
# अंतर-जगातील यात्रा



म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

REFBK-0019009

काका कालेलकर

# आंतर-जगांतील यात्रा

(सन १९७१ ची वासरी)

काकासाहेब कालेलकर

REFBK-0019009

१९७३

परंधाम प्रकाशन, पवनार

प्रकाशक :
रणजित देसाई
परंधाम प्रकाशन, ग्राम सेवा मंडळ,
पो. पवनार (वर्धा) महाराष्ट्र.

आवृत्ति पहिली.

जुलै १९७३.

मूल्य दहा रुपये

मुद्रक :
वि. गो. लवाटे
मॅजेस्टिक प्रिंटिंग प्रेस,
टिळक पुतळा, नागपूर-२.

# वासरीची जन्मकथा

लहानपणीच लिहायला वाचायला शिकलो. शाळेत आणि कॉलेजात जे लिहावे लागते त्यात आळस केला नाही. आलेल्या पत्रांची सविस्तर उत्तरे देखील उत्साहाने लिहिली. हाताच्या बोटात काहीच दोष नाही पण कोण जाणे कसे, मला लिहिण्याचा भयंकर कंटाळा येऊ लागला. यथेच्छ वाचावे, दिवस-रात्र बोलावे याला आपली तयारी. पण लिहिण्याचा प्रसंग आला आणि न लिहिल्याने कितीहि नुकसान होत असले, तरीहि लिहायला मन तयारच होत नाही.

माझ्या भाग्याने या कंटाळ्याला पुरी मदत केली. जन्मभर शिक्षणाचेच काम करीत आल्यामुळे कुणी ना कुणी विद्यार्थी आसपास असायचाच आणि हे सर्व तरुण उत्साही साहित्यभक्त. माझी प्रवासवर्णने, निरनिराळ्या विषयांची चर्चा वगैरे सर्व बाबतीत साहित्यगुण दिसून आल्यामुळे हे तरुण केव्हाहि मी सांगेन ते लिहायला उत्सुकतेने तयार.

यामुळे प्रौढ वयातील माझे सगळेच लिखाण दुसऱ्यांच्या हातून लिहिले गेले आहे.

यानंतर आपल्या आयुष्यातील विविधता आणि भेटायला आलेल्या लोकांची अनेक प्रकारची संस्कारिता, नमूद करून ठेवलेली बरी असे वाटून मी आपली दैनिक रोजनिशी लिहवावयाला लागलो.

या वेळी मी गांधीजींच्या आश्रमात असल्याने गुजरातीत लिहायला लागलो होतो. माझे 'लेखक' सगळेच गुजराती. माझे संभाषण आणि चिंतन मुख्यत्वे गुजरातीतच चालावयाचे. त्यामुळे माझी रोजनिशी देखील गुजरातीतच लिहिली जाणे स्वाभाविक होते.

माझ्यात महाराष्ट्री प्रांताभिमान मुळीच नव्हता आणि गुजराती लोकांनी मला इतका आपलासा केला, की गुजराती ही माझी केवळ रोजच्या व्यवहाराची नव्हे तर हृदयाची भाषा झाली. 'हा पूर्णपणे गुजराती झाला आहे' असे महाराष्ट्री स्नेह्यांनी मला चिडवून पाहिले पण त्याचा काही उपयोग झाला नाही.

मी म्हणे—' मी जन्माने मराठी-भाषी आहे. जन्मापासून घरीदारी मराठीच वापरली आहे. माझे शिक्षणहि महाराष्ट्रात झाले आणि विशेष म्हणजे महाराष्ट्री संतांचे आणि वीर पुरुषांचे मराठी साहित्यहि मी वाचले आहे. माझी मराठी भक्ति मुळीच कमी झाली नाही. पण तिच्याबरोबर गुजराती किंवा हिंदी भाषेची भक्ति तितक्याच उत्कटतेने मी केली तर मराठीचा द्रोह होतो हे मला पटत नाही. मातृभक्तीने कधी शिकवले नाही की मावशीला परकी मानावे (मराठीची एक म्हण मी लहानपणीच ऐकली होती. पण ती वापरण्याची इच्छा कधी झाली नाही—' माय मरो पण मावशी उरो,' मी म्हणायचा, ' माय मरो ' कशासाठी ?) मी लहानपणी मावशीचे प्रेमहि उत्तम मिळविले आहे आणि राहिलो आहे आईजवळच...'

अशा स्थितीत गोव्याचे तरुण मित्र रवींद्र केळेकर एकदा मला म्हणाले, ' आपली साहित्यसेवा गुजराती मार्फत आणि हिंदी मार्फत होवो. त्याचा मला द्वेष नाही. पण तुमची रोजनिशी–डायरी–तुम्ही मराठीत का लिहू नये ?'

मला त्यांचे म्हणणे पटले. पण अमलात आणणे सोपे नव्हते. तरीहि मी विचार केला, मी जे काही लिहवतो ते सर्व समाजासाठी असते. त्याची भाषा समाजाच्या सोयीप्रमाणे पसंत करायची असते. पण रोजनिशी आपण स्वत:साठी लिहितो. हा साहित्य प्रकारच ' आत्मनेपदी ' असतो. मी ज्या-अर्थी जन्माने महाराष्ट्रीय आहे त्याअर्थी माझी रोजनिशी मराठीतच लिहवणे योग्य होईल.

आता ' रोजनिशी ' शब्द मला गोड वाटेना. माझ्या साहित्य सेवेत नवीन नवीन शब्द तयार करण्याची कला मी आपलीशी केलीच होती. तेव्हा एक नवा शब्द तयार करण्याचे ठरवले. आजकाल रोजनिशीच्या ऐवजी ' डायरी ' शब्दच अधिक रूढ होऊ लागला आहे. ' दैनंदिनी ' शब्द हिंदीकडून घेतला असेल. तो चांगला आहे पण मला वाटले की ज्याप्रमाणे Day वरून Diary शब्द झाला आहे त्याचप्रमाणे ' वासर ' शब्दापासून ' वासरी ' शब्द का बनवू नये ? इतक्यात शंका आली की Diary मध्ये ' i ' हे अक्षर कसे आले ? शोध करता समजले की day वरून नाही. पण

एका लॅटीन शब्दावरून डायरी हा शब्द आला आहे. पण नेहमीच्या मंत्रात 'रवि वासरे', 'गुरु वासरे' असे म्हणतो त्यांत 'वासर' शब्द येतो. त्या-वरून 'वासरी' शब्द मी बनवल्यानंतर तोच मला आवडू लागला आणि हा शब्द चालेल अशी लक्षणे दिसू लागली आहेत.

सन १९७१ मध्ये मी माझी वासरी मराठीत लिहवावयाला प्रारंभ केला दैनिक नोंदीतील पहिला भाग त्या त्या दिवशी कुठे गेलो, कोण भेटले, काय वाचले, काय खर्च केला वगैरे अत्यंत जरूरी माहिती द्यायची आणि उत्तरार्धात त्याच गोष्टीवरून जे विचार सुचले, चिंतन घडले अथवा ज्या सूचना कराव्याशा वाटल्या ते सर्व थोडक्यात देण्याचे ठरवले. बाजारात ज्या वासऱ्या मिळतात, त्यांपैकी एक मोठी वासरी पसंत केली आणि ठरविले की एका पानात मावेल तेवढेच तीत लिहावयाचे, अधिक नाही

याप्रमाणे वर्षभर ही प्रवृत्ति अबाधित चालली. हिचा उपयोग स्वतः पुरताच असल्याने पुढे हिचे काही करायचे उरले नव्हते. पण रवींद्रांना वाटले, की यात महत्त्वाचे चिंतन येते. विषयाची विविधता भरपूर आहे. साहित्यगुण तर स्वाभाविक असतो तो तर असणारच. तेव्हा थोडीफार काटछाट करून ही एका वर्षाची वासरी मराठी वाचकांना अर्पण करावी. रवींद्रांनी आपल्या सूचनेला कवि बोरकरांचा पाठिंबा मिळविला. पण त्यांनी संपादन केलेली ही वासरी संपूर्ण स्वच्छ लिहून काढण्याचे श्रम मात्र त्यांनी आपल्या सहधर्मचारिणीवर सोपविले. चि. गोदू मलामुली सारखी. तिने मोठ्या उत्साहाने हे सर्व लिखाण आपल्या सुंदर अक्षरांत व्यवस्थितपणे लिहून काढले.

इतकी पूर्वतयारी झाल्यानंतर जेव्हा प्रकाशनासाठी माझी अनुमति मागितली गेली तेव्हा नाही म्हणण्याचे कारणच उरले नाही. माझे सगळे जीवन आणि चिंतनदेखील राष्ट्रसेवेत आणि संस्कृति-संवर्धनात गेलेले. गांधीजींच्या कृपेने जीवनात आणि सेवेच्या क्षेत्रात खोलीहि आली आणि विविधताहि आली.

तरीहि संमति देण्यापूर्वी सर्व लिखाण एकदा पाहून घेतले. काही भाग

गाळला. काही नांवे गाळणे आवश्यक वाटले. अत्यंत जरूरी वाटले तेथेच नांवे गाळली आहेत.

या वासरीमुळे वाचकांना सगळ्या देशाचा काहीसा प्रवास घडणार आहे. निरनिराळ्या प्रांतांतील उत्तमोत्तम संस्थांचा आणि त्या चालवणाऱ्या राष्ट्रसेवकांचा उल्लेख येथे त्यांना दिसून येईल. आयुष्याची अत्यंत महत्त्वाची वर्षें महात्माजींच्या सहवासात आणि त्यांच्या कार्यांत घालवलेली असल्याने भारताच्या सार्वजनिक जीवनाशी माझा उत्कट संबंध जडला गेला. महात्माजींची साप्ताहिके चालवण्याची जबाबदारीदेखील मधून मधून माझ्या वाट्याला आल्यामुळे राष्ट्राच्या सर्वोच्च नेत्यांशीदेखील परिचय वाढला, यामुळे हे लिखाण पूर्णपणें आत्मनेपदी असले तरी ते वाचकांना रोचक, काही अंशी प्रेरक आणि मधूनमधून बोधक होईल असा विश्वास वाटतो.

माझी इच्छा आहे की, ७१ सालची ही वासरी वाचणाऱ्या तरुण वाचकांना आतापासून स्वतःची वासरी लिहिण्याची प्रेरणा व्हावी. स्वतःचेच विचार आणि अनुभव का असेनात, बराच वेळ गेल्यानंतर तटस्थपणे ते वाचण्यात एक प्रकारचा आनंद असतो आणि त्यामुळे जीवनचिंतनदेखील शुद्ध आणि समृद्ध होऊ शकते. जीवनातील कित्येक चुका टाळता येतात आणि नवी नवी कार्यक्षेत्र दृष्टीसमोर उघडी होतात.

कसेहि असो, स्वतःच्या जन्मभूमीची, जन्मभाषेची आणि संस्कृतीची सेवा घडत आहे, या विश्वासाने याच्या प्रकाशनाला मी संमति देत आहे. आणि या सर्व लिखाणाला माझे आशीर्वाद देत आहे.

यातील कोणताहि भाग, भारतातील नियतकालिकांमध्ये मुळात किंवा अनुवादून, प्रकाशित करण्याची सर्व सामान्य अनुमति येथेच देऊन ठेवतो. त्यामुळे बराचसा पत्रव्यवहार वाचेल.

'सन्निधि',
राजघाट,
नवी दिल्ली.
१८-९-७२.

—काका कालेलकर

# आंतर-जगातील यात्रा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
क्रमांक........
नोंद ........

१८००४

### जानेवारी ७१

मुंबई

१–१–७१

इतक्या वर्षांनी आज जन्मभाषेत वासरी लिहीत आहे. माझ्यात प्रांताभिमान नाही आणि मी मराठीत वासरी लिहावी म्हणून आग्रह करणाऱ्या रवींद्रात[१] देखील कोणतीच संकुचितता नाही. ते मराठीला आपली जन्मभाषा म्हणायला देखील तयार नाहीत. त्यांची कोंकणी-भक्ति

---

[१] रवींद्र केळेकर– गोव्यातील कोंकणी चळवळीचे एक नेते आणि काकासाहेबांचे सहकारी.

मला आवडते. त्यांनी मी वासरी मराठीत लिहिण्याचा आग्रह करावा ही या वर्षीच्या प्रारंभी खास नोंदण्याजोगी हकीकत आहे. मराठी भाषा त्यांना पोटभर आशीर्वाद देईल आणि त्यांना दीर्घायुहि करील.

मी काल चि. दीपकला[२] लिहिले की 'यंदा' दिल्ली सोडणार आणि 'येत्या वर्षी' मुंबईला पोहोचणार! तरीहि तुला बडोद्याला भेटण्यासाठी थांबण्याइतकी फुरसत मला नाही. क्षणभर तारखांचा विचार केल्यानंतर हा वस्तुस्थितीतील विनोद त्याच्या ध्यानात यावा.

चि. वसंत[3] आणि 'मीठी' मॅकली यांना आशीर्वाद देण्यासाठी आणि दोन्ही समाजाचे[४] अभिनंदन करण्यासाठी मुद्दाम मुंबईला आलो आहोत.

उद्या गोव्याला जाण्यासाठी निघू.

गोवा ही माझी जन्मभूमि आहे असे मला म्हणता येणार नाही. पण आम्ही तेथील मंगेशाचे भक्त. म्हणून गोवा ही माझी आणि आमच्या कुळाची धर्मभूमि आणि पुण्यभूमि आहे असे म्हणता येईल. गोव्याच्या लोकांची कलात्मक अभिरुचि आणि त्यांचे आदरातिथ्य दोन्ही मला अत्यंत आवडली आहेत.

हिंदुधर्माला त्याच्या विकृतीबद्दल जणु शिक्षा करण्यासाठी आणि भारतापुढील धर्म-समन्वयाचे दैवी 'मिशन' सिद्ध करण्यासाठी ईश्वराने या देशावर विदेशी लोकांची राज्ये ठोकून बसविली. त्याचा सगळ्यात अधिक भार गोव्याला सहन करावा लागला, त्यामुळे गोव्याची भूमि ईश्वराची मान्य प्रयोगभूमि होऊन चुकली आहे.

या सर्व गोष्टी भारतीय लोक समजतील काय? का अजूनदेखील पुन्हा पुन्हा शिक्षा भोगूनच आपणाला शहाणे व्हायचे आहे?

---

[२] दीपक कालेलकर– काकासाहेबांचे पौत्र.

[3] वसंत नाणावटी– काकासाहेबांच्या मानस-कन्या कु. सरोजिनी नाणावटी यांचे बंधु. डॉ. अशोक नाणावटींचे चिरंजीव. मॅकली पारशी मुलगी. वसंतशी तिचे लग्न नुकतेच झाले.

[४] हिंदु व पारशी समाज.

संतकार्य आणि अवतारकार्य यांतील भेदांचे चिंतन जोराने चालू आहे. महात्माजींचे कार्य हे संतकार्य होते. हीच त्यांची थोरवी.

मुंबई, आगबोट
२-१-७१

चि. बाळाचे[1] नवे दोस्त श्री. विश्वासराव चौगुले यांनी गोव्याला जाण्याची सगळी सोय करून दिली. आणि त्यांच्या सुंदर नवीन जहाजामध्ये, 'रोहिणी'मध्ये, बसून आम्ही पणजीपर्यंत बादशाही समुद्रयात्रा केली. रात्री 'रोहिणी'चे कॅप्टन श्री. भोसले यांना आकाशातील 'रोहिणी' नक्षत्र दाखवताना फार आनंद वाटला.

समुद्र इतका शांत होता की एक लाटदेखील कोठे फुटत नव्हती आणि आमचे जहाजहि डोलत नव्हते. चि. सरोजबरोबर सूर्यास्त बघण्याचा आनंदहि उत्तम होता. अपूर्व म्हणणार नाही. कारण गेल्याच आठवड्यात सरोजबरोबर सामुद्री सूर्यास्त आणि सूर्योदय अनेकदा अनेक ठिकाणी पाहिले आहेत. प्रवास अत्यंत सुखाचा झाला. पण माझ्या 'तुफान-प्रेमी' मनाला प्रवास अळणी वाटला असे म्हटले तर मिठाचा आगर असलेला समुद्र माझ्यावर खात्रीने चिडणार आणि म्हणणार, "माझ्या प्रवासाला अळणी म्हणतोस तर तुला समुद्रात बुडून मरण्याचेच भाग्य लाभो." रत्नागिरी बंदराजवळून जाताना तेथे मागे भेटलेले आमचे अप्पा पटवर्धन आणि तात्या सावरकर आठवले. पण तारादर्शनाच्या आनंदापुढे त्या जुन्या गोष्टी मनातल्या मनात विरून गेल्या. क्षणभर का होईना त्या आठवल्या हेच त्यांचे महत्त्व.

गोव्याच्या यात्रेत गिरसप्पाची यात्रा चंद्रकांतने[2] घुसविली. त्यामुळे शंकरराव गुलवाडींना[3] वाटेत भेटण्याचा लोभ उत्पन्न झाला

[1] काकासाहेबांचे द्वितीय पुत्र डॉ. बाळ कालेलकर.
[2] चंद्रकांत केणी, मडगांवच्या दैनिक 'राष्ट्रमत'चे संपादक.
[3] कर्नाटकातील एक प्रसिद्ध सर्वोदय कार्यकर्ते.

आणि त्यांनी चंद्रकांताकडून भक्कम तीन दिवस मागून घेतले. दूधसागरचा सुंदर धबधबा आणि जोगचे चार भव्य धबधबे एकामागून एक पहायला मिळणार याचा आनंद पुन्हा पुन्हा आठवतो.

प्रपात म्हणजे जीवनाचा अध:पात अशी कल्पना एका काळी सुचली आणि लिहून ठेवली. याचा पश्चात्ताप अजूनहि पुरा झाला नाही. हा पश्चात्ताप धुण्यासाठी मी 'कायोत्सर्गा'चा लेख[४] लिहिला याचे बरे वाटले.

पणजी–प्रियोळ–वास्को दा गामा

३–१–७१

'रोहिणी'च्या ऐसपैस कॅबीनमध्ये मनसोक्त झोप घेऊन पहाटे पूर्वीच उठलो. दक्षिणेकडे सदर्नक्रॉस चांगला उंच आला होता. मला सदर्नक्रॉसचे देशी नांव लवकर आठवेना याची लाज वाटली. पुढे आठवले की सदर्न-क्रॉसपैकी तीन ताऱ्यांचा त्रिशकु बनतो. मग त्याच्या शेजारी उभा असलेला तारा कोण ? वसिष्ट का विश्वामित्र ?

'हा पहा तुमचा त्रिशंकु' असे म्हणून बोट दाखवणारे दोन तारे जय आणि विजय चटकन् डोळ्यात भरले.

पश्चिमेकडे 'बृहत् श्वान' (Canis Major) समुद्रात बुडलेल्या मृगाला धरण्यासाठी पाण्यात बुडी मारण्याची तयारी करीत होता आणि पूर्वेच्या बाजूला गुरु आणि शुक्र चांगले वर उगवून एकमेकांचे समर्थन करीत होते.

पाहता पाहता पणजीला पोहोचलो. आमच्या उत्कंठेमुळेच की काय, 'रोहिणी' एक तास अगाऊ येऊन पोहोचली स्वागतासाठी धक्क्यावर कोणीच दिसेनात ! पण आम्हीच 'हावरेपणाने' लवकर पोहोचलेलो. तेव्हा यजमानांचा दोष नव्हता.

---

[४] पाहा: 'जीवनाचा कायोत्सर्ग' हे काकासाहेबांचे पुस्तक.

थोड्या वेळाने यजमान येऊन पोहोचले त्यांच्याबरोबर आम्ही प्रियोळला गेलो. केरळचे सृष्टिसौंदर्य नुकतेच पाहून आलेले आम्ही! तरीहि 'मांडवी' आणि 'झुवारी' या नद्यांमुळे गोव्याचे सृष्टिसौंदर्य श्रेष्ठ ठरते असे म्हणून आम्ही गोव्याविषयीचा आमचा पक्षपात सिद्ध केला.

रवींद्रांच्या आतिथेय घराविषयी मी बाळाशी बोललो होतो. रवींद्रांच्या मातोश्रींना भेटताना हृदय जड झाले.[1] चि. गोदूने[2] आतिथ्यधर्म उत्तम चालविला. त्या आनंदात मनातील विषाद ओसरला.

लगेच मुरगांवला रवाना झालो. रोहिणीतून सूर्योदय पाहिलेला होता. त्यामुळे वास्कोच्या 'बॉगमळो' (भाग्यमळ) या वेळावरून सूर्यास्त पाहण्याची संधि मनात टिपली गेली.

रात्री चार-सहा लोकांशी नवीन परिचय आणि विचारविनिमय झाला. अध्यात्माच्या 'समाजशास्त्रीय' भूमिकेवरूनच मी चर्चेत भाग घेतला.

विश्वासरावांचे आतिथ्य पूर्ण हार्दिक असल्यामुळे मोकळेपणा वाटला.

वास्को दा गामा

४–१–७१

अनेक व्यक्तींना भेटण्याची संधि मिळाली. तरीहि आजचा दिवस आरामात गेला असेच वाटले. विश्वासरावांचे बंधु यशवंतराव आणि शिवाजीराव यांच्याशी 'राष्ट्रामध्ये समुद्र-मानस वाढविण्याची आवश्यकता' या प्रश्नावर उपयोगी चर्चा झाली. समुद्राच्या बाजूने देशाच्या रक्षणाच्या बाबतीत सरकारकडून गफलत होत आहे. या बाबतीत एकमत दिसले. सरकारमार्फत नव्हे, पण देशातील पुढाऱ्यांनी–औद्योगिक पुढाऱ्यांनीदेखील–राष्ट्राच्या सर्व लोकात 'समुद्र-मानस' उत्पन्न केले पाहिजे. समुद्रातील ही

---

[1] कारण, रवींद्रांच्या वडिलांचे नुकतेच निधन झाले होते.

[2] रवींद्रांच्या पत्नी.

तुफाने (आणि जीवनातील तुफानेदेखील) जनतेला उत्तम शिक्षण देऊ शकतात हे सर्वांना पटविण्यात जी मानसिक क्रांति होईल ती राष्ट्राला अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्राने 'तुफान-प्रेमी' झाले पाहिजे या विचारावर मी विशेष भर दिला.

संध्याकाळी चौगुल्यांच्या अनेक प्रवृत्तीमध्ये काम करणाऱ्या सेविकांची सभा झाली. मी माझे मुख्य भाषण मराठीत केले. त्यानंतर मराठी न समजणाऱ्या (ख्रिस्ती वगैरे) लोकांसाठी थोडा वेळ इंग्रजीत बोललो. आणि शेवटी आलेल्या एका प्रश्नाचे उत्तरही इंग्रजीत दिले. ' देशात इतके मतभेद आणि भांडणे चालू आहेत अशा स्थितीत तरुणांनी काय करावे ? त्यांना काही मार्ग सुचवा, असा तो प्रश्न होता. (मग समजले की प्रश्न विश्वास-रावांनीच सुचवला होता.) मी म्हणालो की " केवळ चर्चा करणाऱ्यांचे मतभेद संपणार नाहीत. वाढणारच. तरुणांनी मतभेद समजून घ्यावे, पण स्वतःच्या समजुतीप्रमाणे कामास लागावे. 'काम' ही वस्तुच अशी आहे की त्यातून समन्वयाचा मार्ग नेमका सापडतो. 'जुन्या'विषयी सामान्यत: आदर बाळगावा. पण ' जुने ' बाजूला ठेवून, ' भविष्यकाळासाठी ' निष्ठा ठेवावी. भविष्यकाळ तरुणांचा आहे. उदारता, व्यापक दृष्टी आणि सर्जनात्मक नवविचार असावेत" ही सूचना सर्वांनाच आवडली. विश्वासरावांच्या धाकट्या चिरंजीवाला–अशोकला तर ती ! विशेष आवडली !

## वास्को-मडगांव-प्रियोळ

५–१–७१

विश्वासरावांचे आतिथ्य आणि मुरगांवच्या (लहानपणापासून पाहिलेल्या) समुद्री धक्क्याचे पुनर्दर्शन हे वास्कोचे आकर्षण. पण आजच्या दिवसाचे खरे महत्त्व मडगांवची यात्रा हेच होय. गोव्याची राजधानी पणजी असो, पण गोव्याच्या संस्कृतीचे माहेरघर अगदी पूर्वीपासून मडगांव (मठग्राम) आहे.

खरोखर या शहराला अधिक वेळ देणे इष्ट होते.

या प्रवासात फक्त आराम घेणे हाच मुख्य कार्यक्रम असल्यामुळे ख्रिस्ती समाजाचा परिचय वाढविण्याचा आग्रह मी धरला नाही. माझी अपेक्षा होती तितके हिंदु व ख्रिस्ती हे दोन समाज अजून जवळ आले नाहीत. दोनचार पारशी अगदी हिंदु होऊन गुजराती हिंदु लोकात मिसळतात आणि राष्ट्रसेवेत भाग घेतात, तेवढ्याने हे दोन समाज जवळ आले असे जसे म्हणता यायचे नाही, तसेच गोव्याचे आहे. गोव्यातील रोमन कॅथलिक समाज एका काळी अहंमन्य होता. अजूनहि त्यांच्यात आपल्या आस्मितेची आणि मोठेपणाची भावना दूर झालेली नाही. अशा स्थितीत ख्रिस्ती समाजाला आपलेसे करणे सोपे नाही हे खरे. पण जर खुबीने आणि समंजसपणाने काम केले तर हिंदूंना ते अशक्य नाही. पण ख्रिस्ती समाजाला आपला करणे आवश्यक आहे, अपरिहार्य आहे आणि फायद्याचे आहे हे हिंदु समाजाला अजून पटलेले नाही. हिंदु समाजाची राजकीय महत्त्वाकांक्षा उथळ. सांस्कृतिक महत्त्वाकांक्षेचा पूर्ण अभाव, हा समाज जगेल अनंतकाळ-पर्यंत. पण प्रभावी होणे त्याच्या नशिबातच नाही असे मला वाटू लागले आहे.

मडगांवच्या भाषणात माझे विचार अगदी जीव तोडून सांगितले. लोकांनी आदराने आणि अनुकूल हृदयाने ऐकून घेतले. माझ्या विचाराचा हिंदु जीवनदृष्टीवर परिणाम होईल हि. पण "जीवन परिवर्तन होणार असेल तर होवो, आम्ही कसलाच अनुकूल प्रतिकूल प्रयत्न करणार नाही." हा हिंदु समाजाचा स्वभाव. आम्ही खरोखर देवापेक्षा दैवावर विश्वास अधिक ठेवणारे. त्यातहि देवापेक्षा दैवावर एक मात्रा अधिक !

**प्रियोळ**

**६–१–७१**

रोज पाहणाऱ्याला या गोष्टीचे महत्त्व न वाटो, पण सह्याद्रीमधून निघणाऱ्या दोन दूरच्या नद्या–मांडवी व झुआरी–हळूहळू वाट काढत पश्चिम समुद्राला मिळताना अगदी शेवटच्या क्षणाला एक होतात ही जगातील एक

अद्‌भुत आणि अद्वितीय घटना आहे. उत्तरेकडे 'आग्वाद'चे 'स्वातंत्र्य मंदिर' आणि दक्षिणेकडे मुरगांवचे बंदर यांच्यामध्ये एक निसर्ग-रमणीय भूशिर आहे. या भूशिरावरच मांडवीच्या किनारी गोव्याची राजधानी पणजी आहे. आणि भूशिराच्या टोकावर नायब राज्यपालांचा प्रासाद आहे. मुंबई आणि कारवार ही निसर्गाने ठरविलेली भारताची फार मोठी बंदरे, पण दोन नद्यांनी (त्यांची जुनी नांवे: गोमती आणि अघनाशिनी) आग्रहपूर्वक हे तिसरे बंदर तयार केले आहे. या दोन विशाल नद्या पूर्वेकडून खूप दुरून येतात. चांगल्या बोटींना आत घेऊन येतात. खरोखर भारताचे मुख्य बंदर मुरगांवच म्हटले पाहिजे. भविष्यकाळी हे बंदर इतिहासात गाजेल याविषयी मला शंका नाही.

आज कोंकणी लेखकांना आणि इतरांना भेटण्याची संधि मिळाली. हे सर्व सज्जन आहेत. भाषाप्रेमी आहेत. मेहनती आहेत. पण राजकारणात जोर धरण्याची कला यांनी शिकली पाहिजे. मी त्यांना म्हणालों, "कोंकणीचा प्रश्न भाषेचा नसून ती भाषा बोलणाऱ्या हिंदु-ख्रिस्ती जनतेचा आहे. जातीभेद आणि धर्मभेद यामुळे सामान्य जनता एक होऊन आपला धाक उत्पन्न करू शकत नाही. तसे पाहिले तर साम्यवादी-कम्युनिस्ट लोकांना हे उत्तम रान आहे. पण अजून त्यांचे लक्ष या केंद्रावर केंद्रित झालेले नाही. मला वाटते, कोंकणीला पुढे करण्याचे दिवस आता संपले. कोंकणीच्यामार्फत जनतेच्या नांवाने प्रचार करून नवी हिंदु-किरिस्ताव-मिश्रित शक्ति निर्माण करणे शक्य आहे. आता भक्ति कोंकणीची न करता कोंकणीच्या मदतीने जनतेची भक्ति केली पाहिजे. 'उभयविध जनतेच्या हृदयाला आपलेसे करील' असे नवीन साहित्य निर्माण केले पाहिजे. यात नव्या कादंबऱ्यांचाहि समावेश असावा.

प्रियोळ

७–१–७१

मंगेशी, महालसा, कवळेची शांतादुर्गा आणि नागेश—ही मंदिरे पाहिली.

ज्या काळी मी ईश्वराला मानत नव्हतो त्या दिवसात वडिलांनी मला मंगेशीचा प्रसाद पाठवला होता आणि मी देखील तो भक्तिपूर्वक ग्रहण केला होता. खरोखर कुलदेवाचे माहात्म्य अलौकिक आहे. या खेपेला जुने सगळे दिवस आठवले. वेदांताचा साक्षात्कार होऊन देखील कुलदेवाची पकड कमी झाली नाही. या ताज्या अनुभवामुळे तुकारामांचे अद्वैत हृदयाने समजू शकलो. दीपकला भेटेन तेव्हा मंगेशीविषयी विस्ताराने सांगेन. कुलपरंपरा टिकवणे फायद्याचे असते.

चि. सरोज आज वसंत-मॅकलींना निरोप देण्यासाठी मुंबईला जाऊ शकली आणि मी तिला जाण्याचा आग्रह केला, हे सर्व कुलदेवाच्या माहात्म्याइतकेच सुंदर आणि महत्त्वाचे होते.

तिसरी गोष्ट म्हणजे श्री. वासुदेवराव साळगांवकर यांचा परिचय आज चांगल्या रीतीने सुरू झाला.

दामोदर मावजो आणि त्यांची पत्नी शैला मावजो सज्जन दंपति आहे. दामोदर कोंकणीचे आहेत. दुकान चालवतात. त्यांना अगदी आपुलकीने त्यांच्या जीवनाविषयी सल्ला दिला. याचे मुख्य कारण म्हणजे दामोदरच्या मनात रवींद्राविषयी आपुलकी आहे. रवींद्राविषयी दामोदरच्या मनातली आपुलकीची उत्कट भावना पाहून मला आनंद झाला आणि रवींद्राविषयी आत्मीयता वाटली. आणि त्यामुळेच दामोदरच्या जीवनात रस वाटू लागला.

प्रियोळ

८–१–७१

कलेची क्षेत्रे अनेक आहेत. पण कलेतील सौंदर्यदर्शन, समन्वयदर्शन, 'ललित-आणि–भव्याचे' दर्शन–सर्वांच्या मुळाशी जीवनाची कलात्मकता आहे. यामुळेच कलेची व्याख्या उपयोगी होऊ शकते. कला-चिंतकांनी कलेल्या अनेक सुंदर व इष्ट व्याख्या दिल्या आहेत. जीवनकेंद्रित अशा त्या व्याख्यांमुळे कलेला लाभ झाला आहे. कलाचिंतनहि वाढले आहे.

तरीहि माझा दृढ अभिप्राय आहे की कला समजण्याला व्याख्येचा तितकासा उपयोग नाही. कलाकाराने आणि कलारसिकाने कलेचे सुंदर सुंदर नमुने दाखवून लोकांना (आणि स्वतःच्या विद्यार्थ्यांना) उत्साहपूर्वक सांगितले पाहिजे. "हे पाहा, किती सुंदर दिसते ! यातील ही बाजू पाहा, इकडचे हे प्रमाण पाहा, सारे कसे आल्हादक, प्रेरक आहे. चित्तवृत्तीला उचंबळून टाकते."

अशारीतीने कलेचे उत्कृष्ट नमुने अथवा प्रसंग उत्साहपूर्वक दाखवत राहून प्रत्यक्ष दर्शनातून कलात्मकता समजून घेण्याला सामान्यजनांना आणि नवशिक्यांना शिकविले पाहिजे, तयार केले पाहिजे. अशा कलादर्शनातून कलात्मकतेचा उदय हृदयात होतो. कलात्मकता ही धारण करण्याची वस्तु नाही कलात्मकतेची दीक्षा हळूहळू कणशः क्षणशः हृदयाला मिळत गेली म्हणजे हृदयच कलात्मक होते. म्हणून म्हणतो—कलात्मकता धारण करण्याची वस्तु नसून स्वतःला कलामय–हृदय बनण्याचा प्रश्न आहे.

एक गोष्ट येथे नमूद केली पाहिजे. मनुष्याचे हृदय कलामय झाल्यानंतर समस्त जीवनाची अंगउपांगे कलामय झाली पाहिजेत. पण पुष्कळदा ती तशी होत नाहीत. कलेचा उपासक पुष्कळदा एकांगी बनतो. काही बाबतीत कलात्मकता विकसित दिसेल तर काही बाबतीत जडतेचे साम्राज्य असेल. पण एवढ्यामुळे आहे त्याला नकार कसा देता येईल ? सध्या कलात्मकतेच्या वाट्याला एकांगिता आली आहे. मी सर्वांगीण कलात्मकतेचा प्रयत्न पाहिला गुरुदेव रवींद्रनाथांमध्ये. साहित्य, संगीत, संभाषण, चित्रकला, मूर्तिकला, सर्वांमध्ये त्यांचा उत्तम प्रवेश. मी त्यांना जीवनकलाधर म्हणू शकतो. तरीहि त्यांच्यात सर्व बाजू सप्रमाण विकसित झाल्याच होत्या असे म्हणू शकत नाही.

प्रियोळ, मडगांव, कोलवे
९–१–७१

प्रियोळ, मडगांव आणि कोलवे–तिन्ही ठिकाणचे वास्तव्य आणि

प्रवास, जणू एका बगिच्यात फिरत आहोत आणि वनभोजन करीत आहोत असेच वाटते.

आजचे कॉलेजचे विद्यार्थी नेहमी वर्तमानपत्री प्रश्न विचारतात. त्यांना नवीन क्रांतिकारी विचार दिले तरी ते झेपण्याची शक्ति त्यांच्यात नसते. अध्ययनाचे विषय आणि वर्तमानपत्री चर्चा–यांच्याबाहेर ते जाऊच शकत नाहीत. तरीहि मडगांवच्या चौगुले कॉलेजात विद्यार्थ्यांना पश्चिम भारताच्या 'मिशन'विषयी सांगितले. भविष्यकाळची जबाबदारी त्यांची आहे हे त्यांना मी पटवून दिले.

श्री. साळगांवकर दंपतीचा आज खरा परिचय झाला असे म्हणता येईल. ते आपल्या अनेक सहकाऱ्यांना घेऊन आले होते. त्यांनी फार चांगले पंचवीस-तीस प्रश्न लिहून आणले होते. त्यामुळे चर्चेत विविधता आली. ऐकणाऱ्या लोकांना बौद्धिक विरंगुळा असतो पण माझ्या वाट्याला सर्व जीवनस्पर्शी चिंतन आणि नूतन संस्कृतीचा पाया बनविणे- –या सारखे हे काम असते. तेव्हा मला तर पूर्ण फायदा मिळतो. संस्कृति प्रचारकाला पुनरुक्तीचा कंटाळा कधीच नसतो (ही गोष्ट गांधीजींच्या सहवासाने मला पूर्ण पटली). पाऊस जसा सर्वत्र पडतो, उपयोग होवो न होवो, त्याप्रमाणे संस्कृति प्रचाराचे काम आहे.

एक कॅथोलिक फादर भेटला. नमुनेदार व्यक्ति होती त्याने सर्व-काही ध्यानपूर्वक ऐकले. पण स्वतःची प्रतिक्रिया अस्पष्टपणेहि सुच-विण्याची त्याची तयारी नव्हती. पोपच्या संस्कृतीत 'चर्च' मजबूत होते. एवढ्याचाच या लोकांना संतोष.

कोलवे, मडगांव, कारवार, अंकोला.

१०–१–७१

कोलवेच्या वेळेवर राहण्याचा आनंद मिळाला. अगदी कारवारची आठवण झाली. सकाळी मोकळ्यावर ध्यान–प्रार्थनेला सर्वजण जमून बसलो. नेहमीप्रमाणे ध्यानासाठी डोळे मिटले. इतक्यात भोगीरची (भुवन-गिरीची) आठवण झाली. 'ही पांढरी शुभ्र रेती, ही उंच नारळाची झाडे

आणि त्यांच्यामागे अखंड प्रार्थना गर्जविणारा समुद्र या दर्शनाचेच ध्यान कां करू नये ? भोंगीरचा पहाड हे एकप्रकारचे विश्वदर्शन होते. समुद्रवेलेचे विस्तीर्ण दर्शन हा दुसरा साक्षात्कार,' याचे ध्यान करता करता डोळे आपोआप मिटले. पण डोळयात शिरलेले दर्शन पापण्या मिटवू शकल्या नाहीत. न कळत मध्येच डोळे उघडत, मध्येच बंद होत. पण त्यामुळे काहीच फरक होत नव्हता.

ध्यान एकटयानेच करायचे असते. तरीहि बरोबर साथी असले तर माझे ध्यान समृद्ध होते. प्रार्थनेचेहि असेच.

प्रियोळला रवींद्र आणि गोदू, त्यांच्या हल्लीच्या जीवनासमवेत, माझ्या ध्यानात हजर असत. पण काल रवींद्रांना लिहिलेली जुनी पत्रे वाचत होतो. त्यामुळे त्यांचा आणि चि. गोदूचा जुना परिचय आणि सहवास जागृत होऊन या चालू सहवासाची खोली पुष्कळच वाढली. यामुळे ध्यानाची उत्कटता देखील खोलवर पोहोचली. समृद्धीखेरीज दुसरा शब्द वापरताच येत नाही.

सभोवतालचा निसर्ग, त्यात आपण जगत असलेले जीवन आणि यामुळे अखंड अनुभवास येत असलेली संस्कृति, यांच्या समृद्ध भांडवलावर चालवलेले ध्यान कोणाहि उद्योगपतीच्या आमदानीहून कमी श्रीमंत नसते. हा अनुभव खरोखर तृप्तिदायक आहे. मी नेहमी म्हणतो की लहानपणी मंदिरातून जे देवदर्शन घडत असे त्यापेक्षा हिमालयातील शिखरांवरून जे ईश्वरदर्शन घडते तेच अधिक पोषक होते. आणि समुद्रदर्शनहि तसेच. कालिदासाला उपमा देतांना देखील माझ्याप्रमाणेच हिमालय आणि समुद्र एकत्र[१] आठवत.

अंकोला, होन्नावर, जोगप्रपात

११-१-७१

मी जन्मभर अनेक घरांचा पाहुणचार घेत आलो आहे. तेव्हा

---

[१] समुद्र इव गांभीर्ये, धैर्येण हिमवान् इव ।

पाहुणचारामुळे एखाद्या कुटुंबाविषयी अभिप्राय नक्की न करण्याइतका मी अनुभवी आहे. अंकोल्याचे श्री. हरि पै यांच्या कुटुंबाचे वातावरण मला आकर्षक वाटले. घरच्या सर्व लोकांवर स्वतः हरि पैंचा प्रभाव दिसून आला आणि तरीहि सर्व वातावरणाचे स्वतः स्वामी व्हावे असा त्यांचा आग्रह दिसला नाही.

'ख्रिस्तमित्र आश्रम' ही संस्था चांगली आहे. पण जुन्या ख्रिस्ती नीतीमुळे या संस्थेचा विकास होणे कठिण दिसते. कदाचित् माझ्या दृष्टीचा हा पूर्वग्रह असेल.

मला वाटते स्वराज्य झाल्यानंतर हिंदुस्थानात गांधीप्रचारामुळें ख्रिस्ती समाजाविषयी जी आपुलकी उत्पन्न झाली आहे तिचे महत्त्व ओळखून वेळीच फायदा घेण्याइतका तो समाज अजून जागृत झाला नाही. हिंदुसमाजातील ही अनुकूल वृत्ति अल्प काळ टिकेल आणि ख्रिस्ती समाजाने जर सर्वधर्मसमभाव अथवा धर्मकुटुंब वृत्ति स्वीकारली नाही तर हिंदुसमाजाला ख्रिस्ती समाज जवळजवळ मुसलमानाइतकाच दूरचा वाटेल. गांधींनी उत्पन्न केलेले वातावरण कोणत्याहि धर्मापेक्षा ख्रिस्ती धर्मसमाजाला अधिकाधिक अनुकूल आहे. पण यांच्यासारख्या धर्मसमाजांचा आग्रह असतो की आपले वैशिष्टच टिकविण्यातच आपले जीवन-सर्वस्व आहे आणि यथाकाळी आपला धर्म जगदेकसम्राट होणार या रूढ महत्त्वाकांक्षेमुळे ख्रिस्ती–धर्म–समाज आपले नुकसान करून घेणार. पोप जर या दिशेने भीत भीत प्रगति करील तर त्याची ती प्रगति वाया जाईल.

या खेपेला जोगचे दर्शन क्रमशः झाले. प्रथम राजाखेरीज बाकीच्या तिहींचे दर्शन, त्या नंतर अंधकारात चारी प्रपातांचे दर्शन. हे दर्शन अंधः-कारात विलीन होण्याची तयारी होते न होते इतक्यात चंद्र मदतीला धावून नव्हे, तर उगवून आला आणि पाण्याच्या तुषारांचे धुके या वातावरणात आपले खेळ बेमालूमपणे खेळू लागले. सगळ्या दिवसाच्या चिंतनाला एकदम कलाटणी मिळाली. जीवनाच्या गतीला एकदम कलाटणी मिळणे याचेच नांव प्रपात. या प्रपातांच्या दर्शनातून मला क्रांतिशास्त्राचे व्याकरण समजले, आणि नवीच दीक्षा मिळाली.

जोगप्रपात-होन्नावर-अंकोला

१२–१–७१

काल जोगच्या प्रपातांचे, वाढत्या अंधारात आणि मग वाढत्या चांदण्यात दर्शन घेण्याचा आनंद लुटला. आज सकाळपासून हेच चारी प्रपात अगदी स्वच्छ, उज्ज्वल प्रकाशात पहावयास मिळाले. ध्यान धरून त्यांचे दर्शन घेतले. विशेष आनंद म्हणजे चारहि प्रपातांच्या पायाशी पसरलेले इंद्रधनुष्य ! आमच्या डाव्या बाजूने खडकावरहि इंद्रधनुष्य दिसत होते. राजा, रुद्र आणि वीरभद्र ओलांडून पार्वतीच्या पायथ्याशी या धनुष्याने पाणीच रंगवून टाकले होते. जणू का धनुष्याचे रंग पाण्यात मिसळून वाहू लागले आहेत. धनुष्य दिसताच प्रतिधनुष्य शोधल्यावाचून मला समाधान कसे होणार ? या धनुष्याच्या बऱ्याच वर, रंगाचा क्रम उलटवून प्रतिधनुष्य आपले अस्तित्व जाणवून देत होते. सर्व दृश्य डोळाभर आणि हृदयभर पाहून, आम्ही दोन सज्जन एक्झिक्युटिव इंजिनियरांच्या मदतीने, दोन मनुष्यकृत सरोवरे पहावयास गेलो. इंजिनेरी कौशल्य कितीहि महत्त्वाचे असो, तेथे ध्यान द्यावयाचे नाही असे ठरवून आम्ही दोन्ही सरोवरांची शांत, रमणीय शोभा अनेक बाजूंनी पाहून घेतली आणि स्टीम लाँचमध्ये बसून सरोविहारहि केला. मला तर काव्यदृष्टीने हीं दोन सरोवरें प्रपातापेक्षा कमी महत्त्वाची वाटली नाहीत. सरोवरांतील एखाद्या बेटात निवृत्ति आश्रम काढून राहिल्यास केवढी प्रसन्न साधना होईल, असाहि विचार मनात आला. सरोवर-दर्शन या खेपेला नवीनच होते. म्हणून देखील त्यांचे चिंतन अधिक झाले आणि त्याबरोबर मनुष्यकृतीचा गौरवहि वाटला.

अंकोला-कारवार-प्रियोळ

१३–१–७१

माझ्या अपेक्षेपेक्षा अंकोल्याने अधिक आणि विशेष प्रगति केलेली दिसते. माझ्या वेळच्या कारवारात आणि आजच्या कारवारात सृष्टिसौंदर्या-

खेरीज काहीच साम्य उरले नसावे. तरीहि समाज तोच तो आहे. समाजाचे भाग्य खुद्द कारवारात आणि त्याची दृष्टि मात्र कारवारबाहेर अशी या शहराची स्थिति आहे. माझ्या मनात नेहमी मुंबई, मुरगांव आणि कारवार ही तीन बंदरे एकत्रपणेच उपस्थित होतात. कारवारचे लोक बाहेरच्या दुनियेत जातात. त्याऐवजी बाहेरच्या दुनियेला आपल्याकडे खेचून आणतील तर समस्त समाजाचा अद्यतन उद्धार होईल.

आज मी हिंदु स्कूलला पुरेसा समय देऊ शकलो. हिंदु स्कूलचे दोन किंवा तीन अवतार झाले आहेत. माझ्या मते हिंदु स्कूलची वैशिष्टये दोन. (१) हिंदु शब्दाचा व्यापक अर्थ आणि (२) सर्वधर्म समभावयुक्त धार्मिकतेचा स्वीकार.

यापैकी 'हिंदु' शब्दाचा व्यापक अर्थ टिकू शकला नाही. हिंदुसभेने या शब्दाचा संकुचित अर्थ केला आणि सावरकरांनी आदर्शातच विकृति आणून शब्दाची व्यापकतादेखील विकृत करून टाकली. आता हा शब्द पुन्हा व्यापक अर्थाने वापरला जाईल असा विश्वास वाटत नाही.

आणि सर्वधर्म समभाव येथे विकसित करण्याच्या ऐवजी धर्म-निरपेक्ष निधर्मी उदासीनताच या संस्थेत शिकविली जात असावी अशी शंका येते

या बाबतीत माझ्या विचारांची स्पष्टता करून त्याचे महत्त्व समजावून सांगण्याचा मी मनापासून प्रयत्न केला. पण बर्फ वितळलेला दिसला नाही. आता पुन्हा एकदा त्या लोकाना विस्तृत पत्र लिहावे असा विचार येतो. सर्वधर्मसमन्वय जर हिंदु स्कूलमध्ये उरला नाही, वाढला नाही तर केवळ एकेकाळी या विद्यालयात मी होतो आणि त्या वेळचे वातावरण समन्वयाला पोषक होते एवढ्या कारणासाठी संस्थेला आपली म्हणण्याची माझी तयारी नाही आणि म्हणूनच एकदा प्रयत्न करून पाहणार. सर्वधर्म--परिवाराच्या भावनेतूनच धर्माचा प्राण जागृत होऊ शकेल. नाहीतर धर्मांची मढी कुजत राहतील आणि दुर्गंधीच पसरवितील.

प्रियोळ-पणजी-प्रियोळ
१४-१-७१

बिहारच्या उमेशचंद्र त्रिवेदीने जयप्रकाशांच्या ताज्या कामाचे वर्णन लिहिले आहे. ते वाचून जयप्रकाशांविषयी आदर एकदम वाढला. त्यांनी खरे गांधीकाम आता सुरू केले आहे. त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

संत फ्रान्सिस झेवियरचे मंदिर पाहिले Bom Jesus Basilica. जगातील सर्व कॅथलिक येथे येतात. शवदर्शनासाठी खास येतात. रशिया-मध्ये लेनिनच्या शवाची अशीच भक्ति होते. हे मी प्रत्यक्ष पाहिले आहे. गांधींच्या मृत्यूच्या वेळी, मला वाटते, माउंटबॅटननी, 'गांधीवाल्यां'ना विचारले, 'शव embalm करून ठेवायचे आहे काय ?' आम्ही लोकांनी स्पष्ट नकार दिला. मूर्तिपूजा वाईट नाही. ती प्रतीक पूजा आहे. पण शव-पूजा निश्चितपणे अग्राह्य असावी. तरीहि गोव्याच्या या ख्रिस्ती मंदिरात झेवियरच्या शवाची पेटी आज पाहिली.

झेवियरविषयी मला आदर आहेहि आणि नाहीहि. युरोपमधून तो भारतात आला. येथून जपानात गेला. जबरदस्त धर्मप्रचारक. त्याला ख्रिस्ती धर्माचे उत्तम स्वरूप जसे समजले होते, तसेच धर्माची उतरती बाजूदेखील मान्य होती. त्या बाजूलादेखील तो श्रेष्ठ मानत असावा. माझ्या मते स्वामी विवेकानंद कितीतरी श्रेष्ठ युग-संत होते. भगवान् येशूने 'सहन'धर्माची पराकाष्ठा केली. त्यांच्याच काही शिष्यांनी विरोधकाचे हाल हाल करून त्यांचा उद्धार करण्यात धर्म मानला !!

पणजीतील माझे व्याख्यान महत्त्वाचे होते. पण मला ते आवडले नाही मी प्रथम समाजशास्त्र काय आहे हेच विस्ताराने समजावले असते तर श्रोते माझे म्हणणे योग्य रीतीने समजले असते. पण मी वाहून गेलो.

प्रियोळ-पणजी-प्रियोळ
१५-१-७१

मोठी व्याख्याने किंवा परिषदेतील चर्चा आता माझ्या उपयोगाची

उरली नाहीत. आणि संस्था-संचालनासाठी प्रत्यक्ष सूचना देण्याचेहि काम उरले नाही. आता ज्या लोकांना व्यक्तिगत आणि सामाजिक जीवन सुसंस्कृत आणि विकसित करावयाचे आहे, आणि जे लोक प्रत्यक्ष या कामात पडले आहेत असे अध्यापक, राष्ट्रसेवक, धर्मप्रचारक आणि संस्था-संचालक यांना जीवन-तत्त्वज्ञानात्मक माझा अनुभव सांगावयाचा. त्या अनुभवाला, आवश्यक असेल तेथे गांधीविचाराचा पाठिंबा द्यावयाचा. शक्य असेल तेथे संभाळून संभाळून विचार-शुद्धीला मदत करावयाची आणि हे सर्व यथाकाळी उगवणार अशा श्रद्धेने संतोष मानावयाचा; हे माझे मुख्य काम आहे.

आपल्याकडले पुरोहित आणि धर्मगुरु आणि ख्रिश्चनातील पुरोहित आणि धर्मगुरु यांच्यात तसा फरक नाही. रूढीवादालाच दोघेहि धर्म मानतात. समाजापेक्षा स्वतःची आध्यात्मिकता आणि चारित्र्य श्रेष्ठ असली पाहिजेत, याचा आग्रह दोहोंत मुळीच दिसत नाही. तरीहि ख्रिस्ती धर्मगुरु अधिक संस्कारी असण्याचा संभव आहे. या लोकांना जसे शिक्षण मिळते तसे आपल्या पुरोहितांना, पुजाऱ्यांना आणि धर्मपंडितांना मिळाले पाहिजे. आणि दोन्ही धर्मांच्या अशा लोकांना सर्व धर्मासंबंधाने खरोखर आदर वाटू शकेल अशा प्रकारे त्यांच्यासाठी शिक्षणक्रमहि तयार केला पाहिजे. आणि तशाच संस्कारी लोकांकडून त्यांना हे नवे शिक्षण देवविले पाहिजे. एकदा शुभ प्रारंभ झाला तर हे काम उत्तम चालेल असे वाटते. रामकृष्ण मिशनच्या कामामुळे हा विश्वास दृढ होतो. या दिशेने मी स्वतःहि काहीतरी केले पाहिजे.

जुने गोवे-मडगांव-प्रियोळ

१६-१-७१

आजच्या दिवसाचा मुख्य अनुभव म्हणजे मडगांव नगरपालिकेकडून मिळालेले मानपत्र. देशात आणि परदेशात मिळालेल्या बहुमानासारखा

हा बहुमान नव्हता. यात असाधारण आत्मीयता होती. विशेष म्हणजे माझ्या यत्किंचित सेवेविषयी कृतज्ञता होती. मानपत्र कोंकणीत वाचले गेले. भाषणे चांगली झाली. श्रोत्यांची संख्या मावत नव्हती.

आज सकाळी साडे आठ वाजता कॅथॉलिक पुरोहित तयार करणाऱ्या एका संस्थेकडून आमंत्रण होते. "Christian way of life as I understand it" हा विषय त्यांनी दिला. मी ईश्वराची प्रार्थना करूनच तेथे गेलो होतो. अगदी हृदयापासून बोललो. त्या लोकांच्या प्रश्नांची उत्तरे देखील अगदी मोकळेपणाने दिली. मतभेद आणि दृष्टिभेद लपवले नाहीत. पण आत्मीयतेने बोललो. " My Lord forgive us our sins as we forgive those who sin against us " अशा प्रार्थनेचा प्रथम मनात विरोध कसा होता आणि शुद्ध अर्थ कसा सुचला, हेहि सांगितले. नवा अर्थ त्यांना फार आवडला.

ख्रिस्ती वातावरणातून निघून हिंदु विद्यालयात गेलो. तेथे हिंदु शब्दाची व्याख्या आणि निरुक्ति सांगितली. सनातन धर्माचे वैशिष्टच सांगितले. येथेहि वातावरण चांगले होते.

## प्रियोळ-पणजी-आगबोट

१७–१–७१

आज गोवा यात्रा पुरी करून समुद्रारोहण केले. चंद्रकांत आणि रवींद्र यांनी प्रवास सुखकर आणि हितकर व्हावा म्हणून पूर्ण प्रयत्न केला होता. रवींद्राच्या घरचे वातावरण उत्तम, संस्कारी आणि आतिथ्यशील रवींद्राची खानदानी संस्कारिता विशेष पहावयाला मिळाली आणि चि. गोदूची प्रेमळ सेवा. पण हे सर्व लोक घरचेच. तेव्हा पूर्ण संतोष मिळून-देखील, त्यांचा विचार मनात खास येणे कठिण.

आज पंधरा दिवसांचा मोटारीचा आमचा सारथी–रामदास पंढरी-शेट– यांच्या सेवेचे आणि रसिकतेचे कौतुक आणि चिंतन मनात विशेष चालले. मोटारीतील सर्व तऱ्हेचे संवाद हा सारथी गोडीने ऐके. आम्हाला

हवी असलेली माहिती तत्परतेने देई. आणि आमचा विनोद उत्तम समजल्यामुळे मनातल्या मनात प्रसन्नपणे हसे. त्याची रसिकता त्याच्या चेहऱ्यावर उमटलेली पाहून मला त्याची कदर वाटे.

मुंबईहून येतानाच प्रवास अतिशय सुखाचा, आणि म्हणूनच 'अळणी' असे मी म्हटले, ते समुद्राला आवडले नसावे. 'तुमच्या आगबोटीला थोडी डोलत ठेवून, माझी आठवण तुम्हाला करून देतो,' असेच जणु त्याने या खेपेला म्हटले. या डोलण्याचा परिणाम चि. कुसुमवर झाला. तिला सगळा प्रवास निजून करावा लागला. प्रवासाचा पूर्वार्ध दिवसा झाल्याने बरीचशी बंदरे पाहून झाली. रत्नागिरी रात्री नवाला आल्यामुळे या जागृत शहराचे दूरदूर पसरलेले दिवेच दिसले.

गोव्यातील जागृति अजूनहि एकाग्र होऊ शकत नाही आणि ख्रिस्ती समाज तात्पुरत्या लाभहानीचा विचार करतो. दूरवर पाहू शकत नाही, याचे वाईट वाटते.

मुंबई
१८-१-७१

प्रवासातून घरी येताच साचलेले टपाल वाचावे लागते आणि अनेक प्रश्नांचे चिंतनहि करावे लागते. (मुंबईला आलो म्हणजे घरी आलो असे वाटणे हे आता आश्चर्यकारक उरले नाही.) एकच मन, एकाच वेळी सुख आणि दुःख, चिंता आणि प्रसन्नता, निराशा आणि उमेद–अशा परस्पर विरोधी भावनांचा अनुभव घेऊ शकते, हे संस्कृतीत रुळलेल्या मनालाच साधते आणि स्वाभाविक वाटते.

दीनबंधू जन्म संवत्सरीच्या लोकांनी चेक पाठवला. त्यामुळे भारावलो. चेक परत करणार. बंगालच्या या लोकांनी मुख्य अतिथि म्हणून मलाच का निवडले, याचा विचार करता एकाएकी कारण सापडले. त्यांच्या मनात असो वा नसो, भारतप्रेमी इंग्रज अॅण्ड्र्यूजच्या मनात रवींद्रनाथांविषयी उत्कट भक्ति आणि पूज्य बापूजीविषयी अत्यंत जिव्हाळा. माझ्याहि मनात गुरुदेव

आणि महात्माजी या दोघांविषयी सारखीच भक्ति. सामान्य लोक म्हणत " गुरुदेव विलासी होते तर महात्माजी विरागी होते. दोघांना एकाच वेळी तुम्ही कसे पसंत करता ?" मी त्यांना सांगतो " गुरुदेव कलारसिक होते खरे आणि जीवनविमुख नव्हते. पण त्यांना विलासी म्हणणे योग्य होणार नाही. आणि गांधीजी त्याग आणि संयम यांना महत्त्व देणारे जरी असले तरी ते जीवनविमुख नव्हते. या दोघां राष्ट्रपुरुषांमध्ये मानवप्रेम अगदी सारखे आणि देशाच्या प्रतिष्ठेविषयी दोघेहि सारखेच जागरूक. दोघांची आर्यता श्रेष्ठ कोटीची. याच्यापुढे भेद गौण ठरतो."

मुंबई
१९-१-७१

मी एक सामान्य नियम करून टाकला आहे आणि त्याला दैवाचे रूप दिले आहे. पुढच्या एकदोन महिन्याचे कार्यक्रम जसे उद्‌भवतील आणि पसंत असतील त्याप्रमाणे त्यांना मान्यता देतो. त्यानंतर दुसरे कार्यक्रम, किती का महत्त्वाचे आणि जवळचे असेनात, त्यांना मान्य करण्यासाठी पूर्वी मान्य केलेल्या कार्यक्रमांना टाळत नाही; बदलत नाही. या नियमाला अपवाद करावे लागतात, हे मी जाणून आहे. पण आजवर तसा प्रसंग आला नाही. मान्य केलेल्या कार्यक्रमाशी नवा कार्यक्रम जुळता घेता येत असेल, तर तसा प्रयत्न अवश्य करून पाहतो.

राजकोटला तीन दिवस दिले होते. पण त्यांना आता तिसरा दिवस आवश्यक नाही. तो कसाबसा वापरणार. या बाबतीत निर्णय दिला इतक्यात के. का. शास्त्रींनी पाठविलेले पोरबंदरचे आमंत्रण हाती आले. या बाबतीत निर्णय मी स्वतः न करता नारणदासभाई आणि के का. शास्त्रींनी मिळून ठरवावे अशी सूचना केली.

माझ्या या सामान्य नियमामुळे मन शांत राहते. खरे कारण म्हणजे जीवनविषयक आस्था असूनहि अलिप्तता स्वीकारली आहे. आजची उदा-

हरणे तशी महत्त्वाची नाहीत पण आस्तिकतेच्या चिंतनाला उपयोगी पडली एवढेच.

मुंबई
२०–१–७१

पुरुषांप्रमाणे स्त्रियांना देखील लग्न न करण्याची मोकळीक असली पाहिजे. पण लग्न न करणाऱ्या पुरुषांची आणि स्त्रियांची संख्या नेहमी कमीच असणार.

लग्नाचे उद्देश तीन– परस्परांच्या प्रेमळ सहजीवनाची आवश्यकता. स्त्रीला किंवा पुरुषाला संभोगसुख नको असले, मुलेंहि नको असली तरीहि जन्मभर टिकेल असे एक-दुसऱ्यामध्ये ओतप्रोत होणारे सहजीवन हवे असते. आणि म्हणूनच ब्रह्मचाऱ्यांनी लग्न करून घेऊच नये, असा नियम करणे अयोग्य होईल.

पण लग्न-बंधनाने बांधून घेतल्यानंतर दोहोंपैकी एका पक्षाला रति-सुख हवे असेल तर दुसऱ्या पक्षाला अनुकूल व्हावेच लागते आणि ते जडहि जात नाही.

आता एक असा पक्ष निर्माण झाला आहे, जो म्हणतो की संतति निरोधाची सोय झाल्यानंतर मुलांना जन्म दिलाच पाहिजे याची आवश्यकता उरली नाही. आम्हाला एकहि मूल नको. आम्ही एकमेकांला सुख देण्यातच वैवाहिक जीवनाची संपूर्णता मानतो.

मला हा पक्ष हितकर वाटत नाही. नवरा आणि बायको–दोघांमध्ये निसर्गाने अपत्यलालसा ठेवली आहे, ती मारणे कायरता आहे. निदान एक किंवा दोन बालकांना जन्म देणे स्वाभाविक आहे आणि कर्तव्यहि आहे.

पतिपत्नी संततिनिरोध करणारच, हे स्वीकारून हव्या असलेल्या दोन मुलांना जन्म, वैवाहिक जीवनात लवकर द्यावा का त्या जीवनाच्या शेवटी द्यावा, याची सांगोपांग चर्चा झाली पाहिजे. मला वाटते येणाऱ्या पिढीच्या दृष्टीने मुलांना लवकर जन्म देणे सर्व बाजूनी इष्ट आहे.

मुंबई
२१-१-७१

मुंबईचे शेरीफ शादीलाल जैन सहज भेटावयाला आले होते. मी होऊन त्यांच्याशी चर्चा सुरू केली.

"प्राणी हत्या न करणे आणि मांसाहार न करणे, या दोनच गोष्टी जैनांनी स्वीकारल्या आहेत. संघर्ष, चढाओढ, शोषण इत्यादि असंख्य गोष्टीचा ते विचारच करीत नाहीत. त्यामुळे तसले अहिंसाद्रोही जीवन त्यांच्या अंगवळणी पडते."

खरोखर जैनांनी जीवनव्यापी अहिंसेचा पूर्ण विचार करून, अशी नवसंस्कृति जगभर पसरविण्यासाठी मिशनरी तयार केले पाहिजेत. ख्रिस्ती संगठनापासून प्रेरणा घेऊन त्याहून चांगले मिशनरी, शुद्ध वृत्तीने जगभर पाठविण्याची योजना तयार केली पाहिजे. पण मला नाही वाटत की जैन लोक हे काम हाती घेतील. श्रावक धंद्याच्या मागे पडलेले आणि साधू रूढीचे आश्रित. तेव्हा हे काम गांधीवाल्यांनीच केले पाहिजे. पण बहुतेक गांधीवाले रचनात्मक काम आणि पुढाऱ्यांचे अनुसरण–यातच सांपडलेले आहेत. तेव्हा हेहि काम पश्चिमेकडील मौलिक विचारकांनाच करावे लागेल असे दिसते.

जुगतरामभाईचे पत्र आणि कठोरवाल्यांची तार आली. कठोरचा कार्यक्रम रद्द झाला. एका रीतीने आवडले. कारण एक ओझे कमी. पण इलेक्शनच्या विचित्र वातावरणामुळे रचनात्मक काम सोडावे लागणे याचे बरेच वाईट वाटले. पूर्वी धार्मिक तंटे बाधत. आता राजनैतिक पक्षापक्षी सर्वत्र नडते.

मुंबई,
२२-१-७१

सकाळी परमानंदभाई[१] भेटले. विनोबांच्या कित्येक उद्गारांमुळे

---

१ श्री. परमानंद कापडीया. संस्कारी जैन व्यापारी, जुने मित्र.

अस्वस्थ झाले होते. "गीतेच्या उपदेशाप्रमाणे रागद्वेषरहित होऊन हिंसा करण्यास हरकत नाही. लोकांना लुटावे देखील" असे ते कसे म्हणतात वगैरे विचारीत होते. मी म्हणालो की, "त्यांचा हा विनोद असेल. भक्त-लोकांना विनोद समजला तर ते भक्त कसचे ? दुसरीहि एक दृष्टि आहे. विनोबा गांधींचा गीता-अर्थ पूर्णपणे मानत नसावेत."

चि. मदालसेला गणराज्य दिवसानिमित्त एक लेख पाठवला. त्यात आजच्या परिस्थितीचा उपाय सुचवला. हृदयशुद्धि आणि हृदयाची विशालता साधलीच पाहिजे. त्यातून सर्व इलाज मिळू शकतील.

आयुष्याच्या शेवटच्या दिवसात कोठे रहावे–वेडछी की बडोदे–याची थोडी चर्चा चि. बाळाशी केली. त्याचा जोराचा आग्रह आहे की बडोदा. तेथे जमीन सहज मिळेल. दिल्लीच्या घराएवढे लहानसे घर बांधून द्यायलाहि तयार आहे. जवळच एक सार्वजनिक पुस्तकालय बांधले पाहिजे–वगैरे योजना त्याने सांगितली. कसेहि असो, गुजरात आणि मुंबई (महाराष्ट्र) यांच्याशी संबंध साधेल.

दिनकर परुळेकर भेटले. देवी उपासक, संत साधूंचे सामान्य भक्त, प्रामाणिक वकील आणि उमेदीचे राष्ट्रसेवक आहेत. जीवनयोग, साधूंचे चमत्कार, अपक्ष राष्ट्रसेवा इत्यादीवर माझे विचार विस्ताराने सांगितले. उत्कट चर्चा झाली.

मुंबई

२३–१–७१

आजच्या तीन गोष्टी नोंदण्यासारख्या आहेत.

(१) श्रीपादराव भेटले,

(२) नानूभाई वोरा यांच्याशी उपनिषदाच्या प्रकाशनाविषयी कुंदर दिवाणकडून मदत घेण्यासंबंधाने बोलणी झाली, आणि

(३) काल ज्यांचे लग्न झाले ती डॉ. शरत देसाईची मुलगी रेखा आणि हिचे ताजमहल मधील रिसेप्शन (अभिनंदन).

श्रीपादरावांना सर्वधर्म-समन्वयाची कल्पना फार आवडली आहे. स्वाभाविकपणे आंतरजातीय आणि आंतरधर्मीय लग्नाची व्यवहार्य कल्पना त्यांना विशेष मान्य आहे. कांति गांधी आणि त्यांनी दोघांनी मिळून हे काम करावे आणि आंतरविवाहांचा जोराने पुरस्कार करावा. केवळ अभिनंदन नव्हे. स्वत: होऊन हे दोघे हे काम डोक्यावर घेतील तर माझ्याकडून पूर्ण प्रोत्साहन मिळेल असे त्यांना आश्वासन दिले.

नानूभाईच्या योजनेत कुंदर पूर्ण उत्साहाने दाखल होत आहेत, यावरून वाटते की ही योजना आता उत्तम रीतीने पार पडेल. दिल्लीला गेल्याबरोबर या कामाला सुरवात करीन. हे काम झाले तर माझी आयुष्यातील एक महत्त्वाची कामगिरी पार पडली असे होईल. या एका पुस्तकानंतर भाषांतरे, वेचे इत्यादि पुष्कळ साहित्य निर्माण होईल.

डॉ. शरत देसाई यांचा ताजमहल मधील समारोह समाजदर्शनाच्या दृष्टीने मला महत्त्वाचा वाटला. एक एक समाज म्हणजे स्वयंपूर्ण, 'आत्मनि संतुष्ट' जगच असते. अशा अनेक जगाशी तटस्थ ऐक्य अनुभवणे ही एक साधनाच आहे.

मुंबई गुजरात मेल
२४–१–७१

पुष्कळ दिवसांनी सुभाष आणि गीता भेटावयाला आली. सुभाषशी गांधी आणि अरविंद यांच्याविषयी लोक जी चर्चा करतात त्याचा विचार झाला. नैतिक भूमिका गांधीजींची आणि आध्यात्मिक भूमिका अरविंदाची, असा भेद केला जातो. ते तर राहो, पण अध्यात्मवाल्यांना नीतीचे बंधन असत नाही, असे समजून लोक जो घोटाळा करतात, त्याचे व्यवस्थित विवेचन करून सांगितले की अध्यात्म हा नीतिनाशक किंवा नीतिविरोधी असू शकत नाही. बुद्धिवादाचेहि उदाहरण दिले.

आज विशेष चर्चा झाली उपेंद्रराय सांडेसराशी[१]. (आणि नानूभाई

---

१ गुजरात मधील एक विद्वान. 'महाभारता'चे तज्ज्ञ.

वोरांना फोनवर त्यांचा परिचय करून दिला.) स्वाभाविकपणे कृष्णचरित्रा-विषयी पुष्कळ बोललो. आणि नवी सूचना सांगितली की महाभारतात श्रीकृष्णाचे जितके संवाद आहेत (धर्म संवाद वगैरे) त्यांच्यापैकी महत्त्वाचे संवाद गोळा करून आपण Plato's Dialogues प्रमाणे श्रीकृष्णाच्या संवादाचे एक पुस्तक तयार केले पाहिजे. मग त्याची स्वदेशी आणि विदेशी भाषातून भाषांतरे होतील आणि एक मोठे साहित्य तयार होईल. या पुस्तकाच्या योगाने भारतीय जीवनदृष्टि किती समृद्ध आहे, हे जगाच्या निदर्शनाला येईल.

जर्मन संन्यासिनी श्रद्धेला[२] एक पत्र लिहून ते गुलवाडींच्या हाती दिले. सर्वधर्म-कौटुंबिक भाव कॅथॉलिक लोकांनी लवकरात लवकर आणि मोकळ्या मनाने स्वीकारला पाहिजे, या बाबतीत तिची मदत हवी. वरून सूचना आली तर समाज लवकर स्वीकारतो म्हणून वरहि प्रयत्न केला पाहिजे आणि लोकातहि प्रचार केला पाहिजे.

अहमदाबाद

२५-१-७१

अहमदाबादला एक दिवस आधी आलो हे चांगले झाले. पुष्कळांना भेटू शकलो. विशेषत: कचा (कृष्णदास गांधी)ला भेटू शकलो. तो आजारी आहे, त्याला भेटू शकलो याचा त्याला आणि मला खूपच आनंद झाला.

मामा फडक्यांनी जन्मात एकच वस्तु माझ्याकडे मागितली—जपानी transistor. तो द्यायला फार उशीर झाला. त्यांनी आशा सोडली होती. ती (वस्तु) आज त्यांना देऊ शकलो, याचाही आनंद झाला.

नवनीतभाई पारेख वगैरे मंडळी भेटली. पण आजचा विशेष संतोष—शंकरलाल बँकरांना भेटून आलो याचा. मी म्हणालो, "बापूजींना भेटण्या-पूर्वी तुम्ही कसे होता हे मला ठाऊक आहे—सर्व प्रकारच्या राजकारणात

---

[२] श्री. विनोबांच्या ब्रह्म विद्या-मंदिरात येऊन राहिलेली एक जर्मन कॅथॉलिक संन्यासिनी.

मुरलेले. तुमचा रचनात्मक कामात गांधीजींनी उपयोग केला, यात तुमचे जीवन धन्य झाले. पण मला नेहमी वाटते की गुजरातच्या सार्वजनिक जीवनाचे नेतृत्व त्यांनी तुम्हाला दिले असते तर गुजरातचे कल्याण झालेच असते. त्याखेरीज गांधीजींच्या व्यापक रचनात्मक तत्त्वज्ञानावर पूर्ण विश्वास असलेला एक राजकारणी पक्ष, तेव्हापासून तुम्ही जिवंत ठेवू शकला असता. अशा पक्षाची उणीव आज अत्यंत भासते."

तेव्हापासून जर असा पक्ष चालू झाला असता तर जनतेला त्या पक्षामागे जाणे सोपे झाले असते. आज गांधी पक्ष काही अंशी अनाथ आणि काही अंशी राजनीतीचा आश्रित झाला आहे. हे दुःख कदाचित् टळले असते.

शंकरलालभाईंनी नम्रतेने उत्तर दिले, "माझे तर कल्याणच झाले. बापूजी सामान्य जनतेला जागृत करून स्वाश्रयी बनवू पाहत होते. श्रम-जीवनावाचून ते शक्य नाही."

अहमदाबाद
२६-१-७१

आज गणतंत्र दिवस. गांठीभेटीने भरगच्च. प्रारंभ केला चि. रैहानाचे स्मरण करून आणि कळले की तिच्या लाडक्या रविशचा[१] देहांत झाला. उर्दू कवितेचेहि नुकसान झाले.

रविशंकरदादांची भेट झाली. त्यांच्याबरोबर मिलमालक गणेशमल दूगड आले होते. भारताबाहेर अहिंसाधर्माचा प्रचार करण्यासाठी जैनांनी नवीन साधू तयार केले पाहिजेत—याविषयी त्यांच्याशी बोललो.

संध्याकाळी पुष्कळ लोक भेटले.

पण आजचे माझे चिंतन अगदीच अलिप्त आहे.

गांधीजींची डेमॉक्रसीची कल्पना मुलखावेगळी. त्यात Demo मुख्य आणि cracy गौण. मीहि याच मताचा.

---

१ श्री. रविश सिद्दीकी. उर्दूचे एक कवि.

दोन दिवस झाले, सकाळी प्रार्थनेच्या वेळी पाहतो–पुष्कळसे शेकडो पक्षी उत्तरेकडे जातात मला हे पाहून आश्चर्य वाटले. पण साबरमती नदी जशी आहार देते तसा सूर्य काही देत नाही म्हणून पूर्वेच्याऐवजी उत्तरेकडे ते पंखांची धाव घेत असावेत. या पक्ष्यांच्या सामाजिक जीवनाचा विचार करता बापूजींची अहिंसक डेमॉक्रसी पूरेपूर पटली.

या पक्ष्यांच्या जीवनाचे आणि स्वभावाचे निरीक्षण आपल्या पूर्वजांनी किंवा आजच्या लोकांनी मुळीच केलेले नाही. बरीचशी काव्यमय कल्पनाच त्यांनी चालवली. त्यामुळे पक्ष्यांना समजून घेण्यासाठी पश्चिमेकडील साहित्यच वाचले पाहिजे बापूजी सुचवितात तसली अहिंसक डेमॉक्रसी पशुपक्ष्यांच्या आंतरिक जीवनात असावी. आणि आहारासाठी आत्मरक्षणासाठी त्यांनी हिंसा संघटित केली असावी. अहिंसक लोकांनी पशुपक्ष्यांच्या जीवनाचे सूक्ष्म सहानुभूतिपूर्ण निरीक्षण करणे अधिक फायदेशीर झाले असते. पश्चिमेचे निरीक्षण सूक्ष्म खरे पण सदोष आहे. कारण ते पशुपक्ष्यांचे भक्षक आहेत.

अहमदाबाद
२७–१–७१

सकाळी वल्लभनगरला तिकडच्या तरुणांचे अभिनंदन करण्यासाठी मदालसा जाऊन आली. तिच्याबरोबर आम्ही गेलो पण कुलनायक रमेश सुमंत मेहता भेटले नाहीत. त्यांना नागपूरला जावे लागले. मी विद्यार्थ्यांना माझा नेहमीचा विचार सांगितला की, "धर्म, संस्कृति, राजकारण या क्षेत्रात भविष्यकाळासाठी काहीतरी नवे निर्माण करा. भूतनिष्ठ बनू नका" इत्यादि.

भारतात प्रजाराज्य आहे. लोकांना आपले राज्यकर्ते निवडता येतात. पण स्वत:चे जीवन सुरक्षित ठेवता येत नाही! बापूजी म्हणत, "प्रजाराज्यात राज्यसत्ता कमीत कमी असावी." जग म्हणते, 'शेवटचा आधार तलवार, बंदुका, पोलीस आणि फौज. लष्कराची सत्ता मुलकी सत्तेच्या ताब्यात आहे याचेच 'धन्य भाग्य' माना." स्वदेशी शिपायांची परेड पाहून

विदेशी राज्य गेल्याचा अभिमान वाटला. पण हिंसाभक्तीचे प्रदर्शन पाहून माझे अहिंसा-परायण हृदय लाजले आणि काही अंशी कोमेजले.

राजभवनमधून कुलपति निवासमध्ये आलो तेव्हा कालचे आणि सकाळचे विचार नरम पडले आणि हृदयाला मोकळे वाटले. परिस्थिती ती आणि तीच. पण तिचा विसर पडला, एवढेच.

श्री. गणेशमलजी दूगड अणुव्रत समितीचे मंत्री–मनसोक्त भेटलो. मी त्यांना सांगितले की राजसत्ता आणि धर्मसत्ता शेवटी 'सत्ताच' आहेत. धर्माचे भविष्य साधूंच्या हातून सुधारणार नसून, श्रावकांच्या हातून सुधरणार. लष्करी सत्ता ज्याप्रमाणे प्रजासमस्तच्या ताब्यात पाहिजे त्याचप्रमाणे साधु-संस्था श्रावकांना वापरता आली पाहिजे. साधु-संस्था श्रावकांची आश्रित आहे आणि श्रावक जड आहेत. शिक्षणाच्याद्वारा हे बदलले पाहिजे.

अहमदाबाद
२८–१–७१

फादर वालेसनी[१] एका व्यवहारी, अनुभवी गोष्टीकडे माझे ध्यान खेचले. मी त्यांना म्हणत होतो की सर्वधर्म-कुटुंबभाव जो गांधींनी सुचविला तो वेळीच ख्रिस्ती लोकांनी उत्साहपूर्वक मान्य केला पाहिजे. यातच त्यांचे, या देशात आणि जगात कल्याण आहे. उशीर केला तर धर्म-विद्वेषी लोकांचे प्राबल्य माजेल. ख्रिस्ती आणि त्यातल्या त्यात रोमन कॅथॉलिक धर्मोपदेशक यांना ही गोष्ट पटली तरी ते स्पष्ट कबूल करीत नाहीत. त्यांना वरच्या धर्मसत्तेची भीति असते. म्हणून पारिवारिक संबंधाविषयी वरून मान्यता आली पाहिजे.

"हा विचार दहा वर्षापूर्वीच वरून मान्य झाला आहे" असे सांगून ते म्हणाले, "कित्येक सुधारणा किंवा फेरफार आम्ही अंमलात आणतो आणि तसे वर कळवितो. पण वरून त्याविषयी मान्यता मागत नाही. तेहि

[१] गुजराती भाषेतले एक लोकप्रिय लेखक. मूळचे स्पेनमधले. धर्मोपदेशक ख्रिस्ती संन्यासी.

चूप असतात. प्रथम अंमल आणि आचरण; तात्त्विक मान्यता उशीराने, हाच क्रम सोईस्कर आहे."

त्यांचे म्हणणे मला पूर्णपणे पटले. सनातन समाजात असेच चालले आहे. आज या गोष्टीचे खूप चिंतन केले.

आज व्युत्पत्तिप्रवीण भायाणी भेटले. त्यांच्याशी व्युत्पत्ति आणि निरुक्तीविषयी विस्ताराने गोष्टी केल्या. (त्यांनी तिसरा प्रकार सांगितला— शब्दक्रीडेचा. ती केवळ मौज असते.)

यशवंत शुक्लांचे[२] सहयोगी प्रकाश गज्जर भेटले. समाजात चांगले काम करीत आहेत. त्याच्या समन्वय विद्यापीठाच्या सुलेखन प्रवृत्तीसाठी २३ फेब्रुवारीचा दिवस दिला.

नवनीतभाई आणि प्रसन्नांच्या घरी सुंदर वातावरण होते.

अहमदाबाद

२९–१–७१

आज सौराष्ट्राला जाण्याच्या तयारीचा दिवस होता. बरेचसे लोक भेटून गेले. कार्यक्रम कोणचाच नव्हता.

विद्यापीठकालातले माझे सहकारी नगीनदास पारेख भेटून गेले. त्यांना साहित्य अकादमीकडून पांच हजार रुपयांचा पुरस्कार मिळाला आहे. मी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले. आम्ही त्यांना बंगाली शिकण्यासाठी शांतिनिकेतनला पाठविले होते. तसे बंगाली शिकण्यासाठी किती तरी लोक तेथे गेले होते. पण नगीनदासनी शांतिनिकेतन यात्रेचा सर्वात अधिक उपयोग केला.

मी नगीनदासना म्हणालो की, तुम्ही अनेक भाषांतील काव्याचे अध्ययन केले आहे आणि काव्यशास्त्रातदेखील निपुण झाला आहात. या दोन्ही विषयांनी तुमच्या सबंध जीवनाची कशी पकड घेतली आणि

---

[२] प्रसिद्ध गुजराती साहित्यिक.

त्यामुळे तुमच्या जीवनात कोणत्या गोष्टींचा उदय झाला, या एकच भागाचा विस्तार करणारे आत्मचरित्र तुम्ही लिहिले पाहिजे. अशाप्रकारचे आत्मचरित्र आजवर कुणी लिहिले नाही. हा विचार जर तुमच्या हृदयात उगवला तर आत्मचरित्र लिहिण्याइतकी वयाची, बुद्धीची आणि प्रतिष्ठेची परिपक्वता तुम्हाला प्राप्त झाली आहे. तुम्ही जरूर या दिशेने आविष्करण करा.

मदालसा[१] आजकाल तरुणाभिनंदनाच्या विचारात मग्न झाली आहे. चोवीस तास हे एकच चिंतन चालू असते. मला अशा एकाग्रतेची कदर आहे.

पण आज ती बरीच आत्मनेपदी झाली होती. कमलनयन तिचा भाऊ, त्याच्या विकासाची ती साक्षी. आणि त्याच्याकडून तिला प्रेरणाही मिळत आली आहे. तिच्या तोंडून कमलनयन संबंधाने ऐकल्यापासून मला पुष्कळ आनंद वाटला. या दोघांमधील पत्रव्यवहारदेखील तिने दाखविला. कमलनयनची ही बाजू मला ठाऊक नव्हती. त्यामुळे मला विशेष संतोष झाला.

## राजकोट

३०–१–७१

आजचा दिवस खरोखर राजकोटमय होता. चि. पुरुषोत्तमचे वडील आणि मुलगी अरुणा तिघे मिळून एक सुंदर गांधी वातावरण बनले आहे. नारायणदासभाईमध्ये वार्धक्यामुळे सौम्य गोडी वाढली आहे.

जामनगरचे प्रवासपरायण दिनकरराय त्रिवेदी झेवीयर कॉलेजच्या कॅथलिक लोकांशी मिसळलेले पाहून मला दोन्ही पक्षांविषयीं बरे वाटले.

आगगाडीतील दोन बिस्तरे ज्या रेल्वे इसमाला सोपविले तो एक चांगला मूर्तिकार आहे. त्याने आगगाडीत राहून गेलेले चि. सरोजचे

---

[१] मदालसा—श्री. जमनालाल बजाज यांची कन्या, श्री. विनोबा यांची उत्साही शिष्या आणि गुजरातचे राज्यपाल श्रीमन्नारायणजींची धर्मपत्नी.

घड्याळ आणून दिले आणि नंतर एक घोड्याची आणि एक महिषीची मूर्ति आणून दाखविली. खरोखर कुशल कारीगर आहे. सौराष्ट्रमध्ये अनेक कलांचा विकास झाला आहे. दोन्ही मूर्ति भाववाही आहेत.

प्रा. जेठवा बऱ्याचशा विद्यार्थ्यांना घेऊन आले. सौराष्ट्र युनिव्हर्सिटीच्या समाजविज्ञान विभागामध्ये गांधी विचार मंडळे स्थापित होऊ लागली आहेत. स्व. डोलररायभाईंनी ही सुरू करवली. त्यांची आज स्थापना झाली. या विद्यार्थ्यांशी गांधी-विचार, अध्ययन आणि प्रयोग—याविषयी मी विस्तृत विवेचन केले. हे सर्व येथे जरूर उगवणार असा मला विश्वास वाटू लागला आहे.

श्री. जेठालाल जोशी, आमचे छगनलालभाई जोशी, नरेंद्र अंजारिया, मृदुलाबेन मेहता—वगैरे मंडळी भेटली. आणि रामकृष्ण मिशनचे कार्यकुशल, गोड स्वभावाचे स्वामी आत्मस्थानानंद भेटल्याने खूप आनंद झाला यांच्या तोडीचा माणूस रामकृष्ण मिशनसारख्या थोर संस्थेत देखील दुसरा नसावा.

राजकोटचा इतिहास लिहिला पाहिजे. आणि गांधीजींचा राजकोटात असलेला संबंध—यावरही एक उत्तम पुस्तक झाले पाहिजे. ही माझी सूचना येथील कार्यकर्त्यांनी उत्साहपूर्वक स्वीकारली आहे.

## राजकोट, पोरबंदर (रात्रौ)

३१–१–७१

वसंतपंचमीच्या दिवशी मोठी तीर्थयात्रा घडली. सगळा दिवस राजकोट आणि रात्री निजावयाला पोरबंदर (सुदाम पुरी) दोन्ही गांधी-स्थाने !

सकाळच्या समुद्र-प्रार्थनेत 'ॐ नमो नारायणाय पुरुषोत्तमाय'—या माझ्या प्रिय मंत्राचा इतिहास आणि अर्थ सांगितला. अर्थ लिहिलेला आहे. इतिहास आजवर प्रगट केला नव्हता. मंत्राच्या प्रचाराचा काळ आता आला आहे. यातूनच सर्व-धर्म-समभाव पसरणार.

हरिजन सेवकांनी एक सेवाकार्य एका पिढीत आटोपले पाहिजे

भंगी-मुक्तिवर जोर दिला पाहिजे आणि हरिजनांना समाजात पूर्णपणे मिसळून टाकले पाहिजे. हे काम तेजस्वी लोकांचे आहे. आश्रितांचे नाही.

आजचे मुख्य भाषण सूतांजली अर्पणाच्या वेळी केलेले. मी म्हणालो, "मला आपण एकाच वेळी धनी आणि ऋणी केले आहे. खादी-भक्ति आणि खादीचे भविष्य, राजस्थान आणि सौराष्ट्र—हरिजनांना पंचायतचे प्रमुख केले पाहिजे वगैरे अनेक विषयांवर बोललो. विस्तृत भाषण झाले. ते समग्र लिहूनच काढले पाहिजे.

आलियाबाडचे केशुभाई वळीयाने डोलररायभाई आणि दुसऱ्या एका शिक्षकाविषयी चांगले चांगले सांगितले.

प्राथमिक शिक्षिका आणि शिक्षक यांना त्यांनी दिलेल्या सूतांजली-साठी धन्यवाद देण्याचे विसरलो, पण त्यांच्या जीवनकार्याविषयी उत्तम सूचना दिल्या. मुलांच्या आई-बापाशी संपर्क साधा. सेवा करण्याची संधि देण्यासाठी प्रत्यक्ष भगवान बालरूपाने तुमच्याकडे येतात—या भावनेने विद्यार्थ्यांशी वागा. 'बाल देवो भव', 'छात्र देवो भव' हा आपल्यासाठी आदर्श आहे."

स्त्रियांच्या सभेत तीन महिलांची चांगली भाषणे झाली. समन्वय म्हणजे केवळ तडजोड नव्हे, तर दोन्ही बाजूंना सांभाळू शकेल असे नवसर्जन होय. स्त्री-स्वभाव या कामी फार उपयोगी पडू शकतो." इत्यादि सांगितले आणि राजकोटहून पोरबंदरच्या यात्रेसाठी धाव घेतली.

■ ■ ■

## फेब्रुवारी ७१

### पोरबंदर–राजकोट (ट्रेन)

१–२–७१

आजचा दिवस माझ्या परिभाषेप्रमाणे, निवृत्त प्रवृत्तीचा होता. जेथवर गेलो तेथून परतणे आणि जाताना पाहिलेले पुन्हा तेच पण नव्या दृष्टीने पाहणे, याला मी नव्या अर्थाने निवृत्ति म्हणतो. निवृत्त प्रवृत्ति केव्हाहि समृद्ध असते. आणि म्हणूनच (या क्षणी सुचले) ती खऱ्या मोक्षाला पोषक असते.

वेळ पुष्कळ मिळाला असता आणि वातावरण मोकळे असते तर महाराणा नटवरसिहजीशी पुष्कळ बोलण्याची इच्छा होती. कीर्तिमंदिरात

माझे विचार–काही बाबतीतले–त्यांनी ऐकले. त्यांची प्रतिक्रिया समजून घेण्याची खूप इच्छा होती.

पोरबंदरमध्ये गांधीजीवनाचे सार मी सांगावे अशी अपेक्षा होती. पण या लोकांना कल्पना नसेल इतका भार देऊन मी सत्याग्रहाविषयी बोललो. (जणू का महात्माजी आडून ऐकत आहेत त्यांच्या संतोषासाठीच मी बोलत आहे.) सौराष्ट्रामध्ये स्त्रियांविषयीचा बापूजींचा संदेश सांगणे आवश्यक होतेच. आणि शंकरदेवांना 'वेद प्रामाण्य' आणि 'वेदपरंपरे-विषयी आदर'–यांतील भेद ऐकवला.

प्रतापराय राजगुरु चांगला माणूस दिसला. सौराष्ट्राबाहेर अशांचा विकास अधिक होणे शक्य आहे. त्यांचे वडील अगोदर भेटले हे बरे झाले. पितापुत्रांचा संबंध असावा तसा दिसला.

गांधीचरित्र–दर्शन मला विशेष आवडले नाही. त्या मागची प्रताप-रायची भावना आणि योजना चांगली आहे. पण चित्रकार प्राणवान वाटला नाही. कदाचित् त्याच्या कलेला येथे अवकाश मिळाला नसेल. "वैष्णवजन" विषयक चित्रमाला चांगली होती. त्या मर्यादेत चित्रकार खुलू शकला. प्रेरक आणि प्रेरित यांच्यामध्ये एकहृदयता असली पाहिजे.

मुंबई

२–२–७१

सौराष्ट्रमधून परतून, सर्व सामान बरोबर घेऊन, दिल्लीला जाण्या-साठी एक दिवस मुंबईला राहिलो. दुसरे काही काम नव्हते. त्यामुळे सौराष्ट्राच्या अनुभवाचेच चिंतन होऊ शकले.

सौराष्ट्राचे गुणदोष मला चांगले माहीत आहेत. पण सौराष्ट्र म्हणजे गांधीजींचे सौराष्ट्र हे मी कधीच विसरू शकत नाही. सौराष्ट्र म्हणजे लहान लहान हिंदु राज्ये. राजस्थानाप्रमाणे क्षात्रधर्माचे ओझे वाळगणारा प्रदेश नव्हे. लोकांमध्ये "बहारवटियापणुं" मुरलेले. दरबारी कावेदावे नेहमीचेच. तरीहि या लोकात प्राण आहे. मौलिकता आहे आणि मुख्य

म्हणजे अति व्यवहारचतुर असून देखील एखादा आदर्श पकडून, त्या पायी 'पायमाल' होण्याची देखील त्यांची तयारी असते. सौराष्ट्री किंवा काठियावाडी स्वभावातील दोष दूर करून त्या स्वभावाला अध्यात्माचे रूप दिले गांधींनी आणि त्यांतूनच सत्याग्रहाचा जन्म झाला. 'सत्याग्रह म्हणजे काठियावाडी स्वभावाचे उन्नतीकरण,–ही गोष्ट मी प्रथमपासून सांगत आलो आहे. अजूनहि कोणी या सूत्राचा स्वीकार केला नाही. हे आश्चर्य आहे !

आजचा सगळा दिवस गुलवाडीजींनी घेतला. वर्धा–पवनारला जाऊन आले. तेथील अनुभव, निरीक्षण त्यांनी सविस्तर सांगितले. मला पुष्कळ लाभ झाला. पण मी तिकडील जीवनात प्रवेश करून मदत करावी, ही त्यांची सूचना मी बिलकुल स्वीकारली नाही. माझे ते काम नव्हे. तसा प्रयत्न केल्यास गैरसमज वाढेल असे निक्षून सांगितले.

मुंबई (ट्रेन)
३–२–७१

ज्याप्रमाणे आपल्या लोकांनी जीवनव्यापी, सार्वभौम अहिंसेचा संकुचित अर्थ केला आणि एक सबंध जैन समाजाचे या संकुचिततेपायी बलिदान दिले त्याचप्रमाणे संयमप्रधान, प्रयोजनपूर्ण ब्रह्मचर्याची साधनादेखील संकुचित केली. याचा मनात राहून राहून विषाद वाटतो.

जगातील इतर राष्ट्रांनी, धर्मांनी, आणि संस्कृतींनी अहिंसेचे जे चिंतन केले त्या मानाने आपल्या पूर्वजांनी फारच पुढे जाऊन अहिंसेवरील आपला विश्वास दृढ केला यांत शंका नाही. ब्रह्मचर्याच्या बाबतीत देखील इतर संस्कृतींच्या मानाने आपली प्रगति असाधारण असावी असे वाटते.

तरीहि मानवी संस्कृतीच्या विकासाच्या दृष्टीने जीवनाचा पायाच अहिंसामूलक असावयास पाहिजे आणि व्यापक अर्थाने संस्कृतीचे व्याकरण ब्रह्मचर्यमूलक संयमप्रधान असले पाहिजे ; ही गोष्ट 'अष्ट–पुत्रा सौभाग्यवती भव' म्हणून आशीर्वाद देणाऱ्या युगाला पटली नव्हती.

यात दोष आपल्या पूर्वजांचा नव्हता; अथवा 'होता' असेच म्हटले पाहिजे. कारण त्यांनी भूतकालाची आदरयुक्त भक्ति करता करता भूत-कालाचीच उपासना चालवली आणि भविष्यकाळाचे चित्र अगदीच हीन रेखाटले.

सर्व संस्कृतींनी कमीअधिक असेच केले आहे. एवढ्यावरून आपल्या पूर्वजांचा दोष क्षम्य असला तरी तो लहानसहान नाही.

ब्रह्मचर्याचा व्यापक अर्थ करून त्यालाच जीवनाचे व्याकरण बनवले असते तर संततिनियमनाचा प्रश्न जगाला शुद्धपणे सोडवता आला असता. जीवनव्यापी ब्रह्मचर्यमूलक संस्कृतीच्या अभावी अन्नोत्पत्ति आणि प्रजोत्पत्ति यांचे प्रमाण सांभाळता येणार नाही एवढे निश्चित.

दिल्ली
४–२–७१

काशी विद्यापीठाची स्थापना गुजरात विद्यापीठाच्या बरोबरच झाली होती. त्यामुळे बाबू भगवानदास, श्री. शिवप्रसाद गुप्त, आचार्य नरेंद्र देव यांचा परिचय झाला. डॉ. भगवानदास प्रथमपासून थिऑसॉफिस्ट. ॲनी बेझन्टचा प्रभाव त्यांच्यावर होता हे सर्व जाणतात. पण भगवानदास यांचा प्रभाव ॲनी बेझन्टवर कमी नव्हता. सर्व-धर्म-अध्ययनपर्यंत ते गेलेच होते. बापूजींशी त्यांचा सूक्ष्म मतभेद होता. पण परस्पर आदर उत्तम. यामुळे भगवानदासांच्या विषयी मला विशेष आकर्षण होते. स्वराज्याच्या चळवळीत जेलमध्ये असताना त्यांच्याशी मी पत्रव्यवहार केला होता. त्यावेळी त्यांनी 'हिंसा' आणि 'दंड' यातील भेदाकडे माझे लक्ष खेचले होते. समाजमान्य सरकारने गुन्हेगाराला शिक्षा केली तर ती हिंसेत गणता कामा नये असा त्यांचा आग्रह. मी त्यांना लिहिले की 'तुम्हाला मग युद्धाचेहि समर्थन करावे लागेल. आणि फक्त कायद्याविरुद्ध अत्या-चाराचाच विरोध करावा लागेल. आमचा आदर्श याहून भिन्न आणि उदात्त आहे. आम्ही सर्वांशी अहिंसामूलक संस्कृतीची स्थापना करू पाहतो.

गुन्हेगारांना सुधारण्याचा प्रयत्न कधीहि न सोडता, पीडितांचे रक्षण करणे आणि त्या पायी प्राण देण्यास तयार असणे ही आहे अहिंसक संस्कृति.

दिल्ली
५–२–७१

कोण जाणे आज तीन प्रकारच्या निरनिराळ्या लोकांशी वैवाहिक संबंधाविषयी खूप विवेचन केले. ज्याला अखंड ब्रह्मचर्य पाळावयाचे असेल त्याने विवाह न करणे उत्तम. पण स्त्री-पुरुष दोघांनाहि मनापासून अखंड ब्रह्मचर्य पाळण्याचा निश्चय असूनदेखील 'स्त्री-पुरुषांनी एकमेकाचे तोंडहि पाहू नये असला आदर्श मान्य नसल्याने आणि एकमेकांचा सहवास प्रिय, इष्ट आणि पोषक असल्याने त्यांनी एकत्र राहण्याचे ठरविले तर त्यात चूक नाही. समाज टीका करील ती सहन करावी हा उत्तम पक्ष, किंवा समाजाची टीका टाळण्यासाठी औपचारिक विवाह करून भावाबहिणी-प्रमाणे राहण्याचा निश्चय करावा हा दुसरा पक्ष. यात दोघांचा दृढनिश्चय पाहिजे–आणि सहजीवन त्यांना सोपे असले पाहिजे.

सामान्यपणे विवाहाच्या मुळाशी प्रजोत्पत्तीचा संकल्प असतोच आणि दांपत्य सुखाची (रतिसुखाची)हि इच्छा असते. यात मुख्य नियम–एकाची इच्छा आहे, दुसऱ्याची नाही अशा स्थितीत संयम पाळावा–हाच पाहिजे. जबरदस्ती पूर्णपणे अनिष्ट होय; पण विवाहबद्ध झाल्यानंतर साथीदाराला अगदीच उपाशी ठेवणे अयोग्य आहे हे जाणून मनाची अनुकूलताहि ठेवली पाहिजे. उत्कट प्रेमसंबंध असल्यावर एकमेकाला संयमात ठेवणे हे कर्तव्य ठरते आणि ते सहज साधू शकते. गृहस्थाश्रम संयम वाढविण्यासाठी आहे. उत्कट प्रेमाला ते साधते. आणि त्याचे पालन प्रसन्नतेने घडते.

मामेबहिणीशी लग्न आपल्या समाजाला अमान्य नसले तरी न करणेच उत्तम. नाहीतर दोघांची तयारी असेल तर आदर्श सत्याग्रहाला तयार व्हावे.

दिल्ली
६–२–७१

अनेक लोक भेटीला येतात. प्रत्येकाचे प्रश्न निराळे. त्याखेरीज संस्थेच्या कार्याचे चिंतन.

राजकोटला प्राथमिक शिक्षिका भेटल्या होत्या. त्यांनी सूतांजलि दिली होती. त्यांच्याशी जी चर्चा केली होती तीच, पण बहुतेक निराळ्या मुद्याची–पट्टीकल्याणाच्या आश्रमांच्या शिक्षिका होऊ पाहणाऱ्या तरुण मुलींना घेऊन विष्णुभाई भट्ट आले होते, त्यांच्याशी झाली.

शिक्षणाला वाहिलेल्या लोकांनी जगाच्या सर्व अडचणींचा आणि परिस्थितीचा उकल शिक्षणाच्या द्वाराच केला पाहिजे. मुलाना मारणे किंवा शिक्षा करणे हे खाटकाचे काम आहे. मुलांचा अपमान तर कधीच करू नये. मुले गुरुजनाविषयी क्षमा आणि आदर बाळगतात. त्यांची कठोरता सहन करतात. या त्यांच्या थोरवीला आपण पात्र न झालो तर आपली अब्रू काय राहिली ? मुलांच्या आई-बापांना देखील भेटले पाहिजे. युक्तीने त्यांनाहि शिकवायाचे असते. तुमच्यासारख्या शिक्षिकांनी मुलांच्या आयांनाच भेटणे उत्तम. मुलांचे स्वभाव ओळखले पाहिजेत. आपण कठोर झालो तर मुलांना लबाड व्हावे लागते म्हणून मुलांच्या दोषाचे मूळ आपण आपल्यात पाहिले पाहिजे, इत्यादि अनेक गोष्टी सांगितल्या. उगवतील त्या खऱ्या.

दिल्ली
७–२–७१

देवी-माहात्म्य–म्हणजेच दुर्गा-सप्तशती –हे पुस्तक चाळले. परमात्म्याच्या शक्तीची देवी म्हणून उपासना करणे यथायोग्य आहे. पुढे पौराणिक चित्ताने त्यांना शिव आणि शक्ति असे रूप दिले अशा या 'आद्या'शक्तीची त्रिगुणात्मक तीन रूपे केली. अशुभ वासना आणि अनिष्ट परिस्थितीशी लढण्यासाठी देवीची मदत मागणे इष्ट वाटले. यातून देवीची

हत्यारे, असुरांचे प्रकार वगैरे एक विशाल पौराणिक जग निर्माण झाले. लढाऊ फौजी लोक दारू पितात, पशू मारून मांस खातात त्याप्रमाणे देवीचेहि ठरविले. जसा भक्त तसा त्याचा देव. ग्रीक आणि रोमन लोकांनी अशीच पुराणे रचली. पुढे ख्रिस्ती धर्माने ती उधळून लावली. आता ती कवींच्या क्षेत्रात उरली आहेत.

आपल्या धर्मात जर आपण वेदान्त आणि देवी उपासना यांचा समन्वय केला आणि पौराणिक भारूड काढून टाकले तर देवी उपासना जगद्व्यापी, मानवताव्यापी होऊ शकेल. पण हे पौराणिक वातावरणाचे जग विलीन कसे होणार? त्यासाठी जबरदस्त प्रचारक हवा आहे.

दुसऱ्याचा बळी घेणे किंवा स्वतःचा बळी देणे यातूनच धर्मभावना समाजात पसरते. ख्रिस्ताच्या बलिदानाचा इसाई धर्माने यथेच्छ फायदा घेतला. आपल्या येथे आपण केवळ विजयी लोकांचे उपासक आणि भक्त. बलिदानाच्या तेजस्वितेची कदर आपण केली नाही. आपली सारी संस्कृति यामुळे नरम पडली आहे.

दिल्ली

८-२-७१

आज या प्रदेशातील सर्वोदय कार्यकर्त्यांची एक महत्त्वाची सभा आमच्या प्रार्थनामंदिरात भरली होती. मी त्यात हजर राहावे अशी त्यांची इच्छा. मला काहीच ऐकू येत नव्हते.

शेवटी सर्वोदय कार्यकर्त्यांपासून गांधीजींची अपेक्षा काय होती, हे त्यांना गोड पण स्पष्ट शब्दात सांगितले. रचनात्मक काम करावयाचे म्हणजे पैशांची गरज असणारच. पूर्वीचे दाते आता म्हणतात, "स्वराज्य सरकार यथेच्छ कर घेते, त्यांच्याकडून मदत घेण्याचा तुमचा हक्क आहे. प्रजेचा पैसा प्रजेच्या कामाला न देऊन सरकारचे कसे चालेल?"

सरकार अनुदान देते पण संस्थेची शेंडी सरकारच्या हातात जाते. आणि शेवटी आपण अमलदारांचे आश्रित बनतो. समाजसत्तावादाच्या

नांवाने लोकसेवेची आणि राष्ट्रसंगठनाची सगळीच कामे सरकारच्या हाती जातात. 'राष्ट्र असंघटित आणि सरकार संघटित' यामुळे राष्ट्रापेक्षा सरकार मोठे होऊन बसते आणि आपण सरकारचे आश्रित बनतो. यामुळे आपले काम निस्तेज होते. निवडणुकीचे सारे तंत्र रचनात्मक कार्यकर्त्यांच्या हाती आले पाहिजे. धंदेवाईक राजनैतिक नेत्यांच्या हाती आज ते गेले आहे वगैरे समजावून दिले आणि मी म्हटले--

'या परिस्थितीचा विचार आणि इलाज आपण कराल किंवा नाही ? गांधींना सर्वोदय कार्यकर्ते तेजस्वी हवे होते. देशाचे नेतृत्व त्यांच्याकडेच जाणे इष्ट होते, पण तसे झाले नाही. यात दोष कोणाचा ?'

दिल्लीहून (ट्रेन)
९-२-७१

दिवस संपत आला आणि चि. सरोजने सांगितले की आजची तारीख तिच्या पित्याच्या स्वर्गवासाची आहे. या दिवसाचे महत्त्व सरोजला असणारच. पण मला विशेष आहे. जणू धीरजलालनी जाता जाता आपल्या लाडक्या एकुलत्या एक मुलीला माझ्याकडे सोपवून दिले. संस्कृत भाषेत मी म्हणेन की चि. सरोज पितुः कन्या आहे. चि. सरोजमध्ये जे काही आहे त्यातला बहुतेक भाग वडिलांचा आहे. बापाचे मुलीविषयी प्रेम असाधारण. आणि मुलीची पितृभक्ति लोकोत्तर. यामुळेच सरोज माझ्याकडे टिकू शकली आहे. हे मी कधीहि विसरणार नाही. केव्हा केव्हा वाटते पित्याने मुलीला इतके प्रेम दिले की मुलांच्यासाठी पुरेसे उरले नसावे.

सुखदेव[१] आज कितीतरी दिवस आमच्या येथे राहून घरचा झाला आहे. पण त्याच्याविषयी सविस्तर आजच सरोजकडून समजले. सामान्य माणसात एखाद्याच गोष्टीत किती उत्कटता असते आणि समाज त्याची कदर करू शकत नाही याचा नमुना ध्यानात येऊन सुखदेवविषयी आपलेपणा

---

[१] एक साधक.

वाटू लागला. 'वात्सल्य' शब्द मी वापरणार नाही, पण त्याच्या जीवनात प्रवेश करण्याची इच्छा उत्पन्न झाली आहे (किंवा सरोजकडून तशी सूचना मिळाली आहे.) दोन्ही गोष्टी खऱ्या आहेत. आता पाहू त्याची थोडी तरी सेवा माझ्याकडून होते किंवा नाही. खरोखर जग अशा सामान्याचेच आहे. त्यांची सेवा हीच ईश्वराची खरी सेवा आहे.

ट्रेन मधून काशी
१०-२-७१

वाराणसीचे वातावरण कसेहि असो या शहराविषयीचा भक्तिभाव कमी होत नाही. याचे खरे कारण येथे धर्मचिंतनाची परंपरा जिवंतपणे टिकली आहे. 'वाराणसी' म्हणताच हरिश्चंद्राचे स्मरण होते. आणि हरिश्चंद्रांना 'त्राहि त्राहि' करणाऱ्या इकडील समाजाविषयीची चीडहि जागृत होते. काशी म्हणजे महाराष्ट्र-संत एकनाथाला धमकावणारी रूढि-निष्ठा; आणि त्याचे धर्मतेज पाहून नरम येणारी व त्यांचा गौरव करणारी संतनिष्ठाहि. काशी म्हणताच बुद्ध आणि महावीर हेहि ध्यानात येतात. आणि त्याच्यानंतर कबीर.

भगवती गंगेने पापी लोकांची पापे धुतली असतील पण जगातील पाप कमी झाले नाही. आता गंगामैयाने, धर्माच्या नांवाने समाजात अधार्मिक आदर्श आणि रूढि पसरल्या आहेत, त्या धुण्याला मदत केली पाहिजे.

काशीमध्ये मोठे मोठे दर्शनशास्त्री होऊन गेले. आजहि आहेत. पण त्यांनी दर्शनानुकूल समाजशास्त्र रचले नाही. जणू का त्यांच्या मते समाज हा असाच असावयाचा. सिद्धांत सनातन धर्माचा हा पाया असावा असे वाटते.

भारतीय इस्लामने अलीगढ युनिवर्सिटी उभी केली, त्याबरोबर मालवीयजींनी हिंदु युनिवर्सिटी स्थापन केली. अलीगढ इस्लामी समाजाची संकुचितता दूर करू शकली नाही. उलट अलीगढने मुस्लिम लीगला मजबूत

पाया देण्याचे काम केले. हिंदु युनिर्वासिटी हिंदुसाठी तसे करू शकली नाही हा लाभ. पण ती एक मामुली युनिर्वासिटीच झाली. गांधीजींच्या प्रेरणेने काशी विद्यापीठाची स्थापना झाली.

ही संस्था तरी काही करील काय ?

## कलकत्ता (सीतारामजी[1] कडे)

११–२–७१

सगळा दिवस ख्रिस्ती धर्माविषयी चिंतन केले. येशूचे सेवाभक्तिमय जीवन. तेवढे त्याचे स्वतःचे. पण त्याची वचने आणि कार्ये शिष्यांनी लिहून ठेवली. शिष्यांची भक्ति आदरणीय. पण त्यांची संकुचितता येशूला आणि त्याच्या धर्माला अखंड बाधत आली आहे. हिंदुजीवनदृष्टीत दोष असंख्य असतील पण तिची उदारता सामान्य नाही. तिचा लाभ ख्रिस्ती धर्माला मिळाला पाहिजे. आपण पूर्ण हृदयाने येशूला स्वीकारू तेव्हाच शुद्ध दृष्टीचा प्रवेश ख्रिस्ती धर्मात होईल. तोपर्यंत 'Orthodoxy Strengthens the Church'- –याचाच अनुभव घेत राहावे लागणार.

अँड्रयूज उत्कटपणे दीनबंधु होते. पण सार्वभौम स्वरूपात ते सर्वबंधु होते.

कांति मेहता आणि अवनी मेहता जीवनाच्या उत्तरार्धात सेवा-संस्था काढू आणि चालवू इच्छितात. Better late than never ! कांतीला दिल्लीच्या आमच्या संस्थेत घेतलेच पाहिजे. येथील मजुरांच्या संस्थेच्या कल्याणासाठी निवडणुकीत उभे रहायला तयार झाला होता. पण ईश्वराने त्याला वाचविले.

डॉ. भगवानदासांचे चिरंजीव–श्री. प्रकाशना इस्पितळात जाऊन भेटलो. बरेच बोलणे झाले. उभयपक्षी आनंद झाला. यांची जीवन-दृष्टि शुद्ध आहे. यांच्या सल्ल्याप्रमाणे काशी विद्यापीठ चालेल तर संस्थेचे

---

[1] सीतारामजी सेकसरिया,

कल्याण होईल. गुजरात विद्यापीठ आणि काशी विद्यापीठ सरकारी मदतीच्या लोभाने निस्तेज होत आहेत याचे दुःख होते.

प्रजा-राज्य चालवणारे लोकनियुक्त सरकारदेखील सरकारच असते. हे विसरून चालता येत नाही.

आगगाडी
१२–२–७१

काल आणि आज मिळून कांति आणि अवनी चार-पाचदा भेटले याचा आनंद वाटला. आजवरच्या त्यांच्या कामातून ते बरेच निवृत्त झाले असले पाहिजेत. मी कांतीला आत्मकथा लिहिण्याचा आग्रह केला आहे. आदर्श आणि व्यवहार-दोन्हीला समजणारा हा माणूस यापुढे उत्तम नेता होणार आहे. आज वय पन्नासच आहे.

आज अँड्र्यूजचा दिवस. त्यांचे शरीर ख्रिस्ती कबरस्तानात आहे. त्यांच्या निष्ठेला ते योग्यच आहे. पण मला वाटले, त्यांची समाधि शांति-निकेतनमध्ये अधिक योग्य झाली असती.

खरोखर, अँड्र्यूज आदर्श इंग्रज होता. आधुनिक काळाला शोभेल असा संतच. भारताने त्याला भारतीय संतमालेत गोवून घेतला पाहिजे. मला वाटते अँड्र्यूजना ख्रिस्ताचा आत्मा पूर्णपणे ओळखावयाला आणि अनुसरायला गुरुदेव रवींद्रनाथांची उत्तम मदत झाली आणि ईशानुसरण करण्यात गांधीजींच्या कर्ममय जीवनाचे उदाहरण त्यांना पोषक झाले असले पाहिजे. ख्रिस्ती माणूस अधिकाधिक किती उदार बनू शकतो याचे उदाहरण म्हणजे अँड्र्यूज होय. प्रेम आणि नम्रतेची मूर्ति.

कालच्यापेक्षा आज सीतारामजींशी आपुलकी पुष्कळ वाढली. जन्म-परंपरेची आणि सुखदुःखाची मीमांसा त्यांना पटू शकली कारण त्यांचे चिंतन येथवर येऊन थांबले असावे.

आगगाडी

१३–२–७१

सगळा दिवस आगगाडीत गेला. अशा लांबच्या प्रवासामुळे खूप शांति मिळाली आणि सरोजशी पुष्कळ गोष्टी करता आल्या. एरव्ही अशी संधि मिळत नाही.

...विषयी मी काही लिहावे असा पुंडलीकांचा आग्रह आहे. पण त्या तरुणाला मी कधीच भेटलो नाही. बेळगांव वेंगुर्ल्याकडील कोंकणी प्रदेशाचा तो रहिवासी. यामुळे थोडी आपुलकी वाटणे स्वाभाविक होते. पण नेहरूंचाहि विरोध करणारा समाजसत्तावादी, अहिंसेविषयी अनास्था असलेला, गोव्याविषयीचे त्याचे राजकारण हिंदु-ख्रिस्ती एकतेला विघातक होणारे, हिंसेच्या मार्गावर विश्वास ठेवणारा. तरीहि गरीब जनतेविषयी त्याच्यात उत्कट कळवळा, स्नेह्या-सोबत्याविषयी आपुलकी आणि निष्ठा, इंग्रजी, मराठी, संस्कृत वगैरे साहित्यावर प्रभुत्व; असाधारण वक्तृत्व आणि लोकांना आपलेसे करून घेण्याची उत्तम हातोटी. गोवा, बेळगांव, कोंकण वगैरे सर्व भाग महाराष्ट्राचेच असे मानणारा. यामुळे आमचे पुंडलीक त्याचे अत्यंत भक्त.

काँग्रेस विरोधी पक्षाच्या लोकांची मला कदर आहे. त्यांच्या गुणांची कदर करणे माझ्या स्वभावात आहे. पण त्यांच्याविषयी आज मी काहीहि लिहिले तर एकतर ते कृत्रिम दिसेल अथवा गैरसमज उत्पन्न करील आणि नसत्या गोष्टी माझ्या अंगाशी येतील.

'साधने'च्या सबंध अंकात ..च्या युरोपियन बायकोविषयी फारच थोडी माहिती मिळाली. सबंध अंकात गुणवर्णन आणि माहात्म्य आहे. चरित्र, जीवनकार्य आणि विचाराची भूमिका—यांपैकी हवे ते काहीच मिळाले नाही.

दिल्ली

१४–२–७१

पूर्वी प्रत्येक जातीचा धंदा ठरलेला होता आणि प्रत्येक जातीची राहणी-करणीहि निश्चित आणि भिन्न भिन्न असे. त्यामुळे प्रत्येक जातीचे

सामाजिक जीवन ओतप्रोत असे आणि इतर जातीशी दूर राहण्याची वृत्तिहि त्या काळी सोयीस्कर होती. आता जातीचा आणि धंद्याचा संबंध उरला नाही; आणि धर्मभावनेमुळे जीवनक्रम नक्की होत होता तेहि आता फारसे उरले नाही. अगदी खालच्या जाती स्वच्छता सांभाळू शकत नाहीत एवढाच मुख्य फरक उरला आहे. मांसाहाराचीहि शिसारी कोठेच फारशी उरली नाही.

अशा अलिप्त समाजात खरोखर सर्व-धर्म-समभाव आणि सार्वभौम समन्वय यांचा प्रचार करण्याची शक्यता नसणार; कदाचित् आवश्यकता नसावी. पण जीवनात विरोध नसूनदेखील राग द्वेष टिकून आहेत, एवढेच नव्हे, तर बळावू लागले आहेत. याच्या विरुद्ध जबरदस्त नैतिक आंदोलन चालविले पाहिजे. पण अलीकडचे सुशिक्षित लोक नैतिक आग्रहाला आग्रहपूर्वक डावलू पाहतात.

कारण काय? तर युरोपचे नेते तसे वागतात आणि केवळ आर्थिक विषमता दूर करू पाहतात. याहि बाबतीत एकांगिताच आहे. समाजाचे नैतिक दिवाळे वाजण्याची पाळी येऊन ठेपलेली दिसते. बरेचसे नेते या बाबतीत आंधळे राहू पाहतात. हा सर्वात मोठा चिंतेचा विषय आहे. भारतीय संस्कृतीचे दिवाळे वाजल्यानंतरच नवनिर्मिती व्हावी अशी तर विधात्याची योजना नाही ना?

परिस्थितीचे जितके 'निदान' करत जातो तितका मी अस्वस्थ होत आहे. माझा मार्ग शुद्ध आणि हितकर असला तरी तो लोकांना पटला पाहिजे ना?

दिल्ली

१५–२–७१

गांधीजींच्या बलिदानानंतर थोड्याच दिवसांनी सेवाग्रामला आम्ही लोकांनी एक शांतता परिषद बोलावली होती. तिच्यासाठी जवाहरलाल आले होते. मुख्य अतिथि होरेस अॅलेक्झान्डर असावेत. त्या परिषदेला

उद्देशून जवाहरलालजी म्हणाले, "मी स्वतःला 'Pacifist' कोणत्या तोंडाने म्हणू ? पंतप्रधान असल्यामुळे भारताची एक चांगली जय्यत सेना मी बाळगीत आहे. तरीहि तुम्हा लोकांना सांगू इच्छितो की आमच्या फौजेत कित्येक लोक हृदयाने पूर्ण शांतताप्रेमी आहेत. युद्ध म्हणजे काय याचा सगळ्यांत अधिक अनुभव त्यांना. ते शौर्याने लढतील, आज्ञेचे पालन करतील पण त्यांना युद्धाची शिसारीच आहे."

जवाहरलालजींच्या कथनात भरपूर सत्य होते. फौजेचे लोक म्हणजे असंस्कारी 'हडेलहप्पी' असा अभिप्राय पुष्कळांचा असतो पण तो चुकीचा आहे. जीवनाचा अनुभव मृत्यूशी खेळणाऱ्या लोकांनाच अधिक असू शकतो. आणि त्यांचे चिंतनहि खोलात उतरलेले असते. काही लोक कठोर, हडेलहप्पी असतात पण सर्वच तसे नसतात.

आधुनिक युद्धकलेत प्राविण्य मिळविण्यासाठी कितीतरी गोष्टी शिकाव्या आणि सांभाळाव्या लागतात. या कामात अत्यंत तरबेज म्हणून ज्या गृहस्थांची लष्करी प्राविण्य-साधक संस्थेवर नेमणूक झाली आहे, ते आमचे ब्रिगेडियर ध्रुव धर्म, तत्त्वज्ञान, काव्य, कला–सर्वच गोष्टींचे रसिक. यांना भेटल्याने अपार आनंद होतो. आज ते भेटले. त्यांच्याशी आज वेदान्तविद्येची आणि 'गुरुडम'ची चर्चा झाली.

दिल्ली

१६–२–७१

जुन्या काळी मुलामुलींची लग्नें आईबाप किंवा घरची वडील मंडळी ठरवीत असत. त्यात मुख्य विचार स्थळाचा आणि कुळाचा असे. वर-वधूचा स्वभावमेळ शक्य आहे किंवा नाही याचा विचार कोण करणार ? वधूवर वयाने लहान आणि अननुभवी. त्यांच्या अभिप्रायाला किंमत किती ?

आज तरुण-तरुणी मोठेपणी लग्न करतात. त्यामुळे परस्पर पसंती त्यांची स्वतःची असावी, या विचाराला महत्त्व मिळू लागले आहे. पण जातीबाहेर जाण्याची हिंमत होत नाही.

खरोखर पाहता स्वभावमेळ आहे किंवा नाही हे आजहि ठरविता येणार नाही. लग्न झाल्यानंतर स्वभावमेळ साधलाच पाहिजे ही खरी जीवनसाधना. खरी जीवनसिद्धि या साधनेतच आहे.

मुलामुलींना स्वत:चा साथी पसंत करण्याचा केवळ अधिकार देऊन काय होणार? त्यांना साथी पसंत करण्याची दृष्टि आणि जीवनकला शिकविली पाहिजे, कारण विवाह ही सामाजिक संस्था आहे. जुन्या लोकांची दृष्टि भ्याडपणाची असे. आर्थिक सुरक्षा आणि सामाजिक प्रतिष्ठा—याचाच विचार होत असे. आजकालच्या तरुण-तरुणींची दृष्टि आर्थिक सुरक्षिततेची असतेच. पण बाकीची सगळी पसंती आंधळीच म्हटली पाहिजे. तेव्हा निवडदेखील 'नशीबच' असे म्हणावे लागते.

या बाबतीत आता प्रत्येक समाजाने सर्व दृष्टींचा समन्वय करणारी पुस्तके तयार केली पाहिजेत. आणि या विषयाची सार्वजनिक चर्चाहि झाली पाहिजे.

दिल्ली

१७–२–७१

आपल्या देशातच नव्हे, तर पुष्कळ देशांतील संस्कारी जनतेने, प्राचीनकाळी तंत्र-साधनेचा उपयोग केला आहे. तंत्र-साधनेत थोडे अध्यात्म, बरेचसे कर्मकांड आणि बाकीचे अर्धेकच्चे विज्ञान—यांचे संमिश्रण आहे. या शास्त्राने मानसिक शक्तीचा विकास करण्याचा प्रयत्न करून एक गूढ मानसशास्त्रही रचले आहे.

सर्वांच्या मुळाशी श्रद्धा वापरलेली आहे.

श्रद्धा शब्दाचा अर्थ फक्त डॉ. भांडारकरांनी openness of mind असा केला आहे. बाकी सगळे लोक will to believe—असाच करतात. माझ्या मते श्रद्धेच्या मुळाशी hypothesis असते. म्हणून मांडलेली वस्तु खरी असावी असे मानून आपण तिचा स्वीकार करतो. आणि मग प्रयोग चालवितो. धार्मिक संस्कृतीमध्ये अपरंपार hypothesis म्हणजे "खऱ्या

असू शकतील अशा विश्वासाने स्वीकारलेल्या वस्तु" असतात आणि भोळे अनुयायी प्रयोग करून न पाहता आणि अनुभवाच्या कसोटीवर न कसता, ऋषिमुनींनी सांगितले आहे ते खरे असलेच पाहिजे–आहेच–असे मानून चालतात आणि प्रयोगवृत्ति सोडून देतात.

अध्यात्माच्या बाबतीत पुष्कळसे गूढ असते. पण तेथे प्रयोगाच्या कसोटीला पुरा अवकाश असतो. मंत्रात आणि तंत्रात प्रयोगाला जणु बहिष्कृत केले आहे. 'श्रद्धा असेल तरच मंत्र फळेल' अशी भूमिका जोराने चालविली जाते. यामुळे मंत्र-तंत्रावरील विश्वास बराचसा उडाला आहे–उडत चालला आहे. पण या विद्येचा चिवटपणा असाधारण आहे. कारण थोडा एकांगी अनुभव समर्थनाला पुरतो.

दिल्ली
१८–२–७१

आपल्या संस्कृतीने एका बाजूने कुटुंब-भावना आणि दुसऱ्या बाजूने विश्व-भावना विकसित केल्या. नदी आणि पहाड दोहोंशी दोस्ती केली. प्रथम कंद, मूळ आणि फळ यांचा आनंद घेतला आणि जगाच्या आधी शेतीची संस्कृति विकासविली. स्वाभाविकपणे आपल्या संस्कृतीच्या वाट्याला जगाचे नेतृत्व आले. पण संतोषाच्या नावाने आपण जडता स्वीकारली आणि स्थानबद्ध झालो. याच्या उलट अरबस्तानचे लोक त्यावेळच्या जगात पसरले. आपण गाईबैलांना आपलेसे केले. त्या लोकांनी घोडा आणि ऊंट यांची स्वारी केली. आपण समुद्राची उपेक्षा केली आणि घरकोंबडे झालो. जगाचा परिचय करून घेणे आपल्याला आवश्यक वाटले नाही. आपण भूगोलाची उपेक्षा केली आणि सर्व काही घालवले.

एका बाजूने ब्रह्मदेश, जपान आणि चीन–या देशांचे मी दर्शन घेतले. दुसऱ्या बाजूने आफ्रिका, युरोप आणि अमेरिका पाहिली. पण इस्लामी जग पाहण्याचे राहूनच गेले. ही मोठी गफलत झाली. आता ही चूक सुधारणे सहज शक्य आहे. पण प्रवासाचा फायदा घेण्याची शक्ती उरली नाही.

चि. बाळ लवकरच पश्चिम आफ्रिकेतील नायजीरिया आणि घाना या देशात जाऊन येणार, सरकारी कामासाठी मी या देशात जाऊन आलो आहे. त्यामुळे त्याविषयी आम्ही बोललो. आपल्या लोकांमध्ये पृथ्वी-परिचयाचा उत्साह अजूनहि जागृत होत नाही. लोक जाऊन येतात, पण हृदयात काहीच उतरत नाही. घरकोंबडे खरेच !

दिल्ली

१९–२–७१

एक हिंदी म्हण आहे. 'सस्ता दाम तो सस्ता माल.' कित्येक लोकांनी ईश्वरप्राप्तीचा मार्ग अतिशय सोपा करून टाकला आहे. दुनियादार मतलबी लोकांनी असे केले असते तर गोष्ट समजण्याजोगी होती. पण थोर थोर संतांनीदेखील ईश्वरप्राप्तीची साधना अतिशय सोपी केली आहे. "देवाचे नांव घ्या, वाटल्यास मौनपणे घ्या, वाटल्यास गद्यघोषाने घ्या आणि साधेल तितके दान देत जा. आणखी काही करावयास नको. ईश्वरप्राप्ती खात्रीने होईल."

असा उपदेश ऐकल्यानंतर साधक म्हणतो, "इतक्या सोप्या मार्गाने दैवदुर्लभ ईश्वरप्राप्ती कशी होणार ? देवाचे नांव घ्यायचे म्हणजे अगदी उत्कटपणे एकाग्र होऊन ध्यान केले पाहिजे. आणि आयुष्याचा सर्व वेळ ईश्वराच्या चिंतनात घालवला पाहिजे हे काम काही सोपे नाही. नाम-स्मरणाची गोडी लागावी म्हणून संत म्हणतात, "मार्ग सोपा आहे, एवढेच." खरोखर मार्ग कठीण आहे आणि यात आश्चर्य कसले ? ईश्वर-प्राप्ती म्हणजे काही लहानसहान गोष्ट नव्हे.

यावर संत म्हणतात, "ध्यान करण्याची अटहि आम्ही लावली नाही. न कळता पद अग्निवरी पडे, इत्यादि—न कळत, केवळ यांत्रिकपणे तोंडातून देवाचे नांव निघाले तरी सर्व पापें जळून जातील. नाममहिमा आहेच असा अद्भुत !" संतांनी जाणूनबुजून मार्ग इतका स्वस्त का केला ? कारण स्पष्ट आहे. लाखो आणि कोट्यावधि लोकांचे वातावरण सुधारायचे आहे.

हजारो लोकांनी एकत्र येऊन नामघोष केला तर कित्येक लोक अंतर्मुख होतीलच आणि त्यामुळे वातावरणात शुद्धि होऊन, त्यात देव घुसू शकेल.

दिल्ली (ट्रेन)

२०–२–७१

कृषि-संशोधन विद्यालय (Agricultural Research Institute) सारख्या संस्थेने 'भारतीय भावनात्मक एकते'सारख्या विषयाची चर्चा करण्यासाठी देशातील सर्व विश्वविद्यालयांना बोलावले हे एक आश्चर्यच म्हटले पाहिजे. कृषि हाच संस्कृतीच्या स्थायीपणाचा पाया आहे, असे सांगून या परिषदेला मी पुढे सांगितले की आपल्या संस्कृतीत लोकोत्तर उत्तम तत्त्वे आहेत हे मला कबूल; पण आपली संस्कृति एकांगी आणि पूर्वग्रहांना चिकटून बसणारी. म्हणून आपण अनेक शतके हार खात आलो आहोत. आपण जातीसारख्या संघटनेला, ती कालग्रस्त झाली तरी, चिकटून राहिलो. वेगळेपणामधून तुसडेपणा अंगवळणी पडतो. एकमेकाविषयी काळजी वाटत नाही. आणि जगाशी वागताना जीवनसंघर्षात आपण एक-सारखे पराभव पावत आहोत. आपण भिन्न जातीत म्हणजेच जातीबाहेर विवाह करण्याची नीति आग्रहाने स्वीकारली पाहिजे. भिन्नधर्मी लोकात-देखील विवाह झाले पाहिजेत. धर्मभेदाने समाजभेद होता कामा नये वगैरे सूचना strategy म्हणून परिषदेपुढे मांडल्या आणि हे काम राजनैतिक आणि धार्मिक अधिकाऱ्याकडून होणार नाही, शिक्षणाला वाहून घेतलेल्या लोकांनीच हे लोकशिक्षणाचे काम केले पाहिजे, हेहि सांगितले. आज देशात सगळ्याच प्रश्नांची, सगळ्या बाजूने अखंड चर्चा चालते आणि असंख्य सूचना रोज ऐकत राहण्याची लोकांना संवय होते. यामुळे क्रांति-कारी कार्यशीलता उठतच नाही. रोगाचे इलाज ऐकण्याने रोग थोडाच बरा होणार ?

१००२

आगगाडी
२१-२-७१

तीन विषयाकडे आज मन विभक्त झाले होते. (१) अहमदाबाद, मुंबई, वर्धा आणि सिकंदराबादची लांब यात्रा. (२) साहित्य अकादमीच्या मार्फत पंधरा-सोळा भाषांतील उत्कृष्ट लेखकांना दिले जाणारे पारितोषक आणि (३) सर्वोदय कार्य करणारे जोडपें वसंत आणि तारा व्यास.

मला जर वेळीच कळले असते की २३ तारखेला रविशंकरदादा स्वत: अहमदाबादेत नसणार, तर तिकडचे आमंत्रण मी स्वीकारले नसते. कारण अशा वेळी गैरहजर व्यक्तीपेक्षा मुख्य वक्त्याकडेच लोकांचे ध्यान जाते. कलकत्त्याला अँन्ड्र्यूज दिनाच्या प्रसंगी ही गोष्ट ध्यानात आली.

फादर वालेसच्या तोंडून कॅथलिक संघटनांची कल्पना आल्यानंतर वर्ध्याला जाऊन संतोष बहन श्रद्धेला भेटण्याची उत्कटता कमी झाली. शेवटी उत्साह उरला ब्रिगेडियर ध्रुवांच्या घरी आराम करण्याचा. श्रीमन्जींना भेटणे इष्ट होते. याचा विचार होऊ शकला.

दरवर्षी साहित्यिक लोकांना पारितोषिक दिलेच पाहिजे या रिवाजा-मुळे आणि तेहि प्रत्येक भाषेला दिलेच पाहिजे या आवश्यकतेमुळे सामान्य कोटीच्या लेखकालादेखील मान मिळू शकतो हे आपल्याला अनिष्ट का वाटावे ?

वसंत आणि तारा यांचा प्रौढ विवाह अभिनंदनीय वाटला. दोघांनीहि सर्वोदय-कार्य आपलेसे केले आहे.

कार्यकर्त्यांमध्ये सिद्धांतनिष्ठा बेताची असली तरी हरकत नाही. आंतरिक प्रेरणा तर सबंध देशात चार-सहा लोकांतच दिसून येणार. बाकींनी करियरमध्ये उत्तम निवड केली हेच अभिनंदनीय असते.

आगगाडी
२२-२-७१

गांधीविषयी आलेल्या पाच निबंधापैकी दोन वाचले. त्यामुळे सगळा

दिवस जणू पू. बापूजींच्या सहवासातच राहिलो. आणि विचार आला की गांधीजीविषयी लोकांनी लिहिलेले सगळे वाचून, नंतर गांधीदर्शन आणि आपला अनुभव लिहावा असा संकल्प केल्याला तीस वर्षे सहज होऊन गेली. आता वाटते, थांबलो ही चूकच केली. आजवरचे माझे सगळेच साहित्य गांधीदर्शन-प्रेरित आहे. तेव्हा तो विचार सोडून द्यावा आणि गांधीजीच्या सहवासात आल्याचे अनुभव विस्तारपूर्वक, लवकर लिहावेत. नाहीतर सर्वच विसराळूपणात गडप होऊन जाणार. सिकंदराबादला वेळ मिळाला तर तेथेच प्रारंभ करावा. आणि 'सलंगसूत्र' लिहिण्याच्या भरीस न पडता आठवेल तसतसे लिहून मग ते कालक्रमाने जुळवून घ्यावे. आणि तसे न जमले तरी काही बिघडणार नाही. मला गांधीचा किंवा स्वतःचा इतिहास लिहावयाचा नाही. फक्त अनुभव लिहावयाचा आहे. आणि विशेष म्हणजे माझ्या जुन्या भांडवलात गांधीजीमुळे कोणती आणि किती महत्त्वाची भर पडली हे नमूद करावयाचे आहे. खरोखर, हीच माझी त्यांना श्रद्धांजलि ठरावी. त्यांना भेटलो तेव्हापासून सेवा अर्पण केली, आता जाण्यापूर्वी श्रद्धांजलि अर्पण करावी.

अहमदाबाद (रात्री ट्रेन)
२३-२-७१

आज महाशिवरात्री. त्यामुळे लहानपणी वडिलांचा मार खाऊनहि उपवास सुरू केलेले—सर्व आठवले त्यात पुन्हा आज कस्तुरबांचा दिवस. त्यामुळे त्या साध्वीचेहि स्मरण झाले. तिथि आणि तारीख या खेपेला एकच झाले आहेत.

दिल्लीहून मुद्दाम अहमदाबादला आलो. रविशंकर दादांच्या अभिनंदनासाठी. हे राष्ट्रसेवक आणि संत खरेच, पण शिक्षणकलेचे उत्तम प्रतिनिधिदेखील आहेत. गायकवाडी पोलीस खात्याच्या सर्वश्रेष्ठीने दादांची प्रथम उत्तम कदर केली आणि खुनी, दरोडेखोर, लुटारू लोकांची सेवा करून, त्यांच्यात माणुसकी आणणे शक्य आहे, या गोष्टीचे महत्त्व त्या

दोघांना पटले. गांधींच्यामुळे दादांच्या जीवनाचा उत्तम उपयोग झाला. या सात्त्विक, तेजस्वी ब्राह्मणाने रचनात्मक कामाची कीर्ति वाढवली. विशाल जनतेशी एकरूप होण्यात यांच्या तोडीचा दुसरा नाही बबलभाई आणि जुगतरामभाई हे दोघेच यांच्या पुष्कळ जवळ येतात.

अशा लोकांनी राजकारणात स्वत: न पडता राजकारणावर प्रभाव पाडला पाहिजे. जनता यांची कदर संत आणि सेवक म्हणून करते, एवढे पुरे नाही. राष्ट्रीय नेते म्हणून जनतेने यांची शक्ति वाढवावी आणि मग मंत्री होऊ इच्छिणाऱ्यांनी त्यांच्या आशीर्वादाने मतें मिळविण्याची आशा बाळगावी. मंत्री होऊ पाहणारे, शिक्षकांना म्हणतात, "आम्हाला मते मिळवून द्या. आम्ही तुमच्या संस्थांना चांगली ग्रँट देऊ." हे स्वीकारून शिक्षक सरकारचे आश्रित बनतात. झाले पाहिजे याच्या उलट. "आम्ही सांगू तसे राज्य करण्याची खात्री द्या. आम्ही तुम्हाला निवडून आणू."

मुंबई
२४–२–७१

निष्ठावान राष्ट्रसेवकांमध्ये असंख्य लोक असे आहेत की ज्यांना गांधीजींची अहिंसा प्रिय आहे, पूज्य आहे. पण त्यांच्या मनात हिंसेच्या उपयोगितेविषयी आकर्षण आहे. हे लोक प्रामाणिक आहेत. पण त्यांना अहिंसेचा साक्षात्कार झाला नाही. माझ्या चिंतनासाठी मी ****ना या सबंध वर्गाचे प्रतिनिधि मानले आहेत. आणि म्हणून त्यांचे बोलणे अत्यंत आस्थेने ऐकतो. किशोरलालभाई आणि आता विनोबा त्यांना जवळचे वाटतात. किशोरलालभाईंनी पश्चात्ताप जाहीर केला. आता फक्त विनोबा उरले. आता त्यांना सविस्तर स्पष्टीकरण करावे लागणार.

आज अवनीची पत्नी—मंजू, रूपा नांवाच्या अठ्ठावीस वर्षाच्या एका गृहिणीला घेऊन आली. त्या दोघींशी चर्चा करताना गृहस्थाश्रमाचे उत्कट चिंतन केले. रवींद्रनाथ ठाकुर म्हणतात तेच खरे. माणसाला विवाहसंस्था अजून नीटशी साधली नाही. मला वाटते या संस्थेचे आदर्श बदलत जातील,

सुधारत जातील आणि मनुष्यजात पुष्कळ प्रगति करील पण फार सावकाश ही संस्था तेव्हाच पूर्णत्वाला पोहोचेल जेव्हा पतिपत्नी दोघेहि पूर्ण वेदांती होतील. दोघे पूर्ण ब्रह्मचारी होऊन भागायचे नाही. आदर्श दांपत्याला संयम आणि परस्पर निष्ठा हे दोन गुण जितके आवश्यक आहेत तितके ब्रह्मचर्य नाही. पूर्ण ब्रह्मचर्य आणि संन्यास अथवा निवृत्ति यांचा मिलाप झाला तर दांपत्य संबंधाचे विसर्जनच होणार. सामान्य विवाह हा सर्वात मोठा मानवी प्रश्न आहे. याचे चिंतन आणि साहित्य पुष्कळच हवे आहे.

मुंबई (ट्रेन)
२५–२–७१

गांधींनी अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी असहकार, सविनय कायदे-भंग–सत्याग्रह वगैरे अहिंसक, पूर्ण नीतियुक्त, आध्यात्मिक शस्त्राचा उपयोग जोवर शिकवला नव्हता, तोवर हिंसक विरोध करणे अपरिहार्य होते आणि म्हणून धर्माला अविरोधी अशी हिंसा मान्य करणे क्रमप्राप्त होते. विजय मिळविण्यासाठी हिंसेचा उपयोग मान्य केल्यानंतर हिंसेबरोबर असत्य आणि कपट ही येणारच. धर्मद्रोही, अनीतिमान शत्रूचा पराभव करण्यासाठी वापरलेली हिंसा ज्याप्रमाणे धर्म्य त्याचप्रमाणे श्रेष्ठ उद्देशाला धरून सांगितलेले असत्य आणि केलेले कपट धर्म्य ठरविल्यावाचून गत्यंतर नसते. गांधीजींच्यापूर्वी जी नीति समाजमान्य होती, तिला असत्य, कपट आणि हिंसा मान्य करणे अपरिहार्य होते. व त्याचमुळे बहादुरांनी स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता केलेल्या सगळ्या गोष्टीचे कौतुक करणे धर्माला अमान्य नव्हते. यापुढे हे जुने प्रकार मान्य करता येणार नाहीत. ही गोष्ट जनतेला जर आपण पूर्णपणे समजावू शकलो नाही तर समाज-मानस जुन्या हिंसेची कदर करणारच आणि गांधीवादी अहिंसक लोकांना अहिंसेची व्याख्या मर्यादित करावी लागणारच.

या कार्याला मान्यता देणे आणि गांधीवादाचा पुरस्कार करणे, ही

तारेवरची कसरत आजच्या काळातील कित्येक लोक करत आले आहेत. याची दखल घेतल्यावाचून गत्यंतर नाही.

वर्धा, पवनार
२६-२-७१

मी जर्मन संन्यासिनी श्रद्धेला खास भेटण्यासाठी पवनारला गेलो याचे कित्येकांना आश्चर्य वाटले. तिकडील लोकात तिची प्रतिष्ठा वाढली आणि कित्येकांना याचे वैषम्यहि वाटले. श्री. विनोबांनी आम्हाला भेटताच श्रद्धेचे अभिनंदन केले आणि समन्वयासाठी तिचा उपयोग इष्ट ठरवला हे चांगले झाले. तीहि खूष झाली. तिची कॅथॉलिक भूमिका मला ठाऊक होती. तिने माझ्यासाठी पुष्कळ प्रश्न काढून ठेवले होते. त्या सर्वांची उत्तरे मी दिली. ती तिने कशीबशी नोंदून ठेवली आहेत. मलाच ते सर्व व्यवस्थित लिहून द्यावे लागणार. कॅथॉलिक भूमिका संकुचित आणि अभिमानमूलक असली तरी तिला सांभाळूनच श्रद्धेसारख्यांचा सहयोग घेणे शक्य असते. तसे करण्यात माझ्या मनोवृत्तीत जर लोभाचे दडपण पडले तर ते अन्-अध्यात्मिक होईल. यासाठी माझी भूमिका स्पष्टपणे सांभाळून आणि कॅथॉलिक भूमिका उत्तम रीतीने समजून त्या भूमिकेमागची व्यापकदृष्टि मी कितपत मान्य केली पाहिजे—आणि तीहि पूर्ण हृदयाने—याचे मी जागरूक चिंतन केले. याचा मला जो लाभ झाला तो थोडा थोडका नव्हता. पण तो आत्मनेपदी. दुसऱ्याला समजणार नाही. माझ्या चिंतनाला या परिस्थितीमुळे उत्तम मदत झाली.

पवनार, वर्धा ट्रेन
२७-२-७१

आजचा दिवस श्री. विनोबांची भेट, श्रद्धेचे बाकीचे प्रश्न, आश्रमवासी

लोकांचे प्रश्न, गुजराती मुली, रामभाऊ म्हसकर, गौतम, आसामचे हेमभाई, इत्यादि लोकांशी विचारविनिमय करण्यात आणि कित्येकांना सल्ला देण्यात गेला. आणि आश्रमाच्या विस्तारात यथेच्छ फिरूहि शकलो. बापू-अस्थि विसर्जनाच्या जागेवर, नदीच्या मध्यभागीहि जाऊन आलो. आश्रमातील सेविकांची श्रमनिष्ठा, सेवाभाव आणि परस्पर सहयोग--तिन्हीविषयी मला संतोष वाटला. बारीकसारीक मतभेद, ईर्ष्या वगैरे थोडे असणारच. त्यामुळे वाईट वाटण्याजोगे काही नव्हते. सर्व वातावरण मला आवडले. पण प्रार्थनेनंतर आता प्रवचन नसते ही मोठी उणीव आहे, अशी मी तक्रार केली. ती विनोबापर्यंत पोहोचली आणि त्या लोकांनी ठरविले की संध्या-काळच्या प्रार्थनेत मीच प्रवचन देऊन प्रारंभ करावा. अर्थात् विनोबांना माझी सूचना सविस्तर ऐकावी लागली. विनोबा तयार नसतील तेव्हा इतराने प्रवचन द्यावे असाहि आग्रह मी केला. आजचा माझा दिवस विविध चिंतनात गेला. ते सर्व लिहून काढणे शक्य नाही. पण याचे वैषम्यहि नाही.

मुंबई
२८--२--७१

धर्माचे स्वरूप काय? खरोखर म्हणजे या जगात आल्यानंतर, जीवनाचा सदुपयोग करून, सर्वोच्च उन्नति साधणे यालाच धर्म म्हणता येईल. 'धर्मो धारयते प्रजाः' असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा धर्म हा व्यक्ति-गतहि आहे आणि सामाजिकहि आहे हे सहज सिद्ध होते. आणि म्हणून धर्माचा दोन्ही रीतीने विचार केला पाहिजे. सर्व समाजाला लागू होणारा धर्म जर बाहेरून लादला गेला, तर तो 'पाळावयाचा' धर्म झाला. ज्याप्रमाणे व्यक्तीसाठी धर्म आतून पटावा, उगवावा आणि आपण स्वेच्छेने प्रयत्नपूर्वक साधना म्हणून तो चालवावा त्याचप्रमाणे सामुदायिक धर्माचे-देखील सर्वांनी मिळून आंतरिक प्रेरणेने त्याचे अनुशीलन करावयाचे असते. सर्व समाजाला लागू होणारा धर्म बाहेरून लादला गेला तर तो कायदा

झाला. तसा लादलेला धर्महि इष्ट आहे पण लादलेला धर्म पूर्ण फलदायी होत नसतो. आणि पुष्कळदा तो विकृत होतो. (धर्माच्या समजुती विकृत होतात. गौण आणि सोप्या वस्तूंना महत्त्व येते आणि भलतेच लोक धर्माचे अधिकारी बनतात.) समाजातील अधिकांश लोकांना ज्ञानयुक्त धर्म-प्रणित बनवणे आणि धर्म न लादता, आतून तो प्रस्फुरित होऊ देणे हेच खरे धर्म-कार्य आहे. यासाठी जबदरस्त सामाजिक अध्यात्मसाधना चालवली पाहिजे. सोपा मार्ग गौण असतो आणि पुष्कळदा हीन बनतो आणि मग समाजाला याचे दुष्परिणाम सहन करावे लागतात. ही गोष्ट सर्वच रूढ धर्मांना लागू आहे.

■ ■ ■

मराठी ग्रंथ
अनुक्रम ... दि:
क्र.

# मार्च

मुंबई
१–३–७१

आज पुष्कळ वर्षांनी * * * ना भेटलो. एकेकाळी त्यांचा संबंध खूप वाढला होता. स्वत:च्या मनाने शिष्य मानण्याचा प्रयत्नहि त्यांनी केला होता. आज भेटल्याने जुन्या बऱ्याच गोष्टी आठवल्या. त्यांनी 'मरणाच्या तयारी'चा विषय छेडला. माझे विचार त्यांच्या डोक्यात शिरण्याजोगे नव्हते. त्यांना भेटल्याने त्यांच्या जीवनाविषयीहि पुष्कळ चिंतन झाले. पण ते लिहिण्याची वृत्ति नाही.

आज अवनी आणि मंजू आपल्या नात्यातील एका मुलीला घेऊन

आले होते. कलकत्त्याला शिकली असल्यामुळे मारवाडी सुखी घरच्या मुलीशी तिचा बराच परिचय आहे. बंगाली तर येतेच. शिक्षण पुरे झाले. आता जीवनाचे काय करावे याचे चिंतन सुरू झाले आहे. चिंता कसलीच नाही. अवनीची इच्छा की व्यापकदृष्टीने जीवनाचा विचार करण्याची थोडी गोडी लावली तर चांगले. लग्न करणे न करणे, साथी ओळखून पसंत करणे, आणि नंतर आई-बापाची संमति घेणे– याविषयी तर बोललोच. पण इतके करून शेवटी जसा साथीदार आपल्या वाट्याला आला असेल, त्याच्याशी आणि त्याच्या कुटुंबाच्या लोकांशी मिळते घेण्याची कला अधिक महत्त्वाची आहे हे समजावून सांगितले.

समाजसेवेचे दोन प्रकार. समाजाच्या अडचणी दूर करणे हा एक प्रकार; दुसऱ्यात समाजावर प्रभाव पाडून लोकजीवनात इष्ट क्रांति घडवून आणणे हा दुसरा, इत्यादि सामान्य पण महत्त्वाची चर्चाहि केली. बँकेत नोकरी, शार्टहँड टाईपिंग आणि कॉम्प्यूटर हेहि विषय निघाले होते.

मुंबई
२–३–७१

बुद्ध भगवानांनी मध्यम मार्ग सांगितला तो त्यांनी व त्यांच्या शिष्यांनी तपस्येपुरताच लागू केला. एखाद्याने तपस्येचा अतिरेक केला तरच लोक त्याच्या भजनी लागतात. सामान्य मनुष्य जे करू शकत नाही ते करून दाखविण्यात बहादुरी आहे, असा अर्थ करून लोक अध्यात्म-क्षेत्रातदेखील अधिक शक्तीचीच पूजा करतात. अहिंसेच्या क्षेत्रातहि जैनांनी असेच केले. भक्ति करावयाची ती शिवतत्त्वाची का शक्तितत्त्वाची ? या प्रश्नाचे उत्तर लोकांनी दिले आहे. "शक्तीवाचूनचा शिव म्हणजे केवळ 'शव' (प्रेत)."

खरी गोष्ट अशी आहे की जीवनात यश मिळते ते अतिरेकाला नव्हे तर समन्वयाला आणि समन्वय असतो मध्यम मार्गी. मध्यम मार्गी समन्वय परायण साधक जीवनात उत्कर्ष मिळवील. पण जनता त्याचे अनुकरण

करूनदेखील, त्याला नेता म्हणून स्वीकारणार नाही. त्याच्या भजनी लागणार नाही. हा आहे आपल्या संस्कृतीचा अनुभव आणि निष्कर्ष. तेव्हा सामाजिक जागृतीसाठी नेत्यांना स्वतःच्या साधनेत खरा मध्यम मार्ग सोडावाच लागतो आणि अतिरेकाची मस्ती स्वीकारावी लागते–मग ती आत असो किंवा नसो. बुद्धाने मध्यम मार्ग सांगितला, पण त्याचे पूर्णपणे पालन केले असावे असे वाटत नाही. त्याच्या शिष्यांनी संख्याबळ वाढविण्यासाठी वाटेल ते केले. या सर्व नीतीचा परिणाम असा होतो की नेत्याला अवतारी पुरुष ठरवल्यानंतर त्याच्या योग्य शिष्य त्याला मिळतच नाहीत. एखादा मिळाला तर तो आपला निराळाच मार्ग चालवतो.

मुंबई

३–३–७१

महापुरुषांचा प्रभाव समाजावर आणि सान्या जगावर पडतो हा एक सिद्धांत–आणि काल म्हणजेच परिस्थिती हीच सरतेशेवटी प्रभावी ठरते हा दुसरा पक्ष. यातील कोणती बाजू निर्णायक आहे हे सांगणे कठीण आहे. भीष्माने राजा अथवा महापुरुष यांच्याच प्रभावाला प्राधान्य दिले आहे. "राजा कालस्य कारणम् ।" भीष्माचे हे म्हणणे पुरुषार्थाला पोषक आहे म्हणून त्याचाच प्रचार करणे सर्वतोपरी इष्ट आहे. एवढे कबूल केल्यानंतर म्हणावेसे वाटते की ज्याप्रमाणे महापुरुषांच्या बाजूला एक स्पष्ट आणि भव्य प्रयोजन असते त्याचप्रमाणे चिंतनशील पुरुषाला कालाच्या बाजूनेदेखील एक समूहगत प्रयोजन दिसून येते. एकट्या गांधीचा प्रभाव सबंध राष्ट्रावर पडला, एवढेच नव्हे तर तो प्रभावी ठरला. त्यांच्या बाजूने नैतिक शक्तिखेरीज काहीच नव्हते–हे खरे आहे. तरीहि त्यांचा प्रभाव जितका लोकोत्तर तितकाच क्षणजीवी ठरला हे नाकबूल करता येणार नाही. त्यांची म्हटली जाणारी माणसेदेखील त्यांच्या तोडीला उतरली नाहीत. श्रीकृष्णाचेहि असेच झाले. आशा होती बुद्धाची आणि येशूची. त्यांचाहि प्रभाव शेवटी

अत्यल्प आणि निस्तेज. यापेक्षा कालाने केलेली प्रगति महत्त्वाची आणि स्थायी म्हटली पाहिजे. कालदेखील एक अनाकलनीय 'समष्टि पुरुष'च आहे. मला वाटते, कालालाच इतिहासविधाता म्हणून त्याचे चारित्र्य आणि प्रयोजन अभ्यासले पाहिजे. हे आजचे नवे दर्शन आहे.

मुंबई
४–३–७१

चि. श्रद्धेला भेटण्यासाठी मी पवनारला जाणार असे समजल्याबरोबर शंकरराव गुलवडी दोन-चार दिवस अगोदर तिकडे गेले आणि त्यांनी तिला सांगितले "काकासाहेब, तुला गोव्याच्या कॅथॉलिक लोकांना भेटण्यासाठी घेऊन जाणार." मी गुलवडींना सांगितले होते की फादर वालेसना अहमदाबादला भेटल्यानंतर श्रद्धेमार्फत रोमच्या लोकांवर थोडासाही प्रभाव पाडण्याची इच्छा उरली नाही. तरीही गुलवाडींनी श्रद्धेला भारून टाकण्याचा प्रयत्न केलाच. मी श्रद्धेला सांगितले की माझी इच्छा आहे पण इलेक्शनमुळे तेथे जुळेलच अशी खात्री नाही. ती समजली आणि तिने गुलवाडींना सांगितले की, 'तुम्ही आग्रह करू नका, जे होईल ते होवो.'

फादर वालेस जे म्हणाले, तसेच श्रद्धेनेहि सांगितले. 'आम्ही रोमची परवानगी घ्यावयाला बसलो तर पुष्कळ अडचणी उत्पन्न व्हायच्या. आम्ही आमच्या श्रद्धेप्रमाणे चालतो आणि त्याप्रमाणे वर कळवतो. आणि ते लोक मुकाट्याने मूक संमति देतात.'

ही गोष्ट सहजच माझ्या ध्यानात यावयाला पाहिजे होती. जगद्व्यापी कॅथॉलिक समाजावर पोपचे राज्य असेच चालणार. आणि पोपच्या आसपास orthodoxy मजबूत असल्याची छापहि सांभाळावी लागणार. आम्हा सनातन्यांमध्ये रूढीचे आणि रूढ विचारांचे जबरदस्त साम्राज्य आहे. पण सर्वांवर अधिकार चालवणारा धर्माधिकारी कोणीच नाही किंवा

असंख्य आहेत. त्याचे चालेल तेवढे चालते. आपल्या येथे हे असेच असावयाचे.

मुंबई

५–३–७१

न्यू ईरा हायस्कूलमध्ये जाणे मला आवडते. विद्यार्थी-विद्यार्थिनी संस्कारी आहेत. पाऊण तासात सभा आटोपली. प्रश्नोत्तरी चांगली झाली. अवनीच्या बहिणीची मुलगी आरती कलकत्त्याला मारवाडी विद्यालयात हिंदीतून शिकलेली आहे. तिला बंगालीचा चांगला परिचय आहे. गुजराती समाजात अशा मुली विरळ.

फिरोजा वकीलची स्नेही सिल्ला (शीला) मलबारी शेवटी काल संध्याकाळी भेटली. तीनदा हिने दांपत्य जीवनाचा अनुभव घेतला आहे. तारुण्यात हिमालयाच्या 'उसपार' कैलास-मानस सरोवराकडे, बौद्ध साधूंच्या सहवासात हिने एक प्रकारची साधनाहि केली. पहाडी यात्रेचे कष्ट सहन केले. कुत्री, मांजरे आदि पाळीव जनावरांची नुसती गोडी नसून खरोखर तिला माया, दया आहे. आध्यात्मिक आणि तांत्रिक साधनेत रममाण झालेली दिसते. काल तिने तांत्रिक साधनेविषयी पांच-सात प्रश्न विचारले. प्रश्न मौलिक होते. मी सविस्तर उत्तरें दिली. वैराग्यपरायण वेदांत आणि जीवनपरायण पण शुद्ध तंत्रमार्ग—यातील मुख्य तात्त्विक भेद सांगितला. 'जगात बरे-वाईट जे होते त्या सर्वांचा करता करविता परमेश्वरच आहे. आपण काही नाही, म्हणून शून्य झाले पाहिजे.' ही भूमिका तत्त्वत: शुद्ध आणि संपूर्ण आहे. पण दुसऱ्या बाजूने 'जीवन शुद्धीची साधना उत्कटतेने झाली पाहिजे' वगैरे गोष्टी सांगून अनेक साधना समजून घेण्याची आवश्यकता पटविली. बाई उथळ नाही, याचा संतोष वाटला. तांत्रिक साधनेतील देवीचे पौराणिक अवतार हिला अजून ठाऊक नसावेत. केवळ नांवाचा परिचय दिसतो.

मुंबई
६–३–७१

सध्याच्या स्थितीत मुंबईला एक दिवस अधिक राहिलो काय अथवा दिल्लीला लवकर पोहोचलो काय फारसा फरक पडत नाही. तरीहि वाटले तारीख सहाच्या संध्याकाळीच निघालो असतो तर बरे झाले असते.

तसे पाहिले तर जगातील प्रत्येक मनुष्य जीवनसाधना करीत असतो. बऱ्याचशा लोकांची साधना उथळ असते. इतर राष्ट्रांच्या मानाने आपल्या लोकांची जीवनसाधना शिथिल, अल्पसंतोषी आणि अन्यमना (absent-minded) असते. असा माझा अभिप्राय आहे. पुरुषार्थ क्षीण असल्याने आध्यात्मिक साधनादेखील पोचट आणि अल्पसंतोषी असते (आणि म्हणूनच लोक सर्वत्र अतिशयोक्ति करतात). सामान्य लोकांची गोष्ट सोडून देऊ, पण रीतसर साधना करणाऱ्या लोकात देखील कित्येक लोक, 'साधना एकांगी आणि अपेक्षा अतिशय'–अशा दोषांमुळे आदर्शाला बिघडवून टाकतात. असली एकांगिता निष्फळ होते आणि विकृति उत्पन्न करते आणि साधना–शिथिल लोक अशा प्रमाणाबाहेर जाणाऱ्या अति–उपासकांचे देव्हारे माजवितात त्यामुळे सत्याचा द्रोह होतो. सत्याची शुद्ध कल्पनाच विसरली जाते. असे दोष आपण चालवल नसते तर या राष्ट्राने केवढी मोठी प्रगति केली असती ! तेव्हा आता सत्यनिष्ठा जागृत करून प्रयोग-निष्ठा वाढवली पाहिजे आणि अनुभव–निष्ठेच्या कसोटीला महत्त्व दिले पाहिजे. तरच आपले अध्यात्म वैज्ञानिक होईल.

मुंबई (ट्रेन)
७–३–७१

प्राचीन काळी लोकांच्यासमोर सगळ्या समाजासाठी एक सामान्य धार्मिक आदर्श होता. हा आदर्श स्वीकारून प्रत्येक जण, प्रत्येक जात आणि प्रत्येक प्रदेश आपल्यापुरता तो मर्यादित आणि संमिश्र बनवीत असे पण मुख्य आदर्श सर्वमान्य असल्यामुळे समस्त जीवनाला काही वळण होते.

मोक्षमार्गी लोक मोक्ष आणि वैराग्य यांचा स्वीकार करीत. सामान्य लोक त्या आदर्शाची पूजा करीत. पण सारी हिंदु संस्कृति एक प्रकारे तंत्रमार्गी होती. या मार्गात जीवनाला विरोध नव्हता पण पुरुषार्थ मात्र मंत्र, तंत्र आणि यंत्र यांनी बाधित झाला होता.

या मार्गाच्याद्वारा जे फळ मिळावयास हवे होते ते न मिळाल्यामुळे लोकांचा विश्वास उडून जावयाला हवा होता पण तसे न होता लोकांचा या मार्गाविषयी उत्साह मावळला आणि बौद्धिक जडता कायम राहिली.

योगमार्गाविषयी देखील असेच झाले आहे.

योग आणि तंत्र—या दोन्ही साधनेत जे लोक स्वत:ला तज्ञ मानतात ते आता विदेशी लोकावर छाप पाडू पाहत आहेत. थोडे विदेशी लोक मोठ्या उत्साहाने या मार्गाची दीक्षा घेऊ लागले आहेत. या दोन्ही मार्गात जे थोडे तथ्य आहे त्याचा अनुभव विदेशी लोक घेतील. जे फोल आहे ते टाकून देतील. लवकरच येथील लोकांचे गुरुत्व संपुष्टात येईल. काही भोंदू गुरु तिकडेहि तयार होतील आणि शेवटी हे दोन्ही मार्ग विशुद्ध होऊन खऱ्या वाटेवर येण्याचा संभव आहे. पण 'शेवटी' म्हणजे केव्हा ? त्या पूर्वी जुन्यातले पुष्कळसे फेकून द्यावे लागेल.

आगगाडी—दिल्ली<br>८—३—७१

हिमालयात असताना एका प्रौढ संन्याशाला मी काही आध्यात्मिक प्रश्न विचारले. त्याने प्रथमप्रथम ऐकले न ऐकले असे केले. तेव्हा मी पुन्हा खोदून विचारले. तेव्हा त्याने मोकळेपणाने पण निक्षून सांगितले की "तुम्ही काही माझे शिष्य नाही आहात. असल्या प्रश्नांची उत्तरे आम्ही फक्त स्वत:च्या शिष्यानांच देत असतो. कारण उत्तर देण्याबरोबर जबाबदारीहि येते. आम्हाला काय ठाऊक, तुमचा कोणी दुसराच गुरू असायचा. त्याचा अभिप्राय निराळा असेल तर तुमचा बुद्धिभेद होईल किंवा अनेकांना रिकामटेकडे प्रश्न विचारण्याची सवय तुम्हालाहि लागेल" मी

चुप झालो. स्वतःचे शिष्यमंडळ वाढवण्याची हौस असलेले हे संन्यासी आहेत, असा मी तर्क बांधला (कदाचित् माझा तर्क खराहि असेल). पण त्याच्या उत्तराचे चिंतन करता करता, बऱ्याच दिवसांनी वाटले की त्या संन्याशाचे उत्तर फटकळ असल्याने माझे मन कलुषित झाले असावे. पण त्याच्या म्हणण्यात तथ्य आहे. आपल्या देशात दार्शनिक किंवा आध्यात्मिक स्वतंत्र चिंतन फार थोडे. ग्रंथनिष्ठा आणि गुरुनिष्ठा–यावरच अधिक भर. अशा देशात स्वतंत्र विचाराला पोषण मिळण्याच्याऐवजी बुद्धिभेदच व्हायचा. तेव्हा परिणामाकडे लक्ष देऊन, सहजासहजी चर्चेत उतरू नये, यातच शहाणपण असेल. माझा स्वभाव स्वतंत्र चिंतनाचा. आता मला या बाजूनेदेखील विचार केला पाहिजे.

दिल्ली
९–३–७१

भारतीय संस्कृतीवर जितका राम आणि कृष्ण यांचा प्रभाव आहे, तितका दुसऱ्या कुणाचाच नाही, हे कबूल करावे लागेल. बुद्ध आणि महावीर स्वामी यांचाहि प्रभाव–अधिकाधिक प्रभाव–भारतीय संस्कृतीवर पडला होता. पण वैष्णवांनी या दोघांच्या प्रभावावर विजय मिळवला. याचप्रमाणे हिंदु संस्कृतीवर अध्यात्मवादी (अद्वैतवादी) वैराग्यनिष्ठ वेदांत आणि दुसऱ्या बाजूने कर्मयोगी नव्हे पण कर्ममार्गी, सकाम भक्तीला पूर्ण मान्यता देणारा पण निष्काम भक्ति आणि ज्ञानयोगाची पूजा करणारा तंत्र मार्ग (वामाचारी नव्हे) भारतीय जीवनात प्रभावी ठरला आहे आणि पंचायतन पूजा स्वीकारून, या तंत्र-मार्गाने समन्वय-धर्माचे प्राधान्य ठीक ठीक चालवलें आहे. आता आपण या सर्व तुलना सोडून देऊन रामकृष्णाकडे पुन्हा वळू. रामापेक्षादेखील कृष्ण अधिक लोकप्रिय. आणि म्हणूनच भक्तांनी कृष्ण-जीवन-कथेची दुर्दशा करून टाकली आहे. त्यातून शुद्ध श्रीकृष्णाला शोधून काढणे सोपे नाही (पण अशक्यहि नाही). राम प्रधानतया धर्मपरतंत्र, आणि धर्मकृत् श्रीकृष्ण आत्मतंत्र आणि म्हणूनच

श्रेष्ठ. रामाचे एक पत्नीव्रत ज्ञाननिष्ठा आणि 'आराधनाय लोकानाम्' जगण्याची जीवननिष्ठा वंदनीय आहेत. पण राम धर्मपरतंत्र, यातूनच आपल्या संस्कृतीत ग्रंथनिष्ठा, शास्त्रवचननिष्ठा आणि गुरुनिष्ठा बोकाळल्या. साधकांना या तिन्ही निष्ठा बऱ्याच अंशी मदतगार आहेत. पण सरतेशेवटी घातच करतात. सत्यनिष्ठा, प्रयोगनिष्ठा आणि अनुभवनिष्ठा स्वीकारल्यानंतर 'यथेच्छसि तथा कुरु,' असेच श्रीकृष्ण बोलतात.

दिल्ली
१०–३–७१

जे लोक सिद्धांतनिष्ठ अथवा तपोनिष्ठ होण्याचा दावा करतात आणि पावलोपावली त्याचे प्रदर्शन करतात त्यांची समाजात मोठी प्रतिष्ठा असते. मग लोकांनी योग्य कारण दाखवून अपवाद करण्याचा आग्रह केला, तर जणू दुसऱ्यावर उपकार करतात असा आव आणून अपवाद करायला तयार होतात. याच्या उलट कित्येक लोक आपल्या निष्ठेचे प्रदर्शन न करता सगळ्या बाजूने विचार करून लोकांच्या अडचणी ध्यानात घेऊन, जरूरी अपवाद प्रथमच करून मोकळे होतात. अशा लोकांची उपयोगिता लोकांना पटते. पण त्यांना कोणी तत्त्वनिष्ठ म्हणत नाहीत. जगाचे असेच चालते.

माझा रेल्वे पास सार्वजनिक कामासाठी वापरण्यात मला संकोच नाही. माझ्या स्वास्थ्यासाठी किंवा माझ्या आसपासच्या राष्ट्रसेवकांच्या स्वास्थ्यासाठी वापरण्यात देखील मला संकोच नाही. माझी स्वतःचीच राष्ट्रसेवा नव्हे पण दुसऱ्या एखाद्या सज्जनाच्या राष्ट्रसेवेत भाग घेण्यासाठी जावे लागले तरीहि मी माझा रेल्वे पास वापरीन. पण केवळ स्वतःच्या गौरवासाठी कोठे जावे लागले तर फुकटच्या पासात जाण्याविषयी मला संकोच राहील. सार्वजनिक कामात पडणाऱ्या माणसाला असा सूक्ष्म भेद करणे इष्ट असले तरी सोपे नसते. आणि तसा भेद केला तर लोक त्याचाच दोष काढतात, असे आहे हे जग !

दिल्ली
११–३–७१

हरिजन समाजाच्या अडचणी दूर करून त्यांना मुख्य समाजाच्या प्रवाहात मिसळून टाकणे हे सोपे काम नाही. कारण विकृत धर्मबुद्धि रूढ होऊन आड येते. आणि जीवनव्यापी, समाजव्यापी प्रश्न सोडवताना पुष्कळ वेडे वाकडे प्रश्न उद्भवतात. त्यामुळे कार्यसिद्धि पुष्कळदा विचित्र प्रकारे करावी लागते. याहून अधिक गुंतागुंतीचा प्रश्न आहे—स्त्रीजनांचा. स्त्रीजातीला तिचे स्थान मिळवून देणे दहा-वीस पुढाऱ्यांचे काम नाही. जीवनाच्या सर्व क्षेत्रात आणि प्राकृत, संस्कृत आणि विकृत–अशा तिन्ही प्रकारच्या स्त्रीपुरुषांचा विरोध सहन करावा लागणार आणि ज्यांची मदत घ्यावी लागते अशा स्त्रीपुरुषांतदेखील तिन्ही प्रकार असणार. आणि हे काम करावे लागणार दोन्ही बाजूच्या समस्त समाजाला. आणि प्रत्येक जण आपल्या आकलनाप्रमाणे, शक्तीप्रमाणे आणि स्वार्थाप्रमाणे उपयोगी पडणार (किंवा विरोध करणार). समस्त जीवनातील, समस्त गुंतागुंतीमधून वाट काढावी लागणार. हा आहे समस्त जीवनाचा प्रश्न. हा अध्यात्मा इतका सोपा नसतो. त्या मानाने जडवादी जीवनदृष्टीचा मार्गहि सोपाच म्हणावा लागेल. दोन्ही आदर्श एकत्र चालवण्यात कमी गुंतागुंत नाही.

असले हे काम हाती घेण्याची पात्रता ज्याची आहे त्यांनाच ऋषि म्हटले पाहिजे. वाटल्यास त्यांना जीवनऋषि म्हणा. त्यांना नमस्कार.

दिल्ली
१२–३–७१

दोन तीन दिवस झाले, डॉ. इंद्रचंद्र शास्त्रीची मुलगी सुनीता येऊन एक चर्चा चालवीत आहे. वडील संस्कृतचे चांगले विद्वान. स्वत: जैन नसूनदेखील जैन धर्माचा त्यांनी उत्तम अभ्यास केलेला. त्यांनी चि. सुनीतेला संस्कृत व्याकरण आणि साहित्य उत्तम शिकवले. उत्तमरीतीने तिने परीक्षा पास केल्या. आता एका शाळेत संस्कृत शिकविण्याचे काम

मिळाले आहे. ती मला विचारते, "आजच्या काळात संस्कृतला काय महत्त्व आहे? सगळेच लोक इंग्रजीच्या, विज्ञानाच्या आणि राजकारणाच्या मागे धावतात. अशा काळी संस्कृत व्याकरणाचा काय उपयोग? संस्कृत-मधील उत्तम भागाचे हिंदी भाषांतर करण्यात काही अर्थ आहे. पण इंग्रजीतून किंवा हिंदीतून संस्कृत भाषांतर करायला लावतात, त्याचा काय उपयोग? आजच्या जीवनात संस्कृत कितीसे उपयोगी पडणार आहे?"

संस्कृत संस्कृतीच्या एक भक्ताच्या मुलीला संस्कृतचे महत्त्व पटवून देण्याची पाळी माझ्यावर आली आहे.

मी तिला जगातल्या सर्व classical भाषामध्ये संस्कृत कशी श्रेष्ठ आहे हे सांगितले. आजच्या सर्व भारतीय भाषांना संस्कृतकडून कसे उत्तम पोषण मिळते, हेहि सांगितले आणि संस्कृत व्याकरणामुळेच जगातील सर्व भाषाच्या philology ने आकार धारण केला आहे, हेहि सांगितले. आणि या सर्वांहून महत्त्वाची दृष्टि तिला दिली की स्वतःच्या विषयाविषयी निष्ठा असणे, हे चारित्र्याचेच एक अंग आहे.

दिल्ली

१३–३–७१

आज पहाटे चि. सतीशने आठवण करून दिली की चंदनची आज पुण्यतिथि आहे. आणि त्याने इच्छा प्रदर्शित केली की आजच्या सकाळच्या प्रार्थनेच्या वेळी मी तिचे स्मरण करावे. त्याने एवढे सांगितले याचा मला फार आनंद झाला. कारण असे आहे की सतीश (त्या वेळी त्याचे नांव शंकर होते) लहानपणी हूड होता. त्याच्यावर माझे प्रेम कमी नव्हते. पण शिक्षणाखेरीज संस्कारितेचाहि माझा आग्रह विशेष. यामुळे मी त्याच्याशी कडक वागत असे. ते इतके की लोकांनादेखील ती कठोरता वाटे. काकी (त्याची आई) मात्र मला म्हणायची, 'त्याची दया करून कामाची नाही, त्याला ठीक केलाच पाहिजे.' परिणामी मी त्याला घालवून बसलो. त्याला माझी भीति पण वाटू लागली आणि माझ्या प्रेमावरचा त्याचा विश्वास

उडाला, शेवटीं एकदा पू. बापूजींनीदेखील मला ठपका दिला. तेव्हा मी सावरलो. पण झालेले नुकसान परत कसे येणार ? शेवटी चि. चंदनच्याद्वारा मी त्याला परत मिळवू शकलो. त्यापूर्वी चंदन माझी भिन्नसंस्थेतील प्रिय शिष्या होती. मी तिला लिहिलेली पत्रें तिने सांभाळून ठेवली आणि नानूभाई वोरांनी ती प्रकाशित केली. आणि उमाशंकरने त्या संग्रहाला पत्ररूपी 'आमुख' लिहिले. आज मी सर्व वाचले. आणि सगळा दिवस सतीशच्या कुटुंबाचाच विचार मनात घोळत राहिला. अजूनदेखील तो माझ्याशी सांभाळूनच वागतो. पण ती जुनी संवय. त्याच्या किंवा माझ्या मनात आता कसलाच किंतु राहिला नाही. माझ्यात मात्र चंदनने माझा शंकर मला परत मिळवून दिला, याची कृतज्ञता जागृत आहे.

दिल्ली
१४-३-७१

आज आसामची प्रवीणा देसाई भेटली. तिने चि. अमलप्रभा आणि ब. श्री. गोपीनाथ बरदलै यांची मुलगी लीली यांचे प्रणाम सांगितले. चि. लीलीचे स्मरण होताच तिचे आणि तिच्या वडिलांचे स्मरण झाले. आनंद झाला. दोन प्रहरी अमतुल बेन भेटल्या. अमलप्रभा, प्रवीणा देसाई आणि अमतुल बेन–तिघांच्या स्मरणाने चिंतन जोराने चालले. स्त्रीजातीमध्ये आत्मार्पणाची किती शक्ति आहे आणि तरीहि तिला नम्रता किती सहजपणे साधते, या विचाराचेच चिंतन चालले. स्त्रीजातीला तिच्या विकासासाठी अनुकूलता मिळत नाही. तरीहि त्यांच्यामध्ये सेवामय जीवन किती उत्कट होऊं शकते हे पाहून स्त्रियांची उपेक्षा करून मानवजातीने स्वत:चे केवढे मोठे नुकसान करून घेतले आहे, याचा विषाद मनात भरला. यांच्यासारख्या कितीतरी स्त्रिया पुढे येणे शक्य होते. जे गुण पुरुषात नाहीत आणि स्त्रियांमध्ये सहज आहेत त्यांच्या जोरावर स्त्रीजातीने मानवतेला निराळेच वळण दिले असते. याची कल्पना मनात येऊन दुसऱ्या बाजूने चिंतन चालले. समाजाचे नेतृत्व पुरुषांना मिळाले; त्यामुळे त्यांच्यात लोकोत्तर पुरुष तयार

झाले, त्याबरोबर हीनतेचे प्रकारहि पुष्कळ वाढले. नेतृत्व स्त्रियांकडे असते तर दुसऱ्या प्रकारची हीनता समाजात बोकाळली असती. तिलाहि आळा पडला, याचा विचार मी कां करू नये ? दोन्ही बाजूने विचार करण्याची सवय असल्यामुळे हे विचार मनात आले. पण आवडले नाहीत आणि म्हणून त्या बाजूचे चिंतन एकदम थांबविले.

दिल्ली

१५–३–७१

गांधींनी स्वतःच्या आश्रमामार्फत आणि विद्यापीठाच्या मार्फत राष्ट्रीय शिक्षणाला जी प्रेरणा दिली त्याचीच परिणति 'वर्धा योजना' या नांवाने त्यांनी देशापुढे मांडली. तिलाच नवे रूप देऊन विनोबांनी बिहारला आणि देशाला आचार्यकुल दिले. देशावरील राजनीतीचा पगडा कमी करून लोकनीतीचे शिक्षण चालवणे, उत्पादक ग्रामोद्योगांना केंद्रात ठेवून शोषण-रहित समाजाला अनुरूप शिक्षण देणे आणि हिंसेचे दमन करण्याच्या ऐवजी तिचे शमन करणे या गोष्टी गांधी-संस्कृतीच्या मुळाशी आहेत आचार्य-कुलांच्या द्वारा हिची स्थापना होवो अशी प्रार्थना केली आणि या संबंधी चर्चा करायला आलेल्यांना हेहि सांगितले की 'नांव आणि आदर्श सर्वोत्तम पण शिक्षण प्रवृत्ति मात्र चालू सरकारी पद्धतिप्रमाणे–अशी जडता आणि आत्मवंचना या प्रवृत्तीत न शिरो.' त्यांच्यापुढे रविशंकरदादांचे उदाहरणहि मी ठेवले. सरकार अशा तेजस्वी शिक्षक सेवकाविषयी आदर बाळगून अडचणीच्यावेळी यांच्या मदतीची याचनाहि करते, हा अनुभवहि सांगितला.

दिल्ली

१६–३–७१

प्रत्येक धर्मात रूढिपरायण (orthodox) लोकांमध्ये संकुचित विचार आणि टाकाऊ रुढि असतात. एवढेच नव्हे तर 'हेच आमच्या पंथाचे

वैशिष्ट्य आहे आणि आम्ही याचे समर्थन करू शकतो' असा आग्रहहि ते बाळगतात. 'स्त्रियांमध्ये मोक्ष साधनेचे तत्त्वच नाही.' अशातऱ्हेचे बावळट विचार अनेक धर्मातील अत्यंत धर्मनिष्ठ लोकातदेखील सापडतात. तेवढ्या-वरून सगळाच धर्म असा विकृत किंवा संकुचित आहे, असे म्हणणे चुकीचे होईल. पण त्या धर्मातील कितीतरी रूढिनिष्ठ लोक अशा गोष्टींचा जेव्हा बचाव करतात तेव्हा अशा रूढींना धर्मात मुळीच स्थान नाही, असेहि म्हणता येत नाही. त्या त्या धर्माविषयी सामान्यपणे बोलताना असा उल्लेख करावा लागतो. पण त्यामुळे त्या धर्माची निंदाहि करता येत नाही. कारण हा भाग एकांगी असतो. बहुजन-मान्य असला तरी श्रेष्ठजन-मान्य नसतो. धर्माचे समाजशास्त्र समजून घेतांना अशा सगळ्या गोष्टींचा विचार करावाच लागतो. स्त्रियांसंबंधाने जे अनुदार विचार आहेत ते सगळ्या धर्मात सापडतात. त्यावरून तो सगळा धर्मच तसा आहे असे म्हणता येत नाही. पण सर्वच समाजात स्त्री-जातीविषयी एका बाजूने अत्यंत स्तुति आणि दुसऱ्या बाजूने हीनपणाचा आरोप दिसून येतात. याची दखल घ्यावीच लागते. हा प्रकार सर्वत्र आहे, त्यामुळे कोणत्याहि धर्माची तारीफ किंवा निंदा करता येत नाही. 'एकांगी अनुभव सर्वांगीण मानण्याची' अनुदारता सर्वत्र आहे एवढेच.

दिल्ली (ट्रेन)
१७–३–७१

आज मेरठला जाऊन पाशूच्या आईला–सईदाला भेटून आलो. समाधान झाले. सईदा आदर्श गृहिणी आहे. [१]बनारसचे जैनमुनि कनकविजयजी आपल्या कामासाठी आले होते. त्यांचे काम केल्यानंतर त्यांच्याशी योग, ध्यान, विश्वात्मैक्य, मोक्ष–यांची चर्चा केली. "मोक्ष हे साधन आहे. मोक्षसिद्धीपूर्वी केलेली सेवा केव्हा केव्हा असेवा होते. एकांगी तर असतेच. मोक्षसाधना आवश्यक तेवढी करून, ती पचनी पडली म्हणजे

[१] रविश सिद्दिकींचे चिरंजीव.

मगच विश्वात्मैक्यबुद्धीने होणारी शुद्ध सेवा सुरू होते." इत्यादि माझे विचार त्यांना सांगितले. माझ्या विचारांना पोषक असे श्रीप्रकाशजीचे वचन त्यांनी सांगितले. मला ते आवडले. कनकविजयजीसारख्या योगमार्गात शिरलेल्या लोकांमध्ये गांधीयुगातील शुद्ध विचार पसरावले असताना त्यांचा उत्तम प्रसार होतो. समाधीनंतर जिचे व्युत्थान होते, ती समाधि अपूर्णच होय. नित्य सेवाकार्य करीत असताना जी टिकू शकते तीच खरी समाधि.' इत्यादि आमच्या गोष्टी झाल्या. ध्यानमार्गाची विस्तृत माहिती देणाऱ्या पुस्तकांची यादी ते मला पाठवणार आहेत—मीच त्यांच्याकडे मागितली, लेखमाला लिहिण्यासाठी. आता मला माझी साधना आणि माझे अनुभव—याविषयी संकोच सोडून लिहिले पाहिजे. ती वेळ आता आली आहे.

### अहमदाबाद (आगगाडी)
### १८–३–७१

सकाळपासून रात्रीपर्यंत आगगाडीतच वेळ गेला. जयपूरला पदम सिंधी आणि लीला भेटली. जगाचा प्रवास करून आल्याची धन्यता पदमच्या तोंडून ऐकून फार आनंद झाला. जगाचा प्रवास प्रौढपणी घडला तर तेच सर्वोत्कृष्ट शिक्षण आहे. कित्येकांना बाळपणीच असली संधि मिळते. याची उदाहरणे मला ठाऊक आहेत. पण ती सगळी संधि व्यर्थ जाते पदमने लिहिलेला वृत्तांत तो मला वाचून दाखवणार. तेव्हा उत्तम विचारविनिमय होईल.

आज बारीकसारीक कामे करून बराच वेळ डॉ. खैर यांचा "मूळ गीतेचा शोध" हा निबंध ध्यानपूर्वक चाळला. हिमतपूर्वक आणि यथेच्छ मेहनत करून लिहिला आहे. मला यातून पुष्कळ माहिती मिळाली. पण गीतेविषयीच्या माझ्या विचारात विशेष फरक पडला नाही. गीता लिहिण्यात भिन्न काळच्या तीन ऋषींचा हात असो, पण त्या सर्वांना मी एकच गणतो—ज्याप्रमाणे अनेक व्यासांचे मिळून माझा अखिल भारतीय चिरंजीवी व्यास बनतो. श्री. खैरनी खोलात शिरून इतके संशोधन केले आहे पण 'गीतेत

चार वर्ण असूनदेखील चार आश्रमांचा पुरस्कार नाही, संन्यासाचा जबरदस्त पुरस्कार केला आहे. पण संन्यास आश्रमाचा आदर नाही.' इकडे त्यांचे लक्षच गेलेले दिसत नाही.

अहमदाबाद
१९-३-७१

शेवटी अहमदाबादला आलो हे चांगलेच झाले. सगळ्यानाच आनंद झाला. चि. बाळ मुद्दाम आला. अतिशय उत्साह चि. मदालसेचा. संस्थेविषयी आणि इन्द्रचंद्र शास्त्रींच्या सूचनेविषयी. श्रीमन्जींची सूचना योग्य आणि उपयोगी वाटली. या प्रसंगामुळे मुनशी, मी आणि प्रा. दावर तीन नांवे एकत्र आली. प्रा. दावरच्या पत्नी आणि मुलगी आरमाईती यांना मुद्दाम भेटावयाला बोलावले हे चांगले झाले.

गुजरातचे राजकीय पुढारी निराळे आणि सुशिक्षित आणि सांस्कृतिक जनता निराळी. जनता समजुतदार आहे. स्वतःचे हित-अनहित ती समजते. परिस्थिति सांभाळून घेण्याची 'कुनेह' पुष्कळ आहे. पण गांधीच्या नांवामुळे जे पुढे आले, त्यांना मात्र फुकटचेच मोठेपण आलेले. ते त्यांना जिरवता आले नाही, तरीहि जनतेने त्यांना सांभाळले. हा जनतेचा मोठेपणा.

रवींद्र केळकर विषयी उमाशंकरची सूचना मौलिक आहे आणि महत्त्वाची आहे. [१]रवींद्राशी चर्चा करीन.

मला वाटते आता मला काही दिवस दिल्लीला आणि काही दिवस सुरत, बडोदा, अहमदाबाद या बाजूला राहणेच इष्ट होईल. श्रीमुखभाई आणि मनोरमाबेन यांना पार विसरून गेलो होतो. चुकूनदेखील त्यांची आठवण आली नव्हती. आज त्याची अत्यंत शरम वाटली. किती प्रेमळ जोडपे आज म्हातारपणी दुःखी आहे. तरीहि स्वतः भेटून स्वतःचे दुःख पुढे

[१]आपल्या देशाचे सांस्कृतिक प्रतिनिधि म्हणून त्यांना लॅटिन अमेरिकेला पाठवावे अशी ती सूचना आहे.

करणे त्यांना इष्ट वाटले नाही. केवढा थोरपणा ! आता त्यांना लवकर भेटलेच पाहिजे.

मुंबई
२०-३-७१

पारशी धर्मसमाजाशी आत्मीयतेचा संबंध वाढला पाहिजे ही माझी उत्कंठा फार जुनी. आलूपासून (लाल काकांची मुलगी) तिचा प्रारंभ झाला, पुढे तिचे पेस्तनजी ड्रायव्हर बरोबर लग्न घडवून आणले. आला पोचा. गुलबेन, डॉ. दिनशा-यांच्यामुळे संबंध वाढला. आता फिरोजा वकील आली तिच्यामुळे तो घनिष्ट झाला. फिरोजा खरोखर उत्तम संस्कारी, प्रेमळ. शिक्षणतज्ज्ञ आहे. (हे चिंतन ता. २१ च्या रात्री लिहवीत आहे. ता. २१ हा पारशांचा पाडवा–जमशेदी नवरोज) यामुळे आज फिरोजांच्या घरी त्यांचा अग्निपूजेचा धार्मिक विधि जवळून पहावयाला, ऐकावयाला मिळाला. आपण अग्नीत तूप ओतून आहुति देतो, त्यापेक्षा चंदनाचे इंधन करून लोबानचा धूप जाळणे सुगंधित आणि उत्तम.

वैदिक धर्म आणि पारशांचा धर्म जवळची भावंडे. प्राचीन काळी देव, असूर एकच राहून मतभेद समजू लागले होते. त्या वेळचे वातावरण आज आठवते. असुर चांगले, देव लबाड ही त्या वेळची रूढ कल्पना. पण वैदिक व अवेस्था भाषा यांतील साम्य उत्कट. सूर्य, विद्युत् आणि अग्नि यांची समान पूजा. वरूण आणि यम–याचीहि पूजा. आज हिंदु आणि पारश्यांनी जुने भेद तुच्छ होते हे ओळखून एक झाले पाहिजे. पण आर्यांनी हिंदु होण्यात उदारता वाढविली आणि संकुचिततादेखील दाखल केली. पारशांना स्वतंत्र राहण्यातच आत्मरक्षा दिसणार. पण हिंदूनी धार्मिक, सामाजिक पुष्कळ सुधारणा करून पारश्यांना आपलेसे केलेच पाहिजे. या कामी ब्राह्मण आणि वाणी यांनी पुढाकार घेतला पाहिजे. काळ आला आहे.

मुंबई
२१-३-७१

श्रीपादराव यांची ओळख नवीनच आहे. स्वतः चित्रापुरी सारस्वत. पत्नी आरमीनियन-पूर्ण भारतीय झाली आहे. श्री. रावनी आपल्या धंद्यात Democratic Socialism पूर्णपणे आणली आहे. आणि घरच्या राहणीत सामाजिक समता सुंदर रीतीने चालवतात. ज्या सारस्वतांनी अन्य जातीच्या, अन्य धर्माच्या, भिन्न भाषांच्या लोकांशी लग्ने केली, त्यांचे अभिनंदन करण्याचा उपक्रम गतवर्षीपासून त्यांनी सुरू केला आहे. त्यांची जातीसंस्था साठ वर्षे मुंबईत चांगले काम करीत आहे. राव यांच्या प्रगतिशील प्रवृत्तीचे सामाजिक महत्त्व लोकांना पटले आहे. त्यांचे सांस्कृतिक, राष्ट्रीय आणि धार्मिक महत्त्व लोकांपुढे मांडून, या प्रवृत्तीला राष्ट्रीय मान्यता देण्याचे काम यंदा आम्ही करू शकलो, हे आजचे महत्त्व. सगळे वातावरण उत्साहपूर्ण आणि बरेचसे आत्मीयतापूर्ण होते. माझी खात्री आहे की याचा प्रचार आता सगळ्या देशात झपाट्याने होणार. आज जितक्या दंपत्तीची सार्वजनिकपणे ओळख करून देण्यात आली, त्याचा रिपोर्ट गौरवाने प्रसिद्ध केला पाहिजे. आजचा उत्सव केवळ मंगलाचरण म्हटला पाहिजे. श्रीपादरावात उत्साह आहे, संगठनशक्ति आहे. त्यांना जेवढी मदत करावी तेवढी चांगली उगवेल याची खात्री वाटते. हा परिचय वाढवला पाहिजे.

मुंबई (आगगाडी)
२२-३-७१

आजचे मुख्य चिंतन कालच्या उत्सवानंतर त्यातून स्थायी प्रवृत्ति कशी उत्पन्न करता येईल आणि ती चालवता येईल याविषयीच होते. हे चिंतन प्रत्यक्ष श्रीपादरावशी करणे इष्ट होते. पण ते आले नाहीत. शंकरराव गुलवाडी आपल्या पद्धतीने ते त्यांच्याकडे मांडतील. जर श्रीपादराव पत्रद्वारे माझे म्हणणे समजून घेतील तर काहीतरी इष्ट प्रवृत्ति त्यातून चालवता येईल.

मला वाटते शंकरराव शेवटी त्यांच्या जाती-संस्थेच्या विकासासाठी आणि उद्धारासाठी माझ्या शक्तीचा उपयोग करतील.

त्याचा दुरुपयोग न व्हावा म्हणून आता मला जाती-संस्थेकडून काय कामे घ्यावयाची याची संपूर्ण योजना द्यावी लागेल. ती वाचून हे लोक नव्या प्रेरणेने इष्ट प्रवृत्ति चालवतील किंवा माझा छंद सोडतील. दोन्ही शक्य आहे. दिल्लीला गेल्यानंतर भारतातील जाती-संस्थांनी यापुढे काय केले पाहिजे याची योजना लिहून काढलीच पाहिजे. उच्च जाती शोषक आहेत. निर्लज्जपणे स्वार्थ साधतात. त्यांचे शुद्धीकरण केलेच पाहिजे. त्यांना परमार्थसेवा शिकवली पाहिजे—आणि प्रत्येक जातीत जो 'स्वात्मनिष्ठ वेगळेपणा' आहे तो तोडला पाहिजे. जातींनी आत्मविकासाचे आधुनिक कार्यक्रम चालवले पाहिजेत.

दिल्ली (आगगाडी)
२३–३–७१

दैवयोगाने आज आगगाडीत एक उद्योगपति भेटले त्यांचा अनुभव ऐकण्याजोगा होता. प्रथम म्हणाले, "भारतात कोठेहि जा, लांचलुचपतीचा बाजार गरम असतो. फक्त गुजरात राज्यात तसे नाही. त्यामुळे आमच्यासारख्यांना उद्योग करण्याची आणि वाढवण्याची हिंमत येते. गुजरातमध्ये आम्ही आमचा माल वीस टक्के स्वस्तात देऊ शकतो आणि गुजरात सरकारची कार्यकुशलतादेखील चांगली आहे. लाखो रुपयांचे contract लाच दिल्यावाचून आम्हाला मिळू शकतात, हा अनुभव केवढा उत्साहवर्धक आहे!"

मी त्याच्याशी थोडे बोललो. समजले की या गृहस्थाने लहानपणी निश्चय केला की उद्योगधंद्यात पडून पुढे यावयाचे, पण वडिलांकडून प्रारंभासाठीदेखील भांडवल मागावयाचे नाही. त्याप्रमाणे यांनी नोकरी करून अनुभव मिळवला आणि चार पैसे शिलकीत टाकले. त्या जोरावर सरकारकडून कर्ज घेऊन धंदा सुरू केला आणि आता उत्तम चालला आहे.

मी म्हणालो, "तसे पाहिले तर लाच न घेणे उद्योगधंद्यात, व्यापारात आणि राज्य चालवण्यात इमानदारी वापरणे, कौशल्याने काम करणे याला उच्च नीतिमत्तेची किंवा असाधारण धार्मिकतेची आवश्यकता नाही. स्वतःचा उत्तम स्वार्थ आणि प्रतिष्ठा वाढवण्याची ज्याला अक्कल आहे, दीर्घदृष्टि आहे असा मनुष्य प्रामाणिकपणा आणि कौशल्य स्वहितासाठीच वाढवणार. जगातील इतर राष्ट्रापेक्षा इंग्रजांना ही गोष्ट पटली आहे. त्यांच्या भाषेतील सुंदर सुंदर अनुभवयुक्त म्हणीमध्ये राष्ट्रीय म्हण आहे– Honesty is the best policy. प्रामाणिकपणानेच उत्तम स्वार्थ साधता येतो. हा गुण जपानी लोकात प्रथम नव्हता, मुळीच नव्हता. नंबर एकचे बेइमान होते. पण ते अनुभवाने शहाणे झाले आणि त्यांनी राष्ट्रीय दुर्गुण दूर केला आणि जगात अब्रू मिळविली.

दिल्ली
२४–३–७१

आज निरनिराळ्या विषयावर तिघांशी उत्तम चर्चा झाली. रामभाऊ म्हसकरशी–गांधी विचाराविषयी. गांधी-विचाराचे कोणत्याहि राजनैतिक 'ism'शी सोयरसूतक नाही. गांधीविचार एक स्वयंभू विरजण आहे. कोणत्याहि 'ism'मध्ये घाला त्याचे उत्तम दही करून टाकेल. गांधीविचार केवळ साधनशुद्धि नव्हे पण लोखंडाचे सोने करणारा परीस आहे. तसे पाहिले तर भांडवलशाही, समाजवाद आणि साम्यवाद–तिन्ही हिंसेला कमीअधिक स्थान देतात. गांधीविचाराला ते नको आहे. सत्ताप्रधान समाजव्यवस्था पार बदलून सेवा आणि सहयोग, समानता आणि आत्मीयता यावर आधारित जीवनव्यवस्था उत्पन्न करावयाची आहे.

दुसरी चर्चा द्वारकाजींशी झाली. आता ते भू-दान–ग्रामदान आणि सर्व-सेवा-संघ–या दोहोहून व्यापक सर्वोदय संमेलन नाशिकला करणार आहेत. यांच्याशीदेखील पुष्कळ मौलिक चर्चा झाली.

तिसरे कांति मेहता. यांनी आपली दृष्टि सांगितली. संपूर्ण गांधीवाद

कुणालाच चालवता येणार नाही. अलिप्त राहून गांधीविचाराची केवळ मूर्ति सांभाळण्यात अर्थ नाही. राजकारणात एक पक्ष होऊन राहू नये हे कबूल पण त्यात भाग घेतलाच पाहिजे इत्यादि. कांतिनी स्वत:चा अनुभवहि बराच सांगितला. मजुरांची पुष्कळ सेवा केली. त्यांच्यावर प्रभाव आहे. पण अजून ते स्वावलंबी व्हायला तयार नाहीत. यांच्यात कार्यशक्ति यथेच्छ आहे. तशी शक्ति दुसऱ्यात ओतता येत नाही. लोक या शक्तीचा फायदा घेतात. शक्ति घेत नाहीत.

दिल्ली
२५–३–७१

आजकाल रामभाऊ म्हसकरशी चर्चा चांगली होते. व्यवहारातील अनुभव घेत असताना जीवनातील आदर्शांचे पालन कसे होऊ शकते आणि त्यात शेवटी काय योग्य आहे, काय अयोग्य आहे हे ठरवावे लागते. तत्त्वज्ञानाची खरी कसोटी हीच आहे आणि म्हणूनच सेवापरायण जीवन हेच तत्त्वज्ञानाला जिवंत ठेवू शकते. या सगळ्या चर्चेत उभयपक्षी जीवनानुभव आणि जीवनचिंतन जागृत केले जाते. हेच या चर्चेचे महत्त्व.

मला भेटावयाला येणाऱ्या सगळ्याच लोकांशी माझी पारमार्थिक वृत्ति जागृत ठेवायचा माझा प्रयत्न असतो. खरोखर असे चिंतन हेदेखील जीवनसाधनेचा महत्त्वाचा भाग असतो.

बिकानेरच्या बाजूला आणि सबंध राजस्थानात आपल्या संस्कृतीतील जुना क्षात्रधर्म आणि जैन लोकांचे अहिंसामय जीवनदर्शन–यांचे सहअस्तित्व आहे. या बाबतीत दोन्ही पक्षांना कसलेच वैचित्र्य वाटत नाही. याचे कारण एक तत्त्वज्ञान क्षत्रियांचे आणि बाकीचे तत्त्वज्ञान वैश्यप्रधान अक्षत्रिय समाजाचे. दोघांनी स्वधर्माचा विचार करावा. या निर्णयामुळे दोघांचेहि सुरळीत चालते. पण सुरळीत म्हणजे काय ? जडधर्मी यांत्रिकता येथे काम करीत असते. समग्र जीवनाचा जीवनधर्म ठरविणारे गांधीजी–यांना हे कसे पटणार ? राजस्थानातील बनिये यथेच्छ धन कमविण्यात किती

हिंसा घडते याचा विचार करू शकत नाहीत. भोजनात निरामिषाहार आणि जीवनकलहात शस्त्रत्याग–यांत 'बनिया जैनधर्म' संतुष्ट आहे.

दिल्ली
२६–३–७१

सेवाग्राम आश्रम हा पूज्य बापूजींचा शेवटचा आश्रम. तेथेच त्यांनी वर्धा शिक्षण-योजनेचा प्रयोग अजमावला. हरिजनसेवा, ग्रामसेवा, रुग्ण सेवा इत्यादि अनेक प्रवृत्ति तेथे त्यांनी चालवल्या. यामुळे त्या संस्थेविषयी मनात आस्था विशेषरूपाने आहे. श्री. किशोरलालभाई, नरहरिभाई, चिमनलालभाई, बळवंतभाई वगैरेंची सेवा तेथे पेरलेली आहे. आशादेवी, आर्यनायकम् यांनीहि तेथे तपश्चर्या केली. माझ्या दृष्टीने धर्मानंद कोसंबीचे अंत्यदर्शन तेथेच झाले, याचे महत्त्व कमी नाही. (माझ्यासाठी त्यांनी आपला जाण्याचा एक दिवस लांबवला हे मी कसे विसरणार ?)

शेवटी रामदासची निर्मला तेथे काम करीत आहे. तिच्याविषयीचे वात्सल्यहि ध्यानात घेतले पाहिजे.

या आश्रमाची अव्यवस्था होऊ नये असे मनापासून वाटते. वर्ध्याकडील सगळ्या संस्था विनोबांच्या कल्पनेप्रमाणे चालणार.

अशा स्थितीत आज श्री. * * * * भेटावयाला आले. त्यांनी आश्रमाची शेती आणि गोशाला नांवारूपास आणली आणि शेवटी त्यांना सेवाग्राम सोडावे लागले. काही लोक त्यांना परत बोलवीत आहेत. तसे पाहिले तर सगळेच आश्रमवासी. एकमेकाशी व्यक्तिगत द्वेष नाही. पण प्रत्येकजण लहानमोठ्या 'सिद्धांता' विषयी असाधारण आग्रही. यांना कोण समजावू शकेल की तत्त्वज्ञान, सिद्धांत आणि अध्यात्म सरतेशेवटी जीवनाच्या चरम उन्नतीसाठी आहेत. तेव्हा संस्था चालवल्या पाहिजेत, अध्यात्मपरायण जीवनदृष्टीने.

प्रधानता जीवनाची आहे हेच सगळे विसरतात आणि जीवन म्हणजे समन्वय !

दिल्ली
२७–३–७१

चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे आमचा गुढीपाडवा. लहानपणी दरवाज्या-शेजारी उंच बांबूवर रेशमी गुढी आणि त्याच्यावर कलश म्हणून एक चंबू उलटा बसवायचा (गुढी म्हणजे झेंडा किंवा पताका). या उत्सवाचे महत्त्व आईकडून आणि वडिलांकडून समजून घेतल्याने माझा उत्साह पोटात मावत नसे. सगळे सण, उत्सव, उपवास, व्रते आणि यात्रा याचे माहात्म्य समजून घेऊन त्या वातावरणात मी जगत असे. यामुळे माझे शरीर-मन-प्राण सनातनीवृत्तीचे झाले आहे आणि म्हणूनच या धर्माविषयी मी अधिकार-वाणीने बोलू शकतो आणि माझ्या गोष्टी पटोत किंवा न पटोत, जनता आदराने ऐकते आणि ग्राह्यबुद्धीने त्याचे चिंतन करते.

परवा मुंबईला श्रीपादराव यांच्या संस्थेमार्फत आंतर-जातीय, आंतर-प्रांतीय भिन्न धर्मी आणि विदेशीय लोकांशी झालेल्या विवाहांचे गंभीरपणे अभिनंदन करून आलो. आज यशपाल जैनच्या मुलाने कॅनडा-मधील मुलीशी लग्न केले. त्यांच्या अभिनंदन उत्सवात आम्ही 'शरीक' होऊन आलो. तेथे देखील मी 'सनातन' म्हणजे 'पुरातनविरोधी नित्यनूतन' या भावनेनेच बोलू शकलो. माझा सनातन धर्म संकुचित मुळीच नाही. राष्ट्रीयतेच्या आणि मानवतेच्या देखील पलीकडे गेला आहे. आणि विशेष म्हणजे समन्वयवादी असल्याने तो व्यवहारकुशलहि आहे. इतका वैज्ञानिक, प्रगतिशील, सर्वसंग्राहक आणि विकासवादी दुसरा धर्म माझ्या पाहण्यात अजून आला नाही. गांधीजींची धार्मिकता याच प्रकारची होती. म्हणून चर्चेमध्ये त्यांचे माझे जुळत असे. माझी बाजू ऐकून घेऊन स्वतःच्या दृष्टीत आवश्यक फेरफार करण्यात त्यांना संकोच नसे.

दिल्ली
२८–३–७१

किती तरी वर्षांनी बालजीभाई भेटले. खूप आनंद झाला. आणि

जुने सगळे दिवस आठवले. त्यापैकी एक प्रसंग आठवताच हसू आले. त्याचे महत्त्व काहीच नाही.

या खेपेला ते विशेष काहीच बोलले नाहीत. त्यांच्या 'सुंदरवन'वर लिहून पाठवलेला अभिप्राय प्रकाशित करण्याची परवानगी त्यांनी मागितली. ती गौण बाब होती. पण भेटल्याचा आनंद उभयपक्षी एकमेकांना मिळत होता. तेव्हा वेळेचे रिकामपण मी नारायण देसाईच्या लहानग्या उमेशी बोलण्यात भरून काढले.

चि. दीपकने माझ्या थैलीत 'Psychology of sex' हे पुस्तक पाहिले. त्यातील विचित्र विधाने वाचून त्याचीच चर्चा त्याने चालवली. आणि आज रामभाऊशी बोलताना देखील तोच प्रश्न निघाला. तेव्हा दोघांशी निरनिराळ्या वेळी यथेच्छ बोललो. पश्चिमेचे विचार उच्छृंखल आहेत. याच्या उलट आपले आदर्श शास्त्रजड आणि अतिशयोक्तिपूर्ण आहेत. या दोन्ही बाजू दोघांनाहि निरनिराळ्या भूमिकेवरून समजावून सांगितल्या.

चि. दीपक अगदी मोकळ्या मनाने बोलतो. जणू कॉलेजच्या दोस्ताशी विचारविनिमय करीत आहे. स्वतःचे विचार आणि स्वतःची भूमिका अगदी स्पष्टपणे सांगतो. मला ते फारच आवडते. विचार करताना अगदी पाश्चात्त्य बनतो आणि आचरणात दृढपणे चारित्र्यशुद्धीला चिकटून राहतो आणि मग माझ्याकडून स्वतःच्या भूमिकेचे समर्थन मागतो. ते मिळते तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरील समाधान बघण्याजोगे असते. चर्चा आटोपती घ्यायला तो तयार नव्हता हेहि मला आवडले.

दिल्ली

२९-३-७१

प्रथम आपण पश्चिमेच्या लोकांचे साहित्य वाचून आणि विचार समजून घेऊन चकित होत होतो. त्यानंतर आपल्यामध्ये प्रथम आंधळा स्वाभिमान आणि नंतर आपल्या संस्कृतीचा डोळस परिचय जागृत झाला. हा काळ म्हणजे राममोहन रॉय, विवेकानंदापासून सुरू होऊन रवींद्रनाथ

भगवानदास, अरविंद घोष, टिळक, गांधीपर्यंत चालला आणि खरोखर आपण पश्चिमेच्या विचारावर आपला प्रभाव पाडू शकलो. सत्य, अहिंसा, संयम आणि सेवा यांच्याबरोबर मानवता, प्राणीप्रेम आणि विश्वात्मैक्या पर्यंतची आपली संस्कृति जगावर प्रभाव पाडू लागली आहे.

पण आता पश्चिमेच्या जडवादाची प्रतिष्ठा जरी नष्ट झाली तरी तिकडची वैज्ञानिकता, यंत्रोद्योगी प्रगति आणि समाजविज्ञान आपल्यावर आता मात करू लागली आहेत. आपण आपला गोसेवेचा कार्यक्रम जोराने पुढे मांडला. आता स्वदेशात प्रजाराज्य आहे. आता आपल्याला गोसेवा, गोरक्षा आदि आग्रहाची मर्यादा कळू लागली आहे. विज्ञान आणि समाज-विज्ञान मान्य करील तेवढेच अध्यात्म व्यवहार्य आहे. हे आपल्याला कळून चुकले. आपली जीवदया विश्वमान्य होईल पण विज्ञान आणि समाजविज्ञान मान्य करील तेवढीच.

ब्रह्मचर्याचे देखील असेच आहे. आपला आदर्श खरोखर उत्तम आहे, सर्व बाजूंनी इष्ट आहे. पण येथेदेखील आपल्याला जीवनविज्ञानाची संमति घ्यावी लागते आणि अंतिम निर्णय, आध्यात्मिक विज्ञान समजणाऱ्या नव्या ऋषींचा स्वीकारावा लागतो. ईश्वरवचन revelation–सर्वज्ञ लोकांचे अभिप्राय आता कामाचे नाहीत. ही सर्व इष्ट प्रगतिच आहे.

दिल्ली

३०–३–७१

आपल्या लोकांनी आध्यात्मिक जीवनाचा विकास करण्यासाठी ब्रह्मचर्य आणि अनासक्ति––ही दोन साधने पुष्कळ वापरली. प्रारंभी सर्वच पारमार्थिक असतात. तपस्या वाढवतात. पण त्या तपस्येचा फायदा किंवा नुकसान काहीच समजू किंवा अनुभवू शकत नाहीत. जी काही शून्यावस्था प्राप्त होते, तिलाच सिद्धी मानू लागतात. समाजात सिद्ध पुरुष म्हणून मिरविण्याखेरीज गत्यंतर नसते. अलिप्तता आणि शून्यता यांतील भेद समजू शकत नाहीत. आणि दोन्ही त्यांना पचत नाहीत. मुख्य गोष्ट अशी

आहे की धर्म, योग, अध्यात्म आणि सिद्धि यांच्यामागे लागलेले लोक परिस्थितीचे पृथक्करण करून, स्वतःच्या मनाला पूर्णपणे ओळखण्याचा प्रयत्नच करीत नाहीत. विकृति उत्पन्न झाली तर तिला दाबतात आणि लपवतात. यामुळे साधनेचे क्षेत्र पूर्णपणे तपासले जात नाही.

पश्चिमेकडील वैज्ञानिक लोक प्रयोगशील असल्यामुळे आपापले अनुभव आणि निरीक्षण लिहून ठेवतात.

आता तिकडील मानसशास्त्री कामविकाराचे निरीक्षण-परीक्षण करू लागले आहेत. लैंगिक संबंधात देखील असंख्य प्रयोग चालू आहेत. स्त्री-पुरुषांना सल्ला देणारे मानस-वैद्यहि तयार झाले आहेत. या लोकांनी आध्यात्मिक प्रयोग अजून सुरू केले नाहीत. पण करण्याची पात्रता मिळवू लागले आहेत

आपल्या येथे ब्रह्मचर्य, लैंगिक संबंध, अनासक्ति, निष्काम सेवा आणि विश्वात्मैक्य साधना——याविषयींचा प्रयोग वैज्ञानिकपणे लिहून ठेवण्याची प्रथा सुरू झाली पाहिजे. आपल्याकडील गुरु सल्ला देण्याचे काम करतात. त्यांनी अध्यात्माचे मानसवैद्यक तयार केले पाहिजे आणि शास्त्रग्रंथ–प्रवीण जुन्या गुरूंच्या जागी आता आध्यात्मिक प्रयोग करणारे वैद्यहि बनले पाहिजे. त्यानंतरच गुरूची विद्या शुद्ध आणि संतोषकारक होईल. आज गरज आहे सार्वभौम, आध्यात्मिक विज्ञानाची.

दिल्ली
३१–३–७१

आजकाल मनुष्याचे जीवन इतके विविध आणि परस्परविरोधी घटनांचे बनलेले असते की त्याला घटकेत सुखी व्हावे लागते, घटकेत दु:खाचा आघात सहन करावा लागतो. त्या आघाताशी एकरूप होत असतानाच, ते सर्व विसरून एखाद्या अत्यंत जरूरी व्यवहाराची, तटस्थपणे व्यवस्था करावी लागते. घटकेत एखाद्या स्नेह्याचे सबंध जीवन नजरेपुढे आणून त्याला आवश्यक सहानुभूति आणि सल्ला द्यावी लागते आणि

इतक्यात अत्यंत आवडत्या लहानशा मुलाला कृत्रिमपणे राग दाखवून धमकावावे लागते.

हे सगळे जीवनकुशल संस्कारी व्यक्तीला उत्कटपणे करण्याचे साधते. जीवनकौशल्य आहेच एक अद्भुत वस्तु.

आणि अशा मनुष्याने जर विश्वात्मैक्य भावाच्या साधनेबरोबर ताटस्थ्य अथवा अलिप्तता आणि अनासक्ति कमावलेली असेल तर त्याला जीवनयोग साधल्यामुळे जीवनकौशल्य अगदी स्वाभाविकपणे साधते.

आजचा सारा दिवस अशाच विविधतेमध्ये गेल्यामुळे वरील चिंतन चालले असतांना गीतेच्या योगाविषयींच्या दोन व्याख्यावर खोल प्रकाश पडला. (१) समत्वं योग उच्यते आणि (२) योगः कर्मसु कौशलम्--या दोन्ही व्याख्या नित्य जीवनक्रमाला लावल्यामुळे जीवनकौशल्याचे स्वरूप चिंतनामध्ये उठावदार झाले.

डॉ. मनुभाई त्रिवेदी लहानपणी आजारी असे. बापाने (त्रिवेदी साहेबांनी) त्याची इतक्या प्रेमाने काळजी घेतली होती की त्यांच्याशी सहानुभूति वाढता वाढता मनुभाईविषयी माझ्या मनात पितृवात्सल्य उत्पन्न झाले आणि ते अखेरपर्यंत टिकले (हे वात्सल्य न समजल्यामुळे वर्ध्याच्या डॉ. महोदयनी एकदा माझ्याशी चांगलीच हुज्जत घातली होती. तोहि प्रसंग आज आठवला). महोदयनी ज्या भावनेने हुज्जत घातली होती तिची मला कदर होती त्यामुळे त्यांच्याशीहि माझी सहानुभूति वाढली.

■■■■

## एप्रिल ७१

दिल्ली (आगगाडी)
१-४-७१

योग, अध्यात्म आणि जनसेवा यांना वाहून घेतलेले साधु-संन्यासी-देखील 'स्वत:च्या कार्याच्या प्रचारासाठी' उत्सव करतात आणि त्यांच्या कार्याशी सहानुभूति असलेले दुसरे साधु, 'स्वत:च्या प्रचारासाठी' अशा उत्सवात गोळा होतात. उद्देश विचारविनिमय आणि ज्ञानाचा किंवा अनुभवाचा विकास हा नसून अगदी चांगल्या अर्थाने विचार-प्रचाराचा असतो. अशा उत्सवात गोळा होणारे साधु सहजासहजी विचारविनिमय आणि अनुभवविनिमय करत असतीलहि. पण मुख्य उद्देश सामान्य जनतेला

माहिती देण्याचा असतो. यामुळे उत्तमोत्तम योगी, संन्यासी, संत आणि निष्काम सेवक एकत्र येऊन आपले उत्तमोत्तम विचार लोकापुढे मांडतात हा मोठा फायदा आहे. पण दोनतीन दिवसात दहाबारा व्याख्याने लोकांना लागोपाठ ऐकविण्यात 'श्रोत्यांना अपचन होत असते' याचा विचार कुणीच करीत नाही. एखाद्या विषयावर अनेकानेक भारदस्त व्याख्याने ऐकल्याने डोक्यात गोंधळ तरी होतो किंवा अरुचि तरी उत्पन्न होते.

असल्या उत्सवाचे काम रिपोर्टात उत्तम शोभते. उत्सवाच्या शेवटी साहित्य प्रकाशित होते. तो देखील स्थायी लाभ म्हणता येईल. पण तेवढ्या-साठी उत्सवाचा आणि प्रवासाचा खर्च मात्र प्रमाणाबाहेर होतो. त्यापेक्षा पुष्कळ लेख मागवावेत. स्वतः माणसे पाठवून लिहून घ्यावेत. उत्कृष्ट असेल तेवढेच साहित्य छापावे. पण उत्सवात व्याख्यान देण्यासाठी दोन किंवा तीन माणसे बोलवावीत. व्याख्यानें थोडी, पण विचारविनिमयाला पुष्कळ वेळ. हे उत्तम.

डेराडून (आगगाडी)
२-४-७१

'रूहानी सत्संग'वाले संत कृपालसिंहजीनी विश्वमानव केंद्र स्थापित करण्याचे दोन वर्षापूर्वी ठरवले होते. आज ते स्थापित झाले. आज संत कृपालसिंहच्या गुरुजींची पुण्यतिथी. अशा प्रकारचे काम करणारे लोक देशात अनेक आहेत. पण कृपालसिंहजींची आध्यात्मिक वृत्ति आणि कार्य-कुशलता फार थोड्यात दिसून येते. यांचे काम आणि कार्यपद्धति पाहून संतोष होतो. सर्व-धर्म-समभाव ही आजच्या युगाची विशेषता आहे. आपल्या धर्माचा अनन्य प्रचार करणारे लोक या नव्या प्रवृत्तीचा फायदा घेण्यास धावून येतात. त्यांनाहि येथे सर्व-धर्म-समभाव मानावाच लागतो. 'विश्वमानव केंद्र' हे समाजव्यापी विविध सेवा करणारे केंद्र आहे. याची प्रत्यक्ष सेवा लोकहितकारी आहेच. सगळ्या समाजाला या केंद्राचा लाभ मिळणार आणि यातूनच राष्ट्राचे भावनात्मक संघटन मजबूत होणार.

अशी केंद्रे देशात सर्वत्र चालू झाली पाहिजेत. कृपालसिंहजींनी युरोप-अमेरिकेत हातपाय पसरले आहेत. रामकृष्ण मिशनच्या नंतर हेच मिशनच्या तोडीला येईल, किंवा त्याच्यापुढे जाईल.

कसेहि असो, मानवस्वभाव सुधारण्याच्या कामी या विश्वमानव केंद्राची पुष्कळ मदत होईल. असे वाटते.

यांनी शेतीवर आणि रुग्ण सेवेवर (आणि वृद्ध सेवेवर देखील) भर दिला आहे आणि शिक्षणावर तर आहेच.

पू. बापूजींनी ग्रामोद्योग आणि हस्तोद्योग–यावर भर दिला. शोषण-विरोधी गांधीजींचे दर्शन अधिक महत्त्वाचे आहे, पण आजच्या समाजाला ते झेपत नाही.

अहिंसक संस्कृति म्हणजे काय याचा खोल अर्थ जेव्हा लोकांना समजेल तेव्हाच गांधीजींचा कार्यक्रम राष्ट्रव्यापी आणि विश्वव्यापी होऊ शकेल.

आता मी कृपालसिंहजींना भेटणार. त्यांनी खादीचा पुरस्कार करावाच असे मी म्हणणार नाही. पण त्यांच्याशी विचारविनिमय पुष्कळ करणार.

दिल्ली

३–४–७१

बेळगाव–शहापुरात, इंग्रजी दुसरीत होतो तेव्हा नारायण बाळप्पा पडते म्हणून एक विद्यार्थी माझा दोस्त होता. पुढे पुष्कळ वर्षांनी तोच एकदोनदा सावंतवाडीला भेटला. तेव्हाहि त्याच्या हुशारीची चमक दिसली. सयाजीरावकडे बडोद्याला जाण्याचा विचार करीत होता. तेथे बडोदा राज्यात तो खूप खूप चढला. चीफ जस्टिस आदि झाला. लहानपणीच आमचा एकमेकांचा संपर्क तुटला होता.

आज खादी-भुवनमधील एक अंमलदार मला भेटला. नांव 'पडते'. या नांवाचे जगात पुष्कळ लोक असतील. तरीहि मी म्हणालो, "लहानपणी

ना. बा. पडते म्हणून माझा एक दोस्त होता. कदाचित् तुम्हाला माहितीहि असेल."

तो गृहस्थ म्हणाला, "मी त्यांचा सर्वांत धाकटा चिरंजीव". आश्चर्याचा आणि आनंदाचा धक्काच बसला ! आम्ही खूप बोललो-नरेंद्र नारायण त्याचे नांव.

आज सारा दिवस अमृतानुभवाचेच चिंतन चालले. या ग्रंथाचे सार न. र. फाटक यांनी दिले आहे. ज्ञान, अज्ञान, सुख, दु:ख, शब्द शब्दातीत, आत्मा, सच्चिदानंद, जीवनमुक्त वगैरे शब्दांचा अति सूक्ष्म, दार्शनिक परिचय करून दिला आहे. शैली काव्यमय आहे. उपमा, रूपके यांची रेलचेल आहे तरीहि पूर्वपक्ष, उत्तरपक्ष अशी दार्शनिक शैली आहे. बराचसा भाग वाचल्यानंतर वाटू लागले की अशा आत्मानुभवानंतर ज्ञानेश्वरांना आपले जीवनकार्य संपले असे वाटले असल्यास नवल नाही. 'ज्ञानेश्वरी' लिहिली मुमुक्षु जगासाठी. 'चांगदेव-पासष्टी' लिहिली अभिमानी योग्यांसाठी. शेवटी लिहिला साहित्य निर्मितीचा कळस–आत्मानुभव. अनुभवच तो. त्यानंतर गुहा-प्रवेशच उरला. वयाच्या बाविसाव्या वर्षी त्यांनी स्वेच्छेने समाधीत प्रवेश केला. त्यांच्या सबंध साहित्यात स्वत:चा आणि भावंडाचा, समाजाने जो छळ केला त्याचा अस्पष्ट उल्लेख देखील नाही. ज्ञानेश्वरीत जगाचा अनुभव विषयांच्या ओघाने खेचून भरला आहे. पण सगळेच तटस्थ. अद्भुत योगी खरे !

दिल्ली

४–४–७१

आज सप्तम-अवतार रामाचा जन्म दिवस. आज तीन ठिकाणी याच विषयावर निरनिराळ्या वातावरणात बोललो. ब्राह्मण-संस्कृतीने गयासुर आणि शूद्रमुनि शंबूक या दोन निष्पाप, पवित्र उपासकांचा निरनिराळ्या वेळी वध करवला. शंबूकाला मारणे रामाला इष्ट किंवा मान्य नव्हते. पण राजाराम धर्मपरतंत्र. ब्राह्मणाच्या मुलाला उठविण्यासाठी त्याने पापकर्म

केले आणि प्रजारंजनासाठी सीतेचा दोनदा त्याग केला. सीता आदर्श पत्नी होती, मान्य आहे. पण सगळा समाज आणि त्याची आजवरची संस्कृति स्त्री-द्रोहाने भ्रष्ट झाली आहे. हे विसरून कसे चालेल ? वसिष्ठ आणि विश्वामित्र यांचा हा शिष्य राजा नसता तर निराळा वागला असता. परशुरामाच्या वेळी ब्राह्मण-क्षत्रियांचा संघर्ष विकोपाला गेला. त्यांचा समन्वय रामाने केला. पण त्या काळी स्त्रिया, वैश्य आणि शूद्र—यांची भयानक उपेक्षा झाली. गीतेतील कृष्णाला या तिघांसाठी विशेष वचन द्यावे लागले. स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः तेऽपि यान्ति परां गतिम् (९.३२). याच तिघांना गीतेने पापयोनि म्हटले आहे. ही गोष्ट स्वीकारताना मला लाज वाटली, म्हणून मी अर्थ करताना पापयोनि या तिघांहून निराळे आहेत, असा अर्थ मारूनमुटकून केला आहे. शंकराचार्यांनी जुना अर्थ स्वीकारून या तिघांना पापयोनि ठरवून टाकले आहे. तिच्या पोटी जन्म घेतो तिलाच पापयोनि ठरविणारी संस्कृतिच पाप-संस्कृति म्हणावे लागेल. पतित स्त्री-पुरुष मिळून पाप करतात आणि त्याचा दोष मात्र स्त्रियांवर लादतात. कारण गुलामापासून अपेक्षा जास्ती.

आज सगळा दिवस सीतामातेचे चिंतन पश्चात्तापबुद्धीने केले.

दिल्ली

५–४–७१

सर्वोदय आणि सर्वमुक्तीचा आदर्श स्वीकारल्यानंतर वेदांत–साधनेत देखील आवश्यक फेरफार कसा जरूरीचा आहे, याचे चिंतन झाले पाहिजे. विशुद्ध आत्मा आणि सर्वांतर्यामी परमात्मा यांचे अंतिम ध्येय स्वीकारल्या-नंतर साधनेत समाजसेवेला आणि 'भूतहिते-रत' त्वाला स्थान मिळालेच पाहिजे.

दुसऱ्या बाजूने पाहता संकुचित वृत्तीने राष्ट्रसेवा, समाजसेवा आणि स्वधर्मसेवा केली तर ती कलुषित होते. तसे न करता लहान मोठ्या सर्व सेवांना आत्मपरायण आणि परमात्मपरायण करणे अत्यंत जरूरीचे आहे.

या प्रकारच्या सर्व साधनांत अहंकार-नाशाला मुख्य स्थान दिले जाते. बुद्धाने देखील 'सचित्त (स्वचित्त) परियोदयनम्'ला महत्त्व दिले आहे. पूर्वीचे साधक अहंकार नाशासाठी त्याला ओळखून शून्य करू पाहत होते. आता आपण समाजसेवा, परिस्थिति सेवा, विशुद्ध करीत करीत स्वदेशी धर्माला सर्वधर्मी बनवीत पुढे गेले पाहिजे आणि त्यातून विश्वात्मैक्य-सेवा साधली पाहिजे म्हणजे अहंकार अत्यंत व्यापक होऊन तो अनंतात विलीन होईल. शून्य आणि अनंत शेवटी एकच होतात.

अशा नव्या साधनेचा क्रम निश्चित आणि विकसित करणे हल्लीच्या युगातच शक्य झाले आहे.

यासाठी संन्यासधर्मालादेखील पूर्णपणे बदलून टाकला पाहिजे

आजकाल मी ख्रिस्ती लोकांशी विचारविनिमय करतांना त्यांना सांगतो, "थोड्या किंवा अधिक हिंदूंना ख्रिस्ती कां बनविता ? हल्लीच्या युगात हिंदुधर्माचा पूर्ण परिचय मिळवा आणि मग समस्त हिंदुधर्माला आणि संस्कृतीला ख्रिस्तीधर्माची दीक्षा देण्याचा प्रयत्न करा. You should try to Christianise Hinduism, after knowing both at their best and worst. And expect me a real and intense lover of Christianity to try to Hinduise Christianity. तुम्ही हिंदुधर्मालाच ख्रिस्ती करा आणि मी ख्रिस्तीधर्माची भक्ति करीत करीत तुमच्या धर्मालाच हिंदु दीक्षा देण्याचा प्रयत्न केला तर त्याचे तुम्ही अभिनंदन करा. यांत दोघेहि एकमेकांना प्रसन्नतेने मदत करू !

दिल्ली

६-४-७१

देवापेक्षा दैव श्रेष्ठ आहे हे जर सिद्ध करावयाचे असेल तर भारतीय युद्धाचा इतिहास पहावा. एका बाजूने पांडव तर दुसऱ्या बाजूने कौरव. एकाच हाडामासाचे भाऊ भाऊ. यांच्या गृहकलहाने सबंध भारत पेटला. लक्षावधि 'लढवय्ये' मारले गेले. युद्ध टाळण्याचा प्रयत्न कृष्णाने आणि सर्व

पांडवांनी केला. भीष्म आणि विदुर यांनीहि तसाच प्रयत्न केला असला पाहिजे. पण कोणाचेच काही चालले नाही. कुंती, गांधारी आणि द्रौपदी यांच्या रूपाने भारतमातेने विलाप केला. कौरवांचा नाश झाला. पांडव दु:खी झाले आणि श्रीकृष्णाचे स्वजन आपापसात भांडून दारूत बुडाले. कृष्णाच्या वाट्याला महान, भारतव्यापी विफलता आली आणि एका पारध्याच्या गफलतीमुळे श्रीकृष्णाचा देहान्त झाला. एवढी विशाल विफलता ज्याच्या वाट्याला आली त्याला आपली समस्त संस्कृति 'पुरुषोत्तम' आणि 'पूर्णावतार' म्हणते. याचे रहस्य समजून घेतले पाहिजे.

श्रीकृष्णाची जीवनदृष्टि, श्रीकृष्णाची नीति आणि जीवनयोग शिकवणारी त्याची गीता–यांनी भारतानंतरच्या भारतीय संस्कृतीला प्रेरणा दिली आहे. जन्मभर पुन:पुन्हा विफलता आणि भविष्यासाठी अद्‌भुत प्रेरणा देण्याचे भाग्य-याचे नांव कृष्णजीवन. श्रीकृष्ण भविष्यासाठी जगले. त्यांची प्रेरणा सबंध इतिहासाला पुरून उरणारी. पण त्यांचे प्रत्यक्ष जीवन म्हणजे विफलता. भारतीय संस्कृतीच श्रीकृष्णाला समजावून घेऊ शकते.

दिल्ली
७–४–७१

पूर्व बंगाललाच हे लोक "बांगला देश" कां म्हणतात हे समजत नाही. पण हा प्रश्न गौण आहे. तिकडील लोकांची जी निर्दय कत्तल चालू आहे त्याविषयी वाचून आपल्याला संमिश्र संस्कृतीविषयी अश्रद्धा वाटू लागली आहे आणि त्यामुळेच कधी केली नव्हती इतकी उत्कट सकाम प्रार्थना आजकाल मी करीत आहे. चिंतनात मात्र केवळ कारुण्य नाही. इतिहासविधाता भगवान् काय करीत आहे याचेच चिंतन चालते. भारतीय मुसलमानांचे मन अजून मध्ययुगातच आहे की काय अशी शंका मनात येते. पाकिस्तानचे कोट्यावधि मुसलमान लष्करी सत्ता कशी चालू देतात ? सेनापतीच्या हातातच सत्ता कशी जाते ? आश्चर्य वाटते. आणि बकऱ्या कोंबड्या मारावीत त्याप्रमाणे हे सेनापति सामान्य जनतेला मारवतात तरी

कसे – आणि मुस्लिम जगातील जनता तोंडातून 'ब्र' हि कां काढीत नाही ? याचेहि आश्चर्य वाटते. पण आश्चर्यापेक्षा संस्कृतीचे यथार्थ स्वरूप ओळखण्याची मनात धडपड चालू आहे. संगम संस्कृति आणि समाजविज्ञान या विषयांचा मी भक्त, खूप जोराने विचार करतो. पण कोठेच भक्कम जमीन सापडत नाही.

श्री. विनोबांचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. "मुस्लिम नेते तोंडच उघडीत नाहीत, याचा अर्थ काय ?"

दुसरा महत्त्वाचा प्रश्न आहे की या प्रसंगी आपले कर्तव्य काय ? जुलुम करणारे आणि जुलूमापुढे न दबणारे—दोन्ही पक्ष मुसलमानच आहेत. यामुळे मुस्लिम संस्कृतीचे वैशिष्टच काय आणि तिचा प्राण कशात आहे याच्या शोधात मन गुंतले आहे.

गुजरातच्या स्थितिविषयी देखील खोल चिंतन चालू आहे. गुजरातच्या बुद्धिमत्तेविषयी मला आदर आहे. काहीतरी मधला रस्ता निघेलच असे वाटते.

दिल्ली

८–४–७१

एक महिना झाला***यांचेशी रोज अनेक विषयांवर विचारविनिमय केला. त्यांची विचार–ग्रहणशक्ति उत्तम आहे. प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीने विचाराचे महत्त्व त्यांना उत्तम पटले आहे. पण झालेली चर्चा त्यांनी लिहून ठेवली नसावी. रवींद्र केळेकरांना जर इतका मुबलक वेळ दिला असता तर त्यांनी रोचक अशी तीन तरी पुस्तकें तयार केली असती. दोघांच्या शक्ति निराळ्या. जीवन-तत्त्वज्ञान जीवनकार्यांत उतरविण्याचा यांचा अखंड प्रयत्न आहे. दोघांचा देशाला उपयोग आहे पण निरनिराळा.

आज त्यांनी प्रश्न छेडला "गांधीविचार आणि गांधीकार्य याचा." मी म्हणालो, "सत्य, अहिंसा, संयम आणि सेवा'–यात संपूर्ण गांधी येतात." ते म्हणाले, "ही चार तत्त्वे सगळ्याच धर्मात आहेत." मी म्हणालो,

"सगळ्या जगाहून भिन्न असे विशेष भाव या चार शब्दात गांधींनी ओतलेले आहेत"–आणि मग चारहि तत्त्वांचे गांधीवैशिष्ट्य त्यांना मी समजावले आणि उदाहरणे दिली. कित्येक लाक्षणिक प्रसंगहि सांगितले. ब्रह्मचर्य शब्दाचा इतिहास सांगितला. मुळात ब्रह्म-चर्य म्हणजे वेदाध्ययन आणि त्याला अनुकूल असा जीवनक्रम. आज याचा अर्थ 'कामविकारावर काबू' असा आहे. आणि बापूजी तर लेखनात आणि संभाषणातदेखील संयमरूपी ब्रह्मचर्याच्या पालनाचा आग्रह बाळगीत. गांधींचे सत्य तार्किक किंवा गणिती नव्हते. जिवंत जीवन-तत्व होते. त्यांच्या पूर्ण अहिंसेत राज्यव्यवस्था बसत नव्हती. पण कोणतीहि संस्था तोडणे, तिचा नाश करणे, त्यांच्या अहिंसेत बसू शकत नाही. "हिंसेचे वातावरण वितळून टाकले पाहिजे," असे ते म्हणत. आज जगात पुंजीवाद आहे. सरकार ही संस्था आहे. दोन्ही स्वीकारून त्या dissolve करून टाकण्याची त्यांची पद्धति होती. देशात जर साम्यवाद अमलात येऊन तो स्थिर झाल्यानंतर गांधीजी या देशात जन्मले असते तर त्यांनी साम्यवाद तोडण्याचा प्रयत्न न करता त्याचा स्वीकार करून अहिंसेच्या जोरावर त्यांनी तो वितळून टाकला असता. विकेंद्रीकरण त्यांच्या सिद्धातात पूर्णपणे बसत असे.

दिल्ली

९–४–७१

सेवाग्रामला जेथे शेवटी बापूजी राहत असत त्या आश्रमाविषयी आम्हा सर्वांना आस्था वाटणे स्वाभाविक. चि. निर्मला गांधीकडून आश्रमाची माहिती मला अधूनमधून मिळते आणि तटस्थपणे वाटते की आश्रमाची उपयोगिता स्थानिक लोकांना आणि समस्त देशाला वाटत असावी. आश्रमाच्या शेतीत विशेष लक्ष देऊन सुधारणा करणाऱ्या गोविंद रेड्डीचे नांव मधूनमधून ऐकू येई. स्थानिक तात्त्विक मतभेदामुळे त्यांनी सेवाग्रामचे काम तूर्त सोडले होते. ते परवा येथे–दिल्लीला–भेटले. रामभाऊ, ते आणि मी पुष्कळ विचारविनिमय केला. त्यांनी काही काळ आश्रम

सोडला. याचा फायदा घेऊन त्यांनी आपल्या कमीत कमी अटी स्पष्ट मांडून, त्या पसंत असतील तरच आपण परत येऊ असे सांगून, परत येण्याच्या लोकांच्या आग्रहाला त्यांनी मान द्यावा असे मी त्यांना सुचविले. ते म्हणाले, "एक वर्ष बिजनौरकडील एका स्नेह्याबरोबर रहावयाची इच्छा आहे. इंग्रजी शिकू, थोडी सेवा करू मग सावकाश सेवाग्रामला जाता येईल." मी बाहेरचा माणूस. जास्त आग्रह कसा करणार? मी म्हणालो, "तरीहि शक्य असल्यास विनोबांना विचारा आणि ते सांगतील तसे करा." एवढे म्हणून तो प्रश्न मी डोक्यातून काढून टाकला.

आणि आता कळले की बिजनौरचे त्यांचे स्नेही–सच्चिदानंद (जे रचनात्मक कामहि करत होते आणि नियतकालिकहि चालवत होते. आणि त्यात कडक लेख लिहीत होते) यांचा कोणी तरी खून केला आणि शेजारच्या खोलीत वाचत असलेल्या गोविंद रेड्डीचाहि खून केला! आध्यात ना मध्यात आलेल्या या पाहुण्याचा खून कां झाला–काही कळत नाही. या हिंसक लोकांना मानवीजीवन अगदीच स्वस्त झाले आहे. देश कोठे चालला आहे?

दिल्ली
१०–४–७१

धार्मिक लोकांच्या आणि आध्यात्मिक लोकांच्या हजारो वर्षांच्या इतिहासावरून मी या निर्णयावर आलो आहे की आध्यात्मिक प्रगति कितीहि झाली असली तरी पुष्कळ वेळा ती एकांगी असते. कारण या लोकांची साधनाच एकांगी - मग ती कितीहि उत्कट का असेना!

साधना उत्कट असल्यामुळे कित्येक शक्ति वाढतात आणि प्रकट होतात. त्यामुळे या लोकांना वाटते की त्यांचे सगळेच विचार आणि सगळेच अनुभव ईश्वरप्रेरित असावेत.

आणि मग शक्तीच्या जोरावर चमत्कार करून दाखवून लोकांची श्रद्धा मिळवितात.

श्रद्धा मिळविण्याचा त्यांना पूर्ण हक्क आहे. पण श्रद्धेबरोबर या लोकांचा आग्रह असतो की आमचे विचार, आमच्या कल्पना, आमच्या आवडीनिवडी आणि आमचे सांस्कृतिक आदर्शदेखील शिष्यांनी स्वीकारले पाहिजेत !

स्वत:चा अनुभव एकांगी आहे, याचे भान नसल्यामुळे आपले सगळेच विचार खरे आहेत असे त्यांना वाटणे स्वाभाविक आहे. पण त्यांनी ते दुसऱ्यावर लादू नयेत.

पण शिष्य लोक तर गुरूच्या सगळ्याच गोष्टी ईश्वरप्रेरित-आणि म्हणून खऱ्या- मानण्याचा आग्रह धरतात. गुरु आणि शिष्य दोघांनाहि ही गोष्ट सोईस्कर असते. आणि मग हे लोक सामान्य समाजाशी नाराजी बाळगतात आणि त्यांना नास्तिक म्हणतात.

अशा या परिस्थितीमुळे सर्वच जगाचे पुष्कळ नुकसान झाले आहे.

ही परिस्थिती सगळ्याच धर्मात आणि सगळ्याच युगात चालू आहे. त्यामुळे प्रगति खुंटली आहे. हे लोक ठासून म्हणतात, 'अनुभवापुढे बुद्धि आणि तर्क कामाचे नाहीत.' पण त्यामुळे त्यांची प्रगति मात्र खुंटते.

दिल्ली
१-४-७१

मानवजातीने आपले आरोग्य गमावले आणि ते परत मिळविण्यासाठी नानाप्रकारच्या वैद्यकीय व्यवस्था उत्पन्न केल्या. त्यामध्ये आपल्याकडील आयुर्वेद पुष्कळच प्रगति करून थकला. कारण लोकांनी प्रयोगनिष्ठा, अनुभवनिष्ठा सोडून देऊन ग्रंथनिष्ठा आणि गुरुनिष्ठा पत्करली. पश्चिमेकडील ॲलोपॅथीने पुष्कळच प्रगति केली आहे. कदाचित् तिचे प्रस्थानच चुकले असेल. पण ही पद्धती प्रयोगपरायण आहे.

ॲलोपॅथीचा मुळापासून विरोध करणारी होमिओपॅथी लहानपणापासून माझ्या परिचयाची आहे. तिचीच बहीण बायोकेमिस्ट्रीदेखील मी वापरली आहे. सरकार-पुरस्कृत ॲलोपॅथीशी या दोघांना टक्कर देता

आली नाही. पण यांनी प्रगति केली आहे. या दोन्ही बऱ्याच स्वस्त आहेत. केव्हा केव्हा या पद्धति अनुभवनिष्ठेपेक्षा कल्पनानिष्ठेला महत्त्व देतात असे वाटते. पण खात्रीने सांगता येत नाही.

आपल्या इकडे यूनानी पद्धतिदेखील चालू आहे. तिचा अनुभव मला फारसा नाही. लहानपणी सावनूरला हिचा अनुभव घेतला. औषधे स्वादिष्ट कशी करावी या बाबतीत या पद्धतीने बरीच प्रगति केली आहे. मुळात ही पद्धति आयुर्वेदाच्या मागे मागे चालत असावी.

कॉलेजमध्ये शिकत असतानाच नेचरोपॅथीचा परिचय झाला. हिचे असंख्य प्रकार आहेत. बंगालमध्ये हिला थोडी प्रतिष्ठा मिळाली असावी. अत्यंत वैज्ञानिक असण्याचा हिचा दावा आहे. पण केव्हा केव्हा जीवननिष्ठा आणि आरोग्यनिष्ठा सोडून देऊन सिद्धांतनिष्ठेच्या नांवाने कल्पनानिष्ठेचा ही आग्रह धरते. हिचा साधेपणा फारच महाग असावा. वेळेची हिला किंमतच नाही. ही पद्धति प्रयोगनिष्ठ होईल तर हिचा उद्धार होईल. हिने आपला हट्ट सोडला पाहिजे.

दिल्ली
१२-४-७१

राष्ट्रीय एकता सर्वांनाच हवी आहे. पण अशी एकता कां सिद्ध होत नाही ? याची खरी कारणे शोधण्याची आपल्या लोकांना सवयच नाही. बापूजीसारख्यांनी परिस्थिती समजावून सांगितली तर यांना पटत नाही

सगळे म्हणतात, "तुम्ही कार्यक्रम द्या, तो अंमलात आणू."

पण जेथे जीवनविषयक मूळ कल्पनाच बदलणे जरूर आहे तेथे जुने विचार न सोडता अंमलात आणलेला कार्यक्रम सफळ कसा होणार ?

एक प्रकारच्या लोकांना आपली जुनी, जातिनिष्ठ आणि वर्णनिष्ठ कल्पना सोडावयाला नको. लोक सामान्यपणे समानता, प्रेम, शोषणमुक्ति-सगळ्या गोष्टी तोंडपाठ बोलतील. पण समाज परिवर्तनाला तयार होणार नाहीत.

दुसऱ्या बाजूचे लोक "पश्चिमेचा अनुभव तोच जगाचा अनुभव. पश्चिमी इलाज तोच खरा इलाज" असे मानून बाकीच्या महत्त्वाच्या गोष्टींचा विचारच करावयाला तयार नाहीत. धर्माच्या अडचणी सांगितल्या तर रशियन लोकांचे शब्द आपल्यापुढे मांडतात की 'धर्माला विसरून जा. म्हणजे त्यांचा इलाज करावयाला नको'. मी त्यांना सांगतो की "आपण धर्माला विसरू, ते काम सोपे आहे. पण धर्म आपल्याला विसरत नाही. तो सर्वत्र आपल्याला बाधतो. त्याचा इलाज काय? जगातले सगळेच धर्म घ्या. तुम्ही त्यांना विसरला. याचा अर्थ धर्मामध्ये ज्या चांगल्या गोष्टी होत्या त्या तुम्ही बुडविल्या आणि धर्मात जे हीनतेचे संगठन होते ते काही मेले नाही. ते तुम्हाला बाधते. मग तुम्ही रडता पण रडणे हा काही इलाज नव्हे. आपल्या स्वदेशी, राष्ट्रीय दोषांना ओळखून प्रयत्नपूर्वक दूरच केले पाहिजे."

'सुधारक', 'उद्धारक' ही दोन्ही नांवे आता जुनी झाली. सुधारक म्हणजे पश्चिमधारक आणि उद्धारक म्हणजे भूतकाळाला संजीवन करू इच्छिणारे. राष्ट्रीय दोष दूर करणे दोघांनाहि साधत नाही. याचे कारण दोन्ही पक्ष राष्ट्रीय दोषांना ओळखू इच्छीत नाहीत. खरे म्हणजे व्यापक अर्थाने वैज्ञानिकतेचा अभाव.

दिल्ली

१३-४-७१

हल्ली हल्ली दोन घटनामुळे त्यांचे चिंतन करावेच लागले. खरोखर या घटना तत्त्वत: महत्त्वाच्या नाहीत. जगात असे वातावरण असणारच. एक घटना बीजनौरमध्ये लोकांना अडचणीच्या झालेल्या स्वामी सच्चिदानंद नांवाच्या पत्रकाराच्या घरी पाहुणे म्हणून राहिलेले सेवाग्राम आश्रमाचे गोविंद रेड्डी यांचा नाहक खून झाला. आणि दुसरी घटना म्हणजे शांति-स्वरूप महाजन (आमच्या मनोरमेचे पति) यांना दुसरेच समाजकंटक महाजन समजून काही नक्षलवाद्यासारख्या लोकांनी दोन दिवस अडकवून ठेवून खूप मार दिला आणि चूक लक्षात आल्यानंतर त्यांना सोडून दिले.

गोविंद रेड्डी संबंधाने केलेले चिंतन लिहिलेच आहे. आज महाजन सपत्नीक भेटले. गृहस्थ चांगला गलेलठ्ठ पहेलवानासारखा आहे. त्यांच्या तोंडून बऱ्याचशा गोष्टी ऐकल्या. म्हणाले की 'बोललो म्हणजे जास्ती मारतात. बोलणेच सोडून देणे उत्तम.'

शांतिस्वरूप दोघा-तिघांना सहज लोळवतील असे मजबूत आहेत. पण त्यांनी प्रथमपासून पाहिले की सगळा गैरसमज आहे. पण ते लोक मानायला तयार नाहीत. त्या लोकांनी शांतिस्वरूपांना आग्र्याला नेऊन सोडले. तेथून परत यायला त्यांनी तिथल्या सर्वोदय संस्थेच्या पत्त्यावर तारेने पैसे मागविले. त्या संस्थेचे लोकहि म्हणू लागले, तुम्हीच ते महाजन याची खात्री काय ? प्रकरण कसेबसे मिटले. मी महाजनांना सांगितले की तुमचा हा सगळा अनुभव लिहून काढा आणि गुन्हेगारांना शोधून शिक्षा करण्याच्या कामी पोलीसांना मदत देण्याची देखील तकलीफ घेऊ नका. याचा परिणाम त्या लोकांवर चांगला होईल. तुम्ही उलट मारामारी केली नाही. याचा प्रभाव त्या लोकांवर पडलाच आहे. आता गांधींची अहिंसा जर पटली असेल तर गुन्हेगारांना पकडून शिक्षा देण्याच्या प्रवृत्तीपासून अलिप्त रहा.

दोन दिवस बेदम मार खाऊनदेखील तुम्ही त्यांना क्षमाच करता असे एक उदाहरण घालून देण्याचा सुंदर प्रसंग तुमच्या वाट्याला आला आहे. याचा फायदा घेणे इष्ट होईल. त्यांनी लिहून काढण्याचे कबूल केले आहे.

कसला तरी गैरसमज होऊन निर्दोष समाजसेवकांची हत्त्या होणे किंवा त्यांना मार पडणे हे समाजाला सहन कसे होते ? समाजाने सर्व तऱ्हेच्या लोकांना नेहमी शिक्षण देत राहिले पाहिजे तरच सुधारणा होईल.

पण समाजाला स्वत:ला हे खरे तत्त्वज्ञान पटले पाहिजे ना ? नेते स्वत:च पुरेसे संस्कारी नाहीत. जगाची संस्कृतीच बदलण्याचा, सुधारण्याचा प्रयत्न आध्यात्मिक अधिकारी पुरुषांनी केला पाहिजे. सामान्यांनी देखील कुणाची वाट न पाहता समाजाला सुशिक्षित करण्याचा प्रयत्न नेहमी चालू ठेवावा.

देवाला तरी असले वातावरण कसे सहन होते ?

दिल्ली
१४-४-७१

गुरुशिष्य संबंध किती प्रकारचा असतो, प्रत्येक प्रकारचे वातावरण कसे असावे, निष्ठा आणि श्रद्धा यांच्या विना कुणालाहि गुरु करणे कसे चुकीचे आहे आणि गुरूने देखील निष्ठा आणि श्रद्धा यांच्या मर्यादा ओळखल्या पाहिजेत, तरच संबंध कसा शुद्ध राहू शकेल वगैरे विचार आजकाल डोक्यात जोराने चालू आहेत. प्रत्येक धर्मात गुरु-शिष्य संबंधाचे महत्त्व फार फार मानले आहे. तत्त्वतः ही दृष्टि खरी आहे. पण तिचा दुरुपयोग होतो. श्रद्धा निष्ठा आंधळ्या असता कामा नयेत आणि तरीहि तर्काच्या आणि जगाच्या अनुभवाच्या त्या 'पर' असल्या पाहिजेत हे कसे जुळवायचे ? फार मोठा प्रश्न आहे.

त्यात पुन्हा या संबंधाची उत्कटता समजावण्यासाठी पतिपत्नी-संबंधाशी त्याची तुलना केली जाते. हे तर अगदीच वाईट. कारण पतिपत्नी-संबंध अनन्य असेल तरच त्याला आध्यात्मिक महत्त्व. गुरु-शिष्य संबंधात तसे नाही. एका गुरूला अनेक शिष्य असू शकतात. शिष्याला मात्र आध्यात्मिक गुरु एकच असला पाहिजे. विद्या-गुरु कितीहि असोत अशी भूमिका मांडली जाते.

गांधींचा रस्ताच निराळा. जग म्हणते गुरूला ईश्वर माना. गांधी म्हणतात– असा आध्यात्मिक अनन्य गुरु ईश्वरच होऊ शकतो. गांधीजींची भूमिका आहे शुद्ध, पण मुलखा वेगळी. या विषयावर अजून पुष्कळ चिंतन करावयाचे आहे.

आज दुसरे चिंतन अमृतानुभवाचे– मला स्वतःला अद्वैतवाद पूर्णपणे मान्य आहे. अद्वैत मानल्यावर मायावाद मानणे तर्कशुद्ध आणि तर्कसिद्ध असेल. पण मला मायावाद पटत नाही.

ज्ञानेश्वरांचा स्फूर्तिवाद उत्कृष्ट आहे. त्यांनी मायावाद सोडला किंवा तोडला नाही. पण बाजूला ठेऊन दिला.

ईश्वर एकच आहे असे म्हणणाऱ्या मुसलमान, ख्रिस्ती आणि ब्रह्मसमाजी लोकांना मी म्हणतो, 'ईश्वर एकच आहे. पण त्याला अनेक

आणि अनंत होता येते आणि अनंत होऊन देखील त्याची एकता कायमच असते. देवाची अनेक नांवे तुम्ही मानता. मग रूपे कां मानू नयेत ?'

देवाला करता येत नाही असे काहीच नाही असे म्हणणाऱ्या लोकांना अडवण्याच्या हेतूने मी म्हणतो, 'देवाला आत्महत्या करता येत नाही.'

त्याचप्रमाणे एकेश्वरी धर्माच्या ईश्वराला अनेक होण्याची भीति असते. असली दुर्बलता आमच्या देवावर आम्ही लादणार नाही. व्यक्ति तितक्या प्रकृति या न्यायाने व्यक्ति तितके देव म्हणजेच एका देवाची 'अनंत रूपे'ही गोष्ट सर्वांनी स्वीकारलीच पाहिजे.

दिल्ली

१५–४–७१

मला स्वत:लाच आश्चर्य वाटले की पूर्व बंगालमध्ये एवढा जबरदस्त, अमानुषी अत्याचार चालू आहे आणि मी गुरु-शिष्य संबंध, गांधी समाधीची व्यवस्था आणि उन्हाळ्यात आबूला रहावयाचे की नाही या विचारात आजचा दिवस घालवला.

पुन्हा विचार आला की हृदयाची सगळी शक्ति वापरून प्रार्थना करण्याखेरीज बंगालच्या लोकांना मी येथून काय मदत करणार ? प्रश्न जगातील सर्व राष्ट्रापुढे आहे. निरनिराळ्या दृष्टीने लोक विचार करतात. कोणी पंजाबी मुसलमानांची (पाकिस्तानची) बाजू घेतात. कोणी जागतिक परिस्थितीचा विचार करतात. कोणी पूर्व बंगालला मदत पोहोचविण्याचा विचार करतात. हे सर्व चांगलेच आहे. (शेख मुजिबुर रहमान पाकिस्तानच्या ताब्यात आहे. तो जिवंत तरी असेल ना ?) कसेहि असो, माझी भगवंताच्या चरणी एकच प्रार्थना चालू आहे– "पंजाबच्या मुसलमानांच्या हृदयात शुद्ध धर्मोदय होवो."

मनुस्मृतीत लिहिले आहे – अराजके जनपदे राजानम् असृजत् प्रभु:. मनुष्यजीवनात अव्यवस्था बोकाळली, जीवन असुरक्षित झाले तेव्हा

भगवंताने समाजात व्यवस्था आणण्यासाठी राजाला उत्पन्न केले. म्हणजेच राजाच्या आज्ञेने लोक कह्यात यावे. यासाठी सरकार किंवा राज्यव्यवस्था ईश्वराने निर्माण केली.

ईश्वराने निर्माण केली की अनीश्वराने ? सैतानाने असे मी म्हणणार नाही. राजनीतीच्या मुळाशी सदाचार किंवा धर्मनीति असली पाहिजे. सर्वांची तशी इच्छा असते. धर्म, नीति आणि सदाचार यांचे राजशासन ध्यान करते हे खरे. पण तिचे म्हणणे म्हणजेच मनुष्य समाजाचे म्हणणे असे की, 'शारीरिक शक्ति आणि सामाजिक बळ वापरण्यावाचून परिस्थिति सुधारता येत नाही आणि मानवी मनाची उच्छृंखलता काबूत येत नाही. राजशासन सरतेशेवटी भौतिक शक्तीच्याच आधाराने चालते.' पण ही गोष्ट खरी नाही. सरकार या संस्थेने संस्कृतीला कमजोर केले आहे. सरकारकडून होणाऱ्या जुलुमाचा उपाय काय ? [illegible] गांधी म्हणतात– "सत्याग्रह". आपण म्हणू "आणि क्रांति-प्रेरक प्रार्थना".

---

१२००८

दिल्ली
१६–४–७१

भेटावयाला येते येते असा दोन दिवस निरोप पाठवून शेवटी श्रीमती यशोधरा दासप्पा आज संध्याकाळी भेटल्या. रचनात्मक काम करणाऱ्या महिलांमध्ये यांचे स्थान बरेच उंच आहे. पंचवीस-तीस वर्षे झाली–किंवा अधिक–कर्नाटकात आश्रम प्रवृत्तीच्या आसपास त्यांनी कितीतरी सार्वजनिक कामें आणि शिक्षण-संस्था चालविल्या आहेत.

दासप्पा आणि के. सी. रेड्डी यासारख्या ब्राह्मणेतर नेत्यांना तिनेच समजावून सांगितले की 'दक्षिणेत काँग्रेसचे काम ब्राह्मण लोक करीत असतील तेवढ्यावरून स्वराज्यासाठी धडपड करणाऱ्या राष्ट्रीय संस्था काँग्रेसला ब्राह्मणी प्रवृत्ति मानू नका. ही जनतेची प्रवृत्ति आहे. हिच्यात शिरून ही आपलीशी करा. (माझ्या हिंदी लेखांचे कन्नड भाषांतर करून ते तिने त्यांना वाचावयाला दिले.) अशा रीतीने हे कर्तबगार लोक गांधींच्या काँग्रेसकडे वळले आणि सगळा प्रांत स्वराज्यवादी झाला.

अरसीकेरी येथील स्वतःचा आश्रम आजदेखील त्या पूर्ण ध्यान देऊन चालवीत आहेत. गांधीजींनी यशोधरा अम्माची कदर केली होती.

स्वराज्यप्राप्तीच्या दिवसात यांच्याइतक्या निष्ठेच्या अधिक महिला रचनात्मक कामाच्या मागे लागल्या असत्या तर काँग्रेसचे रूप बदलले असते.

अजूनदेखील देशाची स्थिती सुधारणे शक्य आहे. पण त्यासाठी स्त्री-जातीमध्ये निष्ठेने काम झाले पाहिजे. नटवी विलासिता जाऊन तिच्या स्थानी तेजस्वी महत्त्वाकांक्षा आली पाहिजे. व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा सर्वच बुडवून टाकील. देशाचा मागासलेपणा आणि आंधळेपणा दूर करण्याचे काम स्त्रियांनी हाती घेतले तर प्रथम त्यांचा उद्धार होईल आणि त्या मागोमाग देशाची दृष्टि शुद्ध होईल.

खरोखर हे व्यापक अर्थाचे सांस्कृतिक कार्य आहे. भारतीय संस्कृतीचा पायाच शुद्ध केला पाहिजे. हे काम स्त्रियांनी हाती घेतले तरच भावनात्मक शुद्धि होऊ शकेल. याला vision असावे लागते. स्वामी विवेकानंदासारखा प्रेरक मिळाला तर हे शक्य होईल.

दिल्ली

१७–४–७१

रात्री सतीश, बाळ आणि दीपक–महेंद्रच्या घरीं जेवायला गेले. माझ्या वाट्याला सिद्धार्थ होता. त्याने गंभीर प्रश्न विचारले, 'ईश्वर आहे हे सिद्ध कसे करावे ?' 'ईश्वराने सृष्टि तयार केली हे कशावरून ?' इत्यादि.

मी सांगितले, असे प्रश्न विचारणारे खरे जिज्ञासू नसतात. त्यांचे म्हणणे–"तुमचा देवावर विश्वासच आहे ना. मग सिद्ध करा देव आहे म्हणून." अशाचा पेच उलटवला पाहिजे त्यांना सांगावे–"तुम्ही देवावर विश्वास ठेवावा असा देवाचा आग्रह नाही आणि आमचाहि नाही. तुमचे देवावाचून चालते तर त्याचे ओझे तुम्ही स्वीकारा" असे आम्ही मुळीच म्हणणार नाही. तुम्ही देवावर विश्वास बाळगला नाही तर देवाचे काही बिघडत नाही. विश्वास ठेवणारे लोक देवाकडे काही ना काही मागत

असतात. देवाला त्याचा विचार करावा लागतो. त्यापेक्षा तुम्ही चांगले. देवावर विश्वासच नाही. मग मागणार कशाला ? प्रश्नकर्त्यांना अशा उत्तराची अपेक्षा नसते. त्यांचा सगळा जोर आटतो.

मग काही वेळाने विषय बदलून त्यांना म्हणावे, "या दिल्लीत घरे बांधावी लागत नाहीत. आपोआप तयार होतात. आपण नुसते जाऊन त्या घराचा कबजा घ्यावयाचा. घरे आपोआप तयार होतात असे सांगितले म्हणजे ते हसू लागतात. घरे आपोआप कशी तयार होतील ? कोणी ना कोणी ती बांधतो, तेव्हा ती तयार होतात." मग त्यांना विचारावे की "जर बांधणाऱ्यावाचून दिल्ली तयार होत नाही, तर हे सगळे जग निर्माण करणारा कोणी असला पाहिजे असे आम्ही मानतो. तुमचे जग जर आपोआप होते आणि आपोआप चालते तर दिल्ली कां आपोआप तयार होऊ नये ? एवढ्या उत्तराने काम भागते. मग आपण विषय बदलावा."

सिद्धार्थाला मोठी गंमत वाटली. खुश झाला.

दिल्ली
१८-४-७१

सर्वोदयाच्या क्षेत्रांत भूमिदान-ग्रामदान-शांतिसेना वगैरे कामें करणाऱ्या आठ-दहा लोकांना वसंत व्यासने आणले होते. कारण आज ग्रामदानाचा खास दिवस होता. ग्रामदान, शांतिसेना या दोन्ही विषयांचे मला वाटणारे महत्त्व मी त्यांना सांगितले आणि मग प्रश्नोत्तरीमध्ये पूर्व-बंगालविषयी बोललो. या बाबतीत मी पुरेसे लिहिले आहे असे वाटते. ग्रामदान आणि शांतिसेना आपण प्रयत्न केला तर जागतिक प्रवृत्ति होतील. इतके त्यांचे युगानुकूल महत्त्व आहे. पण पश्चिमेपुढे आपले लोक दबले गेले आहेत. पश्चिमेचे लोक स्वतःच्या मौलिक कल्पनाप्रमाणे स्वतंत्र चिंतन करतात, प्रयोग करतात. इतिहासाचा अर्थ सांगतात. यापैकी आपल्याकडे काहीच नाही. फक्त जुन्याविषयी आदर-भक्ति-अभिमान आहे.

गांधीजींनी ज्याप्रमाणे आपल्या संस्कृतीमधून सत्याग्रह, असहकार, सर्वोदय इत्यादि गोष्टींचे प्रयोग करून जगापुढे मांडले त्याप्रमाणे राष्ट्रीयता आणि आंतरराष्ट्रीयता यांच्यासाठी नवीन तत्त्वज्ञान-आध्यात्मिक आणि विशाल पारिवारिक तत्त्वज्ञान तयार केले पाहिजे. पश्चिमेच्या लोकांनी स्वतंत्रता आणि समता यांच्या आधारावर एक समस्त संस्कृति उभी केली. प्रेम, उदारता, क्षमा आणि पारिवारिकता यांच्या आधारावर संस्कृति उत्पन्न करण्याचे बापूजींचे स्वप्न. याची प्रेरणा कितीशा लोकांनी घेतली आहे? विनोबांनी समानशीलांना एकत्र आणण्याचा प्रयत्न जरी फारसा केला नसला तरी त्यांना यथेच्छ सहकारी मिळाले. त्यामुळे त्यांच्या विचारांचा पुष्कळ प्रचार झाला. पण पदरात किती पडले याचा हिशोब कसा निघणार? कारण इतर कुणीहि त्यांच्या इतकेदेखील काम केले नाही. अध्यात्म, आत्मीयता, कौटुंबिक भाव आणि सर्वोदय यांच्या पायावर नवीन शास्त्रे तयार करून जगाला ती पटविली पाहिजेत. Liberty आणि equality यांचा प्रचार सरकार नांवाच्या संस्थेमार्फत होऊ शकला, पण Fraternity साठी असरकारी मानवी संगठन हवे आहे. त्याची कल्पना जगाला दिली तर नव-संस्कृति चालू शकेल.

दिल्ली

१९-४-७१

कधी अनुभव नव्हता, काल दोनप्रहरी उठून बसल्याबरोबर भोवळ आली. उभे राहताच पडेन असे वाटले. कारण समजेना. मी शौचाला गेलो. थोडे बरे वाटले. मला वाटले, सकाळच्या न्याहारीनंतर निजलो नाही. झोप अपूरी झाली, त्यामुळेही असेल. काल रात्री दोनदा लघवीला उठलो त्या वेळी भोवळ नाही आली. आज सकाळी पाच वाजता उठताच कालच्यासारखी भोवळ आली शेवटी आपल्या इंदु भांणचे (मानलेले) वडील डॉक्टर भांण यांना बोलावले. काल घरच्या डॉक्टर अशोक नानावटींनी तपासले होते. ब्लड प्रेशर असण्याची त्यांना शंका होती.

डॉक्टर भांणचे म्हणणे पडले की कानाच्या आत अगदी आतल्या बाजूला दोन तांदळाएवढे एक इंद्रिय असते ते साऱ्या शरीरातील संतुलन सांभाळते. त्यांत काही बिघाड असावा. त्यांनी एक औषध stemitil सुचविले. आज तीन वेळा घेतले.

बीकानेरला जाण्याचे रहित केले, याचे वाईट वाटले. पण इलाज नव्हता.

देवाने दिलेल्या शरीराबरोबर जन्मभर सहयोग करायचा आहे. त्या शरीराचेच आपल्याला ज्ञान नसावे ही खरोखर लाजीरवाणी गोष्ट आहे आणि मी तर झोप, शौच, लघवी, भूक यांचे सूक्ष्मपणे निरीक्षण करणारा. स्वास्थ्याचे नित्य चिंतन करणारा. मला काहीच समजू नये याचा अर्थ काय ? मानसिक काहीच कारण नाही. मला वाटते, झोपेचे तंत्र काबूत आणले पाहिजे अथवा खरे म्हणायचे म्हणजे झोपेचे तंत्र निमूटपणे स्वीकारले पाहिजे. एवढ्या म्हातारपणी प्रकृति चांगली चालली आहे हे शरीराचे उपकार आहेत. शरीराशी निष्ठा सांभाळलीच पाहिजे. शरीराचे लाड करू नयेत. वासनेला वश होऊ नये. आत्म्याला विसरू नये. ही साधना योग्य वेळी उत्तम सांभाळली. पण शरीराचा म्हणून देखील काही हक्क असतो. त्याला अन्याय होता कामा नये. त्यात मुख्य म्हणजे झोप, शौच, आंघोळ आणि वेळेवर सप्रमाण आहार घेणे. यापैकी झोप आता आपले राज्य बरोबर चालविते. मला वाटते या बाबतीत माझ्याकडून राजद्रोह झाला ! कसेहि असो, आरोग्याचे चिंतन चालविलेच पाहिजे.

मला वाटते, मी काहीच व्यायाम करीत नाही. फिरायलादेखील जात नाही. तरीहि त्या मानाने अन्नपचनाचे तंत्र ठीक चालले असावे. आतापर्यंत या बाबतीत जी उपेक्षा झाली होती ती शरीराने सांभाळून घेतली. कसेहि असो, आहार आणि झोप यांच्यावर पूर्ण लक्ष ठेवले पाहिजे.

मनाचे स्वास्थ्य उत्तम आहे ही एक ईश्वराची कृपाच आहे. विसराळूपणा थोडा वाढत आहे, पण त्याची तक्रार नाही. बुद्धिशक्ति, अनुमानशक्ति आणि कोणत्याहि परिस्थितीत इलाज शोधण्याची शक्ति या तिन्ही ताज्या आहेत. त्यात परिपक्वता आली आहे. हा एक लाभ आहे.

दिल्ली

२०-४-७१

आज नवजीवनकडून माझ्या पुस्तकाविषयी मागितलेली माहिती आली. तिच्या आधाराने चि. सरोज, सतीश, कुसुम आणि मी – माझ्या साहित्याविषयी पुष्कळ विचार केला योजना आखल्या त्यातून 'चि. चंदनने' या पुस्तकाची गोष्ट निघाली. चि. सतीशबरोबर त्या पुस्तकाची चर्चा करताना आम्ही फक्त प्रकाशनाच्या दृष्टीने बोललो. पण माझ्या मनात ते जुने सगळे दिवस जागृत झाले.

चंदन प्रथम माझी शिष्या. माझ्यामुळेच सतीश दक्षिणामूर्तीमध्ये गेला. मी दक्षिणामूर्तीत वारंवार जाऊ लागलो. विद्यार्थ्यांना उद्देशून व्यक्त केलेले माझे विचार चंदनने ऐकले. ती विद्यापीठामध्ये येऊन मला भेटू लागली. त्यानंतर तिची चि. सतीशशी दोस्ती जमली. त्यांनी लग्न करण्याचे ठरविले. अशा रीतीने चंदन आमच्या घराण्यात दाखल झाली. हे एक भाग्यच समजतो. पण तिने चि. सतीशच्या आणि माझ्यामधील अंतर दूर केले. हा सगळ्यात मोठा लाभ झाला. मला सांभाळण्याचा प्रश्नच नव्हता. पण चि. सतीशच्या मनांतील तेढ तिने मोठ्या कौशल्याने हळूहळू कमी केली. त्यामुळेच पिता-पुत्र एकहृदय होऊ शकले. ही धन्यता चंदनमुळेच शक्य झाली हे मी कधीहि विसरू शकत नाही. पुढे बनारस हिंदु युनिवर्सिटीत चि. सतीशचा गृहस्थाश्रम थाटला. मी थोडे दिवस त्याच्या घरी जाऊन राहिलो. तिकडे लहानशा शैलेने मला लळा लावला. पुढे एकदा चंदन मुलांना घेऊन 'काकावाडीत' येऊन राहिली होती. तेथे चि. राजा माझा झाला. आता ही मुलें दूर झाली असोत पण माझा संतोष यत्किंचितहि कमी झाला नाही.

त्या चंदनच्या अस्थि हरिद्वारच्या गंगा प्रवाहात सोडण्याची पाळी आली ! सगळ्या गोष्टी आज एकदम आठवल्या. माझ्यात कौटुंबिकता बेताचीच आहे. पण आहे ती हृदय भरून टाकते.

दिल्ली
२१-४-७१

आज अनेक संदेश लिहून दिले. राज्य चालविण्याच्या ऐवजी शिक्षण आणि सेवा यांच्याद्वारा समाज संघटण करणे इष्ट आहे असा संदेश शिक्षक-वर्गाला दिला. सिद्धांत खरा आहे. पण शिक्षकवर्ग हा समजू शकेल की नाही याचीच वानवा आहे. अमलात आणण्याची गोष्ट दूरच.

गोकुळभाईंना दारूबंदीविषयी संदेश पाठवला. जनतेचा प्रभाव सरकारवर पाडला पाहिजे. नाही तर सरकारला विसरून जनतेतच निष्ठेने काम केले पाहिजे.

हिंदी साहित्यिकांना पूर्व बंगालविषयी संदेश पाठविला की आंतर-राष्ट्रीय भूमिका बदलल्यावाचून आज विशेष काही करता येणार नाही.

कुसुम नारगोळकर माझ्याकडून एक लेख घेऊन गेली. ती म्हणाली 'मला आवडला'. पण मला वाटते, तिच्या पतिराजांना त्याने संतोष होणार नाही. असो.

सर्वोदय समाजाने यापुढे जातीचा प्रश्न हाती घेऊन धर्मसमन्वयाचे काम केले पाहिजे. जाती तोडण्याचे काम अहिंसक पद्धतीने करावयाचे म्हणजे जातीची आणि धर्माची 'संघटणे' हाती घेऊन त्यांना इतरांची सेवा शिकविणे हाच मार्ग आहे. हिंदुस्तानात असंख्य जाती-संघटना, जातीचे फंड, आणि जातीच्या शिक्षण संस्था आहेत. हीच गोष्ट पारशी, ख्रिस्ती, यहुदी आणि मुसलमान धर्मसमाजाविषयी खरी आहे. तेव्हा आता यांच्यामध्ये शिरून त्यांनी इतर जातींना आणि धर्मांना-धर्म-समाजांना-मदत करणे इष्ट आहे. हे पटवून देऊन त्यासाठी एक जबरदस्त अभियान सुरू केले पाहिजे. याला पुरेशी मंडळी सर्वोदय समाजाने दिली पाहिजेत. सर्वात मुख्य काम हेच आहे. सर्वोदय समाज हे काम हाती घेईल का ? स्वराज्य, सरकार, काँग्रेस, गांधीस्मारक निधि, सर्व सेवा-संघ, सर्वोदय समाज या संस्थांनी मिळून हे गांधीकार्य उचलले पाहिजे. नाशिकच्या संमेलनापुढे हा प्रश्न ठेवावा असा विचार होत आहे.

आजच समजले की नाशिकचे संमेलन ता. ५-६-७ ला असणार. नंतर

सामान्य जनतेचे संमेलन ता. ८-९-१० तीन दिवस असणार. मला भीति वाटते की सहा दिवसाच्या दीर्घ चर्चेत लोक थकून जातील आणि पुढील रचनात्मक सेवेला उत्साह राहणार नाही. कसेहि असो, या खेपेच्या सर्वोदय संमेलनाला आव्हान दिलेच पाहिजे. माझी शक्ति क्षीण होत आहे. याचा अनुभव नुकताच होऊ लागला आहे. तेव्हा समाजाचे काम समाजाला समजावून सोपवून देणे इष्ट आहे.

दिल्ली

२२–४–७१

दोन दिवसाच्या आजारीपणाचे मला आश्चर्य वाटले. कारण अशा प्रकारची भोवळ मला जन्मात कधी आली नव्हती. मी ओळखले की झोप कमी पडल्यामुळे भोवळ आली. तेव्हा तिचा कसलाच विचार उरला नाही.

पण त्याबरोबर आता ती कमजोरी वाटते ती मात्र म्हातारपणाबरोबर 'चिकटणार असे वाटते. औषधी इलाज करू. पण म्हातारपणाचा विचार झालाच पाहिजे.

माझ्या मते मरण एकदम येते किंवा अंशाअंशाने येते. म्हातारपण म्हणजेच क्रमश: मरण. मी लहानपणापासून अनेक लोकांची म्हातारपणे पाहिली आहेत. म्हातारपण म्हणजे ईश्वरदत्त निवृत्ति असेच मला प्रथम-पासून वाटले आहे, तेव्हा झोप जशी प्यारी असते तसेच म्हातारपणहि मला पूर्वीपासून प्रिय आणि इष्ट वाटते.

मृत्युसंबंधाने जसे माझे विचार स्थिर आहेत त्याचप्रमाणे म्हातारपणहि मला स्वीकार्य आणि स्वागतार्ह वाटले आहे. किती तरी मोकळीक मिळवून देते ते.

तेव्हा मला त्याची चिंता नाही. पण चिंतन करणे आवडते आणि मृत्यूनंतरची व्यवस्था करून ठेवणे अत्यंत इष्ट वाटते. रोमन लोक म्हणत, मृत्युपत्र केल्यावाचून जो मेला तो असंस्कारी, मूर्ख म्हटला पाहिजे. ते लोक तर दरवर्षी नवीन मृत्युपत्र करीत. (माझ्या वडिलांना मृत्युपत्राचे नांव

ऐकणेही अशुभ वाटे. त्यांना रोमन लोकांचा अभिप्राय मी सांगावयाला हवा होता.) आता मी माझ्या पुस्तकांची बापूजींनी ठरवलेली व्यवस्था ठीकठाक करणार. माझ्या लिखाणाची व्यवस्थादेखील कॉपीराईट, रॉयल्टी वगैरे सर्व ठरवून टाकणार. आज वाटते की चि. बाळ, सरोज आणि रवींद्र या तिघांना मी माझे उत्तराधिकारी नेमत आहे हे नवजीवनला कळवावे.

मी नेहमी म्हणतो की मृत्युपत्र म्हणजे मरून गेल्यानंतरदेखील आपल्या मालमत्तेवर अधिकार गाजवणे आहे. मनुष्याला ते शोभत नाही. मेलो तर पूर्णपणे मरावे. पण आज मी लोभामुळे नव्हे तर नंतरची अव्यवस्था टाळण्यासाठी मागची व्यवस्था करीत आहे आणि ती मरण्यापूर्वीच अमलातही आणणार. मला याचे अत्यंत समाधान आहे.

मनुष्याला आपल्या शरीराची विल्हेवाट लावण्याचा काही अंशी हक्क असला पाहिजे. मी म्हणेन माझ्या मृत शरीराचा डॉक्टर लोकांनी पूर्ण उपयोग करावा आणि मग अवशेष जाळून टाकावेत. हाडे आणि राख झाडांना खत म्हणून वापरावी. गंगेला अर्पण करणे मला मान्य नाही.

दिल्ली
२३–४–७१

ज्याप्रमाणे प्राचीन आर्यांनी आपले श्रेष्ठत्व जगावर गाजवले, पुढे स्वतःच्या संस्कृतीचा प्रचार अनेक देशांत केला आणि शेवटी मागासलेल्या देशांच्या संस्कृतीतूनदेखील बऱ्या-वाईट पुष्कळ गोष्टी घेतल्या आणि एक प्रकारची समन्वय संस्कृति चालवली, त्याचप्रमाणे युरोपच्या गोऱ्या लोकांना आर्यांचे अनुकरण करण्याची संधि मिळाली. यांनी एशिया, आफ्रिका आणि अमेरिका–तीन खंडांत तीन प्रकारची नीति चालवली आणि स्वतःचे श्रेष्ठत्व स्थापित केले.

आर्यांपेक्षा यांना दोन गोष्टींचा फायदा मिळाला. युद्धकलेतील प्रगति आणि विज्ञान आणि यंत्रविद्येतील नवे नवे शोध यांनी आपल्या

संस्कृतीचाही प्रचार जोराने केला. आर्य लोकात ज्याप्रमाणे आर्यत्वाचा अभिमान होता तसाच अभिमान या गोऱ्या लोकांतही आहे. पण यापुढे मागासलेले देश झपाट्याने पुढे येऊ लागले आहेत.

अमेरिकेत प्रथम इंग्रज, फ्रेंच, जर्मन वगैरे लोक मिसळले. पुढे दक्षिण युरोपमधील लॅटिन जातीदेखील मिसळल्या. त्याचप्रमाणे आता अमेरिकन लोक जपानी, चीनी, भारतीय, अरबी, इरानी, इजिप्शियन वगैरे लोकांत हळूहळू मिसळतील. निग्रोशी मिसळणे त्यांना जड जाते पण तेही आता हळूहळू मिसळू लागले आहेत. सरतेशेवटी अमेरिकन लोकांची गत हिंदू-प्रमाणेच होणार, अशी चिन्हे दिसू लागली आहेत. वंशसमन्वय होण्यापूर्वी संस्कृतिसमन्वय होणे शक्य दिसते. या कामी विज्ञानाची मदत पुष्कळ होईल आणि आपला वेदान्तदेखील उत्तम मदत करू शकेल. अमेरिका इजिप्त आणि भारत—या तीन प्रदेशांना यापुढे सांस्कृतिक महत्त्व येणार आहे, हे स्पष्ट दिसते.

पण भारतीय संस्कृतीला जीवनकलेला बाधक अशा पुष्कळ गोष्टी टाकाव्या लागतील. भारताने अध्यात्म्याच्या जोरावर संकुचित धर्म-भावनेचा जवळ जवळ नाश केला पाहिजे आणि अध्यात्माचे समाजविज्ञान विचारपूर्वक निर्माण केले पाहिजे आणि त्याहून तातडीची गोष्ट म्हणजे अध्यात्म्याच्या आधारावर वंशा-वंशामध्ये पारिवारिक संबंध स्थापून, आंतर-राष्ट्रीय नव-राजनीतिशास्त्र तयार केले पाहिजे. त्याला आंतर-जातीय किंवा जागतिक लोकनीति विज्ञान म्हणावे लागेल. अध्यात्म आणि व्यापक कुटुंब भावना यांचा आधार सार्वभौम झाला पाहिजे.

दिल्ली
२४–४–७१

आज एक नमुनेदार सिंधी स्वामी भेटला. अजून पुरा संन्यासी झाला नाही. सेवाग्राम आश्रमात राहिला होता. हिंदु संस्कृतीचा नमुनेदार प्रतिनिधी होता. मी म्हणालो—"वय झाले आहे. कानाने फारच थोडे ऐकू येते." तो म्हणाला—"शीर्षासन करा. नाकात बदामी तेलाचे दोन थेंब घाला.

कानातदेखील दोन दोन तासांनी बदाम तेलाचे दोन-दोन थेंब घाला. डोक्याला बदामाचे तेल चोळा."

त्याच्याकडे माझी विश्व-समन्वय संघाची योजना होती. तेव्हा सर्व-धर्म-समभाव स्वतःला फार आवडतो असे म्हणून त्याने ॐकाराचे महत्त्व सांगितले. गीता पाठ करायला सांगितली. गायीचे दूध-लोणी-तूप वापरा, येथे गायी बाळगा. मी सगळी मदत करीन. मला पैसे नकोत वगैरे सगळ्या ठराविक गोष्टी बोलला. बरोबर एक म्हातारा शिष्यही घेऊन आला होता. मी त्याला माझे विचार सांगितले. सगळे विचार स्वीकारायला तयार. पण स्वतःची एकही गोष्ट सोडायला तयार नाही. इतिहास, अनुभव, निरनिराळे प्रयोग कशाचीच त्याला किंमत नाही. सनातनी म्हणून जेवढ्या रूढ गोष्टी समाजात चालत आहेत त्यांचा प्रचार करावा. त्याग आणि वैराग्याचे महत्त्व गात रहावे. अध्ययन नको, अनुभव नको, परिवर्तन नको. सगळी संस्कृति रूढ आणि यांत्रिक केलेली.

सामान्य समाज अशा लोकांचीच कदर करतो. स्वतः धर्माप्रमाणे चालता येत नाही याचे दुःख करतो आणि त्याचे प्रायश्चित म्हणून अशा लोकांना दक्षिणा देऊन त्या पुण्यातून स्वतःचे पाप धुवून काढतो. नवीन परिस्थितीत बसेल असला व्यापारधंदा पसंत करतो. त्यात लबाडी आणि फसवा-फसवी केल्यावाचून गत्यंतर नाही अशी मनाची समजूत करून घेऊन हातून घडणारे पाप मनुष्य वाढवत जाईल आणि दानाची रक्कम वाढवून पाप धुवून जाईल असा हा रूढ धर्म 'सामान्य' जनांना सोयिस्कर झाला आहे. जीवनात तेजस्विता नाही. डोक्यात कार्यकारण संबंध समजण्याची बुद्धी नाही. पैसे मिळविण्याइतका व्यवहार उत्तम समजतो. लाच देण्याची खूबी आणि अपरिहार्यता उत्तम पटलेली. अशा लोकांना असलेच साधु हवे असतात. हा अर्धा संन्यासी मला सांगतो, "गांधींच्या आश्रमात नोकर नसावेत. गृहस्थाश्रमी लोकांच्या कौटुंबियाचा एक निराळा विभाग असावा वगैरे मी सूचना केल्या. आश्रमवाल्यांना त्या पसंत पडल्या नाहीत. म्हणून मी आश्रम सोडला. सध्या अजून स्वतःचा आश्रम स्थापित केला नाही. प्रयत्नात आहे."

दिल्ली

२५–४–७१

आज सगळीच योजना फसली. सकाळी नेहमीप्रमाणे चारला उठलो. प्रकृति उत्तम होती. डोक्यात कमजोरी नाही. चालण्यात पावलेहि बरोबर पडत होती. आंघोळ, ध्यान. प्रार्थना उत्तम झाली आणि पावणे बाराला एकदम पूर्वीपेक्षाहि जोराच्या चक्करी येऊ लागल्या. पंधरा-वीस मिनिटे असेच चालले. मग चि. सरोजच्या मदतीने शौचाला गेलो. थोड्या प्रयत्नाने शौच होताच डोक्याची भोवळ थांबली. कमलाताई होस्पेटना तार केली, "येऊ शकत नाही, क्षमस्व". डॉक्टर भाण तपासून गेले. नाडी, रक्तदाव, छाती सर्व कांही चांगले.

इतक्या काळजीने केलेली योजना आयत्या वेळी नष्ट झाली. वाईट वाटले. पण करणार काय ? उद्या सोमवार आहे. सविस्तर पत्र लिहू. आता वाटते, सकाळी दहा वाजता शौचाला गेलो असतो तर हा प्रसंग टळला असता. पण अगोदर कसे कळावे ? शरीराने शौचाची अस्पष्ट सूचनादेखील दिली नव्हती. हे असे कां होते याचे कारण उमगत नाही. 'भवितव्यता विरुद्ध' असेच म्हणावे लागते. चि. बाळला मात्र घाईने एक दिवस लवकर यावे लागले.

जोराने चिंतन चालू आहे. पण हाती काहीच येत नाही, याचे वाईट वाटते. 'मनसा चिंतितं कार्यं दैवेन अन्यत्र नीयते ॥'–मला त्याचे सुख दुःख नाही. पण वास्तविक कारण समजले पाहिजे.

प्रत्येकाने लहानपणीच आहार, परिश्रम, शरीर आणि मनाचे व्यापार याचे विज्ञान आपलेसे केले पाहिजे. आत्मा, परमात्मा, इहलोक-परलोक इत्यादि चिंतन, दर्शन आणि अनुभव काय कामाचे ? जर शरीर स्वास्थ्य आणि मानसिक स्वास्थ्य याचे विज्ञान आपलेसे झाले नाही तर.

आजच्या स्थितीत नजीकचे कोणचेच कारण सापडत नाही. तेव्हा सबंध जीवनाचाच, सामग्र्याने विचार झाला पाहिजे. कोणीहि तज्ज्ञ डॉक्टर हे काम करू शकणार नाही. स्वतः जातीनेच शोध केला पाहिजे. नव्या अर्थाने "तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे । येरा गबाळाचे काम नोहे ॥"

जातीने शोध करीन पण निःशंक, यथार्थ अनुमान पदरी पडेल का ? खात्री नाही. अपरिहार्य अर्थे शोक करणे व्यर्थ आहे.

दिल्ली

२६-४-७१

आज दोन गोष्टींचे चिंतन झाले. माझ्या साहित्याच्या प्रकाशनाची व्यवस्था यापुढे तिघांना सोपविण्याच्या माझ्या कल्पनेला चि. सतीश आणि बाळ दोघांची मान्यता आहे, हे स्पष्ट करून घ्यावयाचे. आणि त्याप्रमाणे योग्य व्यवस्थेविषयी नवजीवनशी पत्रव्यवहार करण्याचे ठरविले. यात चिंतन असे विशेष नव्हतेच. पण चि. सतीशने घरगुती पद्धतीने सर्व काही ठरवावे असे सांगितले याचे मला आश्चर्य वाटले. त्याचा स्वभाव तड आणि फड करण्याचा. मी जन्मभर ती पद्धत टाळत आलेलो. आज त्याच्याकडून माझ्या स्वभावाचा आणि पद्धतीचा पुरस्कार ऐकून बरेहि वाटले आणि आश्चर्यहि वाटले.

आजची दुसरी गोष्ट म्हणजे गोव्याचे राजाराम पैंगिणकर यांच्या आत्मकथेचा दुसरा भाग हाती आला. त्यामुळे एका महत्त्वाच्या सामाजिक कुरिवाजाचे अगदी नव्या पद्धतीने चिंतन झाले.

पहिला भाग मी साद्यंत वाचला होता. पण पार विसरून गेलो होतो .दुसरा भाग हाती येऊनदेखील जुने काहीच आठवले नाही. 'मी कोण?' हे वेदांती अध्यात्माचे पुस्तक असावे असेच मी धरून चालली. पुढे लेखकाचे पत्र वाचले तेव्हा उलगडा झाला.

पश्चिमेकडील काही लोक वेश्याव्यवसायाचे समर्थन करतात. विवाह-संस्थेसाठी हा सेफ्टी वाल्व्ह मानतात. दुसरे लोक म्हणतात की व्यभिचार पत्करला. पण वेश्याव्यवसायाची हीनता नको. स्त्री जातीचा हा अपमान आहे.

तिसरा पक्ष विचारतो : 'विवाह-संस्था आज समर्थनीय आहे काय ? आणि असेल तर तिला सामाजिक कां करू नये ?'

प्रेम आणि संभोग यांच्या साहचर्याविषयी देखील सर्व बाजूंनी मौलिक चिंतन झाले पाहिजे. मानसविज्ञान, समाजविज्ञान आणि अध्यात्म या तिहींच्या अद्यतन वैज्ञानिक विचारांच्या जोरावरच विवाह, व्यभिचार, वेश्याव्यवसाय, मुलामुलींना दत्तक घेणे, संपत्तीची वंशपरंपरागत मालकी, कुलधर्म, जातिधर्म, वंशव्यवस्था, राष्ट्रीयता या सर्व क्षेत्रांचे परस्पर संबंध ठरवले पाहिजेत. संपत्तीवर मालकी हक्क, युद्धसंस्था आणि विवाहसंस्था या तीन परस्पर भिन्न गोष्टींचे साहचर्य स्वीकारलेच पाहिजे.

मला वाटते, मी आजवर वाचन आणि चिंतन, निरीक्षण आणि काही अंशी चर्चा करत राहिलो. पण आता जर वेळीच आणि लवकर निर्णयात्मक काही लिहिले नाही तर भविष्याच्या पिढीचा द्रोह केला असे होईल. पुष्कळ वाचले, चिंतन केले, निरनिराळ्या दृष्टींचे प्रयोजन ठरविले. आता प्रश्न उठतो : ‘सगळ्या गोष्टी जमेस धरल्यानंतर, सर्व बाजू समजून घेतल्या नंतर शेवटी निर्णय काय ?”

एकाने खरे म्हटले आहे : ‘शेवटी निर्णय काय ? या प्रश्नाचे उत्तर ठरविताना शरीरातील एक शेर रक्त आटते.’

## दिल्ली (विलिंगडन हॉस्पिटल)

२७–४–७१

आजचा केवढा पवित्र दिवस ! आज आहे अक्षय तृतीया. त्यांत पुन्हा परशुराम जयंती आणि शिवाजी महाराजांची जयंती. जे काही कार्य आज हाती घ्यावे त्यात म्हणे खात्रीने आणि लवकर यश मिळते आणि मी तर काल नागपूरचेहि रद्द करून इस्पितळात प्रकृति स्वास्थ्यासाठी, आज दुपारपासून दाखल झालो आहे !

आज सकाळच्या प्रार्थनेच्या वेळी स्वास्थ्याविषयी बोललो आणि वसीयतनाम्याविषयी देखील. नवीन हेच होते की योग्यांना देखील झोप घ्यावीच लागते. एकदा समाधि साधली आणि ती सहज लागली मग मृत्यु झोपेत का येईना तो मोक्षाच्या आड येणार नाही.

मी हेहि सांगितले की आज मृत्यु जवळ आल्याचे मुळीच वाटत नाही. स्वास्थ्य चांगले आहे. पण मृत्यूचा विचार नेहमी करावा. साधकासाठी मृत्यूच्या चिंतनाला परमात्म्याचे चिंतन बनवता येते. ऐन उमेदीच्या प्रारंभी ज्ञानेश्वरांनी जीवन-यात्रा संपवली. त्यांच्याकडून जीवनाचे आणि मृत्यूचे रहस्य समजून घेतले पाहिजे. इत्यादि.

आज इस्पितळातील कृत्रिम जीवनाचा प्रारंभ झाला. लहानपणी आम्ही घरगुती किंवा गावठी औषधे घेत असू. स्थिति बिघडली तर डॉक्टरी औषध घ्यावयाचे. डॉक्टर महाग असतात आणि ते औषधात एखादी वस्तु वापरतात ही पहिली तक्रार. पुढे आयुर्वेद घरात आला. मधून मधून प्रवासात यूनानी औषधे घ्यावी लागली. दोन्हीचा प्रकार एकच. पण यूनानी औषधे स्वादिष्ट असावयाची. त्यानंतर घरात मंगळूरकडची होमिओपॅथी शिरली. तिच्या मागोमाग बायोकेमिस्ट्रीची बारा औषधे आली आणि मी कामचलाऊ डॉक्टर बनलो.

कॉलेजात निसर्गोपचाराविषयी ऐकले आणि मग उपवास, रेचक, बस्तीप्रयोग वगैरे आले. याला महात्माजींनी खूप प्रोत्साहन दिले. शेवटी दिनशा मेहताचे नैसर्गिक प्रयोग चालवले. त्या वेळी नाही पण आज मात्र त्या वेळच्या उपचारांचा फायदा स्पष्ट दिसून येतो. परिश्रम, व्यायाम, कसरत करीत नाही तरीहि प्रकृति चांगली राहते. तरीहि ॲलोपॅथीची मदत घ्यावीच लागते कारण ती वैज्ञानिक प्रगतिशील आहे.

दिल्ली (विलिंगडन हॉस्पिटल)<br>२८-४-७१

आज माझी वैद्यकीय तपासणी सविस्तर झाली. छाती, पोट, गळा, कान वगैरेचे X-Rays घेतले. लघवी आणि शौचाची तपासणी झाली. उद्या परिणाम कळेल. बहुतेक सर्व normal आहे. आज रात्री डॉक्टर करोलीने आश्वासन दिले की चक्कर हा कायमचा बिघाड नाही. दूर होईल. उद्या सविस्तर सांगतील.

चक्कर आलीच कां ? याचे कारण मला हवे आहे. ते उद्या मिळावे. आज कोण जाणे एक विचार मनामध्ये पक्का झाला. आणि तो यशपाल जैन मार्फत घनःश्यामदासजी बिडलापर्यंत पोहोचावा अशी इच्छा व्यक्त केली.

गांधीजींच्या हिंदीचे महत्त्व, स्वरूप सबंध देशात लोकांना समजावणारा मी. आज हे काम मी सोडून दिले आहे. सरकारने व इतर लोकांनी ते चालवले आहे. आता ते कसेबसे का होईना वाढणारच. पण हिंदी भाषेने प्रादेशिक भाषेचा जोराने पुरस्कार केला पाहिजे. तरच हिंदीची धडगत आहे. ही गोष्ट आजच्या हिंदीवाल्यांना वर वर पटली आहे. आतून पटलेली नाही. तेव्हा हे गांधीकार्य आजच्या माझ्या स्थितीत देखील मी देशापुढे मांडलेच पाहिजे. अशा हृदयस्थ भावनेने प्रेरित होऊन मी यशपालजींशी बोललो. हे सगळे काम मी आपल्या डोक्यावर घेऊ शकणार नाही हे मला ठाऊक आहे. पण याचा प्रारंभ मीच केला पाहिजे. कारण मलाच ही गोष्ट प्रथम सुचली. मीच बापूजींच्या मागे जोराने लागलो आणि गुजरात विद्यापीठमार्फत, नवजीवन आणि इतर संस्थामार्फत गुजरातीला परिपुष्ट करण्याचा आग्रह धरला. आणि म्हणूनच बापूजींनी मला सवाई गुजराती म्हटले. त्याच भावनेने प्रादेशिक भाषांचा सवाई पुरस्कर्ता मला झाले पाहिजे.

दिल्ली (विलिंगडन हॉस्पिटल)
२९–४–७१

इस्पितळाचे जीवन. आसपास शेकडो आजारी लोक असले तरी त्यांच्याशी ना कोणता संबंध, ना वास्तपूस. फक्त डॉक्टरांशी आणि इस्पितळातील नोकरांशी संबंध. एकाच इस्पितळात असूनदेखील आजाऱ्याशी कसलाच संबंध नाही. आजारी माणूस, त्याचे इष्टमित्र एवढेच त्याचे जग. इस्पितळाच्या संपूर्ण वातावरणाशी काहीच संबंध नाही.

या विश्वाशीदेखील आपला संबंध तसाच आहे. ग्रह, नक्षत्र, तारे

आपल्याला प्रकाशाचे ठिपके दिसतात. पण त्यांच्या तेथे आपापले जीवन आणि जग असणारच.

तीन दिवसात किती तरी लोक भेटून गेले. सद्भाव सर्वांचा, आत्मीयता थोड्या लोकांची. पण मला आत्मीय संतोष मिळाला सर्वांपासून. माझ्या जगात त्यांना एका कोपऱ्याइतके स्थान त्यांच्या जगात मला देखील तसेच थोडेसे स्थान. ही उत्तम स्थिति आहे. हे सर्व टिकवून आत्मीयता मात्र सर्वांशी एकाच प्रकारची – ही खरी साधनेची सिद्धि.

काही लोकांची असंस्कारिता पूर्वी दिसून येई, त्या वेळी मनात चीड यावयाची. आता लोकांचे दोष, त्यांच्या चुका, त्यांची पापे – यांच्याविषयी कसलीच चीड वाटत नाही. सगळेच जणू का एका कादंबरीतील पात्रे. माझ्या साधनेची उत्तम सिद्धि हीच – की सर्वांशी आत्मीयता. त्यांचे दोषहि माझेच जणू आणि ह्यामुळेच द्वेष, तिरस्कार – काही मनांत उठत नाही. लहानपणी राग यावयाचा, तिरस्कार वाटावयाचा. त्याचे आता हसू येते.

आता या पुढची साधना सुरू केली पाहिजे. जीवन म्हणजे काही रोचक कादंबरी नव्हे. मीच लिहिले आहे ना, की जीवन म्हणजे कैदखाना आहे आणि त्यालाच जन्मभर साधन म्हणून वापरतो. माझे जीवन आणि माझे शरीर बंधनकर्ताहि आहे आणि मुक्तिदाताहि आहे. धन्य जीवन, धन्य धन्य !!

दिल्ली

३०–४–७१

या पुढचे आयुष्य कसे खर्चावे हा प्रश्न नेहमीचा असला तरी आज मी तो प्रश्न पूर्ण मनाने डोक्यात घोळविला.

व्यक्तिगत मोक्ष का समाजसेवेमार्फत समाजाच्या उन्नतीसाठी झटणे आणि सर्वमुक्तीसाठी धडपडत, स्वतःच्या मुक्तीची निश्चिति करणे हेच माझे जीवन प्रयोजन असल्यामुळे आज मी या प्रश्नाचे विशेष चिंतन केले.

कोठे रहावयाचे, हा प्रश्न कमी महत्त्वाचा नाही. तरी त्याला गौण

ठरवून समाजोन्नति करण्याच्या प्रयत्नात आत्मोन्नति आपोआप होते हा माझा अत्यंत महत्त्वाचा आदरणीय सिद्धांत आहे. कित्येक वर्षे झाली माझे सगळे चिंतन याच आदर्शाला पोषक व्हावे असा अखंड प्रयत्न चालू आहे. भर्तृहरीची मला एक आवडती ओळ आठवते:—

स्वार्थान् संपादयंतो वितत पृथुतरारंभयत्ना परार्थे ।

जगासाठी मोठी मोठी कामे करणे, योजना अमलात आणणे, शिक्षणाला वाहून घेणे अशी विशाल कामे चालवत असताना स्वतःचा न्याय्य आणि धर्म स्वार्थहि आपोआप सिद्ध होतो. अशा अनुभवाच्या बळावर स्वार्थाचा विचारदेखील सोडून, दुसऱ्याच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणारे संत महंत महाभाग जगात विरळे. पण त्यांच्या पुण्याईवरच आजचे जग चालले आहे.

ही गोष्ट साक्षात्काराइतकी पटल्यानंतर, अगदी याचप्रमाणे चालण्याचा प्रयत्न करीत आहे. हा आदर्श समाजव्यापी करावयाचा असेल तर थोतांड बाजूला सारून लोक-कल्याणाच्या सर्व बाजूंनी उत्थान साधले पाहिजे.

अशा मनुष्याला स्वधर्म, परधर्म असा भेदच उरत नाही. मुक्ति म्हणजे सर्वमुक्ति. खरा सार्वधर्मच असू शकतो.

कालवा खणून सबंध गावाला पाणी पुरवल्यानंतर माझ्या शेताला पाणी मिळाल्यावाचून राहणार नाही. अशा प्रकारचा आत्मविश्वास मनात आपोआप दृढ होतो.

आता मात्र लोकसेवेसाठी शरीराकडून, इंद्रियाकडून आणि मन, बुद्धि, अहंकार आदिकडून अखंड सेवा घेण्याचे दिवस उरले नाहीत.

## मे ७१

दिल्ली
१-५-७१

बाळाच्या घरी शांति असणारच. इतक्या दूर भेटण्यासाठी कोण येणार ? ज्याप्रमाणे वय झाले म्हणजे मनुष्य सेवानिवृत्त होतो त्याप्रमाणे चितानिवृत्त होण्यासाठी काही व्यवस्था असली पाहिजे. पण ते कसे जुळणार ? खाणेपिणे, आंघोळ आणि झोप घेणे – हे स्वतःच करावे लागते. त्याचप्रमाणे देण्याघेण्याचा आणि पैशाहिशोबाचा भार स्वतःच वाहावा लागणार. पण जेथे विस्मृतीचे राज्य सुरू झाले तेथे अराजक न होता

कुराजक होऊ लागेल तर सगळी जबाबदारी कुणावर तरी सोपविली पाहिजे. मी माझी जबाबदारी बाळावर सोपवत आहे. पण मला न आठवणाऱ्या गोष्टी पुनः पुनः विचारले तरी विसरलेल्या गोष्टी कसा सांगणार ? चि. सरोजकडे सर्व सोपवले असते. पण तिने स्वतःचाच सगळा भार स्वतःच्या वहिनीवर सोपवला आहे. एवढे बरे आहे की अमृतलालमुळे ज्याप्रमाणे मी संस्थेच्या बाबतीत निश्चित आहे त्याप्रमाणे बाळाच्या बाबतीतहि आहे. पण त्याची नीति निराळी. माझी दृष्टि निराळी.

मला वाटते की माझ्या साधनेचे स्वामी – प्रत्यक्ष भगवान्, ते मला एकदम मरू देऊ इच्छीत नाहीत. इंद्रिये एकामागून एक निवृत्त झाली म्हणजे तेवढा मृत्यु साधला. स्मृति अंशतः राजीनामा देत आहे. त्याचप्रमाणे पैशांचा सदुपयोग करण्याच्या बाबतीत तिघांनी किंवा पाचांनी सगळा कारभार हाती घ्यावा. मधूनमधून मला काय केले, काय नाही ते समजावून सांगावे. जरूर असेल तेथे माझ्याकडून निर्णय घ्यावा. पण जबाबदारी माझ्यावर नसावी.

ही झाली पैशाविषयी आणि हिशोबाविषयी.

पत्रव्यवहाराचे सोपे आहे. व्याप केव्हाहि आखडता येतो. आणि या क्षेत्रात सरोजची मदत उत्तम होईल. तेव्हा मी निश्चित आहे. अनेक क्षेत्रातून जसा जसा निवृत्त होतो तसतसे ईश्वराकडे अधिक ध्यान लागू लागले आहे. माझ्या विचाराप्रमाणे जीवन आणि साधना एक आहे. क्रमशः मृत्यु केवढी मोठी सोय !

दिल्ली
२–५–७१

चि. वनू [१] व मोहन [२] महेंद्र [३] तिघांना एकत्र पाहताच स्व. नरहरि भाईचे जीवन-चरित्र अजून का लिहून झाले नाही असा विचार मनात

[१] सौ. वनमाला देसाई–स्व. नरहरिभाई परीख यांची कन्या.

[२] श्री मोहन परीख–स्व. नरहरभाईंचे सुपुत्र

[३] श्री महेन्द्र देसाई–श्री वालजी गोविंदजी देसाई यांचे सुपुत्र.

आला आणि त्या तिघांनाहि मी गोड ठपका दिला. पुष्कळ वर्षापूर्वी मोहनने मला विचारले होते की "माझ्या पित्याच्या चरित्राचा तुम्ही आग्रह करता. पण जगाच्या दृष्टीने माझे वडील इतके महत्त्वाचे होते काय ?" चि. मोहन इतक्या तटस्थपणे विचार करू शकतो असे पाहून तो मला अधिक आवडता झाला आणि मग मी त्याला जगाच्या दृष्टीने नरहरिभाईंचे महत्त्व पटवलेच. पण दुसरीहि दृष्टि सांगितली की "महात्मा गांधी जगासाठी एक युगपुरुष झाले. त्यांच्या आसपास जी महत्त्वाची मंडळी होती, त्यांचे जीवनचरित्रहि जगाला आवश्यक असते." मला वाटते आता हे चरित्र लिहिले जाईल. त्यात नरहरिभाईंचा बारडोली उपवास महत्त्वाचा असणार.

आणि आजच राधा करनाड आणि तिची धाकटी बहीण सगुणा देसाई दोघी भेटल्या. त्यांनी स्वतःच्या वडिलांचे जीवन आणि इतरांनी केलेली कदर–सर्व काही एका पुस्तकात आणले आहे. त्यांत इंग्रजी विभाग आणि कन्नड विभाग आहेतच. खेरीज, एक निबंध हिंदीतहि आहे. या ग्रंथाचे प्रकाशन राष्ट्रपति गिरींच्या हातून होणार आहे. त्या प्रसंगी मी अध्यक्ष व्हावे असा त्यांचा आग्रह होता. तो योग्यहि होता. पण मी माझी अडचण त्यांना सांगितली. तेव्हा सगुणा म्हणाली, 'तुम्ही अध्यक्ष होणार असे जाहीर करू. मग न येऊ शकला तर आयत्यावेळी कामचलाऊ अध्यक्ष शोधून काढू." मी म्हणालो. "माझी हरकत नाही. पण कोणालाहि कामचलाऊ अध्यक्ष होण्यात प्रसन्नता वाटत नाही. शक्य असल्यास मी आनंदाने हजर राहीनच. अध्यक्षपदी मी नसलो म्हणून काय बिघडले ? कर्नाड सदाशिवरावाचे चरित्र इतक्या उशीराने छापल्याने बरेचसे स्वारस्य त्यातील गेले असे मला वाटले. पण तसा विचार नरहरिभाईंच्या बाबतीत मला आला नाही ! !

दिल्ली
३–५–७१

हल्लीचे युग विज्ञानवेत्त्यांचे आहे. समाजाला विज्ञान कितीसे

कळणार ? पूर्वी शास्त्र-प्रामाण्य चालत असे. आता तज्ज्ञांचे प्रामाण्य स्वीकारावे लागते.

जोपर्यंत समाजवाद बोकळला नाही तोपर्यंत व्यक्तीला अधिकार आहे की विज्ञानवेत्त्यामध्ये मतभेद झाला तर विज्ञान जाणणाऱ्या सामान्य मनुष्यालाच स्वतः पुरता निर्णय घ्यावा लागतो. ॲलोपॅथीचे तज्ज्ञ सर्वत्र आहेत. आयुर्वेद, होमिओपॅथी, नैसर्गिक उपचार इत्यादि क्षेत्रांतील सज्जन-देखील आपल्याला भेटतात. आपण कबूल करतो की कोणच्याहि 'पॅथी'चे ज्ञान आम्हाला नाही आणि तरीहि कोणाचे औषध घ्यावयाचे हे आपल्या-लाच ठरवले पाहिजे. याला इलाज नाही. खरे म्हटले तर यातच व्यक्तीची प्रतिष्ठा, आहे. निर्णय आंधळा का होईना तो निर्णय स्वतःच करणार आहोत यातच माझी आणि माझ्या भाग्याची प्रतिष्ठा आहे.

देव सर्वज्ञ, सर्व-समर्थ आहे. त्याला अशक्य असे काहीच नाही. पण अशा देवाला मानणे न मानणे माझ्या हातात आहे. सगळेच विज्ञानवेत्ते माझ्यासमोर उमेदवार म्हणून उभे आहेत. मी नम्र होऊन सर्वांना नमस्कार करतो. आपले अज्ञान सर्वांपुढे जाहीर करतो: तरीहि निर्णय मलाच करावा लागतो की औषध कुणाचे घ्यावयाचे. हे काम योग्य माणसावर मी सोपवू शकतो. पण असा योग्य कोण आहे ते तर मलाच ठरवावे लागेल.

**नवी दिल्ली**

**४–५–७१**

पुष्कळ वर्षांनी नारायण मलकानी भेटले. पण डॉक्टर बेरी–होमीओ-पॅथला भेटावयाचा वेळ ठरला होता म्हणून विशेष बोलताहि आले नाही. द्वारकाप्रसाद पंजाबी, आपल्या पत्नी आणि मुलगा नारायण यांना घेऊन आले. त्यांना धन्यवाद द्यायलादेखील वेळ नव्हता. पुन्हा भेटू केव्हा तरी. हे सिंधी कुटुंब सेवाभावी आहे. सिंधचा उत्कट नमुना.

आज माझी चांगली कसोटी झाली. डॉक्टरच्या समोर बसलो आणि त्याच्या मागची पाटी दिसली–Consultation Rs. 20 /– Visit

Rs. 100 /– मनांत विचार आला, 'हा माणूस रोग्यांना चांगलाच लुटत असला पाहिजे.' पुन्हा विचार आला की 'ॲलोपॅथी डॉक्टरापेक्षा याची प्रतिष्ठा आपण कमी कां मानावी ? यालाहि सुखाने राहता आले पाहिजे.' पुढे डॉक्टरनी प्रश्न विचारायला सुरवात केली. बारीक सारीक असंख्य प्रश्न विचारले आणि छापील फार्मवर उत्तराची नोंद लिहिली. मनात विचार आला, 'इमानदार, मेहनती आणि हुशार डॉक्टर आहे'. पुढे डॉक्टरनी खाण्याच्या बाबतीत, झोपेच्या बाबतीत प्रश्न विचारले. सल्ला दिला. तेव्हा पुन्हा मनात विचार आला, 'याला आपण उगीचच लुटारू म्हटले. किती काळजीने सर्व काही विचारत आहे.'

तरीहि शंकाशील मन स्वस्थ कसे राहणार ? 'नुसती छाप पाडण्यासाठी इतके प्रश्न विचारीत असेल कदाचित. लिहूनहि घेतो. पण इतकी माहिती याला हवी आहे कशाला ? मनाशी औषध ठरून चुकले असेल. पण 'किती मेहनतीने फी घेत आहे हा.' अशी छाप पाडत तर नसेल ? मग मीच मनावर रागावलो. प्रत्येक गोष्टीत धूर्तपणा पाहणे, हा तुझा स्वभाव झाला आहे. शंका घेतोस यात तुझीच कसोटी नाही का होत ?" माझ्या मनापुढे मी लाजलो.

बाहेर आल्यावर कळले की बाळाने आग्रहाने फी देऊ केली पण त्याने नाहीच घेतली. मग काय विचारावयाचे ? मी माझ्यावर चांगलाच रागावलो. म्हटले, "आता तरी स्वतःला सुधार." सगळा दिवस आत्मशुद्धीच चालवली.

दिल्ली-बाळाच्या घरी<br>५–५–७१

काल श्री. नारायण मलकानींना पाहून आनंद झाला. आणि आश्चर्यहि वाटले. मी मानले होते सिंधी लोकांशी माझा संबंध फर्ग्युसन कॉलेजमधील माझ्या एका संकल्पामुळे उत्पन्न झाला. मी एकदा मित्रमंडळीला म्हणालो, "आपण महाराष्ट्रीय इतर प्रांतांच्या लोकांशी मिसळत

नाही. फक्त त्यांची टीका करतो–'गुजराती लोक शामळूभाई', 'बंगाली बोल घेवडे,' 'कन्नडअप्पा अडाणी,' 'पंजाबी दुरभिमानी,' आपणच काय ते चांगले ! हें आपल्याला शोभत नाही; हीच गोष्ट एकदा लोकमान्यांशी बोललो. त्यांनी मनावर घेतले नाही. पुढे गंगाधरराव देशपांड्यांशी बोललो. (त्या वेळी मी कॉलेज संपवून 'राष्ट्रमता'त काम करीत होतो.) गंगाधरराव म्हणाले, 'कॉलेजमध्ये असताना गुजराती लोकांचा थोडासा संबंध आला पण खरोखर म्हणजे सिंधचे जीवतराम कृपलानी माझे उत्तम मित्र झाले आणि त्यांना मी क्रांतिकारी दलात खेचू शकलो.'

गंगाधररावांची चॅलेंज मी स्वीकारली. आणि केशवराव देशपांड्यांच्या आमंत्रणाने बडोद्याला गेलो. मी गुजराती कसा झालो ते सांगण्याची जरूर नाही. पण जीवतराम कृपलानीमुळे सिंधमध्ये गेलो, त्याची एक संस्थाहि चालवली. पुढे कृपलानींना गुजरात विद्यापीठात आणले. त्या वेळचे नारायण मलकानी. पुढे आमची कार्यक्षेत्रे बदलली आणि आम्ही दूर झालो. मला वाटले की सिंधशी आपला संबंध आता संपला. खरे म्हणजे मीच तो संबंध आटोपता घेतला. जयरामदास दौलतरामपासून विष्णुशर्मापर्यंत जमलेली उत्तम मैत्री हळूहळू संपुष्टात आली गिरधारी तर माझ्या मुलासारखा ! आता पाहतो द्वारकाप्रसाद पंजाबी-सिंधी आहेत. चिकटू पाहतात. ईश्वर करील ते खरे.

## आगगाडीत

६–५–७१

आजचा दिवस मुंबईला जावयाच्या तयारीचा म्हणता येईल. चि. नंदिनी[1] आग्र्याहून दिल्लीला आली. तिच्या कार्याची माहिती घेतली. इंद्रचंद्र शास्त्री बरोबर लीलाधर म्हणून पी. एच्. डी. चा विद्यार्थी आला होता. भारतीय संस्कृतीतील अराजकवादावर तो महानिबंध लिहीतआहे. त्याच्याशी खोलात शिरून चर्चा केली.

---

[1] कवि उमाशंकर जोशी यांची कन्या.

नायबराजना[२] सांगितले की त्यांचे पैसे कालरा ट्रस्टमध्ये जमा करणार. या तिन्ही गोष्टी चिंतनात्मक होत्या. पण मुख्य चिंतन यापुढील प्रवृत्ति-विषयीच होते.

मध्येच भोवळ येणे, घेरी येणे हे कायमचे होणार की काय अशी भीति होती. पण त्यामुळे निराश किंवा हतोत्साह न होता, ती मर्यादा स्वीकारून यापुढे काय काय कामे करता येतील, याचा विचार चालवला होता. काल रात्री झोप येईना. तरीहि सकाळी चांगली झोप येऊन ताजगी वाटली. घेरी आली नाही. त्यामुळे पुढच्या दिवसाची कल्पना बदलावी लागली. मला वाटते जून अखेरपर्यंत माझा कार्यक्रम अनिश्चित असेल तोवर माझी कुवत, देशाची परिस्थिति आणि साधनांची उपलब्धि – याविषयी स्थिर निर्णय होऊ शकेल आणि मगच पुन्हा जोराने काम सुरू होईल. त्याचे स्वरूप काय असेल हे आज ठरवता येणार नाही. तरीहि मला वाटू लागले आहे की जूनअखेर देशाची परिस्थिति स्पष्ट होईल.

माझे मुख्य काम चिंतनात्मक आणि योजनात्मक असणार. कदाचित् परिस्थितीला अनुरूप, प्रत्यक्ष योजना देशापुढे जोराने मांडावी लागेल. 'सर्व-धर्म-समभाव' कितीहि महत्त्वाचा असला तरी समाजाच्या आजच्या मनस्थितीत तो विचार जोर पकडेल असे वाटत नाही. तेव्हा धर्म आणि अध्यात्म जमेस धरून, लोकांपुढे नव-संस्कृतीचा कार्यक्रम मांडावा लागेल. तसे केले तरच विचार स्पष्ट आणि प्रेरक होईल आणि योजनाहि घडवता येईल. हे दोन महिने फारसे काम दाखवू शकणार नाही. पण उत्कट रचनात्मक चिंतन करावे लागणार. त्याची तयारी आहे.

मुंबई
७–५–७१

शास्त्राच्याद्वारा आणि साहित्याच्याद्वारा मनुष्याला जितके ज्ञान मिळते त्याहून अधिक सत्पुरुषांच्या सत्संगामुळे मिळते. (आणि अधिकाधिक

[२] श्री. नायबराज कालरा.

तर निरीक्षण, परीक्षण, प्रयोग आणि चिंतनाद्वारा जे मिळते तेच. तेच उत्तम पचतेहि. पचण्याचा अर्थच आत्मसात् होणे आहे.)

आता सत्संगामुळे जे मिळते त्याचे महत्त्व पुष्कळ लोक समजत नसतील. पण जे समजतात ते कृतज्ञतेखाली दबले जाऊन त्या ज्ञानाला अवास्तव महत्त्व देतात. ज्ञान घेताना स्थल, काल., परिस्थिति आणि संबंध यांचा हिशेब केलाच पाहिजे. पण कृतज्ञ लोक त्या ज्ञानाला त्रिकालाबाधित समजतात आणि आंधळेपणाने त्यालाच अनुसरतात. गोष्ट अशी आहे की, काही जीवनसिद्धांत सार्वभौम आणि त्रिकालातीत असतात. तरीहि त्याचे पालन स्थल-काल परिस्थितीचा विचार करून करावयाचे असते. सामान्य मनुष्य म्हणतात – आम्ही अज्ञानामुळे मोहवश होतो आणि भलतेच आचरण करतो आणि मग पस्तावतो. यांतून वाचण्याचा एकच उपाय आहे. सत्पुरुषांच्या वचनाला चिकटून रहावे. तसे करताना अडचण सोसावी लागली, नुकसान झाले तरी ते परवडले. सिद्धांतांना चिकटून चालणे उत्तम आहे, पण आंधळेपणाने चिकटून चाललो तर नुकसान होणारच आणि ते नुकसान चुकीच्या निर्णयामुळे. त्यापायी सत्पुरुष-निष्ठा, शासन-निष्ठा, परंपरा-निष्ठा – सर्वच व्यर्थ होतात. खरोखर पाहिजे आहे बुद्धियोग. बुद्धियोगाचे स्थान घेऊ शकेल अशी वस्तु जगात नाही.

भगवंतांनी वचन दिले आहे – की जे माझे अनन्य भक्त असतील त्यांना मी बुद्धियोग देतो. पण म्हणावे लागते, भगवंतांनी हे वचन फारसे पाळलेले दिसत नाही. भक्त म्हटला म्हणजे तो आंधळा असलाच पाहिजे. विचार बाजूला ठेवणारा आणि परिणाम काहीहि होवो, मनात शंका येऊ न देणारा असाच असतो. म्हणजेच बुद्धियोगाला प्रथम स्थान न देता तो द्वितीय स्थान देतो.

आता सत्य हाच परमेश्वर – ही गोष्ट खरी असेल तर शुद्ध, अध्यात्म-परायण जीवनदृष्टीप्रमाणे चालणारी बुद्धिच खरी भक्ति म्हटली पाहिजे. असे भक्त जगात किती असतील ? आणि त्यांना जग तरी भक्त म्हणायला तयार आहे काय ?

मुंबई
८-५-७१

सार्वजनिक जीवनामधून आम्ही धर्माला दूर केले-प्रथम देशात अनेक धर्म आहेत म्हणून. नंतर धार्मिक रूढि जुन्या आणि अडचणीच्या आहेत म्हणून आणि शेवटी धर्मातील गूढवाद पटत नाही म्हणून. एवंच धार्मिकतेलाच रजा मिळाली. तरीहि सार्वजनिक जीवनात गांधी, अरविंद, रवींद्रनाथ, भगवानदास आणि लजपतराय यासारख्या लोकांनी उच्च आदर्शाचे आणि नीतिमत्तेचे महत्त्व कायम ठेवले आणि हे सगळे महापुरुष आध्यात्मिकतेने प्रेरित होते. यामुळे 'धार्मिकता' हे नाव काढून टाकले तरी, आत्मपरायणता कायम राहिली.

त्यानंतर स्वराज्य-युगाचा प्रारंभ झाला. नेहरू स्वत: सत्यनिष्ठ, प्रामाणिक आर्यपुरुष होते. पण त्यांनी जे आदर्श चालवले, ते स्वच्छ असले तरी जनतेला उन्नतिकर होते का ? सार्वजनिक जीवनात घसरगुंडी सुरू झाली. बरीचशी पापे सार्वजनिक जीवनात डोकावू लागली. पण तिकडे लक्ष पुरेसे गेले नाही.

काही काळ सार्वजनिक जीवनातून नीतिमत्तेलादेखील खो मिळाला. आणि पक्षाभिमान आणि तात्कालिक फायदा -- दोनच गोष्टी आंधळेपणाने थैमान घालू लागल्या.

राज्यव्यवस्थेत वशिला आणि लाच-लुचपत (corruption) प्रथम-पासून आहेतच. त्याला आळा घालण्याचे काम झाले नाही. इंग्रजांच्या काळी लाच-लुचपत होती पण इतकी नागडी नव्हती. आता तिचेच साम्राज्य सर्वत्र आहे.

सोशियालिजम्च्या नांवाने 'सरकार' या संस्थेचे महत्त्व वाढले, क्षेत्रे वाढली, खर्च वाढला. पण कार्यकुशलता न वाढता पुष्कळ कमी झाली. राष्ट्रापेक्षा राष्ट्रीय सरकार श्रेष्ठ झाल्यामुळे दुर्दैवी जनता दु:खी झाली आहे आणि पक्षापक्षाचे निर्लज्ज राजकारण वाढल्यामुळे राज्यव्यवस्थेत स्थिरता आणि विश्वासपात्रता उरली नाही. हे असे कोठवर चालणार ? स्फोट झालाच पाहिजे. पण स्फोट होऊन चांगली स्थिति येण्याची आशा

नाही. मला भीति वाटते की देशाची एकता टिकणार नाही. तुकडे पडतील आणि लष्करशाहीच्या नावाने गुंडाशाही येईल. आणि मग परदेशी राज्य सुखाने देशात घुसू शकेल. याच्या मुळाशी आपल्या संस्कृतीतील सनातन दोषच आहेत हे कबूल केले पाहिजे.

मुंबई
९–५–७१

उमाशंकर कलकत्त्याला जाऊन आले. संस्कार-संपन्न बंगाली लोकात उमाशंकरचा जसा प्रवेश आहे तसा इतर कोणाचा असेल तर मला ठाऊक नाही. मी शांतिनिकेतनमध्ये असताना क्षितिमोहन सेन यांच्यासारख्या विद्वानांशी माझी उत्तम दोस्ती झाली होती. संस्कृत साहित्याची आवड आणि भारतीय संस्कृतीचा हृदयात गौरव—यामुळे आम्ही जवळ आलो. पण पुढे मी तो संबंध वाढवलाच नाही. एकदा क्षितिमोहन सेन रवींद्रनाथाबरोबर आश्रमात आले होते. त्या वेळी पुन्हा परिचय थोडा ताजा झाला एवढेच.

उमाशंकरबरोबर चिमनलाल चकूभाई शाह आले होते. नंतर वाडीलाल डगळी आले. भेटून आनंद झाला.

वेदांतील 'उच्छिष्ट' शब्द रवींद्रनाथांनी कलेसाठी कसा वापरला, हे मी त्यांना सांगितले. उपयोगितेहून अधिक, ते सर्व 'उत्शिष्ट' दुधाच्या प्याल्यावरील गाईच्या चित्रासारखे.

स्व. परमानंदभाईविषयी एक लेख चिमनभाई चकूभाईंना मी पाठवला होता. परमानंदभाईंचे 'प्रबुद्ध जीवन' ते चालू ठेवणार आहेत. स्वतः संपादक राहणार. मी लेख देण्याचे कबूल केले आहे. परमानंदभाई गेल्यानंतर त्यांचा एवढा अधिकार मला स्वीकारलाच पाहिजे. पजूसण व्याख्यानमालादेखील चालू राहील.

कॉपीराईट ॲक्टची सर्व माहिती कोठे मिळेल असे मी उमाशंकरना विचारले. त्यांनी पटवारीचे नांव सांगितले पण पुस्तक कोठे मिळेल ते ते सांगू शकले नाहीत. मला त्याची जरूर आहे. कोणाला विचारावे ?

श्री. माधवदास पाच-सात महिलांना घेऊन आले. त्यांना मी सांगितले की पुरुषांचे नेतृत्व सोडून, बायकांनी आता मानवजातीचे नेतृत्व आपल्याकडे घेतले पाहिजे. पण हा विचार स्वीकारण्याची हिंमतच स्त्रियां-मध्ये उगवत नाही. शरीर-भेद आणि जीवन-व्यापारातील स्त्रियांचा भाग यामुळे स्त्रियांना वाटते पुरुषांचे श्रेष्ठत्व मान्य केलेच पाहिजे. पशुपक्ष्यांमध्ये असे नाही. पशुपक्ष्यांमध्ये मादी लढाऊ असते. अपत्य रक्षणाची जबाबदारी तिची. म्हणून ती स्वतंत्र आणि तेजस्वी असते—जरी नर शक्तीमध्ये मादी-पेक्षा अधिक असतो.

पण हा बोध स्त्रिया घेतच नाहीत. त्याला इलाज काय ?

मुंबई
१०–५–७१

आज वैशाखी पौर्णिमा. बुद्ध जयंति. माझा आवडता दिवस. संध्या-काळी चंद्रोदय किती तरी आल्हादायक होता. झाडावरच्या फुलांनी चितेला आग लावली होती आणि तिच्या ज्वाळा प्रसन्नता पसरवीत होत्या. तो रंग लाल फुलांमध्ये सर्व रंगाचा समन्वय करून मध्येच पांढऱ्या रंगाचे राज्य खुलवीत होता.

मला मुंबईचा मानव-समुद्र बॅक-बेच्या समुद्राइतकाच आकर्षक आणि शांतिदायी वाटत आला आहे. मुंबईची धावपळ आणि अखंड प्रवृत्ति मला तरी शांतिदायीच वाटली आहे. कारण 'स्वराज्य-नगरी' मुंबईत सर्व प्रांताचे, सर्व धर्माचे आणि सर्व व्यवसायाचे लोक परस्पर प्रेमाने एकत्र नांदत आले आहेत. भारतातील बहुतेक शहरे भूतकालाची स्मारके आहेत. मुंबईत मात्र वर्तमानकाळच प्रधानपणे नांदतो. ज्यांना दृष्टि आहे, त्यांनी येथे भविष्य-काळाचे सुभग दर्शन करावे. मला तर मुंबईच स्वतःचे घर असावे असे वाटते.

बाकीचे अवतार भूतकाळाची आठवण करून देनात. श्रीकृष्णदेखील भूतकाळाला सोडू शकत नाहीत. बुद्ध भगवान् चालू अवतार आहेत

म्हणूनच नव्हे तर हृदयावरील अनेक ओझी दूर करणारे सनातन अवतार आहेत म्हणून मानवतेला सतत प्रेरणा देत आहेत. त्यांचा संबंध विस्तारला आणि मावळला. अजूनदेखील अनेक ठिकाणी जीव धरून आहे. पण बुद्ध भगवान् त्यांच्या संघाहून मोठे तर आहेतच, शिवाय निराळेही आहेत.

माझी बुद्धभक्ति पाहून लंकेच्या साधूंनी विचारले 'तुम्ही बौद्ध कां होत नाही ?' मी म्हणालो "बुद्धाला आणि 'धम्मा'ला मी शरण गेलोच आहे. संघाला शरण जाऊ शकत नाही. अशा स्थितीत मला बौद्ध करून घेता का ?" विचार करून ते म्हणाले "लाचार आहोत. तुम्हाला घेऊ शकत नाही." असा मी अलौकिक बौद्ध आहे. माझा मध्यम मार्ग शांतिदायी. प्रागतिक आहे. तो प्रतिष्ठा देऊ शकत नाही, हाच मोठा लाभ.

मुंबई
११-५-७१

नाशिकचे सर्वोदय संमेलन फार महत्त्वाचे होते. भूदान, ग्रामदान आणि शांतिसेना—या तीन महत्त्वाच्या प्रवृत्ती इतकी वर्षे चालल्या आहेत ते उत्तम झाले. त्यांची पुष्टि झाली पाहिजे हे इष्ट आहे.

पण बापूजींचे इतर कार्यक्रम विसरले गेले हा दोष सुधारण्यासाठी नाशिकचे संमेलन होते. नेमके तेवढेच काम झाले नाही. पुष्टीच्या कामाचा संकल्प पुन्हा मजबूत केला हे एक आणि पूर्व बंगालचा प्रश्न समजावून सांगणारे एक योग्य आणि कुशल गृहस्थ आले—त्यांना जयप्रकाशनी पुढे केले-हे दुसरे काम. या दोन कामांनी नाशिकचे संमेलन व्यापून टाकले. झाले त्याचा फायदा होईलच पण गांधीकार्यातून गांधीच विसरले जात आहेत यावर इलाज झाला नाही.

सत्याग्रहाची चर्चा झाली. पण ती यांत्रिक झाली. न झाली असती तर बरे झाले असते.

सगळ्या राष्ट्रीय प्रवृत्तीतून नैतिकता गायब होत आहे. यांत्रिकता आणि उथळता शिरत आहेत, इकडे कोणाचेच लक्ष जात नाही.

श्री. सिद्धराज ढढ्ढांना कबूल केल्याप्रमाणे माझी दृष्टि मी संमेलनापुढे मांडली आणि संमेलनाने माझी सूचना संघाकडे रीतसर सोपवून दिली. धन्यवाद !

संध्याकाळचे दोन तास फिरोजा आणि सिल्ला यांना दिले. त्या दोघी तासभर उशीराने आल्या. विचारविनिमय झाला याचा त्यांना संतोष झाला, पुष्कळ झाले.

जगदीश वोरा भेटले हे चांगले झाले. ते जेथे जातात तेथे जिवंतपणे काम करतात. गोव्याच्या कोकणीचा प्रश्न त्यांना पटला याचे आश्चर्य वाटले आणि आनंदही वाटला.

हिंदी जगत् 'अनुवादा'चा प्रश्न सोडवील तर किती उत्तम. पण सरकारमार्फत हे काम यांत्रिक पद्धतीने होऊ लागले आहे. मी त्यांना सुचवले आहे की, "हाच प्रश्न घेऊन पुढे चला." त्यांना माझी सूचना पटली आहे. माझ्या मदतीची अपेक्षा करतात.

मुंबई
१२–५–७१

ज्या दिवशी पुष्कळ लोक भेटावयाला येतात, तेव्हा पुष्कळदा महत्त्व नसलेल्या तुच्छ गोष्टींची चर्चा होते. वेळ फुकट जातो. तरीहि तऱ्हेतऱ्हेचे पुष्कळ लोक भेटतात हे मला आवडते.

यात सामान्य सामाजिक आनंद जो होत असतो त्याचे मला आकर्षण नाही. पण निरनिराळ्या क्षेत्रात असणाऱ्या, अगदी निरनिराळी कामे करणाऱ्या आणि भिन्न भिन्न रस असणाऱ्या लोकांना आत्मीयतेने भेटत असताना मला जीवनसमृद्धीचा आंतरिक आनंद होतो आणि त्या लोकांना कल्पनाहि नाही अशा विविधतेत रममाण होऊन मला अत्यंत खोल असा चिंतनात्मकहि आनंद होतो.

लहानपणी गावातील निरनिराळ्या मंदिरात जाऊन त्या त्या मूर्तींचे

दर्शन घेत असता विविधतेचा जो आनंद मिळत असे तोच आनंद घरबसल्या येऊन भेटणाऱ्या लोकांच्या दर्शनाने आणि परिचयाने होत असतो.

आणि परमात्मा किती भिन्न भिन्न रूपांनी दर्शन देत असतो याची कल्पना होऊन त्या सर्वाधिष्ठित परमात्म्याविषयी उपकृत भाव जागृत होतो.

हा आनंददेखील जीवनाचे एक पौष्टिक पोषणच आहे.

तेव्हा वेळ गेला तर जावो, (नाही तरी वेळ जाण्यासाठीच येत असतो) पण ईश्वरदर्शन घडत आहे, याहून वेळेचा अधिक चांगला उपयोग कोणता असे समाधान मनात उठते.

केव्हा केव्हा प्रश्न उठतो की इतरांनादेखील असाच आनंद मिळत असेल काय ? सर्वांना असा भरीव आनंद मिळत नसतो, पण कित्येकांना अगदी माझ्याप्रमाणे आनंद मिळत असेलच. त्यांना सत्पुरुष म्हणण्यात मी स्वतःकडे तेच विशेषण घेत आहे, इकडे लक्ष गेले तरी त्यांना सत्पुरुष म्हटल्यावाचून कसे रहावेल ?

मुंबई
१३–५–७१

आसामचा एक कार्यकर्ता निर्मलकुमार बडा (आहे लहानशीच मूर्ति) चांगले काम करतो. मिरझापुरला आश्रम चालवतो, कोल भिल्ल वगैरे लोकांमध्ये. मी त्याला सांगितले, 'बाबारे, सगळेच लोक समाजाची आर्थिक स्थिति आणि राजकीय स्थिति सुधारण्याच्या पश्चिमी योजना घेऊन काम करतात. थोडे लोक ग्रामोद्योगाची आणि ग्राम-संघटनेची योजना बोलतात. पण देशाची हार्दिक आणि सांस्कृतिक एकता संकटात आहे इकडे कुणीच लक्ष देत नाहीत. इलाजहि करत नाहीत. तू आता जोराने सांग की कुणीहि स्वतःच्या जातीत लग्न करू नये. लग्ने भिन्न जातीतच व्हावीत. आणि जातीचे फंड, जातीच्या संस्था वगैरेतील अर्धा भाग मागासलेल्या जातीच्या उपयोगी पडावा.

एकमेकांच्या हातचे पाणी पिऊ लागले आहेत—असल्या लहान

सुधारणांनी आपण संतुष्ट होऊ नये. हिंमतपूर्वक क्रांति पुढे नेली पाहिजे. लोकांना खेचून पुढे नेले पाहिजे. तरच थोडेफार लोकात ते कायमचे उतरेल.' त्याला हे पटले.

उद्योगपति श्रीपाद राव यांना भेटण्याशी इच्छा होती. गुलवाडी त्यांना घेऊन आले. त्यांची परिस्थिति मला काहीच ठाऊक नव्हती. आतून प्रेरणा झाली आणि मी म्हणालो, "खाजगी संपत्ति ही संस्था जगातल्या सगळयाच लोकांना स्वाभाविक आणि यथार्थ अथवा योग्य वाटते. तिच्या ठिकाणी ट्रस्टीशिप (निधिपालत्व) आणावयाचे आहे असे करताना 'मालकाला' पुष्कळ discretion द्यावे लागेल. तशा संतोषावाचून तो अपरिग्रही होणार नाही, ही एक गोष्ट आणि तुमच्या या सर्व सुधारणेत स्त्रीजातीला आग्रहाने बरोबर घेतले पाहिजे ही दुसरी गोष्ट. ट्रस्टीशिप ही एक नवी जीवन-व्यवस्था आहे. ती अमलात आणताना तिचे व्याकरण घडवावे लागेल ते स्त्रियांच्या हातून घडविण्याचा प्रयत्न केला तरच स्त्रिया आपल्या मताकडे वळतील." हा दुसरा लाभ.

राव म्हणाले, "माझ्या जीवनातील सगळयात मोठा प्रश्न तुम्ही छेडला आहे. माझ्या पत्नीला माझे विचार पटवू शकत नाही–इतर स्त्रियांना काय पटवणार ?" मी म्हणालो, "पत्नी पत्नी आहे म्हणूनच तिला तुमचे विचार सर्वांत शेवटी पटतील. निराश होऊ नका. तुमच्या कामात, तुमच्या सहकाऱ्यांच्या पत्न्यांना खेचा. स्त्रियांना जर तयार न केले तर सर्वत्र अर्धांग वायु पसरेल. हे संकट टाळलेच पाहिजे. रस्ता कठीण आहे. पण दुसरा उपाय शक्य नाही."

मुंबई
१४–५-७१

मला माझ्या पित्याकडून जन्म मिळाला. शरीर, त्याचे पोषण आणि लहानपणाचे सर्व संस्कार वडिलांकडून मिळाले. वंशपरंपरा आणि तीतील कुलधर्म त्यांनीच समजावून सांगितला. मला ते ईश्वराइतके पूज्य. देवाची

कल्पना आणि देवाची भक्ति त्यांनीच दिली. त्यांच्याबरोबर बसून देवाची पूजा करू लागलो. त्यांच्याबरोबर तीर्थयात्रा केली. शिवरात्रीचे उपवास केले. दानधर्म त्यांनीच शिकवला.

पुढे धर्मशास्त्राने सांगितले, "मातृदेवो भव, पितृदेवो भव." तेव्हा जगात मला अत्यंत पूज्य व्यक्ति माझे वडील. सकाळी उठून त्यांचे दर्शन घ्यावे, त्यांच्या पाया पडावे, असा रिवाज मी पुष्कळ वर्षे चालवला.

म्हणून काय मी जगाला सांगू की तुम्हीदेखील माझ्या वडिलांना माझ्याप्रमाणेच पूज्य माना ? जगाच्या दृष्टीने माझे वडील समाजातील एक सामान्य पुरुष. त्यांच्यात असामान्य असे काहीच नाही. असंख्य नागरिकांपैकी ते एक. ही गोष्ट मी कशी विसरावी ?

आपल्या समाजात पुष्कळ लोक कुणाला तरी गुरु करतात. त्यांच्याकडून मंत्र घेतात. गुरुदीक्षा घेऊन गुरुदक्षिणा देतात. त्यांचे चित्र ठेवून पूजा करतात. कुटुंबातील सर्वांना सांगतात, "हे आपले गुरु, यांची ईश्वर समजून पूजा केली पाहिजे."

पण एवढ्याने भागत नाही. आपल्या गुरूचा ते प्रचार वाढवतात. जगातील सर्वांनी माझ्या गुरूंना पूज्य मानले पाहिजे, सर्वच माझ्या गुरूचे शिष्य व्हावे. प्रत्येक शिष्य आपल्या गुरूंनी केलेले चमत्कार सांगतात आणि लोकांना सुचवतात की माझ्या गुरूंना शरण जा. तुमचे कल्याण होईल.

आज समाजात असंख्य गुरूंचा त्यांच्या दशपट, शतपट शिष्यांकडून प्रचार होत आहे.

मी माझ्या वडिलांच्या पूज्यतेची मर्यादा जाणतो. त्याप्रमाणे हे लोक आपल्याला गुरूची मर्यादा स्वत:पुरती मर्यादित कां ठेवीत नाहीत ? एखादी पतिव्रता पतिभक्तीमुळे इतर स्त्रियांना सांगत नाही की माझा पति इतका उत्तम आहे की त्याचा तुम्हीदेखील माझ्याप्रमाणे स्वीकार करा.

मुंबई
१५–५–७१

जवळ जवळ एक महिन्यापूर्वी माझी प्रकृति विनाकारण बिघडली.

आज चि. सरोजची प्रकृति अशीच विनाकारण आणि एकाएकी बिघडली. डोक्यात चक्कर, पोटात ढवळणे आणि जवळजवळ कोऱ्या उलटघा. अशोकने तपासून ठरवले की food poisoning असावे. हे खरे कसे मानावे ? या दिवसात चि. सरोज बाहेर जेवायला गेली नव्हती. घरचे अन्न आपण सगळेच खातो. असो. काहीतरी कारण शोधून लावलेच पाहिजे.

तिची सेवा करण्याची मोकळीक मला नाही ! प्रयत्न केला तर रागे भरून घ्यावे लागेल. तेव्हा शहाणा होऊन गप्प बसलो.

आणि आजच संध्याकाळी फिरावयाला जावयाचे मंजू-अवनींना[१] कबूल केले होते. पहिल्याच दिवशी विघ्न आणणे इष्ट नव्हे असे म्हणतात. द्वितीय अनध्यायदेखील 'अशुभ' म्हणतात. हा सगळा विचार करून फिरायला जायचे ठरविले. आम्ही नरीमन पॉइन्टकडे गेलो. आकाशात उजव्या बाजूला पांढऱ्या ढगातून सप्तर्षि डोकावत होते. मी मंजूला अत्रि (तीन नव्हे तो), वसिष्ठ आणि अरुंधती यांचा परिचय करून दिला.

चि. मंजू एकदा माझ्याबरोबर जपानला आली होती. रेवती[२] आणि मंजू सगळा दिवस आणि रात्र एकमेकींच्या सहवासात. कारण असो वा नसो सगळा वेळ हसत असावयाच्या. जपानच्या यात्रेचा आनंद अधिकाधिक या दोघींनीच मिळवला. ते दिवस आठवले. उद्या अवनीचे बंधु हाँगकाँग, जपान, फिलिपाईन, कोरिया वगैरे देशात धंद्यासाठी जाणार. (उद्या रात्री दोन वाजताना म्हणजेच परवाच्या पहाटेपूर्वी).

चि. सरोजची सहन करण्याची शक्ति विलक्षण आहे. दुःख सहनहि करते आणि दुसऱ्यांची काळजीहि करते. तिच्या वडिलांचा स्वभाव असाच होता काय ? संस्कार रक्तातून उतरतात. तसेच सहवासानेदेखील पोसले जातात.

चि. सरोजच्या वडिलांना मी एकदाच पाहिले होते. विलायतेला जाण्यापूर्वी आमचे प्रिन्सिपाल--रँगलर परांजपे यांना भेटून जाण्यासाठी आले होते. आमच्या शेजारच्या खोलीत उतरले होते, म्हणून त्यांची आठवण

---

[१] श्री. अवनि मेहता आणि त्यांच्या पत्नी.

[२] डॉ. बाळ कालेलकर यांच्या पत्नी (आता स्वर्गवासी).

राहिली. त्या वेळी सरोजचा जन्महि झाला नव्हता. कल्पनेतदेखील नसणार. त्या वेळी जर कुणी आम्हा दोघांना एकत्र बसवून भविष्य सांगितले असते तर ते खरेहि वाटले नसते. पण देवाच्या घरचे चमत्कार ज्योतिषाच्याहि पलीकडचे असतात.

मुंबई
१६–५–७१

अनुभवावाचून सत्याचा स्वीकार करायचा नाही. तोवर "वस्तु खरी असेल कदाचित्" इतक्यापर्यंतच जायचे. अशा वृत्तीला श्रद्धा म्हणता येईल. इंग्रजीत हिला हायपोथेसिस (Hypothesis) म्हणतात. संस्कृतमध्ये अभ्युपगम.

आता पूर्ण अनुभव होवो किंवा न होवो, कित्येक जीवनसिद्धांत आपण स्वीकारतो, श्रद्धेच्या जोरावर. ही श्रद्धा निराळी. लाभ होवो किंवा हानि होवो सत्याला सोडणार नाही, आत्म्याच्या प्रेरणेला दगा देणार नाही. ईश्वराला सर्वस्व अर्पण करीन. शुद्ध प्रेमाने प्रेरित निःस्वार्थ सेवाच जीवनाला धन्य बनवते, इत्यादि प्रेरणा श्रद्धामूलक आहेत. या श्रद्धा आत्म्याच्या प्रेरणेतून मिळाल्या आहेत. सत्यनिष्ठा, प्रयोगनिष्ठा, अनुभवनिष्ठा यांनाच जीवन सर्वस्व अर्पण करायला आपण तयार होतो. ते या सर्वश्रेष्ठ श्रद्धेच्या बळावर.

बाकी सत्यनिष्ठा सांगते की श्रद्धेलाच सत्य मानू नकोस. श्रद्धा म्हणजे openness of mind असा अर्थ डॉक्टर भांडारकरांनी केला आहे तोच खरा.

विज्ञानाच्या प्रयोगनिष्ठेच्या मुळाशी एकप्रकारची अश्रद्धा वृत्ति असते. पूर्ण पुरावा मिळून खात्री होई तोंपर्यंत मी स्वीकारणार नाही. वाटेल ते होवो, नाही म्हणजे नाही या विज्ञानाच्या वृत्तीनेच जगाची प्रगति झाली आहे. अविश्वासापेक्षा विश्वास चांगला ही नैतिक वृत्ति आहे. हिला आंधळी करण्यामध्ये भयंकर जोखम आहे. म्हणून सत्यनिष्ठ मनुष्य म्हणतो–

अश्रद्धा पुरवली. पण भोळी श्रद्धा नको. प्रयोगनिष्ठेला बाधक अशी श्रद्धा आणि अश्रद्धा दोन्ही त्याज्य आहेत. सत्यनिष्ठा, प्रयोगनिष्ठा आणि अनुभवनिष्ठा यांना आपण निष्ठात्रय म्हणू. या निष्ठात्रयाचे जे भांडवल तीच परमश्रद्धा. ती आपली जीवन-प्रेरणा आहे. बाकी सर्वत्र openness of mind हीच सामान्य श्रद्धा. ग्रंथनिष्ठा, वचननिष्ठा, व्यक्तिनिष्ठा या तिन्ही प्रगतीला बाधक होतात. प्रयोगनिष्ठेला मारतात आणि सरतेशेवटी आत्मनिष्ठेला बाधक बनतात. अध्यात्मविद्या, मंत्रविद्या, फलज्योतिष इत्यादी शास्त्रे सध्या निष्प्राण आणि म्हातारी झाली आहेत. जीवनातील तेजस्विता नष्ट झाली, प्रगति थांबली. सत्यनिष्ठा शिथिल झाली आणि अशी ही नास्तिकताच आस्तिकता म्हणून नांदू लागली. केवढे मोठे संकट ! आपण मृत्यूचे उपासक बनलो.

मुंबई<br>१७-५-७१

कॉलेजच्या दिवसात जेव्हा तरुणांना मिशी फुटते, तेव्हाच कवितादेखील फुटत असते. मला प्रथम इंग्रजी कवितेची गोडी लागली. त्यानंतर संस्कृत. आणि या दोन भाषेतील कवितातील काव्य चाखण्याची शक्ति आल्यानंतर मराठी कवितेतील गोडी समजू लागलो. इंग्रजी आणि संस्कृतची दीक्षा मिळाली नसती तरी मराठी कविता आवडल्या असत्या; पण कवितांचे माधुर्य, सौंदर्य, संगीत आणि हृदयाला हालविण्याची शक्ति मी पकडू शकलो असतो की नाही, याविषयी शंका आहे. संस्कृतने मला भाषेच्या उच्चारणाचे सौंदर्य शिकवले. संस्कृतच्या छंदांचे मला वेडच लागले. प्रत्येक छंदात मी संस्कृत ओळी केल्या होत्या. व्याकरणाच्या चुका असतील पण छंदाची एकहि चूक नाही. (या बाबतीत कित्तूर मास्तरांचा मला फार उपयोग झाला आणि इंग्रजीत चंदावरकरांचा. मगच मी मराठी कविता करू लागलो.) इंग्रजीतदेखील थोड्या कविता केल्या होत्या, पण त्यात राम नाही असे ध्यानात आल्याबरोबर त्या फाडून टाकल्या. (तात्या सावरकरांनी माझ्या इंग्रजी कविता वाचल्या होत्या आणि त्यांनी माझ्या-

विषयी बोलताना माझ्या इंग्रजी कवितांचा उल्लेख केला होता. पण तो उल्लेख औपचारिक होता, हे ओळखण्याइतकी जागरूकता माझ्यात होती.) मला वाटते मी मराठी कविता शेवटी लिहिली ती साबरमती जेलमध्ये. कविता स्वतंत्रता देवीविषयी होती. इंग्रजांना माझे स्वतंत्र विचार सहन झाले नाहीत म्हणून त्यांनी मला बंदिवासात घातले, म्हणजेच माझ्या स्वातंत्र्याची कदर केली. मी जेलच्या बाहेर होतो तेव्हा ब्रिटिश राज्याचा नागरिक म्हणजे गुलाम होतो. माझी तेजस्विता सहन न झाल्याने सरकारने मला बंदीत घातले, त्याच क्षणी मी स्वतंत्र झालो. त्या कवितेतील एकच ओळ आज आठवते–प्राप्ति परी त्वदीय जाहली बंदीवासी. यापूर्वी मी एक सुंदर कविता पाठ केली होती– 'सांग कुठे पाहु तुला, सखि स्वतंत्रते ! जनिविजनी सांग कुठे रमसि सुव्रते'. कदाचित् ही कविता नारायण वामन टिळकांची असेल आणि ती एका इंग्रजी कवितेचे भाषांतर असेल. ती कविता ख्रिस्ती होती. मला पुष्कळ आवडली होती. तिची पूर्ति जेलमध्ये या कवितेत अशी केली की 'बंदिवासात पोहोचून मी खरोखर मनाने जगापुढे स्वतंत्र झालो होतो.' मी ब्रिटिश राज्य मानीत नाही, ही गोष्ट जाहीर करीत करीत मी बंदिवासात गेलो. शरीर बंदीत पडलेले पण बाकीचा सगळा मी पूर्ण स्वतंत्र असल्याचे जगाला जाहीर झाले. ही माझी मुक्ति त्या कवितेत होती.

मुंबई

१८–५–७१

मला वाटते गुरुदेव रवींद्रनाथात आणि माझ्यात एवढे एक साम्य आहे, आम्ही अगदी लहानपणापासून मरणाचे सख्य स्वीकारले आहे. (अगदी लहानपणी मृत्यूची भयानक चित्रे ऐकून रात्री झोप येत नसे, तो काळ सोडून दिला पाहिजे.) मरण ही काही शिक्षा नव्हे आणि पापाचे फळहि नव्हे. कारण मरण सर्वांनाच येते, हा माझा अगदी पहिला विचार. मरण मोठी सोय आहे. जीवनाला पुनः पुनः ताजेपणाची दीक्षा मिळते. हाहि विचार मला प्रिय होता.

मरणाविषयी मी पुष्कळ लिहिले आहे. यापुढेहि लिहीन. कालसमुद्राच्या काठी ताऱ्यांच्या दृष्टीखाली अवनीने विचारले: 'मरणानंतर काय होते ?' हा प्रश्न जुना होता. दुसरा प्रश्न जैनांनी छेडला आहे—'जर जीवांची संख्या परिमित आहे तर लोकसंख्या कशी वाढते ?' दोन्ही प्रश्नांची उत्तरे मी एकत्र करून दिली. परमात्म्याला आपण जर महासागर म्हटले आणि लहान मोठी भांडी समुद्रात बुडवून बाहेर काढली तर त्यातून निरनिराळ्या आकाराचे कमी अधिक खारे पाणी यांना जीवात्मा म्हणता येईल. मेल्यानंतर फक्त शरीर जाते. सूक्ष्म देह आणि कारण देहदेखील टिकतात, याची खात्री नाही. एकच मनुष्य (त्याचे संस्कार) निरनिराळ्या गर्भात शिरून अनेक जीवनातून पुनर्जन्माचा अनुभव घेऊ शकतील.

मनुष्य मेल्याबरोबर ताबडतोब दुसरा जन्म घेईल अथवा पुष्कळ काळ वाट पाहून संकार परिपक्व झाल्यानंतर, हजारो वर्षानंतरदेखील जन्म घेईल जनावरे मेल्यानंतर मनुष्ययोनीत येऊ शकतील (आणि तरीहि कित्येक पशुवृत्ति सोडू शकणार नाहीत.) पश्चिमेचे कित्येक लोक विकासवादी विचाराने ठरवतात की मनुष्यजन्म आल्यानंतर जीव पुन: पशुयोनीत जाणार नाही. या बाबतीत माझा निश्चय नाही. जीवात्म्यांची संख्या परिमित असण्याचे कारण नाही आणि परमात्मा अनंत आहे.

एक जीवात्मा मरणानंतर मोडून जाईल आणि निरनिराळ्या जीवात्म्यांचे संस्कार एकत्र होऊन नवीन जीवात्मा उत्पन्न होऊ शकेल.

आज या साऱ्या कल्पनाच आहेत. त्या शक्य कोटीतील असाव्यात एवढेच म्हणता येईल.

मुंबई

१९–५–७१

'आपण तुच्छ प्राणी ! आपण जगात सुधारणा काय करणार ? भगवंतानेच अवतार घ्यावा. तोपर्यंत आपण प्रार्थना करू आणि वाट पाहू.' अवतार येतो तेव्हा फार थोडे लोक त्याला 'अवतार' म्हणून ओळखतात.

बाकीचे त्याचा विरोधहि करतात. आपण अवताराच्या बाजूला राहू शकलो तर आपले धन्यभाग्य. निदान विरोध न करता गप्प बसलो तर तेवढेच पुण्य. बाकी पापी लोक पाप वाढवून अवताराला लवकर यावयाला भाग पाडतात एक प्रकारचे पुण्य नव्हे का ?

अशा तऱ्हेचे 'वाद' समाजाला पराक्रम-शून्य बनवतात. 'संत सत्पुरुष चमत्कार करून दाखवतात. त्यांचे उष्टे, प्रसाद म्हणून खावे. आपण संत थोडेच होणार ? संतांची पूजा करू, त्यांचे माहात्म्य गाऊ यातच आपल्या जीवनाची कृतकृत्यता आहे ' ही झाली नेमकी भक्ति.

तिसरा प्रकार–ज्ञानाची, ध्यानाची, योगाची आणि भक्तीची साधना करून, साक्षात्कार झाल्याचा दावा करणे. चमत्काराच्या क्षेत्राशी दोस्ती असलेला हा एक प्रकार आहे. "साक्षात्कारी" लोक समाजावर राज्य गाजवितात. "सामान्य नीतिनियम आम्हाला बाधत नाहीत. कर्मयोगाशी आम्ही खेळू पण तो योग आमच्यासाठी नाही." असे म्हणणारा वर्ग समाजातून अनुयायी मिळवतो. भक्तांच्या सेवेचा फायदा घेणे हा एक प्रकार आणि समाजात यांच्यासारखेच दुसरे "साक्षात्कारी" पुरुष असतात त्यांचा हेवा करणे, हे याचे दुसरे काम. यांच्या भक्तांचीही कामें दोन !– स्वतःच्या गुरूचा बेसुमार प्रचार करणे आणि इतर गुरूची साधेल तितकी निंदा करणे.

हा आहे आजच्या धर्मसमाजाचा आढावा. असा प्रकार अखंड चालत असतो. आणि हे म्हणे आपल्या राष्ट्राचे आध्यात्मिक जीवन !

लोक मधूनमधून यात्रा करतात, सत्संग शोधतात. यात मुख्य उद्देश पवित्र स्थाने, भारलेली स्थाने (जागती स्थाने) यांचा शोध घेणे. निरनिराळ्या पंथांची आंतरिक माहिती घेणे आणि मग निंदास्तुतीच्या वृत्तीला पोषण देणे.

चार धामाची यात्रा करून आलेल्या लोकांना पुरेसा वेळ द्या. प्रथम काही वेळ स्वतःची धन्यता, भेटलेल्या सत्पुरुषांची स्तुति आणि पुढचा कार्यक्रम एवढ्या प्राथमिक गोष्टी संपल्या म्हणजे निंदास्तुतीला ऊत येतो। आणि मग सगळेच समाजाच्या सामान्य पातळीवर येऊन पोहोचतात.

मुंबई
२०-५-७१

काल डॉ. माधवदास भाईंनी सांगितले की सरकारचा विचार खादी-कमिशन ग्रामोद्योगाच्या ताब्यात देऊन सर्व काही सरकारी करून टाकण्याचा आहे. आणि म्हणून ढेबरभाईंनी खादी-कमिशनच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचे ठरविले आहे.

हे ऐकून माझे मन अस्वस्थ झाले. सरकारने खादी-कमिशन नेमून खादी कार्याला प्रोत्साहन दिले, हे चांगले झाले होते. पण तेव्हाच भीति वाटली होती की राष्ट्रीय काम सरकारी होऊन जाणार की काय ? पण 'ढेबरभाई अध्यक्ष आहेत तेव्हा खादी सुरक्षित आहे.' असे मनाचे समाधान करून घेतले. आता ढेबरभाईच निराश होऊन राजीनामा देतात, याचा अर्थ खादी सरकारी होणार ! सगळा दिवस याचाच विचार केला. संध्याकाळी माझा नवा विचार माधवदासना सांगणार होतो पण ते आले नाहीत. तेव्हा विचार येथे लिहून ठेवलेला बरा.

ढेबरभाईंनी राजीनामा देऊ नये. उलट, खादी-कमिशन सरकारच्या तंत्रातून शक्य तितके मुक्त करावे. असे केल्यामुळे सरकारी ग्रँट बंद होईल किंवा कमी मिळेल. तसे झाल्यास कार्यकर्त्यांनी पगारात थोडी कपात करावी. (खालच्या कार्यकर्त्यांच्या पगारात कपात होऊ शकणार नाही, हे स्वीकारले पाहिजे.) कमिशनमधील कार्यकर्त्यांची संस्था थोडी कमी करावी लागेल त्यालाहि तयार व्हावे. पण खादी-कमिशन सरकारी तंत्रात विलीन न होता, सार्वजनिक संस्था म्हणून टिकले पाहिजे. माझी दुसरी सूचना याला जोडूनच आहे, की आज मिलच्या सूतातून तयार केलेले हातमागाचे कापड स्वदेशात आणि परदेशात खूप लोकप्रिय आहे. याला मी अर्धी खादी म्हणतो.

हे अर्ध्या खादीचे खातेदेखील खादी-कमिशनच्या हाती आले पाहिजे आणि राहिले पाहिजे. माझ्या सूचनेचा हा मुख्य भाग आहे.

आपल्या देशात अर्धी खादी टिकणार यात शंका नाही. पण तिने स्वत: जगून पूर्ण खादीला जगवले पाहिजे. हेच तिचे जीवनकार्य आहे.

अर्ध खादीच्या जोरावर पूर्ण खादीला टिकवले पाहिजे. जगात यंत्रोद्योग वाढत आहेत. त्यांना आज आळा घालता येणार नाही. यंत्रोद्योगाची पूर्ण वाढ झाल्यानंतर त्याची मर्यादा कळून येईल. आणि मग पूर्ण खादी वाढू लागेल. तरीहि शंभरवर्षे (किंवा कमी) अर्धी खादी आणि पूर्ण खादी एकत्र जगणार हे ओळखून खादी प्रवृत्ति सरकारच्या हातून घेतली पाहिजे. आणि ती पूर्ण सार्वजनिक झाली पाहिजे.

मुंबई
२१–५–७१

आपल्या समाजातील तरुण मुलामुलींना भेटण्याची आवश्यकता आहे. आदरामुळे आणि संकोचामुळे ते बोलत नाहीत. पण जर त्यांना बरोबरीचे मोकळे वातावरण दिले तर केव्हा केव्हा स्वतःचे हृदय उघडे करू शकतात आणि शंकाही विचारू शकतात. आज अवनी-मंजूचा मुलगा प्रदीप भेटला. आई येणार म्हणून जरा लवकर आला होता. मी त्याला ओळखू शकलो नाही. थोड्या प्रयत्नाने त्याची वाणी खुलली. म्हणाला : 'तुम्ही संस्कृत भाषा शिकण्याचा इतका आग्रह करता. अशी मृत भाषा शिकून फायदा काय? निष्कारण श्रम कां घ्या?' देशी भाषांचा आग्रहदेखील त्याला अस्थानी वाटला. दोन्ही बाबतीत त्याला विस्ताराने सांगितले. बापड्याला सगळी दृष्टीच नवी होती! मी सांगितले ते येथे लिहिण्याची आवश्यकता नाही.

माधवदास भाईंच्या अगोदर आलेली नीति रतनसीदेखील जीवनाचे प्रयोजन समजू इच्छित होती. तिला, आधुनिक मनाला पटेल, अशा रीतीने विकास आणि उन्नति हेच जीवनाचे हेतु आहेत, हे संगतवार विस्ताराने सांगितले. मनुष्यप्राण्याला जी इंद्रिये मिळाली आहेत, त्याचे महत्त्व आणि प्रत्येक इंद्रियाची– पोहोच (Range) कोठवर आहे त्याची कल्पना दिली. दृष्टि नवी असली म्हणजे या तरुण लोकांचे डोके प्रथमच चालू लागते.

खादी कमिशनचे जगदीशनारायण वर्मा लेख लिहून घेऊन गेले.

कालचे चिंतन माधवदास भाईंना सांगितले होते. तेच लिहून दिले. जगदीश नारायण खादीकार्यात अठरा वर्षे काम करीत आहेत.

परवा मणि भुवनमध्ये प्रार्थनेसाठी येण्याचे आमंत्रण देण्यासाठी आमचे जावई श्री. गुलाम रसूल कुरैशी स्वत: आले होते. त्यांना भेटताच चि. सरोजला जुन्या सगळ्या गोष्टी आठवल्या. त्याची मला मदत पुष्कळ झाली. हिंदु-मुस्लिम ऐक्य हार्दिक आणि जीवन-प्रेरित असले पाहिजे. चि. अमीनाची आठवण झाली आणि माझे मन भारावून गेले.

चि. पुष्पाच्या[१] बंधूच्या घरी प्रार्थना आणि प्रसाद याचा आनंद मिळाला. माझ्या मते मीनाबेन[२] आदर्श महिला आहे. पूर्ण हिंदु झाली आहे आणि तरीहि ख्रिस्ती राहिली आहे. येथे पूर्णपणे शाकाहारी. माहेरी जाते तेव्हा तिकडील आहार घेण्यास संकोच नाही. आम्ही तात्त्विक सिद्धांत बोलत राहतो. प्रवीणभाई आणि मीना ते सिद्धांत, बेमालूम, जीवनात एकरूप करून टाकतात. भारतीय संस्कृति अशांच्या द्वाराच विकसित होते.

मुंबई
२२–५–७१

आज पुरुषोत्तम गांधी, चि. विजया आणि चि. कल्पक भेटल्याने आनंद झाला. पुरुषोत्तमने वडिलांचे काम व्यवहार बुद्धीने चांगले चालवले आहे. चि. अरुणा कॅनडाला परत गेली. भेटली असती तर फार आनंद झाला असता.

वसंतरावाशी[3] माझ्या साहित्याविषयी पुष्कळ बोललो. त्यातून फारसे निघेल असे वाटत नाही. पण शेवटचा प्रयत्न करून पाहिला पाहिजे. काही होणे शक्य असेल तर हीच वेळ आहे. कोंकणीविषयीदेखील काही होईल अशी खात्री नाही. शेवटी प्रश्न पैशाचा आणि लोकरुचीचा आहे. मला विश्वास आहे की काळानंतर माझ्या साहित्याची कदर होईल.

---

१ पुष्पा जोशी. शिक्षिका.

२ पुष्पा जोशींच्या भाभी.

3 वसंतराव बोरकर.

चि. मंजूला लेखन करण्याविषयी उत्साहित केले. पाहू, काही होते का.

चि. चंदनला कमी प्रोत्साहित केले नव्हते. पण ही वृत्ति आतूनच उगवली पाहिजे.

आजचा खरा आनंद जुहूचा समुद्र पहावयाला मिळाला आणि त्या-बरोबर पू. बापूजींचा येथील किनाऱ्यावरील सहवासाचा आनंद आठवला. त्या वेळी भारताला स्वतंत्र केलेच पाहिजे, एकदा भारत स्वतंत्र झाला म्हणजे भारताची बुद्धिशक्ति, हृदयशक्ति आणि कार्यशक्ति जोराने जागृत होतील आणि भूतकाळापेक्षा अद्‌भुत उत्कर्ष भारत करून दाखवील; अशी स्वप्ने आम्ही पाहत होतो. लहानपणापासून ज्या ज्या महत्त्वाकांक्षा हृदयात साठविल्या होत्या आणि भारतीय संस्कृतीचे उज्ज्लतम रूप हृदयात चित्रित केले होते ते सर्व खरे ठरणार अशा विश्वासाने आम्ही सर्व प्रवृत्त झालो होतो. गांधींचे विभूतिमत्त्व हेच भारताचे विभूतिमत्त्व आहे अशा विश्वासाने आम्ही कार्यशील झालो होतो.

जर गांधींनी काँग्रेसचा हात धरला नसता तर स्वराज्य मिळाले नसते. आजही याविषयी शंका नाही. पण काँग्रेसने खऱ्या गांधींना पूर्णपणे आपलेसे केलेच नव्हते. देशातील सर्वोच्च राजकारणी पुरुष पश्चिमी विद्येचे शिष्यच नव्हे तर दास झाले होते. त्यांनी गांधींच्या शक्तीचा स्वीकार केला. आणि आत्म्याचा इनकार केला. आता ती शक्तिही कोठे दिसत नाही आणि गांधी-आत्मा नवे कलेवर शोधत आहे. माझी आस्तिकता म्हणते की तसे कलेवर तयार झालेच पाहिजे. जगाला त्याची गरज आहे. आपण आता त्या कलेवराची पूर्वतयारी करावयाची आहे.

मुंबई
२३–५–७१

शेवटी पुंडलीकजी आज भेटले, गंगाधररावांच्या गावी दर वीस वर्षांनी लक्ष्मीचा उत्सव होतो. १९११ साली तो उत्सव जुन्या पद्धतीने पार पाडला. त्यानी स्वत: दहा-बारा हजार रुपये खर्च केले. रेडा मारला, बकरी, कोंबडी

असंख्य मेली. गाव खुश झाला. वीस वर्षांनी (१९३१) गंगाधरराव गांधी-मताचे झाले होते. त्यांनी प्राणिहत्या बंद केली. रेड्याऐवजी पाच नारळ, बकऱ्या ऐवजी तीन नारळ, कोंबड्याऐवजी दोन आणि कबूतर पारव्या-ऐवजी एक – अशी व्यवस्था केली. आसपासच्या लोकांनाहि खुश केले. खूप पैसा खर्च केला. १९५१ साली गंगाधररावांच्या चिरंजीवानी मन घातले नाही. तरीहि लोकमताने प्राणी वाचले. चिरंजीवानी ५००० रु. दिले.

आता यंदा पुन्हा उत्सव चालू आहे. यंदा रेडा मारणार होते, पण पुंडलीक, वडवी वगैरेंनी धाक घातला की 'आम्हास प्रथम मारा, मग पशु मारा!' मला भेटून पुंडलीक हुदलीला जात आहेत. हे सर्व ऐकून मला संतोष झाला. पुढे होणार असेल ते होवो.

मी म्हणतो, लोकांनी मांस खाणे हे निराळे आणि देवीसाठी बळी देऊन धर्माला भ्रष्ट करणे निराळे. धर्माच्या नांवाने प्राणिहत्या होता कामाच नये. पण महाभारत म्हणते – यदन्नो पुरुषो राजन् । तदन्ना: तस्य देवता: ।। मनुष्य जे अन्न खातो तेच आपल्या देवाला देणार. याचा अर्थ–मनुष्याला आपला धर्म आणि आपला देव खाली ओढल्यावाचून करमत नाही. खरोखर धर्म मनुष्याला चढविण्यासाठी आहे.

देवदासी प्रथा हे असेच दुसरे उदाहरण आहे. आज मणिभुवनमध्ये पूर्व बंगलासाठी सर्वधर्म प्रार्थना होती. संतबाल आणि आमचे कुरैशी – याची ही प्रवृत्ति होती. माधवदासनी मला आग्रह केला म्हणून त्यात मी भाग घेतला. संतबालसारख्या साधूवर टीका करण्याची इच्छा होत नाही. भारतातील मुसलमानांमध्ये फक्त आमचे कुरेशीच पश्चिम पाकिस्तानचा निषेध करायला पुढे आले. त्याचेहि अभिनंदन करावयाचे होते.

मी माझी भूमिका सांगितली–"सर्वधर्मांचा परिवार बनवावयाचा तर प्रत्येक धर्माची शुद्धि झाली पाहिजे. आणि प्रत्येक धर्मसमाजामध्ये सामाजिक जबाबदारी आणि तेजस्विता आणली पाहिजे. सगळ्या धर्मांचे अध्यात्म चांगलेच असते. अडचण उत्पन्न होते– धर्माच्या समाजविज्ञानामुळे. हे विज्ञान वेळोवेळी व्यापक आणि अध्यात्म-परायण केले पाहिजे. प्रत्येक धर्माचे धर्माचार्य जुन्याचे उपासक आणि वस्तुपाल (curator) बनले आहेत.

त्यांच्यात जीव नाही, दृष्टि नाही. त्यांना गोळा करून लाभ काय ? या युगात प्रत्येक धर्माच्या श्रावकानी – laymen नी–पुढे आले पाहिजे. आणि समाजाची हृदय-शुद्धि करून उदारता आणली पाहिजे" – इत्यादि.

मुंबई
२४–५–७१

पूर्वी आईबाप आपल्या मुलांना लहानपणी मारूनठोकून काबूत ठेवीत. मास्तरहि छडी मारून शिकवीत. मुलांनी काय शिकावे, कोठे शिकावे हे आईबापच ठरवीत. मुलामुलींची लग्नेहि आईबापच जुळवीत आणि त्यांना कामाला लावून देत. मुलांना स्वतंत्र इच्छा अशी नव्हतीच. पुढे त्यांना मुलें झाली, नोकरी लागली म्हणजे मुलांच्या पुरुषार्थाला प्रारंभ होई आणि शेवटपर्यंत जातीच्या पुढाऱ्यांची नजर असावयाचीच. त्यामुळे परंपरा आणि रूढि यातच नवी पिढी तयार होई. या व्यवस्थेचे फायदे पुष्कळ होते. पण नुकसान अधिक. परिस्थितीप्रमाणे जीवनात सुधारणा करण्याला अवकाश थोडा असे आणि मागासलेल्या जाती मागासलेल्याच राहाव्यात हेहि ओघाने मान्य होत होते.

आता ही घडी मोडली आहे. एकच शिक्षण (निष्प्राण का असेना) सर्वांना मिळू शकते. मागासलेल्या जाती पुढे येऊ लागल्या आहेत. तरीहि विशिष्ट जातीचा पुढाकार नव्याने चालवला जात आहे. महाराष्ट्रात ब्राह्मणाच्या ऐवजी इतर जातीत मराठेच पुढाकार गाजवितात. हरिजनामध्ये महार, उत्तर भारतात चांभार–यांनाच सर्व फायदा मिळतो. प्रतिष्ठा त्यांचीच.

आणि आता सोशियालिजम सरकारच्या हातात आल्याने आणि अमलदारांच्या हातात सरकारी पैसे आणि ग्रँट देण्याची शक्ति आल्याने, समाजाचे जुने पुढारीपण सरकारी नोकरांच्या हाती गेले आहे. नव्या जाती, नवे संघ आपापला स्वार्थ साधीत आहेत आणि नैतिकता बघता बघता खालावली आहे. रूढ शिक्षण स्वार्थाला आणि मतलबी संघटनाला मदत

देते आणि समाज, नैतिक दृष्ट्या झपाट्याने खाली जात आहे.

या परिस्थितीचे चिंतन मुरलीधर घाट्याशी एक प्रकारे, अवनी-मंजूशी दुसऱ्या प्रकारे, आणि प्रेमाबेन[१]शी तिसऱ्या प्रकारे, आज पुष्कळ केले.

समाज अर्ध-शिक्षित झाला आहे. स्वार्थी, मतलबी लोक त्याला वहकवीत आहेत. निवडणुका जिंकणे आणि सत्ता आणि संपत्ति हाती येऊ देणे या कलेतील प्रवीण लोक नेते बनले आहेत. नैतिक-सामाजिक कल्याण ज्यांना समजते त्यांची प्रतिष्ठा शून्य झाली आहे. वर्तमानपत्रे मतलबी लोकांच्या हाती गेली आहेत. त्यांचे नेतृत्व विकृत झाले आहे. याला उपाय दोन–समाज ठेचा खाऊन पस्तावेल तेव्हा त्याला खरे हित समजावणे आणि दुसरा- परिस्थिति जो काय बदल घडवील तो घडू देणे.

मुंबई
२५–५–७१

पूर्वी विद्वत्ता होती संस्कृत भाषेत, आणि धंद्याचे शिक्षण मिळे त्या त्या धंद्यातील कर्तबगार लोकांच्या मार्फत. सामान्य जनतेला न मिळे विद्या ज्ञान, न मिळे कौशल्य. त्यांच्या वाट्याला गरीबी, अज्ञान आणि अनेक वेळा उपासमार. माणुसकी त्रैवर्णिक द्विजांची. 'सामान्य लोक विद्वानांचे पशु'. ही होती त्या वेळची सर्वमान्य म्हण.

पुढे संतांनी बुद्धाच्या वेळेपासून देशीभाषेत धर्म, पुराणे, लोककथा आणि कविता आणल्या. देशी भाषेतून लोकांना संत–साहित्य मिळाले.

पुढे पठाण आणि मोगलाचे राज्य आले. ते चालवण्याला मदत केली त्रैवर्णिकांनीच. या काळात अनेक वेळा आदिवासी लोकांची कत्तल झाली आहे. हिंदु युगात आदिवासींची उपेक्षा होई. त्यांचा बहिष्कारहि होई. पण पठाण–मोगलांनी आपले राज्य न स्वीकारणाऱ्या आदिवासींची मनसोक्त कत्तल केली आहे ! त्याचा थोडा थोडा इतिहास सांपडतो. विशेष नाही.

---

[१] प्रेमाबाई कंटक.

इंग्रजांनी येऊन हळूहळू लोक-शिक्षणाला प्रारंभ केला. त्याचा लाभ घेतला त्रैवर्णिकांनी, मुसलमानांनी, पारश्यांनी आणि ख्रिस्ती झालेल्या शूद्रांनी. शूद्रांना चांगले दिवस पहावयाला मिळाले पठाण मोगलांच्या राज्यात आणि युरोपियनांच्या राज्यात.

आता इंग्रजी विद्या शिकलेले लोकच पुढे येत आहेत. हेच नव्या युगाचे द्विज. हेच राज्यकर्ते. हेच उद्योगपति आणि हेच लोकनायक. आता परिस्थितीमुळे आणि प्रधानतया गांधीसारख्या लोकनेत्यामुळे मागासलेले लोक पुढे येऊ लागले आहेत. पण ते स्वकीयांची पूर्ण सेवा करण्याच्या ऐवजी स्वत:चीच एक नवी जात बनवीत आहेत. येत्या पंचवीस वर्षात सगळ्या समाजातून ही नवी इंग्रजी शिकणारी जात वाढत जाणार. येथ-वरचे माझे चिंतन लोकांपुढे मांडत आलो आहे. आता ते सर्वमान्य झाले आहे.

आता या नव्या इंग्रजी जातीतूनच एक उच्च जात निर्माण होऊ पाहत आहे. तिला पूर्वी 'England returned' म्हणत असत. पुढे ती व्यापक झाली. 'युरोपात जाऊन आलेले लोक.' आता या लोकावर मात करणारी नवी जात होत आहे. अमेरिकेत राहून, शिकून आलेल्या लोकांची. पूर्वी गोरे लोक इकडच्या लोकाशी लग्ने करीत नसत. (झाली ती फार थोडी) पण आता, स्वराज्य झाल्यानंतर येथील इंग्रजी शिक्षित जातीशी अमेरिकन लोक लग्ने करायला तयार आहेत, उत्सुक आहेत. पूर्वी मिशनरी लोक धर्मांतर करवीत. आता पश्चिमी संस्कृतीचा प्रचार चालत आहे.

मुंबई

२६–५–७१

डॉ. माधवदास यांच्या परिचयाची मुले-मुलीं मला भेटू इच्छितात. भेटल्यावर काय प्रश्न विचारावे याचे त्यांना संकट पडले आहे. एका मुलीने एकदा प्रश्न विचारला, "जीवनाचा हेतु काय आहे ?" आज दुसरा प्रश्न विचारला, "माया काय आहे ? तुमची दृष्टि समजावून सांगा." दुसऱ्या

दोघी येणार. याहि असलेच प्रश्न विचारणार. त्यांना वाटते दाढीवाले काकासाहेब साधुपुरुष आहेत, तेव्हा वेदांती प्रश्न विचारले पाहिजेत. या लोकांना वेदांताचा स्पर्शहि नाही, गोडी मुळीच नाही. एरव्ही हे लोक प्रश्न विचारतात ते वर्तमानपत्रातील चालू चर्चेविषयी असतात. स्वतःच्या जीवनाविषयी किंवा आवडीनिवडी विषयी चर्चा करण्याची त्यांना इच्छा किंवा हिंमत होत नाही. माणसाळल्यानंतर त्यांचे खरे प्रश्न बाहेर येतात.

खरी गोष्ट म्हणजे हल्लीचे आईबाप स्वतःच्याच मुलाच्या जीवनाशी संबंध ठेवीत नाहीत. शिक्षणसंस्था आणि त्यातील शिक्षक जाणे आणि विद्यार्थी जाणे. मुलांना नोकरीसाठी किंवा धंद्यासाठी 'डिग्री' मिळाली पाहिजे एवढी चिंता आईबापांना. मुलांनी चांगले मार्क मिळवले पाहिजेत एवढी चिंता शिक्षकांना, मुले कशीबशी जगतात. एकमेकांच्या सहवासात उथळपणा वाढवतात. समाजाच्या नेत्यांमधून आदरणीय व्यक्ति सांपडणे कठीण.

अशा परिस्थितीत संस्कृतीचे दिवाळे निघाले आहे. वर्तमानपत्रे, त्यांतील जाहिराती, नाटके आणि सिनेमा एवढेच नव्या पिढीचे आकर्षण. त्यातूनच थोडी पोरे चांगली निघतात. भविष्याचा विचार करतात. खोलात शिरून अभ्यास करतात. पण तो पश्चिमेकडील पुस्तकांचा. स्वतःच्या संस्कृतीचे किंवा येथील लोकमानसाचे त्यांना कसलेच ज्ञान नसते. खेडे-गावात जुने, बरेवाईट पारंपरिक ज्ञान असे. संतवाणीचा इष्ट किंवा अनिष्ट प्रचार होई. ते आता मुळीच उरले नाही. आधुनिक परिस्थिति, जुने हेवेदावे आणि पोटाची चिंता यातून जे बाहेर येतात ते चैनीच्या आणि विलासाच्या मागे लागतात.

अशा पिढीशी संपर्क कसा साधायचा? जुन्यातले जे चांगले आहे, त्याच्यावर त्यांची निष्ठा स्थिर कशी करावयाची? आणि जीवनाच्या केंद्रात कोणते सिद्धांत दृढमूल करावयाचे हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. पूर्वी थोडे ऋषिमुनि व्यापक विचारांना स्थानिक रूप देऊ शकत आणि जातीचे नेते आपापले प्रश्न सोडवीत. ते सोपे दिवस आता उरले नाहीत. आता आपल्या संस्कृतीचे नवनिर्माण केल्यावाचून गत्यंतर नाही.

मुंबई
२७-५-७१

आजचा दिवस दोन चिंतनात वाटला पाहिजे. त्यामुळे दोन्ही चिंतनाची थोडी उपासमार होईल. इलाज नाही.

गुलवाडीजी जीवदया वाले जयंतिलाल मानकर यांना घेऊन आले आणि बदरीभाईदेखील आले.

शंकररावांचे गोसेवक सूर्यनारायण भट्ट तर होतेच. कारवार जिल्ह्यात गाईबैलांना जंगलातून पुरेसा आहार मिळू शकतो, यामुळे पशूंचे ओझे माणसांच्या शेतीवर पडणार नाही, हा मोठा लाभ आहे. कारवारच्या प्रदेशात गीरसारख्या मोठ्या गाई उपयोगी नाहीत. पुष्कळ दूध देणाऱ्या लहान गाई आणि लहान बैल यांचा उपयोग अधिक होईल. गाईंच्या ऐंशी (८०) जातीविषयी सचित्र पुस्तकें भारतीय भाषात करण्याची गुलवाडींची योजना चांगली आहे. पण ती प्रचारानंतर वाढवली पाहिजे, नाही तर अंगाशी येईल.

कित्येकांना वाटते भारतातदेखील यापुढे गाईला माणसाबरोबर निभावणे शक्य नाही. दुधावाचून आपल्याला केव्हा तरी चालवावे लागणारच. माझे चिंतन म्हणते की गाईबैलांचे परिवार-नियोजन केले पाहिजे. चांगले वंशच टिकवावेत. अजूनहि शे-दोन वर्षे गाईला आपल्या जीवनात स्थान असणारच. पण या साऱ्या प्रश्नांचा वैज्ञानिक, औद्योगिक आणि हिशोबी अभ्यास केला पाहिजे. गौसेवेची भूमिकाच बदलली पाहिजे. गाईचे राष्ट्रीयकरण अत्यंत जरूरीचे आहे. पण आज मुद्दाम मी तो प्रश्न काढला नाही. मानकरांना पुन:पुन्हा भेटायला हवं !

आज मोहनलाल सोपान, लाभुबेन आणि त्यांच्या मुली—रूपा, गीतांजली भेटल्याने फार आनंद झाला. सोपानचा परिचय फार जुना. त्यांनी उत्तम साहित्य विशाल प्रमाणावर दिले आहे. पत्नीला आणि मुलींना उत्तम संस्कार आणि अनुकूल संयोग देऊन तयार केले—ही समाजाची आणि संस्कृतीची उत्तम सेवा आहे. वृत्तविवेचन, साहित्य-सेवा, राजकारण—सगळ्याच दिशेने उत्तम विकास आणि राष्ट्रसेवा केली आहे यात शंका नाही.

आणि भाषाप्रभुत्वहि किती उत्तम ! बंगाली, हिंदी इत्यादि अनेक भाषा घरीच नांदतात. माझ्या मते संस्कृतिसेवक जसा असावा तसे सोपान आहेत. व्यापारात पडले नाहीत. राजकारणात सापडले नाहीत हाहि संयम सामान्य नाही. मोहनलालची उन्नति पाहून आनंद होतो. पण मला वाटते समाजाने जर यांच्यावर नेतृत्व लादले असते तर दोघांचा फायदा झाला असता. प्रधानतया वृत्तविवेचक झाल्यामुळे आपण होऊन समाजाचे सांस्कृतिक नेतृत्व करणे त्यांना शक्य नव्हते. हातून सेवा झाली ती थोडकी नाही. पुरी महत्त्वाचीहि आहे—हे समाधान त्यांना आहेच. तरीहि मला वाटते त्यांचे नेतृत्व गुजरातला अधिक उपयोगी झाले असते. कारण त्यांना अनेक संस्था चालवता आल्या असत्या. त्यांचे म्हणणे खरे आहे की 'उत्कृष्ट साहित्य सर्जनात्मकच असू शकते.' तीच गोष्ट समाजसेवेलादेखील लागू पडते. वृत्तविवेचन त्या मानाने कमी पडते.

मुंबई
२८–५–७१

शेवटी जपानी विद्यार्थिनी–रेइको ताबुची दिल्लीहून येऊन पोहोचली. तिसऱ्या दर्ज्याने आली म्हणून चांगलीच थकली होती. वडिल सहा वर्षापूर्वी वारले. एक भाऊ आणि थोरली बहीण आहे. यापूर्वी भारतात येऊन तिने प्रवास केला आहे आणि म्हणूनच हिंदी शिकणार आणि गांधी-विचार आणि कार्य हेहि शिकू इच्छिते. सरकारी स्कॉलरशिप नाही, वा एखाद्या संस्थेकडूनही आलेली नाही. स्वतःच्या हौसेने आलेली आहे आणि म्हणूनच तिच्या उपयोगी पडावे असे वाटले. आता पहावयाचे, या यात्रेचा किती फायदा करून घेते. माझ्याकडून जास्तीत जास्त मदत व्हावी ही इच्छा आहे.

गुलवाडीजी दोन जैन मुलींना—चांदनी मेहता आणि भावना—घेऊन आले. चांदनीला मेडिसिनमध्ये तयार करण्याची शंकररावांना हौस आहे. छप्पन्न टक्के मार्क मिळाले. त्यामुळे कुठेच प्रवेश मिळत नाही. म्हणून

तिला पुण्याच्या लष्करी मेडिकल शिक्षण संस्थेत पाठवू पाहतात मला हे मुळीच आवडले नाही. पण लोकांच्या कामात ढवळाढवळ कां करा, म्हणून मी तटस्थ राहिलो. या मुलीला सांस्कृतिक क्षेत्रात पुढे आणणे इष्ट आहे. फारच चांगले काम करील. स्त्रीसमाजाचे नेतृत्वहि करील. मुलीची आई भेटणार आहे त्यावेळी कदाचित परिस्थिति अधिक समजू शकेन. शंकरराव या मुलीसाठी खटपट करीत आहेत. परिश्रम घेत आहेत. तशी शक्ति आणि वृत्ति माझ्यात नाही. शिक्षणशास्त्रज्ञ म्हणूनदेखील, असले काम मी केले नाही.

अंतर्मुख होऊन विचार करतो की अशा प्रकारचा स्वधर्म माझा का ? आणि मी त्याला चुकलो का ? सेवाजीवनाच्या प्रारंभी असे चिंतन करायला हवे होते. आता शेवटच्या दिवसात विचार करून काय फायदा ? तरीहि स्वधर्माचा विचार आमरण केलाच पाहिजे. पुढच्या जन्मी उपयोगी पडेल कदाचित् ! आजचे चिंतन म्हणते की माझा स्वधर्म अशाप्रकारचा नव्हताच आणि नाही. रेइको जपानची आहे म्हणूनच तिच्या बाबतीत थोडी जबाबदारी घेतली.

मुंबई
२९-५-७१

ज्या लोकांना जीवनाची गंभीरता कळली आहे, सामाजिक जीवनाचा विस्तार आणि व्याप कसा असतो याची कल्पना आहे. आणि मानवजातीचे भूत, वर्तमान, भविष्य याची ऐतिहासिक आणि तात्त्विक कल्पना जे करू शकतात, त्यांना बापूजींचे सिद्धांत समजावून सांगणे सोपे आहे. किंबहुना त्यांनाच गांधी-सिद्धांताची खोली आणि सत्यता पटू शकते. तेव्हा सामान्य लोकांना गांधी-सिद्धांतापासून प्रारंभ करून फायदा नाही. त्यांना गांधीजींचे जीवन प्रारंभापासून सांगावे. समाजसेवा करता करता, त्यातील दोष ध्यानात येऊन, सेवेची पद्धति गांधींनी कशी सुधारली आणि अन्यायाचा विरोध करीत असतांना सर्वांचेच कल्याण करण्याचा आदर्श गांधींनी

कसा सांभाळला, हे सर्व सांगता सांगता, शेवटी शेवटी गांधी-सिद्धांताची नवीनता, शुद्धता आणि सार्वभौमता लोकांच्या ध्यानात येईल, अशा रीतीने हळूहळू पुढे गेले पाहिजे. अशा पद्धतीमुळे विकासवाददेखील चरितार्थ व्हावयाचा.

हे सर्व ठाऊक असूनदेखील आज विचार आला की तत्त्वचर्चा ग्रहण करण्याची शक्ति जपानी लोकांत कमीतकमी असते. तर तिकडील एका मुलीला गांधी-सिद्धांत अगदी सोप्या भाषेत आणि सहज समजेल अशा पद्धतीने सांगण्याचा प्रयत्न करून पाहू.

जपानी मनाला तात्त्विक चर्चा झेपत नाही हे ठाऊक तर होतेच आणि रेइकोशी झालेल्या दोन दिवसाच्या संभाषणात त्याचा अनुभवहि आला होता. तरीहि मी तात्त्विक चर्चेतून प्रारंभ केला. गांधीजींची सत्यनिष्ठा, जीवनगत सत्याचा त्यांचा व्यापक अर्थ येथून प्रारंभ केला. यापुढे, "सत्याचे संपूर्ण आकलन होत नसते, जे आकलन होते ते सापेक्ष असते. निरपेक्ष, संपूर्ण शुद्ध सत्य फारच दूर असणार. तेव्हा प्रत्येकाने पूर्ण सत्याच्या प्राप्तीसाठी प्राप्तसत्याचे पालन करावे, प्रयोग करावे आणि पुढे जावे. आपले सत्य दुसऱ्यावर कधी लादू नये. उलट दुसरा स्वतःच्या सत्याचे पालन करतो त्याचा आदर करावा. 'त्याचा रस्ता त्याला, आपला आपल्याला,' हे स्वीकारून चालणे म्हणजेच अहिंसा"—एवढे तिला समजावण्याचा मी प्रयत्न केला. मला वाटते आज माझी विवेचन पद्धति फारच सरळ होती. तरीहि तिला ती पूर्ण झेपली नाही. प्रयत्न केला, हेच फळ पदरी पडले.

मुंबई
३०–५–७१

भारतात हिंदुधर्म, इस्लाम, इसाई धर्म, यहुदी धर्म आणि पारसी लोकांचा धर्म अशा पाच-सहाचाच आपण उल्लेख करतो. अशा वेळी हिंदूचे अनेक पंथ आपण एकत्र करतोच. पण त्या खेरीज शीख, लिंगायत, जैन, आर्यसमाजी आणि ब्रह्मसमाजी यांनाहि हिंदूतच घेतो. बौद्धांना बाहेर राहू

देणे योग्य होणार नाही. बौद्ध आणि जैन हे मूळचे कितीहि जुने असोत, महावीर आणि गौतम समकालीन होते. हिंदूखेरीज बाकी सर्वांचे एकदोन एकदोन मान्य धर्मगुरु आहेत. हिंदूत तर चार मुख्य शंकराचार्य. याखेरीज अनेक पंथांचे एक-एक अथवा अनेक धर्मगुरु, पीठाधिपति अथवा आचार्य सापडतील. द्वैत, विशिष्ट द्वैत यांचे आचार्य पुन्हा निराळे.

या सर्व गुरूंना एकत्र आणणे पूर्वी अशक्य होते. दोन संन्यासीदेखील एकमेकांना भेटणे देखील मुश्किल होते. कोणी कोणाला अगोदर नमस्कार करावयाचा हे ठरल्यावाचून भेटावे कसे ?

आता मात्र या धर्मगुरूंची प्रतिष्ठा समाजात कमी झाल्यामुळे आणि राजकारण प्रभावी ठरल्यामुळे (आणि विदेशी राज्य गेल्यामुळे देखील) हे धर्मगुरु हळूहळू एकत्र येऊ लागले आहेत. पण त्यांचे संगठन होऊ शकत नाही. पूर्वी यांना बोलवायला गेलो तर अडून बसत आणि आपला अधिकार गाजवत. आता ती स्थिति उरली नाही. आता राजनीति बाजूला ठेऊन, राष्ट्रातील धर्मपरायण, उदारमतवादी सांस्कृतिक नेत्यांनी प्रथम एकत्र आले पाहिजे आणि मग या सर्व धर्मगुरूंनादेखील एकत्र आणले पाहिजे. आता हे काम पूर्वीइतके कठीण राहिले नाही. वेदांत, अध्यात्म आणि तशा प्रकारचे धर्मशास्त्र यांना एकत्र आणण्याचे बरेचसे काम होऊन गेले आहे. चर्चा टाळून यांचा समन्वय करता येतो. मुख्य गोष्ट आहे प्रत्येक धर्माचे समाजविज्ञान कसे सांभाळायचे ? या बाबतीत सांस्कृतिक नेत्यांनी धर्म-गुरूंना मार्ग दाखवला पाहिजे. हे काम शक्य आहे आणि त्याचा काळ आला आहे. साधेल तेथून अनेक प्रारंभ करून शेवटी सर्वमान्य आध्यात्मिक समाजविज्ञान विकसित केले पाहिजे.

मुंबई
३१–५–७१

चांदनीची आई–मनोरमाबेन–लहानपणी पू. बापूजींच्या परिचयात आली होती. चांदनीचे पिता–अमृतभाई. हे कुटुंब महादेवभाईंच्या परिचयाचे.

आजहि नारायण यांच्याच घरी उतरतो मनोरमा गांधीकार्यात मनापासून रस घेत आहे.

चांदनीने पुढे काय शिकावे, काय करावे याविषयी मी मनमोकळे आईबापाशी बोललो आणि आईने तर गांधीवाले हल्ली काय करतात, भूदान-ग्रामदानाचे भविष्य काय, बिहारची परिस्थिती वगैरे चर्चाहि केली आणि शेवटी मगध युनिव्हर्सिटीशी संबद्ध अशा मेडिकल कॉलेजमध्ये चांदनीला पाठवावे किंवा नाही, अशा संस्था नवीन प्रकारची पागडी घेतात त्याचे काय – वगैरे चर्चा केली.

हीच चांदनी संध्याकाळी आपल्या पारशी मैत्रिणीला घेऊन आली– धन पटेल. तिला धर्मांतर करून ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याची उत्कट इच्छा झाली आहे. तिला मी स्वधर्मनिष्ठा आणि सर्वधर्म-समभाव यांचे रहस्य समजावले. या तत्त्वाचे महत्त्व चांदनी उत्तम समजू शकली. धन पादऱ्यांच्या प्रभावाखाली पुष्कळ गेली आहे. तिला सर्व-धर्म-समभाव आज पटला नाही तरी शेवटी पटणारच. ख्रिस्तीधर्माविषयीची माझी आपुलकी तिला मी समजावली त्यामुळेच ती विचार करू लागली आहे. स्वधर्म आणि स्वसमाजाला सोडण्यात हीनपणा आहे. त्याची सेवा करून त्यांना सुधारणे यातच बहादुरी आहे, विश्वसेवा आहे आणि जीवन कृतार्थ होणार–हीहि गोष्ट तिला पटली पाहिजे.

आज पुष्पा अगदी नवीन प्रकारच्या दोन स्नेह्यांना घेऊन आली. एक होती पोलंडची फ्रान्सिस्का (Francisca) व दुसरे होते पारशी सोली उरणवाला. हे सोली नमुनेदार पारशी आहेत. अगदी मोकळ्या मनाचे. कदाचित् आपल्या पत्नीला घेऊन येतील आणि मग मुलाला.

फ्रान्सिस्का मला अध्यात्मवादी वाटली. तिचे ज्ञान बेताचे असेल, पण वृत्ति खरीखुरी आध्यात्मिक असावी. पश्चिमेकडील हा नमुना मला ध्यानात घेण्याजोगा वाटला. चि. सरोजची आणि फ्रान्सिस्काची दोस्ती सुंदर जमली. अध्यात्म जगभर सारखेच असणार. स्वामी विवेकानंदांनी त्याचा जिवंतपणा पटवून दिला. हिंदूधर्मात दोष यथेच्छ आहेत. पण हिंदुधर्माची जीवनदृष्टि, आध्यात्मिक विश्वदृष्टि आणि सर्व-धर्म-समभाव हेच जगाला तारक होतील.

# जून ७१

मुंबई

१-६-७१

आजच्या पुण्यदिवसाचा प्रारंभ कृतज्ञतेने झाला. चि. सरोजच्या वडिलांची आज जन्मतिथि. जन्मभर किती तरी किमती दान स्वीकारत आलो आहे. त्यापैकी सर्वात मोठे आणि मला धन्य करणारे दान धीरजलाल-कडून मिळालेले सरोजरूपी आहे. तेव्हा आज प्रार्थनेत पुष्कळ वेळ त्यांचेच ध्यान केले. सर्व सद्‌गुणात आस्तिकतेची कसोटी करणारा सद्‌गुण आहे धीर (धीरज). सरोजच्या वडिलांच्या नांवाचे चिंतन मी किती तरी केले आहे. शिक्षणासाठी विलायतेला जाण्यापूर्वी, रँग्लर परांजपे यांना ते

भेटण्याला आले असताना फर्ग्युसन कॉलेजच्या माझ्या खोलीच्या शेजारी राहिले होते. तेवढेच त्यांचे दर्शन. त्या वेळी केवळ कुतुहलाने घेतलेले ओझरते दर्शन आज मी सांभाळून आहे. पुण्याच्या लोकांनी त्यांची खरी कदर केली होती.

जुन्यातले जुने, उत्तमोत्तम अंत्यज सेवक मामा फडके यांचे आत्म-चरित्र (हस्तलिखित) आले आहे, त्यांचे चरित्र वाचणे हा एक सत्संगच आहे. आजपासून तो सुरू केला आहे.

शंकररावांनी धरून आणलेली चांदनी बरीच उपयोगी आहे. या चौकस मुलीचा प्रश्न महत्त्वाचा आहेच. परवा ती आपल्या एका पारशी मैत्रिणीला घेऊन आली होती आणि तिच्याशी मला 'सर्व-धर्म-समभाव' आणि 'स्वधर्म निष्ठा' याचे विवेचन करावे लागले होते. स्वधर्माची, स्वजातीची आणि स्वकीयांची जशी आपण सेवा घेतो तशीच ती करण्या-चेहि कर्तव्य आहे. स्वसंस्कृतीला शुद्ध, समृद्ध आणि समर्थ करण्याचे कर्तव्य विसरता कामा नये वगैरे समजावून सांगितले होते.

आज चांदनी एक अंध युवकाला–रमेशला–घेऊन आली. कल्पना नव्हती या आंधळ्या तरुणात काही वैशिष्टच असेल. खरोखर हा तरुण बुद्धिमान आहे, जागरूक आहे. अंध लिपीतून याने पुष्कळ साहित्य वाचले आहे. ख्रिस्ती लोकांचा परिचय, पश्चिमेचे विज्ञान आणि बुद्धिवाद यांच्या प्रभावाने याची बुद्धि स्वतंत्र आणि ग्रहणशील झाली आहे. याने स्वतःची भूमिका विस्ताराने सांगितली आणि मार्मिक प्रश्न विचारले. त्याची कदर करून मी उत्तरे दिली. त्यांच्याबरोबर तरुणा दारुवाला म्हणून एक पारशी मुलगी आली होती. हिंदु संस्कृतीचा हिला चांगला परिचय आहे. हिनेहि चर्चेत भाग घेतला. हिची ग्रहणशक्ति अद्‌भुत आहे. मुद्दा चटकन् पकडते आणि पटला म्हणजे प्रसन्न होते.

मुंबई
२–६–७१

माझे अत्यंत जुने साथी– १९१० पासूनचे – मामा फडके. यांची

आत्मकथा वाचून आज पुरी केली आणि माझ्या दोन-चार सूचना, आत्मकथा लिहून काढणारे रामनारायण ना. पाठकांना वाळुकड येथे पत्र लिहून कळवल्या.

मामा अगदी लहानपणापासून सिद्धांतनिष्ठ. राष्ट्रसेवकातील सिद्धांतनिष्ठ पण व्यवहारकुशल अशा लोकांशी मतभेद चालवणारे हिंमतवान सेवक आणि शिक्षक. इंग्रजी शिक्षण घ्यावयाचे नाही, सरकारी नोकरी करावयाची नाही, स्वत:च्या चिंतनाला एकनिष्ठ रहावयाचे—ही वृत्ति पहिल्यापासून.

प्रथम ओढा टिळकाकडे. महाराष्ट्रात राष्ट्रीय शिक्षण अशक्य झाले म्हणून बडोद्याला गंगनाथ विद्यालयात गेले. तेथेहि C. I. D. त्यांच्या मागे लागलेली म्हणून गिरनारकडे गेले. शेवटी गांधीकडे पोहोचले. अस्पृश्यता-निवारण हेच जीवनकार्य म्हणून पसंत केले. अत्यंत निष्ठेने आदर्श सेवा केली. तेथेहि त्यांना ठक्करबाप्पा (अमृतलाल ठक्कर) नडले. आपली जीवन आणि प्राण ओतून वाढवलेली संस्थाहि त्यांना सोडावी लागली. अत्यंत निराग्रही आणि निष्ठावान आग्रही. मला यांच्याविषयी अत्यंत आदर वाटतो. ठक्कर बाप्पांना मामांची कदर करता आली असती तर चांगले झाले असते. सिद्धांतनिष्ठा आणि व्यवहारकुशलता यांची जोडी चालवू शकणारे महात्माजीसारखे विरळेच.

आम्ही दोघे गांधीजींचे भक्त. आज्ञाधारक शिष्य. तरीहि आम्हाला गांधीजींची कला साधली नाही आणि यातच आमचा खरा उद्धार आणि आत्मसंतोष.

कित्येक थोडे गुजराती कार्यकर्ते 'काका-मामाची जोडी' बनवतात. आम्हा दोघांना परस्पराविषयी प्रेमादर आहे. पण दोघांचा मार्ग निराळा, आणि तरीहि वर म्हटल्याप्रमाणे आम्हा दोघांना गांधीजींची कला साधली नाही. आणि गांधींनी आम्हा दोघांना आमच्या इच्छेप्रमाणे आमचे व्यक्तित्व सांभाळू दिले हीच त्यांनी आमची उत्तम कदर केली.

याविषयी आता अलिप्तपणे, सविस्तर लिहावे असे केव्हा केव्हा वाटते. पण न लिहिण्यात सार आहे, असेच शेवटी वाटते.

मामाविषयी उद्या लिहिणारच आहे.

मुंबई
३-६-७१

आज कुमारी रेइको ताबुचीला शिकवण्याचा प्रारंभ केला. प्रथम एखादे हिंदी भजन शिकवावे आणि मग त्यांतील शब्दांच्या मदतीने, नागरी लिपी नवीन पद्धतीने शिकवावी असा विचार होता पण नंतर तो बदलला. जापानी मंत्र 'नम् म्यो हो रेंगे क्यो' हा प्रथम शिकवावा अशी कल्पना आली. पण तो तर निचिरेन पंथी मंत्र ! इतर बौद्धांना कदाचित् चालणार नाही तेव्हा आपलीच सार्वभौम प्रार्थना शिकवावी असे ठरविले. आणि त्या मंत्रातील पहिला एक तृतीयांश शिकवला– 'ॐ असतो मा सद्‌गमय।' सूक्ष्मपणे तिच्या चुका ओळखून त्या सुधारल्या.

सत् चे सद् होते हे सांगितले. पण ती सच् असाच उच्चार करीत होती, ते मी पकडू शकलो नाही. चि. सरोजने सांगितले, 'जपानी लोकांच्या अडचणी मला थोड्याफार समजतात. त्यांच्या भाषेत 'र' आहे पण 'र, ल'चा भेद त्यांना पकडता येत नाही. कारण त्यांच्या लिपीत 'ळ'ला स्थानच नाही'.

त्याचप्रमाणे ऱ्हस्व, दीर्घ त्यांना सहज पकडता येत नाहीत. ही अडचण आपल्या देशातीलहि पुष्कळ लोकांनाहि आहे. आणि संस्कृति म्हणजे उच्चारशुद्धीचा आग्रह. तेव्हा या बाबतीत मी पुष्कळ आग्रह धरणार. त्यात मला समाधान आहे. एकदा स्पेलिंगचा प्रश्न निघाला असता, बापूजी म्हणाले होते–'जोडणी-शुद्धीला चारित्र्य-शुद्धीइतकेच महत्त्व दिले पाहिजे.' पुष्कळांना गांधींचा विचार पटत नाही. मला बराच पटतो. म्हणूनच मी वर लिहिले आहे की उच्चार-शुद्धि म्हणजेच संस्कृति.

अशा रीतीने रेइकोला शिकवताना उच्चारणाचा आग्रह धरल्यानंतर तिला या वस्तूचे महत्त्व पटवून देणार. मला वाटते हे संस्कृति-प्रचाराचेच एक अंग आहे. इंग्रजांना हे पटले आहे. त्याचा आग्रह मी समजू शकतो. हा

आग्रह धरला नाही तर काय परिणाम होतो, हे मी आफ्रिकेतील स्थानिक लोकांची इंग्रजी ऐकून उत्तम समजू शकलो. त्यामुळे आपल्या पूर्वजांचा आग्रह पटला.

मुंबई
४–६–७१

आज चि. रेइकोला प्रार्थनेतील दुसरे वचन शिकवले–'तमसो मा ज्योतिर्गमय ।' या लोकांच्या जिभेला 'र'चा उच्चार साधत नाही आणि रेफ तर फारच कठीण. पण माझा निश्चय आहे की तिला तिच्या नांवाच्या आद्याक्षराची दीक्षा द्यायचीच.

आज अकस्मात सतीश आल्याने त्याच्याशी बरेच बोलणे झाले. त्याने आणलेली पू. बापूजींची पत्रे वाचली. बापूजींच्या सहानुभूतीची आणि न्यायबुद्धीची कसोटी होत असलेली त्या पत्रात दिसली. उद्या सतीशशी या बाबतीत विस्तारपूर्वक बोलणार. या पत्रांमुळे चिंतन पुष्कळ झाले. पण ते लिहिण्याजोगे नाही. चिंतन दृढ झाल्यानंतर त्याविषयी तटस्थपणे पुष्कळ लिहावयाचे आहे.

आज माझे कृत्रिम दात ठीक करण्यासाठी डॉक्टर देसाईकडे गेलो. माझ्या मते काम फारसे नव्हते. पण एक अतिशय सज्जन, सेवाभावी आणि गोड स्वभावाच्या फार जुन्या स्नेह्यांना भेटण्याचा आनंद मिळेल, या लोभाने गेलो.

तेथे दिसले की या दंतवैद्यांना मला भेटण्याची, माझ्याहून अधिक उत्कंठा होती. गिऱ्हाइकांची अतिशय गर्दी असूनदेखील त्यांनी मला आजच वेळ दिला आणि स्पष्ट सांगितले देखील की "आजच भेटण्याच्या उत्कंठे-" मुळे त्यांनी तसे केले.

माझ्या दाताची वरची कवळी त्यांनी ठेवून घेतली. मला शंका होती की पुढच्या दाताचा मागचा भाग Crack झाला असावा म्हणून मी पुष्कळ पाहिले. तसे दिसले नाही फक्त आतील खपलीच तडकली आहे.

पण डॉक्टरनी मला दाखवले की ती तडक आतपर्यंत पोहोचली आहे. तेव्हा मुकाटयाने दात ठेऊन आलो. उद्या संध्याकाळी दात ठीक होऊन मिळतील.

नवे दात करून घेण्याची इच्छाच होत नाही. मी म्हातारा, दातहि म्हातारे! आणि इतक्या वर्षांची त्यांनी साथ दिलेली. त्यांनाच ठीकठाक करून शेवटपर्यंत टिकवावे असे वाटते. डॉक्टरनी माझ्या भावनेची कदर केली आणि सहज बोलता बोलता वृद्ध सैनिकाचे उदाहरण दिले.

मुंबई
५–६–७१

कधीच न भेटणारे लोक आज भेटले. त्याची नोंद घेतलीच पाहिजे. एक शेराबेन जमाल. यांचा प्रथम परिचय पुण्याला आलूबेन आणि आलाबेन यांच्यामार्फत झाला त्याच वेळचा. या आता पाकिस्तान–कराचीमध्ये असतात.

दुसरे वनूभाई आणि जयाबेन वोरा–इन्श्योरन्सवाले. दोन महिन्या-साठी युरोप-अमेरिकेला जातात. जया, नानूभाई वोरांची बहीण. एका काळी आम्ही खूप बोलत असू.

आज सगळा दिवस मला भोवळ येत होती आणि आज अधिकच. त्यामुळे प्रकृतीचे चिंतन घडले. ही व्याधि कायम राहिली तर आयुष्यात काय काय फेरफार केला पाहिजे त्याचा विचार केला. अगदी शांतपणे व्यवहारापुरता.

आज एक फ्रेंच गृहस्थ भेटायला येणार असे 'मणिभुवन'कडून कळले. हा गृहस्थ वियेतनाममध्ये शिक्षक आहे. त्याला इंग्रजी बेताचेच येते. पण त्याच वेळी सतीश येथे असल्याने संभाषण काही अंशी सोपे झाले. गृहस्थ सज्जन दिसले आणि एकदा युरोपची फेरी करून पुन: वियेतनामला जातील–मिशनरी होण्यासाठी.

मी त्यांच्याशी अगदी मनापासून बोललो. स्वराज्य मिळाले. त्यात तीन तत्त्वे होती. गांधींची अहिंसा सर्व सहन करणारी संतांची अहिंसा नव्हे.

तर सबंध राष्ट्राचा पुढाकार घेणाऱ्या झुंजारपूर्ण अहिंसक सेनापतीची अहिंसा होती. दुसरे तत्त्व हिंदु-संस्कृतीत मुरलेल्या (कोटयावधि) सामान्य लोकांचे राष्ट्र. आणि या दोघांच्यामध्ये काँग्रेसचे समर्थ नेते–जे पूर्ण देशभक्त पण पश्चिमी विद्येत मुरलेले. गांधीजी राष्ट्रात अहिंसक तेजस्विता आणू शकले. पण स्वराज्य स्वाभाविकपणे काँग्रेसच्या नेत्यांच्या हाती गेले. त्यांना गांधीविषयी आदर. पण राष्ट्रातील अहिंसक क्षात्रतेज ते टिकवू शकले नाहीत. ज्यांना गांधीजींची अहिंसक क्षात्र संस्कृति पूर्णपणे पटली होती, ते आजच्या राज्यसत्तेच्या बाहेर आहेत. त्यामुळे उद्या जर भारताला युद्ध करावे लागले तर ते गांधीपद्धतीचे होणार नाही. यापुढे गांधींचे पुनरुत्थान होणार असेल तेव्हा होवो ! गांधींचे आगमन जगासाठी होते. ते व्यर्थ जाणार नाही, अशी श्रद्धा आहे.

मुंबई
६–६–७१

काल अंतूभाई वैद्य यांच्याशी ठरल्याप्रमाणे, सकाळी नास्ता केला नाही. ते सव्वा आठ नंतर आले. फक्त दोन्ही हाताची नाडी पाहून त्यांनी सांगायला सुरुवात केली. वैद्यलोक चतुर असतात. अंदाजाने पुष्कळ गोष्टी सांगतात. हा माझा जुना अनुभव. त्या दृष्टीनेच मी एकू लागलो. पण अंतूभाई निश्चितपणे सांगत होते. इतक्या सगळ्या गोष्टी नाडीतून समजणे कसे शक्य असेल ? आणि इतर रीतीने त्यांना कळणे अशक्य होते. असो.

त्यांनी काय काय सांगितले ते येथे लिहीत नाही. आम्ही आश्चर्यचकित झालो. मग मी त्यांना गेल्या महिन्याची हकीकत सांगितली. ते म्हणाले, भोवळ येते ही गोष्ट गौण आहे. प्रोस्ट्रेट ग्लॅन्डचा इलाज मुख्यत: केला पाहिजे आणि किडनीजचाहि इलाज. त्यांनी दोन औषधे लिहून दिली आणि म्हणाले दोन दिवसात भोवळ बंद होईल. पंधरा दिवसात प्रकृति चांगली होईल. पण संपूर्ण आरोग्यासाठी दीड वर्ष इलाज केला पाहिजे. मी ते मान्य केले.

आता दुसरी गोष्ट. कित्येक वैद्य रोगाचे निदान बिनचूक करतात, पण औषधाची निवड करण्यात तितकेसे कुशल नसतात. पण मी आता अंधश्रद्धेने चालणार नाही. अंतूभाई अनुभवी आहेत आणि त्यांना आत्मविश्वास आहे. ते सांगतील त्याप्रमाणे औषधे घेण्याचा आणि पथ्य पाळण्याचा माझा विचार आहे.

आयुर्वेदी वैद्यांना हे ज्ञान कोठून येते ? ग्रंथपढिक वैद्य पुष्कळ असतात. त्यांना निदानहि साधत नाही. काही वैद्य घराण्यात परंपरेने सगळेच हुशार निघतात. तेव्हा काही ज्ञान स्वतःच्या घराण्यातच ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न असेल. मला वाटते कित्येक घराण्यात वैद्यांची एक प्रकारची आध्यात्मिक साधना आग्रहाने पाळली जाते. या साधनेची कल्पना करणे सोपे नाही. या साधनेच्या जोरावर नाडीच्या धक्क्यातून ते पुष्कळ ज्ञान मिळवतात. असंख्य रोग्यांच्या अनुभवानेदेखील ज्ञान वाढत असावे. वैद्यकशास्त्रातदेखील 'शक्तिपाता'सारखा काही प्रकार असेल का ?

अमतुलबेनशी बांगला-देशविषयी बोललो.

मुंबई
७-६-७१

चि. पुष्पाला एक दिवस पुण्यात अधिक रहावे लागले. रेइको कालच एकटी परत आली आणि पुष्पाच्या घरी राहिली.

सकाळी तिचा वर्ग घेतला. येथेच ती जेवली आणि संध्याकाळी चि. जयश्री आणि कल्पना दोघींनी येऊन रेइकोला आपल्या घरी नेली.

आतापर्यंतची व्यवस्था तात्पुरती होती. डॉक्टर माधवदास यांच्यामार्फत रेइकोच्या शिक्षणाची व्यवस्थाहि करावयाची आहे. तिला कामापुरते हिंदी आले म्हणजे तिला अन्यत्र पाठवता येईल. कदाचित् तिला वनस्थलीत ठेवणे इष्ट होईल. तेथे खाण्यापिण्याची व्यवस्था पहावी लागेल. पण हिंदीसाठी तेच स्थान चांगले वाटते. या मुलीला दुसऱ्यांदा भारतात येऊ देण्यात माझा हात असल्यामुळे मला हिच्या विकासाची योजना ध्यानात घ्यावी लागते. पाहू, काय करता येते ते.

आज ज्ञानगंगोत्रीशी संबंध असलेले भाई विजयगुप्त मौर्य भेटले. पोरबंदरचे गृहस्थ. तेथे न्यायाधीश होते. 'जन्मभूमि' आणि 'प्रवासी'त त्यांनी पुष्कळ काम केले आहे.

यांनी समुद्रसृष्टीचा चांगला खोलवर अभ्यास करून एक महत्त्वाचे पुस्तक लिहिले आहे. एका काळचे वल्लभ युनिव्हर्सिटीचे कुलनायक ईश्वर-भाई पटेल यांनी मला आग्रह केला की विजयगुप्तांच्या या नवीन पुस्तकाला मीच प्रस्तावना लिहावी. मला हे आवडले.

आपण सर्व निरामिषाहारी. पशुपक्ष्यांची हिंसा आहारासाठी नापसंत करणारे. आपल्यापुढे एक भयंकर प्रश्न उत्पन्न होणार आहे. भूगोलाचे ज्ञान वाढले, विज्ञान वाढले. मनुष्याची आयुर्मर्यादा वाढत चालली आहे. लोकवस्ती काबूत ठेवण्याचे प्रयत्न निष्फळ होत आहेत. आपण पुष्कळ रोग टाळले अथवा काबूत आणले. आता युद्धे टाळू पाहत आहोत. त्यामुळे मानवसंख्या वाढणार. जमीन आपल्याला पोसू शकणार नाही.

तेव्हा ज्याप्रमाणे आज आपण कंद, मूळ, फळ आणि धान्य खाण्यात पाप मानत नाही त्याप्रमाणे मासे, खेकडे वगैरे जलचर खाण्यात पाप नाही असे मानून मानवी लोकसंख्येचा प्रश्न सोडवावा लागणार. भूचर आणि खेचर यांच्यापेक्षा जलचर सृष्टि प्रचंड आहे. या सृष्टीशी मनुष्याचा संबंध वाढणार. त्याचा विचार अध्यात्माच्या दृष्टीने जर केला नाही तर प्राणीशास्त्रच आपल्यावर राज्य करणार तेव्हा मानवीजीवनात जोराने क्रांति केलीच पाहिजे.

मुंबई

८–६–७१

आज ज्येष्ठ पूर्णिमा. कबीर जयंती आहे म्हणे. भारतातील असंख्य संतांमध्ये कबीर वेगळा पडतो. त्याचा जन्म हिंदु होता की मुसलमान, ठाऊक नाही. पण इस्लामचा प्रभाव त्याच्या जीवनावर होता आणि रामानंदांकडून त्याने दीक्षा घेतली होती. मला सगळ्यात अधिक आश्चर्य

वाटते ते हे की रामनामाचा इतका आग्रह धरणाऱ्या कबीरांनी इस्लामी प्रभाव मान्य करून सीतेचे नांवच घेतले नाही. राम म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर. कृष्ण म्हणजेहि परमेश्वर. पण 'राम' म्हटल्याबरोबर एक पत्नीव्रती राजा हे ध्यानात आल्यावाचून राहत नाही. आम्ही वेदांती म्हणून रामाची सीता तर काय, कृष्णाची राधादेखील फक्त ब्रह्मविद्या आहे सगळेच रूपक आहे असे मानणारे. तरीहि सीतेवाचून रामाची कल्पना पूर्ण होत नाही. राधेचा कृष्णाशी कसला संबंध होता याची चर्चादेखील माझ्या मनात उठत नाही. याला कारण ? येथे तर्क चालत नाही. माझ्या वडिलाचे नांव बाळकृष्ण आणि आईचे सासरचे नांव राधा आणि मी सनातनी मातृ-पितृ-भक्त.

अशा वातावरणात सीतेचे नांव न घेता, कबीराने रामभक्ति केली. आणि भारतातील सनातनी संतांमध्ये त्याने स्थान मिळवले, हा खरोखर एक अद्‌भुत चमत्कार आहे. सनातनी आत्मा सर्व लोकांच्या अडचणी समजतो. मनोवृत्ति सांभाळतो आणि सरतेशेवटी खरेखुरे अध्यात्म, शुद्ध धार्मिकता आणि अनन्य भक्तीची कदर करतो.

आज आसाम, तिनसुखियाच्या एका गृहस्थाचे पत्र वाचून मी कळवळलो. स्त्रीजातीविरुद्ध एक निंदात्मक पुस्तक त्याने वाचले. त्याने भारून जाऊन घरच्या बायकांची कसोटी सुरू केली. त्यांचे सगळे दोष पाहून आणि आपापसांतील भांडणे पाहून चिडला. लोकहि त्याच्यावर चिडले. पुढे वेडा झाला. आता काय करावे हे बिचाऱ्याला सुचत नाही. त्याच्या पत्रात अतिशयोक्ति असेल, पण मला तसे वाटले नाही. मी त्याला लिहिले–'हजारो वर्षें दास्यात काढावी लागली, तर कुणाचाहि स्वभाव विकृत होईल. आणि आपले अविभक्त विशाल कुटुंब म्हणजे गोकुळ असावयास पाहिजे, पण पुष्कळदा तेथेच प्रत्यक्ष नरक दिसतो. आपल्या संस्कृतीची विशुद्धि केल्यावाचून जगणे शक्य नाही.'

मुंबई

९–६–७१

आजचा दिवस मुंडक-उपनिषदाच्या सहवासात गेला. या ऋषीला

अनुभव झालेला आहे आणि म्हणून शब्द तोलून बोलण्याची किंवा लिहिण्याची त्याला आवश्यकता वाटत नाही. त्याचे हृदय आहे काव्यमय. तेव्हा तोंडून जशी भाषा निघेल तशी बोलण्याची त्याची तयारी आहे.

'अतिवादी' शब्द याला आवडत नाही आणि छांदोग्यातील एक ऋषि हौसेने म्हणतो, "मी आहेच अतिवादी. मी लपवू कशाला ?––अतिवादी न अपन्हुवीत. मी साफ म्हणेन की माझ्या अतिवादाला सत्याचा–म्हणजेच–अनुभवाचा पाठिंबा आहे." (अतिवादी शब्दाचा मी अर्थ करतो mystic) मुंडकाच्या ऋषीला वाटते की अतिवादी म्हणजे शास्त्राला सोडून बोलणारा. त्याचे म्हणणे असे की शास्त्रे लिहिणारे लोकदेखील अनुभवी होते. आणि सर्वांचा अनुभव एकच असणार तेव्हा शास्त्रांना सोडून बोलू नये. छांदोग्याचा ऋषि म्हणतो, "मी सत्याला धरून बोलतो. शास्त्रे कदाचित् खोलात शिरत नसतील त्याला मी काय करू ?"

मनुस्मृतीमध्ये अतिवाद शब्द वाईट अर्थाने आला आहे. तेथे अतिवाद म्हणजे कठोर वचन, शिवीगाळ. मनु म्हणतात, 'लोकांचा अतिवाद सहन करावा. उलट कुणाचा अपमान करू नये.

आज एक अमेरिकन बाई भेटली–मीरा सद्‌गोपाल. नवरा पंजाबी आहे. ही बाई तीन वर्षे झाली भारतात स्थायी झाली आहे. मध्यप्रदेशात जबलपूरच्या जवळ एका खेड्यात कित्येक लोक "किशोर भारती" म्हणून शाळा किंवा संस्था काढणार आहेत. सद्‌गोपाल त्यात असणार. यामुळे मीरेशी शिक्षणाची महत्त्वाची चर्चा झाली. मुलांना शिक्षकांच्या घरात राहून घरचे संस्कार मिळाले पाहिजेत आणि छात्रालयाचे संस्कारदेखील मिळाले पाहिजेत. त्याचप्रमाणे मुलींनादेखील कन्या–छात्रालयात स्वराज्य चालवण्याचे शिक्षण मिळाले पाहिजे. हिंदु संस्कृतीच्या आदर्शातदेखील पुष्कळ सुधारणा झाली पाहिजे. सर्व-धर्म-परिवार स्थापन झाले पाहिजेत वगैरे पुष्कळ गोष्टी आम्ही बोललो. मांसाहार, मत्स्याहार, कुक्कुट-पालन, आश्रमी वातावरण–अनेक विषयांची चर्चा झाली. सुधारक आर्य समाजातदेखील सुधारणा करणे आवश्यक आहे, इत्यादि.

मुंबई

१०–६–७१

आज कुमारी रेइकोने, येथील समाजाचे निरीक्षण घडल्याने, एक प्रश्न विचारला. महत्त्वाचा होता. "घरात किंवा समाजात वडील माणसांना आदर दाखवण्यासाठी काय करावे, कसे वागावे, याचे आम्हाला लहानपणापासून शिक्षण मिळते. येथे तसे काही दिसत नाही. याचे कारण काय ?" प्रश्न खरा असल्यामुळे मला चांगला झोंबला. वस्तु स्वीकारून मी म्हणालो, "माझ्या लहानपणी अशी अनवस्था किंवा बेदरकारी नव्हती. आम्हाला 'विवेका'चे चांगले शिक्षण मिळे आणि त्यामुळे सामाजिक व्यवहार सुगंधी होऊन शोभत असे.

आता आईबापांना मुलांकडे लक्ष द्यायला वेळच नसतो. आस्थाहि नसते. ते मानून चालतात की हे शिकवण्याचे काम शिक्षकाचे आहे. मुलांना शाळेत पाठवतो, फी देतो. याहून अधिक काय करणार ?

शिक्षक म्हणतात, 'आम्ही परीक्षेचे विषय शिकवणार. मार्क मिळवण्याची कला समजावून सांगू. शिष्टाचार किंवा 'विवेक' हा काही परीक्षेचा विषय नाही. तेव्हा ते काम आमचे नव्हेच." अशा रीतीने नव्या पिढीची दोन्ही बाजूंनी हेळसांड होते.

शिक्षणखाते म्हणते 'या देशात असंख्य जाती, अनेक धर्म. प्रत्येकाचा शिष्टाचार निराळा. पुन्हा प्रांतनिहाय फरक पडतो. आम्ही काय शिकवावे ?' अशारीतीने सर्वत्र अराजक आणि असंस्कारिता पसरली आहे इत्यादि सांगून परिस्थिति स्पष्ट केली. पण सगळ्या बाजूने विचार करणाऱ्या मला आणखी एक गोष्ट सुचली, ती मात्र मी मांडली नाही.

शिष्टाचार तरुणांना शिकवला पाहिजे खरा. पण तो त्यांना सहजपणे पटून, त्यांचा झाला पाहिजे. पण ज्या समाजात घरीदारी आणि समाजात उच्चनीच भाव माजला आहे, तेथे वडील मंडळी आणि श्रेष्ठ जाती, आपला हक्क म्हणून आदर मागू लागतात. कोण किती श्रेष्ठ, किती लहान, याचे कोष्टक अवाढव्य बनले आहे. आदर हक्काने मागितला तर त्यातून जालीम आणि गुलाम असे वातावरण उत्पन्न होते. हल्लीच्या परिस्थितीत

ते मान्य होणे शक्य नाही आणि इष्ट तर नाहीच नाही. समानतेवर आधारलेल्या समाजाचा नवा शिष्टाचार कुणीच ठरवला नाही. आणि जुना चालणे शक्य नाही आणि इष्टहि नाही. म्हणून असंस्कारितेचे सर्वत्र साम्राज्य पसरले आहे. ही स्थिति सुधारलीच पाहिजे.

मुंबई
११-६-७१

आज चि. सरोजने डॉ. देसाईजवळ जाऊन दात दाखवले. त्यांनी गॅस देऊन दोन दात काढले. दुसरा काढतांना गॅसचा परिणाम कमी झाल्याने दुःख जाणवले आणि ते सगळा दिवस-रात्र राहिले. सरोजचे दुःख पाहून माझे हृदय कळवळले, पण करणार काय ? मला फक्त बर्फाचा इलाज सुचला तो सांगितला. सरोजची सहनशक्ति असाधारण आहे. त्यामुळे सेवा करायला पुढेपुढे धावते. मला हे गुपचुप पाहावे लागते. असो, हे सर्व तिच्याच हाती कसे लिहिवावे ?

आज येथील गांधीस्मारक निधीचे मुख्य श्री झाईवाल श्री. पागे यांच्या वतीने आले होते. पू. बापूजींनी चि. रामदाससाठी गीतेतील सोपे श्लोक पसंत करून 'रामगीता' तयार केली. तिची 'रेकार्ड' करणार आहेत. कल्पना सुंदर आहे. वेदाची सविस्तर रेकार्ड करून ठेवण्याची लाडांची महत्त्वाकांक्षा होती, ती आठवली. रेकार्ड करायची तर ती अत्यंत शुद्ध असली पाहिजे. या रेकार्डसाठी प्रास्ताविक चार शब्द अधिकारी पुरुषाचे असावेत, म्हणून पाग्यांनी विनोबाकडे तपास केला. ते म्हणाले, "माझे मौन आहे. मौनाची रेकार्ड घेऊ शकता !"

मला झाईवालांनी विचारले. मी आढेवेढे न घेता 'हो' म्हटले. पण माझा आग्रह सांगितला की गीतेच्या श्लोकांचे उच्चारण अतिशय शुद्ध असावे. तरच मी प्रास्ताविक चार शब्द बोलू शकेन. रामगीतेतील बापूजींच्या निवडीशी माझा काही गूढ संबंध आहे बाबा राघवदासनी "रामगीता" माझ्याकडे पाहिली. हरिजनासाठी ती छापून प्रकाशित केली

पाहिजे, असे वाटून ते बापूजीकडे गेले. त्यांनी "आम्हा तिघांची संमति असेल तर प्रकाशित करा" असे सांगितले. हे श्लोक आता चाळीस-बेचाळीस वर्षांनी पुन्हा माझ्यासमोर येतात. तेव्हा त्यांचे आता नव्याने ध्यान करीत आहे. गीतेचे, बापूजींचे उच्चारण शुद्ध करण्यासाठी त्यांना मी वेळ दिला होता. माझ्याच आग्रहामुळे "अनासक्ति योग" हे नांव सुचले आणि आता "रामगीता" पुन्हा हातात येत आहे. संबंध गूढ खरा !

मुंबई
१२-६-७१

थोडेच दिवस का होईना, रेइकोसारख्या जपानी मुलीला रोज एक तास शिकविण्यात घालविल्याने माझ्यातील शास्त्रीय शिक्षक जागा झाला. आर्यभाषातील ध्वनि जपानी लोकांना पकडणे कठीण. तेव्हा प्रथम कान तयार करावयाचे. मग गळा, जीभ आणि ओठ कसे तयार करावयाचे याचे शास्त्र डोक्यात व्यवस्थित झाले. अक्षरे कशा क्रमाने शिकवावीत यावर मी एके काळी पुष्कळ लिहिले होते. त्याची उजळणी झाली.

त्यानंतर येथील लोकांचे विचार, रिवाज, शिष्टाचार, राष्ट्रीय पूर्वग्रह, निरनिराळ्या वर्गांचे परस्पर संबंध, सर्व-धर्म-समभाव वगैरे अनेक गोष्टींची चर्चा छाननी करता करता विदेशी लोक, आजचे युग, पाश्चिमात्य लोकांचे प्राबल्य—इत्यादि विषयांचे चिंतन घडले. आता यावर लहान लहान स्वतंत्र प्रकरणे लिहिली पाहिजेत.

"सन्निधि" मंडळाच्या दृष्टीने आजचा दिवस महत्त्वाचा होता. अमृतलाल[1] आणि हसमुख[2] व्याही झाले त्यामुळे ब्राह्मण-बनिया हा भेदच मावळला आणि निरर्थक झाला. शिक्षणाला वाहून घेतलेले दोन राष्ट्रसेवक आणि त्यांची कुटुंबे ही जवळजवळ एकवर्णीच ठरतात. आणि तरीहि सवर्ण विवाह होऊ नयेत, या माझ्या नव्या नियमालादेखील बाधा येत नाही.

[1] श्री अमृतलाल नाणावटी काकासाहेबांचे अनेक वर्षांचे सहकारी.

[2] श्री हसमुख व्यास —काकासाहेबांचे एक अंतेवासी.

आता समाज 'नाही नाही' म्हणता इतका पुढे गेला आहे की मिश्र विवाहाला पुरोहित सहज मिळतात. सर्व जातीचे आणि धर्माचे लोक निःशंकपणे आशीर्वाद देतात. तेव्हा आता 'विवाह स्वजातीत होता कामा नये,' हा नियम पाळणे जड जाणार नाही. 'कन्यादान' या विधीतदेखील अर्थ उरला नाही. आमच्या 'समाश्रय-विधी'त बापाच्या संमतीची अपेक्षा आहे. आता तीहि काढून टाकली पाहिजे. गांधींनी स्वतःच्या विधीत ती सुधारणा केलीच आहे.

भिन्न धर्मीय विवाहांमध्ये पुरोहितांना स्थान नसावे, आणि केवळ सरकारी नोंदणी खेरीज काही विशेष असले पाहिजे. यासाठी दोन्ही धर्म-समाजातील संस्कृतिसंपन्न पुढारी हजर असावेत आणि सग्या सोयऱ्यांना आमंत्रण असावे. भारतात ही सुधारणा झपाट्याने सुरू झाली तर तिचा प्रभाव साऱ्या जगावर पडेल. अमेरिकेवर प्रभाव पाडण्याची हीच उत्तम संधि आहे. सांस्कृतिक क्षेत्रांत भारत आणि अमेरिका जवळ येण्यात जगाचा फायदा आहे.

मुंबई
१३–६–७१

आयुर्वेदाचार्य अंतुभाई भेटावयाला येणार होते. पण त्यांचा-आमचा वेळ जुळेना तेव्हा त्यांनी पांच पुस्तके भेट म्हणून पाठवली. पुस्तके चांगली आहेत. आजकाल इंग्रजीत लिहिलेल्या पुस्तकांचाच बोलबाला होतो. विशाल जनतेसाठी लिहिलेल्या उत्तम पुस्तकांचीदेखील कदर होत नाही. आपला हा स्वभाव फार जुना आहे. बुद्ध भगवान् आणि भगवान् महावीर यांनी लोक-भाषेत लिहिले म्हणून संस्कृतभक्तांनी त्यांची कदर केली नाही. पण शेवटी विशाल जनतेत त्याचाच प्रचार झाला. संस्कृतवाल्यांनी यावर तोडगा काढला. बुद्धाला विष्णूचा अवतार म्हणून मान्य केला, पण जाहीर केले की कलियुगात लोकांना भ्रमात टाकण्यासाठी तो अवतार होता.

बौद्ध आणि जैन धर्माचे सामर्थ्य ओळखून संतांनी लोकभाषेत साहित्य दिले आणि त्यातून भक्तिमार्गाचा प्रचार केला.

पण प्रतिष्ठित लोकांचे दास होण्याचा स्वभाव कोठे जाईल ? पठाण-मुगलांचे राज्य झाले आणि आपल्या लोकांनी अरबी-फारसी भाषांची भक्ति चालवली. ती विदेशी राज्ये नष्ट झाली तरीहि आपले लोक अरबी-फारसीची प्रतिष्ठा सोडावयाला तयार नव्हते. शेवटी उर्दू भाषेने येऊन अरबी-फारसीचे प्रस्थ मोडले. उर्दूचा अखिल भारतीय प्रभाव सुमारे शंभर वर्षे टिकला.

तोच प्रकार आता इंग्रजीच्या बाबतीत दिसून येतो. इंग्रजांचे राज्य गेले प्रजाराज्य झाले. आणि आश्चर्य हे की स्वराज्य झाल्यानंतर इग्रजीचे प्रस्थ कमी न होता वाढले. इंग्रजीवाल्यामध्ये नैतिकता कमी आणि मौलिकताहि कमी आणि नेतृत्व त्यांचेच ! हे तुटल्यानंतरच देशीभाषा जोम धरतील आणि लोकभोग्य साहित्याची प्रतिष्ठा वाढेल.

आज आंधळा विद्यार्थी रमेश बोरसे हा मुद्दाम भेटावयाला आला होता (मी त्याला भेटण्याची इच्छा व्यक्त केली होती). हा तरुण तडफदार आहे. आसपासच्या लोकावर प्रभाव पाडू शकतो. वाचतो पुष्कळ, पण विचार कच्चे. अशा लोकांना आपण प्रेमाने भेटून सुधारू शकलो तरच नव्या पिढीचे वातावरण निरोगी होईल. ज्यांना ज्यांना साधेल त्यांनी हे काम केलेच पाहिजे.

बीबी अमतुलसलामचे पुतणे श्री. वदूद खानच्या घरी जाऊन आलो. सर्वांनी (त्यांच्या हिंदु पत्नीसहित) मिळून प्रार्थना केली. वातावरण मला फार आवडले. देव अशांचे भले करो.

आगगाडीत

१४–६–७१

शेवटी चौदावी तारीख उगवली. ही तारीख ठरविण्यात दोन गोष्टी निर्णायक होत्या. ता. १२ ला चि. प्रमिलेच्या लग्नाला येथे मुंबईला हजर राहणे आणि दिल्लीला जाऊन रेल्वे पास सजीवन करण्यासाठी पुरेसा वेळ मिळवणे.

चि. रेड्कोला र, भ सारख्या अक्षरांचे उच्चारण शिकवता शिकवता ही मुलगी लहान अर्भक आहे असेच वाटे. हिला भ काही केल्या पकडता येईना. कानालाच ब आणि भ चा फरक ओळखता येईना. इतक्यात मला एक युक्ति सुचली. इंग्रजी दोन शब्द– bob आणि hot अलग अलग बोलायला सांगितले. मग घाईघाईने पण चार अक्षरे बोलायला लावली. आणि शेवटी तीन अक्षरे करून 'बॉ भोट' बोलायला लावले. काय करते आहे बिचारी ! ओठातून तिन्ही अक्षरे बरोबर निघाली आणि कानालादेखील व आणि भ चा फरक पकडता आला. तिला आनंद झाला पण मला तिच्याहून अधिक आनंद झाला. हा कालचा अनुभव. आज वर्ग घ्यावयाचा नव्हता पण आता महिनाभर ही मुलगी शिकायला येणार नाही, या कल्पनेने विषाद वाटला. पुत्री-वात्सल्यापेक्षा शिष्या-वात्सल्य कमी प्रबळ नसते असा प्रथमच अनुभव झाला.

स्टेशनवर प्रमिला, कुसुम आणि रेड्को आनंदाने भेटल्या. त्या वेळीदेखील माझे वात्सल्य जागे होते. आजकाल अलिप्तपणा इतका अंगवळणी पडला आहे की वाटत होते की मी अगदीच कोरा झालो आहे. यामुळे दोन दिवसाचा वात्सल्याचा अनुभव आनंददायक झाला. ताबडतोब माझ्या साधनेने मला विचारले, 'यात आसक्ति तर नाही ना ?' हृदयाने खात्री दिली "आसक्तीला आता अवकाश नाही."

आगगाडीत चि. मदालसेला[१] पत्र लिहिले आणि संस्कृत पंडित नलिन भट्टांनादेखील. मन म्हणाले, उपनिषदाविषयी आसक्ति आहे, हिचा इन्कार करता येईल काय ? आसक्ति माणसांविषयी असती तर आपण चकित होऊन चित्ताला सांभाळतो. उपनिषदांबरोबर त्या काळच्या ऋषींविषयीच्या आत्मीयतेचे काय ?

---

१ सौ. मदालसा नारायण– स्व. श्री. जमनालाल बजाज यांच्या कन्या आणि श्री श्रीमन्नारायण यांच्या सहधर्मचारिणी.

दिल्ली

१५-६-७१

बऱ्याच दिवसांनी दिल्लीला घरी आलो. स्टेशनवर वसंत व्यास आणि तारांना पाहून आनंद झाला. त्यांचा उपयोगहि झाला. सामानाकडे मला कोणी पाहू देत नाहीत. तेव्हा लाचारीने गप्प बसतो. नाही तर आज लोणच्याचा नाश झाला नसता. पण आता मीहि अगदी सुखदु:खानी उदासीन झालो आहे.

आज आल्यापासून रेवरंड डोकच्या गांधी-चरित्राच्या गुजराती भाषांतराची प्रस्तावना वाचत आहे. ही प्रस्तावना ऐतिहासिक महत्त्वाची आहे. नव्या आवृतीत ती घेतलीच पाहिजें, असा माझा आग्रह नवजीवनने मान्य केला आहे.

ऐशीं पानांची अघळ-पघळ प्रस्तावना काटछाट करून आटोपशीर केली पाहिजे की काय अशी शंका मनात येऊन प्रस्तावना वाचू लागलो.

प्रस्तावनेत त्या वेळचे गांधींचे विचार, त्यांच्या स्नेह्यांनी-प्राण जीवन मेहतांनी प्रामाणिकपणे सविस्तर मांडले आहेत.

पुढे पुढे यांपैकी कित्येक विचारांचा आग्रह गांधींनी सोडून दिला. पण मूळ विचार हृदयातून काढून टाकले नाहीत. कित्येक बाबतीत ते अनुभवाने शहाणे झाले. त्यांच्या काही विचारात आमूलाग्र परिवर्तन झाले. हे जरी खरे असले तरी गांधींजीच्या मूळ भूमिकेचे महत्त्व कमी होत नाही.

मला वाटते, या पुस्तकातील डॉ. मेहतांच्या प्रस्तावनेचा मी आग्रह धरला, त्याप्रमाणे नव्या आवृत्तीला एक प्रस्तावना देणे हे माझे कर्तव्य होते. पाहू आता कसे होते ते. प्रस्तावना लिहिण्याचे ठरले तर आजचे हे मनन त्या वेळी उपयोगी पडेल.

आज संध्याकाळी द्वारकाप्रसाद पंजाबी सहकुटुंब येऊन भेटून गेले. त्यांच्याबरोबर नारायण मलकानीहि आले. याचा मला विशेष आनंद झाला. मी त्यांना म्हणालो की, आम्हाला गांधींजीची ओळख झाली त्या पूर्वीचा आमचा परस्परांचा परिचय. मलकानी म्हणाले, 'आता मला 'नारायण म्हणून बोलवणारे दोन तीनच उरले असतील.' श्री पंजाबी चांगले प्रेमळ

संस्कार-वांच्छू, सेवाभावी सद्‌गृहस्थ आहेत. यांचा परिचयदेखील आनंद-दायक आहे.

नवी दिल्ली
१६-६-७१

पुष्कळ दिवसांनी पुन्हा प्रार्थना भवनमध्ये सर्वांनी बसून प्रार्थना केली. याचा आनंद न्याराच होता! चि. अमृतलाल दोन्ही घरचे व्याही झाले याविषयी बोललो.

आज सध्याकाळी नेहमीप्रमाणे बाळाच्या घरी गेलो. बाळाने सांगितले, "आता तुम्ही एकटे येऊ नका, कुणाला तरी बरोबर घेऊन या."

आज पट्टीकल्याणचे ओमप्रकाशजी त्तिखा भेटले. जुना गोड संबंध. त्यांनी सप्टेम्बरमध्ये तीन व्याख्याने चंडीगढला देण्याचे आमंत्रण दिले. आणि विषयहि सुचविले. (1) 'Aristocracy of wealth," (2) Aristocracy of caste and culture' (3) "Aristocracy of intellect and philosophy." तिन्ही विषय मी मान्य केले. कारण या तिन्हींमध्ये भारतीय संस्कृतीची उज्ज्वल बाजू आणि त्यातील मोठ्यातली मोठी कमजोरी–याविषयी बोलता येईल आणि तीन व्याख्याने मिळून एक पुस्तिका होईल.

आपल्या संस्कृतीतील हे दोष जुन्या काळच्या सगळ्याच संस्कृतीत आणि धर्मात प्रगट झाले आहेत. ते युगच संस्कारी आणि असंस्कारी, समर्थ आणि असमर्थ, स्वकीय आणि परकीय–असा भेद करण्याचे होते.

Aristocracy शब्दाचा पूर्ण भाववाचक देशी शब्द कोणचा ? या शब्दात वंशपरंपरागत गुणवैशिष्ट्य, संस्कारिता, वैभव आणि अधिकार–या सगळ्या गोष्टी येतात. थोड्या लोकांनी आपल्या वंशपरंपरागत श्रेष्ठत्वाच्या जोरावर बहुजनांवर राज्य करावे आणि आपले नेतृत्व स्वाभाविक आहे, असे सिद्ध करावे–हे रहस्य आहे Aristocracy चे.

यासाठी नेमका शब्द आहे 'अभिजात्य'. पण तो पंजाबी लोकांना

कसा पचावा ? मी निरनिराळे शब्द सुचवले. 'धनपतींचा वैभवाधिकार'. 'जातिसंस्काराचे महात्म्य' आणि 'बुद्धि वैभवाचे आधिपत्य'.

आपण द्विज जाति आणि शूद्र असा भेद केला. पश्चिमच्या लोकांनी Elite–अेलीत–वर्गाचे महात्म्य स्थापित केले. औद्योगिक युग सुरू होताच पश्चिमेकडील धनपति पुंजीपति बनले. पुढे त्यांच्या विरुद्ध श्रमजीवींनी बंड केले. आणि बुद्धिजीवी लोकांनी दोघांची सेवा चालवली.

दिल्ली

१७–६–७१

आमच्या लहानपणी आजाऱ्यांना घरगुती औषधे देत असत. तेवढ्याने भागे. विशेष असेल तरच वैद्याला बोलवायचे, युनानी पद्धतीचे नावहि ऐकले नव्हते. ते प्रथम सावनूरच्या हकीमजींच्या तोंडून ऐकले. औषधाचा प्रकार तोच. (युनानी औषधे जरा स्वादिष्ट असत.) पुढे बघता बघता डॉक्टरी इलाज–अॅलोपॅथीचें प्रस्थ माजले. तेव्हापासून आतापर्यंत नेहमी निंदा ऐकतो अॅलोपॅथीची, पण शेवटचा आधार अॅलोपॅथीचाच !

आम्ही कारवारला गेलो आणि आमच्या घरी होमीओपॅथी शिरली. ही मंगळूरहून आली होती. आम्हा सर्वांना ती आवडली. खर्च कमी, घेण्याचा त्रास कसलाच नाही, पण मुख्य गोष्ट म्हणजे रोग कां होतात ? आरोग्य कशाला म्हणावे ? वगैरेची चर्चा प्रथमच मनात वावरू लागली.

पुढे निसर्गोपचार समोर आला. याची चर्चा आणि विवेचन फारच आवडले. पण क्विनीन घेऊन, मलेरियातून उठून आठ दिवसात कामाला लागावे आणि शरीरातील विष सावकाश काढत राहावे, हे सोपे आहे. पण मलेरिया काढण्यासाठी सहा महिने निसर्गोपचारात अडकून राहणे' हे कसे शक्य होईल ? आणि पुन्हा मलेरिया होणार नाही याची खात्री ते देत नाहीत. . अशा शंका बळावल्या, अॅलोपॅथीचे मानस कितीहि संकुचित असो, त्यांचे उपचार व्यर्थ असोत, पण हे लोक (पश्चिमकडचे) सतत नवे नवे प्रयोग करतात. असंख्य लोकांचे अनुभव एकत्र करतात. नवीन विचार

करायला तयार. या वैज्ञानिक वृत्तीविषयी आदर वाटतो. ही वैज्ञानिक वृत्ति इतर पंथीयांनीदेखील स्वीकारली पाहिजे.

(येथे एक विनोद आठवतो.) एकदा लाड[१] म्हणाले होते. 'ॲलोपॅथी वगैरे सगळ्या 'पॅथी' अजमावल्या. शेवटी 'ॲपथी' अजमावण्याचे ठरविले !! इंग्रजीत 'ॲपथी' म्हणजे उदासीनता-बेदरकारी, भावनाशून्यता' जडता. या विनोदामागील विषादच वरील विवेचनाच्या शेवटी मनात घर करतो. मनुष्याला अखेरपर्यंत शरीर वागवावयाचे असते. म्हणून प्रत्येकाने आरोग्याचे चिंतन शेवटपर्यंत केलेच पाहिजे. वैज्ञानिकतेवाचून दुसरा उपाय नाही. सत्यनिष्ठा, प्रयोग आणि अनुभवनिष्ठा

दिल्ली

१८-६-७१

तत्त्वज्ञान, वेदांत आणि इतर आध्यात्मिक क्षेत्रांचा परिचय उत्तम-प्रकारे झाल्यानंतरच चित्ताचे चिंतन जीवनाकडे वळले. जीवनात केंद्रीय वस्तु आहे आत्मा. तो सर्वव्यापी आहे, सर्वसमर्थ आहे, सर्व कल्याणकारी आहे. याचा अर्थच असा झाला की आत्मप्राप्तीदेखील जीवनविकास आणि जीवनसिद्धि यासाठी आहे. आपण जन्माला येतो जीवनसिद्धीसाठी. आणि तिची साधना जीवनद्वाराच होऊं शकते.

किती चांगले झाले की धर्म, आत्मा, परमात्मा यांचे पौढ आणि खोल चिंतन झाल्यानंतरच व्यापक, सार्वभौम जीवनसाधना चिकटली. जीवनाची कल्पना जर एकांगी, उथळ किंवा विकृत असती, तर जीवन-साधनेने मला खड्ड्यात नेऊन टाकले असते. म्हणून आता सर्वांना सांगतो- 'प्रथम आत्म्याला ओळखा. त्याला जीवनाच्या केंद्रस्थानी ठेवा आणि मग जीवनउपासना उत्कटतेने चालवा'.

आत्म्याचा परिचय हे मुख्य काम हा उपदेश ऋषिमुनींनी पूर्ण आग्रहाने केले. आत्म्याची शुद्ध कल्पना करून दिली सर्व आचार्यांनी. इंद्रियांची

---

१ स्व. पु. मं. लाड I. C. S.

आसक्ति प्रथम तोडली तपश्चर्येने आणि वैराग्याने. त्यानंतर साक्षात्कार झाला औचित्याचा आणि कलात्मकतेचा. त्यामुळे रसिकता विशुद्ध झाली. वैराग्यातदेखील सुंदरता अनुभवास येऊ लागली. अशा रीतीने जीवनशुद्धि प्रथम त्यानंतर सर्वांगीण सामर्थ्य. इंद्रियजय मनावरील काबू. जीवनाच्या स्वरूपाचे संपूर्ण ज्ञान. इतके झाल्यानंतर जीवनसमृद्धि होऊ लागली आणि समृद्धीचा स्वभावच असा की देण्यानेच तिचा खरा उपयोग होतो. त्यक्तेन भुंजीथाः संत यापुढे जाऊन म्हणतात 'दुणावे की देता'.

इतर लोक धनसंपत्ति देतात. मी आहे शिक्षणशास्त्री मी देऊ शकतो ज्ञान, अनुभव, जीवन-चिंतन आणि कधीकधी श्रद्धा.

आणि ज्याला अद्वैत पटले तो ते देणार तरी कसे ? स्वतःच स्वतःला द्यावयाचे म्हणजेच उपभोगावयाचे. 'इष्टैः सह भुज्यताम्' आणि 'त्यक्तेन भुंजीथाः' एकच आहेत. श्रेष्ठतम आनंद नेहमी अद्वैतानंदच असतो.

हे लिहीत असताना मनात शंका आली–अनुभव घेणे याला साक्षात्कार म्हणता येईल का ? या शब्दात 'अक्ष्' म्हणजे 'डोळे' याचा व्यापक अर्थ केला पाहिजे.

दिल्ली

१९–६–७१

आज रात्री उमाशंकर भेटले. त्यांना जेवायलाच बोलावल्यामुळे बोलायला यथेच्छ वेळ मिळाला. प्रथम ' चि. चंदनने ' या पुस्तकाची नवी आवृत्ति काढणार आहोत, हे सांगून संपादन कसे होणार याची कल्पना त्यांना दिली. पहिल्या आवृत्तीला त्यांची प्रस्तावना होती म्हणून विस्ताराने सांगितले. त्यांना संपादनाची माझी दृष्टि पसंत पडली. आता चि. सतीश त्याच्या आग्रहाच्या बाबतीत एकटाच पडला, हे बरे झाले.

त्यानंतर मीच इंदिरेचा प्रश्न काढला. पूर्व-बंगालसंबंधाने ती फारच संभाळून, योग्य पावले टाकीत आहे. परवा काश्मीरमध्ये तिने जे तिकडील लोकांना म्हटले की, 'तुम्ही भारतात रहावयाला तयार झालात, याचे

शहाणपण आज स्पष्ट दिसून येते.' किती सौम्य आणि नेमकी सूचना पूर्व बंगालच्या मुसलमानांना! उमाशंकरचा इंदिरेशी चांगला संबंध आहे. दोघे एकमेकांची योग्यता ओळखून आहेत. याचा मला संतोष आहे.

गुजरातच्या राजकारणावर उमाशंकरचा प्रभाव चांगला पडणार. पण प्राणी बराच सौम्य आहे. त्याला याहून अधिक प्रभाव पाडणे शक्य आहे, इष्ट आहे. मी जर जन्माने गुजराती असतो तर अशा वेळी किती तरी केले असते. आज एका माणसाच्या स्वार्थी नीतीमुळे संबंध प्रांताला दबून दबून चालावे लागते. स्वार्थी आणि अभिमानी मनुष्य किती आंधळा होऊ शकतो, याला काहीच मर्यादा नसावी हे दुर्दैव! आणि दुःखाची गोष्ट म्हणजे, सगळी नीति गुजरातच्या हिताला किंवा स्वभावाला अनुकूल नाही.

म्हणे * * * वारले तेव्हा दुःखवटयाच्या सभेसाठी मला अध्यक्ष म्हणून बोलावण्याचे घाटत होते. पण तारखा अनुकूल नव्हत्या. मी प्रवासात असणार म्हणून विचार रद्द झाला. ईश्वरानेच मला बचावले. राजनीतीत मतभेद असणे हे काही अडचणीचे नव्हते. पण त्याच्याविषयी माझ्यातला वात्सल्यभाव कायम आणि अबाधित असला तरी त्याने दृढतेने सर्व संबंधाचे शून्य केले होते. अशा वेळी श्रद्धांजलीवर जुना संबंध लादला जाणे दुर्दैवच झाले असते.

दिल्ली

२०-६-७१

घरातील सगळे जण एकत्र बसून जेवण्याचा आग्रह जुन्या लोकात फार होता. तो हल्ली बराच कमी झाला आहे. प्रत्येकाला आपापला वेळ सांभाळावा लागतो. एकत्र बसून जेवणे जुन्या काळची luxury! 'कामगार' लोकांना ती कशी झेपावी? अशा युगात सर्वांनी मिळून सामुदायिक प्रार्थनेचा आग्रह आम्ही आश्रमवासी चालवतो. आश्रमवासियांमध्येदेखील माझा आग्रह विशेष. सहभोजी आणि सहप्रार्थी यांचे महत्त्व समजावण्यासाठी इंग्रजी शब्द 'companion'चा मूळ अर्थदेखील मी समजावतो.

आमचा विश्वास आहे की सहभोजन, सहप्रार्थना, सहयात्रा आणि सहचिंतन–या गोष्टींच्या द्वारेच सामुदायिक आत्मा जागृत होऊ शकतो. मी तर मानतो की सामुदायिक आत्मा प्रथम जेथे नव्हता तेथे आपण उत्पन्न करत आहोत. अशा भावनेतूनच जातिसंस्था उत्पन्न झाली. निरनिराळे धर्म आणि पंथ यांची संघटने स्थापन झाली. राष्ट्रीयता आणि मानवता लोकांना पटू लागल्या.

आणि अशा प्रवृत्तीमुळेच संकुचित किंवा एकांगी संगठन बाधक आहे, भयानक आहे ही गोष्ट मानवाला पटू लागली.

रक्ताचा संबंध आणि लग्नाचा संबंध–या जोरावर कुटुंबसंस्था उत्पन्न झाली. जातिसंस्थेच्या पायामध्ये रोटी-बेटी व्यवहार (आणि लोटी व्यवहार–एकमेकांच्या हातचे पाणी पिण्याचा) हे मानले जातात. पूर्वी एका नदीचे पुत्र, एका घाटीचे रहिवाशी, एका समुद्र किनाऱ्याचे खलाशी– अशांची संगठनेदेखील स्वाभाविक होती. पहाडामुळेदेखील आपुलकी उत्पन्न होऊन संगठने होत असत.

त्या त्या काळी एकत्र आणणारे फायद्याचे समर्थ तत्त्व कोणते, हे ठरवावे लागते किंवा असे समर्थ तत्त्वच आपले राज्य लोकावर लादते. समान सोयी, समान संकट, समान रागद्वेष किंवा समान गुरुभक्ति–अशी निरनिराळी सांस्कृतिक तत्त्वें आपापला प्रभाव पाडत.

मानवप्राण्याला संगठन-निष्ठा अत्यंत आवश्यक आहे. पण त्याबरोबर कालग्रस्त संगठने तोडताहि आली पाहिजेत, नाही तर संगठनेच जीवन-विकासाची आणि मानवतेची शत्रु बनतात.

दिल्ली

२१–६–७१

आजचा दिवस फार जुन्या गोष्टी ताज्या करण्यात गेला. चि. अनुसूया आणि श्री. राधाकृष्ण बजाज यांचे लग्न जुळवण्यात जमनालालजींनी माझी मदत घेतली होती. जाजूजी कुटुंबात माझा प्रवेश. लहानशा गौत-

माचा जन्म, त्याच्या बाळलीला. आज तो ब्रह्म-विद्या-मंदिराचा एक समर्थ कार्यकर्ता आणि विनोबा साहित्याचा प्रवक्ता झाला आहे. चि. दिलीप सर्जन झाला आहे. मी म्हणालो, "चांगला धंदा आहे. लोकांची इंद्रियें कापावयाची आणि धन्यवाद मिळवावयाचे." बिकानेरच्या एका मुलीशी नुकतेच त्याचे लग्न झाले आहे. मधुचंद्रासाठी काश्मीरला जात आहे. त्याची पत्नी सरोज विदुषी आहे. या नव्या पिढीशी विनोद करताना आणि हसता खेळता संस्कृतीच्या महान सिद्धांताची चर्चा करताना खूप समाधान वाटते. आमच्या पिढीपासून सगळे संस्कार घेऊन ही स्वतंत्र वृत्तीने नवनिर्मितीची तयारी करीत असलेल्या लोकांना पाहून परंपरेचा पुरा अर्थ ध्यानात येतो.

आमच्या पुरुषार्थाची कल्पना आमच्या पूर्वजांना होऊ शकली नाही. तुकारामाने वैदिक संस्कृतीच्या अभिमानी पंडितांना सांगितले, "वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा । येरांनी वहावा भार माथा।" अगदी याच वृत्तीने, भारतीय संस्कृतीचे रहस्य आम्ही आमच्या वडील माणसांना समजावत होतो. आता ही नवीन मुले आपल्या परीने आम्हाला समजावणार की भारतीय संस्कृतीचे रहस्य तुम्ही तुमच्या काळी व्यापकपणे समजला. पण आता ते कामाचे नाही. जुने तोडण्यात तुमचा वेळ गेला. स्वराज्य मिळवले आणि भारतीय आत्मा विचारदास्यातून तुम्ही मुक्त केला, हे तुमचे उपकार. पण नवनिर्मिति आम्हीच करणार.

मी नव्या पिढीला म्हणतो, "तुमचा अधिकार मला मान्य आहे. तुमच्या स्वातंत्र्याच्या आड आम्ही येणार नाही. पण तुम्हा लोकांचे अध्ययन फारच थोडे. चिंतनाचे ठिकाणच नाही. तुम्ही लोक प्रवाहपतित आहात. नवनिर्मितीचा प्राण तुमच्यात दिसत नाही. आमचा विरोध करा. आम्हाला ज्याची कल्पना नाही अशी नवनिर्मिति करा. आशीर्वाद देऊ. पण आम्हाला वाटते नवनिर्मितीचे काम तुमच्या पुढची पिढी करणार. तुमची पिढी प्रवाहात वाहण्याखेरीज जास्ती काही करू शकणार नाही!"

दिल्ली

२२-६-७१

सर्व काही ईश्वरच करतो असे सगळेच म्हणतात. पण ते वरवरचे असते. पुष्कळशा संतांचा विचार मात्र दृढपणे असतो-सर्व काही ईश्वरच स्वेच्छेप्रमाणे करीत असतो. जर ईश्वर आहे तर तो सर्वसमर्थ आहे, जागरूक आहे. व्यक्ति, घटना किंवा वस्तु, लहान किंवा मोठी, तुच्छ किंवा महत्त्वाची असा भेद ईश्वराजवळ नाही तर [असे लोक म्हणतात की देवाच्या जगात यदृच्छा (chance) सारखी वस्तु असूच शकत नाही.] मीच एकदा म्हणालो होतो की एखाद्या रानटी फुलाचा विकास आणि एखाद्या राष्ट्राच्या युगानुयुगे होणारा विकास देवाच्या वाट्याला सारखाच.

'सर्व काही देवच ठरवतो आणि करतो,' हा सिद्धांत स्वीकारल्यानंतर मनुष्याची जबाबदारी उरतच नाही. एक सनातन नाटकच चालू आहे जे ईश्वराच्या मनात प्रारंभीच ठरून गेलेले आहे. पुण्य, पाप ही भेद तत्त्वे देखील उरत नाहीत. मनुष्याचे पुण्यपाप अगोदरच ठरलेले. दोहोंचे फळदेखील पूर्वीच ठरलेले. मग व्यक्तीची जबाबदारी उरलीच कोठे ?

या सर्व गोष्टींचा विचार करून मी ठरवले आहे की जगात पूर्वनिश्चित असे काहीच नाही. प्रत्येक व्यक्तीला नेहमी थोडेसे स्वातंत्र्य दिलेले आहे. दरेक व्यक्ति 'ईषत् स्वतंत्र' आहे. 'सर्व काही ईश्वर करतो,' हे म्हणणे बरोबर नाही. खरी गोष्ट म्हणजे, सर्व काही ईश्वराच्या ताब्यातच आहे आणि म्हणूनच ईश्वराने आपल्या या जगात chanceला, यदृच्छेला, अदृष्टाला स्थान ठेवले आहे ईश्वर कर्तुम्, अकर्तुम् आणि अन्यथा कर्तुम् समर्थ आहे, यात शंका नाही. आणि म्हणूनच तो सर्वांना स्वतःच्या इच्छेप्रमाणे काम करण्याची थोडीशी मोकळीक देऊन पुनः त्या घटनावर आपला काबू ठेवतो. आणि म्हणूनच पुरुष आणि प्रकृति असा भेद स्वीकारूनदेखील अद्वैतवाद सार्वभौम आहे हे आपण स्वीकारू शकतो.

राजा कायदे करून त्याप्रमाणे अंमल करण्याचे काम आपल्या अधिकाऱ्यावर सोपवतो आणि न्याय देण्याचे काम न्यायाधीशाच्या हाती ठेवतो! सर्व अधिकार स्वतःचे असूनदेखील, ते न वापरण्यात त्याचा मोठेपणा असतो. ईश्वर असा राजाहूनदेखील मोठा.

दिल्ली
२३–६–७१

ज्या दिवशी ठिकठिकाणचे लोक भेटतात त्या दिवशी खूप आनंद वाटतो. मी मनुष्यप्रेमी आहेच. आणि एकाच दिवशी अनेक प्रदेशाचे लोक भेटले म्हणजे इतक्या निरनिराळ्या जगात वावरून आल्याचा संतोष होतो. बंगळूरचे तुलसीभक्त सीतारामशरण त्यांच्या बरोबर "अणुव्रत"चे संपादक हर्षकांत आणि मद्रासचे सुब्रह्मण्यम् भेटले. सीतारामशरणनी 'अग्निपरीक्षा' विषयी पुस्तक लिहिले आहे. मी म्हणालो, 'त्या पुस्तकात सीतेची निंदा करण्याचा उद्देश मुळीच नाही. पण निंदकाच्या तोंडी कां होईना, कठोर वचनें सीताभक्तांना सहन होणार नाहीत'. पण माझा असंतोष निराळाच आहे. जैनांच्या रामकथेत रामाला अनेक पत्न्या असोत, त्याप्रमाणे लिहिण्याचा तुम्हाला अधिकार आहे. पण राम म्हणजे एक पत्नीव्रती या आदर्शात पोहोचलेल्या आम्हाला तुमच्या कथेविषयी दु:खी आणि नाराज असण्याचा अधिकार असला पाहिजे.

विनोदिनीबेन नीलकंठ भेटल्या. आनंद झाला. प्रथमपासून त्यांच्याविषयी सद्भाव होताच. पण चि. शैलेविषयी मागणे करण्यासाठी त्या सुकुमारला घेऊन उमाशंकरच्या घरी आल्या होत्या आणि अशा रीतीने व्याहीपणाचा संबंध सुरू झाला. याची वारंवार आठवण होते.

जयपूरचे आमचे पदम[१], लीला, वनू, रुचिरा–सर्व येऊन भेटले. हे तर सगळे पूर्णपणे स्वजन. पदमचा स्वजनपणा अतिशय गोड आहे. या खेपेला चि. वनू जरा लाजाळू झाली आहे. म्हणून वय विचारले. फक्त तेराच आहे. बोलक्या रुचिरेने सर्वांच्यावतीने बोलून घेतले.

आणि सरतेशेवटी भूरेलाल बया भेटले. त्यांना सारे विश्व एक करावयाचे आहे. त्यांच्याद्वारा विश्व एक होईल तर मलादेखील बरे वाटेल.

या कल्पनेने बयाजींना चांगलेच पछाडले आहे. सर्व जगाचे एक राज्य होणे या युगात शक्यच नाही. ही गोष्ट त्यांना कशी पटवावी ? या बाबतीत

---

[१] पदमचंद्र सिंघी.

ते अनंतकालचे यात्री व्हायला तयार आहेत. त्यांच्या थोडे तरी उपयोगी पडावे लागणार असे दिसते.

दिल्ली
२४-६-७१

भारतीय संस्कृति महान, जीवनव्यापी (अथवा जीवनाहूनदेखील व्यापक अशा) सिद्धांताची चर्चा करते, कीस काढते. ज्याप्रमाणे शूर कोण हे ठरविण्यासाठी द्वंद्व युद्ध केले जाते त्याचप्रमाणे बुद्धिमान कोण हे ठरविण्यासाठी वाग्युद्ध आणि शास्त्रार्थ आपण चालवत आलो. पण शेवटी जो थोर ठरेल त्याच्या मागे अनन्य निष्ठेने जाण्याचा आपला स्वभाव.

या स्वभावामुळेच भक्तियोगाला माहात्म्य आले. त्यातूनच एका बाजूने अवतारवाद आणि दुसऱ्या बाजूने गुरुचरणी सर्वस्व अर्पण करण्याची निष्ठा सर्वमान्य झाली.

आपले निरनिराळे धर्माचार्य गुरुनिष्ठेच्या जोरावरच धर्मप्रभु बनले.

त्यांच्या मागोमाग आले संत. त्यापैकी काहींना प्रभुत्व नको होते. पण ते त्यांच्यावर लादले गेले.

संत, सेनापति आणि राष्ट्रगुरु—या तिन्ही भूमिका गांधीजींच्या वाट्याला आल्या. त्यांनी आपल्या काळात निःस्वार्थपणे, निरभिमानपणे देशाचे नेतृत्व केले. त्यांना आपला उत्तराधिकारी नेमायचा नव्हता. पण त्यांनी ओळखले, समाजाला हे हवे आहे आणि त्यांच्या हाडातदेखील गुरुभक्ति पुष्कळ प्रमाणात होती. यासाठी त्यांनी उत्तराधिकारी म्हणून दोन नांवे घेतली.

हे दोघे परस्पर पोषक होणे अशक्य होते. त्यांनी एकमेकांचा विरोध केला नाही, हेच मोठे काम झाले. गांधीजींची अहिंसा येथे कामाला आली.

जवाहरलालजींनी उत्तराधिकारी म्हणून आपल्या मुलीला तयार केले असेल पण ती गोष्ट त्यांच्या सिद्धांतात बसत नव्हती. त्यांना लोकमताची प्रतिष्ठा वाढवायची होती.

पण प्रत्यक्षात झाले काय ? अवतारनिष्ठा, गुरुभक्ति, गादीची परंपरा, याच्या ऐवजी त्यांनी निवडणुकीला (election) महत्त्व दिले. त्यांना वाटले आपण मोठे काम साधले. पण सबंध राष्ट्रीय चारित्र्याची हानि झाली. सिद्धांतनिष्ठा आणि हीन तत्त्वेच पुढे येऊ लागली.

दिल्ली
२५-६-७१

बांगला देश अथवा पूर्व बंगालचा प्रश्न अगदी अद्वितीय आहे. या प्रश्नाविषयी लोकांनी विचारले म्हणून दोनतीन लेख लिहिले. पण खरोखर, मनाशी काहीच निर्णय होऊ शकत नाही. आजच्या परिस्थितीत याह्याखान आणि त्यांचे साथी यांच्या बाबतीत मात्र दिसते की त्यांच्या मनात एक स्पष्ट कल्पना आहे, एक योजना आहे ती राक्षसी योजना असेना का, पण ती अगदी निश्चित असून तिला ते कायम चिकटून आहेत. एकदा वाटते की हे लोक आंधळेपणाने प्रवृत्त झाले असून शेवटी हे आत्मनाश करून घेणार. पण पुन्हा वाटते की परिस्थिति या लोकांना उत्तम समजते. जगातील राष्ट्रांचे भले बुरे मानसदेखील त्यांना उत्तम समजत आहे आणि म्हणून निःशंकपणे आपली योजना अंमलात आणत आहेत.

दुसऱ्या बाजूने वाटते की सगळेच मानवी पक्ष आंधळे होऊन काम करीत आहेत आणि फक्त इतिहास-विधाता भगवान् अकल्प्य रीतीने आपली योजना पार पाडीत आहे.

याहि बाबतीत माझे विचार सामान्य जनतेच्या किंवा मोठमोठ्या चिंतकांच्या विचाराहून बरेच भिन्न आहेत. भगवंताला सत्याची योजना कायमची ठरवून ती अंमलात आणावयाची नसते त्या त्या क्षणाला भगवंत आपली योजना ठरवीत आणि बदलत असला पाहिजे. ज्याप्रमाणे एखादा डाव खेळणारे दोन खेळाडू आपल्या प्रतिस्पर्ध्याचा डाव बदलताच, त्याचा हिशोब करून, आपला डाव बदलतात त्याचप्रमाणे भगवंताच्या खेळात असंख्य खेळाडू असतात. त्या सर्वांना अमुक हद्दीपर्यंत मनसोक्त चालायची

स्वतंत्रता भगवान् देतो आणि त्यांचे डाव बदलले की स्वतःची योजना बघता बघता बदलून, क्षणोक्षणी आपल्या मनाप्रमाणेच सर्व काही घडवून आणतो. असंख्य किंवा अनंत खेळाडू एका बाजूला आणि त्या सर्वांना पुरून उरणारा खिलाडेश्वर निराळा. किती अद्भुत आणि जिवंत खेळ आहे हा ! मी ठरविले आहे की या खेळात भाग घेताना इतर खेळाडूंचा विचार करतांना आठवण ठेवावयाची खिलियेश्वरांचीदेखील. याचा आनंद अलौकिक असतो.

दिल्ली

२६–६–७१

आज माझ्या स्वास्थ्याविषयी समाचार विचारायला श्री. धीरेन मजुमदार आले होते. धीरेन मजुमदार बंगालकडील एक उत्तम विचारक कार्यकर्ते आहेत. त्यांच्याविषयी मला आदर आहे तेव्हा मोकळ्या मनाने त्यांच्याशी पुष्कळ गोष्टी केल्या. अनेक बाबतीत त्यांचे माझे अनुभवमूलक मतैक्य आहे. स्वराज्य झाल्यानंतर आपल्या संस्था सरकारच्या कह्यात कशा न जातील याचा त्यांनी चांगला विचार केला आहे. सरकारी मदत आपल्या मार्फत लोकांना पोहोचवण्यात आपली तेजस्विता जाते. ती कामे परभारे करवली पाहिजेत वगैरे विचार उत्तम आहेत. बिहारमध्ये सहरसाच्या बाजूला खूप फिरून लोकमानसावर यांनी प्रभाव पाडला आहे.

आपल्याकडे पूर्वी धर्मप्रचाराचे काम खूप माजले. पण धर्मप्रचाराचे शास्त्र बनले नाही. त्यामुळे थोड्या संतांनी उत्तम काम केले तरी संतसंस्था सुव्यवस्थित झाली नाही. पू. बापूजींनी स्वतःच्या आश्रमामार्फत आणि रचनात्मक संस्थामार्फत राष्ट्रसेवा चालवली. त्याखेरीज राष्ट्रसेवक तयार करण्याचा जबरदस्त प्रयत्न केला पश्चिमेकडील संस्थांचे त्यांनी उत्तम निरीक्षण केलेच होते. आपल्या देशातील सांस्कृतिक परंपरेचा देखील त्यांना उत्तम परिचय होता. ‘काम कामाला शिकवते’, हे त्यांना ठाऊक होते. आदर्श न विसरता अखंड सेवा चालवली तर अनुभवाने मनुष्य

शहाणा होतो. हे त्यांना ठाऊक होते म्हणून जवळ येतील तसल्या लोकाकडून त्यांनी कामे घेतली. संस्था चालवण्याचे शास्त्र केव्हा तयार होईल ?

दिल्ली

२७–६–६१

केशव देव आचार्य नांवाचे एक साधु अरविंद साहित्याविषयी बोलायला आले होते. पुष्कळ वर्षांपूर्वी मला भेटले होते म्हणे. पाँडिचेरीला राहून त्यांनी श्री. अरविंद साहित्याचा अभ्यास केला आहे. त्यांची विशेषता म्हणजे त्यांतील महत्त्वाच्या ग्रंथांचे यांनी हिंदी करून त्या प्रकाशित करण्याची व्यवस्थाहि केली आहे. या कामी आर्थिक सहायता कोठून तरी मी मिळवून द्यावी, या आशेने ते आले होते. मी म्हणालो, 'इंग्रजी न जाणणाऱ्या देशी लोकांना अरविंद विचार मिळत नाहीत हे दुर्भाग्य आहे. ते सुधारण्याचा तुम्ही प्रयत्न करता ही उत्तम जनसेवा आहे. या कामी मदत करणारा कोणी भेटला तर त्याच्याकडून पैसे मागून तुम्हाला पाठविण्याच्या ऐवजी त्याचा तुमचा संबंध बांधून देईन आणि मी अलिप्त राहीन.' यांनी इंग्रजीचे पारिभाषिक शब्द गोळा करून त्याचे हिंदी पर्याय दिले आहेत. हे पुस्तक मी मागवलें आहे. श्री. अरविंदाचे सर्वांत उत्तम पुस्तक 'दिव्य जीवन' ('The Life Divine') या नांवाने केशवदेवांनी ते हिंदीत आणले आहे. पाँडिचेरीच्या माताजी पुष्कळ पैसा गोळा करतात. त्या मानाने त्यांची कामेहि वाढतात. त्यामुळे त्यांच्याकडून हिंदीसाठी मदत मिळत नाही. हे सगळे लोक शिष्ट संस्कृतीचे उपासक. जनतेपर्यंत पोहोचणाऱ्या संतवर्गाचे हे लोक नव्हेत. पण आधुनिक वैज्ञानिक, आर्थिक, राजनैतिक संस्कृतीच्या जाळ्यात सापडलेल्या लोकांना अध्यात्माकडे आणण्यात या लोकांचा उपयोग होतो. हे काम जागतिक आहे. तेव्हा या सेवेलादेखील महत्त्व आहे. श्री. अरविंदानी गीतेवर पुष्कळ मेहनत घेतली आहे. अर्थात स्वत:चे तत्त्वज्ञान गीतेत पाहणे त्यांना स्वाभाविक आहे. त्यांचे गीतेवरील निबंध एकदा पाहिले होते. आता पुन्हा ध्यानपूर्वक वाचले पाहिजेत. केशव देवांची श्रद्धा, भक्ति आणि परिश्रम पाहून आदर वाटला.

दिल्ली
२८-६-७१

प्रत्यक्ष साधना अत्यंत महत्त्वाची असते. साधना म्हणजे खोल चिंतन आणि जीवनप्रयोग. या खेरीज आसपासच्या लोकांची आणि समाजाची सेवा, हा देखील साधनेचाच एक भाग आहे. 'सेवा निःस्वार्थ असावी' असे न म्हणता ती 'निष्काम असावी' असे गीता कां म्हणते हे आजवर पुरे ध्यानात येत नव्हते. सेवेमध्ये स्वार्थ नसावा. अभिमान नसावा, हे बरोबर आहे. पण 'सेवा शुद्ध असो आणि फलदायी निवडो', एवढी कामना तर मनात असणारच. तेव्हा 'निष्काम' हाच शब्द गीतेने कां वापरला आहे याचे चिंतन अखंड चालू असते.

मी ज्यांची सेवा करतो, ज्यांना सल्ला देतो, किंवा साधारण उपदेश करतो, त्या लोकांशी हृदयाने तेवढ्यापुरते एकजीव व्हावे लागते हाच माझ्या वाट्याला मोठा लाभ. हीच माझी साधना. आज ध्यानात आले की पूर्वी जीवन कर्ममय होते तेव्हा ते जीवनप्रयोग मी करीत असे तसे आता करता येत नाहीत पण जन्मभर केलेल्या प्रयोगाच्या अनुभवाच्या जोरावर आता लोकांना मी जेव्हा सल्ला देतो तेव्हा जणू सह-अनुभूतीच्या जोरावर, त्या लोकांच्या मार्फत जीवनप्रयोगच चालवतो.

यामुळे सल्ला मागणाऱ्यांच्या जीवनाशी तेवढ्यापुरते एकरूप होऊन, नवी नवी साधना चालते आणि याचा लाभ फार मोठा आहे. हे इतरांशी साधलेले निष्कारण ऐक्य हीच खरी निष्काम भावना आहे. निःस्वार्थ निरभिमान वृत्तीबरोबर तादात्म्य आणि ताटस्थ्य यांचा योगहि आवश्यक आहे.

आता या नवीन दृष्टीचे चिंतन वाढवले पाहिजे. सहानुभूतिद्वारा, इतरामार्फत जीवनप्रयोग तटस्थपणे चालवणे ही खरोखर मोठी साधना आहे. चरित्रवाचन आणि इतिहासाचे अध्ययन—या दोन्ही प्रवृत्तिदेखील परिपक्व वयात साधना होऊ शकतात. पण ती एकांगी साधना झाली. जीवनप्रयोगावाचून साधना पूर्ण होत नसते.

पूज्य बापूजींनी समस्त भारताच्याद्वारा स्वतःची साधना चालवली, याचे पुरे रहस्य आता ध्यानात येऊ लागले आहे.

दिल्ली
२९-६-७१

मी आजवर मानत होतो की एके काळी पुष्कळ साधना केली. तिचे भांडवल शेवटपर्यंत पुरेल. वृद्धावस्था झाली आहे. कामेहि आपोआप कमी होतात, तेव्हा ध्यान-चिंतनाला अधिक वेळ देणे शक्य आहे.

पण आता दिसून येते की सेवाकार्य असो वा नसो, जीवनसाधना चालू असलीच पाहिजे. नाही तर आसपासच्या लोकांवरदेखील आपल्या बोलण्यावागण्याचा प्रभाव पडू शकत नाही. आत्मीयता आणि तटस्थ वृत्ति यांचा प्रभाव तेव्हाच पडणार, जेव्हा आंतरिक साधना जागृत आणि कार्यकारी असेल.

तेव्हा आता पुन्हा नित्यसाधना सुरू केलीच पाहिजे. पूर्वी साधनेमध्ये शारीरिक तप, कष्ट सहन करणे, उपवास करणे वगैरे गोष्टी येत असत. आता या वयात शरीराला कष्ट देणे किंवा उपवास करणे साधनारूप होणार नाही. पण वाचा-संयम वाढवणे शक्य आहे, इष्ट आहे. लोकांना सलाहसूचना देणे, त्यांच्याशी तात्त्विक चर्चा करणे ही आध्यात्मिक सेवा आहे खरी. पण त्याचा प्रभाव कमी होत असलेला स्पष्ट दिसत असूनदेखील संयमाकडे न वळणे इष्ट होणार नाही.

तेव्हा आता एकदम मौनावर न जाता वाचा-संयम वाढवलाच पाहिजे.

दुसरी एक गोष्ट ध्यानात आली. योगसूत्र म्हणते–अहिंसा प्रतिष्ठायां तत् सन्निधौ वैर त्याग: –ज्या साधकाला अहिंसेची साधना सिद्ध झाली आहे (ज्याच्या जीवनात अहिंसा प्रतिष्ठित झाली आहे), त्याच्या सहवासात वैर भावना टिकूच शकत नाही. या कसोटीने तपासता माझी अहिंसा आता परिपक्व राहिली नाही.

आसपासच्या लोकात एकाचे मनदेखील जरी वैरयुक्त राहू शकले किंवा निष्कारण वैर भावनेला पोषण मिळवीत असले तरीहि खडबडून जागे झाले पाहिजे. आणि सर्वत्र अहिंसा वाढली पाहिजे. एकांतात साधना करणे सोपे आहे पण लोकांतात म्हणजे समाजात राहून साधना करतांना ती कुणालाहि बाधक होता कामा नये. लोकांच्या अपेक्षा दुखावल्या जाऊ

नयेत आणि तरीहि साधना कडकपणे चालवली पाहिजे. पाहू हे आता कितपत साधते ते.

दिल्ली

३०–६–७१

आज सर्वोदयातील श्रेष्ठ कार्यकर्ते येऊन भेटले. प्रा. बंग, अध्यक्ष जगन्नाथन, मनमोहन चौधरी, गोविंदराव देशपांडे आणि नरेंद्र दुबे या सर्वांशी कसलाच संकोच न बाळगता, मोकळेपणाने आणि पूर्ण निराग्रही वृत्तीने बोलू शकलो कोणत्याहि संस्थेत कसलेच स्थान किंवा अधिकार साधला नाही. आणि आज तर तशी इच्छाहि होणे शक्य नाही. अशा वेळी स्वतःचे म्हणणे त्यांना भारपूर्वक सांगितले आणि म्हणालो, "देश तुमच्या हातात आहे. तुमच्यात जे उगवेल तेवढेच जगाला मिळणार. आम्ही आता जावयाच्या वाटेवर आहोत. जी सेवा मागाल ती देऊ."

एवढे सांगून जाती मोडणे, सर्व-धर्म-समभाव साधणे, विवाहसंस्था सुधारणे, अमेरिकेत धर्म आणि नीति जाऊन सर्वत्र permissiveness वाढत आहे, ती आपल्या देशात येऊ न देणे वगैरे गोष्टी त्यांना सांगितल्या. आणि ग्राम-दानपुष्टि कार्य स्वदेशी संस्कृतीच्या आधारावर चालविण्यासाठी उत्तम कमेटचा ठिकठिकाणी नेमल्या पाहिजेत त्याचा आग्रह धरला. भूमि-पति, धनपति, सावकार आणि सरकारी अधिकारी यांची प्रतिष्ठा आणि अधिकार तोडण्यासाठी सत्याग्रहाचा अवलंब करण्याचा काळ आला आहे, हेहि त्यांना भारपूर्वक सांगितले.

अगदी अनपेक्षितपणे अमृतलालने माझी जुनी रामदासांच्या 'मनोबोध'ची आवृत्ति माझ्या हातात दिली आणि प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे, "मनोबोधा"वर एकवीस प्रवचने त्यांनी माझ्याकडे मागितली. या संकल्पाच्या मुळाशी किती तरी जुनी साधना, चिंतन आणि सहधर्मीयांच्या विषयींची आत्मीयता जागृत झाली. हे काम आता केलेच पाहिजे पण

जुन्याकाळचे अध्ययन आता पार विसरून गेलो आहे. आणि परिपक्व चिंतनामुळे भविष्याची दिशा स्पष्ट होऊन, जुन्या निष्ठा, इष्टपणे शिथिल झाल्या आहेत. त्या सगळ्यांचा फायदा घेऊन पण जुना उत्साह कायम ठेऊन एकवीस प्रवचनें आटोपशीर लिहिली पाहिजेत. ती समाजमान्य होतील असा प्रयत्नहि असलाच पाहिजे.

★ ★ ★

# जुलै ७१

दिल्ली

१–७–७१

स्त्री-जातीच्या उद्धाराचा प्रश्न सर्वत्र आहे. प्राचीन काळी कित्येक समाजात स्त्रियांचे श्रेष्ठत्व होते. आसामच्या बाजूला स्त्रियांचे राज्यहि होते. पण स्त्रीचे श्रेष्ठत्व टिकले नाही. याचा अर्थ असा की स्त्रीला राज्य करण्याची संधि मिळूनदेखील तिला ती टिकविता आली नाही.

पुष्कळ पुरुष म्हणतात की 'प्रकृतीची रचनाच अशी आहे की

स्त्रीची स्थिती दुय्यम असते त्यांचा स्वभावहि तसाच आहे. आणि त्यांत त्यांना संतोष आहे. पुरुषांचे श्रेष्ठत्व मान्य करणाऱ्या स्त्रियांनी पुष्कळ मिळवले आहे आणि त्यांनी काही गमवले नाही.

पण हा पुरुषी संतोष आहे.

एक गोष्ट खरी आहे की जोपर्यंत मानवीसंस्कृतीत बाहुबळाने शत्रूवर विजय मिळवण्याची आवश्यकता आहे तोवर स्त्रियांचे प्राधान्य टिकणार नाही. गर्भाला नऊ महिने सांभाळणे, मुलांना दूध पाजणे आणि मुलांसाठी घर सांभाळणे या गोष्टी स्त्रीच्या वाटचाला आहेत तोपर्यंत हिंसाप्रधान संस्कृतीत ती मागासलेलीच असणार.

पण मानवी संस्कृति आजवर हिंसाप्रधान असली तरी ती कायमची तशी राहणे शक्य नाही. युद्धाच्या ऐवजी असहयोग आणि सत्याग्रह जेव्हा रूढ होतील आणि स्पर्धा आणि शोषण जाऊन समन्वय युग-धर्म होईल तेव्हा स्त्रियांना समानता मिळेल. एवढेच नव्हे तर स्त्रीचे नेतृत्व आणि श्रेष्ठत्व विकसित आणि मान्य होईल.

त्यानंतरच खऱ्या मानवी संस्कृतीचा प्रारंभ होईल. आणि त्या वेळी त्याग, बलिदान, सेवा, संयम आणि समन्वय प्रतिष्ठित होऊन स्त्रीचे श्रेष्ठत्व हळूहळू पण निश्चितपणे सिद्ध होत जाईल.

एवढ्या परिवर्तनाला किती वेळ लागेल सांगता येत नाही. पण माझी आंतरिक श्रद्धा म्हणते की हे परिवर्तन होणारच, आणि ते या युगातच.

एवढ्या मोठ्या क्रांतीसाठी पुरुषांची मनें हळूहळू तयार होत असताना दिसतात. पण स्त्रियांमध्ये हे परिवर्तन अजून दिसत नाही. पण ते आणलेच पाहिजे.

आज तरुण शांतिसेनेचे काम अहमदाबादमध्ये करणारी मंदाकिनी दवे भेटली. तिच्या प्रश्नांची उत्तरें मी दिली. पण येथे वर लिहिलेली बाजू तिच्यापुढे मांडली नाही. अहमदाबादला इतर मुलींना घेऊन येईल तेव्हा ही बाजू मांडलीच पाहिजे.

तरुण सेविका आज अर्ध्या तयार आहेत. स्त्रीला तिची कमजोरी समजली आणि जगभर घरे चालविणाऱ्या स्त्रीत्वाचे सामर्थ्य पटले म्हणजे ती आपोआप तयार होईल.

दिल्ली
२-७-७१

ज्याप्रमाणे समाजाच्या संघटनेसाठी, संरक्षणासाठी आणि न्यायदानासाठी समाजाने शासन अथवा सरकार नावाची संस्था उभी केली आणि तिचेच महत्त्व वाढवून, सरकारच्यासमोर समाज अथवा राष्ट्र गौण बनवून सरकारच्या सोयीसाठी जनतेने असंख्य अडचणी सोसल्या पाहिजेत आणि ओझे उचलेले पाहिजे असे ठरवले. त्याचप्रमाणे समाजसेवेचेदेखील होणार की काय अशी शंका वाटू लागली आहे. समाजाची जीवनविषयक सेवा करण्यासाठी, आणि विशेषत: नैतिक आदर्श अंमलात आणण्यासाठी, सरकारहून भिन्न असा स्वेच्छानियुक्त राष्ट्रसेवकांचा एक वर्ग आपण चालवीत आहोत. हळूहळू याचे संघटन होत आहे आणि संघटन आले म्हणजे ते चालवण्याचे महत्त्व वाढून, त्यांच्या सोयीसाठी समाजाला गौण व्हावे लागते. प्रजेसाठी राजा उत्पन्न झाला. पण राजा (सरकार) श्रेष्ठ आणि प्रजा त्याची आश्रित हे जसे झाले (कारण राजा हा रक्षक आणि प्रजा रक्षित, असा संबंध होतो) त्याचप्रमाणे राष्ट्रसेवक खरोखर असोत किंवा नसोत, महात्मे बनतात आणि त्यामुळे त्यांच्या कल्पनेप्रमाणे आणि त्यांच्या सोयीसाठी जनतेला नरम व्हावे लागते.

राज्यकर्ता आणि त्याचे सरकार सामर्थ्य आणि कौशल्य यांच्या जोरावर श्रेष्ठ ठरतात (राष्ट्रसेवक गुरु बनून समाजाला शिष्य बनवतात.) समाज जर शिक्षित झाला आणि त्याचे नैतिक संघटन त्याला स्वत:ला करता आले तरच समाज वाचला.

पूर्वीच्या काळी जातिसंस्था हे लोकसंघटन होते. जातीचा आदर्श सामाजिक नेते घडवीत असत. एवढेच नव्हे तर समाजालादेखील घडवीत असत. राज्यसत्ता आणि धर्मसत्ता, जुन्या काळी जाती-संघटनाची मदत घेत. ती व्यवस्था उत्तम होती. पण विचार जागृति आणि प्रगतीच्या अभावी जाती-संघटन रूढीवादी बनले आणि सर्वच संघटने परस्पर सहाय्यक राहिली नाहीत. यापुढे लोकनीति जर प्राणवान झाली तर विकासाची आणि उद्धाराची आशा बाळगता येईल.

दिल्ली

३–७–७१

गीताप्रेसशी संबंध असलेली आणि सध्या वृंदावनमध्ये गीतेवर आध्यात्मिक प्रवचने देणारे स्वामी रामसुखदासजी भेटले. स्वामीजींना कर्म, अकर्म आणि विकर्मचा विनोबांनी केलेला अर्थ मान्य नव्हता म्हणून त्यांनी तो प्रश्न छेडला. ही संधि साधून मी गीतेविषयीची माझी सबंध भूमिका त्यांच्यापुढे मांडली. कर्म, अकर्म, विकर्म याचा मी केलेला अर्थ त्यांना आवडला. माझी भूमिका त्यांना मान्य असेल असे मुळीच वाटत नाही. पण माझी अनन्य गीताभक्ति समजल्यामुळे माझी भूमिका त्यांनी शांतपणे ऐकून घेतली. ग्रंथप्रामाण्याचा माझा विरोध न पटला तरी प्रेमाने ऐकणे त्यांना अपरिहार्य होते. वेदप्रामाण्य, गीताप्रामाण्य आणि गांधीप्रामाण्य तिन्हीविषयी माझी स्पष्ट भूमिका ऐकल्यानंतर, त्यांना यथाकाळी तिचा आदर वाटेलच आणि मान्य होईल असा माझा विश्वास आहे. माझ्यासारखी भूमिका फार थोड्यांची असते. त्यामुळेच मला भविष्याची आशा बाळगावी लागते की यथाकाळी ती मान्य होईल. तसे झाल्यास मोठा लाभ आहे.

नागालँड कोहिमामध्ये श्रीकुमार आज सात वर्षे काम करीत आहेत.

नागालँड आणि मेघालय या प्रदेशात, तिकडील लोकभाषेत हिंदीचा प्रचार करणे, गांधी-जीवन समजावणे अत्यंत महत्त्वाचे काम आहे. या कामाचे महत्त्व मला जितके पटले आहे तितके आजच्या राष्ट्रसेवकांना पटलेले दिसत नाही. नाही तर कुमारला यथेच्छ मदत मिळाली असती. योग्य दिशेने प्रयत्न झाला तर तेथील सरकारकडूनदेखील मदत मिळू शकेल.

खरोखर या प्रदेशांत मी अधिक जावयाला हवे होते. राष्ट्र-संघटनेचे हे अत्यंत महत्त्वाचे काम–असली पुष्कळ कामे–आपल्या राष्ट्राच्या हातून होत नाहीत ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

भारताच्या पश्चिम टोकाला बिकानेरमध्ये देखील पुष्कळ काम झाले पाहिजे.

दिल्ली
४–७–७१

मानवी शरीर हे अद्भुत यंत्र आहे. आजीवन ते आपल्या ताब्यात दिलेले आहे. लहानपणी जन्म देणाऱ्या आईबापाच्या ताब्यात काही काळ ते भले असो पण आपल्याला समजू लागल्यापासून ते पूर्णपणे आपल्याच ताब्यात असते. आहार, निद्रा, आत्मरक्षण, इंद्रियविकास, इंद्रियतृप्ति आणि वासनासंयम, यांच्यायोगे आपण या शरीराची सेवा करतो, उन्नति साधतो आणि तरीहि याची रचना पुरेपूर आपल्याला ठाऊक नसते. म्हणून जुन्या लोकांना विचारा, वैद्याचा सल्ला घ्या, आपला अनुभव आठवा आणि निरनिराळे प्रयोग करा असे आपले चालूच असते. कधीकधी आपण या शरिरावर जुलूम करतो आणि पुष्कळ वेळा हे शरीर आपल्याला दात देत नाही. तरीहि याचा सहवास आणि सहयोग अखंड चालू असतो.

कित्येक लोक आत्मोन्नतीच्या नांवाने या शरीराची निंदा करतात. सगळ्याच बाबतीत याला दाबू पाहतात. यातून तऱ्हेतऱ्हेच्या विकृती उत्पन्न होतात आणि त्याचे नुकसान कायमचे सहन करावे लागते.

अशा या शरीराला उत्तमरीतीने ओळखण्यासाठी एखादी साधना प्रारंभीच माणसाला कां मिळू नये ? मनुष्यजातीचे आयुष्य थोडेथोडके नाही. माणसाने प्रयोगहि कमी करून पाहिले नाहीत. पण सर्व बाजूने फायदेशीर असे शरीरविज्ञान, मनोविज्ञान आणि जीवनविज्ञान अजून मनुष्याने तयार कसे केले नाही याचे आश्चर्य वाटते.

मला वाटते की भारतीय तत्त्वज्ञानात आत्मतत्त्वाचा विकास करण्याचा एकांगी प्रयोग पुष्कळ चालला. हे तत्त्वज्ञान आजवर सृष्टि, मानवी इंद्रिये आणि दोघांना एकत्र आणणारे आपले शरीर याची उपेक्षा करून स्वत:च निसत्व बनले. भक्तिमार्गी लोकांनी दुसऱ्या प्रकारे जीवनविमुखता वाढवली त्यामुळे सर्वत्र निष्फळता पसरली. समाजाला शुद्ध नेतृत्व मिळाले नाही. तेव्हा आता खऱ्या 'जीवनयोग्यांनी', पुढे आले पाहिजे.

दिल्ली
५-७-७१

बायबल, कुराण आदि धर्मग्रंथांचा ज्यांनी अभ्यास केला आहे आणि सर्वधर्म-समभावाचा सिद्धांत ज्यांना मान्य आहे अशा एका गृहस्थाने 'मंगल-प्रभात'मध्ये या विषयावर नेहमी लेख लिहिण्याचे कबूल केले. अर्थात् मला ते फार आवडले.

पुढे ते म्हणाले की 'या वयात आपल्याला सगळा 'मंगल-प्रभात' भरून काढावा लागतो हे काही बरे नाही.तेव्हा अर्धा 'मंगल-प्रभात' भरून निघेल इतके लिखाण मी देत जाईन.'

आता एवढी मदत मिळाली तर ती कोण सोडणार? तरीहि मला वाटले की त्यांना हे झेपणार नाही. कारण त्यांची स्वतःची कामे असणारच.

या गोष्टीची चर्चा चालू असतानाच एकदा ते एका प्रतिष्ठित गृहस्थाला घेऊन आले आणि म्हणाले की अर्धा 'मंगल-प्रभात' त्यांनी भरून काढावा. हे जर मी मान्य केले तर हे गृहस्थ 'मंगल-प्रभात'ची ग्राहक संख्या वाढविण्याचा मनापासून जोराने प्रयत्न करतील.

हीहि गोष्ट आम्हा सर्वांना इष्ट वाटली. पण पुढे ते म्हणाले, 'माझे लेख तुम्ही वाचून पसंत केल्यानंतरच छापायला देता ही अट काढून टाका. अर्धा 'मंगल-प्रभात' माझा, त्यात माझे लिखाण येईल. बाकीचा तुमचा. . .'

ही सूचना मला विचित्र वाटली. 'मंगल-प्रभात' हे काही निरनिराळे विचार जगापुढे मांडणारे दुकान नाही. 'मंगल-प्रभात'ला स्वतःचे व्यक्तित्व आहे. आणि गांधीच्या प्रेरणेने परिपक्व झालेल्या एका विशाल जीवनदृष्टीचे ते प्रतिनिधि आहे. यात भिन्न दृष्टीचे चिंतन चर्चेसाठी येऊ शकेल. विविधतेमध्ये एकता हेच 'मंगल-प्रभात'चे मुख्य सूत्र आहे. पण दोघांची दोन निराळी नियतकालिके एकत्र छापायची हे त्याचे स्वरूप नाही. केवळ ग्राहक संख्या वाढते या लोभाने अशी व्यवस्था स्वीकारणे शक्य नव्हते आणि म्हणून ती सारी योजना सोडून द्यावी लागली.

'मंगल-प्रभात' एका विशिष्ट जीवनदृष्टीचे प्रतिनिधि आहे. माझ्या मागे हे पाक्षिक जे दुसरे चालवतील ते याच केन्द्रीय जीवनदृष्टीला एकनिष्ठ राहून स्वतःच्या अभिरुचीप्रमाणे चालवतील. पण संपादकत्व एकाच व्यक्तीचे राहील एवढे स्पष्ट करणे इष्ट वाटले.

दिल्ली (ट्रेन)
६-७-७१

गुजराती भाषेत accidentला (अपघाताला) 'अकस्मात्' म्हणतात. पण या शब्दाचा मूळ अर्थ एवढाच आहे की जे काही एकाएकी घडते, ज्याचे संतोषकारक कारण सापडत नाही, त्याला म्हणावे 'अकस्मात्' (कस्मात् म्हणजे कशामुळे.' ज्याचे 'कस्मात्' अथवा कारण आपल्याला सापडले नाही, त्याला म्हणावे 'अकस्मात्'). आजकाल स्त्रीपुरुषांमध्ये प्रेम-संबंध घडून येणे हे अकस्मातावर अवलंबून आहे. त्यांना एकमेकाविषयी प्रेम वाटू लागले (आणि दुसरी कसलीहि अडचण नसली) तर त्यांचा विवाह व्हावा, हाच नियम आजकालच्या लोकांना मान्य दिसतो. ('इतर काही अडचण नसली तर' ही शर्त मानावीच लागते. पण तिला महत्त्व किती द्यावे, या बाबतीत मतभेद वाढू लागले आहेत. आणि पश्चिमेचे लोक म्हणतात की अडचणींना न जुमानण्यातच पुरुषार्थ आणि प्रगति आहे.)

पूर्वीचे लोक कुलधर्माला महत्त्व देत. संस्कारिता परस्परपोषक आणि संतोषकारक आहे की नाही हे पाहत आणि प्रेमसंबंध अकस्मात् नसून प्रयत्नसाध्य आणि हृदयसाध्य आहे असे मानीत.

आजकालच्या 'अकस्मात्मूलक भूमिके'मधून स्वच्छंद आणि अराजक निर्माण होऊ लागले आहे. आणि स्वछंदवादी लोकच आता भिऊ लागले आहेत. एवढा पुरुषार्थ करून केलेले विवाह दीर्घकाल टिकू शकतात असाहि अनुभव नाही. यामुळे काही लोक विवाहसंबंधालाच रजा द्यावी असे म्हणू लागले आहेत. आणि काही लोक 'परस्पर क्षणिक आकर्षण याला महत्त्व न देता सर्व तऱ्हेची परस्पर अनुकूलता पहावी' असे म्हणू लागले आहेत. या

दुसऱ्या प्रकारच्या लोकात भारदस्तपणा आहे. पण अशी अनुकूलता पाहावी कुणी ? ठरवावी कुणी ? हा प्रश्न राहतोच. उथळ जीवनाच्या लोकांना हे सर्व कसे ठरवता येणार ?

तेव्हा शेवटी ठरवावे लागते की कौटुंबिक संस्कार, शिक्षण, स्वभाव वगैरेची अनुकूलता पाहून विवाह ठरवल्यानंतरच वधूवरानी निश्चय केला पाहिजे की आमचे परस्पर जुळणे 'अकस्मात' नसावे. आम्ही स्वतःवर काबू मिळवूच मिळवू. आणि एकदुसऱ्यांना अनुकूल होण्याची आणि एक-दुसऱ्याची भिन्नता सहन करण्याची पराकाष्टा करू. विवाह ही साधना असून ती पुरुषार्थाची अपेक्षा बाळगते.

मुंबई (ट्रेन)
७–७–'७१

आज दिवसाचा बराच वेळ 'मनोबोध' वाचण्यात गेला. समर्थ रामदासांचा सर्व उपदेश थोडक्यात या २०५ श्लोकात येऊन जातो.

असे सांगतात की मुसलमान फकीर लोक 'करीमा' नांवाच्या उर्दु छंदात धर्मोपदेश समाजापुढे ललकारत असत. अगदी 'करीमा' सारखाच संस्कृत छंद भुजंगप्रयात आहे. 'करीमा'ची अक्षरे अकरा, तर भुजंगप्रयातची बारा. बाकी ऱ्हस्व दीर्घ सारखेच. तेव्हा रामदासांनी जनतेला बोध देण्यासाठी हे श्लोक भुजंगप्रयात छंदात तयार केले. पण स्वतःच्या मनाला उद्देशून लिहिले.

अशीहि दंतकथा आहे की शिवाजींनी समर्थांना गुरु केल्यानंतर त्याचा मठ चालवण्यासाठी एक ठराविक देणगी दिली. पण मठाचा वाढता खर्च देणगीत पुरा होईना. मठातील शिष्य म्हणाले की, "आपण शिवरायांना कळवू. ते वार्षिक देणगी सहज वाढवून देतील".

रामदासांना अशा रीतीने राजाश्रयाचे अंकित होणे पसंत पडले नाही. त्यांनी शिष्यांना मना केले आणि उलटे सांगितले की "माझे हे 'मना'चे दोनशे श्लोक लोकांना ऐकवा आणि त्यांच्याकडून भिक्षा गोळा करून

आणा." त्याप्रमाणे शिष्य कोकणात गेले आणि तेथून पुष्कळसा तांदूळ घेऊन आले आणि मठाचा खर्च त्यातून सहज निघू लागला.

या दंतकथेविषयी मतभेद आहेत. पण मला ती खरी वाटते. माझ्या लहानपणी कित्येक रामदासी साधूंना सकाळचे स्नान आटोपून, मनाचे श्लोक गद्यघोषाने गात गात, भिक्षा गोळा करतांना मी पाहिले आहे. साधूंनी राजावलंबी न राहता, जनावलंबी असावे यातच साधूचे स्वातंत्र्य आणि वैराग्य सुरक्षित आहे. हा संतांचा अनुभव पुष्कळ अंशी आजहि खरा आहे.

अधिकांशी सर्वच साधूंनी प्रधानतया स्वावलंबी असावे आणि तेहि स्वश्रमावलंबी असावे. हा आदर्श त्या काळी नव्हता. आणि देशात भिकारहि माजले नव्हते. त्यामुळे जनाधारित असणे हाच आदर्श स्वाभाविक होता. आज आपल्या देशात राष्ट्रसेवक आपल्या संस्था स्वराज्य सरकारच्या अनुदानातून चालवू पाहतात. त्यांनी रामदासांच्या दंतकथेतून बोध घेतला पाहिजे—कारण त्या वेळी 'स्वराज्य'च होते.

मुंबई
८-७-७१

आज गुरुपौर्णिमा. आमच्या समाजात मीच सध्या सर्वात वडील आहे. त्यामुळे कुणी तरी या दिवसानिमित्त मला नमस्कार करून आशीर्वाद मागणार. सवयीमुळे त्याचा मला संकोच राहिला नाही. पण गुरुपौर्णिमेचे नांव ऐकताच मला माझ्या सर्व गुरुजनांचे स्मरण सर्वात अगोदर होते. आज शिष्यवात्सल्याला महत्त्व दिल्यास गुरुभक्ति गौण होईल. हे मला अगदी असह्य आहे.

लहानपणच्या शाळेतील निरनिराळ्या लहानमोठ्या शिक्षकांची देखील मी आज आठवण काढली. कित्येकाविषयी मला दयाच वाटली. त्यानंतर खरेखुरे समाजनेते आणि सांस्कृतिक गुरु यांचे स्मरण केले. ज्यांच्याकडून जीवनदृष्टि लाभली असे समकालीन आणि प्राचीन—सर्वांचेच कृतज्ञतापूर्वक स्मरण केले. या लोकांत स्वदेशी आणि विदेशी दोन्ही प्रकारचे गुरु होते.

या सर्वांचे उपस्थान केल्यानंतर मगच अध्यात्माकडे वळलो. हे माझे गुरुदेखील थोडे थोडके नाहीत. त्या सर्वामध्ये प्रथम स्थान प्रार्थनासमाजाला आणि त्यानंतर स्वामी विवेकानंदांना. सर्वांची नांवे येथे लिहिणे प्रशस्त होणार नाही. सरतेशेवटी कळस म्हणजे पूज्य बापूजी.

हे सर्व पौरुषेय गुरु. यांच्याकडून सर्व काही मिळवल्यानंतर मला आत्मगुरूचा उल्लेख केलाच पाहिजे. आत्मगुरु म्हणजे माझ्या हृदयात राहणारे, माझ्याशी पूर्ण तादात्म्य स्वीकारणारे आणि तरीहि माझ्याहून अलिप्त आणि श्रेष्ठ असे आत्मदेव. माझ्याहून ते भिन्न नाहीत ही त्यांची कृपा. पण खरोखर माझ्यातील सर्व हीनपणा, अपूर्णता, एकांगीपणा ओळखण्याइतके ते स्वतः थोर आहेत. त्यांच्या इतकी क्षमा कुणातच नसेल. पण दोष दाखविताना कसलीच दयामाया नाही. या हृदयस्थ, अत्यंत थोर गुरुदेवांच्या प्रसादाला लायक मी केव्हा होईन ? आज अत्यंत अंतर्मुख होऊन दिवस घालवल्यामुळेच हे गुरुचिंतन साधले आणि त्याविषयी लिहिताना धन्यता वाटली.

अहमदाबाद
९–७–७१

वृद्ध लोक अनुभवसमृद्ध असतात. नव्या पिढीच्या लोकांना, पूर्वी न घडलेले सिद्ध करून दाखवण्याची श्रद्धा आणि हिंमत त्यांच्यात असते, असली पाहिजे. त्यांच्यावर विश्वास ठेवून, नेतृत्व त्यांना सोपविणे यात तरुणांची खरी आस्तिकता आहे.

'पारमिते'चा बोध केवळ भाषांतराने जनतेपर्यंत पोहोचणार नाही. त्याच्या मागील इतिहास विस्तृतपणे समजावला पाहिजे.

वेदाविषयी अत्यंत आदर असावा. वेदप्रामाण्यापेक्षा वेदपरंपरेचा उत्तराधिकारी होणे अधिक महत्त्वाचे आहे.

आज दिवसाच्या शेवटी खूप धडपड करून श्रीमुखभाई आणि मनोरमाबेनना भेटू शकलो. मनोरमा म्हणे स्वतःच्या आईचे एकमात्र अपत्य.

मनोरमेचा एकुलता लाडका मुलगा–जीत गेल्याने मनोरमेचे दु:ख मी समजू शकलो. पण तिच्या आईचे अनेकपट दु:ख मी हृदयात साठवू शकलो. नचिकेताच्या भक्तीने यमराजाकडून त्याचे रहस्य समजून घेणारा मी, मृत्यूच्या वार्तेने सहजासहजी प्रभावित होत नाही. पण जेव्हा ऐकले की 'जीत' एकाएकी बेशुद्ध झाला आणि त्या स्थितीत जवळजवळ दीड महिना बेशुद्धच राहिला तेव्हा त्याच्या तशा अवस्थेत त्याच्याजवळ बसून राहणाऱ्या आईबापाची काय स्थिति झाली असेल याची कल्पना करूनच मी अस्वस्थ झालो. मुलगा आता उठेल, मग उठेल अशा आशेत दिवस कंठायचा आणि एक एक दिवस गेला म्हणजे निराशेत बुडून जावयाचे–तरीहि आशा सोडावयाची नाही आणि निराशेने घेरले जावयाचे–या स्थितीची कल्पना करून मी ती अनुभवली. मला एकदम भडभडून आले. असा अनुभव मला सहजासहजी येत नाही. वाटले, आता डोळ्यातून खळकन पाणी वाहणार ! मोठ्या प्रयत्नाने हुंदका दाबला आणि मुकाट्याने पुढच्या गोष्टी ऐकल्या आणि मन शांत केले. मृत्यूपेक्षाहि आशानिराशेच्या असह्य हेलकाव्यात दीड महिना काढणे याची वेदना मी आज अनुभवली.

अहमदाबाद
१०–७–७१

आज जुने-नवे इतके लोक भेटले आणि इतक्या निरनिराळ्या विषयांची मौलिक चर्चा झाली की सर्वांचा उल्लेख करणेहि सोपे नाही. आणि विस्ताराने लिहिणे अशक्य. तेव्हा 'पुष्कळ चिंतन झाले म्हणूनच काही लिहिता येत नाही' असे म्हणावे लागते.

आणि रात्री भोजनाच्या वेळी पित्त-प्रकोप होऊन जोराची भोवळ आली. सारे घर जणू चक्राकार फिरू लागले. दोन-तीन उलट्या झाल्या-नंतर शांति वाटली आणि वेळेवर झोपहि आली. सकाळी अगदी ताजे वाटले.

आता मनाला पटले की प्रकृति तशी बरी असणार. पण सबंध

शरीरात पसरलेली अस्वस्थता मात्र दूर होणे दुरापास्त आहे. तेव्हा प्रवास कमी, लोकांशी विचारविनिमयहि कदाचित् कमी करावा लागेल. रिकाम्या वेळेच्या अभावी वाचन फारसे होऊ शकत नाही. तरीहि अद्यतन जागतिक प्रवृत्ति आणि नवे नवे विचार यांच्याशी परिचय ठेवलाच पाहिजे त्यावाचून नित्यचे चिंतन करणे शक्य नाही. कारण आत्मशक्तीचा प्रभाव विश्वावर कसा असू शकतो आणि आत्मशक्तीची उपेक्षा केल्याने जगातील प्रवृत्ति कशा बाधक आणि सर्वविनाशक होतात याचे चिंतन चाललेच पाहिजे. आणि ते ताज्या वाचनानेच शक्य होते.

तरीहि या दिशेने आत्मशक्तीचा परिचय ज्यांना अगदी बेताचाच आहे त्यांनादेखील कित्येक फार चांगल्या गोष्टी सुचतात. त्या वाचल्याने स्वतःची आत्मनिष्ठा मजबूत तर होतेच पण तिला नवानवा वाव मिळतो. हा मोठा लाभ घालण्याजोगा नाही

तेव्हा थोडे वाचन, थोडे लेखन, थोडा विचारविनिमय आणि पुष्कळशी झोप अथवा आराम–असाच कार्यक्रम यापुढे ठेवला पाहिजे. आणि प्रकृतीला सांगितले पाहिजे की "बये (अथवा माते !) आजवर तुझ्याकडून कसलाच अत्याग्रह झाला नाही. तू मला सांभाळून घेतले आहेस. आता मीहि तुला सांभाळीन शेवटपर्यंत साधेल तसा सहयोग करू या."

अहमदाबाद
११–७–७१

पारिवारिक संस्कार-संमेलन दोन प्रकारे झाले. सकाळी राजभवनामध्ये आणि संध्याकाळी श्री. गणेशमल दुगड यांच्या घरी. सकाळच्या संमेलनात मी हजर राहू शकलो. संध्याकाळी तेथे जाण्याची माझी तयारी होती, पण लोकांनी माझ्या तब्येतीचा विचार करून मला त्रास न देण्याचे ठरविले (त्यांत सतीशचा हात होताच).

पाच-पाच किंवा सात-सात वर्षांच्या तीन नव्या पिढ्या आणि तशाच तीन जुन्या पिढ्या, यांचे संमेलन उत्तम झाले. कल्पनाच भव्य होती. काल

भगवंताचे वात्सल्य आणि पराक्रमाची दीक्षा, आत्मशक्तीचा अनंत विकास साधत राहावयाचे–ही आस्तिकता.

याचे चिंतन करतांना मला कवि नानालाल आठवले. त्यांनी गीतेतील एक वचन सुधारण्याची हिंमत करून दाखवली. गीतेतील भगवंतांनी आपल्या एका विभूतीचे अर्धे दर्शन करवले --

कालोस्मि लोकक्षयकृत-प्रवृद्धः ।
लोकान् समाहर्तुम् इह प्रवृत्तः ।।

युद्धाच्या प्रारंभी लोकक्षयकृत् विभूतीला महत्त्व होते. पण ते सनातन नव्हे. नानालाल कवींनी जाहीर केले – कालोस्मि लोकोन्नतिकृत् प्रवृद्धः । जुन्या गोष्टींचा, शिळ्या परिस्थितीचा नाश–क्षय करूनच नवनिर्मिति आणि लोकोन्नति व्हायची असते. भारताला आपल्या जुन्या, सडलेल्या आणि अधःपात करणाऱ्या सांस्कृतिक तत्त्वांचा नाश करून सर्व समन्वयात्मक, विश्वसमन्वयात्मक उन्नति – आणि तीहि जागतिक उन्नति साधावयाची आहे.

या कामी जगांतील सर्व राष्ट्रात, आंतर-राष्ट्रीय मिशनचा स्वीकार करणारे अमेरिकन राष्ट्र आपल्याशी उत्तम सहयोग करूं शकेल. रशियाला अजून युरोप – अमेरिकेतील – आणि स्वतःच्या घरचीदेखील – अवनति दूर करावयाची आहे. रशिया आणि अमेरिका यातील वैमनस्य मिटवता आले तरच भारताला आपले मिशन जगात पसरवता येईल. यासाठी आत्मशुद्धि आणि जागृति आवश्यक आहेत.

अहमदाबाद
१२–७–७१

आज लोकांना खरेदेखील वाटणार नाही, पण गांधीजींच्या आश्रमात प्रारंभी, हरिजन शिक्षक दुधाभाई सपत्नीक दाखल झाले, यामुळे (दक्षिण आफ्रिकेत ख्रिस्ती लोकांबरोबर उत्तम प्रकारे मिसळणाऱ्या) गांधीजींच्या कित्येक साथीलोकांनी उपवास केला. त्यामुळे बापूदेखील उपाशी राहिले. अडचण टाळण्यासाठी पूज्य बापूजींनी मगनलालभाई गांधींना मद्रासकडे

पाठवून दिले. पूज्य बा दीर्घ कालपर्यंत फलहारावरच होत्या. हे सर्व म्हणू लागले, "दक्षिण आफ्रिकेची गोष्ट निराळी. येथे स्वदेशांत आणि स्वसमाजात आहोत. येथे हरिजनांना स्वीकारता कसे येईल ?"

अशा आणीबाणीच्या वेळी पूज्य बापूजींनी मला बडोद्याहून आश्रमात राहण्यासाठी बोलावले.

मी म्हणालो, "मी एकटा येणार नाही. पत्नी-मुलांना घेऊन येईन ! ते मान्य असावे." काकीने माझी लाज राखली. आश्रमात येताच दुधाभाईच्या पत्नी दानीबेनला बरोबर घेऊन तिने स्वयंपाकाचे काम हाती घेतले. त्या वेळचा पू. बापूजींचा संतोष आणि आनंद आज आठवून धन्यता वाटते.

मामा फडके येथे आले आहेत याचा विशेष आनंद आहे. दीपक-सारख्या नव्या पिढीला त्यांचा सविस्तर परिचय करून दिला. अस्पृश्यता निवारणाला त्यांनी कसे वाहून घेतले हेहि सांगितले.

इंदूबेन शेठ आणि झीणाभाई यांच्या विद्याविहार संस्थेमध्ये आई-बाप (पालक) आणि शिक्षक यांचे संमेलन होते. या सर्वांनी नव्या पिढीला उत्तमोत्तम संस्कार देऊन सांगितले पाहिजे की, 'हे सर्व घ्या, पण आमचे केवळ अनुयायी बनू नका. तुम्हाला आमच्यापुढे जावयाचे आहे. एक दिवस येईल जेव्हा आम्ही प्रसन्नपणे तुमच्या मागोमाग येऊ आणि त्याची धन्यता अनुभवू'. म्हणूनच म्हटले आहे—पुत्रात् इच्छेत् पराजयम्, शिष्यात इच्छेत् पराजयम् । दर पिढीला उत्तम धर्माचे प्रागतिक नवसंस्करण करावेच लागते. त्यासाठी उदार श्रद्धा आणि आत्मशक्तीविषयी आस्तिकता असली पाहिजे.

अहमदाबाद
१३–७–७१

आमचे जावई श्रीमन् नारायणजींचा आज जन्मदिवस. भारतीय साहित्य अकादमीने मला अकादमीचा "महत्तर सदस्य" (fellow) पसंत करून त्याचे ताम्रपत्र मला येथे (अहमदाबादमध्ये) दिले. प्रत्येक साहित्य-सेवीला त्याच्याच घरी म्हणजे वातावरणात ताम्रपत्र अर्पण करण्याचा

रिवाज आहे. माझ्यासाठी गुजरातची राजधानी पसंत करून माझी गुजराती आत्मीयता त्यांनी मान्य केली. याचा मला आनंद वाटला. (त्या प्रसंगी उमाशंकरनी थोडा विनोद करून घेतला.) ते म्हणाले, “नित्य प्रवासी काकासाहेब यांचे घर खरोखर धावती आगगाडी म्हटली पाहिजे.” इत्यादि.

स्वराज्य स्थापनेनंतर ज्या नव्या संस्था उत्पन्न झाल्या, त्यापैकी साहित्य-अकादमी अत्यंत सात्त्विक आणि आदरणीय. माझ्या आयुष्याच्या, शेवटी तिने केलेला बहुमान हा खरोखर प्रादेशिक भाषांच्या सेवेचा बहुमान आहे.

आजचे युग सत्ता आणि संपत्ति याच्यामागे लागले आहे. ‘सत्ता आणि संपत्ति वाढावी आणि सर्वांना ती वाटून मिळावी, याचेच नांव ‘सत्ययुग’ असा विचार जगभर पसरला आहे.

एका काळी धर्माची प्रधानता होती. पण धर्मसंस्थेने सत्तेची उपासना केली. अनुयायांची संख्या वाढवण्याची चढाओढ चालवली आणि संस्कृति बिघडवली. राजसत्तेने लोककल्याण थोडेफार केले असेल पण जनतेचे चारित्र्य भ्रष्ट केले आहे.

स्मृतिकारांनी त्या काळच्या सांस्कृतिक नेत्यांना – ब्राह्मणांना निक्षून सांगितले होते : “सत्ता आणि संपत्ति प्रत्यक्ष हाती घेऊ नका. समाज ठेवील तसे रहा.”

खरोखर धर्मसत्ता आणि राजसत्ता मानवजातीची खरी उन्नति आता करू शकणार नाहीत. हे काम संस्कृतिसेवक, प्रजासेवक साहित्यकारच करू शकतील. मात्र त्यांनी अनिर्बंध कामुकता आणि असंस्कारी विलासिता वाढवून हीनपणे प्रजारंजन करण्याचे हलके काम सोडून दिले पाहिजे. शेवटची आशा संस्कृतिधुरीण साहित्यसेवकांवरच अवलंबून आहे.

अहमदाबाद (आगगाडी)
१४–७–७१

आपल्या कामात तल्लीन असलेले लोक भेटले म्हणजे विशेष आनंद

होतो. त्यांच्या कामाची माहिती मिळते आणि माझे ज्ञान अद्यतन होते, हा मला लाभ आणि त्यांच्या विषयात त्यांना माझ्याकडून एखादी नवी दृष्टि किंवा नवी सूचना मिळते. कित्येक लोक या लोभानेच माझ्याकडे येऊन आपला विषय छेडतात. आज विष्णुदेव पंडित, (वेद परिचयचे लेखक) झीणाभाई, मनसुखरामभाई, जोबनपुत्रा, मनुभाई जोधाणी आणि रविशंकर दादा यांनी आपापल्या क्षेत्रांची चर्चा केली. मनुभाई पंचोळीहि भेटले.

जानकी मैयांनी गौरक्षेचा प्रश्न काढला. माझे उत्तर त्यांनी Tape Record केले आहे.

गाय-बैल यांचा प्रश्न आता अगदी बदलून गेला आहे. गाय-बैलांना आता nationalise केले पाहिजे ही माझी मौलिक सूचना आहे. हा प्रश्न आता हिंदूंचा राहणे शक्य नाही. गाय-बैल आणि माणूस दोघांनाहि जमिनीच्या उत्पन्नावर जगावयाचे आहे. यामुळे दोघे एकमेकांचे प्रतिस्पर्धी झाले आहेत. गाईला संततिनियमन लागू करणे अपरिहार्य आहे आणि गोभक्षक लोक ते मान्य करणार नाहीत. हाच मोठा पेच आहे. गाईचे राष्ट्रीयीकरण करून त्यातून जो उपाय निघेल तो सर्वांनी मान्य करावा.

याविषयी आता मलाच निर्भयपणे चर्चा सुरू केली पाहिजे.

गणेशमलजी दुग्गड चांगले समाजसेवक आहेत. त्यांच्या घरी सर्व-धर्म प्रार्थना चांगली झाली.

राजभवनमध्ये सहा दिवस मदालसेचा आणि श्रीमन्‌जींचा परिचय चांगला झाला. यांच्या हातून गुजरातची चांगली सेवा होत आहे आणि गुजरातदेखील याची चांगली कदर करीत आहे.

मुंबई
१५-७-७१

श्रीमती मारी लुईस हाब नांवाची एक स्विस-फ्रेंच बाई भेटली. बौद्ध धर्म आणि योग याची तिला गोडी आहे. तिने एक तिबेटी बौद्ध गुरु केला आहे.

युरोप-अमेरिकेच्या कित्येक लोकांना हिंदुस्थानच्यापेक्षा देखील तिबेटच्या प्राचीन वातावरणाचे आकर्षण अधिक आहे. याचे आश्चर्यहि वाटते आणि ते स्वाभाविकहि आहे. विज्ञानाच्या वातावरणात वाढलेल्यांना चमत्कार आणि गूढ गोष्टी अद्‌भुत वाटणारच. मानवमात्रात ही कमजोरी आहे. या बाईशी प्रथम चर्चा झाली कारुण्यासंबंधाने. मी सांगितले स्त्रीपुरुषामधील जे कामुक आकर्षण असते, त्यालाच 'प्रेम' म्हणण्याची चूक जर केली नाही तरच आपण प्रेमधर्म समजू शकतो आणि प्रेमधर्म आचरणात येतो कारुण्यपूर्ण सेवेच्याद्वारा. Have in action is compassion. त्यानंतर धर्मांतराचा प्रश्न निघाला. मी म्हणालो, "मी जन्माने हिंदू आहे. त्या धर्माची सेवा मला मिळते. त्या धर्मात ज्या उणिवा असतील, त्या दूर करण्यात हिंदुधर्माची सेवा आहे. म्हणून हिंदुधर्म न सोडता कोणताहि धर्म मला घेता येईल. जैनांचा 'स्याद्‌वाद' 'सर्व-धर्म-समभावा'ला पोषक आहे. इस्लामी आणि ईसाई धर्म-समाज इतर धर्मांचा द्वेष करतात. त्यांना आपली संख्या वाढवायची असते. ईश्वराच्या ऐवजी संख्येची पूजा करतात. यांनीच धर्म-धर्मांची युद्धें चालवली. समस्त मानव-जातीत कौटुंबिक भाव उत्पन्न करील तोच खरा धर्म." ती म्हणाली, 'बौद्धात देखील आमचाच धर्म खरा आणि सर्वश्रेष्ठ आहे असे म्हणणारे लोक आहेत.'

मी म्हणालो, असतील ईसाई अभिमानाची ती प्रतिक्रिया असेल. पण 'तुमचा धर्म सोडा, आमचा घ्या' असा आग्रह मोठ्या प्रमाणावर त्यांनी चालविल्याचा पुरावा नाही. 'धर्मांतराचा' कार्यक्रम हा त्या धर्माचे वैशिष्टय अजून दिसत नाही.

मुंबई
१६–७–७१

सरते शेवटी मरणाविषयीचे इंग्रजी पुस्तक आज मिळाले. एखाद्या महिन्याची मेजवानी झाली.

पुंडलीकजी भेटून गेले. Sabotage विषयी मी त्यांना लिहिलेले ताजे पत्र त्यांनी तिम्माप्पा नाईकांना दाखविले. नाईकांना संतोष झाला.

पुंडलीकजी जन्मभर अनिर्णितच राहणार. त्यांच्या हाडात हिंसा आहे आणि अहिंसा सोडणे आता त्यांना शक्य नाही.

संध्याकाळी समुद्राच्या किनाऱ्यावर जाऊन त्यालाच प्रार्थना ऐकवली. प्रार्थनेत अनोळखी तीन बाया उत्साहाने सामील झाल्याचा आनंद वाटला. पण समुद्रदर्शन आणि प्रार्थना यांचा आनंद अद्भुत होता. समुद्राच्या हृदयाला जोराचे भरते आल्यामुळे तो माझ्याशी विचारविनिमय करू पाहात होता. मला त्याचे थोडे थोडे समजत होते. आणि मला पूर्ण समजत नाही याचा त्याला विषाद वाटत होता. हा विषाद काही केल्या कमी होत नव्हता. सहानुभूतीमुळे मीहि विषण्ण झालो.

घरी आल्यावर डॉ. माधवदास, अवनी आणि मंजू ठरल्याप्रमाणे भेटले. विश्व-समन्वयाविषयी अगदी मनापासून आणि हृदयापासून बोललो. कारण माझे संपूर्ण मिशन त्यांच्यात ओतावयाचे होते. आज फारच उत्कटतेने बोललो. यापुढे हेच काम माझा सर्व वेळ घेणार आणि त्याच्याच ध्यानात देखील एकाग्र व्हावे लागणार. मुंबईत संस्थेची शाखा काढली पाहिजे.

सर्वांगी एकाग्रता ही माझी विशेष जीवनसाधना आहे. ती आता पुष्कळच वाढणार असे स्पष्ट दिसते. या कामी अधिकाधिक लोकांना खेचावयाचे आहे. चि. अमृतलालची आता पुरी कसोटी होणार.

या वयात अमृतलालना दिल्लीपेक्षा मुंबईची हवाच चांगली आणि म्हातारपणी घरच्या लोकांची सेवा त्यांना मिळणे हेहि इष्टच आहे. चि. सरोजला देखील मुंबईत थोडे अधिक राहता आले तर माझ्या दृष्टीने ते इष्टच आहे. आणि मी स्वतःला तटस्थ काय म्हणून मानावे ? मुंबईशी माझादेखील संबंध आहेच.

मुंबई
१७–७–७१

चि. मृणालिनी मराठी आणि गुजराती दोन्ही भाषेत लिहिते याचा आनंद आहेच. पण ती दोन्ही समाजात सारख्याच मोकळेपणाने वावरते

आणि तिला दोन्ही समाजात आदराचे स्थान आहे याचा मला विशेष संतोष आहे. हे काम केवळ भाषाप्राविण्याचे नसून, सांस्कृतिक विशाल सहानुभूति आणि उदार सांस्कृतिक आकलनामुळेच शक्य होते.

गुजराती समाजात सोपान आणि लाभूबेन यांचा प्रभाव खोलवर पोहोचला आहे. त्या मानाने या दंपत्तीचा परिचय मला कमी आहे याचे वाईट वाटते. सोपानाचा परिचय तसा फारच जुना आहे. तो वाढायला हरकत नव्हती. माझे संबंध, काही अंशी एकांगी झाले यामुळे माझे बरेच नुकसान झाले आहे.

परमानंदभाई माझे फार जुने गुजराती मित्र. त्यांच्या 'प्रबुद्ध जीवन' साठी मी अधून मधून लिहावे असे चिमनलाल चकूभाईंनी मला दोनदा सांगितले. आणि आज तीच विनंती करण्यासाठी चिमनलाल ज. शाह, सुबोधभाई आणि रेखा-पिता दामजीभाई मुद्दाम आले होते. मी यापूर्वीच एखादा तरी लेख द्यायला हवा होता. मी पाठवला नाही, गफलत झाली. मी त्यांना सांगितले, "दोन-तीन विषय सुचवा, म्हणजे तुम्हाला खात्रीने माझे लेख मिळतील. एरवी काही सुचत नाही." एकदा वाटते की गुजराती जैन समाजाविषयी माझ्या अपेक्षा काय आहेत, याविषयी एक लेखमाला लिहावी. पुन्हा वाटले 'प्रबुद्ध जीवन'ला अशी लेखमाला झेपेल का? मला वाटते, हिंमतपूर्वक अशी माला लिहावीच. गुजराती जैन समाजात वैशिष्टय आहे. हिंदु संस्कृतीचा लाभ मिळवूनदेखील कित्येक हिंदुदोष या समाजात नाहीत. त्यामुळे माझ्या मनात ज्या आशा उत्पन्न झाल्या आहेत त्या आता मी व्यक्त केल्या पाहिजेत.

मुंबई
१८–७–७१

"भ्रमंती"चे संपादक बाळासाहेब धुरंधर भेटले. मनुष्य व्यवहारचतुर आणि कर्तबगार दिसला. व्यवहारात सफलता मिळत असूनदेखील, ती सोडून tourism ला खाजगी रीतीने वाहून घेण्याचे त्यांनी ठरविले. सरकारने देऊ

केलेली ग्रॅन्ट नाकारली आणि केवळ लोकमताच्या जोरावर श्रमंतीचे मिशन व्यवहाराच्या दृष्टीनेदेखील सफल करून दाखवत आहेत. सरकारचा आश्रय कसा बाधक होतो याची या गृहस्थाला उत्तम कल्पना आहे. मी त्यांना सांगितले "तुमच्या कामाला Private sector म्हणू नका. पण non-Governmental Public sector म्हणा. 'असरकारी' शब्द त्यांना ठाऊक नव्हता. त्यांना समजावला. मनुष्य मला आवडला. पुढे मतभेद होणार नाही असे नाही. पण आज तरी संबंध वाढवणार.

कु. चांदनी बरोबर प्रज्ञाचक्षु रमेश आला होता. रमेश मला अधिकाधिक आवडू लागला आहे. याची आत्मकथा थोडक्यात दिल्लीला मिळणार आहे.

आज कुंदर दिवाण भेटले. एकापरीने बरे झाले. नवीन स्मृतीविषयी मी विसरून गेलो होतो. त्याची त्यांनी आठवण करवली. नवीन स्मृति करणे माझ्या मिशनला अत्यावश्यक आहे. पण पंथ उत्पन्न करावयाचा नाही.

आजचे मुख्य चिंतन श्री. चिमनलाल चकूभाई शाह यांचेशी झाले. "गुजराती जैन समाजाकडून माझ्या अपेक्षा" ही लेखमाला आता लिहिलीच पाहिजे.

यांच्याशी अगदी मौलिक चर्चा झाली. हिंसे-अहिंसेचे समाजशास्त्र मी त्यांच्यापुढे खोलात शिरून, विस्ताराने मांडले. परमानंदभाई यांचे हे स्नेही. त्यांच्या इतकेच मला आज महत्त्वाचे वाटले.

दिल्ली

१९-७-७१

आज आम्ही मुंबईहून दिल्लीला जावयाला निघालो. ट्रेनमध्येच श्रीमन्‌जींना पत्र लिहावयाला वेळ मिळाला. श्रीमन्‌जी स्वतःच्या मर्यादा ओळखून ध्येयनिष्ठा संभाळणारे आहेत. स्वतःच्या मर्यादा बरोबर ओळखण्यात त्यांची नम्रता आणि व्यवहारकुशलता आहेच. पण उघडपणे ते

व्यक्त करोत किंवा न करोत, 'अतिध्येयनिष्ठा जीवनाला इष्ट नाही. मर्यादा सांभाळणे यातच ध्येयनिष्ठा उत्तम पाळली जाते,' असे त्यांना वाटत असले पाहिजे. अथवा, हा विचार माझा असल्यामुळे तो त्यांच्यातहि मी पाहत असेन.

एकदा बापूजी माझी कमजोरी मला समजावून सांगतांना म्हणाले होते "तमे अमले मोळा छो. सामा माणसनी दया खाईने तमे अमलमां कडक नथी थता. अे बराबर नथी." पू. बापूजींनी माझा दोष दाखवला. त्याचा मी स्वीकार केला आणि मग हळूच म्हणालो; "संस्था चलावता कडकाई वापरीने लोकोने चढावी शकाय, अे रीते ज संस्था प्रगति करती हशे. पण कडकाईथी अमलमां आणेली ध्येयनिष्ठा टकती नथी. में जोयुं छे के केटलाय ध्येयनिष्ठ लोको आसपासना समाज करतां पोते आदर्शनुं पालन कडकाई थी करे छे. एथी नामना मेळवे छे. समाजना गुरु बने छे.' अशा रीतीने प्रतिष्ठा आणि अधिकार पदरी पडल्यानंतर स्वत:ची ध्येयनिष्ठा हळूहळू कमी करतात आणि लोकांचे ध्यान तिकडे जाऊ नये म्हणून दुसरीच एखादी टूम पुढे करतात. कडक ध्येयनिष्ठा दीर्घकाळ टिकत नसते. त्यापेक्षा सर्वांगीण विचार संभाळणेच चांगले असे मला वाटते.

नवी दिल्ली

२०-.७--७१

आज चि. अमृतलालचा जन्मदिवस. आम्ही दिल्लीला पोहोचलो. अमृतलालनी पासष्ट वर्षे पूरी केली. त्यांच्यात आणि माझ्यात वीस वर्षांचे अंतर आहे. त्यांनी यापुढे मुंबईत राहावे, विश्वसमयन्वयाचे काम तेथे करावे, आणि घरच्या लोकांना आपला सहवास द्यावा ही माझी सूचना त्यांच्या ध्यानात बरोबर आलेली दिसत नाही. परिस्थितीचे आकलन उग्रपणे झाल्यावाचून, भविष्याची नीति योग्यपणे ठरू शकत नाही.

बीबी अमतुस्सलाम भेटल्या. त्या आज ग्वाल्हेरला जाऊन जुन्या वैद्याचा इलाज करणार. मला बीबीजीविषयी बरीच काळजी वाटते. मी नेहमी विनोद करतो की, "जन्ममरणाच्या किनाऱ्यावर राहण्याची त्यांना

संवय पडली आहे. या खेपेला त्यांची प्रकृति तशी विशेष बिघडलेली दिसली नाही. पण बऱ्याच थकल्या असाव्यात. मनोरचनेत कसलाच फरक नाही. त्यांची मनोरचना निरोगी आहे. त्याचाच लाभ त्यांना मिळत आहे. ग्वाल्हेरहून येथे येऊन मगच त्यांनी राजपुरला गेले पाहिजे. पण त्यांची मर्जी तशी दिसत नाही.

जपानी मुलगी ××× माझ्या चिंतेचा विषय झाली आहे. खरोखर तिच्या मनात काय आहे हे जर समजू शकलो तर सोपे जाईल. पण अडचण तीच आहे. हा देश सोडून ती स्वदेशी लवकर परत जाईल तर सर्व प्रश्न सुटतील. जपानी लोकांचे आतिथ्य पांच वेळा घेतले. त्यांच्यासाठी काही केले पाहिजे अशा बुद्धीने या पोरीचे स्वागत केले. यात काही चूक होऊ नये म्हणून नरेश मंत्रीना हिचा तपास करण्याचे सुचविले. त्यांच्याकडून 'ऑलबेल' आली. म्हणूनच तिला बोलावली. ती लग्नार्थी आहे याची कल्पना असती तर हजारदा विचार केला असता.

दिल्ली
२१--७--७१

सकाळच्या प्रार्थनेत चि. मृणालिनीचा उल्लेख केला. त्यानंतर एक विचार आला. तिची दोन्ही भाषेतील साहित्य--उपासना विविध आहे, व्यापक आहे. भाषा आणि शैलीच्या खुबीचे अध्ययनहि आहे. पण ही झाली साहित्य--उपासना. या उपासनेबरोबर जीवन-उपासना पण गंभीरपणे चालू असेलच. पण तिचा अनुभव होण्याइतका आमचा परिचय वाढतच नाही. क्वचित् प्रसंगी, मधून मधून भेटतो. जुन्या गोष्टी आठवतो, आत्मीयता ताजी करतो, पण परिचय वाढत नाही. जीवनानुभवाविषयी बोलण्याला अवकाशच सापडत नाही. त्यामुळे. अंतर कायम आहे, हे मात्र जाणवते.

आज कुमारी ××× च्या आजारीपणामुळे तिचेच चिंतन, उत्कटपणे करावे लागले. जॉनशी विचारविनिमय करावा लागला. जुन्या जपानी मुली--योशिमी आणि युकीको लहान असूनदेखील अनुभवाने पोक्त दिसतात.

सेवाभावहि चांगला आहे. भारतात राहून पुष्कळ मिळवण्याची शक्ति त्यांच्यात आहे. दोघींची जोडी चांगली आहे. आवडण्याजोग्या मुली आहेत. त्यांनीच प्रथम सांगितले की × × × ला कावीळ झाली आहे.

आज मनूभाई जोधाणीना एक महत्त्वाचे पत्र लिहिले. त्यांचे "स्त्री जीवन" मासिक चांगले काम करीत आहे. इतर प्रांताच्या मानाने गुजरातमधील जागृति ताजी किंवा नवीन म्हटली पाहिजे. मूळ गुजराती स्वभाव चांगला. त्यावर चढवलेली संस्कृति उत्तम फळ देणारच.

दिल्ली
२२–७–७१

आज दुपारी एक पंजाबी, पुरुषार्थी, प्रज्ञाचक्षु लेखक–वेदमेहता माझी मुलाखत घेण्यासाठी आले होते. मनुष्य स्वभावाने गोड. आंधळा असूनहि युरोप–अमेरिकेला जाऊन राहिला आहे. तेथे त्याने भारताविषयी आठएक पुस्तके लिहिली आहेत. हाच पुरुषार्थ थोडा नव्हे. आता फोर्ड फाउन्डेशन आणि दुसरी एक संस्था यांच्या वतीने गांधीजींविषयी एक सविस्तर पुस्तक लिहिण्यासाठी भारतात आला आहे. त्याच्याशी मी अगदी मोकळ्या मनाने बोललो–गांधीजींची प्रथम भेट त्यांनी सविस्तर विचारून घेतली. गांधीजींचे वैशिष्टय कशात आहे ? गांधीजींचा प्रभाव लोकांवर का पडला ? स्त्रियांना त्यांच्याविषयी आकर्षण कां ? त्यांचा आहार आणि स्वादसंयम. गांधीजींशी कधी मतभेद झाला का ? इत्यादि पुष्कळ प्रश्न त्यांनी विचारले. प्रचलित राजकारणाविषयीदेखील. (या बाबतीत मी माझ्या नेहमीच्या भूमिकेवरून उत्तरे दिली.)

गृहस्थ पुन्हा एकदा भेटावयाला येणार. चांगला चौकस आहे. पंजाबी पुरुषार्थाची मूर्ति आहे. याची पुस्तके आता मिळवून वाचली पाहिजेत.

खरोखर अमेरिकन राष्ट्र जगाचे पुढारीपण करण्यास लायक आहे. अमेरिकेचे सरकार कसेहि असो, राष्ट्रातील जनता हिंमतवान आहे. जगाला ओळखण्याचा पुरुषार्थ करीत आहे. पूर्वीचे धर्मप्रचारक मिशनरी जबरदस्त

इच्छाशक्तीचे आणि लोकोत्तर तपस्वी. पण त्यांचा आदर्श संकुचित. आजचे जग विज्ञानाला आणि संस्कृतीला महत्त्व देते आणि तपस्येपेक्षा पुरुषार्थाला श्रेष्ठ मानते. आणि समस्त प्रजा प्रयोगपरायण आहे. यांच्या सहवासाने आपल्या लोकांत हे सर्व गुण येतील तर आपले अध्यात्म कृतार्थ होईल.

दिल्ली

२३–७–७१

आज दिल्लीचे सर्वोदयवाले आपल्या प्रार्थनाखंडात एकत्र झाले होते. त्यापूर्वी श्री. भीमसेन सच्चर येऊन भेटून गेले सर्व-हित-कारी सज्जन आहेत. अनुभवी तर आहेतच.

हमदर्द दवाखान्यात जाऊन कु. ××× ला भेटून आलो. तेथे जॉन सेवेला होताच ! परत येऊन सर्वोदयवाल्यांपैकी कित्येकांना भेटलो. सच्चरजी भेटले तेव्हा जैनेंद्रहि भेटले होते. आम्ही परत आलो तेव्हा बरेचसे सर्वोदयवाले गेले होते. तरीहि पांच-सातजण दिल्लीचे आणि बाहेरचे भेटले. त्यांना सांगितले की जनतेचे सामाजिक आणि सांस्कृतिक नेतृत्व आपण गमावून बसलो आहोत. ते नेतृत्व जनसंघाकडे गेले आहे आणि गांधीवाले "बिचारे निरुपद्रवी रचनात्मक काम करणारे." अशी आपली शेखी झाली आहे. हे सर्व बदललेच पाहिजे. राष्ट्राची एकता संकटात आहे. जागतिक परिस्थिति ओळखून, विज्ञान आणि अहिंसेच्या जोरावर भविष्याची रचना करावयाची आहे. यात आपण पुढाकार घेतला पाहिजे. आपण समन्वयवादी आहोत. पण त्याच्या-साठी आवश्यक वाटल्यास, संघर्षहि उभा केला पाहिजे. कोणीहि आपल्याला 'बिच्चारे' म्हणता कामा नये." थोड्या वेळात सर्व सांगितले.

नरेंद्र पडते पुन्हा भेटले. खादी कामात त्यांना महत्त्वाचे स्थान आहे असे दिसते. तारा, वसंत व्यास आपल्यापरी सर्वोदय कार्यकर्त्यांत चांगले मिसळतात.

दिल्ली
२४-७-७१

आज प्रज्ञाचक्षु वेद मेहता पुन्हा आले. त्यांना मी मुंबईकडील रमेश बोरसेविषयी सांगितले आणि मुंबईला त्यांनी एकमेकांना भेटावे अशी इच्छा व्यक्त केली.

जुगतरामभाई, मामा फडके, रविशंकरदादा वगैरे लोकांविषयी सांगितले. मग त्यांनी माझ्याशी interview इंग्रजीत पट्टीबद्ध केला. "ब्रह्मचर्याची जरूरच काय ?" या प्रश्नाला मी सांगितले "दोन निरनिराळी जीवनतत्त्वज्ञाने आहेत. दोहोंचा मला उत्तम परिचय आहे. दोन्हीकडे माझे मन झुकते. पण शेवटी जर संपूर्ण इंद्रिय विजय–म्हणजे मोक्ष–हे स्वीकारले तर पूर्ण ब्रह्मचर्य आवश्यक ठरते." त्यांनी ठराविक प्रश्न काढला "जसे भोजन आवश्यक तसेच सेक्स आवश्यक." मी भेद सांगून निरुत्तर केले. "श्वास घेणे, झोप घेणे, घाम येणे, खाणे–यावांचून जगताच येत नाही. सेक्सवाचून जगता येते आणि सर्वांगीण विकास पण होऊ शकतो." त्यांनी मनू, गांधी, आभा वगैरे विषयी विचारले. त्याची उत्तरे दिल्यानंतर, "गांधींना सेक्सचे नसो पण स्त्रियांचे आकर्षण विशेष कां होते ? अशा प्रश्नाला मी सांगितले, कित्येक लोक ते क्षम्य मानतात. मी म्हणतो, पुरुषांना स्त्रीजातीविषयी, दोन तीन कारणाने, विशेष आकर्षण आवश्यक आहे. सेक्सला पूर्णपणे बाजूला ठेवू. स्त्रीपुरुष मिळून एक संपूर्ण व्यक्तित्व होते. स्त्री आणि पुरुष परस्पर पूरक आहेत, हे एक कारण. दुसरे, जगभर इतिहासकाळात पुरुषाने स्त्रीला दाबात ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. या महान अन्यायाचे प्रायश्चित्त करण्यासाठी स्त्रीचा विशेष विचार केलाच पाहिजे. गांधीमध्ये ही वस्तु होती, याचा मला गौरव वाटतो.

सरकार संस्था गांधीजींच्या अहिंसेत बसत नाही वगैरे पुष्कळ गोष्टी सांगितल्या.

दिल्ली
२५-७-७१

गांधी हिंदुस्थानी साहित्य सभेची वार्षिक बैठक आज झाली. सात

सदस्यांची उपस्थिति होती. सभेची स्थापना होऊन सोळा वर्षे पुरी झाली. बैठक होती रिवाजी पण माझ्या मते फार महत्त्वाची होती. बापूजींनी मला सोपून दिलेले धर्म समन्वयाचे व्यापक काम, त्यात तीन मुसलमान व्यक्तींचा प्रभाव वगैरे सांगून चि. रैहानाचा परिचय कसा झाला, ते विचारपूर्वक सांगितले आणि कार्यपद्धति भिन्न असली तरी माझ्या सेवाकार्यात रैहानाचा सहयोग किती महत्त्वाचा आहे हेहि सांगितले. उद्देश हा की सर्वांच्या हृदयात माझी पवित्र आत्मीयता पेरली जावी.

आता देशाचा इतिहास, त्यापासून मिळणारा बोध, सध्याची परिस्थिती, भविष्याचे मिशन—याविषयी विस्तृत लेखमाला लिहून एक पुस्तक तयार केले पाहिजे (आणि ते संस्थेला अर्पण केले पाहिजे) असाहि संकल्प मनात ठरला.

आज दीक्षितजींनी स्वतः लिहिलेल्या एका अप्रकाशित कादंबरीची कथा सांगितली. कादंबरी मोठी—पांचशे पानांची होणार. त्यामुळे, आणि कादंबरीचे वातावरण गांधीवादी आहे म्हणून कोणी प्रकाशक छापावयाला तयार नाही" असे ते म्हणाले. मी सुचविले की याच कादंबरीतून दोन कादंबऱ्या कराव्या. दरेकीचे कथानक संपूर्ण असावे. रोचक आणि बोधक असावे. ज्यांनी पहिली वाचली नाही त्यांना दुसरी वाचतांना अडचण वाटू नये यासाठी पहिल्या गोष्टींतील घटना, व्यक्तिचित्रे वगैरेचा ओझरता उल्लेख दुसऱ्या गोष्टीच्या पूर्व भागात सहजपणे पसरलेला असावा. यातच लेखकाच्या कौशल्याची कसोटी आहे. दोन कादंबऱ्या करण्यात श्रेष्ठ कौशल्य व्यक्त होईल" इत्यादि सांगितले.

दिल्ली

२६—७—७१

प्रज्ञाचक्षु वेद मेहताची आज तिसरी मुलाखत झाली. त्यांनी संतोष व्यक्त केला. त्यांचे म्हणणे खरे आहे. गांधीजीसंबंधाने अलीकडे साहित्याचा एक पहाड उभा झाला आहे. पण गांधीजींचे खरेखुरे संपूर्ण व्यक्तित्व व्यक्त

झालेले मिळत नाही. त्यांनी एका पुस्तकाचा उल्लेख केला. Gandhi's Truth by Ericson– हे पुस्तक आणून आता वाचलेच पाहिजे.

मी त्यांना सांगितले की 'आमच्या संस्कृतीचे रहस्य ध्यानात घेतल्यावाचून गांधीजींचे व्यक्तित्व पूर्णपणे समजणे आजच्या जगाला शक्य नाही. गांधींनी व्यक्तिगत मोक्षाची कल्पना गौण ठरवून, सेवाद्वारा समाजाशी आणि विश्वाशी ऐक्य अनुभवणे आणि सर्व मुक्तीची नवीन साधना अजमावणे– हा सर्व मुक्तीचा आदर्श, आपल्या संस्कृतीपुढे आणि जगापुढे मांडला, ही गोष्टच लोकांना अजून समजलेली नाही. पण गांधीजी खरेखुरे अद्वैत वेदांती असल्यामुळे त्यांचा जीवन आदर्श अति-मानुषी (transcendental) आहे.

मनुष्यजातीचे सर्वोच्च चिंतकदेखील "माणसाच्या उत्कर्षासाठी प्राणीजगत् आहे" असे मानतात. आणि म्हणून समस्त मानवजातीच्या स्वार्थाचे समर्थन करतात. खरा वेदांत व्यापकतम स्वार्थालादेखील 'स्वार्थ'च म्हणणार. असला स्वार्थ सहन करू. तुच्छ स्वार्थ सोडता सोडता वर चढू, पण स्वार्थाला स्वार्थच म्हणून ओळखणार. त्याचे समर्थन करीत बसणार नाही असे मी स्पष्ट केले. माझ्या विचाराची स्वच्छता त्यांना फारच आवडली आणि त्यांनी संतोष व्यक्त केला.

दिल्ली<br>२७–७–७१

पूर्व बंगालविषयी गुजरातसाठी एक संदेश टेलिफोनवर–अहमदाबाद राजभवनला dictate केला. तोच संदेश दुपारी साडे तीन वाजता जैनेंद्रजींना इंग्रजीत लिहविला. माझा मुख्य भर "जगातील लहानमोठ्या राष्ट्रांच्या सरकारवर आधार न ठेवता, सर्व ठिकाणच्या संस्कृतिनायक मनीषी नेत्यांचे कार्यकारी संगठन तयार करून असरकारी, जागतिक संगठनाचा प्रारंभ करण्यावर आहे. भारतानेच हे केले पाहिजे."

मनुष्यजीवनात सर्वश्रेष्ठ संस्था धर्म होती. तिचा उत्तरोत्तर, अधिका-

घिक दुरुपयोग झाला. आज जगातील विचारवंतांना (अध्यात्माचे महत्त्व पटलेले असूनदेखील) धर्माची लाज वाटू लागली आहे.

त्यानंतर शारीरिक आणि लष्करी सत्तेच्या जोरावर राज्ये आणि सरकारे पुढे आली. त्याचे युग संपत आले आहे. पण आजकाल सत्ता आणि संपत्ती यांच्या जोरावर आणि आजवर दबलेल्या संख्येच्या जोरावर जग चालवण्याचा प्रयत्न लोकप्रिय आहे. याचा दुरुपयोग अधिकाधिक भारतातच होणार. माझ्या मते जाती (वंश), संपत्ती आणि संस्कृति यांच्या भेदांना गौण करणारा इस्लाम जगाची उत्तम सेवा करू शकला असता. पण त्याने धर्मसत्ता, राजसत्ता आणि लष्करी संघटन यांचा आश्रय घेतला म्हणून हा धर्मसमाज जगात मागासला आहे. आणि त्याचा प्रश्न सोडवण्याचा भार भारतावर येऊन पडला आहे. यामुळे भारतापुढे दोनच भविष्ये आहेत– जागतिक परिस्थितीत नेंगरून नामशेष होणे किंवा अध्यात्माचे कार्यकारी, अत्यंत नवे समाजविज्ञान तयार करून, वंशभेदाला मूठमाती देऊन जगाचे नेतृत्व करणे.

दिल्ली (आगगाडी)
२८–७–७१

आज आगगाडीच्या प्रवासात दोन पुस्तके पाहण्याचे ठरविले होते. वेद मेहताचे बावीस वर्षापर्यंतचे आत्मचरित्र आणि एरिकसनचे 'Gandhi's Truth'–दोन्ही पुस्तके महत्त्वाची आहेत.

पण रवींद्रांनी पाठविलेले 'स्वामी विवेकानंद आणि हिंदुधर्म' या माझ्या भावी पुस्तकाचे हस्तलिखित हाती आल्याने त्याचे प्राधान्य स्वीकारावे लागले. अर्धेमुर्धे तपासले. निजण्यापूर्वी बाकीचे पुरे केलेच पाहिजे.

या पुस्तकात माझ्या जुन्या लेखांचा केवळ संग्रह नाही. रवींद्रांनी पत्र लिहून मला कळविले आहे की या जुन्या लेखात पुनरुक्ति टाळण्यासाठी त्यांनी काटछाट केली आहे, विवेचनाचा क्रम बदलला आहे, मधे मधे

एखादे वाक्य स्वत:कडून घातलेले आहे. पण माझी दृष्टि, विचारसरणी आणि प्रधान बोध यांना कोठेहि दुखविले नाही. या दृष्टीने हे सर्व हस्तलिखित ध्यानपूर्वक पाहत आहे. मला कोठेच काहीच खटकले नाही.

रवींद्रांनी माझे विचार, माझी जीवनदृष्टि, माझी अभिरुचि आणि माझी भाषाशैली काळजीपूर्वक समजून घेऊन जवळजवळ आत्मसात् केली आहे यांची ही सेवा मला फार उशीराने मिळत आहे. पण भवितव्यतेची रचना किंवा व्यवस्था प्रसन्नपणे स्वीकारणे यातच शहाणपण आहे.

स्वामी विवेकानंद, रवींद्रनाथ, अरविंद घोष आणि महात्मा गांधी–यांच्या समन्वित परंपरेचा मी स्वीकार केला आहे. माझा बुद्धिवाद, निरीश्वरवाद, वेदांत, सर्व मुक्तीची साधना, जैनांचा स्याद्वाद, बौद्धांचा मध्यममार्ग आणि भारतीय इतिहासाचा बोध–यांचा समन्वय माझ्यात झाला आहे.

•

मुंबई (आगगाडी)
२९–७–७१

आस्तिकता कुणाची अधिक ? आध्यात्मिकता कुणाची श्रेष्ठ ? ख्रिस्ती मिशनरी, येशूचा आशीर्वाद घेऊन कोणत्याहि दूर देशात, सर्व प्रकारचे कष्ट, अपमान, विरोध आणि असह्य प्रतिकूलता सहन करून, निराश न होता सेवा चालूच ठेवतात. सबंध आयुष्यात थोडीशी देखील सफलता न मिळे ना का, आपण पेरतो ते ईश्वरी बीज आहे, ते उगवणारच अशा श्रद्धेने मरे तोपर्यंत सेवा चालवतात.

आणि असा साधुपुरुष मेल्यानंतर त्याची जागा घेणारा कोणी तरी दुसरा ख्रिस्ती तेथे येऊन त्याचे काम पुढे चालवतो. या लोकांची श्रद्धा अद्भुत खरीच. पण अनंतकालावरील त्यांचा विश्वास आणि 'धर्मबीज उगवणारच' ही त्यांची आस्तिकता विशेष लोकोत्तर.

आपल्या येथे आजकाल लोक प्रत्येक प्रश्नाची चर्चा करतात. राष्ट्रीय दोष आणि संकटे, त्याचा इलाज शोधतात, पण त्यांना फळ ताबडतोब हवे

असते. यंदा पेरलेले बीज यंदाच उगवणार नसेल तर ते पेरण्याची हिंमत कोणी करणार नाही. समाजातील दोष अनेक पिढ्यांचे असले तर ते आपण पचवण्याला तयार. ते दूर करण्याचा कार्यक्रम शीघ्र फलदायी असेल, तरच तो ऐकायला आपण तयार आहोत. उपायांची चर्चा अखंड करू. पण उपाय शीघ्रफलदायी असेल तरच त्याचा विचार करू, असा आपला स्वभाव झाला आहे. उपाय अंमलात आणण्याची गोष्ट त्यानंतरची. 'प्रारंभ आपणच केला पाहिजे' असे मानणारे लोक त्याहून थोडे.

अशा स्थितीत स्वतःचे आणि दुसऱ्याचे स्थायी दोष देखील सुधारणे शक्य आहे. असा विश्वास कोठेच दिसून येत नाही. 'हे असेच असणार' असे आपण धरून चालतो. स्वभावात एवढा मोठा दोष असून देखील आपण आपल्या श्रद्धेची आणि आस्तिकतेची बढाई हाकतोच !

•

मुंबई

३०–७–७१

अंतूभाई विद्वानहि आहेत आणि व्यवहारकुशलहि आहेत. संभाषणचतुर तर आहेतच. बंगळूरच्या सीताराम रावविषयी सल्ला विचारून, त्यांनी आपल्या जीवनाची दुसरी एक बाजू उघड केली. त्यामुळे त्यांच्याविषयी आदर वाढला. त्यांच्या मराठी पुस्तकाला ठीकठाक करण्यात मी आनंदाने मदत करीन.

चि. बाळाला विमानतळावर पोचवून चि. दीपक भेटीस आला. त्याने अमेरिकन लेखक थोरोची गोष्ट काढून एक फार मोठा सिद्धांत माझ्याकडून समजून घेतला. 'थोरोला शंकाशील (cynical) म्हणता येणार नाही.' जगाचा व्यवहार खरोखर अव्यवहार्य आहे हे त्याला पटले आहे. आणि तसे लोकापुढे मांडण्याची त्याला हिंमत आहे. बरे झाले, दीपकने हा प्रश्न माझ्यापुढे मांडला. त्याला योग्य जीवनदृष्टि देण्याची संधि मिळाली. युरोप-अमेरिकेचे जागतिक नेतृत्व जोखमकारक आहे, हे समजून आजच्या व्यवहारात जगाप्रमाणे चालण्यास हरकत नाही.

संध्याकाळी ठरल्याप्रमाणे चि. चांदनी रमेशाला घेऊन आली. त्याच्याशी वेद मेहता विषयी बोललो. चांदनीने धर्मसमन्वयविषयक दोनचार चांगले प्रश्न विचारले. या मुलीत गुजराती बौद्धिक कुशलता चांगली आहे.

आज रमेशकडून हात-पाय, छाती-पोट आणि पाठ यांची मालिश करून घेतली. या बुद्धिमान तरुणाने समाजसेवेची आणि आपल्या आजीविकेची—अशा दोन्ही प्रवृत्तीत कुशलता मिळवून स्वतःचे जीवन प्रतिष्ठित केले आहे. स्वाभिमानहि आहे. आंधळ्या, बहिऱ्या, मुक्या लोकांना ज्ञान आणि कौशल्य यांच्याबरोबर चारित्र्याचे शिक्षण घेणेदेखील सोपे नसते.

मुंबई (आगगाडी)
३१-७-७१

माधवदास सकाळी येऊ शकले नाहीत. दुपारी थोडाच वेळ बसले. पण महत्त्वाच्या गोष्टी झाल्या. आता ते १६-१७-१८ ऑगष्ट तीन दिवस दिल्लीला असतील. त्याच वेळी चि. अमृतलाल आणि रवींद्र केळेकर तेथे असतील आणि पुष्कळ गोष्टी तेव्हाच नक्की होऊ शकतील.

"मंगल प्रभात"साठी दर महिन्याला चार-पांच ग्राहक मिळवण्याचा त्यांनी संकल्प केला आहे मी म्हणालो, "माझ्यामागे "मंगल प्रभात" एक तर बंद करावे, नाही तर सर्वानुमते कुणाला तरी सोपवावे. मी एकटा ठरवणार नाही. यथाकाळी तुम्हालाहि विचारू. ते म्हणाले, "माझा विचार आजच सांगून टाकतो फक्त रवींद्रच 'मंगल प्रभात' पुढे चालवू शकेल." यावरून रवींद्रांच्या भविष्याविषयी आम्ही बोललो. ते म्हणाले, "साहित्याचा जीव. त्यांनी दुसरे काही करता कामा नये. उपाशी मरणार नाही. एवढ्याच संतोषावर जगावे."

नंतर अमृतलालविषयी देखील बोललो.

काल पुष्पा आली खरी. पण माझे मालिश चालले होते. त्यामुळे

तिच्याशी बोलणे झाले नाही. तिच्या पत्राचा उल्लेख देखील केला नाही. आज दुपारी पुष्पाबरोबर दोन विद्यार्थी आले होते-- पंकज आणि सुनील. मुलांनी आपल्या वयाप्रमाणे प्रश्न विचारले. त्यांना पोक्त जीवनतत्त्वज्ञान अगदी सोप्या भाषेत समजावले. मुलांना मी बराच वेळ दिला. माझ्या मते वेळेचा सदुपयोग झाला. मुलांच्या पातळीवर जाऊन विचार मांडणे, यात शिक्षणकलेची कसोटी आहे. चटकदार वाक्यांच्या साहित्यगुणाने भुरळून जाता कामा नये-- ही गोष्ट मुलांना आणि पुष्पालादेखील समजावून सांगितली. 'Oscar Wilde' च्या एका वचनाची पुष्पाशी चर्चा करावी लागली तेव्हा तिला सगळे पटले.

* * *

## ऑगस्ट ७१

नागपूर
१-८-७१

नागपूरला श्रीमती कमलाताई होस्पेटच्या मुख्य सूतिकागृहाच्या पन्नास वर्षांच्या उत्सवाला, अक्षय तृतीयेच्या दिवशी मी हजर राहिलो नाही ही उणीव भरून काढण्यासाठी महाल शाखेच्या उत्सवाला हजर राहण्यासाठी आज आलो. हेच आजचे मोठे कार्य. मोहनी बंधू हरिभाऊ, नानासाहेब, अण्णासाहेब— यांच्या भगिनी यमूताई (कमलाताई) या सर्व कुटुंबाच्या शैक्षणिक सेवेचे चिंतन करणे स्वाभाविक होते.

येथे माझ्या युगपरिवर्तनाचा संदेश सांगितला की पुरुषांनी मानवतेचे नेतृत्व करून संघर्षाला महत्त्व दिले आणि युद्धे केली. आता स्त्रीजातीने मानवी पुरुषार्थाचा पुढाकार घेण्यासाठी तयार झाले पाहिजे. सेवा, समन्वय आणि सहयोग, या त्रयीने अहिंसक संस्कृतीचा युगावतार केला पाहिजे याविषयी सांगितले. विचार नवीन आहे. तो किती क्रांतिकारी आहे याची कल्पना नाही पुरुषांना— नाही स्त्रियांना. यामुळे शांतपणे ऐकून घेतात. समाजात पण या विचारांची खळबळदेखील होत नाही. 'स्त्रीपुरुष सहयोग' मुळाशी असलेली आजची असमानता पूर्णपणे रूढ झाली आहे. याचे वैषम्य कुणालाच खुपत नाही आणि मी म्हणतो, "स्त्रियांना ही स्थिति सहन होता कामा नये."

पश्चिमेकडे देखील थोड्याच स्त्रियांना या क्रांतीची आवश्यकता पटली असली तरी या क्रांतीने अजून कोठे जीव धरला नाही. तरीहि क्रांति आता पुढे येणार यात शंका नाही.

नागपूर
२-८-७१

काही झाले तरी, माझ्या मते आजचा दिवस 'भणसाळी दिवस' आहे. त्यांनी इंद्रियदमन, तपस्या आणि अध्यात्माचा प्रारंभापासून अनुभव घेतला. आणि गांधी वातावरणात सामील झाले. पण ते गांधी-कार्य-कर होऊ शकले नाहीत. पण पुष्पाबेन देसाई सेवाग्रामला आल्या त्या गांधी-कार्यात मग्न झाल्या. त्यांना भणसाळीभाईंची सेवा करण्याची संधि मिळाली आणि शेवटी त्यांनी भणसाळीभाईंचा सहयोग मिळवला. आणि त्यांना पुढे करून आपली कार्यशक्ति आजमावली. यांचा आश्रम पाहून फार आनंद झाला. आश्रमात मुलींची संख्या मुलांहून कमी नसावी, अशी सूचना केली. त्यांचा प्रयत्न कमी नाही. पण आता सर्वत्र मुलींच्या शाळा झाल्या आहेत आणि जिकडे अशी शाळा आहे, तिकडील मुली आश्रमात घेऊ नयेत' असा सरकारी कायदा आहे. हेतु चांगला आहे कारण, शाळेत पुरेशा मुली येत

नाहीत. ही परिस्थिति पुष्पाबेननी समजावली. मी म्हणालो, "म्हणूनच आपण असाधारण प्रचार आणि प्रयत्न केला पाहिजे. ही आवश्यकता केवळ भारताची नाही, पण साऱ्या विश्वाची आहे. शिक्षणातील क्रांतीमुळे जीवनात क्रांति झाली, तरच ते शिक्षण कामाचे. सत्ताकेंद्रित जीवन-व्यवस्था आज जगभर सरकारच्या मदतीने चालते. यापुढे सेवा, समन्वय आणि सहयोग केंद्रित संस्कृतीची स्थापना करायला स्त्रीजातीचे नेतृत्त्व हवे आहे.

आज माडखोलकर संध्याकाळपर्यंत बसले. यांनी प्रश्न खोदून खोदून विचारले आणि टिळक-गांधींची संस्मरणे स्वतःच्या भाषेत लिहून काढली. नंतर नानासाहेबांशी महत्त्वाचे बोलणे झाले. संस्थेची तेजस्विता सांभाळणे महत्त्वाचे आहे, हे या लोकांना पटले आहे.

आजच्या रात्रीच्या आमच्या प्रार्थनेला पुष्कळ मंडळी होती. यामुळे विशेष संतोष झाला

नागपूर आगगाडी

३–८–७१

आजचा दिवस खरोखर चिंतनसमृद्ध होता. ते सगळे एका पानाच्या मर्यादेत कसे येणार ? बाळुकाका जोशींशी अमृतानुभवाविषयी बोलताना ईश्वरनिष्ठेच्या मुळाशी असलेला दैववाद, व्यक्तीला असलेले ईषत् स्वातंत्र्य, पुरुषार्थ, द्वैत-अद्वैत आणि ईश्वरेच्छा वगैरे वरील माझ्या गूढ चिंतनाचे सार त्यांना सांगितले. त्यांच्या पूर्वग्रहात सर्वकाही उतरू शकले नाही. याला इलाज नव्हता.

स्त्रीसेवा करणारे रामकृष्ण मिशनवाले बंगाली सेन आणि सिंधी अडवानी यांच्याशी खोलात शिरून, स्त्री उन्नतीविषयी पुष्कळ बोललो.

पुस्तकालयाच्या आणि वाचनालयाच्या संघठनाविषयी महत्त्वाच्या सूचना केल्या.

आज नानासाहेबांना मोहनी कुटुंबाविषयी सविस्तर माहिती देण्याची विनंती केली हरिभाऊ आणि यमूताई— यांच्याविषयी अधिक माहिती हवी आहे. पाहू आता काय मिळते ते.

डॉ. वानकर आणि श्रीमती डॉ. कुसुम वानकर यांचा नवाच परिचय. पण तो वाढवण्याजोगा आहे असे वाटते. त्यांनी चि. सरोजच्या वडिलांविषयीचा एक सुंदर प्रसंग सांगितला.

या खेपेला नागपूरला येऊन स्त्री-स्वातंत्र्य आणि स्त्री-जातीचे नेतृत्व या विषयावर चिंतनात्मक पुष्कळ बोललो. आणि मोहनी कुटुंबातील स्त्रियांना ही कल्पना सविस्तर समजावली.

वर्धा स्टेशनवर रामभाऊ म्हसकर भेटले. अप्पा पटवर्धनांच्या आत्मकथेला प्रस्तावना मागतात. हे यथायोग्य आहे. पण मुदतीची घाई करतात, हे मात्र अडचणीचे आहे. पाहू कसे काय साधते ते.

आज पुनमचंद राका भेटले. जुना स्नेह ताजा झाला, इतकेच. आता पाहू ते कितपत चिकटणार. माझा विचार आटोपते घेण्याचा आहे.

एकूण, एक दिवस नागपूरला जास्ती राहिलो, तो पदरात पडला म्हणावयाचे. कोल्हटकरविषयीचे माडखोलकरांचे पुस्तक सुरू केले आहे. पण अप्पासाहेबाचे अगोदर घ्यावे लागेल असे वाटते.

सिकंदराबाद
४–८–७१

पुष्कळ पुष्कळ दिवसांनी शेवटी ब्रिगेडियर ध्रुवांचे प्रेमळ आमंत्रण स्वीकारू शकलो. चि. गायत्रीला भेटून फार आनंद झाला. पण प्रथम ध्यानात येईना की चुकल्या चुकल्यासारखे काय वाटते. मग सुचले की आसपास मुले नाहीत. ती अजून उठली नव्हती. मुलांशी दोस्ती झाली, तेव्हाच आतिथ्याचा आनंद परिपूर्ण झाला. घरात प्रवेश करताना ध्रुवांनी जमिनीवर हात टेकून डोके टेकून चरण स्पर्श केला. म्हणाले, 'तुम्हाला हे आवडत नाही हे ठाऊक आहे, पण तुमच्या बाबतीत हे केल्यावाचून राहवत नाही." (मी यांच संस्कृतीत वाढलेलो. दोन्ही बाजू मला हृदयपूर्ण समजतात.)

आपल्या लोकात लष्करी अंमलदाराविषयी जी कल्पना आहे ती तशी का असावी हे समजत नाही. कदाचित् भारतात विदेशी लोक राज्यकर्ते

झाले, त्यांचे लष्करी अंमलदार क्रूर आणि तुसडे असतील. त्यामुळे आपला जुना क्षात्रआदर्श केवळ वर्तनात राहिला.

कसेहि असो, ध्रुवांना भेटल्यापासून त्यांच्या संस्कारितेच्या आणि सूक्ष्म बुद्धिमत्तेचा मी भक्त बनलो आहे.

युद्धकलेत केवळ शौर्य आणि विजय मिळवणे या दोन गोष्टी नाहीत. आजच्या युगात युद्ध जिंकण्यासाठी सामाजिक जीवन आणि मानवी मनोरचना–दोहोंचे उत्तम आणि रचनात्मक अध्ययन असावे लागते. सामान्य जीवनात असले कौशल्य संस्कारितेचे लक्षण मानले जाते. पण विशाल, संगठित औद्योगिक क्षेत्रात आणि आजकालच्या युद्धात केवळ बहादुरी आणि planning पुरेसे नाही. जीवनातल्या सगळ्याच क्षेत्रातले कौशल्य हवे असते. आणि म्हणूनच वर्तमान जगाने युद्धकलेत सार्वभौम नैपुण्याला प्राधान्य दिले आहे. नैपुण्यात् विजयो ध्रुवम् ।

सिकंदराबाद

५–८–७१

सुभेदार गुरुदयाल यांनी आज मला लोहचुंबकाच्या मदतीने तपासले. हाताला स्पर्शहि न करता, हाताजवळ हात धरून, त्यातून निघणाऱ्या आंदोलनातून, शरीरात काय बिघडले आहे हे ओळखण्याची अद्‌भुत कला आज ऐकली, आणि पाहिली. भारतात असे चार-पांच तज्ज्ञ आहेत म्हणे. पडदानशीन स्त्रियांना तपासणे सोपे झाले म्हणावयाचे. या विषयीचे साहित्यहि मिळते. आता केव्हा तरी ते पाहिलेच पाहिजे. अध्ययन करण्याची हिंमत नाही. पण रहस्य समजून घेतलेच पाहिजे. जीवनयोगाची दृष्टि गूढ होऊ शकेल, ही आशा.

आता रुढिनिष्ठ आयुर्वेदाला अजमावण्यापेक्षा वैज्ञानिक होमिओपॅथीला आजमावणे अधिक इष्ट आणि सोपे जाईल असे दिवसभराच्या चिंतनानंतर ठरू पाहत आहे.

आजच्या दिवसाचे मुख्य चिंतन ब्रिगेडियर ध्रुव, समुद्रयानाचे तज्ज्ञ

राव आणि शेवटी मेजर धवन–यांच्याशी त्यांच्या कामाचे स्वरूप समजून घेतल्यानतर जे चिंतन झाले, तेच महत्त्वाचे होते.

काल याच विषयावरील चिंतन नमूद केले आहे. आज त्यात प्रगति झाली आहे.

हिंदुस्थानचा व्यापार आणि संबंध ज्या ज्या देशाशी वाढत आहे तो समुद्रयानेवर अवलंबून आहे. यासाठी राष्ट्रात (केवळ वरच्या जातीत नव्हे, तर सामान्य जनतेतदेखील) समुद्र-मानस पेरले पाहिजे आणि ते दृढमूल केले पाहिजे.

जे लोक शाकाहारी आहेत, ते शाकाहारीच राहोत. पण मांसाहारी लोकात मत्स्याहार वाढवणे एरव्हीदेखील भारताला अपरिहार्य आहे. तरच अन्नोत्पत्ति आणि प्रजोत्पत्तीमधील वैषम्य थोडे कमी करता येईल.

आणि आता मी नवीन प्रचार सुरू करणार–समुद्रकाठचे लोक आणि ज्यांनी समुद्र पाहिला नाही असे मध्यदेशस्थ–यांचे विवाह वाढवले पाहिजेत. या सूचनेवर खूप जोर देणार आहे.

सिकंदराबाद

६–८–७१

श्रावणी पूर्णिमा. पंचमीपासून पूर्णिमेपर्यंत केव्हाहि जानवे बदलावे. लहानपणी याचे महत्त्व केवढे तरी होते! जानवे बदलणे हा जितका धार्मिक विधि तितकाच सामाजिक विधि होता. प्रथम प्रथम अहमदाबादमध्ये सगळे महाराष्ट्रीय मावळणकरांच्या घरी जमत असत. जानव्याच्या नऊ धाग्यांपैकी प्रत्येक धाग्यावर एक एक देवतेची स्थापना आम्ही करीत असू. पैकी पहिला मंत्र अजून आठवतो–'ॐकारम् प्रथम तंतौ न्यसामि.' सर्व विधि अत्यंत भव्य वाटे. हे सर्व गेले याचे वाईट वाटते, पण जावयाला नको होते, असे मात्र आता वाटत नाही. काल-परिवर्तन हे संस्कृतीचे आणि प्रगतीचे आवश्यक अंग आहे.

मी पूर्ण अहिंसावादी; येथील लष्करी अमलदारांना भेटून त्यांची

कदर करू शकतो. लोकांना जगवणे आणि स्वतः मरायला (आणि शत्रूला मारायला) तयार असणे हे यांचे व्रत. लष्करात भारतीय एकता जितकी सिद्ध आहे, तितकी अन्यत्र नाही. यामुळे लष्करी लोकांविषयी आदर वाटतो. युद्धासारख्या भयंकर कामासाठी तयार होण्यात या लोकांना जीवनकलेचे अंगप्रत्यंग कमवावे लागते आणि सर्व आदर्श व्यवहाराला स्वीकारावे लागतात. रजपुतांनी असे केले नाही, म्हणून ते हरले. शौर्य वाढवले पण बुद्धि वाढवली नाही. छत्रपति शिवाजींनी हा दोष दूर करण्याचा प्रखर प्रयत्न केला.

आज आंध्रचे राज्यपाल खंडूभाई देसाई येऊन भेटले. मोकळ्या मनाने पुष्कळ चर्चा झाली. महत्त्वाची होती. मतभेदहि मोकळ्या मनाने व्यक्त केले. अगदी जातांना त्यांनी माझा आशीर्वाद मागितला. मी चकित झालो आणि अर्थात् हार्दिक आशीर्वाद दिले. वयाने मी मोठा आहेच.

अत्यंत पवित्र विधि रक्षाबंधन. आज तो सर्वत्र अनुभवला.

भाषेचा प्रश्न आम्ही विस्तृतपणेच चर्चिला. प्रादेशिक भाषेचे महत्त्व प्रजाराज्याला पटलेच पाहिजे.

सिकंदराबाद

७-८-७१

कोल्हटकरविषयीच्या पुस्तकात स्त्री-पुरुष संबंधाचा एक नाजूक प्रश्न पावलोपावली चर्चिला जातो. स्त्री ही माता, बहिण, पुत्री, पत्नी—यांपैकी कुणी तरी असते. मला वाटते की भावजय, मेहुणी आणि प्रिया—याहि संबंधाचा विचार केला पाहिजे. (जो संबंध समाजमान्य नाही, ज्याच्यामुळे कुटुंबाचा आणि समाजाचा नाश होतो, त्याचा विचार आंधळेपणाने न करता, योग्य उपाय शोधणे शक्य आहे. या संबंधाला दुसरे नाव न सांपडल्यामुळे "प्रिया" म्हटले आहे.)

या सर्व प्रश्नांचे चिंतन लिहिले जाणारच आहे म्हणून येथे विस्तार करीत नाही.

आज आम्ही सर सालारजंगाचा म्युझियम, नव्या इमारतीत, पाहून आलो. सालारजंग फार हुशार मुत्सद्दी होता. इंग्रजांना अनुकूल झाला हे खरे. पण इंग्रजी राज्यपद्धति संस्थानात दाखल करण्याचा त्याने चांगला प्रयत्न केला आणि पश्चिमेचा प्रवास करून त्याने पुष्कळ मिळविले. त्याच्या राजकारणाचा विचार येथे कर्तव्य नाही. पण पश्चिमेची विविध कला आपल्या लोकांपुढे त्याने ठेवली, ही फार मोठी सेवा होती. त्याचे जीवन-चरित्र जर मिळाले तर वाचले पाहिजे.

हैद्राबादला 'दक्षिणची दिल्ली' म्हणतात. उत्तरेची आर्य संस्कृति, दक्षिणेची द्रविड संस्कृति, मुसलमानांची अरबी-इराणी संस्कृति आणि इंग्रजांनी आणलेली पाश्चात्त्य संस्कृति यांचा येथे समन्वय व्हायला पाहिजे होता. भविष्यकाळी कदाचित् होईल. त्या दिशेने चिंतन आणि कुशल प्रयत्न करणारे लोक या राजधानीत आणून सोडले पाहिजेत. जर खंडूभाईशी खाजगी बोलण्याची संधि मिळाली असती तर हा विषय छेडला असता.

## सिकंदराबाद

८–८–७१

ठरल्याप्रमाणे मराठी साहित्यमंडळाचे तीन सज्जन भेटून गेले. प्रो. डॉ. आघाशें, प्रा. म्हाडकर आणि प्रा. कहालकर यांच्याकडून कळले की येथील राज्यकारभारात महाराष्ट्री अंमलदार चांगल्या ठिकाणी आहेत. सेतु माधवराव पगडी यांचे चारशे पानांचे आत्मचरित्र (किंमत २० रु.) घेतलेच पाहिजे. त्यांना शुक्रवारी (ता. १३ ला) भेटू. महाराष्ट्र मंडळात व्याख्यान आणि प्रश्नोत्तरी कबूल केली आहे.

गुजरात प्रगति समाजाचे तीन-चार सज्जन सकाळी येऊन गेले, पण भेट झाली नाही. विजय मेहता, रमेश शाह, कृष्णदास शाह पुरुषोत्तम मेहता—उद्या पुन्हा येऊन भेटतील.

आजचे मुख्य काम म्हणजे गोवळकोंडा कल्ला पाहणे, कुतुबशाही राजांचे कब्रस्तान पाहणे, (आणि ज्याने बराच वेळ खाल्ला असे) एक

चारशे-पांचशे वर्षांचे जुने झाड—हातीयान झाड शोधून काढणे, हे होते. गोवळ-कोंडा म्हणजे हैद्राबादचा पूर्वावतार. येथील मुख्य नदी मूसी. दीडशे मैल वाहून कृष्णेला जाऊन मिळते. हिचे वर्णन किंवा माहात्म्य कोठेच मिळाले नाही. चुकल्या चुकल्यासारखे वाटले. येथील स्थळपुराण कोठून मिळणार ? )

त्या त्या काळी लष्करी दृष्टीने, अद्यतन रचना करून बांधलेली ही स्थानें आज पडून गेली आहेत. पहाडी किल्ले किंवा भुईकोट सर्वच कुच-कामाचे झाले आहेत. प्राचीन काळी आपले लोक युद्धकलेत पुढारले होते. पुढे अरबी आणि फारसी (पर्शियन) लोकांपुढे आपण हरलो. त्यानंतर पश्चिमेच्या गोऱ्या लोकांपुढे दोघेहि हरलो. आज सर्व जग अमेरिकेचे शिष्य झाले आहे. यापुढे युद्धकलाच कालग्रस्त व्हायची आहे. अन्यथा मनुष्य-जातीचा विनाश निश्चित.

सिकंदराबाद

९–८–७१

संध्याकाळी Institute of Defence Management मध्ये माझे व्याख्यान झाले आणि त्यानंतर प्रश्नोत्तरी. तास दीडतास फार चांगला गेला. आज मी काय काय बोलावे याविषयी ध्रुवांनी काल सविस्तर सूचना दिल्या होत्या. मी ध्यानपूर्वक ऐकल्या होत्या. सर्वकाही मला आवडले पण—

पण आज सर्वकाही विसरून गेलो. पुन्हा सगळे विचारण्याची लाज वाटली. आणि तितका वेळहि नव्हता, तेव्हा नशिबावर हवाला ठेवून, सुचेल ते बोललो. ध्रुवांनी माझा परिचय थोडक्यात लिहून काढला होता तो वाचला. लष्करी माणसाला शोभेल असेच त्याचे भाषण थोडक्यात होते.

गांधींची अहिंसा अंमलात आणण्याचा प्रयत्न कोणीच करीत नाही. खरोखर राष्ट्ररक्षण आणि मानवतेला वाचवण्याचा दृष्टीने ती अत्यंत महत्त्वाची आहे. आत्मरक्षा आणि अन्याय, शोषण आदींचा प्रतिकार हेच गांधीमार्गात महत्त्वाचे आहे. जगाचे लष्करी नेते गांधीमार्ग पसंत न करोत,

पण त्यांचे रहस्य समजू शकतात. . .वगैरे वगैरे बोलून मी प्रारंभ केला त्या नंतर लिखित प्रश्न आले. सर्वच महत्त्वाचे होते. मी मनापासून उत्तरे दिली. आणि लोकांचे कित्येक रूढ विचार कसे चुकीचे आहेत हेहि समजावले भाषेचा प्रश्न, धर्मांचे प्रश्न वगैरे पुष्कळ प्रश्न हाताळले. पायाचे शिक्षण—हेहि समजावले.

मला वाटले, भाषणानंतर जर एखादा तास येथेच बसून, कित्येक लोकांना भेटू दिले असते आणि त्यांची चर्चा ऐकावयाला मिळाली असती तर पुष्कळ लाभ झाला असता.

ध्रुवांनी आभार मानतांना गांधींच्या दांडी मार्चच्या वेळी मी (म्हणजेच गुजरात विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी) managementचे काम केले या गोष्टीचा मार्मिक उल्लेख केला. तो मला फार आवडला. माझ्या मते ही माझी उत्तम कदर होती. ध्रुवच हे करू शकले.

सिकंदराबाद

१०-८-७१

वेद मेहताचे Face to Face वाचण्यात मी विसरूनच गेलो होतो की अप्पासाहेबांची 'जन्मकथा' वाचून तिच्यासाठी लवकरच प्रस्तावना लिहून देण्याची मागणी रामभाऊ म्हसकरांनी केली आहे. बरे झाले चि. सरोजने आठवण करून दिली.

आजचे मुख्य आकर्षण म्हणजे संध्याकाळी चि. गायत्रीने तासभर दक्षिणी नृत्य दाखवले-भरत नाटचम्.

मी अनेक ठिकाणी निरनिराळी नृत्ये पाहिली आहेत. संगीतहि ऐकले आहे. संगीत आणि नृत्य दोहोंमधील classical म्हणजे शास्त्रोक्त प्रकार मला ठाऊक आहे. बहुतेक नृत्यात तालबद्ध हातवारे वगैरे असतात. मान नाचवावयाची, डोळे नाचवावयाचे हेहि प्रकार शास्त्रोक्त पद्धतीचे असतात. कित्येक महिला या सर्व प्रकारात अत्यंत प्रवीण असूनहि यांच्या चेहऱ्यावर भावनात्मक हावभाव उमटलेले दिसत नसत.

मला वाटे की classical नृत्याला स्वाभाविक भावनात्मक हावभावाचे वावडे असेल. आज चि. गायत्रीच्या नृत्यात सगळा प्रकार शास्त्रोक्त असूनदेखील भावनात्मक हावभावांना पूर्ण अवकाश होता. यामुळे मला ते फार आवडले. घटकेत कारुण्य, घटकेत अभिमान, घटकेत हास्य असे प्रकार पाहत असतांना जणू दोघांमध्ये संवाद चालला आहे, अशा तऱ्हेच्या नाटचाची कल्पना मी करू लागलो. जर या कलेच्या मागे लागलो तर नृत्य आणि नाटच एकत्र करून मी उत्कृष्ट संभाषण करू शकेन असा आत्मविश्वास वाटला आणि अनुरूप संगीतहि पसंत करू शकेन असे वाटले.

सिकंदराबाद
११-८-७१

आज बाहेरील काहीच कार्यक्रम नव्हता. त्यामुळे मनाला मोकळे वाटले. चि. सरोज, यजमान पति-पत्नी बरोबर गावात जाऊन आली. थोडी खरेदीदेखील केली.

मी कुसुमच्या भावाबरोबर बराच बोलत बसलो आणि तेवढचातून या प्रदेशाच्या वातावरणाची कल्पना आली.

हैद्राबाद आंध्र प्रदेशाची राजधानी झाली, हे माझ्या मते उत्तम झाले. ओरिसा प्रांतातील तेलगु बोलणारे आणि तेलंगणातील तेलगु आदि सर्व लोक आंध्रात मिसळले हे तर चांगले झालेच. पण या प्रदेशातील मुसलमानांना शक्य तितके हिंदूमध्ये मिसळण्याची आवश्यकता उत्पन्न झाली, याचेही मला बरे वाटले.

पाकिस्तानात हिंदूंना फारच वाईट वागवतात याचे मला वाईट वाटते, पण आश्चर्य वाटत नाही हिंदुस्थानात कोठेहि जा, थोडचा काँग्रेसवादी मुसलमानांना स्वतःची भारतनिष्ठा जाहीर करावीच लागते. पण बाकीच्या सर्व मुसलमानांचा ओढा पाकिस्तानकडेच असतो. यात मुसलमान समाजाचा दोष थोडा थोडका नाही. पण तो दोष दूर करण्याची जबाबदारी मुख्यत्वे हिंदूंची आहे. पण ती त्यांना अजून पटलेली नाही. मुसल-

मानांना विशेष अधिकार देऊन काहीच साधणार नाही. त्यांना पूर्णपणे आपलेसे करण्यासाठी हिंदूंनी आपली जातिनिष्ठा समूळ सोडून दिली पाहिजे. पण हे त्यांना पटावे कसे? भारतातील राष्ट्रवादी सर्वोत्कृष्ट नेत्यांनादेखील ही गोष्ट अजून पूर्णपणे पटलेली नाही. मला भीति वाटते की हिंदु संस्कृति या एका प्रश्नावर कायमची हरणार.

पण जर मुख्य गोष्ट पटली तर ही संस्कृति जगाचे नेतृत्व करील.

सिकंदराबाद
१२-८-७१

आता रात्रीचे नऊ वाजले आहेत. गुजराती समाजाकडून आतापर्यंत काहीच कळले नाही.

हे लिहवीत आहे इतक्यात फोन आला की उद्या संध्याकाळी, त्यांनी मला बोलावण्याचे महाराष्ट्र मंडळानंतर ठरवले आहे आणि त्याप्रमाणे पत्रिकाहि पाठविल्या आहेत, तेव्हा तारखेचा घोटाळा ध्यानात आला. ता. १२ ला जन्माष्टमी आहे असे समजून एका पक्षाने आजचे आमंत्रण मानले आणि जन्माष्टमीनिमित्त मी बोलणार, तेव्हा ते उद्या आहे असे दुसऱ्या पक्षाने ठरवले.

कसेहि असो, उद्या प्रथम महाराष्ट्र मंडळ आणि नंतर गुजराती मंडळ, असा दुहेरी कार्यक्रम पार पाडावयाचा आहे. ते काही कठीण नाही.

ध्रुवांच्यामुळे मोठ्या मोठ्या लष्करी अंमलदारांची ओळख होते. ऐकण्याची अडचण असूनदेखील मी उत्साहाने त्यांच्याशी बोलतो. केव्हा केव्हा ओळख औपचारिकच असते, पण मला हे सर्व आवडते. कारण अनेक वर्षांचा अनुभव आहे की आपण सहज म्हणून एखादे महत्त्वाचे वाक्य बोलतो. ऐकणाऱ्याला त्यातून चिंतनाला आहार मिळतो. पुढे पुष्कळ वर्षांनी तेच गृहस्थ भेटले असतांना आठवण देतात की "मागे एकदा तुम्ही असे म्हटले होते, ते माझ्या मनात रुजून गेले आहे."

अशी उदाहरणे बरीच झाल्यामुळे मी सर्वांशी आस्थेने बोलतो.

इतरांना फायदा होवो किंवा न होवो, माझे चिंतन मला उपयोगी पडते. (आणि केव्हा केव्हा अकल्पितपणे ऐकणाऱ्यांपैकी कित्येकाच्या उपयोगी पडते.)

या सर्व प्रकाराला मी पूर्वी 'देवाची मर्जी' म्हणत असे, आता तसे वाटत नाही. 'यदृच्छा' म्हणून सोडून देतो. पण त्याचे गांभीर्य 'देवाच्या मर्जी'हून कमी नसते.

सिकंदराबाद
१३–८–७१

जन्माष्टमीच्या या दिवशी लिहिण्याजोगे इतके विविध चिंतन आहे की एकाहि विषयाला न्याय होणार नाही. कॅप्टन श्रीनिवास राव यांची सेवा आणि नम्रता; सेतु माधवराव पगडीची बहुविध आणि उत्कट विद्वत्ता, महाराष्ट्र समाजाच्या मला आवडणाऱ्या विविध प्रवृत्ति, गुजराती समाजाची व्यवहारकुशल आणि प्रेमळ सामाजिकता – या सर्वच महत्त्वाच्या गोष्टींची कदर केली पाहिजे आणि आंध्र प्रदेशाचे अभिनंदन केले पाहिजे. हैद्राबादला दक्षिण भारताची दिल्ली असे म्हणतात, ते दिल्लीहूनदेखील अधिक यथार्थ आहे.

मला वाटते या शहराची आणि प्रदेशाची यापुढे चांगलीच कसोटी होणार आहे आणि विश्वासहि वाटतो की या कसोटीत येथील लोक उत्तम रीतीने पार पडतील.

हिंदु आणि इस्लामी संस्कृतीचा समन्वय येथे सप्रमाण होणार आहे. उत्तरेकडील 'आर्य' म्हटली जाणारी संस्कृति आणि दक्षिणेकडील द्रविड संस्कृति यांचा समन्वय येथे कसा होईल याचे चित्र कल्पनाचक्षुसमोर स्पष्ट होत नाही. कारण आर्य आणि द्रविड हा भेदच आता तसा कुठे उरला आहे ?

सर्व समन्वयाचे काम हिंदी भाषेमार्फत झाले पाहिजे. पण ते काम हिंदीभाषी लोकांमार्फत होण्याच्या ऐवजी मराठी आणि गुजराती भाषिक

समाजांच्या मार्फत होऊ शकले तर ते अधिक इष्ट आहे. द्राविडी समाज जसा संस्कारी आहे, तसाच स्वाभिमानीदेखील आहे. हिंदी प्रचारात जर साम्राज्यवादाचा वास आला तर द्राविडी लोक तो सहन करणार नाहीत, याचा अनुभव आलाच आहे. तेव्हा मराठी, गुजराती लोकांनीच पुढाकार घेतला पाहिजे.

मला वाटते माझ्यासारख्यांनी यापुढे हैद्राबादकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.

सिकंदराबाद (ट्रेन)
१४–८–७१

खरोखर ध्रुव आणि गायत्री यांच्या आतिथ्याला मर्यादा नाही. कितीहि प्रेमळ सेवा केली तरी अधिक करण्याचा त्यांचा उत्साह बाकी राहतो. त्यांच्या लहान तिन्ही मुलीमध्ये देखील प्रेमळपणा आणि या वयात आश्चर्यकारक असा सेवाभावदेखील दिसतो. ध्रुवांचा प्रभाव संस्थेतील सर्व लोकांवर आणि येणाऱ्या जाणाऱ्या लोकांवरदेखील स्पष्ट दिसतो. या पतिपत्नीच्या प्रेमाला आपण लायक होऊ शकू की नाही अशी शंका मनात एकसारखी राहते. प्रयत्न केलाच पाहिजे.

' सरकारने Defence management च्या अत्यंत महत्त्वाच्या संस्थेसाठी ध्रवांना पसंत केले त्यांत लष्करी खात्याची कदरदानी दिसून येते. कोणच्याहि खात्यात ध्रुवासारखे चारित्र्य आणि कौशल्य उठून दिसणारच.

आज मी त्यांना म्हणालो : "तुमच्या येथे मला अगदी घराच्यासारखे वाटते." आणि मग सुधारल्यावाचून रहावेना. आणि म्हणालो : "तुमच्या घरी जी शांति आणि जो आराम मी अनुभवू शकलो, तसा स्वतःच्या घरीदेखील अनुभवला नाही." यात खरोखर मुळीच अतिशयोक्ति नव्हती.

"पुढल्या वर्षी लवकर या" हे आमंत्रण देऊनच त्यांनी विदाय दिली. हिंमत होईल की नाही, कुणास ठाऊक. पण जर आलो तर हैद्राबादच्या

प्रदेशाशी ओतप्रोत झाले पाहिजे. आणि दुसरी एक इच्छा उद्‌भवली· चि. गायत्रीला प्रार्थनेचे संस्कृत श्लोक शिकवले पाहिजेत. म्हणजे ती आपल्या मुलींना शिकवील. या इच्छेचे मलाच आश्चर्य वाटले. पण मनात अगदी स्वाभाविकपणे ही इच्छा उत्पन्न झाली आणि श्लोक मुलीपर्यंत पोहोचले पाहिजेत हेहि तितक्याच उत्कटतेने वाटले. मनुष्य स्वतःलाहि पुरे ओळखत नाही.

वर्धा-नागपूरवरून
१५-८-७१

पंधरा ऑगष्टचा दिवस. अत्यंत पवित्र. दिल्ली किंवा मुंबईला असतो तर अनेक सभातून आणि संस्थातून हजेरी द्यावी लागली असती. त्याच्या-ऐवजी आगगाडीचा एकांत मिळाला. ईश्वराची किंवा परिस्थितीचीहि कृपाच म्हटली पाहिजे. गडबडीच्या दिवशी विशाल समाजाचा परिचय मिळतो. पण त्याचमुळे मला स्वतःचा परिचय मिळू शकत नाही आणि त्या बाबतीत उपासमार होते. आज आगगाडीतील आरामाच्या वेळी रामकृष्ण परमहंस, स्वातंत्र्यवीर योगीराज अरविंद, बापूसेवक महादेवभाई आणि स्वातंत्र्य खेचून आणणारे स्वतः पूज्य बापूजी—यांच्या सहवासाचा सर्व लाभ मिळाला. त्यामुळे आजचा दिवस चिंतनसमृद्ध झाला. हे सर्व चिंतन येथे नमूद न झाले म्हणून काय बिघडले ?

परवाच कृष्ण जयंति झाली. भगवान श्रीकृष्णाची हस्ती पण आजच्या चिंतनात होतीच. यामुळे जीवन भरल्या भरल्यासारखे वाटत होते.

नाही म्हणायला वर्धा आणि नागपूरच्या स्टेशनवर स्नेही भेटले. रामभाऊंना निरोप पाठवू शकलो आणि मोहनी बंधूंचे प्रेमळ आतिथ्य स्वीकारू शकलो. आता या बंधूच्या इच्छेप्रमाणे यमुताईंना पत्र लिहावयाचे आहे. यात दिल्लीला काही दिवस राहण्याच्या त्यांच्या इच्छेचे स्वागत आणि आता त्यांनी आराम घेण्याची आवश्यकता—या दोन गोष्टी मुख्य असणार.

वेद मेहतांना पत्र पाठवले. हाहि जणू एक पक्षी सहवासच होता.

त्याच पत्रात आजच्या दिवसाच्या चतुर्विध माहात्म्याचा उल्लेख करावयास हवा होता तो राहून गेला. पुष्कळदा माझे असेच होते.

आज महाराष्ट्राच्या धार्मिक इतिहासाचे भुसारींचे पुस्तक चाळले. त्यामुळे माझ्या सनातनी धर्मविकासाचे क्रमश: परिवर्तन जागृत झाले. याची समृद्धि अनुभवली.

नवी दिल्ली

१६-८-७१

आज डॉ. माधवदास, उमाशंकर, नंदिनी, स्वाति, बदरीभाई, महेंद्र, वनू आणि आनंद—इतक्या स्वजनांना भेटल्यामुळे जणू व्यापारात खूप नफा व्हावा आणि संतोष मनात पसरावा असे झाले. माधवदास पुन्हा भेटतील तेव्हा विश्वसमन्वयाविषयी बोलू. बदरीभाई आणि त्यांच्याबरोबर आलेले बंगाली शांति-सैनिक यांच्याशी पूर्व बंगालच्या स्थितीविषयी मौलिक चर्चा केली. "जनतेला सरकारला विसरून जाऊन स्वत:चे संगठन करता आले पाहिजे. मग शारीरिक बळ वापरा किंवा सत्याग्रह करा. आजकालची जनता सरकारपरायण झाली आहे. यामुळे सगळी सरकारेहि बिघडतात आणि जनताहि लाचार होते." इत्यादि माझे विचार विस्ताराने सांगितले. जोधपूरचे रमेश धानवी भेटले. ज्ञानपीठामध्ये काम करतात. मी त्यांना सांगितले 'ज्ञानपीठासारख्या संस्थेत केवळ सांगकामे होऊ नये. उलट नव्या नव्या वस्तु सुचवून संस्थेची शक्ति वाढवावी आणि संस्थेला मनाजोगे वळण द्यावे.

आज उमाशंकरमुळे महेंद्र आणि वनमाला (आणि त्यांचा आनंद) भेटू शकले.

नंदिनी आणि स्वाति अगदी पहिल्याप्रमाणेच मनमोकळेपणाने बोलतात हे फार आवडते.

**श्री.** घन:श्याम ओझा, स्टेट मिनिस्टर आणि साहित्यक, याच्याशी थोडासा विनोद केला. पण परिचय वाढवण्याची संधि गमावली माझे

जुने वचन आठवले 'He would rather lose a friend than lose a wit.'

नवी दिल्ली
१७–८–७१

आज कामहि थोडे आणि भेटावयाला कोणी येणार नव्हते. काल चि. सिद्धार्थ, चि. कुसुमला म्हणाला, "ताप नाही. तरीहि उद्या शाळेला जाणार नाही. आणि घरी एकटयाला boring वाटेल तेव्हा काकासाहेबांना विचारून तू लवकर ये ना." त्याप्रमाणे आज कुसुमला साडे अकरालाच जाऊ दिली. संध्याकाळी जेवतांना सिद्धार्थशी मीच बोलणे चालवले. त्याचा संकोच काढलाच पाहिजे. संकोचाबरोबर निष्कारण गैरसमजहि असतात. ते आपोआप दूर होतील. मी त्याला सांगितले, "बाबारे, मला भेटणाऱ्या सर्वांना माझ्या सहानुभूतीचा अनुभव होतो. तटस्थ राहूनहि सहानुभूतीने सर्वांशी तदाकार होतो. आणि म्हणून प्रत्येकाला माझ्यापासून काहीना काही मिळते. तुझ्याच बाबतीत मी हरणार की काय ?" मग विनोद केला "आशा आहे की सिद्धार्थच्या हृदयाचा दरवाजादेखील खोलू शकेन." काम सोपे नाही, कित्येक मुले लहानपणापासूनच दिसायला मोकळी पण आतल्या गाठीची असतात. आणि याचेहि असंख्य प्रकार. कसेहि असो, माझा कसलाच स्वार्थ नाही. माझी दृष्टि त्याने स्वीकारावी असला आग्रहहि नाही. स्वाभाविक-पणे उत्कट प्रेम आहे. माझी सर्व सहानुभूति आणि तटस्थता त्याला पटली तर सहज मोकळा झाला पाहिजे.

मगच त्याच्यावर काय काय संस्कार झाले आहेत ते मला समजून येईल. कित्येक उत्तम संस्कारदेखील असतील. मनुष्याचे भाग्य असतेच खोल आणि गूढ.

नवी दिल्ली
१८-८-७१

ज्यांना भेटणे कठीण असे तीन जण आज भेटले. फार आनंद झाला. नवकृष्ण बाबू, मालती देवी आणि मनमोहन चौधरी. तिघांना घाई होती आणि ऐकण्याची माझी मुष्किली ! तरीहि मनमोहनला जरा बसवून घेऊन त्याच्याशी महत्त्वाचे बोललो. आपण गांधीवादी लोक. रचनात्मक कामात पडून समाजाची उत्तम सेवा करतो हे खरे. पण अनुदान देणाऱ्या सरकारचे आश्रित बनतो. सत्कार्य सर्वच करतात. पण गांधींनी अन्याय, अत्याचार आणि शोषणाचा प्रतिकार करून अहिंसेची आणि सेवेची प्रतिष्ठा वाढवली.

'माझा रचनात्मक कार्यक्रम पूर्ण करा, मग सत्याग्रहावाचूनच मी तुम्हाला स्वराज्य देववीन.' हे गांधीजींचे म्हणणे खरे आहे, पण सर्व राष्ट्र रचनात्मक काम पूर्ण करील तोवर गांधी थांबले नाहीत. गांधींनी जितके सत्याग्रह चालवले, त्याच्यापूर्वी रचनात्मक काम कुणी किती केले होते ?

आज गांधीवादी लोकांनी अन्याय आणि शोषण यांचा तेजस्वी प्रतिकार करून दाखवला पाहिजे तरच राष्ट्र गांधी-विचाराला महत्त्व देईल. सत्याग्रह संघटित करण्याचे काम आपल्यापैकी कुणीच करत नाही म्हणूनच नक्सलवादी पुढे आले. हिंसेने का होईना – अन्यायाचा ते प्रतिकार करतात. आपण सत्याग्रहाच्या द्वारा अन्यायाचा प्रतिकार करून दाखवू या मग नक्सलवादी ख़ुशीने आपल्यामागे येतील.

दिल्ली
१९-८-७१

ज्यांना भेटण्याची उत्कंठा होती ते आमचे अमेरिकन स्नेही हॅरी नाइल्स आणि खुशी नाइल्स यांची दोन प्रहरी भेट झाली थोड्या वेळात आम्ही पुष्कळ बोललो. मी म्हणालो, "ज्याप्रमाणे जगभर मानव-समाजावर धर्माचा प्रभाव होता, पण तो हळूहळू नष्ट झाला (कारण धर्मातील श्रेष्ठ भागाविषयी चारित्र्यहीन लोक उदासीन झाले आणि धर्मातील हीन भागाचा

आग्रह वाढला आणि जगातील मानवहितकारी संस्कारी लोक धर्माच्या बाबतीत कंटाळून गेले) त्याचप्रमाणे हल्ली सत्ता आणि संपत्तीचे स्तोम माजविणारी सरकारे आणि त्यांचे राजकारण सामान्य जनाला त्रस्त करीत आहे. तेव्हा सरकारे आणि राजकारण यांची प्रतिष्ठा तोडली पाहिजे. अमेरिकन सरकार आमचे शत्रु झाले आहे कारण त्याला balance of power महत्त्वाचे वाटते. याच्या उलट तुमचे संस्कारी सामाजिक नेते आम्हाला आपलेसे वाटतात, इत्यादि.'' राजकारणाची प्रतिष्ठा कशी तोडावी याची चर्चा झाली. नंतर अन्नोत्पत्ति, प्रजोत्पत्ति यांतील विषमता, कुटुंबनियोजन अपरिहार्य आहे, पण त्यातून दोष उत्पन्न होणार – वगैरे चर्चा चांगली झाली. त्यानंतर शहरें आणि कारखाने, नद्यांचे आणि सरोवरांचे पाणी विषारी करतात, हे संकट वाढत आहे – याच्या गोष्टी झाल्या. पृथ्वीच्या हवेतील oxygen संपून जाण्याची भीतिदेखील चर्चेत निघाली. मी म्हणालो, 'ग्रहमालेतील एखाद्या ग्रहावर अमर्याद प्राणवायु असेल तर तो आणता येईल.' (चंद्रावर जातांना येथूनच हवा न्यावी लागते.)

गोरी राष्ट्रें आणि रंगीन राष्ट्रें यांचा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी अमेरिकेची आणि भारताची आहे इत्यादि.

दिल्ली

२०-८-७१

या खेपेला मुंबईला केव्हा जावे हे काही केल्या ठरत नव्हते. शेवटी एकतीसचे अकन होऊन गेले आणि तेहि पुन्हा बदलावे लागले. मुंबईला डॉक्टर शरद नानावटीच्या कमरेत एकाएकी दुखायला लागले आहे. अगदी निपचीत, उताणे निजावे लागते. हे सर्व वाचून मलाहि चि. सरोज इतकीच तिची चिंता वाटू लागली. असंख्य लोकांची वैद्यकीय सेवा करणारी आणि घरच्या पाहुण्यावर ध्यान ठेवताना न कंटाळणारी शरद – अंथरुणाला खिळली आहे, ही कल्पनाच अस्वस्थ करणारी.

चि. सरोजने विचारण्यापूर्वीच मी मनाने ठरवले की आता लवकर गेले पाहिजे. थोडे तरी उपयोगी पडू.

चि. सरोजने ट्रंक कॉल करून माहिती विचारली. ट्रंक कॉल शरदनेच घेतला. 'यावयाची घाई करू नका' वगैरे म्हटले. पण त्यातूनच परिस्थितीचे गांभीर्य ध्यानात आले.

एका काळी सर्वांना उपयोगी पडणारा मी, गेल्या दहा-वीस वर्षांत कुणाचीच सेवा करत नाही, सर्वांची सेवा घेतो. जणू, जुना मी दुसरा आणि हल्लीचा दुसरा. मलाच आश्चर्य वाटते. सर्व प्रकारच्या शारीरिक अडचणी सोसून कोणाचीहि सेवा करावयाला तयार असा मी, अखंड आरामात राहतो ! आणि मानतो की, 'माझे वय झाले आहे.' ही सर्व आत्मवंचना आहे. मनुष्याला सेवा घेण्याची संवय झाली म्हणजे त्याचा स्वभावच बदलतो.

पण आता मला सेवा कोण करू देणार ? आणि माझी सेवा घेणार तरी कोण ?

दिल्ली

२१–८–७१

अनंतकाल आणि अनंत आकाश अथवा दिशा यांचा अनुभव प्रत्येकाला अल्पांशाने असतो. आणि पूर्णांशाने कोणालाच नाही. ज्यांना आपण 'सर्वज्ञ' म्हणतो, 'त्रिकालज्ञ' म्हणतो, ती व्याख्या फक्त परमेश्वराच्या कल्पनेला लावणे शक्य होईल. बाकी जितके संत पुरुष, अवतारी पुरुष आणि धर्म-संस्थापक झाले, त्यांचे आकलन एकांगी आणि कालग्रस्त झालेले दिसून येते. इतिहासाची ही कसोटी आध्यात्मालादेखील लावलीच पाहिजे.

कित्येक वैज्ञानिक लोक कालाची अनंतता समजू शकतात. पण दिशेची अनंतता समजूच शकत नाहीत. आणि म्हणून त्यांनी 'दिशा ही सरळ रेघ नसून एक अनंत वर्तुळ आहे', अशी विचित्र कल्पना पटवण्याचा प्रयत्न

चालवला आहे. त्यांची व्याख्या सुंदर आहे. वैज्ञानिक असेल. फक्त तेथे कल्पना थकून जाते.

समाज व्यवस्थेत ताबडतोब जर काही सांभाळावयाचे असेल, तर ते आहे स्थैर्य. सर्वधर्मसंस्थापकांनी प्रगति आणि परिवर्तनापासून लाभ मिळवला आहे. पण आपली व्यवस्था सर्वोत्तम आहे. ती कायम टिकावी यातच लाभ आहे, अशा कल्पनेने त्यांनी स्थैर्याची उपासना प्रमाणाबाहेर केलेली दिसून येते आणि त्यामुळेच त्यांची सारी व्यवस्था अथवा योजना प्रगतीला बाधक ठरली आहे.

आपल्या लोकांनी आणि पुष्कळ मनीषींनी कलियुग आणि सत्ययुग यांची कल्पना करून प्रगतीला मान्यता दिली. पण तेथेहि त्यांनी चार युगाचे चक्र ठरवून टाकले. आणि ही युगे पुनः पुनः येतात असे सांगून प्रगतीचे आनंत्य मारले.

दिक्, काल, कार्यकारणभाव, परिवर्तन, आणि प्रगति यांचे आनंत्य स्वीकारलेच पाहिजे. या सत्याला मर्यादा नसणार.

दिल्ली

२२-८-७१

चि कुसुमच्या आमंत्रणाप्रमाणे सिद्धार्थ सगळा दिवस 'सन्निधि'मध्ये रहावयाला आला. मला फार बरे वाटले. माझे त्याच्याशी कसलेच बोलणे झाले नाही. पण सगळा दिवस त्याचा विचार करू शकलो. आता चि. बाळ परत आल्यानंतर त्याच्याविषयी कित्येक स्पष्ट सूचना करू शकेन. हाच एक लाभ झाला

आज रामचंद्रन् मुद्दाम येऊन भेटून गेले. आणि यशपाल जैन स्वतःच्या दोनतीन कामासाठी येऊन गेले. एरिक्सनचे 'Gandhi's Truth' आणि 'Truth and Non-Violence' हे युनेस्कोचे पुस्तक–याविषयी रामचंद्रनशी बोललो. त्यांच्याबरोबर त्यांच्या संस्थेची मंडळीहि होती. आणि राजघाट समाधीचे शिवाजीहि होते. त्यामुळे रामचंद्रन्शी खाजगी बोलणे झाले नाही.

रामचंद्रन् आणि यशपाल दोघेहि जपानची यात्रा करू इच्छितात. रामचंद्रन्‌जीचे एका delegation चा नेता म्हणून जपानला जाण्याचे ठरले होते पण शेवटच्या घटकेला, एका तात्त्विक मतभेदामुळे त्यांनी जपानला जाण्याचे नाकारले. त्या विषयीची माहिती रामचंद्रन् आणि यशपाल दोघां-कडून मिळाली.

जपान आणि भारत एकमेकांच्या जवळ आलेच पाहिजेत–हे दोन्ही राष्ट्रांना पटले आहे. पण या परिस्थितीचा गैरफायदा घेणारेच लोक पुढे येणार हेहि स्पष्ट आहे.

असली कामे सरकारच्या द्वारा होणे शक्य नाही असे मी म्हणत आलो आहे. पण आता वाटते हल्लीच्या सार्वजनिक संस्थामार्फतदेखील ही खरोखर होणार नाही. तेव्हा ?

दिल्ली
२३–८–७१

जपानी मुलगी ××× चा प्रश्न कसा काय सुटणार, कोण जाणे. कोणतीच योजना केल्यावाचून ती येऊन पडली आहे. एकदा स्वतःच्या हिंमतीवर भारतात येऊन, देशभर हिंडून परत गेली आहे, तेव्हा कर्तबगार असेल आणि 'स्वतःची योजना पार पाडील, फक्त औपचारिक आमंत्रण पाहिजे' असे समजून मी आमंत्रण दिले. खात्री करून घेतली की घरची बरी आहे, आर्थिक बोझा बनणार नाही.

×× हा सिंगापूरचा तरुण. फारच चांगला दिसतो. त्याचे केवळ exploitation न होवो, म्हणजे झाले. मला आता दोघांची काळजी वाटू लागली आहे.

आज हॅरी-खुशी नाइल्स तीन प्रहरी मुद्दाम आल्यामुळे त्यांची मन-पसंत भेट झाली. मंत्रशक्ति, अध्यात्म आणि आजची समन्वय साधना– या विषयी बोललो. 'ॐ नमो नारायणाय पुरुषोत्तमाय' हा मंत्र त्यांनी मनापासून ऐकला आणि त्याचा taperecord हि घेतला.

अमेरिकेला-म्हणजेच तेथील युरोपियन गोऱ्या लोकांना-युरोपचा वारसा मिळाला. त्यातून आता हे तरुण राष्ट्र स्वत.ला ओळखण्याचा आणि अभिनव भविष्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे.

कामवासनेच्या बाबतीत जसे प्रयोग करतात, तसेच राजकारणात, वंशविज्ञानात, नवे नवे प्रयोग करणारच. पूर्वी ऋषिमुनि चिंतन आणि प्रयोग करीत. आता तिकडील समस्त प्रजा प्रयोग करू लागली आहे. (समस्त प्रजेपैकी हिंमतवान लोकच प्रयोग करणार. पूर्वी उच्च जातीपैकीच लोक प्रयोग करीत.) या नव्या प्रयोगातूनच सर्वांगीण समाजविज्ञान तयार होणार.

दिल्ली-आगगाडी
२४-८-७१

जर्मन साध्वी श्रद्धेचे एक पत्र आले. त्यात तिने युरोपचा अनुभव लिहिला आहे. आणि कॅथॉलिक धर्मगुरु पोपची भेट झाल्याचा उल्लेखहि केला आहे. श्रद्धेच्या पत्रातील अनेक विषयासंबंधाचे चिंतन येथे लिहावयाचे नाही पण पोपच्या नंसिओचे (Nuncioचे) दिल्लीहून आलेल्या पत्राचा उल्लेख येथे करावयाचा आहे. " ख्रिस्त्येतर धर्म " या नांवात इतर धर्मांचा अनादर गर्भित आहे असे पुष्कळांना वाटते. याचा उल्लेख श्रद्धेच्या पत्रात आहे.

हल्लीच्या पोपने येत्या नववर्षासाठी चिंतन आणि प्रचार यांना प्रेरक एक विषय सुचवला आहे. जर शांति हवी असेल, तर न्यायासाठी प्रयत्न चालवा" हा आहे विषय. या विषयाविषयी माझा अभिप्राय आणि माझी सूचना नंसियोने मागितली आहे. माझे उत्तर नंसियो पोपच्या 'ख्रिस्त्येतर धर्मशाखे'कडे पाठवील.

सर्वधर्मसमभाव आणि ममभाव-ही माझी भूमिका आहे. तेव्हा मी अत्यंत भक्तिभावाने देवाची प्रार्थना करून उत्तर लिहिले. ते उद्या रवाना होईल. मला वाटते ज्या अंत:प्रेरणेने माझे उत्तर लिहिले गेले आहे त्याचा

परिणाम काही तरी होईलच. नाही तर असंख्य लोकांचे असंख्य विचार गोळा करून ते छापून काढण्यात प्रवृत्तीची शोभा असते. पण फळ कितीसे मिळणार? सर्वधर्मसमभाव आणि ममभाव, यांच्यासाठी प्रेमादर आणि आत्मीयता असली पाहिजे. विविधतेमध्ये प्रेमाची आत्मीयता असेल तरच न्यायाच्यापुढे आपण जाऊ शकतो. खऱ्या ख्रिस्तीला हे पटलेच पाहिजे.

### मुंबई-आगगाडी
### २५–८–७१

आगगाडीच्या प्रवासामुळे इब्राहीम लिंकनचे जीवन चरित्र (मणिभाई देसाईने गुजरातीत लिहिलेले) सबंध वाचू शकलो. लिंकनविषयी याच्यापूर्वी वाचले नव्हते असे नाही. पण मणिभाईंनी आज कित्येक वर्षे लिंकनविषयीचे जवळजवळ सगळे साहित्य वाचले आहे. आणि यापुढे ते एक मोठे बृहत् चरित्र लिहिणार आहेत. लिंकनचे चरित्र वाचताना महात्माजींची आठवण पदोपदी होत राहिली. लिंकनच्या आयुष्यात युनाइटेड स्टेट्सचे दोन विभाग गुलामीच्या प्रथेमुळे अलग होणार होते. त्यांना लिंकनने तसे होऊ दिले नाही आणि युद्ध करून प्रथम पराभव होत असतानादेखील, हिंमत न हारता लिंकनने विजय मिळवला आणि अमेरिकेची एकता टिकवून, गुलामीची प्रथा नष्ट केली.

आणि अगदी गांधीप्रमाणे, त्यांचाहि विरोधी पक्षाने खून केला.

सामान्य शिक्षण ज्याला शाळा-कॉलेजमधून मिळाले नाही अशा या महात्म्याने केवळ स्वतःच्या पुरुषार्थाने (सापडतील ती पुस्तके वाचून) सर्व ज्ञान मिळवले. शरीरश्रम कधी टाळले नाहीत. युद्ध टाळण्याचे सर्व प्रयत्न केले आणि ते टळत नाही असे ठरल्यावर युद्धाची निष्ठा दृढपणे संभाळली.

अशा मनुष्याला महात्माच म्हटले पाहिजे. वकिली आणि राजकारण दोहोला आवश्यक वक्तृत्व आणि विनोद दोन्हींचा विकास साधून दोन्हींचा त्याने मुबलक उपयोग केला.

लिंकनचे चरित्र प्रत्येकाने वाचलेच पाहिजे. जीवनसाधनेला पुष्कळ उपयोगी पडेल.

मुंबई
२६–८--७१

आज अमृतलाल, कांति गांधी आणि माधवदास–यांच्याशी निराळ्या-वेळी पुष्कळ बोलणे झाले. त्यामुळे परिस्थिति बरीचशी स्पष्ट झाली आणि आपल्या कामाचा मार्गहि बराच स्पष्ट झाला.

यंदा 'भारतातील सर्व धर्मांचे एक कुटुंब बनते' या गोष्टीवर भर द्यावयाचा आहे. कोणताहि समाज अस्वस्थ होईल असा कार्यक्रम मांडायचा नाही. सर्वच धर्मांना आणि धर्मसमाजांना अभयदान देऊन सर्वांमध्ये कौटुंबिक भाव आणावयाचा आहे.

धर्मभावना सगळीकडे क्षीण झाली आहे. तिचे महत्त्व उरले नाही. जे उरले आहे त्याला संकुचित सामाजिक अस्मिता म्हणता येईल. ही अस्मिता सुरक्षित असेल तरच उदारतेचा संदेश लोक ऐकावयाला तयार होतील.

आपल्याला एकच धर्म चालवावयाचा नाही. सर्व धर्म शुद्धरूपात टिकोत हीच आपली भावना आहे. पारश्यासारखी लहानशी जमात स्वतंत्र-पणे जगू पाहते. तिला आंतरधर्मीय विवाह मनापासून मान्य नाहीत. तरीहि स्वतःच्या थोर पुढाऱ्यांनी इंग्रज बायांशी लग्नें केली, तर ती मान्य करावी लागतात.

आपण या बाबतीत त्यांना अभयदानहि द्यावे आणि अनुकूलताहि दाखवावी.

कांति गांधीची आज फारशी मदत होणार नाही. पुढे स्वतःच्या गरजेने या कामात तो येऊ शकेल कारण सर्व-धर्म-कुटुंबाचे त्याला आकर्षण आहे.

सार्वजनिक काम जोराने करावयाचे म्हणजे खर्च आला. पैसे आले म्हणजे अधिकाराचा प्रश्न आला. आणि मग आपल्या देशात एका संस्थेच्या दोन संस्था झाल्याच पाहिजेत. सर्वच बाबतीत या सर्वांचा विचार करावा लागतो.

मुंबई
२७--८--७१

शुक्रवारचा दिवस महत्त्वाचा असावयाचाच. आज सकाळी अवनी आणि मंजू आले. जैन युवक संघ आणि वेद मेहता यांच्या विषयीच पुष्कळ गोष्टी झाल्या. सगळा वेळ अवनीचेच बोलणे ऐकले. एकाच संस्थेमार्फत काम करण्याचा त्यांचा स्वभाव नाही.

दुपारी कांति गांधीशी बरेच बोलणे झाले. कालच्यापेक्षा आजचा रंग निराळा होता. एका पारशी दस्तूर – मिनोचेर – होमजीकडून तिसऱ्या तारखेला बोलण्याचे त्याने वचन घेतले.

सैय्यद हाशिम हुसेन या गृहस्थाची ओळख करून दिली. शेवटी माधवदासभाईंना सर्वकाही समजावले. मुंबईत समन्वयाचे काम सुरू झाले पाहिजे, यात शंका नाही. हे शहर सर्व बाजूंनी उत्तम आहे. पण माझ्या सारख्याने येथे बसून किंवहुना स्थायी होऊन पुष्कळाकडून कामे घेतली पाहिजेत. नाही तर मुंबईत जशी लोकांची विविधता तशीच उत्तमोत्तम प्रवृत्तीचीदेखील विविधता. कोणती प्रवृत्ति इतर प्रवृत्त्यांना खाऊन टाकील याचा अंदाज करणे कठिण.

मला वाटते हे काम मी दहा वर्षीपूर्वीच येथे बसून करावयाला हवे होते. पण मी राहिलो प्रवाहपतित माणूस. एक विशाल योजना आखून, तिच्याच मागे लागण्याचा माझा स्वभाव, बापूजींच्या नीतीमुळे, मला सोडावा लागला. पण ही मीमांसा चिंतनात आणून फायदा काय ? कदाचित् वेळ काढून ही मीमांसा लिहून काढण्यात फायदा असेल. खोलवर चिंतन करून मागचा पुढचा विचार लिहून काढेन, तर पुढच्या पिढीला फायदा होईल जरूर.

मुंबई
२८--८--७१

गांधी जिवंत होते तेव्हा राष्ट्राचे नेते खादी संबंधाने चुकूनमाकून बोलत असत. सामान्य लोकांची समजूत होती (आणि कदाचित् गांधींनाहि वाटत असेल) की स्वराज्य झाल्यानंतर खादीला पुष्कळ प्रोत्साहन मिळेल पण झाले अगदी याच्या उलट. पूर्वी ग्रामोद्योगाच्या नांवाने खादी आणि खादीसारखे इतर उद्योग यांनाच प्रोत्साहन मिळे. आता युरोप–अमेरिकेचा आदर्श खेडेगावापर्यंत पोहोचविण्याचा आग्रह बोलला जातो. त्यांपैकी होत नाही काहीच. यंत्रोद्योगावरचा विश्वास मात्र आंधळेपणाने वाढत आहे. आता चार-सहा गांधीभक्त मनापासून खादीभक्ति करीत असतील. बाकी कित्येक औपचारिकपणाने खादीवरील विश्वास बोलतात. बरेचसे लोक परंपरेने खादी वापरतात. पण हळूहळू खादीबरोबर विनखादीहि वापरू लागले आहेत. आणि स्वतःचा अविश्वास झाकण्यासाठी प्रश्न विचारतात, "खादीचे भविष्य काय आहे?" त्यांच्या म्हणण्याचा अर्थ असा की निष्ठेसाठी आम्ही खादी वापरू, पण ती काही टिकणार नाही. पुष्कळसे स्वतःला गांधीवादी म्हणवणारे आणि जवळजवळ सगळेच काँग्रेसवाले त्या वर्गात मोडतात. "राष्ट्र खादी घ्यायला तयार नाही हे स्पष्ट दिसते. तेव्हा खादीचा आग्रह किती दिवस चालवावयाचा?"

मी सांगतो की हल्ली चालले आहे त्याचे दिवाळे वाजल्यानंतर खादी घ्यावीच लागेल. हे दिवाळे वाजावयाला किती वेळ लागेल हे सांगता येत नाही तोवर आहे ती खादी जपून ठेवा, नाही तर पस्तावावे लागेल. दिवाळे वाजणार आहे याच्यावर लोकांचा विश्वास नाही. तज्ज्ञांना मात्र तशी शंका थोडीफार आली आहे.

मुंबई
२९–८–७१

प्रस्तावना लिहिण्याच्या निमित्ताने इब्राहीम लिंकनचे चरित्र वाचून झाले आणि या महान् अमेरिकनाचे चिंतनहि चांगले घडले. गुलामीची प्रथा

बिलकुल न आवडणारा हा प्राणी केवळ राष्ट्रीय ऐक्यासाठी दक्षिणी संस्थानातील ही प्रथा सहन करून होता. आणि त्याच राष्ट्रीय ऐक्यासाठी त्याने युद्ध स्वीकारले, आणि जिंकलेहि. खरोखर हा उत्कृष्ट शांततावादी होता. ज्याप्रमाणे पू. बापूजींना ईश्वराने नेले अगदी त्याचप्रमाणे लिंकनलाहि नेले.

लिंकनचे चरित्र पुन्हा वाचलेच पाहिजे. पण त्याचे लिखाण जर कोठे मिळाले, तर ते मात्र वाचल्यावाचून मी राहणार नाही. सिद्धांतनिष्ठा, बांधसोड आणि समन्वय—या तिन्हीचे महत्त्व लिंकन उत्तम समजले होते कारण तो मानवताप्रेमी होता. अमेरिकेतील निग्रोंची गुलामी म्हणजे गोऱ्या लोकांचे त्रिखंडव्यापी पाप असे जे मी एका काळी म्हटले होते, त्याची उजळणी करावी लागली.

मला दिवसेंदिवस अधिकाधिक पटू लागले आहे की हिंदुस्थान आणि अमेरिका या दोघा देशांनी मिळून जगाची सेवा केली पाहिजे, कारण ईश्वराचा तसा हेतु दिसतो. अमेरिकेच्या सहवासावाचून आपल्या देशात आधुनिकता येणार नाही आणि भारतीय संस्कृतीच्या खोल परिचयावाचून अमेरिकेत आध्यात्मिकता रुजणार नाही. हिंदुसंस्कृतीचे गुणदोष समजल्यावाचून बहुवंशी आणि बहुभाषी अमेरिकेला स्वतःचे आंतर्राष्ट्रीय मिशन पूर्णपणे समजणार नाही आणि जर ते समजले नाही तर अमेरिकेचा नाश ठरलेलाच. कारण तेथील संस्कृतीला सध्या पायाच नाही. प्राण आहे पण आत्मा सापडला नाही आणि भारताला अमेरिकेकडूनच प्राण मिळू शकेल.

मुंबई
३०–८–७१

पावसाळ्याचे दिवस आणि त्यात मुंबईचा समुद्र किनारा. आणि जवळच बोरघाट अथवा खंडाळाघाट. मग पावसाने कहर केला याची तक्रार ती काय करावयाची. मुंबईच्या लोकांना या पावसाचा दर वर्षीचा अनुभव आहे. रेनकोट वापरतात, तोंडापुरती लहानशी छत्री वापरतात आणि बरेचसे लोक पावसात भिजून घरी येऊन कपडे बदलतात.

आणि जरूरीची कामेदेखील टाळून घरीच बसणाऱ्यांची संख्या किती, हे कुणी सांगावे ?

इतका त्रास सोसूनदेखील पावसाची कोणी तक्रार करीत नाही, कारण पावसामुळेच अन्न उगवते.

लहानपणी मी पुष्कळ विचार केला की पाऊस अमुक ठिकाणीच पडावा, अमुक ठिकाणी पडू नये, अशी व्यवस्था विज्ञानाला कां करता येऊं नये ? सूर्याचा प्रकाश आणि हवामान यांचा हिशोब करून मिटिरीऑलोजी नांवाचे विज्ञान उत्पन्न केले आहे. अनेक ठिकाणी यंत्रे ठेवून मोजमाप घेतात. पाऊस केव्हा पडेल, किती पडेल, ढगांचा प्रवास कोणाच्या दिशेने असेल इत्यादि अंदाज काढून प्रकाशित करतात, पण अजून यातील फारच थोड्या गोष्टी खऱ्या ठरतात.

परदेशातदेखील हवामानशास्त्राचा अभ्यास चालू आहे. तिकडचे वैज्ञानिक जितके डोके चालवतात, तितके आपले वैज्ञानिक चालवत नाहीत हे कबूल केले पाहिजे. जुन्या लोकांचा अनुभव 'मडळी' वाक्यांत साठवलेला आहे. त्याला काहीच किंमत नाही. प्रत्येक कॉलेजात यंत्रें ठेवून, माहिती मिळवून, त्यातून अनुमाने काढली पाहिजेत. या विषयाचे महत्त्व दिवसेंदिवस अत्यंत वाढणार आणि याच्या खालोखाल समुद्रातील उत्पत्तीला महत्त्व येणार.

मुंबई
३१-८-७१

मला वाटले होते की जुगतराभभाई जरी अखंड कामात असले तरी वय झाल्यामुळे त्यांना प्रकृति तपासून घेण्यासाठी आणि इलाज करण्यासाठी देखील इस्पितळात जाऊन राहावे लागते. तेव्हा त्यांना माझ्या स्थिति-विषयी कल्पना येऊ शकेल. काही झाले तरी मी त्यांच्याहून वयाने मोठा आणि त्यांच्या सारखा काटक नव्हे. तरीहि त्यांनी माझ्यासाठी जो कार्यक्रम पाठवला आहे तो जणू मी चिरतरुण असल्यासारखा !

माझ्या कार्यशक्तीविषयी त्यांचा विश्वास पाहून बरे वाटले. दोन वर्षांपूर्वी मला कोठे वाटत होते की आपण म्हातारे झालो ? त्या काळी मी निवृत्त होण्याच्या गोष्टी करत होतो. पण ते सगळे केवळ तात्त्विक होते.

आता दिवसातून तीनदा निजावे लागते. याहिपेक्षा विसराळूपणा माझ्या उपयोगितेला मोठाच बाधक झाला आहे.

आता मी अध्यात्माकडेच एकाग्र झाले पाहिजे.

आणि अध्यात्मात तरी आता चिंतन करण्याचे कितीसे उरले आहे ? ध्यानाच्या मदतीने विश्वात्मैक्य भाव अनुभवत राहणे आणि त्याची पुष्टि शरीराला, मनाला आणि आसपासच्या वातावरणाला देणे—हेच काम उरले आहे.

हा नवा कार्यक्रम जर पूर्णपणे अंमलात आणू शकलो तर आध्यात्मिक आनंद काय वस्तु आहे, याचा नमुना आसपासच्या समाजाला पहावयाला मिळेल.

स्वस्थता, शांति आणि प्रसन्नता स्थिर झाल्यानंतर, त्यातून जो आनंद सुटतो अथवा फुटतो, त्याची मला कल्पना आहे. त्याचा थोडा स्वाद घेतला आहे. पण तद्रूप झाल्यानंतर जीवनाची जी स्थिति होईल, त्याचा अनुभव औरच असणार.

## सप्टेंबर

मुंबई

१-९-७१

आजच समजले की अमेरिकेत गेलेले भारतीय लोक आता आपापल्या जातीचे संगठन तिकडे करीत आहेत आणि आपापली मंदिरेदेखील बांधत आहेत. जैन लोकांचेदेखील असे एक संगठन आहे. मी म्हणालो की "ख्रिस्ती लोक आपल्या धर्माचा प्रचार करण्यासाठी ज्याप्रमाणे संस्था काढतात, त्याप्रमाणे जैन लोक जर अमेरिकेत आपल्या जैन धर्माचा प्रचार करण्या-

साठी प्रयत्न करत असतील आणि तिकडे जैन बनणाऱ्या अमेरिकन लोकांसाठी मंदिर बांधत असले, तर त्यात विरोध करण्यासारखे काही नाही. शुद्ध जैन धर्माचा प्रचार कोठेहि करावा." लोक म्हणाले, "हे तसे नाही. अमेरिकेत जाऊन शिक्षण घेण्यासाठी राहिलेल्या फक्त जैन लोकांना लाभ मिळावा म्हणून हे जातीपुरते संगठन आहे." लोकांनी सांगितले की 'जगाची सेवा करण्याला आपण कोठवर जावे ? आपल्या जातीच्या लोकांचा प्रथम विचार केला पाहिजे. त्यांना पुरती मदत केल्यानंतर जर शक्ति उरली, तर इतरांचा विचार करावयाला हरकत नाही." मी म्हणालो "हा शुद्ध स्वार्थ आहे. यात धर्म नाही."

काही लूटफाट करणाऱ्या जाती म्हणतात की "स्वकीयांशी आम्ही इमानाने वागू, परक्यांना लुटण्यात काही दोष नाही. जे लोक आम्हाला परके म्हणतात, दूर ठेवतात, त्यांना लुटण्यात कसलाच अधर्म नाही. असे लोक जर तुम्हा जैन लोकांना लुटतील, तर त्यांचा दोष कसा काढावा ?

देशातील सर्व वंशाचे, सर्व जातीचे, सर्व धर्मांचे लोक आपलेच आहेत. त्यांपैकी ज्यांची हजारो वर्षे आपण उपेक्षा केली, ते पाप धुऊन काढण्यासाठी प्रथम त्यांना मदत केली पाहिजे. जो स्वत:पुरता विचार करतो तो जैनच नव्हे.

मुंबई
२–९–७१

कॉलेजमध्ये मी तत्त्वज्ञान हा विषय घेतला होता. या विषयाची गोडी प्रथमपासूनच होती. पण विशेष अभ्यास केला नव्हता. या विषयाचा जीवनावर आणि चारित्र्यावर उत्तम परिणाम झाला पाहिजे असे मला वाटे. पण दिसून आले की या विषयाचे मोठमोठे विद्वान सूक्ष्म आणि गहन चर्चा करतील, पण अलिप्तपणे. त्यांच्या जीवनाला कोणत्याहि साधनेचा स्पर्शहि नाही.

हीच गोष्ट संस्कृतमधील दर्शनशास्त्रांच्या विद्वानांची. दोघांच्या मानाने माझे अध्ययन बेताचेच. पण लहानपणापासून जीवनाचा विचार

करण्याची संवय. त्यामुळे प्रथम मराठी संत-साहित्य वाचले. त्याचबरोबर प्रार्थनासमाजाचे साहित्यहि थोडे थोडे पाहिले. पण मला खरा लाभ झाला तो धर्मविरोधी, विज्ञानपरायण बुद्धिवादी साहित्यापासून. त्याने मला पारमार्थिक म्हणजे serious केले. बुद्धिवाद आणि अनुभव यांनी विचारशुद्धि केली. मग पुन्हा प्रार्थनासमाज आणि ब्रह्मसमाज याच्याकडे गेलो. शेवटी संतोष मिळाला स्वामी विवेकानंदत्रयी[1] कडून.

तेव्हापासून साधनेची गोडी उत्कट झाली. नंतर वाचले पुष्कळ. पण कसोटी लावली साधनेची, त्यामुळे अध्यात्म आणि जीवन यांचा समन्वय झाला. धंदा शिक्षकाचा. त्यातच हिमालयाचा प्रवास. रवींद्रनाथ ठाकुर आणि अरविंद घोष—आणि शेवटी गांधी.

यामुळे आता लोकांना सल्ला देणे आणि मार्गदर्शक होणे चांगले साधते. आणि आवडतेहि.

आज लिहिलेल्या एका पत्रावरून हे सर्व सुचले.

मुंबई
३–९–७१

आज भगवान् जरथुष्ट्राचा जन्मदिवस, मुंबईत उजवण्याचा संकल्प आज अमलात येऊ शकला, याचा संतोष झाला. सामान्य लोकांना वाटते असले उत्सव नेहमीच व्हावेत. चांगल्या लोकांना बरे वाटते. पुढे हे लोक विसरून जातात. माझी मनोभूमिका मात्र तशी नव्हती. मला वाटते माझा संकल्प अगदी उत्कट आहे. आणि मला वाटते त्यातून एक सुंदर प्रवृत्ति सुरू होणार आहे. आज वाटले की गांधीजी स्वतःच पाहत आहेत आणि आशीर्वाद देत आहेत. या प्रवृत्तीला हिंदू मन आणि पारशी मन—दोघांचे आशीर्वाद वाढत जाणार. आणि याचा फायदा पारशी लोकांना लवकर पटणार आहे.

---

[1] (१) रामकृष्ण परमहंस, (२) स्वामी विवेकानंद व (३) भगिनी निवेदिता (Margaret Noble).

आपण सर्व-धर्म-समभाव या गांधी तत्त्वाचा प्रचार करीत आहोत. याची पुसट कल्पनादेखील चि. मॅकलीला नसणार. तिने फक्त वसंतचे आणि स्वत:चे परस्पर आकर्षण ओळखले. तरीहि या विवाहाच्या मागे गांधी तत्त्व काम करीत होते असे मला दृढपणे वाटते.

आज मारी लूईस हाब भेटली. तशी यापूर्वीहि भेटत असे. पण आज तिने स्वत:चे प्रश्न विचारले. आणि मीहि तिला अगदी आत्मीयतेने उत्तरे दिली. प्रश्न नीट ऐकू आले नाहीत. त्यामुळे उत्तरे जरा अव्यवस्थित होत होती. पण त्यामुळे आध्यात्मिक वातावरण मुळीच बिघडले नाही. माझ्या उत्तरांचा तिला कितपत लाभ होणार भगवान जाणे. पण तिचे प्रश्न ऐकून माझे चिंतन जागृत झाले आणि मी तिला नेमकी उत्तरे दिली, याचा मला खात्रीने फायदा झाला.

विशेषत: तंत्रसाधनेचे या लोकांना आकर्षण आहे. पण स्पष्ट किंवा पूरी कल्पना नाही. तंत्राचा उपयोग आपल्यापेक्षा या लोकांनाच अधिक होणार.

मुंबई
४--९--७१

दत्तकुमार पैंकडून ×××× चे पुस्तक आले. हे पुस्तक प्रथम आले तेव्हा मी सगळे वाचलेच नव्हते. थोडा भाग पाहून सोडून दिले होते. आता त्याचे कानडी भाषांतर छापत आहे. माझ्या मते ते व्यर्थ आहे. ××××नी प्रस्तावना मागितली आहे, ती थोडक्यात लिहून पाठवीन आणि ती न छापण्याची त्यांना सल्लाहि देईन. या पुस्तकाचा प्रचार वाढल्याने भारत सरकारच्या विरुद्ध असलीच चळवळ करण्याची प्रेरणा कित्येकांना मिळाली, तर आश्चर्य नाही.

आज संध्याकाळी चिमनलाल चकूभाईंना पूर्व बंगाल विषयीची माझी भूमिका विस्ताराने समजावून सांगितली. आणि गुजरातच्या आजच्या

वातावरणाविषयी माझा खेद प्रकट केला. दोन्हीविषयी त्यांनी लेख मागितले. लेख लिहिण्याचा परिणाम काय होईल ते त्यांना सांगितले. माझे म्हणणे त्यांना तात्पुरते पटले. पण वर्तमानपत्री मनोरचना. ती कसलाच निश्चय होऊ देत नाही. सामान्य लोक दुय्यम प्रतीचे नेता आणि सर्व वर्तमान पत्रकार फक्त नेतृत्व मागतात. कुणाच्या तरी मागे जावयास मिळावे, एवढीच सोय त्यांना हवी असते.

त्यांनी विनोबाविषयी आणि जयप्रकाशाविषयी माझा अभिप्राय मागितला. माझ्या विवेचनावरून त्यांना जेवढे समजले असेल तेवढे बस होते. माझा आदर आणि मतभेद दोन्ही ते समजू शकले.

मुंबई
५–९–७१

माझा नियम आहे (पण कदाचित् पुढे तो बदलावा लागेल) की जे लोक भेटावयाला येतात त्या लोकांचा माझ्यावर पहिला हक्क. वेळ किती द्यावा हे मी त्या त्या वेळी ठरवीन. ते योग्यहि नसेल. त्यानंतर दुसरा हक्क मला पत्रें लिहिणाऱ्याचा. सगळ्यांनाच उत्तरे लिहीन असे नाही. पण त्यांचा हक्क खरा. त्यानंतर इतर कामे.

आज निरनिराळ्या प्रकारचे पुष्कळ लोक भेटले. जपानी मुलींपैकी एक. कर्नाटकमध्ये यशोधराम्मा दासप्पांच्या देखरेखीखाली आंधळे, लुळे, लंगडे अशा लोकांची सेवा करणाऱ्या संस्थेत काम करीत आहे. तेथे एका वर्षात ती कानडी भाषा शिकली. फक्त बोलायला नव्हे तर लिहायला वाचायलादेखील. मला याचे मोठे कौतुक वाटले. मुलगी जपानी आहे म्हणून. (३० वर्षांची आहे–मुलगी म्हणावें का ?)

श्री. मारी लूइस पुन्हा भेटली. आज तात्त्विक सवाल बाजूला ठेऊन स्वत:विषयी बोलली हे विशेष आहे. ही केवळ साधिका नाही एवढे दिसले. आता तिच्याशी बेतानेच चर्चा करणार. तिच्या मानाने सिल्ला (मलबारी) खरी तपस्विनी आहे आणि तिने पुष्कळ मिळविलेहि आहे. तिच्या विषयी

आदर वाटला आहे.

कांति पारेख आणि कांति गांधी यांचा संबंध बराच समजला. त्यांच्यातील वितुष्ट काढून टाकण्याचा प्रयत्न करावासा वाटतो.

अनु बंदोपाध्यायला घेऊन माधवदास भेटले. मी अगदी तटस्थपणे सल्ला देत राहिलो. यातून काहीहि उत्पन्न होवो मला सारखेच आहे.

मुंबई
६-९-७१

बुद्धि आणि भावना दोन्ही मनुष्याला हव्या आहेत. दोहोंचा उत्तम विकास झाला पाहिजे. आणि मग त्यांचा विनियोग सप्रमाण झाला पाहिजे.

आज एका विदेशी युवतीने प्रथम चर्चा सुरू केली की "बुद्धीचा विश्वास करता येत नाही. मी बुद्धीच्या मागे जाऊन स्वतःचे नुकसान केले आहे. आणि म्हणूनच धर्माचा मार्ग शोधत आहे." मी तिला सांगितले, बुद्धीची मदत कधीच सोडता येत नाही. बुद्धीचा अतिरेक करून लोक स्वतःचे नुकसान करतात. पण खरोखर, ती बुद्धि नसून केवळ स्वछंदाचे समर्थन असते. तेव्हा बुद्धि नेईल तोपर्यंत शुद्ध बुद्धीच्या मागे जावे. तिने नापसंत केलेल्या गोष्टी सोडून द्याव्या. पुढे जेव्हा, गूढ प्रसंगी बुद्धि पांगळी ठरते तेथे आध्यात्माची कास धरावी.

पण केवळ बुद्धि अपुरी आहेच. तिच्या योगाने जीवन यांत्रिक बनते. जीवनात प्रेरक वस्तु भावनाच आहे. भावना उत्कट असाव्या. पण भावनांच्या आहारी जाऊ नये. बुद्धि आणि भावना दोहोंना शुद्ध आणि समर्थ करणे ही आहे मुख्य साधना. मनुष्याजवळ एक जीवनप्रेरणा असते तिला 'intuition' म्हणतात. ती सर्व बाजूंनी विचार करून शेवटचा निर्णय देऊ शकते. तिचा विकास आपोआप होत असतो. सर्व साधना उत्तम चालल्या म्हणजे त्यातून intuition प्रकट होते. संस्कारी, सर्वकल्याणकारी आणि

उन्नतिपरायण अशा अंत:प्रेरणेलाच वश झाले पाहिजे.

ज्यांनी साधना साधली नाही त्याची प्रेरणा अधोगामी पण होऊ शकते म्हणून संस्कारिता आणि साधना यांची संमिश्री कास धरली पाहिजे.

मुंबई
७--९--७१

आज कुणास ठाऊक कशामुळे, पण दारूबंदीविषयी खूप उत्कटतेने विचार केला. सध्या दारूबंदीमध्ये काहीच प्रगती होणार नाही. देशाचे नेते दारू वापरण्यात दोष मानीत नाहीत. सामान्य जनतेत जुनी धर्मभावना उरली नाही. तेव्हा दारूबंदी हा 'थोडया वेडयांचा कार्यक्रम आहे,' असे ठरून चुकले आहे. मजूरांच्या बायकांना आजवर नवऱ्याची दारूबाजी आर्थिकदृष्टया असह्य वाटत होती. आता ऐकतो की बायकाहि हळूहळू पिऊ लागल्या आहेत. तेव्हा धर्म, नीति, सदाचार किंवा गांधी यांचे नांव पुढे करून काहीच लाभ नाही. आता शेवटचा आधार दारू पिण्यापासून होणाऱ्या नुकसानीचा कडू अनुभव जेव्हा होईल, तेव्हा पश्चातापाने समाज शहाणा होईल, तोवर जर दारूबंदी टिकली तर तिचा उपयोग होईल नाही तर पश्चात्ताप कितीहि झाला, तरी तो निराशेत बुडून जाईल, आणि 'हे असेच चालायचे, असे म्हणून समाज सर्व अध:पात सहन करील.

यासाठी आज दारूबंदीपासून प्रत्यक्ष लाभ किंवा सफलता दिसली नाही तरी ही शुभ प्रवृत्ति जिवंत ठेवली पाहिजे.

कित्येक लोकांना दारूबंदीचा मुळीच आग्रह नाही. पण ती प्रवृत्ति चालली तर त्या संस्थेत आपली नोकरी आहे, तेवढी पोटापाण्याची सोय टिकवण्यासाठी दारूबंदीच्या गोष्टी करतात. हे लोकच वातावरण बिघडवतात. थोडे लोक कट्टरपणे दारूविरोधी असले तर त्याचा उत्तम परिणाम होतो. पण उथळ यांत्रिक विरोध नैतिक वातावरणाला मारून टाकतो.

मुंबई
८-९-७१

'नवनीत'चे तिन्ही भाषेचे संपादक भेटले. त्यांत गुजरातीसाठी कुंदनिका कापडिया (तिच्या बरोबर मकरंद दवे) हिंदीसाठी नारायण दत्त आणि मराठीसाठी उमाकांत ठोंबरे आले होते. मला कल्पना नव्हती की तिघे एकत्र येतील. आता त्या लोकांना मधून मधून काही लिहून दिले पाहिजे. 'नवनीत'चे स्वरूप पाहता त्यांना पुष्कळ देऊन पचायचे नाही आणि वारंवार दिले तर ते त्यांच्या योजनेत बसणार नाही. पण या लोकांना संतोष दिला पाहिजे. नवनीतातील विविधतेमुळे त्यांना वाचकवर्ग मोठा मिळाला आहे. तेव्हा त्यांच्या मार्फत विचार-प्रचार थोडक्यात पुष्कळ होईल, हा एक लाभ. पण हे लोक सज्जन आहेत. त्यांचा परिचय वाढल्याने उभय-पक्षी लाभ होईल.

संध्याकाळी रमेश, चांदनी आणि नवीनच हंसा ही मंडळी भेटली. तिघांची जिज्ञासा चांगली आहे. कदाचित xxx चा यांच्यावर बौद्धिक प्रभाव अधिक असेल. तो बुद्धिमान आहे. पुष्कळ वाचतो. चिंतनही करत असेल. पण त्याच्यात ध्येयवाद नाही. पश्चिमेच्या उथळपणाचा भक्त झाला आहे. हा सुधारेल असे वाटत नाही. पण याच्या प्रभावाने या मुली मात्र आदर्श विहीन होतील अशी भीती वाटते. पण त्याला इलाज काय ? जग जसे चालले आहे तसेच चालणार. आपल्या वाट्याला जशी आणि जेवढी सेवा येईल तितकी करावी. अगदी आस्थेने आणि कळकळीने करावी आणि मग अलिप्त व्हावे. दुसरा मार्ग दिसत नाही. ह्या लोकांचा फायदा होवो न होवो या तीन प्राण्यांच्या व्यक्तित्वाचे अध्ययन करायला मिळते हाच स्वतःला लाभ. पण शुभ सेवेपासून केव्हा काय उत्पन्न होईल याचा अंदाज करणारे आम्ही कोण ?

मुंबई–आगगाडी
९-९-७१

वेळ मिळाला म्हणजे मंजू सहज भेटून जाते. तिला काही खास सांगायचे नसते, विचारायचे नसते पण सहज जो काही विचार-विनिमय

होईल किंवा इतरांचे संभाषण ऐकायला मिळेल तेवढ्यात तिला संतोष आहे. मला तिचा स्वभाव ठाऊक आहे. म्हणून एवढ्यासाठी तिचे येणेही मला आवडते. प्रवासवर्णन लिहिण्यात तिची लेखनशक्ती आणि स्वाभाविक रसिकता दिसून येते. तिची प्रगती चांगली होणार आहे.

स्वित्झर्लंड मधील मरी लुईस या खेपेला वारंवार आली. तिचे आध्यात्मिक प्रश्न कृत्रिम नाहीत. आयुष्यात तिला निराशा मिळाली आहे. जीवनाचा हेतु कळला नाही म्हणून धडपडते. मला वाटते, तिचा असंतोष आणि धडपड दीर्घकाळपर्यंत टिकणार आहे. तिला जर मनाचे स्वास्थ्य आणि शांती मिळाली तरच ती मानवतेची उत्तम सेवा करू शकेल. अन्यथा तिचे आयुष्य अगदी वाया जाणार.

अशा तऱ्हेचे जीव जगात कितीतरी खितपत पडले असतील हे सर्व पाहून मानवतेविषयी पुष्कळांना निराशा झाली तर आश्चर्य नाही.

श्री. चिमनलाल चकुभाईंनी 'प्रबुद्ध जीवन'मध्ये लिहिलेला स्वाइत्झरवरील लेख आज वाचला. हा एका काळचा मिशनरी. मानव-सेवेला याने जीवन अर्पण केले. तेवढ्यासाठी सात वर्षे वैद्यकी शिकला. त्याचा ईश्वरावरील विश्वास कमी झाला पण मानव्याच्या कर्तव्याविषयी त्याची आस्था वाढली. जैनांनी जीवदयेचा प्रचार केला. तिलाच हा माणूस रॅव्हरन्स फॉर लाइफ म्हणून उपदेशतो, याचे सर्व साहित्य वाचले पाहिजे कारण याच्यासारखे पारमार्थिक लोक जगात थोडे आहेत. त्याला बायकोही तशीच मिळाली आहे (अथवा त्याने शोधून काढली असेल).

आगगाडीत
१०-९-७१

विश्वकल्याणाचे चिंतन चालू असले म्हणजे विश्वाचेही चिंतन करावे लागते आणि विश्वेश्वराचे चिंतन तर आता मुद्दाम करावे लागत नाही. ते आपोआप होते आणि विश्वेश्वराच्या दृष्टीने विश्वाचे चिंतन असंख्य, अनंत, विविधतेमध्ये फेरी मारून येऊ शकते. अशा या चिंतनाची संवय झाली आहे. तेव्हा मन कोणत्याही क्षेत्रात सहज जाऊन परत येते.

पण शंका मनात येते की चिरपरिचित क्षेत्रातूनच हे मन भटक्या मारून येत नसेल ना ?

पण जेव्हा निरनिराळ्या ठिकाणचे, निरनिराळ्या धंद्याचे लहान मोठे स्त्रीपुरुष भेटतात आणि त्यांचे प्रश्न हाताळावे लागतात तेव्हा कोण-तेही क्षेत्र अपरिचित किंवा अचिंतित वाटत नाही. प्रश्न समजून घेऊन त्याचे उत्तर केवळ तात्त्विक नाही पण जीवनाच्या व्यापक दृष्टीने चटकन मिळून जाते आणि मग वाटते की प्रश्नाची उत्तरे, अडचणीचे इलाज मला सुचत नसून ईश्वरच माझ्या हृदयात ती उत्तरे आणि ते परिहार पाठवून देत असला पाहिजे.

कारण उत्तराने प्रश्न विचारणाऱ्याचे समाधान होते. केव्हा केव्हा त्याला आभार व्यक्त करण्याचे मन होते आणि मला त्या प्रश्नापायी नव्या-नेच आणि संतोष देणारा इलाज सुचतो, याचा आनंद होतो आणि म्हणूनच वाटते की उत्तर निघाले माझ्या तोंडून खरे. माझ्या डोक्यात आणि हृदयात ते उत्तर उगवले हेही खरे पण त्याचा उगम मी नसून माझ्या मार्फत अखंड काम करणारा विश्वात्माच आहे.

असे नसते तर उत्तरात आणि इलाजात इतके नाविन्य आणि इतकी मौलिकता अनुभवास आली नसती.

कसेही असो, नवे नवे लोक भेटतात आणि निःस्वार्थपणे निरहंकार-पणे मी सर्वांना भेटतो आणि सर्वांविषयी आदरभाव जागृत होतो, या गोष्टीचा विसर पडत नाही.

या रोजच्या अनुभवाला चालू साधना कां म्हणू नये ?

दिल्ली

११–९–७१

आज विनोबा-दिन. त्यांनी आज ७६ वर्षे पूर्ण केली. त्यांच्या आरोग्यासाठी आणि दीर्घायुतेसाठी सर्वत्र प्रार्थना होत आहे. राजे लोकां-साठी प्रार्थना होतात, त्या मतलबी असतात म्हणे. साधु-संतांच्या संबंधाने

जे होते त्यात भक्ती असते. पण त्यातही आशीर्वाद प्राप्तीचा आणि त्याच्या जोरावर तऱ्हेतऱ्हेच्या ऐहिक लाभाचा लोभ असतोच. राष्ट्रसेवकांची गोष्ट निराळी. ते सामान्य जनतेच्या हितासाठी, दुःख निवारणासाठी आणि शक्तिसंवर्धनासाठी प्रयत्न करीत असतात जे लोक त्यांच्या या सेवेमुळे आणि चारित्र्यामुळे आकर्षित होतात त्यांच्यापैकी काही लोक त्यांच्या आशीर्वादाने सत्ता मिळवू शकतात हे खरे पण बहुतेक लोकांना त्यांच्याकडून सेवेची आणि आत्मोन्नतीची दीक्षा मिळते. तेव्हा अशा थोड्या व्यक्तींच्यासाठी होत असलेली प्रार्थना बरीचशी शुद्धसात्विक असते आणि म्हणून तिचा परिणाम समाजावर उत्तम होतो.

आपण प्रार्थना करतो ईश्वराच्या नावाने. पण ती सरळ पोहोचते आसपासच्या सर्व मानवांच्या हृदयापर्यंत आणि तेथे वास करीत असलेल्या परमेश्वरापर्यंत.

जगात हृदयें अनंत आहेत. त्या सर्वांच्या वासना ओळखणे अशक्य आहे. पण त्या सर्व वासनांपैकी ऊर्ध्वंगामी उन्नतिपद वासनांचा स्वामी भगवान् सर्वत्र एकच आहे. तेव्हा या हृदयस्वामीला प्रार्थना केली म्हणजे तो स्वतः स्वतःच्या योजनेप्रमाणे अनेक हृदयात ती प्रार्थना उगवावी अशी व्यवस्था करतो. प्रार्थना करणे आपल्या हातात. त्या प्रार्थनेचा विनियोग करणे सर्व हृदयस्वामी भगवंताच्या हातात. ही व्यवस्था उत्तम आहे.

ही झाली विशिष्ट प्रसंगी केल्या जाणाऱ्या सामुदायिक प्रार्थनेची गोष्ट. पण अत्यंत उत्कट प्रार्थना व्यक्तीच्या हृदयात आपोआप उठत असते. त्या प्रार्थनेचे इतर फळ काहीही असो. त्या व्यक्तीच्या स्वतःच्या हृदयाला त्यातून अत्यंत उत्कट पोषण मिळते आणि म्हणूनच प्रार्थना शुद्ध, सात्त्विक सर्वकल्याणकारी असावी लागते.

दिल्ली
१२–९–७१

म्हातारपण आले म्हणजे शरीर क्षीण होणारच पण त्यांत रोग घुसता कामा नये. आहारात आणि विहारात संयम वाढवला तर आरोग्य संभाळणे कठिण होऊ नये.

मला उचकी येऊ लागली. याचा त्रास सहन करावा लागला याचे दुःख होतेच. पण खरोखर जन्मभर शरीराला ओळखण्याचा प्रयत्न केला तरीहि रोग टाळता आला नाही याची लाज-शरम अगदी असह्य झाली.

आता सामान्य रोग असला तर औषध न घेता नैसर्गिक उपचार करून भागवणे आवडते. मी स्वत:ला निसर्गोप्रचार-प्रेमी मानतो, पण उचकी येऊ लागली म्हणजे मुकाटयाने औषधाला शरण जाणे आवश्यक वाटते. मनाची तेवढी तयारी झाली म्हणजे आयुर्वेद की अॅलोपॅथी याचा निर्णय घ्यावा लागतो. आयुर्वेद घरचा यामुळे त्याच्याविषयी प्रेम आहे. पण अॅलोपॅथीचे डॉक्टर ज्याप्रमाणे सूक्ष्म निरीक्षण-परीक्षण करतात तसे आयुर्वेदी करत नाहीत असे पाहून त्या उपचारासंबंधाने मन साशंक होते. आणि लहानपणापासून डॉक्टरांचे औषध करत आलो आहोत म्हणून तोच मार्ग सोपा वाटतो.

एखाद्या दिवशी मन जोर करून म्हणते की राष्ट्रसेवा म्हणून किती तरी प्रश्न हाती घेतले आहेत. तर आयुर्वेदाचा नवा अभ्यास करून त्याला प्रयोगपरायण कां करू नये ? निदान ओळखीच्या वैद्यांना भेटून त्यांना प्रयोगपरायण करवावे असी उसळी मनात येते पण शेवटी तो उत्साह-म्हातारपणामुळे टिकत नाही. आता हे काम नव्या पिढीने केले पाहिजे असे म्हणून शांत होतो.

अतुभाई वैद्य आणि डॉ. भाग यांचेशी या बाबतीत विचारविनिमय करून संतोष मानावयाचा आहे.

**दिल्ली**

**१३–९–७१**

काल कोल्हापुरची इंदू टिकेकर भेटून गेली. तिने सर्वोदय प्रवृत्तीचे तात्त्विक समर्थन लिहून काढले आहे. या पुस्तकाचे ती हिन्दी करवणार आहे. त्याचेसाठी मी प्रस्तावना द्यावी अशी मागणी करण्यासाठी ती आली होती.

मालकी हक्क मानणारे आजचे जग समाजातील उच्चनीच भेद स्वाभाविक आहे असे मानते. हा विचार तोडण्याचा प्रयत्न हल्लीच्या युगात समाजवादाने केला आहे आणि रशियाच्या साम्यवादाने याच्याहि पुढे जाऊन राष्ट्रमान्य हिंसेच्या जोरावर संपत्तीचे खाजगीपणच नष्ट केले आहे.

या दोन मार्गाहून सर्वोदयाचा मार्ग निराळा आहे. येथे स्वार्थी, अयोग्य चढाओढ, शोषण आणि हिंसा या सर्व टाळून हृदयपरिवर्तन करून सामाजिक जीवन वैज्ञानिक, साधे आणि मोक्षाला अनुकूल करण्याचा मार्ग म्हणजे सर्वोदय हे गांधींनी समजावले.

सर्वोदयाची ही तात्त्विक भूमिका आपल्या समाजाला उत्तम रीतीने समजावली पाहिजे इंदूताईचा प्रयत्न त्या दिशेने आहे हे अभिनंदनीय आहे.

पण दोन महत्त्वाचे आदर्श नजरेपुढे ठेवले पाहिजे. जवाहरलालजी पासून सर्वच कॉंग्रेसवाले समाजसत्तावादाला पुढे करतात आणि लोकनियुक्त सरकार मार्फत कायद्याने मान्य केलेली हिंसा वापरून समाजसत्तावाद अमलात आणतात. यांच्या या धोरणाविरुद्ध कमर कसून गांधीचा सर्वोदय जर कसा अहिंसक आहे हे तत्त्वचर्चा मार्फत समजावले तरच हा प्रयत्न युगानुकूल ठरेल.

आणि हेहि स्पष्ट केले पाहिजे की गांधीजींच्या अहिंसक सर्वोदयात सरतेशेवटी सरकार ही संस्था (जबरदस्तीने न तोडता) वितळून टाकायची आहे. सर्वोदय निर्जीव असेल तोपर्यंतच त्याच्या प्रवृत्तीला सरकारचे अनुदान मिळणार. खरा सर्वोदय सरकारलाच उपाशी मारणार. हे जर ध्यानात आले तर सरकार सर्वोदयाचा पुरस्कार करील का ?

दिल्ली

१४-९-७१

योगी लोकांचा दावा आहे की आमचे शास्त्र आणि आमची विद्या अनुभवसिद्ध आहे. व्यवहार्य आहे. पण हे लोक वेदकाळापासून पंतजलिपर्यंत जे काही शास्त्रार्थ लिहिले आहेत ते सर्व प्रमाण मानून त्या वचनांचा अर्थ

समजण्याचाच प्रयत्न करतात. व्याकरण आणि न्यायशास्त्र पुढे करून आपलाच अर्थ खरा आहे असे सिद्ध करू पाहतात.

"माझा आणि इतरांच्या प्रयोगाचा अनुभव असा आहे, तो खरा आहे, भरीव आहे याची मला खात्री आहे. शास्त्रार्थ आमच्या अनुभवाचे समर्थन करीत असेल तर वाहवा ! शास्त्र जर या सर्व अनुभवाच्या विरुद्ध जाईल तर पुन्हा त्याचा खोलवर विचार करू. पण शेवटी अनुभवाच्या विरुद्ध जाणारे शास्त्र सोडून दिलेच पाहिजे, मी तर सोडून देणारच" असे म्हणणारा एकहि योगी पाहण्यात आला नाही.

केवळ ग्रंथ – श्रद्धेची श्रद्धा म्हणून वाटल्यास कदर करावी. पण अंधश्रद्धा जीवनाच्या उपयोगी नाही. आणि सत्यनिष्ठेलादेखील धरून नाही हे आपले लोक केव्हा समजतील ?

आपले लोकच कशाला, जगांतील सगळेच केवळ ग्रंथस्थ धर्मशास्त्रा-प्रमाणे चालणारे लोक सत्यार्थ सोडुन वचनार्थाला चिकटतात आणि मग शब्दशास्त्र, व्याकरणशास्त्र आणि तर्कन्याय यातूनच अर्थ काढतात अनुभवाला किंमतच नाही. त्यामुळे योगाचे विज्ञान बनू शकले नाही. प्रगतीचे नाव नाही. नवे शोध कुठून होणार ?

चि. यशोधरेच्या बंगाली गुरूजीचा प्रश्न खरोखर अनुभवाचा किंवा योगविद्येचा नसून तत्त्वज्ञानाचा होता. योग्याने ईश्वरावर विश्वास ठेवलाच पाहिजे का ? मी स्पष्ट उत्तर दिले योगदर्शन ईश्वराला मानते. पण योगविद्येने सांख्याप्रमाणे सेश्वर निरीश्वर दोन्ही पक्षांना मान्यता द्यावी. चित्तवृत्ति निरोध आणि आत्मदर्शन यासाठी इंद्रियांवर विजय मिळवणे याच गोष्टी मुख्य आहेत.

'ईश्वरावर विश्वास' फक्त शास्त्र वचन मूलक असेल, तर तो निराळा पण जर तो साधनाजन्य अनुभव असेल तर मग प्रश्नच उठत नाही.

दिल्ली

१५–९–७१

सरते शेवटी चि. ××× चे वर्ध्याला जाण्याचे ठरले. येत्या

आठवड्यात ती तेथे जाईल. तिला एकदा हिन्दी चांगले येऊ लागले म्हणजे भारताविषयी ज्ञान मिळवण्याचे साधन तिच्या हाती येईल. वर्तमानपत्रें, मासिकें आणि पुस्तकी साहित्य सर्व काही वाचू शकेल. मग तिला भारतातून जे घ्यावयाचे असेल ते घेता येईल.

ही मुलगी भाषा-प्रेमी आहे किंवा नाही, काही कळत नाही. साहित्य-प्रेमी असावी, पण बेताचीच. आजकालचे युगच उथळ जीवन-प्रेमी आहे. हीदेखील तशीच असली तर आश्चर्य नाही.

तिच्या संपूर्ण जीवन-विकासाचा पत्कर आपण घेतला नाही. या देशात राहून ती वाटेल ते घेईल आणि त्याचा जपानसाठी सदुपयोग करील ही आहे मुळची योजना. तिच्या संपूर्ण जीवन-विकासासाठी मला आस्था आहे पण तशी सेवा मागून काही ती आली नाही. मीहि तसे वचन दिले नाही. तेव्हा निष्कारण लादा कां ? ती काही लहान मूल नाही. स्वतःचे हित समजू शकते आणि विदेशात जाऊन नवे नवे संस्कार घेण्याची हिंमत आहे. म्हणून ती येथे आली आहे. आणि अगदी नव्याने आली आहे असेहि नाही. एकदा येऊन चार-सहा महिने राहून सगळा देश पाहून गेली आहे.

या मुलीच्या वयाचा मी होतो तेव्हा मला वाटे की माझे स्वातंत्र्य माझे आहे. आसपासच्या लोकांनी त्याची कदर केली पाहिजे. माझे कल्याण अकल्याण देवाने माझ्या हाती सोपवले आहे. ती जबाबदारी घेण्याचे वय आता माझे झाले आहे. तेव्हा लोकांनी माझ्या स्वातंत्र्याचा स्वीकार केला पाहिजे, आणि मला मोकळा सोडला पाहिजे. तरच माझी जबाबदारी काम करू लागेल.

लहानपणचे हे विचार आठवून मी आसपासच्या तरूणांच्या स्वातंत्र्याला जपतो. त्यांच्यावर आपण काही लादू नये आणि त्यांच्यावर आपला कब्जा बसवू नये. या दोन गोष्टींची मी नेहमी काळजी घेतो. लहानपणी मला स्वातंत्र्याऐवजी उपेक्षा मिळाली. त्यातूनहि मला स्वातंत्र्यच मिळाले.

दिल्ली–आगगाडी
१६–९–७१

आज मुंबईला जाण्यासाठी सकाळीच आगगाडी पकडली. सकाळच्या प्रार्थनेत संन्यास या संस्थेविषयी बोललो.

लग्न न करता, गृहस्थाश्रमाचा प्रारंभच न करता, कौटुंबिक जीवनाला अगदीच गौण करून, जीवन सेवामय करणे अथवा सामाजिक जीवनदेखील बाजूला सारून, आत्मप्राप्तीसाठी इंद्रियविजय साधून 'तपस्या हेच जीवन' असे करणे, याला आपण संन्यास म्हणतो. अशा संन्यासाला सगळ्याच धर्मात स्थान आहे:

संन्यस्तवृत्ती ही मनुष्याला स्वाभाविक आहे. पण तिची संस्था करणे हे मात्र जोखमीचे काम आहे. ही जोखम ओळखून कित्येक सुधारक धर्मांनी संन्यासाचा म्हणजे या संस्थेचा निषेध केला. हिंदु संस्कृतीने जीवनाचे चार आश्रमविभाग करून संन्यासाला शेवटचे स्थान दिले आहे. तरीही विरक्तीचा सार्वभौम अधिकार मान्य केला आहे. 'यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत् । गृहाद्वा वनाद्वा ।।

सुरक्षितता होती. संन्यस्ताची दीक्षा संन्यासी गुरूकडूनच घ्यावी लागे आणि गुरू शिष्याला पूर्णपणे कसल्यावाचून दीक्षा देत नसे. 'रहा माझ्याजवळ कित्येक वर्षे––मग पाहू म्हणे'––असेच उत्तर मिळे आणि एकदा संन्यास घेतला म्हणजे मग मात्र परत जाण्याची मोकळीक नसे. 'संन्यास न झेपला तर आत्महत्या करा, पण संन्यासाचा अपमान करू नका.' असा दंडक होता. बौद्ध, जैन, ईसाई वगैरे लोकांनी उत्साहाने संन्यासाचा अधिक प्रचार केला आणि मग त्याला स्वस्त करून टाकला.

मुंबई
१७–९–७१

स्वकीयांनाच नव्हे तर परकीयांना देखील उपयोगी पडणे हा मानवाचा महत्त्वाचा सार्वभौम धर्म आहे. स्वकीयांना उपयोगी पडण्यात जितकी

आत्मीयता अधिक तितका स्वार्थही अधिक. कारण स्वकीय एकमेकांच्या उपयोगी पडतात आणि स्वत:च्याच सेवेत 'परोपकार' कुठून असणार ? हीच गोष्ट स्वकीयांच्या सेवेच्या बाबतीतही खरी आहे. अशी सेवा अत्यंत इष्ट आहे पण त्यात थोरपणा नाही जे आपल्याला दूर आहेत आणि म्हणूनच जे लोक सेवेची अपेक्षा करू शकत नाहीत अशांच्या उपयोगी पडणे, यातच खरी आणि पुरी मानवता आहे.

ज्यांच्या जवळ यथेच्छ धन आहे, त्यांना सेवा करण्याचा एकच मार्ग सुचतो. आर्थिक मदत करा. त्यात सर्व सेवा येऊन गेली. आर्थिक मदत घेणाऱ्याला अर्थाचे—म्हणजे धनाचे—महत्व कळते व तो उपकारबद्ध होतो. देणाऱ्याला तेवढ्या रकमेचे काहीच महत्त्व नसते. त्यामुळे थोडेसे देऊन पुष्कळ उपकारबद्धता मिळविण्यात, सौदा स्वस्तात पडला असेच त्याला वाटते आणि मग प्रत्यक्ष सेवा करण्याची गोष्टच तो विसरतो. यात मानवता क्षीण होते, हे त्याला समजतेही आणि समजत नाहीही. खरोखर प्रत्यक्ष सेवा करणे—मग ती शारीरिक असो किंवा त्याहून अधिक महत्त्वाची, मानसिक किंवा भावनात्मक असो—त्यातच आपल्या औदार्याची खरी कसोटी होते आणि तिच्यामुळेच देणाऱ्याची उन्नती होते. हा मोठा फरक धनी लोकांना कळत नाही. हेच त्यांचे मोठे नुकसान आहे. प्रत्यक्ष सेवेच्या मदतीला जोड-सेवा म्हणून धन-सेवा वापरली तर ती अधिक कृतार्थ होईल.

मुंबई
१८-९-७१

जगाचे कल्याण व्हावे अशी ज्याप्रमाणे आपण सामान्य इच्छा करतो, त्याचप्रमाणे आपल्या नातेवाईकांचे, स्नेह्यासोबत्यांचे आणि विरोध करणाऱ्याचेदेखील कल्याण होवो, अशी सात्त्विक इच्छा मनात बाळगणे आणि ती उत्कटतेने जागृत करणे स्वाभाविक आहे. पण अशी इच्छा म्हणजे काही ईश्वराला करावयाची प्रार्थना नव्हे. उठल्या सुटल्या ईश्वराची प्रार्थना करणे ही खरोखर अनन्य भक्ती नसून, सगळी जबाबदारी ईश्वरावर टाकून

स्वत: अकर्मण्य होणे—अशा सारखा उठवळपणा आहे. 'देवा मी तुझी भक्ती करतो, तेव्हा त्याच्या बदल्यात तू माझा सांगकाम्या हो. माझे काम तुला आठवून फक्त प्रार्थना करण्याचे. तेवढे मी केले म्हणजे बाकी सगळी धावपळ तुला केली पाहिजे आणि ती कशासाठी ? तर मी इच्छा केली म्हणून. मी तुझा भक्त आहे. तुला आज्ञाधारक सेवक म्हणणार नाही प्रार्थनापालक स्वामी म्हणेन. पण तुझ्याकडून काम मात्र सांगकाम्या नोकराप्रमाणे मिळाले पाहिजे.'

एका महिलेचा स्नेही अडचणीत आहे म्हणून ती मला म्हणाली, 'त्यांची अडचण दूर होण्यासाठी, काकासाहेब ! तुम्ही सर्वदेखील माझ्याबरोबर प्रार्थना करा !' तेव्हा तिला मी माझे वरील विचार समजावले. "तुझ्या मित्राला मी बघितलादेखील नाही. त्याला जी सोय पाहिजे ती न्यायाची आहे की अन्यायाची, हेही मला ठाऊक नाही. त्याला जी वस्तु सोयीची वाटते, तिने त्याचे खरोखर अकल्याणही होणार असेल. तरीही तुझी इच्छा म्हणून मी देवाची प्रार्थना करावयाची ? देवाला आपण काय समजतो ?

मुंबई
१९-९-७१

आज म्हणे सर्व-पितृ अमावास्या. पूर्वजांच्या मृत्युदिनी त्यांचे श्राद्ध करावयाचे असतेच. पण भाद्रपद महिन्याचा वद्यपक्ष खास श्राद्धासाठी आहे. आणि त्यातही शेवटचा दिवस—अमावस्या म्हणजे उरले सुरलेले सगळे पितर लोक या दिवशी पिंड मिळवणार.

वंशपरंपरा ध्यानात ठेवण्यासाठी श्राद्ध करण्याचा प्रकार चालू झाला असेल. श्राद्धदिवशी दिवंगत नातेवाईकांचे पुण्यस्मरण करावयाचे असतेच. पण माझ्या मते पूर्वजांपैकी ज्या थोर लोकांनी आपल्या कुळाचे वैशिष्टच म्हणून काही सद्‌गुणांची उपासना केली असेल, या सद्‌गुणांना ओळखून कुलव्रत म्हणून त्यांचा स्वीकार करावयाचा आणि ते व्रत किंवा ती व्रते श्रद्धापूर्वक यथाशक्ती पुढे चालवावयाची.

पण धर्मव्यवस्था करणाऱ्या, नंतरच्या ब्राह्मणांनी सर्वप्रसंगी एकच कार्यक्रम लावून दिला आहे आणि तो ब्रह्मभोजन आणि दक्षिणा. 'ब्राह्मणाला जेवू घाला आणि दक्षिणा द्या.' दक्षिणायाम् श्रद्धा प्रतिष्ठिता ।— दक्षिणेच्याद्वारा श्रद्धा व्यक्त होते.

वर्षभर कोणत्या ना कोणत्या निमित्ताने ब्राह्मणांना मिष्टान्न भोजन मिळण्याची सोय झाली. आता आम्ही ब्राह्मण—आम्हीही ब्राह्मणांना जेवायला बोलावले पाहिजे. पण घरच्या लोकांना नाही. तेव्हा आम्ही ब्रह्मभोजनासाठी घरच्या जावयांना आमंत्रण देऊ लागलो ! जावयांचे गोत्र निराळे !

जुन्या संबंधाने आदर वाढत गेला— 'जुने लोक सर्वज्ञ आणि पवित्रतम. त्यांच्या बाहेर आपण जाता कामा नये.' अशा आदर्शाचा प्रचार करून आपण भविष्यकाळचा द्रोह केला आहे.

मुंबई
२०-९-७१

'जिवंत व्रतोत्सव' या माझ्या मराठी पुस्तकाची नवी आवृत्ती तयार करण्याविषयी बोलण्यासाठी आणि पूर्वतयारी करण्यासाठी, भाऊ धर्माधिकारी पुण्याहून मुद्दाम आले.

नवी आवृत्ती होईल पण तीस-पस्तीस वर्षांत देशाच्या धर्मसंस्कृतीत जो फरक झाला आहे, त्याची दखल घेणे आणि या संस्कृतीला आपण कोठे घेऊन जाऊ इच्छितो, याचा आडाखा तयार करणे—हे फार मोठे काम आहे गांधीयुगात ज्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला आहे, अशांची जीवनदृष्टि सामान्यपणे एकच आहे. बारीकसारीक बाबतीत विचारविनिमय करून यापुढचे चित्र रेखाटणे कठीण नाही आणि पुष्कळ उपयुक्त आहे.

या सात-आठ दिवसांत जो विचारविनिमय होईल, त्याचेच महत्त्व पुढील आवृत्तीपेक्षा अधिक आहे. भाऊ सारख्या अनुभवी आणि निष्ठावान सेवकाशी चर्चा करून भविष्याचे माझे चित्र त्यांना पटवून देणे, याचेच मला आकर्षण आहे.

आता आपण आपली संस्कृती कशीबशी जगवायची नसून तिला देशोन्नतीसाठी सर्वसमर्थ करावयाची आहे.

आणि याच्याही पुढे जाऊन, हिच्यामार्फत विश्वाची सेवा करावयाची आहे.

हा विचार मी पुष्कळ ठिकाणी मांडला आहे. पण येत्या सात दिवसात या विचाराचा विस्तार करून त्याचे स्पष्ट चित्र उमटून द्यावयाचे आहे. आतापासून माझे चिंतन सुरू झाले आहे. असले मौलिक चिंतन मला वेळ काढून करावे लागत नाही. तेच मला घेरते आणि माझ्याकडून काम करवून घेते.

मुंबई
२१-९-७१

आज सगळा वेळ भाऊ धर्माधिकारींना देऊ शकलो. पुस्तकाची चर्चा पुष्कळ झाली. पण त्याबरोबर जीवनविषयक आमच्या दृष्टींचा विनिमयही उत्तम झाला.

भारतीय संस्कृतीमध्ये शहर, ग्राम, जंगल, नद्या, पर्वत आणि ऋतु यांचा परिणाम आणि क्रम दिसून येतोच. त्या खेरीज एकाच देवाची पांच-सहा मुख्य स्वरूपे–पंचायतन किंवा षडयतनच्या रूपांनी संस्कृतीवर प्रभाव पाडतात.

त्यानंतर येतात अवतारी पुरुष. त्यांचे जगच निराळे आणि प्रत्येकाचे कार्य अद्वितीय. अवतारी पुरुष येतात आणि जातात. मरत नाहीत. म्हणून त्यांची जयंति असते. ऋषिमुनि आणि संतपुरुष यांची पुण्यतिथी उजवली जाते. प्रत्येक थोरल्या देवाचे अवतारही असतात. निरनिराळ्या धर्माचे संस्थापक आणि पंथ निर्माते आणि प्रत्येक धर्माचे संत––केवढा मोठा विस्तार ! आणि या सर्वांची धर्मकुटुंब व्यवस्था.

प्रत्येक धर्मातील दर्शने निराळी, समाज विज्ञाने निराळी आणि जीवनकलेचे प्रकारही असंख्य.

या सर्वांचा समन्वय करण्यातच नवनिर्मिती आणावी लागते.

याच समृद्ध वातावरणात पारसी दस्तूर मिनोचेर होमजी येऊन भेटले, फार चांगले झाले. यांनी स्वत: धर्माच्या समाजविज्ञानावर एक महानिबंध लिहिला आहे. तो उद्या मिळेल.

प्रस्तावना म्हणजे ताजे नवचिंतन.

मुंबई
२२-९-७१

आज भाऊ धर्माधिकारी आणि रवींद्र–दोघेही होते. दोघांना निरनिराळा वेळ दिला. दोघांचे विषय निराळे. पण दोघांचा सहवास मला आवडतो. विचारांचे गांभीर्य दोघेही समजू शकतात. त्यामुळे मला नव्या नव्या गोष्टी सुचतात. त्यांना त्या पटवण्यात आनंद वाटतो.

आणि मुख्य गोष्ट म्हणजे त्यांच्या कानी पोहोचविलेले चिंतन. उगवेल, फुकट जाणार नाही या विश्वासाचे समाधान मिळते.

साहित्य प्रकाशनापेक्षा योग्य माणसाच्या बुद्धि-हृदयापर्यंत पोहोचण्याचा आनंद मला विशेष आहे.

आजचा विशेष अनुभव म्हणजे विचारविनिमय केल्याने दोघेही थोडा वेळ थकले मला मात्र थकवा मुळीच आला नाही. उलट तकवाच वाटला.

याचे मी तटस्थपणे चिंतन केले. त्यातून तीन गोष्टी निघाल्या. मनुष्य सुख अनुभवतो त्यामुळे त्याला जसा तकवा येतो, त्याचप्रमाणे जीवनगत विविध चिंतनाचे मला सुख होते. त्यात श्रम नसून आत्मानुभव–सुखानुभव आहे. हे सर्व साधनेचे फळ आहे.

दुसरी गोष्ट चिंतनातील विविधता. एकच एक विषय फार लांबला तर थकवा आणतो. पण विषयांतर केले म्हणजे जीवनानुभव समृद्ध होतो आणि तिसरी गोष्ट म्हणजे आपल्याला जे सुख झाले, तेच–तसेच–दुसऱ्यालाही होते, हे पाहून अद्वैताची समृद्धी होते आणि स्वत:चे चिंतन दृढ होते. आत्मविश्वासाला पोषण मिळते. पण या साऱ्या वस्तु सूक्ष्म आहेत. अनुभवगम्य आहेत.

मुंबई

२३-९-७१

मला कालच शंका आली होती की xxx आज येणार नाही. तिच्या विषयी वाईट वाटते. ती आपले किती नुकसान करून घेत आहे, याची तिला कल्पना नाही आणि या बाबतीत मी तिला काहीच समजावून सांगू शकत नाही, याचे वाईट वाटते.

आजच्या स्थितीत ती जर ईश्वरावर सर्व सोपवून देईल तर तिला आपोआप मदत मिळेल. पण स्वत:चे स्थान ईश्वराला सोपवणे सोपे नाही. दीर्घ साधनेनंतरच त्याचा प्रारंभ होतो. तोवर वेदनाच राहते आणि अशी वेदना साधना होऊ शकत नाही. तिच्या विकासाची योजना ईश्वरच जाणे तिच्या कल्याणासाठी उत्कट चिंतन करणे, हेच मला शक्य आहे. जर तिला खरी प्रार्थना समजावून सांगू शकलो तरी तिला लाभ होईल.

आजचा सगळा वेळ भाऊ धर्माधिकारींनाच देऊ शकलो. दोन नोंदी लिहून झाल्या. हिंदुस्थानाचा धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि राजनैतिक इतिहास खोलात शिरून आपलासा केला पाहिजे. वरवर तुच्छ वाटणाऱ्या गोष्टींच्या मागे कित्येक गूढ तत्त्वे काम करीत असतात. जागरूकपणे त्यांचे चिंतन झाले पाहिजे. या सर्वातून जे सार निघेल ते राष्ट्रापुढे ठेवणे शक्य आहे. पण त्याचे महत्त्व यथाकाळी अनुभवानेच ध्यानात येणार आणि मग ते पटणार.

तोंपर्यंत ही व्यापक चिंतनपद्धती थोडया राष्ट्रभक्त सेवकांपर्यंत पोहोचविली पाहिजे.

भाऊमुळे माझी मनुस्मृति जागृत होऊ पाहते. पण मी नक्की केले आहे—मनोबोध (रामदासाचा) लिहिल्यानंतरच मनू हातात घ्यावयाचा.

मुंबई

२४-९-७१

कित्येक पारशी स्त्रियांनी "नालंदा" म्हणून एक अध्ययन आणि विचारविनिमय यांना प्रोत्साहन देणारी संस्था चालवली आहे. त्यात थोडे

पुरुषही असतील आणि सगळेच पारशी आहेत असेही नाही. हिंदु ख्रिस्ती स्त्रीपुरुष देखील आहेत. तरीही मुख्यत्वे पारशी महिलांचीच ही संस्था असावी. या लोकांनी मला एकदा व्याख्यानाला बोलविले होते. पुन्हा आज नालंदाचा संपर्क घडला. चि. जर जसावाला आणि फिरोजा वकील--या दोघींचा आग्रह होता. श्रोते मंडळी वीस-बावीसच असतील. पण आस्थेवाईक आणि प्रौढ. पांच-सहा चांगले प्रश्न त्यांनी विचारले होते. माझी उत्तरे शास्त्राच्या समर्थनासाठी नव्हती. स्वतंत्र चिंतनाला प्रोत्साहन देणे, हीच माझी मुख्य नीति. सर्व मंडळीने गोडपणे ऐकून घेतले. चांगली चर्चा व्हावी अशी माझी इच्छा होती. संस्थेच्या नीतीत ते बसत नसेल किंवा तयारी नसेल अथवा केवळ आदरबुद्धी असेल. थोडे थोडे सामान्य प्रश्न विचारून त्यांनी स्पष्टीकरण करून घेतले. एवढेच.

मला संतोष वाटला तो हा की हिंदु, बौद्ध, ख्रिस्ती वगैरे तत्त्वज्ञानाचा परिचय हे लोक आस्थेने करून घेतात. 'नालंदा' नाव देखील सूचक आहे. या संस्थेची अधिक माहिती मिळवली पाहिजे. त्यांनी हळूहळू एक पुस्तकालय वाढवले पाहिजे पुढे यथाकाळी लहानसे त्रैमासिक देखील त्यांना चालवता येईल.

अशा संस्था वाढल्या नाहीत तर झोपी जातात.

मुंबई
२५-९-७१

काल भाऊ धर्माधिकारी नाथांना भेटून आले. आज नाथांचा फोन होता. मी त्यांच्याशी बोलू शकलो. त्यांनी सतीश आणि बाळविषयी विचारले त्यांचा वात्सल्यभाव मला ठाऊक आहे, म्हणून त्यांना विस्ताराने माहिती सांगितली. त्यांचे मुख्य पुस्तक 'विवेक आणि साधना' याचे इंग्रजी झाले पाहिजे. अशी भाऊची इच्छा आहे. नाथांची देखील आहे. नाना धर्माधिकारी एखाद्या प्रकरणाचे इंग्रजी करून, मग ते नाथ सांगतील त्यांना वाचून दाखवतील. जर पसंत पडले तर त्यांची इच्छा आहे की मी

साहित्य अकादमीला तशी शिफारस करावी. मी म्हणालो की, " शिफारस करणे माझ्या हातात आहे. ते लोक एक समिती नेमतील, मग ठरेल ते खरे." मी दुसरी गोष्ट सुचवली की नानूभाई वोरा इंग्रजीत चांगली पुस्तके प्रकाशित करतात. त्यांनादेखील मी शिफारस करू शकेन.

मी असेही सुचवले की त्या पुस्तकाचे बंगाली भाषांतर झाले तर त्याचा तिकडे उत्तम प्रचारही होईल आणि नाथांच्या विचारांची कदरहि होईल आणि ते लोक इंग्रजी सहज करू शकतील.

भारतीय तत्त्वज्ञानात आणि अध्यात्म साधनेत नाथांची मौलिक दृष्टी आहे. तरुणांना आजच्या स्थितीत प्रेरणाही मिळेल.

नाथदेखील आता थकलेले दिसतात. आमच्या पिढीचे काम कधीच पुरे झाले आहे. लोकांनी त्याची कदरही केली. आता नवी प्रेरणा आणि युगानुकूल नवी दृष्टी जे देऊ शकतील त्यांचेच लोक ऐकतील.

मुंबई

२६–९–७१

भाऊ धर्माधिकारी सणाच्या पुस्तकाविषयी पुऱ्या उत्साहाने काम करताहेत. या पुस्तकाच्या निमित्ताने थोडे वाचन आणि पुष्कळ चिंतन होऊ शकते, हा मला लाभ आहे.

परशुराम अवताराचा नव्याने खूप विचार होऊ शकला. ऋषी, आचार्य, संत, योगी, मांत्रिक आणि गुरु यांच्या भिन्न भिन्न कार्याविषयी चिंतन करता करता आर्यांचा अंतिम जीवन उद्देश, त्यांची साधना आणि समाजाचे नेतृत्व यांचे निरनिराळ्या काळचे प्रयोग ध्यानात येऊ लागले. हे चिंतन जितके खोलवर जाईल तितका जागतिक मानवसमाज कसा विकसित होत आहे, त्याचे रहस्यही अधिक स्पष्ट होईल. त्यातूनच भविष्याची दिशा देखील प्रगट होऊ लागेल असा विश्वास वाटतो.

श्री. कन्हैयालाल मुनशींनी परशुरामाचे खूप चिंतन केले आहे. ते स्वत: भार्गव ब्राह्मण. भरूच शहर (भृगुकच्छ) भार्गवांचे स्थान. महिष्मती

आणि शूर्पारक–ही स्थाने परशुरामाशी संबद्ध आणि परशुराम चिरंजीवी; कृष्णावतारापर्यंत टिकला. तेव्हा मुनशींना वैदिक काळापासून अगदी पौराणिक काळाच्या शेवटपर्यंत आर्यांच्या इतिहासाचे चित्र रंगवता आले आहे. कादंबरीच्या रूपात रंगवले याच्यामुळे नुकसान झाले नाही.

श्री. म. माटे यांचे पुस्तक तितकेच महत्त्वाचे आहे. त्यांनी भारतातील आर्य लोकांचा वांशिक विकास कसा झाला, याचा शोध लावला आहे. माटे आणि मुनशी दोघांची दृष्टी भिन्न भिन्न, पण दोघेही परशुरामाचे भक्त. त्यामुळे दोघांचे प्रयत्न परस्पर पोषक झाले आहेत.

मुंबई

२७–९–७१

आज सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे कार्यक्रमात एकाएकी केलेला फेरबदल. उचक्या येऊ लागल्या म्हणून सूरत–वेडछीला जाण्याचे रद्द करण्याचा विचार चाललाच होता. मग मुंबईत राहण्याचे खास कारणही कमी झाले. तशात चि. सतीशचे पत्र आले. त्याप्रमाणे चि. xx ला ट्रंक कॉलही केला आणि नंतर ठरवले की उद्या सकाळीच येथून निघावे. एकाएकी सगळे ठरले–आणि पूर्ण शांतपणे.

"Man proposes but circumstances disposes." यांचा पुन्हा एकदा अनुभव मिळाला. येथे राहिलो असतो तर भाऊ धर्माधिकारींना अधिक वेळ दिला असता. पण खरोखर आमची चर्चा पुरी झाली होती. निर्णय होऊन चुकले होते. आता जे लिहावयाचे उरले आहे ते दिल्लीहून होऊ शकेल.

लवकर जाण्यापासून चि. xx च्या उपयोगी पडू शकेन ही आशा. आपण ज्या गोष्टींची उपेक्षा करतो, तीच वस्तु अगदी जणू वैर साधण्यासाठी आपल्यापुढे दत्त म्हणून उभी राहते. मला वाटते चि. xx ला अगदी वेळेवर जागृती देत आहे. अजूनही विशेष बिघडले नाही. जर वेळीच उपाय केला तर परिस्थितीचा फायदा घेऊन चांगलाच परिणाम आणता येईल.

फक्त जागृती बाहेरून येण्याची आवश्यकता होती. दिल्लीला जाऊन मी काय करू शकतो हेच आता पहावयाचे आहे. उत्कट चिंतन चालू आहे आणि विशेष म्हणजे चिंतनात प्रार्थनेची वृत्ती मिसळली आहे आणि त्यामुळेच मला आशा वाटते.

आगगाडी
२८-९-७१

आजचे माझे चिंतन अगदी निरनिराळ्या दोन विषयांमध्ये वाटले गेले. गुरु-शिष्य संबंध आणि त्यातून उत्पन्न होणाऱ्या संस्थांचा समाजावर पडणारा प्रभाव–हा एक विषय. आणि दुसरा विषय अपत्यांना जन्म दिल्यानंतर त्यांना उत्तम संस्कार देण्याची आणि ते दृढ करण्याची आई-बापांची जबाबदारी.

या दुसऱ्याविषयी मला खास म्हणावयाचे आहे –– स्वाभाविकपणे ही जबाबदारी बापापेक्षा आईची अधिक असली पाहिजे. पण आजच्या संस्कृतीमध्ये ते शक्य नाही. मानवी संस्कृतीने स्त्रीचे स्थानच आश्रितासारखे केल्यामुळे स्त्रीचा प्रभाव जो सर्वाधिक असला पाहिजे तो जवळ जवळ निष्प्राण झाला आहे. आणि म्हणून संतानाविषयीची जबाबदारी प्रधानपणे पित्यावर येऊन पडते. ही जबाबदारी ओळखणारा बाप अपत्य कल्याणाच्या दृष्टीने आपल्या सहधर्मचारिणीला तयार करतो आणि तिच्यामार्फत आपल्या संतानांवर प्रभाव पाडतो. असे झाले तर सर्व बाजूंनी ते सर्वोत्तम म्हणता येईल. कारण स्त्रीची पतिनिष्ठा आणि तिचे अपत्यप्रेम दोहोंचा लाभ मुलांना मिळतो.

गुरु-शिष्य संबंधातदेखील शिष्याच्या गुरुनिष्ठेविषयी पुष्कळ पुष्कळ लिहिले आहे. पण त्याहून अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे शिष्यवात्सल्याचा असे वात्सल्य उत्कटहि असावे लागते आणि शुद्धहि असावे लागते. दोन्ही बाजूंनी हितकर अशा वात्सल्यापुढे शिष्याला स्वतःच्या उन्नतीसाठी झटल्यावाचून गत्यंतरच नसते.

दिल्ली

२९-९-७१

विजयादशमी–दसरा, केवढा महत्त्वाचा सण ! आमच्या लहाणपणी आठ-दहा दिवस दसऱ्याचीच चर्चा आणि तयारी होत असे नवरात्र हा देवीचा सण. घरी महादेवावर फुलांची माळा लटकत ठेवण्याचा रिवाज होता पहिल्या दिवशी एक माळा, दुसऱ्या दिवशी दोन – अशा माळा वाढत वाढत शेवटच्या दिवशी नव-दहा माळा चढावयाच्या. माळांचा केवढा मोठा झुबका होत असे. दसऱ्याच्या दिवशी सर्व माळा प्रसाद म्हणून आम्हाला मिळत. मोठ्या भक्तीने आम्ही त्या घेत होतो. हे सर्व धर्म काव्य आता जुने झाले. पूर्वी समाजाला रिकामपण होते. आता व्यवहार बेसुमार वाढला.

इंग्रजी "Link" चा माणूस माझी मुलाखत घेऊन गेला. या लोकांना माझी आठवण कशामुळे झाली कोण जाणे. अरुणा आसफअलीचा Link. गांधीविषयी माझे विचार त्यांनी विचारले. मी म्हणालो, सरकार ही संस्थाच लोकमान्य, कायदेशीर हिंसा वापरणारी. गांधीच्या अहिंसक संस्कृतीत ती बसत नाही. बिनसरकारी, सार्वजनिक जीवन मजबूत केले पाहिजे. जुनी जातीय संपादने अशी होती. आजच्या multi-purpose co-operative societies आणि युनिवर्सिटी बिन सरकारी संस्था म्हटल्या पाहिजेत. त्यांची शेंडी सरकारने आपल्या हाती घेतली आहे, ते चांगले झाले नाही. सगळ्या संस्था अनुदानाच्या लोभाने सरकारच्या हातात जातात.

दिल्ली

३०-९-७१

आज एक महिना पुरा झाला. उद्या दुसरा सुरू होईल. एरवी या गोष्टीला काहीच महत्त्व नाही. पण मला वाटू लागले आहे की आता माझ्या आयुष्यक्रमांत बराचसा फेरफार होत आहे किंवा होणार आहे. आणि हा फेरफार आंतरिक संकल्पामुळे नव्हे तर परिस्थितीत आणि प्रकृतीत फेरफार झाल्यामुळे होत आहे. असा फेरफार अगदी स्वाभाविक

आणि अपरिहार्य असल्यामुळे तो कायमही होतो आणि प्रसन्नतेने स्वीकारला जातो. रात्रीचे झोपणे आणि सकाळी उठणे जसे स्वाभाविक आणि सहज-मान्य असते, तसा हा फेरफार आहे.

चि. दीपकच्या पत्राचे वातावरण अगदी हेच आहे. त्याच्या सूचनांना विशेष महत्त्व नाही. पण जीवन परिवर्तन त्यात स्पष्ट सुचवले आहे.

जीवनक्रमांतील सामाजिक विस्तार आपोआप कमी होऊ लागला आहे. आणि त्यामुळेच चित्तवृत्ति सहजपणे अंतर्मुख होऊ लागली आहे. या फरकातील आध्यात्मिक वातावरण आता उत्कट केले पाहिजे अथवा दुसऱ्या शब्दात म्हणावयाचे म्हणजे आजवर जी शेती केली तिच्या सुगीचे दिवस ओळखून, धान्य भरून, कोठींत साठवले पाहिजे. भविष्याचे हे भांडवल होईल.

## आक्टोबर

नवी दिल्ली

१-१०-७१

बापूजींचा जन्मदिवस उद्या आणि चि. सरोजचा आज आणि बरोबर दोन महिन्यानंतर माझा.

कालपासून सरोजच्या जन्मदिवसाचे ध्यान करीत होतो. परवा विजयादशमी झाली. त्यामुळे ही सर्व चिंतने एका मागून एक आली. आज सकाळच्या प्रार्थनेत या सर्वांचा उल्लेख करणार होतो पण आजपासून जीवन

परिवर्तन होणार आहे, या विचाराचे महत्त्व डोक्यावर 'सवार' झाले. कालच्या चिंतनात मी म्हणालो की माझे सगळे जीवन जर शेती म्हणावे, तर या पुढचे जीवन शेतीची सुगी म्हटली पाहिजे.

सकाळची प्रार्थना ओसरल्याबरोबर चि. सरोजची आठवण ताजी झाली. अद्‌भुत आत्मार्पणाचा नमुना अन्यत्र आढळणार नाही. आणि हे काही धर्माने तिला शिकवले नाही तर स्वाभाविक प्रेमाने. आणि त्यामुळेच सरोजच्या पित्याचे स्मरण मला अचुक होते. त्यांची ही कृति आहे. त्यांचा माझा स्नेह जमला असता तर किती उत्तम झाले असते. पण माझ्या स्मरणात ते आहेत. याचे श्रेय त्यांनाच देण्याचे मन होते ! जेथे स्वतःची मुलगी, तेथे आपण–अशी त्यांची भावना असावी, असे मला पुष्कळदा वाटले आहे.

माझ्यात अशी भावना आहे. पण ती एकाच व्यक्तींत केन्द्रित होऊ शकत नाही. माझा विश्वास आहे की माझ्यातील ही भावना धीरज-लाल ओळखू शकले आहेत. म्हणूनच माझ्या स्मरणात ते प्रसन्नपणे राहू शकतात.

माझ्या आजपासूनच्या नव्या जीवनाच्या प्रारंभी या थोर पुरुषाचे स्मरण जागृत झाले हा शुभ शकुन आहे.

दिल्ली

२–१०–७१

पूर्वी गांधी जयंतीला व्याख्यानासाठी अनेक आमंत्रणे असत. त्यामुळे दिवस भरला-भरला वाटे. आता प्रवासात असल्यामुळे मी कोठे आहे, याचीच बातमी पुष्कळांना नसते. मीहि आमंत्रणे टाळतो व लोकहि माझ्यासारख्या मागासलेल्या सेवकाला बोलावण्याचा उत्साह बाळगत नसावेत.

कित्येक लोक असे समजत की मी दोन आक्टोबरला मिळणे शक्यच नाहीं, मला पुढचीच एखादी तारीख विचारतात. मला हे इष्ट आहे.

यामुळे आजचा दिवस चिंतनात गेला. गांधी समाधीकडेदेखील गेलो नाही. तेथवर जाणे-येणे कठिण नव्हते. पण सगळा वेळ बसणे झेपले नसते. आता मी निवृत्त आहे याचा पक्का अनुभव झाला.

भीमसेन सच्चर भेटून गेले. त्यांना भारत-रशिया मैत्री कदाचित् पटली नसावी. मोघमपणे त्यांनी माझा अभिप्राय विचारला. मी म्हणालो, "अमेरिका जर चीनच्या गळ्यात पडू शकते आणि ते सुरक्षित आहे, तर भारत-रशिया मित्र व्हावयाला हरकत काय ?' या राजकीय मैत्री मतलबी असतात. केव्हाहि मित्राचे शत्रु व पुन्हा शत्रूचे मित्र होऊ शकतात. आणि यातच चातुर्य मानले जाते.

सर्वोदयचे काही कार्यकर्ते आले होते. त्यांचा प्रश्न-- "जर आम्ही रचनात्मक कार्यकर्ते, निवडणुकीत लोकांना मदत करतो. तर आपणच आपल्यापैकी एखादा उमेदवार उभा कां करू नये ?"

मी म्हणालो, 'जितक्या लोकांना हा प्रश्न विचाराल तितक्या निरनिराळ्या सल्ला मिळतील आणि तुमच्या पक्षात फाटे पडतील तेव्हा फक्त विनोबांचीच सल्ला घ्या."

दिल्ली

३-१०-७१

मेजर रामचंद्रन् आणि इंदू भाण भेटावयाला आले. मेजर बरोबर एक ऑस्ट्रेलियन आला होता. मनुष्य अनेक धर्मांचा अभ्यास करून Commitment चा विरोधी झाला आहे. त्याचे व माझे विचार बरेच जुळले. बौद्ध धर्माविषयी आम्ही पुष्कळ बोललो. हिनयान, महायान, जपानी झेन इत्यादि. मेजरबरोबर गीतेविषयी खोल चर्चा केली. अवतारवाद, बोधिसत्व यातील भेद सांगितला. इंदू भाणची परिषद समन्वयाची आशा अपेक्षा राखणार, आपला विश्वसमन्वय संघ समन्वयाच्या निश्चयावर पुढे जाणार. एकाची आशा आहे, दुसऱ्याची श्रद्धा आहे', वगैरे चर्चा झाली.

निरनिराळ्या औषधींच्या मदतीने ध्यान साधणे, इंद्रियजय करणे, समाधि मिळवणे याचा अनुभव पुष्कळ घेऊन भारतीयांनी या मार्गाचा त्याग करण्याचे ठरवले. त्यापेक्षा प्राणायामाच्या मदतीने मनावर काबू मिळवणे श्रेष्ठ म्हणता येईल, पण दोहोंमध्ये सारखाच दोष आहे, ही गोष्ट उच्च भूमिकेवर गेल्यावर पटते.

मनोनिग्रह, इंद्रियजय, योग वगैरे सर्व साधना जीवनविमुख होता कामा नयेत. सर्व काही जीवनाच्या उन्नतीसाठी आहे.

'प्रबुद्ध जीवन'मध्ये चिमनलाल चकूभाईंचा स्वैत्झरवरील दुसरा लेख वाचला. स्वैत्झरला पुष्कळशा गोष्टी समजल्या नाहीत. गांधींची साधना ही जीवनविमुख नाही याविषयी लिहितांना स्वैत्झर म्हणतो, "या योजनेवर Made in England चा छाप आहे" हे विचित्र वाटते. पण गांधीसाधना आजवरच्या भारतीय साधनेहून निराळी आहे हे मात्र स्पष्ट आहे.

दिल्ली
४–१०–७१

शरद पौर्णिमा म्हणजे पावसाळ्यानंतरचे निरभ्र सृष्टीचे काव्य. सबंध दिवस आणि सबंध रात्र या काव्याशी एकरूप होण्याची मस्ती अनुभवायची ह्याच खरा शरद पौर्णिमेचा उत्सव. आज सकाळच्या प्रार्थने-पासून सर्व वेळ याच वातावरणात रममाण होऊ शकेल याची धन्यता वाटली.

आज मद्रासकडच्या प्रख्यात लोकसेविका आणि गायिक सुब्बालक्ष्मी मुळीच वेळ नसताना कसा तरी वेळ काढून भेटून गेल्या. इतका आनंद झाला, जणू 'गीतपौर्णिमा'च भेटल्या.

आणि आजच चि. मदालसा आणि तिची आई जानकीमय्या भेटून गेल्या. पूर्व बंगालातील शरणार्थी लोकांची सेवा करीत असताना जानकी-मय्यांना एक वचन सुचले ते तर मानवाच्या स्वयंसिद्ध अधिकाराचे वचन आहे—"मानव संरक्षण मानव मात्रका स्वयंसिद्ध अधिकार है।"

आणि हे निरपवाद कर्तव्यहि आहे. याचा स्वीकार केल्यावाचून मानव-जातीची एकता सिद्ध होणारच नाही.

हे कर्तव्य आणि हा अधिकार जगातील सरकारे कधीच मान्य करणार नाहीत. आंतरराष्ट्रीय कायदादेखील यात भयंकर अडचणी दाखवू शकेल. फक्त गांधीजींचा अहिंसक प्रतिकाराचा मार्गच या अधिकाराचे समर्थन करू शकेल.

अन्यथा यूरोप-अमेरिकेतील गोरी राष्ट्रे या अधिकाराच्या नांवाखाली जगभर धुडगुस घालतील आणि साम्यवादी राष्ट्रे संरक्षणाचा व्यापक अर्थ करून जगाला त्राहि करून सोडतील.

जितके अधिक चिंतन करावे, गांधींजींचा अहिंसक प्रतिकार सर्वोत्कृष्ट युगधर्म वाटतो. या धर्माचा स्वीकार होऊ शकेल पण प्रचार मात्र फार कठिण आहे. आचरणाद्वाराच प्रचार होऊ शकतो हे गांधींनी दाखविले आणि त्याचे अनुकरण कोणीच करीत नाही, हेंहि ध्यानात घेतले पाहिजे.

दिल्ली
५–१०–७१

राष्ट्राची किंवा समाजाची प्रगती कोणच्या दिशेने झाली पाहिजे याचा विचार कोणीच करत नाही. राष्ट्राच्या इतिहासापासून बोध काय घ्यावा याचे चिंतनही नाही. चालू पिढी आणि मागची पिढी यांचा अनुभव म्हणजे स्वत:चा अनुभव, त्याच्या जोरावर चालू योजना सुधारली पाहिजे. याचीही कल्पना नेत्यांना नाही. गेल्या दोन-तीन हजार वर्षांत आपल्या संस्कृतीच्या नेत्यांनी काय मिळवून ठेवले, काय बिघडविले याचीही चर्चा नाही.

फक्त यूरोप, अमेरिका आणि रशिया काय करीत आहेत त्याची माहिती वर्तमानपत्रातून मिळेल तेवढी खरी. त्या माहितीच्या आधारावर वर्तमानपत्रे जे लिहितील, तेच काय ते लोकांचे त्या दिवसाचे चिंतन.

अशा परिस्थितीत विद्यार्थी एक अखिल भारतीय परिषद बोलावणार.

त्यातून संगठन उत्पन्न करणार. चार लोकांकडून दिशादर्शन मागणार, ठराव पास करणार, समिती नेमणार. समितीचे सदस्य पुढे जाण्याचा प्रयत्न करणार. निवडणूकी जिंकण्याचा प्रयत्न करणार. नेते होणार. पर-देशात जाऊन येणार. स्वत:ची संपत्ती वाढवणार.—हे आहे आपल्या राष्ट्राचे भाग्य ! पश्चिमेच्या पुढारी देशांचा अनुभव, त्यांना सुचणारे उपाय आणि ते चालवणार त्या प्रवृत्ती, यांचा फुटकर व्यापार करणारे लोक देशाचे भाग्य ठरवणार. नशीब भारताचे !

दिल्ली
६-१०-७१

गांधींनी भारतात येऊन साबरमतीला आपला आश्रम सुरू केला. त्यावेळी आम्ही चार महाराष्ट्रीय ब्राह्मण त्यांच्याकडे खेचले गेलो. प्रथम त्यांनी मला खेचले नंतर विनोबा आले. त्यांच्या मागोमाग मामा (फडके) आणि मामामुळे अप्पा पटवर्धन.

किती आश्चर्याची आणि आनंदाची गोष्ट आहे की आम्हा चौघांना आपले विशेष कर्तव्य वाटले की अस्पृश्यता निवारण्यासाठी आपण अधिकात अधिक काम केले पाहिजे.

एक गोष्ट मी पुष्कळदा सांगितली आहे—मुंबईला व्याख्यान देतांना बडोद्याचे सयाजीराव म्हणाले की "अस्पृश्यांच्या उद्धारासाठी मी पुष्कळ शाळा काढीत आहे, पण तिकडे शिकवण्यासाठी मला हिंदू शिक्षक मिळत नाहीत. मुसलमान शिक्षक नेमावे लागतात." त्यांचे भाषण ऐकावयाला मी गेलो होतो. माझ्या अंत:करणाला पीळ पडला मी मामांना म्हणालो, "आपल्या ब्राह्मण जन्माचे सार्थक केले पाहिजे" मामांनी गोधऱ्याचे काम घेतले.

एकदा एक हरिजन मुलगा कुठून तरी पिकलेली उंबराची फळें घेऊन आला. पोराला एक फळ अतिशय गोड वाटले. आपण खाल्लेले अर्धे फळ त्याने मामांना प्रेमाने दिले आणि म्हणाला, "मामा, खाओ" एका क्षणा-

चाही विचार न करता, मामांनी ते उष्टे फळ खाल्ले. हे दृश्य पाहताच मी मनात म्हणालो,, "खरा प्रेमधर्मी ऋषि आहे." आम्ही चौघांनी आपापल्या-परी हा प्रेमधर्म सांभाळला आहे.

दिल्ली

७-१०-७१

आज मला काकीविषयी लिहिलेच पाहिजे. तिला जाऊन त्रेचाळीस वर्षे झाली. माझे आयुष्य किती तरी बदलले. आश्रमात आम्ही कमीअधिक बारा वर्षे काढली असतील. हे देखील सर्व मी पार विसरून गेलो होतो. चि. कुसुमने वासरीत या दिवसाचा उल्लेख केला, म्हणून सकाळी प्रार्थने-पूर्वी सरोजला सांगितले. मला कल्पनाही नव्हती की नायबराज, तिच्या-विषयी मी काही सांगावे, अशी आग्रहाची सूचना करतील. पण जे झाले ते झाले. काही बिघडले नाही. आयुष्यातील एक प्रकरण, एक दिवसासाठी कां होईना—सजीवन झाले.

काल मामा फडके, अप्पा पटवर्धन, विनोबा आणि मी अस्पृश्याविषयी काय काय करू शकलो याची आठवण केली. तेव्हा माझ्या बाबतीत काकीचा संपूर्ण सहकार सहज आठवला आणि मनात तिच्याविषयीची कदर जागृत झाली. मला वाटते आता महादेवभाईने लिहिलेला काकीविषयीचा लेख वाचून मग मी देखील एखादा लेख लिहिला पाहिजे माडखोलकरांचा देखील तसाच आग्रह आहे.

काकीची आणि दुर्गाबेनची ( महादेवभाईच्या पत्नीची ) अतिशय मैत्री. त्याच्या खालोखाल शेजारीण गोमतीबेनची. स्वामी आनंद तिला अगदी भावासारखा. पण त्याचे सगळे श्रेय स्वामीला दिले पाहिजे. पुढे जेव्हा स्वामी आणि मी हिमालयात एकत्र राहिलो तेव्हा काकीशी असलेले माझे मतभेद एकदा मी सविस्तर सांगितले. स्वामीवर त्याचा प्रभाव उत्तम पडला आणि मगच स्वामी मला विशेष ओळखू शकला. पुढे स्वामीचे–माझे बिघडले, तो प्रश्न निराळा. जर काकी जिवंत असती तर कदाचित् तिने स्वामीला माझ्याकडे खेंचून आणले असते

दिल्ली
८-१०-७१

राधा ओबरॉय माझ्यासाठी इंग्रजीत लिहायला आठवड्यातून तीन दिवस तयार आहे, त्याचा आज प्रारंभ केला. सगळे काम, चिंतन आणि प्रचार जनतेसाठी लोकभाषेत करण्याची एकाग्रता साधावी म्हणून इंग्रजी टाळण्याचे व्रत, गांधींच्या प्रेरणेने घेतले होते, त्याचे आज उद्यापन झाले. आणि त्याच विषयी आज तिला मी लिहवले.

शांतिनिकेतन मधल्या जुन्या आठवणी आज मी विश्वभारतीच्या वतीने पट्टीबद्ध (tape record) करवल्या. त्यांना जुनी संस्मरणे हवी होती. त्यांना या गोष्टी जुना इतिहास म्हणून गोड वाटणार आणि त्याच हेतूने मी आज त्यांना सर्व काही सांगितले. पण माझ्या मते शांतिनिकेतन-मधील माझे दिवस फारच महत्त्वाचे होते. ती गंभीरता टाळण्याचा मी प्रयत्न केला. पण तासभर जुने दिवस सजीवन झाले. आता जर विशेष गोष्टी आठवल्या तर त्याची पूर्वतयारी करून त्यांना पुन्हा वेळ देईन.

मध्येच गोसंवर्धनवाले शिवाभाई पटेल भेटावयाला आले.

परवाच कलकत्त्याच्या गाईंचे रक्षण कसे करावे? हा प्रश्न घेऊन जानकीमय्या भेटल्या होत्या. मी त्यांना सांगितले " या प्रश्नावर सर्व शक्ति केंद्रित करण्याची सूचना श्री. विनोबांची. त्यांनीच तुम्हाला या बाबतीत कार्यक्रम दिला पाहिजे. आज मी शिवाभाईंना जानकीबाईंचे नाव सुचविले. शिवाभाईना या प्रश्नातील सर्व अडचणी समजतात. त्यांचे पुस्तक 'श्वेत क्रांति' ध्यानपूर्वक वाचले पाहिजे. त्यांच्याशी मला पत्रव्यवहार करावयाचा आहे.

दिल्ली
९-१०-७१

चि. शरद नानावटीच्या ऑपरेशनची चिंता सगळा दिवस राहिली. सकाळपासूनच्या जपामुळे मनावर चांगला परिणाम झाला. जप बराच मोठा

असल्यामुळे इतर मंत्राप्रमाणे, थोड्या वेळात पुष्कळ जप होत नाही. पण त्यामुळे मंत्राचे महत्त्व वाढते आणि मनावर परिणामहि अधिक होतो. सकाळी प्रार्थनेच्या वेळीदेखील तोच मंत्र बराच वेळ चालला. पण नित्यक्रमात फेरफार नको, असा विचार होऊन नित्याच्या जपाने प्रार्थना पुरी केली. पण जे झाले ते योग्यच झाले, हे समाधान राहिले.

अखिल भारतीय साहित्य परिषदेशी माझा संबंध आहे हेदेखील मी विसरून गेलो आहे. काम महत्त्वाचे आहे. कोटा येथील अधिवेशनासाठी संदेश लिहून पाठवीन. प्रकृति बरी असती तरीदेखील कोटाला गेलो नसतो. कारण मग त्यांच्या समितीत भाग घेऊन वर्षभर काम करावयाची जबाबदारी स्वीकारावी लागली असती. त्या लोकांना सामान्य सूचना केव्हाहि देता येतील. चांगल्या लोकांचा परस्पर परिचय करून देणे हे इष्ट व आवडते काम आहे. उत्कलची मैत्रीदेवी आणि गुजरातचा वचुभाई शुक्ल यांनी मिळून बरेचसे साहित्यिक काम केले आहे असे दिसते. मैत्रीदेवींच्या उपयोगी पडणे आवडेल.

उपेंद्र राय सांडेसरा हिमालयचे दर्शन करून परत आले. त्यांचा उत्साह उत्तम दिसला.

दिल्ली
१०-१०-७१

श्री. विष्णुदेव पंडित यांनी वेदपरिचयाचे काम हाती घेतले आहे. ते मला पसंत आहे. या प्रवृत्तीचा समाजावर काय आणि कितपत परिणाम होणार याची मला कल्पना मात्र नाही. ते काम पंडिताचे नाही आणि मठपतीचेहि नाही. त्याला स्वामी विवेकानंदासारखा माणूस पाहिजे. स्वामी विवेकानंदांनी उपनिषदाचा प्रचार केला नाही पण स्वतंत्रपणे वेदांताचा प्रचार केला. लोकांना वेदांत पटवला. मग प्रस्थानत्रयीचा अभ्यास सुचवला. तसेच वेदाविषयी झाले पाहिजे. हे करणारा उत्पन्न होईल तेव्हा खरा.

माझे इंग्रजी लेखन खरोखर सुरू झाले. या कामी राधेचा उपयोग चांगला होईल अशी आशा वाटू लागली आहे.

अखिल भारतीय गुजराती समाजाचे महेंद्र देव कर्तबगार माणूस दिसतात. व्यापक गुजरातचे संगठन दिल्लीमधूनच चांगले होऊ शकेल हे त्यांना सुचले हीच मोठी गोष्ट जर अहमदाबादमध्ये हे काम सुरू केले असते तर ते तिकडच्या लोकांच्या आहारी गेले असते. येथे आहे म्हणूनच अलिप्तपणे काम करू शकेल. या लोकांनी इतर प्रादेशिक भाषांबरोबर आदानप्रदानाचा संबंध सुरू केला आहे याचे महत्त्व सर्वांत अधिक आहे. आणि प्रारंभ द्राविडी भाषापासून केला, यात यांची दृष्टि आणि शक्ति दोन्ही दिसून येतात.

राजा[१], जोॲन[२] आणि मुलें सर्व आजच आले आणि भेटले हे चांगले झाले. सर्वांत धाकट्या कालेलकरचे – मीलनचे – दर्शन झाले! आनंद झाला.

दिल्ली

११–१०–७१

आचार्यकुलाची विनोबाची कल्पना सुंदर आहे. मी देखील सांगत आलो आहे की धर्मासारखी जीवनव्यापी कल्पना धर्माच्या ठेकेदारांनी नि:सत्व करून टाकली. राजशासनासारखी समर्थ व्यवस्था जुन्या राज्यकर्त्यांनी एका रीतीने बिघडविली. त्यामुळे प्रजाराज्य आजमावणे इष्ट वाटले. जुन्या राजांच्या आणि सम्राटाच्या राज्यापेक्षा प्रजाराज्य किती तरी चांगले. पण सत्ता आणि संपत्तीच्या लोभात सांपडलेल्या लोकांनी इलेक्शनचा चुथडा करून आणि अज्ञान प्रजेने लांच-रिश्वत, घूसखोरी अपरिहार्य समजून, शासनसंस्थेला शापरूप बनवली. धर्मसंस्थेच्या मागोमाग शासनसंस्थादेखील अप्रतिष्ठित होण्याच्या मार्गावर आहे. या संस्थेला पूर्णपणे अप्रतिष्ठित व्हायला बराच वेळ लागेल. पण चिन्हें आताच दिसू लागली आहेत.

तेव्हा आता आशा उरली शिक्षण संस्थेची. या संस्थेने धर्म आणि

---

[१] श्री. सतीश कालेलकर यांचे सुपुत्र अशोक. [२] अशोकची पत्नी.

राजकारण—यांच्या तावडीत न जाता, दोहोवर आपला प्रभाव पाडला पाहिजे. म्हणून ही संस्था प्रथमपासून बिनसरकारी ठेवता आली पाहिजे. न्यायमूर्तीप्रमाणे शिक्षणमूर्ति, सरकारच्या कह्यात राहता कामा नये. आजच्या लोकांना हे साधेल असे दिसत नाही. धर्म आणि राजकारण यांच्या इतकेही दैवत या शिक्षण संस्थेत आज नाही.

दिल्ली
१२–१०–७१

गुरुदेव रवींद्रनाथांनी जीवनाची व्यापकता समजण्याला आणि उमजण्याला मदत केली, त्यामुळे आमच्या सारख्याच्या जीवनात ते खोलवर पोहोचू शकले. पण ते पोहोचणे संपूर्ण जीवनविषयक असून देखील, बुद्धिगम्यच होते. ते स्वत: व्यक्ति म्हणून आमच्या जीवनात घुमू शकले नाहीत. त्यांची तशी इच्छाहि नसावी. आम्ही त्यांची कविता, त्यांचे विचार आपलेसे करू शकलो. पण त्यांनी स्वत:ला आपलेसे करू दिले नाही. ते दूरच राहिले.

गांधींचे मात्र याच्या अगदी उलट त्यांनी आम्हाला 'अपनावले'. आम्ही त्यांचे झालो, ते आमचे झाले. तरीहि त्यांचे माहात्म्य त्यांना चिकटले आणि आमचे अल्पात्म्य आम्ही सोडू शकलो नाही. यात गांधीच्याकडे कसलाच कमीपणा नव्हता. आत्मीयतेच्या साधनेत त्यांच्याकडून कसलीच कमतरता नव्हती. पण त्यांच्या व्यक्तित्वात आणि आमच्या व्यक्तित्वात अंतर राहणार. हे ते ओळखू शकले. या बाबतीत त्यांचे कारुण्य काम करीत होते. हा फरक सूक्ष्म ध्यान करणाऱ्यालाच समजणे शक्य आहे. आणि असा फरक समजण्यात कोणच्याच बाजूने अस्वस्थता नव्हती.

वर जे चिंतन दिले आहे त्याच्या कसोटीवर मी अद्वैत कसून पाहिले. आणि दिसले की पूर्ण अद्वैत खरे असूनदेखील, द्वैतालादेखील अस्तित्व असणार. केवळ तर्क बुद्धीने त्याचा इन्कार करणे योग्य होणार नाही. द्वैत आणि अद्वैताचे सहअस्तित्व पटले. आता ते चिंतनात आत्मसात् करण्याचे बाकी आहे.

दिल्ली
१३–१०–७१

भाऊ धर्माधिकारीसाठी विवेकानंद पुण्यतिथि कशी उजवावी याचे चिंतन मराठीत लिहिले. याचेच सरोजने गुजराती करून, राजकोटच्या स्वामी आत्मस्थानंदजींना पाठवण्याचे ठरविले. त्यांना मी लिहिणार की 'याचे बंगाली करून, रामकृष्ण मिशनच्या लोकांना पाठवून द्या." या कामी आत्मस्थानंदांचे नांव सरोजला सुचले हे चांगले झाले.

आज संध्याकाळी साडे सहाला सभेची बैठक झाली. त्यात पांच जणांना नवे सदस्य म्हणून घेतले. पैकी डॉ. माधवदास आजपासूनच कार्यकारी अध्यक्ष म्हणून मला मदत करतील. आजच त्यांचा जन्मदिवस ! रवींद्रांना अमृतलाल आणि चि. सरोज यांच्या मदतीला मुख्यमंत्री म्हणून नेमले. तारीख १६ पासून त्यांची कारकीर्द सुरू करणे सोइस्कर होईल.

अशा रीतीने गांधी हिंदुस्तानी साहित्य सभेच्या कामात आता जोम येईल, अशी आशा करू या. माझ्या डोक्यावरील ओझे पुष्कळ कमी झाले, यामुळे आजचा दिवस मला प्रिय वाटतो. आजच्या सर्व कामात सर्वांच्या चिंतनाचा लाभ मिळाला याचा मला विशेष संतोष आहे. मला वाटते याचमुळे मला अधिक सेवा देण्याची शक्ति येईल. डॉ. माधवदास म्हणाले, "लहानशा भांडवलावर बराच व्यापार जो करू शकतो, तोच कुशल व्यापारी. हा माझा सिद्धांत असल्यामुळे, गांधीजींचे जे कार्य तुम्ही मला सोपवले, ते निष्ठापूर्वक करण्यात माझी शक्ति मी वापरीन आणि मला त्याची धन्यता वाटेल." हे सर्व आपोआप. सहजासहजी घडून आले तेव्हा हे परमात्म्याला मान्य आहे.

दिल्ली
१४–१०–७१

जगातील आपले काम जणू संपले आता मागच्या लोकांना सांगत सुटावयाचे की, 'बाबांनो हे पहा आम्ही चाललो, आता या सर्व गोष्टी तुम्ही

सांभाळावयाच्या आहेत. आमचा अनुभव सांगतो तो ऐका. वाटल्यास त्या अनुभवाचा फायदा घ्या. भविष्याची नीति आता तुम्हीच ठरवणार, इष्ट काय आणि अनिष्ट काय, याविषयीचा आमचा आग्रह आम्ही आजवर चालवला. आता तुमचा आग्रह घेऊन तुम्ही पुढे व्हा. आणि तुम्हाला सुचेल तेच करा."

निदान माझ्या मनोरचनेने नुकतीच ही भूमिका स्वीकारण्याचे ठरविलें. आणि त्यामुळे खूप मोकळेपणा वाटू लागला आहे. कित्येकांना वाटले की ही जाण्याची तयारी आहे. मला तसे वाटत नाही.

तसे वाटण्याचा हक्क मला प्राप्त झाला आहे. पण माझे मानस त्या प्रकारचे नाही. आपले विचार वर्तमानकाळला पटवलेच पाहिजेत अशी जी प्रवृत्ति होती, ती आता ओसरली आहे, हेच खरे.

पण या तटस्थपणामुळे मुक्त चिंतनाला जोर येऊ पाहत आहे.

तेव्हा आता मला वर्तमानकाळाची मर्यादा सोडून देऊन, दूरवरचे चिंतनदेखील मांडायला सुरवात केली पाहिजे. माझ्या स्वभावात ते बसते. त्यासाठी शक्ति क्षीण झाली नाही. वेळ आणि रिकामपण किती मिळणार हेच पहावयाचे.

मुंबई
१५-१०-७१

जुगतरामभाईंनी पत्र लिहून खास विचारले की श्रीमनजी म्हणतात त्याप्रमाणे गांधी विद्यापीठ संबंधी Deemed universtity ची मान्यता सरकारकडून घ्यावी की न घ्यावी ? आजपर्यंत मी तत्त्वत: अशा गोष्टींचा विरोध करीत आलो होतो. आज मी त्यांना लिहिले की गुजरात पुरता विचार करता मला वाटते की मान्यता घ्यावी. प्रजेची सेवा करीत आहोत. प्रजाराज्याशी तुटकपणे राहून स्वत:ची तेजस्विता सांभाळण्यापेक्षा मान्यता घेऊन स्वराज्य सरकारवर आपला प्रभाव पाडण्याचे दिवस आले आहेत. माझ्या दृष्टीत हा महत्त्वाचा फरक झाला. हे त्यांना कळवले आणि येथेहि नोंदून ठेवत आहे.

दुसरी एक गोष्ट-- पारश्यांनी आपला धर्म पारश्यांपुरताच मानून संकुचित केला. त्याचप्रमाणे जैन समाजाने अहिंसाधर्म विश्वधर्म असूनहि स्वत:चाच धर्म बनवला. हे चांगले झाले नाही. त्यांनी आता महावीराच्या अहिंसाधर्माचे दोन भाग करावे. एक रूढीला चिकटून राहणारा जैन लोकापुरता आणि दुसरा सर्व धर्मात शिरून किंवा स्वतंत्रपणे चालणारा विश्व-धर्म सर्वत्र जीवनव्यापी अहिंसादृष्टीचा स्वीकार होईल, असा प्रचार चालवावा.

अशा तऱ्हेचा संदेश मी जैनधर्म महामंडळाला पाठवला होता. त्याचा परिणाम रिषभदास रांका यांच्यावर उत्कट होऊन त्यांनी जैन समाजातील आंतरिक संघर्ष दूर करण्याचा प्रयत्न एक वर्षभर करावा. त्यात सिद्धी मिळाली तर बाहेर पसरावे. नाही तर आत्मविसर्जन करावे असा संकल्प केला. त्यांना मी स्पष्ट लिहिले की तुमची उत्कटता अभिनंदनीय आहे. पण आत्मविसर्जनाची घाई अधर्म्य आहे. माझा हा विचार त्यांना समजावून सांगणारे पत्र लिहविले.

दिल्ली

१६-१०-७१

वर्तमानपत्रवाले पुष्कळदा अनेक प्रश्न विचारण्यासाठी माझा interview घेतात. इंदूरच्या दैनिक 'नई दुनिया'च्या वतीने रमेश बम "निर्मल" माझा interview घ्यावयाला आला होता. म्हणाला, "तुमचा साक्षात्कार हवा आहे! interview साठी 'साक्षात्कार' शब्द ऐकून मी अगदी गारच झालो! 'मुलाखत' किंवा 'भेट' असे नेहमीचे शब्द सोडून अगदी वेदांती शब्द असल्या कामासाठी लोक वापरू लागले, तर भाषेचे काय होणार? माझी मुलाखत घ्यायला आलेल्या माणसाला 'साक्षात्कारी पुरुष' म्हटले पाहिजे!

पूर्वी व्यक्तीवर आणि राष्ट्रावर संकटे येत. आजच्या युगात भाषेवर-देखील असली भयानक संकटे येऊ लागली आहेत!

आमच्या 'साक्षात्कारी पुरुषा'ने माझी उपयोगिता ओळखून गांधीवादा-विषयी चारच प्रश्न विचारले. माझी नेहमीची उत्तरे दिली. उत्तरे व्यापक आणि स्पष्ट असली तरी ती येथे देण्याची आवश्यकता नाही. पण कोठे तरी ती लिहून ठेवायला हवी होती.

आज रवीन्द्र, अण्णा फणसे नावाच्या एका गृहस्थांना घेऊन आले. पत्नी आणि मुलगाहि बरोबर होते. या गृहस्थांनी गोव्यातील 'राष्ट्रमत' चालू करावयाला, प्रारंभी पुष्कळ मदत केली. कित्येक महिने येऊन, राहून, सगळ्याच बाबतीत यांनी ध्यान दिले, दैनिक अग्रलेखदेखील लिहिले. इतक्या आपुलकीने सविस्तर मदत करणारी माणसे जगात विरळा. मी या लोकांशी अगदी मोकळ्या मनाने यथेच्छ बोललो. ते पुन्हा येणार आहेत.

दिल्ली

१७-१०-७१

चि. बाळ आणि उमाशंकर अहमदाबादहून एकाच विमानातून आले. कोठारींनी उमाशंकरला घरी पोचविले. जेवून उमाशंकर जर्मनीला गेले. अगदी साधी गोष्ट. पण उमाशंकरचे प्रेम आणि आत्मीयता अनेक प्रकारे आपोआप प्रकट होते. विद्वत्तेबरोबर असे प्रेम सर्वांना दिसते अनुभवायला मिळते म्हणूनच ते सर्वांना हवेसे वाटतात.

सारस्वत जातीचे कन्हेन्शन नोव्हेंबर अखेर भरणार. त्यांना लिहिलेले पत्र अनेक रीतीने महत्त्वाचे आहे. भारतामध्ये सामाजिक क्रांति कशी व्हावी, या विषयी महत्त्वाच्या सूचना--- अत्यंत व्यवहारिक अशा मी दिल्या आहेत.

गाझीयाबादचा एक प्राथमिक शिक्षक येऊन भेटला. त्याच्या मते अत्यंत महत्त्वाचा शोध त्याने केला होता की बापूजींना आपल्या मरणाची कल्पना अंतरज्ञानाने मिळाली होती आणि ते हेहि जाणत होते की आजच्याहून अधिक पूर्ण देह धारण करून त्यांचा पुनर्जन्म होणार आहे या या भोळ्या माणसाला मी पुष्कळ समजावले की गांधीवर असल्या चमत्कारांचा आणि सिद्धीचा आरोप करणे योग्य नाही. खरी सिद्धी

निराळीच असते, इत्यादि. स्वधर्म समजून, मी अगदी कळकळीने त्याला पुष्कळ समजावले पण संत महात्म्याच्या साहित्याने आणि भक्तीने जें मानस तयार केले आहे, यातील दोष आणि होणारे नुकसान सामान्य मनुष्य कसे समजू शकणार ? पण आपण अखंड प्रयत्न केलाच पाहिजे. आपल्याप्रमाणे दुसरेहि सज्जन असा प्रयत्न करतीलच. "थेंबे थेंबे तळे साचे" ही श्रद्धा हवी.

दिल्ली

१८-१०-७१

सृष्टीवर खरे राज्य वनस्पतीचे. त्यात प्राण्यांनी धुमाकूळ सुरू केला. आणि माणसाने हद्द केली. प्रथम शेती सुरू केली, मग रस्ते तयार केले, क्रयविक्रय सुरू झाला. उद्योग धंदे वाढले आणि अरण्य आणि ग्राम उभयांचे शत्रु अशी शहरे सुरू झाली. शहरांचा निसर्गाशी संबंध गौण. घराभोवती फुलबाग आणि बगीचे—– एवढाच वनस्पतीचा स्वीकार. अशा शहरात ऋतु परिवर्तनाचे महत्त्व कितीसे ? काल दिवाळी झाली. उद्या वर्षारंभ आज म्हणून यथेच्छ धुके पसरले होते. अशा स्थितीत कालचे चिंतन आठवून लिहावयाचे. दिवाळीमुळे परस्पर अभिनंदनाची पत्रे येऊ लागली. हा रिवाज आपण इंग्रजांकडून घेतलेला असो, पण तो अभिनंदनीय आहे. पण कित्येक पत्रे इंग्रजीत येतात, हे मात्र अभद्र वाटते.

जैनेंद्रजी दिवाळी म्हणून मुद्दाम भेटले. स्वतःच्या पुस्तकाची माहिती दिली. ते पुस्तक आता पाठवतील. जैनेंद्रजी चिंतक चांगले आहेत. स्वतःला अनुकूल कविभाषाहि तयार करतात. अनेक विषयांचे चिंतनहि करतात. तरीहि त्यांचे नेतृत्त्व केवळ साहित्यिक क्षेत्रात. सामान्य सामाजिक जीवनात का नाही ? मला वाटते सामाजिक नेतृत्वासाठी समस्त जीवनाला आवरणारे चित्र असावे लागते. मग ते उसने आणलेले किंवा कुजके का असेना. आणि त्या चित्रामध्ये जीवनाला प्रेरणा असावी लागते. त्या अभावी चिंतन साहित्याबरोबर बाहेर पडूच शकत नाही. आजचे नेतृत्व पश्चिमचे आंधळे अनुयायी आहे.

दिल्ली
१९-१०-७१

श्री सीताचरण दीक्षित आणि रवींद्र यांचा विचारविनिमय झाला असावा. दीक्षितजी म्हणाले, "तुमच्या शेजारी हे हरिजन राहतात. त्यांचा त्रास आहे. आसपासचे सगळे वातावरण स्वच्छ असले पाहिजे. सरकारला सांगून यांना येथून हालवले पाहिजे. त्यांनाहि चांगली जागा मिळेल आणि आपले वातावरणदेखील स्वच्छ होईल."

मी म्हणालो की, ही सूचना नवीन नाही. अगदी येथे नवीनच रहा-वयाला आलो आणि सरकारकडून एक एकर जमीन आम्हाला देण्याचे ठरले, तेव्हाच ही शेजारची slum area साफ करण्याचे सरकारने ठरवले होते. प्रेरणा आमची नसली तरी, आम्हाला ते इष्ट होते.

सरकार किंवा कॉर्पोरेशन त्यांना दुसरीकडे चांगली जागा द्यावयाला तयार होते. सरकारने मदतहि केली असती. पण हे लोक म्हणाले. "ज्या जागी हल्ली आम्ही आहोत तेथून नोकरीवर जाणे सोपे आहे. कारण ते जवळ पडते. येथून चांगल्या जागी गेलो तर आम्ही जे एकत्र आहोत ते विभागले जाऊ आणि ती नोकरी सोडून नवी शोधावी लागेल.

या लोकांनी जाण्याचा इन्कार केला. आम्हीहि त्यावेळी यांना येथून हटवण्याचा आग्रह धरला नाही. हरिजन सेवकांनी हरिजनांचा सहवास टाळवा हे योग्य होणार नाही. यांची सेवा करून यांना सुधारणे आमचे कर्तव्य आहे. आता इतक्या वर्षांचे शेजारी, त्रास देत असले तरी त्यांची सेवा चालू ठेवू. त्यांना दूर करण्याचा प्रयत्न करणार नाही.

दिल्ली
२०-१०-७१

पोटदुखी शांत राहील इतके खाल्ले पाहिजे. कमी खाऊन पोट थांबत नाही. हा आदर्शच आरोग्याला अनुकूल नाही. इतके दिवस झाले जास्त खाण्याची भीती आणि कमी खाण्याची तितकी भीती—यातून अपचन तर

होणार नाही ना ? अशी भीती वाटते. तरी देखील पोटदुखीच्या शांती-साठी जास्त खाऊन बघितले अजून तरी बाधले नाही. एखादे वेळी शौचाला पातळ होते, त्याची फारशी चिंता नाही. पण जेवायला बसलो असताना अन्न खाववतच नाही. अन्न गळ्याखाली उतरत नाही--अशा स्थितीत काय करावे हे समजत नाही.

केव्हा केव्हा झोप येत नसली म्हणजे खाल्लेले गळ्याकडे येते, हे मात्र अपचनचे लक्षण खरे. पण तसा अनुभव फारसा नाही. पण असा अनुभव होताच मी अस्वस्थ होतो. कारण अपचनासारखे बाधक दुसरे काही नाही. अपचनातून कोणताही रोग व्हावा. अपचन बेअब्रू सारखे वाटू लागते.

अजून तरी, दोन दोन तासाने खाल्ले म्हणजे शरीराची तशी चिंता वाटत नाही. पण हे असे कोठवर चालायचे याची चिंता मात्र आता वाटू लागली आहे, जन्ममरणाची माझी साधना उत्तम झाल्याकारणाने या नव्या चिंतनाचे रूपांतर चिंतेत होत नाही. हा मोठा लाभ आहे. मनाचे स्वास्थ्य स्थिर आहे. शरीराचे आणि आयुष्याचे काही झाले तरी मनाची शांती ढळणार नाही, याची खात्री आहे. पण आरोग्य सांभाळलेच पाहिजे.

दिल्ली
२१-१०-७१

गांधीजींने सर्वोदयाचा आदर्श भारतापुढे आणि जगापुढें ठेवला आणि सांगितले की सोशियालिझम आणि कम्युनिझमपेक्षा सर्वोदय श्रेष्ठ आहे. सरकार कायद्यामार्फत अंमलात आणण्याची हिंसा यात नाही. सामाजिक परिवर्तन करावयाचे आहे. त्यासाठी अस्तेय आणि अपरिग्रह यांचा प्रचार जोराने झाला पाहिजे. गांधीवादी लोकांमध्ये जर एवढे जीवनपरिवर्तन झाले तर लोकांकडून असहयोग आणि सत्याग्रहाच्या मदतीने सर्वोदय चालू करता येईल.

पण काही सर्वोदयवाल्यांना गांधी नको आहेत. गांधी आणि सर्वोदय

ही नांवेच हवी आहेत. सोशियालिझमचा तात्त्विक विरोध करून ते स्वस्थ बसतील आणि अहिंसेचे गीत गातील. लोकांमध्ये गांधींना अप्रिय करण्याची याच्याहून चांगली प्रवृत्ती कोणची ?

ज्यांना अपरिग्रहाची ट्रस्टीशिप पटली नाही. त्यांनी सर्वोदयाचे नावच कां घ्यावे ?

जी स्थिती सर्वोदयाची. तीच ग्रामदानाची आणि आचार्यकुलाची होऊ पाहत आहे आणि काही लोक आता सर्वोदयाच्या नावाने सर्व सेवा-संस्था ताब्यात घेऊन आपले राज्य चालवण्याची योजना आखत आहेत !

हे सर्व उघडे पाडणे शक्य आहे पण आपल्याजवळ खरे गांधीवादी कार्यकर्ते हवे आहेत. जुन्या पद्धतीने संस्था चालवून स्वतःची आजीविका मिळवणे, धनी लोकांकडून भांडवल मिळवणे आणि गांधीचे नांव घेणे--याचे नांव सर्वोदय---असे होऊ पाहत आहे.

दिल्ली
२२-१०-७१

रवींद्रांनी आज एका गोष्टीकडे माझे ध्यान खेचले---

'सर्व-धर्म-समभाव इत्यादी आदर्श अंमलात आणण्यासाठी तुम्ही आजवर हिंदूंनी काय करावे, हेच सांगत आला आहात. हिंदुसभा, R. S. S. किंवा जनसंघ यांच्यासारखे मानस तुमचे नाही हे सर्वांना ठाऊक आहे. पण हिंदू नाहीत अशा धर्मसमाजांनी काय करावे. हेही तुम्ही सांगितले पाहिजे.'

त्यांचे म्हणणे मला पटले आणि त्याविषयी प्रास्ताविक लिहून भारतीय ख्रिस्ती लोकांनी कसे वागावे, काय करावे वगैरे सांगायला सुरवात केली.

सर्व काही थोडक्यात सांगावे अशी मनापासूनची इच्छा आहे. पण लोकमानस भलत्याच दिशेने काम करीत आहे, असे पाहून भूमिका स्पष्ट

केल्यावाचून आपले म्हणणे लोकांना पटणार नाही, अशी खात्री झाल्यामुळेच मला कित्येक विस्तार करावा लागतो.

वाचक अशा विस्ताराचा फायदा करून घेतात आणि तरीही म्हणतात की "अघळपघळ लिहितात."

आणि जर अशारीतीनें भूमिका स्पष्ट न केली, तर हेच वाचक अर्थाचा अनर्थ करावयाला तयार !

कसेही असो, स्वत:ला समाधान होईल की आपण भूमिका स्पष्ट केली आहे, असेच लिहावे. वाचकांना ते रुचो वा न रुचो भविष्यकाळच्या लोकांना आपले म्हणणे बरोबर समजले आणि पटले तर तोच मोठा लाभ भविष्याच्या लोकांना आजच्या पिढीचे मानस समजले तर तोही लाभच आहे.

दिल्ली

२३-१०-७१

"Rajaji 93" या ग्रंथासाठी माझा लेख त्या लोकांनी तीनचारदा मागितला. 'देतो, देतो' म्हटले पण गफलतीत राहून गेले. हे बिलकुल शोभले नाही.

पण खरोखर त्यांच्याशी एकेकाळी उत्कट संबंध आला असून देखील आता काहीच आठवत नाही. ज्याप्रमाणे माणूस मरून गेला म्हणजे त्याच्याकडून कुणी लेख मागू शकत नाही, त्याचप्रमाणे ज्याची स्मृति क्षीण झाली; त्याच्याकडूनही काही मिळणे दुरापास्त आहे. पण कित्येकांची स्मृति शेवटपर्यंत ताजी असते. माझा तसा दावा नव्हता. पुष्कळ गोष्टी विसरत आलोच आहे. पण आता मात्र विस्मृतीचे आक्रमण जोराचे झाले आहे.

काल आणि आज 'पंडित सुखलालजींचे दर्शन आणि चिंतन' दोन भाग वाचत आहे. त्यावरूनदेखील खात्री झाली की कित्येक गोष्टी आता पूर्व जन्मीच्या असाव्यात. इतक्या साफ विसरून गेलो आहे.

आता याचे चिंतन फायदेशीर वाटते. कित्येक जाती आपला जुना इतिहास विसरतात. मग तो शोधून काढावा लागतो. लिहिलेला इतिहासही विसरला जातो.

चि. सिद्धार्थला आपल्या कुळाचा आणि जातीचा थोडा इतिहास सांगून ठेवण्याची इच्छा झाली. मला बरे वाटावे म्हणून तो ऐकायला तयार झाला. पण त्याला ते काहीच नको होते. आमच्या लहानपणी आम्हाला, अगदी याच्या उलट, सर्व काही हवे होते देवाच्या घरी कालमहात्म्य यथेच्छ आहे. पण विस्मृतिदेखील कालमाहात्म्यातच येते.

दिल्ली

२४-१०-७१

राजाजी ९३ वर्षांचे झाले. तरी त्यांचे जे लेख चुकून माकून वाचतो त्यावरून त्यांची स्मृती मजबूत दिसते. माझी स्मृती गतवर्षीपर्यंत बरीच चांगली होती. त्यामुळे गतवर्षीपर्यंत मला राजाजींचे आश्चर्य वाटत नव्हते. आता मात्र वाटते.

जवळजवळ सगळ्या गोष्टी विसरलो. तरीही कुणाचाही संबंध कसा सुरू झाला (अर्थात् उत्कट असेल तर) याची कल्पना टिकते. तो संबंध कसा वाढला आणि कसा बदलला याचा तपशील आठवत नसला तरी स्वतःची प्रतिक्रिया ध्यानात राहते.

माझ्या स्वभावात उत्कट प्रेम आहे असे नाही. पण मी निष्ठेला जपत असतो. स्वामीविषयी उत्कट प्रेम असूनदेखील बापूजींशी जमलेली निष्ठा तोडणे मला अशक्य झाले. माझा विश्वास होता की माझ्या उत्कट प्रेमामुळे स्वामींची माझ्याविषयीची निष्ठा कधीच डगमगणार नाही. अनुभव तसा आला नाही. याचा मला किती आघात झाला याची थोडीशी कल्पना बापूंना होती व त्यांनी मला समजावण्याचा व सांभाळण्याचाही प्रयत्न केला आणि माझ्या अपेक्षेप्रमाणे बापूजींची निष्ठा (तिला वात्सल्य म्हटले पाहिजे) मला कायमची मिळाली आणि तरी ही बापूजींची अलिप्तता कायम राहिली.

राजाजींशी जो संबंध आला त्यात मी जी आत्मीयता मानली ती सकारण होती. पण तसा अनुभव मात्र मला मिळाला नाही ते मोठे झाले. पण त्यामुळे आमचा संबंध ढिला होईल अशी माझी अपेक्षा नव्हती. माझ्या अपेक्षेप्रमाणे महादेवभाईंनी माझ्याशी असलेली निष्ठा शेवटपर्यंत कायम ठेवली. नरहरिभाई मध्येदेखील चांगली निष्ठा होती. राजाजी मात्र बघता बघता दूर झाले. एखाद्या ठिकाणी अपेक्षाभंग झाला तर माझ्या स्वभावाप्रमाणे मी माझी निष्ठा वाढवतो. पण ती आंतरिकच असते. बाह्यवृद्धी कोणालाही कशी परवडणार ? राजाजी अगदी सहजपणे दूर गेले. याचे मला वाईट वाटले तरी आश्चर्य वाटले नाही. त्यांच्या संबंधाने माझ्याकडून मी कसलीच उपेक्षा होऊ दिली नाही. याचा मला संतोष आहे. जगाचे संबंध परिस्थितिवशच असणार. हे स्वाभाविक आहे. त्यामुळे माझी शांती ढळत नाही.

दिल्ली

२५-१०-७१

प्रपौत्राच्या दर्शनाचा आनंद मानावयाचा आणि त्याच दिवशी ६१ वर्षापूर्वी झालेल्या वडिलांच्या निधनाचे मनाने श्राद्ध करावयाचे आणि दोन्ही गोष्टी अलिप्ततेच्या साधनेच्या वातावरणात !

आज विठ्ठल कन्या विद्यालय, नडियादच्या विद्यार्थिनी—उत्तर भारताच्या यात्रेला निघालेल्या--भेटल्या. यांच्या आचार्या–प्रभाबेन चांगल्या अनुभवी दिसल्या. विद्यार्थिनींना माझा नेहमीचा संदेश सविस्तर सांगितला. आणि 'लग्नें करावयाची तर जातीच्या बाहेरच,' हा माझा महत्त्वाचा संदेश हा संदेश ऐकून सर्व चकित होतात आणि एवढ्यात मला संतोष आहे. थोड्याच दिवसात या संदेशाचे प्रचारक आपोआप तयार होतील.

योगायोग असा की हा संदेश सांगून मी बाहेर येतो, इतक्यात अशोकराजाची पत्नी जोॲन, चि. मीलनला आणि त्याच्या दोन बहिणींना घेऊन आली. विठ्ठल कन्या विद्यालयाच्या शिक्षिकांना तिची ओळख करून दिली. या लोकांना एवढ्या क्रांतीचा प्रचार कितपत आवडला, कोण जाणे.

पण आपल्या राष्ट्राचा स्वभाव आहे की थोडे लोक दहा मैल पुढे गेले, तर सामान्य लोक निर्भयपणे दोन मैल पुढे जावयाचे.

श्रीमती ॲनी बेझंट हिंदुधर्माचा कैवार घेऊन पुढे आल्या. त्या हिंमत करून सुधारणेचा पुरस्कार किती करणार ? परिवार नियोजनाचा पुरस्कार केला म्हणून त्यांना शिक्षाही झाली होती. आज सरकार मुबलक खर्च करून स्वत: परिवार नियोजनाचा प्रचार करते. आंतरजातीय लग्ने पुष्कळ होतील पण सजातीय लग्ने, सगोत्राप्रमाणे टाळायला कोणी तयार होणार नाहीत. ते दिवस इतक्या लवकर यावयाचे नाहीत.

दिल्ली
२६–१०–७१

दक्षिणेच्या सारस्वत लोकांनी ६०–६५ वर्षांपूर्वी स्वत:च्या जातीतील पांच–सहा पोटभेद एक करण्यासाठी मोठ्या उत्साहाने एक परिषद बोलावली होती. मी त्यात भाग घेतला होता अणि जोरजोराने प्रचारही केला होता. पुढे मी क्रांतिकारी स्वातंत्र्याच्या चळवळीत शिरलो.

परवा सारस्वतांचे एक पत्र आले. त्यात पहिल्यापासून हाच सवाल की, ' पोटभेद हळूहळू मोडून एक केले पाहिजेत.' साठ वर्षांत काहीच प्रगती नाही म्हणून मी त्यांना माझा टोमणा पाठवला आणि म्हणालो. " साठ वर्षांत देशाने केवढी प्रगती केली. तुम्ही मात्र होता तिकडेच आहात."

देवाच्या घरी न्याय आहे. आजच चि, सतीशच्या एका लेखाचे कात्रण मिळाले. त्यात " सगळ्या प्रांतीय भाषांना नागरी लिपिच वापरणे इष्ट आहे, ती वैज्ञानिक आहे. सर्व भारतीय भाषांनी स्वर व्यंजन व्यवस्था एकच स्वीकारली आहे. नागरी लिपि सुधारून ती टायपराइटरला सोयीची केली पाहिजे." वगैरे सर्व गोष्टी त्यात आहेत !

मला आठवले की गुजरात सोडून, राष्ट्रभाषा हिंदीचे काम मी हाती घेतले तेव्हा भारतभर मी जोरजोराने प्रचार केला. त्या वेळी भाषा, लिपि, वर्णव्यवस्था, प्रेस, टायपराइटर, शॉर्टहॅन्ड–सगळ्या बाजूंचा अभ्यास

करून, अत्यंत व्यवहार्य सूचना देशापुढे ठेवल्या. अंमलात आणून दाखवल्या. त्या वेळी अत्यंत गोड अनुभव रवींद्रनाथ ठाकुरांनी करवला आणि चीड येण्या इतका अनुभव घरच्या नवजीवन प्रकाशन मंदिराने करवला. हिंदी-वाले, उर्दूवाले दोघांनी मिळून माझा पराभव केला. एका बाबतीत विनो-बांची प्रागतिकता आणि परागति ही मला नडली आणि आज पाहतो चि. सतीश हे सगळे प्रश्न जणू नव्यानेच हाती घेत आहे. जसे सारस्वत तसा देश !

दिल्ली
२७–१०–७१

माझी आत्मकथा आणि सन्निधि संस्थेचा विकास या दोन गोष्टींची आज बरीच चर्चा झाली. माझ्या आत्मकथेत यथेच्छ विविधता येणार आहे. पूर्व आणि पश्चिमचा संघर्षात्मक सहयोग, महाराष्ट्र, कर्नाटक, कोंकण या तीन प्रांतातून प्रारंभ करून हिमालय, बंगाल, आसाम, गुजरात, उत्तर-भारत, सिंध आणि सगळा दक्षिणअखिल भारतीय विविधता. भाषा, धर्म, निरनिराळे समाज आणि पुढे युरोप, आफ्रिका, जपान, अमेरिका—किती तरी विविधता आणि असंख्य धंद्याचे लोक भेटलेले. आज हे सगळे स्वाभा-विक वाटते. पण आमच्या काळी विविधतेचा फक्त प्रारंभच होता. त्याच्या नाविन्याची महत्ता आज कोठून येणार ?

आत्मकथा कशीही लिहिली जावो. तिचा माझ्यावर बराच खोल परिणाम होणार आणि आशा करतो की नव्या पिढीवरदेखील चांगला परिणाम होईल. आत्मकथेच्याद्वारा, नव्या पिढीला मी स्वतःचेच सर्वस्व अर्पण करणार.

आणि संस्थेच्या विकासासंबंधाने आज मी काही सांगू शकत नाही. स्वराज्य–प्राप्तीसाठी देशाला लढविण्याची तयारी करणे आणि त्याच वेळी रचनात्मक असंख्य प्रवृत्तींचा प्रारंभ करणे, हे गांधी युगालाच साधणे शक्य होते, भाषा समन्वय धर्म-संस्कृती-समन्वय—असले व्यापक प्रश्न आणि

लिपिसुधार, शीघ्रलेखन, टाइपाचे सुधार इत्यादी गोष्टीत मूलाग्राही प्रवृत्ती चालू करावयाच्या. आहार-विहार सगळ्याच गोष्टी जीवनव्यापी आणि केवळ चिंतनात चालविलेल्या गोष्टी त्याहून निराळ्या !

दिल्ली
२८-१०-७१

जपानी प्रोफेसर मिनोरु कासाई भारतात येऊन गांधीजींच्या इतिहासाविषयीच्या विचाराविषयी निबंध लिहिणार आहेत. जपानी ख्रिस्ती लोकात जे पूर्वग्रह असतात. त्याने प्रेरित होऊन न लिहिले तर उत्तम. गांधीजींच्या मनात कलियुगाचा आदर्श काय होता हे ते समजून घेऊ इच्छितात. त्यांनी निर्मलकुमार बोसची गांधींविषयीची दृष्टि सांगितली, तशी निर्मलकुमारने मांडली असेल, हे संभवत नाही. निर्मलकुमारने काय लिहिले आहे हे आता पाहिले पाहिजे. युरोपीय लोक गांधीजींचे तत्त्वज्ञान यथार्थ समजण्याचा पुरा प्रयत्न करतात तरीहि केव्हा केव्हा समजण्यात घोटाळा होतो. जपानी लोक एशियन. यांना गांधी अधिक चांगले समजण्यात येतील, अशी जगाची अपेक्षा. आता हा माणूस काय करणार कोण जाणे. पण मी अगोदरच प्रतिकूल विचार कां करावा ? आजचे संशोधक पुष्कळ माहिती गोळा करतात पण अनुमाने काढण्यात उथळपणे घाई करतात. म्हणून शंका आणि चिंता वाटते. गांधीजींच्या पूर्ण सत्यनिष्ठेविषयी भारपूर्वक सांगावे लागले. जर हा माणूस पुन्हा भेटला तर त्याची भूमिका समजून घेण्याचा प्रयत्न करीन.

देवेंद्रभाई गुप्त आज भेटले. त्यांना आणि आम्हाला अधिक जागा हवी आहे.

येथील हरिजनांना दुःखी केल्यावाचून जागा मिळावी याविषयी आपण मिळून प्रयत्न केला पाहिजे, असे मी त्यांना सांगितले. भारतीय सर्व भाषासाठी नागरी लिपीचा स्वीकार करणे, यावर ते पुष्कळ बोलले. माझा सर्व अनुभव त्यांना सांगायला मी तयार आहे.

दिल्ली
२९-१०-७१

आजकाल योगसूत्रांतील यमाविषयी चिंतन चालू आहे आणि सकाळच्या प्रार्थनेनंतर त्याचीच चर्चा करीत आहे. सत्याचे तेरा आकार, निरनिराळे दहा यम आणि आश्रमाचीं अकरा व्रतें यांचें चिंतन करता करता पू. बापूजींच्या विभूतिमत्त्वाचे चिंतन घडते. त्यामुळे सत्पुरुषाचा सहवास किती प्रेरणादायी होऊ शकतो याची कल्पना ताजी होते.

अशाप्रकारची खरीखुरी उत्तम सेवा मिळत असतानादेखील लोक ती पुढे न करता खरे खोटे चमत्कार लोकांना सांगून स्वत:च्या गुरुमहाराजांचे भक्त मंडळ वाढवू पाहतात हाच एकं मोठा दु:खदायक चमत्कार म्हटला पाहिजे.

सद्ग्रंथ श्रवण आणि महात्म्यांचा सहवास या दोन्ही गोष्टी जीवन-साधनेत अत्यंत महत्त्वाच्या आहेत. दोहोंपासून स्वत:ला काय काय मिळाले याचे सविस्तर वर्णन जर लोक प्रामाणिकपणे लिहू शकले तर निराळे चमत्कार उत्पन्न करावे लागणार नाहीत.

ही विशाल सृष्टि हाच केवढा मोठा चमत्कार ! दिक्कालचे आनंत्य हाहि सर्वांत मोठा चमत्कार ! मानवी मनाची खोली, त्यातील बऱ्या आणि वाईट गोष्टी दोन्हींची अद्भुतता मनुष्याला गुंग करून टाकण्याला पुरेशा आहेत.

आजच चि. दीपकाच्या पत्रात त्याने विश्वाच्या चमत्काराविषयी लिहिताना कोटयावधि कीटक जन्माला येतात आणि मरून जातात या चमत्काराचाहि उल्लेख केला आहे. मला याचे आश्चर्य वाटले.

सध्या मी 'परमसखा मृत्यू'चे थोडे थोडे इंग्रजी करत आहे. त्यामुळे मृत्यूचे चिंतन अखंड चालत आहे आणि त्याचमुळे चि. दीपकाच्या पत्रातील जन्ममृत्यूच्या आनंत्यावरील भाग मला महत्त्वाचा वाटला. त्याने आपल्या पत्रात या विस्ताराला 'भयंकर' म्हटले आहे. ते विशेषण मला आवडले नाही. हे आनंत्य गुंग करून टाकणारे आहे. पण भयंकर मुळीच नाही. सारी विशालता भयातीत आहे. विस्मय शब्द देखील येथे अपुरा पडतो. क्षणभर स्वत:चे जीवन किती तुच्छ आहे याची जाणीव होते आणि दुसऱ्याच क्षणी या सर्व गोष्टीचे आकलन करण्याचा वृथा प्रयत्न केल्यावाचून राहवत नाही याचा मोठेपणा पटतो.

दिल्ली
३०-१०-७१

पू. बापूजींच्या इच्छेविरुद्ध मी गुजरात सोडले ते बरोबर केले की नाही याचा विचार पुष्कळ वर्षे केला, गुजरात सोडणे अपरिहार्य होते असाच निर्णय पुष्कळ वर्षे कायम राहिला. आता मात्र वाटते की गुजरात सोडायला नको होते. विद्यापीठ सोडून कोणचेहि स्वतंत्र काम कुठेहि घेता आले असते.

मी गुजरात सोडले याचे अत्यंत वाईट वाटले नरहरिभाईंना. त्यांना शंका आली की त्यांना मोकळे वाटावे म्हणूनच मी गुजरात सोडले. आता या सर्व गोष्टी जुन्या झाल्या हा विचारदेखील आता शिळा झाला.

पण बाहेर राहून गुजरातची सेवा करण्याचे आमंत्रण मी कधीच टाळले नाही. कारण माझे हृदय गुजरातला चिकटलेलेच आहे. बापूजींनी मला 'सवाई गुजराती' म्हटले ते मला पूर्णपणे ओळखूनच.

गुजराती साहित्य परिषदेचे अधिवेशन मद्रासला आहे. सर्वांचे आग्रहाचे आमंत्रण आहे. मी ते स्वीकारलेहि आहे. त्यानंतर गुजरातच्या प्रार्थनासमाजाचे आमंत्रण विनोदिनीबेन मार्फत आले आहे. नाही म्हणण्याची मुळीच हिंमत नव्हती. पण वेडछीला हो म्हणून नंतर नाही म्हणावे लागेल याचाहि प्रभाव मनावर पडला. आता प्रार्थनासमाजासाठी एक संदेश म्हणून लेख पाठवलाच पाहिजे. तो लेख आज सगळा दिवस मनात घोळत आहे. याचे कारण प्रार्थनासमाजाशीं हृदयाने मी एकरूप आहे, हेच होय. त्या समाजाने एक अत्यंत जरूरी काम केले नाही आणि ते रचनात्मक असल्यामुळे आजहि करण जरूरी आणि शक्य आहे. हिन्दूधर्माचे तत्त्वज्ञान शुद्धरूपाने ब्रह्मसमाजाने पकडले. संतपरंपरा काही अंशी आपलीशी केली पण वर्णाश्रम व्यवस्था आणि जातिव्यवस्था यांचा फक्त इन्कार केला. हा एक दोष आणि शहरात राहणाऱ्या उच्च आणि मध्यम वर्गाचीच शुद्ध आणि सोय पाहिली. समाज जनताविमुख झाला आणि म्हणूनच निष्प्राण झाला. ही चूक आता सुधारलीच पाहिजे आणि खेडेगावात गेले पाहिजे.

दिल्ली
३१-१०-७१

कालिदास जयंतीच्या दिवशी खरोखर उज्जैनीला असले पाहिजे. (एका वर्षी गेलोहि होतो) निदान ज्याप्रमाणे रवींद्रनाथ ठाकुरांचे भक्त मधून मधून एकत्र येऊन आनंद करतात त्याचप्रमाणे कालिदास-प्रेमी अनेक भाषा-भाषी ठिकठिकाणी एकत्र आले पाहिजेत.

माझ्या सारख्याने तर बोलवतील तिकडे जाण्याऐवजी आता कित्येक कालिदास-भक्तांना आपण असू तिकडे बोलविले पाहिजे, पण मी निवृत्त झालो आहे एवढेच नव्हे तर निरुत्साहीहि झालो आहे. हे काही बरे झाले नाही. आजचा दिवस आगगाडीत घालवला. आज खरोखर समग्र कालिदास आगगाडीत वाचायला हवा होता आणि ताजा करायला हवा होता. जीवन समृद्ध झाले असते आणि नित्यनूतन कालिदासांनी नवीन संदेशहि दिला असता.

पण, 'गतं न शोच्यम् ।'

निदान श्रीमन्जींची पुस्तकें पाहिली आणि मदालसेचा 'स्मृति-संगम' चाळला. जुन्या गोष्टी सगळ्याच ताज्या करू नयेत. भूतकाळांतील सजीव भाग ताजा करावा. पण त्याला रसिक-विवेक हवा असतो.

बॉम्बेसेंट्रलवरून चि. शरदला हॉस्पिटलमध्ये भेटून मगच घरी आलो, हे चांगले झाले. ज्याप्रमाणे तपस्वी तप करून आदरणीय होतो त्याचप्रमाणे 'श' सारखी सेवापरायण लोकप्रिय डॉक्टरीण आजारी पडून आदराची अधिकारिणी होते. बडोदा स्टेशनवर अमुक मंडळी भेटण्याची अपेक्षा असते. पण मला या स्टेशनवर आल्याबरोबर पू. केशवराव देशपांडे आठवतात. नंतर अनंतबुवा मर्ढेकर आठवतात. सयाजीपुरा आठवतो. तिकडील गायी आठवतात. काकीची आठवण होणारच. आणि स्वामी आनंद देखील आश्चर्य वाटते की हे सर्व जुने कसे झाले ! इतक्या प्रिय व्यक्ति जर मला जुन्या झाल्या तर मीहि पुष्कळांना जुना झालो असेन.

जुने होणे काल-भगवानाने ठरवून टाकले आहे. त्याचे विस्मृति राज्य अनंत आहे. मी स्मरणयात्रा लिहिली ती जगाला दिली. विस्मृति यात्रा लिहीन ती मात्र काल-भगवानाच्या चरणी अर्पण करावयाची. आपण म्हणतो आत्मा कालातीत आहे पण जगदेखील कालातीत होऊन जाते. एकदा कालेलकर शब्दातून हे तत्त्वज्ञान काढण्याची इच्छा झाली.

[illegible] ठाणे. [illegible]
[illegible] .................... दि. ..........
[illegible] ....................

## नोव्हेंबर

मुंबई
१-११-७१

अपेक्षेप्रमाणे कुमारी मारीय लुईस येऊन भेटली. आश्चर्यचकित होऊन मला विचारू लागली, " हे खरे की काय की जैन लोक देवाला मानत नाहीत ?" मी म्हणालो, " यात आश्चर्य कसले ? खरे खुरे बौद्ध तर देवालाही मानीत नाहीत आणि आत्म्यालाही मानीत नाहीत. (तिचा बौद्ध लोकांशी बराच संबंध आला आहे, पण ते महायानी आहेत हे सर्व मला

माहीत होते.) स्वत: गौतम बुद्ध देवाला आणि आत्म्याला मानीत नसत. उलट आत्म्याला न मानणे त्यांच्या धर्माच्या पायातच आहे. पुढे मारी लुईसला सांगितले की तुम्ही लोक दार्शनिक चर्चा घेऊन आपापसात भांडता आणि एकमेकांना नास्तिक, पापी म्हणता. आम्हाला तुमचे हसू येते. सर्वांचा अंतिम अनुभव सारखाच असतो. भेद असतो दार्शनिक दृष्टीमध्ये आणि व्याख्येमुळे पुढे तिला मी सांगितले की जगात अज्ञान आहे हे खरे ना ? हे अज्ञान कोणी केले ? देवाने ? आपल्या जीवनात देवाने प्रवेश केला त्या पूर्वी तेथे अज्ञान होते. मग ती जागा देवाने भरून काढली. अतएव देवापेक्षा अज्ञान व्यापक, श्रेष्ठ म्हणावे ज्येष्ठ, तर खरेच.

आम्ही साधनेच्याद्वारा अंतिम सत्य मिळवले आहे. आम्हाला या तात्त्विक चर्चा खेळ वाटतात. आम्ही ज्याला आत्मा म्हणतो त्याला बौद्ध लोक ओळखतात, पण त्याला 'संखार-समुच्चय' म्हणतात, म्हणोत बिचारे.

या सर्व गोष्टी जशा मी समजावून सांगितल्या तशा त्या तिला समजल्या. पण त्या भूमिकेवर ती नसल्यामुळे तिला रहस्य समजले नाही. तेव्हा मी तिला म्हणालो, "मी तुला सर्वोच्च अनुभवाची पुसट कल्पना देतो. पण तुला ती झेपत नाही, त्याला काय करणार ? हा चर्चेचा विषय नाही. एका मनुष्याला आपला अनुभव दुसऱ्याला देणे अशक्य नाही. पण त्या भूमिकेवर पोहोचण्याची, घेणाऱ्याची शक्ति पाहिजे. ईश्वरावरील माझा विश्वास तात्त्विक नसून आनुभविक आहे."

नंतर तिने प्रार्थनेचा प्रश्न छेडला. मी म्हणालो, प्रार्थनेचा स्थूल अर्थ आहे 'मागणे' आणि देणे घेणे. पण सर्वोच्च भूमिकेवर पोहोचल्यानंतर एक प्रार्थना अखंड चालत असते. तिचे स्वरूप होते आनंद अनुभवित राहणे.

मुंबई

२-११-७१

'वैदिक ऋषि, निरनिराळे धर्मसंस्थापक आणि अवतारी पुरुष सर्वज्ञ होते, त्रिकालज्ञ होते असे मानून चालले पाहिजे.' या आग्रहामुळे त्यांची

वचने आणि त्यांचे ग्रंथ सर्वकाळी मान्य केले पाहिजेत, हा आग्रह उत्पन्न झाला. धर्माच्या रूढी अपरिवर्तनशील झाल्या. हा दोष स्पष्ट असून लोकांना पटत नाही. अशा वेळी आदर्श गुरुची कल्पना करून त्याच्या आज्ञेप्रमाणे स्वतःचे जीवन चालवणारा पंथ जगात सर्वत्र पसरला आहे. 'गुरूसाक्षात् परब्रह्म' असे समीकरण केले जाते आणि नंतर गुरुचा औरस मुलगा किंवा गुरुच्या गादीवर बसणारा मान्य शिष्य यालाही सर्वज्ञ मानून (किंवा धरून चालून) त्याची आज्ञाअध्यात्म क्षेत्रात (किंवा सर्वच क्षेत्रात) मान्य करण्याचा प्रघात पुष्कळ ठिकाणी चालू आहे. ही भूमिका सत्याधारित किंवा अनुभव-सिद्ध नसूनही स्वीकारली प्रचारली जाते.

या लोकांनी शीखधर्मापासून काय बोध घ्यावा ? दहा गुरूंची परंपरा ते अजून स्वीकारतात आणि ग्रंथसाहेब हाच नंतरचा कायमचा अकरावा गुरु मानतात. याचा अर्थ असा की हे लोक अनुभवाने शहाणे होण्याची संधी त्यांच्यावर लादली गेली तरी त्यांनी तिचा अव्हेर केला आणि दुहेरी रूढीला ते चिकटले, गुरुभक्ती आणि ग्रंथभक्ती; त्याबरोबर पंथनिष्ठा. तिन्ही त्यांना चिकटल्या

श्रद्धा, निष्ठा आणि भक्ती या भावनांची शक्ती अत्यंत आहे. पण अमर्याद नाही. बुद्धीच्याही अतीत आहे असे म्हणून श्रद्धेचे माहात्म्य वाढवले जाते. तर्काची, न्यायाची आणि बुद्धीची कसोटी अपुरी असेल पण अनु-भवाची कसोटी तर मान्य केली पाहिजे. पण लोक काल्पनिक अनुभव, सांगोवांगीचा अनुभव पुढे करतात. चमत्काराचा आश्रय घेतात आणि सत्य-निष्ठेला दगा देतात.

सगळ्याच धर्मात हे खूळ शिरले आहे. जो धर्म हे खूळ मान्य करणार नाही त्याला अनुयायी मिळणार नाहीत. त्याने कोरेच रहावे. ही आहे स्थिती. यामुळे प्रथम विज्ञानवादी धर्म सोडून बाहेर पडले. बुद्धिवादी त्यांच्या मागोमाग चालले. दोहोंचा पंथ वाढला. पण अजूनही धर्म सत्यनिष्ठ, प्रयोगनिष्ठ आणि अनुभवनिष्ठ होत नाहीत याला काय करावे ?

मुंबई
३-११-७१

श्री ऋषभदास रांका हे जुने समाजसेवक आहेत. जैन समाजातील व्यर्थ माजलेले अनेक सांप्रदाय दूर करण्यासाठी सतत प्रयत्न करीत असतात. आज पंचवीस वर्षे सतत काम केल्यानंतर जैन समाजातील दोष दूर करण्यासाठी आता तपस्या करू पाहतात. त्यांच्याशी थोडा पत्रव्यवहार झाला होता. त्या बाबतीत त्यांचे स्पष्टीकरण ऐकावयाचे होते. समाज शुद्धीचा प्रारंभ आत्मशुद्धीतून झाला पाहिजे यात शंका नाही. आत्मशुद्धीचा प्रभाव चांगला पडतो पण तिचीदेखील आंतरिक मर्यादा असते. उपवास करून समाजात जागृती आणण्याच्या प्रयत्नाला विशेष मर्यादेपर्यंतच फळ मिळणार, पुढे जग स्तंभित होते. मग काय करावे हेच त्याला सुचत नाही.

कित्येक गोष्टी लोकांना अनुभवानेच समजाव्या लागतात आणि तोही अनुभव एकदा येऊन भागत नाही. अशा स्थितीत आपण आपले कार्य वाढवत रहावे. पुढे काळ अनुकूल झाला म्हणजे पुढचे पाऊल टाकता येते.

पण मनुष्याने धीर तरी किती धरावयाचा ? केव्हा केव्हा समाजाला खडबडून जागे करावे लागते. अहिंसक लोक त्या मार्गानेच जागृती अणणार.

मला सांगायचे होते की अहिंसाधर्माचे पालन आणि प्रयोग परंपरे-प्रमाणे जैन समाज करत राहो, या समाजात गृहस्थाश्रमीच सेवा आणि प्रगती करू शकतात. साधु लोक सर्वस्वाचा त्याग करतील पण अहंतेचा त्याग करू शकत नाहीत. 'मम'ता सोडल्याने 'अहं'ता जोराने वाढते त्याला ते काय करणार ? साधु लोकांकडून प्रेरणा घ्यावी; पण सेवासंस्थेत त्यांना घेऊ नये. ते नाहक नडतात.

आजच्या युगात अहिंसक जीवन संस्कृतीचा जगभर प्रचार केला पाहिजे. यासाठी स्वदेशाबाहेर जाऊ शकतील असे मिशनरी लोक तयार पाहिजेत.

ख्रिस्ती मिशनरी बरे वाईट मिळून जगभर काम करतात. तसे लोक आपल्याकडे तयार झाले पाहिजेत. त्यांच्या दोषाचे अनुकरण टाळावे पण मिशनरीवर्ग तयार केलाच पाहिजे. जैन लोक करतील ?

मुंबई
४–११–७१

आजचा दिवस अप्पा पटवर्धनाचा जन्मदिवस. त्यांच्या 'जीवन यात्रे'च्या प्रकाशनाचा दिवस, तेव्हा त्यांचे चिंतनच आज मुख्य होते. अप्पा-मध्ये विद्वत्ता आणि ध्येयनिष्ठ खऱ्या. पण वास्तववाद आणि विनोदही कमी नाही. पण सर्वात प्रभावी त्यांची सत्यनिष्ठा–आत्मनिष्ठा.

अप्पा हे मामा फडक्यांचे नातेवाईक. सेवापरायण आणि मोकळ्या मनाचे त्यामुळे त्यांच्याशी दोस्ती सहज झाली आणि आता ध्यानात येते की त्यांची मातृभक्ती हेही माझ्यासाठी मोठे आकर्षण. त्यांच्या भावांमध्ये 'करीयर' होती. त्यांनाही ती साधली असती. पण अप्पांना जीवनाचा सदुपयोग करावयाचा होता आणि म्हणूनच कोणाचीही 'करीयर' सोडून देणे त्यांना मुळीच कठिण जात नव्हते.

माझ्या मनात एक शंका नेहमी उठत असते. काही केल्या दबली जात नाही. ती ही की पूर्ण सत्यनिष्ठ मनुष्य उत्तम साहित्यिक होऊ शकेल का ? साहित्यिकामध्ये काव्यवृत्ती असते. जे गोड दिसेल, गोड ठरेल, छाप पाडू शकेल तेच खरे असले पाहिजे, अशी अपेक्षा साहित्यिक मनोवृत्तीत असतेच. या मनोवृत्तीबरोबर ध्येयनिष्ठा आणि आदर्शनिष्ठा उत्तम नांदू शकतात. पण जेव्हा सत्यनिष्ठा तथ्यनिष्ठेला अधिक महत्त्व देते आणि वास्तववादाच्या आहारी जाते, तेव्हा काव्यमयवृत्ती बाधक वाटू लागते. आदर्शवाद पोकळ ठरले की काय, अशी भीती वाटू लागत. आणि मग विचारातील आणि भाषेतील काव्यमयता दगा देईल की काय अशी शंका पुनः पुनः घेरते.

मला वाटते सत्यनिष्ठा म्हणजे loyalty to truth आणि तथ्यनिष्ठा म्हणजे loyalty of facts. यामध्ये सूक्ष्म फरक करता आला तरच मनुष्य वाचतो. नाही तर जीवनातील एक अत्यंत सुंदर आणि शुभ वस्तु हातची निसटते.

मुंबई
५-११-७१

चंद्रकांत केणी पुष्कळ दिवसांनी भेटले. "गोव्याचे महाराष्ट्रात विलिनीकरण होऊ नये आणि कोंकणीला मान्यता मिळावी—या दोन गोष्टीत आमचा विजय झाला आणि आमची भूमिका बांदोडकरनी स्वीकारली त्याचा संतोष मानला पाहिजे." वगैरे सांगून चंद्रकांतनी गोव्याच्या हल्लीच्या परिस्थितीचे सांगोपांग चित्र माझ्यापुढे उभे केले. सर्व बाजूने आणि व्यापक दृष्टीने ते चित्र मला महत्त्वाचे वाटले. आता यापुढील गोव्या समोरचे प्रश्न समजून घेऊन पुढचे मार्गदर्शन हवे आहे. 'राष्ट्रमत'साठी एक मुलाखत हवी आहे. "प्रश्न विचारून रवींद्र तुमच्याकडून मुलाखत घेतील. ती आम्हाला उपयोगी होईल." असे चंद्रकांतचे म्हणणे. मी पुष्कळ चिंतन केले. आणखीही माहिती मिळवीन आणि आशा आहे की गोव्याला उपयोगी असे काही सांगू शकेन. गोव्याची स्थिती आमूलाग्र बदलली आहे याची खात्री झाली आणि म्हणूनच माझे डोके चालेल अशी आशा आहे.

कनूभाई व्होरा भेटून गेले. 'वृद्धावस्थेचे अनुभव' या विषयावर पत्रें लिहून प्रश्न छेडतील त्यांची उत्तरे द्यावी. 'परम सखा मृत्यू' प्रमाणेच उपयोगी पुस्तक होईल, असा त्यांना विश्वास वाटतो. हल्ली हल्ली वृद्धावस्थेविषयीदेखील मी थोडे लिहिले आहे. वृद्धावस्था म्हणजे मनुष्यजीवनाचा उतरता काळ ही भुमिका मला मान्य नाही. परिपक्व विचारात जोमही येऊ शकतो. आणि दीर्घ अनुभव-मूलक नवसर्जनाची नवीनता आणि मौलिकता त्यात आल्याच पाहिजेत. या भूमिकेवरून कनूभाईंना पुष्कळ देऊ शकेन असे वाटते—कनूभाईंना म्हणजे नव्या पिढीला.

रामभाऊंनी आपल्या भाषणात 'सुरेंद्रजी मुक्त आणि विनोबा युक्त आहेत' हा विनोबांचा अभिप्राय सांगितला.

मुंबई
६-११-७१

आता मला माझ्या भविष्याचा कार्यक्रम नक्की केलाच पाहिजे. आता

यापुढे चालढकल चालायची नाही. पहिली गोष्ट–दोनच स्थाने पसंत केली पाहिजेत. दोन्ही ठिकाणी जरूरीची सर्व पुस्तके आणि लेखन वाचन यांची सोय केली पाहिजे. लोक भेटावयाला येणारच. त्यांना वेळ दिला पाहिजे. स्थानाचे नक्की झाल्यानंतर किती महिने, किंवा केव्हा केव्हा एका ठिकाणी रहावयाचे आणि केव्हा दुसऱ्या ठिकाणी हेही कायमचे नक्की करून, त्याप्रमाणे जाहीर केले पाहिजे. एक-दोन आठवडे मागेपुढे करण्याची सूट असणारच या दोन स्थानांपैकी एक तर दिल्ली असणारच आणि आज तर वाटते की दुसरे स्थळ मुंबईच होईल. पुढे ईश्वर जाणे.

देशाची स्थिती बदलत बदलत अशा भूमिकेवर आली आहे की आता नव्या काळाला अनुसरून समाजाच्या सोयीप्रमाणे, अमुक व्यवस्था स्थायीपणे चालवलीच पाहिजे. सार्वजनिक जीवन लटकते आणि अनिश्चित राहूच शकणार नाही.

तर मग बदललेल्या परिस्थितीत नवी समाजव्यवस्था कशी चालू करता येईल याविषयी एक लेखमालाच चालवली पाहिजे आणि ती सर्व मान्य झाली पाहिजे.

असे जर करता आले तर ती या पिढीची उत्तम सेवा होईल. नव्या युगाची ती एक स्मृतीच होईल. पण तसे रूप मात्र टाळले पाहिजे.

समाजच सर्वोपरी असणार, असे म्हणणाऱ्या युगात व्यक्तिस्वातंत्र्य सांभाळले जाईल याची काळजी घेऊन, यापुढची समाजव्यवस्था ठरवावी लागेल. आश्रमवाल्यांनीच हे काम केले पाहिजे.

मुंबई

७–११–७१

मिचिको नाकादा आपल्या ओळखीच्या दोन जपान्यांना घेऊन आली. त्यापैकी केइको ही 'निर्मला निकेतन'मध्ये Social Service या विषयासाठी राहिली आहे आणि दुसरा प्रो. हिरोशी मोचिझुकी, भारताचा अनुभव घेणार आहे. या लोकांनी हिंदुधर्म, बौद्धधर्म, गांधीजी वगैरे विषयी अनेक

प्रश्न विचारले. हल्लीच्या चालू दृष्टीहून भिन्न दृष्टीने मी उत्तरे दिली, ती त्यांना विचारणीय वाटली. जगात यापुढे स्त्री जातीचे नेतृत्त्व होऊ शकेल ही गोष्ट मात्र त्यांना पटणे शक्य नव्हते. मी मनात म्हणालो, गेल्या पन्नास वर्षांत जपानने युद्धमानस मजबूत केले आहे. त्याचा प्रभाव या पिढीत तरी पूर्णपणे उतरणार नाही. तो उतरावा या हेतूने मी जपानशी सख्य जोडले आहे. पण कदाचित् एका पिढीत आपण जे पेरतो ते दुसऱ्या पिढीत उगवणार असेल.

रामभाऊ म्हसकर सोलापूरकडील एका चित्रकला (drawing) शिक्षिकेला सरलाबाई केशकामतना घेऊन आले. या बाई मुसलमानी शाळेत शिकवतात. भारतातील मुसलमानांची मनोवृत्ती आणि त्यांची नीति याविषयी चर्चा झाली. पण त्यातून काहीच निघण्याजोगे नव्हते.

आज मुरलीधर घाटे आणि सरस्वती येऊन भेटले. गांधींनी सुचवलेल्या सार्वजनिक कामात मुरलीधर आज चाळीस वर्षे वावरत आहेत. ते काही कल्पनातरंगी माणूस नाहीत. ध्येयनिष्ठा मजबूत आणि व्यवहारी दुनियेचा भक्कम अनुभव. यांचा अनुभव आणि यांचे विचार मला नेहमीच महत्त्वाचे वाटले आहेत. म्हणून यांचे तोंडून सगळा अनुभव पुऱ्या आस्थेने मी ऐकून घेतो. हे निराश नाहीत, हे मला आवडले.

मुंबई
८-११-७१

मी आजकाल सांगत असतो की 'अहिंसाप्रधान संस्कृति सुरू झाली आणि राज्यशासन वितळत गेले म्हणजे समाजाचे नेतृत्त्व स्त्रियांना करावे लागेल. आणि मग ज्याप्रमाणे आज पुरुष सांगतात तशा स्त्रिया वागतात, त्याच्या उलट स्थिति होईल. स्त्रियांनी सांगावे आणि पुरुषांनी एकावे असे दिवस येतील.

यावर स्त्रियाचा विश्वास बसत नाही, हे मला ठाऊक आहे. पण ऐकून घ्यायला आपले काय जाते' असे म्हणून त्या ऐकतात. त्यांना वाटते, 'यांत आपली स्तुतिच आहे, ऐकू या.'

हा झाला नेहमीचा अनुभव. काही मुलींनी मला हिंमतपूर्वक जबाब दिला: "पुरुषाचे राज्य हा अन्यायच होता. याचा सूड म्हणून स्त्रीराज्य रूपी दुसरा अन्याय आम्ही काय म्हणून चालवावा ? आम्ही म्हणू की स्त्री आणि पुरुष दोघांनी मिळून विचार करावा. विचार विनिमयाने ठरेल त्याप्रमाणे राज्य् चालावे. तेच आम्ही पसंत करू."

ही शुद्ध दृष्टि आहे. हिचा विरोध करणे शक्य नव्हते.

काल जपानी मुली म्हणाल्या, 'स्वत:चे राज्य चालवणे स्त्रीच्या स्वभावातच नाही. तुम्ही वाटेल ते म्हणा, स्त्रिया पुरुषांच्या मागोमागच जाणार." मी मनात म्हणालो. 'जपानी संस्कृति सध्यातरी युद्ध परायण आहे. त्यामुळेच या मुली असे म्हणतात'.

पण कालपासून विचार करतो आहे, पुरुष कधी स्त्री राज्य मान्य करतील ? सोपे नाही. पुरुष डोक्यात राख घालतील, जीवन उध्वस्त करतील, पण कोणाची 'बायको' होणार नाहीत.

पण मन म्हणते "जो गुलामी सहन करतो, दास म्हणून राहतो, त्याच्यात 'बायकी स्वभाव' असतोच.

पण मी स्त्री राज्याची गोष्ट करीतच नाही. राज्याधिकार स्त्री-पुरुषांचे समसमान असावेत कुटुंब, समाज आणि राज्ये दोघांनी मिळून चालवावीत. पण नेतृत्व स्त्री जातीचे किंवा स्त्री-मानसाचे असावे. मानवी-संस्कृति स्त्री-मानस प्रेरित, अहिंसा मूलक, समन्वयवादी असावी.

मुंबई
९-११-७१

मिरजेचे वैद्य करमकर खास येऊन भेटले. नाडी पाहून त्यांनी सांगितले की शरीरातून मेंदूला पुरेसे पोषण मिळत नाही, तेव्हा पाचनशक्ति वाढवली पाहिजे. दुसरी गोष्ट त्यांनी सांगितली की वारंवार लघवीला जावे लागते, त्याचा इलाज लघवी कमी करणे, हा नसून लघवीचे तंत्र सुधारणे हे आहे. यासाठी त्यांनी सोपा उपाय सांगितला. रोज सकाळी एक चमचा

मध थंड पाण्यावरोबर घ्या. हळूहळू लघवीचे तंत्र आपोआप सुधारेल." हा उपाय करून पाहण्याजोगा वाटला. चालू असलेल्या इलाजात त्यामुळे व्यत्यय येणार नाही.

वैद्य म्हणाले "तुमच्यासाठी औषध मिरजेला गेल्यावर तयार करून पाठवून देईन. पांच-सात दिवस लागतील. एक महिना औषध घेऊन पहा."

मेंदूला पोषण कमी मिळते मला कधीच वाटले नव्हते. यापूर्वी एका वैद्याने असेच सांगितले होते की मेंदूला कमी पोषण मिळत असल्याने भोंवळ येते. त्याचेहि मला काही वाटले नव्हते. पण आता वाटते की स्मरणशक्ति शिथिल झाली आहे त्याचे हे एक कारण असावे. स्मरणशक्ति कमी झाल्याचे वैद्यांना सांगतो तेव्हा तिकडे त्यांचे लक्ष जात नाही. आज मलाच वाटू लागले.

वैद्य लोक म्हणतात स्मरणशक्तीला पोषक वस्तु बदाम आहे. याचा प्रयोग करून पहावयाला पाहिजे. वैद्यांना हेहि विचारले पाहिजे की काजूचा खास उपयोग काय आहे ? मुरटयासारखे फळ येथे मिळतच नाही. पण बदामाच्या ऐवजी काजू घेतले तर काही लाभ होईल का ? काजूचे गुणधर्म काय आहेत ?

मुंबई
१०-११-७१

गोरक्षेच्या कामालाच वाहून घेतलेल्या श्री. शिवाभाई पटेलांचे पत्र आल्यामुळे गोवंशाच्या प्रश्नाचे आज पुन्हा एकदा चिंतन झाले. आपल्या समाजाची या बाबतीतील धर्मदृष्टि बरीच मागासलेली आहे. तेव्हा तिला अद्यतन केले पाहिजे या भूमिकेवरून आज 'मंगलप्रभात'साठी एक अग्रलेख लिहिला. गोवंशाची हत्त्या होता कामा नये, हे मान्य केल्यानंतर गोवंशाची अमर्याद उत्पत्तिहि काबूत आणली पाहिजे. दूध न देणाऱ्या गाईला अर्धपोटी खाऊ घालून लवकर मरू देतात आणि यात अधर्म मानीत नाहीत. यापेक्षा त्यांना नांगर चालवणे, मोट चालवणे आणि गाडा ओढणे– यांना जुंपले,

पोटभर खाऊ दिले आणि संतति नियमन केले, तर त्यांत खरा धर्म आहे. धर्म शुद्ध आणि डोळस, असल्यास ज्ञान आणि विज्ञानाला धरून चालतो. जडता मात्र अज्ञान आणि जुन्या परंपरेला पोषण देते आणि म्हणून ती अधार्मिक असते. या गोष्टीचा प्रचार वाढवला पाहिजे, गोवंश सुधारणे हेहि धर्माचेच काम आहे

आज अकस्मात् सिंधी मुलगी मोहिनी येऊन भेटली. आता ती अडवाणी नसून मनसुखानी झाली आहे. सिंधी भाषेसाठी भारतातील सिंधी हिंदूंनी नागरी लिपि चालवावी या चळवळीला माझे प्रोत्साहन आहेच. मी भोपाळला जाणार नाही, पण लेख पाठवला आहे. 'नागरी लिपीचा आग्रह धरणारे हिंदुसभावाले आहेत,' अशी चळवळ चालली आहे आणि सिंधीवर लादलेली अरबी लिपीच आमची खरी लिपि आहे, असे म्हणारा पक्ष जोर करीत आहे. ज्यांना इंग्रजी भाषा आणि लिपि यांच्याद्वाराच भारतीय एकता हवी त्यांना नागरी लिपिद्वारा थोडीशी एकता आलेली देखील नको आहे. त्यांचा जोराने विरोध झाला पाहिजे.

मुंबई
११-११-७१

महादेवभाईंच्या डायरीमध्ये जेथे जेथे माझा उल्लेख आला आहे, तो वेगळा लिहून काढून कुसुमने मला वाचायला दिला, तेव्हा वाटले माझा उल्लेख गौण आहे पण महादेवभाईंची डायरी मात्र सगळी वाचली पाहिजे. नाही तर बापूजीविषयीचे माझे ज्ञान अपुरे आहे असेच मला वाटेल.

राजाजींनी पू. बापूजींचा सिलोनचा प्रवास ठरवला. त्यात मीही त्यांच्याबरोबर गेलो. त्या प्रवासाचा उल्लेख माझ्या लिखाणात थोडासा आहे, पण महादेवभाईंच्या डायरीतील भाग त्याहून महत्त्वाचा आहे. लंकेतील धर्मस्थाने आम्ही पाहिली. बौद्ध मंदिरे आणि संस्था पाहिल्या बऱ्याच बौद्धांशी मी चर्चा केली. हे सगळे अत्यंत महत्त्वाचे होते. पण बौद्ध साधूंनी जेव्हा पाहिले की मला बौद्धधर्म साहित्याचा परिचय आहे त्या धर्माचा मी

भक्त आहे आहे आणि त्यांच्या भूमिकेवर जाऊन मी धर्मचर्चाही करू शकतो तेव्हा मी आपलाच माणूस आहे अशी त्यांची खात्री झाली आणि मग माझ्या तोंडून बौद्ध परिभाषेत गांधी विचार समजून घेताना त्यांच्या भावनेत प्रतिकूलता उरली नाही. ते प्रसन्नपणे मधून मधून म्हणावयाचे "हां, आता आम्हाला बरोबर समजले. गांधी सिद्धांताचे रहस्य आता ध्यानात आले. आता आम्ही याचा प्रचार अनुकूलतेने करू शकू."

लहानशा प्रवासातील माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या या सेवेचे पुष्कळ महत्त्व होते. त्यानंतर जर मी पुन्हा लंकेला गेलो असतो तर पुष्कळ काम करू शकलो असतो.

मुंबई
१२-११-७१

मारी लुईस आजकाल रोज येते. वेद, वेदांत आणि हिंदुधर्माविषयी स्वत चे अभिप्राय सांगते, माहिती विचारते आणि बेताचा वेळ घेऊन वेळे-वर जाते. आजवर तिने ख्रिस्तीधर्म आणि बौद्धधर्म---या दोहोंविषयीच वाचले, ऐकले आणि माहिती घेतली. आता तिला हिंदु धर्माचे सिद्धांत श्रेष्ठ वाटू लागले आहेत आणि हिंदु लोक पश्चिमेच्या मागे लागून स्वतःचा धर्म विसरतात, याची चीड ती व्यक्त करते. तिला मी हिंदुधर्मातील आणि समाज व्यवस्थेतील श्रेष्ठ तत्त्वेही समजावून सांगतो आणि आमचे दोषही समजाविण्याचा प्रयत्न करतो. कारण मला सर्व-धर्मसमभावाचे वातावरण उत्पन्न करावयाचे आहे. समभाव पटल्यानंतर ममभाव पटायला वेळ लाग-णार नाही. वेदांतून उपनिषद आणि उपनिषदांमधून म्हणजेच वेदांतामधून गीता निघाली आणि वेदांत व गीता यांच्यामधूनच बौद्धधर्म आणि जैन धर्माचे फाटे फुटले, हे मी समजावून सांगतो.

उद्या तिला ब्रह्मसूत्र आणि गीतेविषयी सांगणार. कोण जाणे कसल्या कसल्या लोकांना ती भेटून येते आणि जोराजोराने स्वतःचे अभिप्राय व्यक्त करते. तिला पुष्कळ गोष्टी समजावल्या पाहिजेत.

रामभाऊ म्हसकर सहज आले होते. त्यांना मी भारतातील सर्व भाषांसाठी एक नागरी लिपी चालविण्याच्या आपल्या प्रयत्नातील खाचखळगे समजावून सांगितले आणि काय काय तयारी केली पाहिजे हेही सांगितले. तसे न केले तर तोही नागरीचा एक पंथ होऊन राहील हेही खूप आस्थेने समजावले. त्यांना बऱ्याच गोष्टी पटल्या.

मुंबई
१३-११-७१

फिरोजा वकीलच्या बरोबर सिल्लाबेन आली होती.

ईश्वराच्या घरी सर्व काही प्रारंभीच ठरलेले आहे या विचाराचा माझा विरोध तिला समजावून सांगितला.

माझ्या म्हणण्याचा विरोध करण्याची इच्छा तिला झाली नाही, तेव्हा मी विचारले, " माझे म्हणणे पटते का ?" सिल्लाबेनने ईश्वराची व्याख्या पुढे केली. " मानवी अनुभवावरून ईश्वराला राज्यकर्ता मानतात". त्या व्याख्येतील दोष मी दाखवला. पुढे तिने प्रकृती आणि पुरुष यांचे दर्शन पुढे करून समाधीस्थितीचे स्वरूप माझ्यापुढे मांडले.

गोष्ट अशी आहे की या लोकांनी पुष्कळ वाचले आहे. त्यांतून स्वत: स्वीकारलेल्या भूमिकेचे समर्थन ते करतात. मुक्त मनाने नवे विचार स्वीकारण्याची शक्ती यांच्यात नसते, त्यामुळे समजण्याची शक्तीदेखील बोथट झालेली असते.

पूर्वीचे शास्त्री पंडित शास्त्रवचनांना मानण्याला बांधलेले आणि हे नवे लोक स्वत:ची नवी भूमिका पकडून बसलेले. पंडितापेक्षा हे बरे. सत्याच्या शोधाच्या बाबतीत दोघांच्या मार्गात सारख्याच अडचणी आहेत. एवढे बरे आहे की अशा मतभेदामुळे सामाजिक संबंधात बिघाड होत नाही. आणि दु:खाची गोष्ट ही की सामान्य जनतेची भूमिका दुर्दैवी रूढीच्या बाहेर येतच नाही.

शुद्ध जीवन-दर्शनाला अनुकूल जीवनव्यवस्था चालवणे अपरिहार्य

आहे आणि तेच मानवीसमाज आजवर टाळत आला आहे. एका रीतीने हे बरेच आहे. नाहीतर एवढ्यावरून रक्तपात झाले असते.

संध्याकाळी चि. दीपकला इस्पितळात भेटून आलो. बरे वाटले.

मुंबई

१४–११–७१

चार वेदांच्या वीस हजार मंत्रांपैकी जवळ जवळ तीनशे मंत्र पसंत करून, वेदकाळातील संस्कृतीची काव्यमय आणि पुरुषार्थ प्रेरक कल्पना देण्याचे काम डॉ. अविनाशचंद्र बसु यांनी " The Call of the Vedas" या पुस्तकात केले आहे. श्री. मुनशींच्या भारतीय विद्याभवनाने हे पुस्तक प्रकाशित करून चार रुपयात देण्याची सोय केली आहे. पंधरा वर्षांत तीन आवृत्त्या झाल्या म्हणजे पुस्तक लोकप्रिय झाले आहे. मारी लुईसने आज ते आणून दिले. आता ते सगळे वाचून काढणार.

या तीनशे मंत्रांपैकी जवळ जवळ शंभर मंत्र माझ्या परिचयाचे आहेत. त्यामुळे अध्ययन सोपे होईल.

वेदांचे अध्ययन यापूर्वी अनेक वेळा सुरू केले. पण उपनिषदांमध्ये जी गोडी वाटली आणि एक निश्चित वातावरण मिळाले, तसे वेदांमध्ये मिळेना. उपनिषदांचा जन्मच वेदातून. त्यामुळे तिकडील भव्यता वेदात आहेच. पण सर्वसामान्य वातावरण एक चित्र देईना. त्यामुळे मी ते ठेवून दिले होते.

माझी दुसरी अडचण होती, आर्यसमाजी प्रवृत्तीची. ते लोक आपल्या मनातील अर्थ वेदातून काढून दाखवतात. पश्चिमेचे लोक वेदातील कल्पना primitive आहेत, असे धरून भाषांतर करतात. दोन्ही मला आवडत नव्हते. पण वेदातील शब्द, वेदाचे व्याकरण त्यांचा मौलिक अभ्यास करण्याची तयारी नव्हती. आजही नाही. तरी पण आता प्रारंभ करणारच. आजवरचे सामान्य ज्ञान आणि सर्व अध्ययन मदत करील. तेवढ्यावरच सुरू करणार.

मुंबई
१५-११-७१

नुकताच मी शिवाभाई पटेलशी गोरक्षेविषयी सविस्तर बोललो होतो. त्यानंतर 'मंगल प्रभात'मध्ये अग्रलेखहि लिहिला. आज जयदयाल दालमियांचे एक पत्र आले आहे. केवळ हिंदूंच्या लोकसंख्येच्या जोरावर सरकारवर दबाव आणून काही होणार नाही. कित्येक सांस्कृतिक आकांक्षा व्यापक असूनही नपुंसक असतात. वेदकाळी ब्राह्मण घोड्यांचे आणि बैलांचे यज्ञ करीत. कित्येक गोमांसहि खात. तरीहि तेव्हापासून 'गाईला मारू नये' ही भावना आहे. आर्यांचे किंवा हिंदूंचे राज्य होते तेव्हा आपण गायी मारू दिल्या नाहीत. पण त्यांच्यासाठी काही केले नाही आणि गोरक्षेचा प्रचारहि जगात केला नाही. पठाण मुगलाचे राज्य झाले तेव्हा आजच्यापेक्षा हिंदूंचे बहुमत प्रचंड होते. कित्येक मुसलमान राजे गोरक्षेला अनुकूलहि होते. पण हिंदु बहुमत निष्प्राण होते. आज, केवळ हिंदूंच्या जोरावर स्वराज्य झाले नाही. ते शक्यहि नव्हते. आज भारतसरकार गोहत्येला अनुकूल झाले आहे, त्याच्यामागे गैरहिंदूंचा जोर नाही. हिंदुसभेचे नेते सावरकरांनी हिंदूंना सांगितले. "गाय एक जनावर आहे. ती माताहि नव्हे आणि देवीहि नव्हे. इतर जनावरे तशी गाय. हिंदूंनी हिंदु राज्य करावे, पण गाईचा आग्रह सोडून द्यावा." पुष्कळ हिंदूमध्ये गाईचा आग्रह उरला नाही. इलेक्शनमध्ये देखील गाईच्या प्रश्नाला महत्त्व उरले नाही. मिशनरी ज्याप्रमाणे जगभर ख्रिस्ताचा प्रचार करतात तशा पद्धतीने जगभर गोरक्षेचा प्रचार चालवला पाहिजे. यासाठी माणसे आणि पैसे मिळतील का ? खरी कसोटी येथे आहे.

मुंबई
१६-११-७१

तिम्माप्पा नाईकांच्या पत्रात उठवलेल्या प्रश्नांचे उत्तर सविस्तर लिहून काढले. सामान्य नीतिमत्तेचा पाया सामाजिक म्हणजे द्वैतमूलक

असतो आणि आध्यात्मिक सिद्धी मिळवलेल्या लोकांच्या जीवनाचा पाया अद्वैतमूलक असतो, हे समजले तर अरविंद घोषांची भूमिका पटू शकेल. त्या मार्गातील संकटे स्पष्ट आहेत. पण त्या मार्गाचा इंकार करणे शक्य नाही. खाकेत कोणी गुदगुल्या केल्या तर गुदगुल्या खात्रीने होतात. पण स्वतःच्या हाताने केल्या तर मुळीच होत नाहीत. या उदाहरणावरून अद्वैत भूमिका पटू शकेल. गुदगुल्या न होणे आणि निर्विकारी होणे यांच्यातील साम्य समजले पाहिजे आणि पटले पाहिजे.

पत्रात स्पष्ट केले आहे तरीहि एक दोन लेख लिहिलेच पाहिजेत आणि तेहि सविस्तर.

आज उजवा हात दुखतो. म्हणून डॉ. xx कडे जाऊन आलो. फी तीस रुपये, औषधाचे अठरा रुपये बाळाने दिले. डॉक्टर म्हणाले, काळजी करण्याजोगे काहीच नाही. शरीराला काहीच कसरत मिळत नाही, त्यामुळे सांध्यामध्ये stiffness येते. दुसरे काही नाही.

लहानपणापासून कसरतीचे महत्त्व ऐकत आलो आहे. कित्येक म्हाताऱ्यांना अगदी शेवटपर्यंत कसरत करताना पाहिले आहे, हिमालयाच्या यात्रेत मी यथेच्छ परिश्रम केले आहेत. पण आजकाल काहीच कसरत किंवा श्रम करत नाही. वाटत होते, 'आजवर चालले तसे शेवटपर्यंत चालेल. आज पन्नास रुपये खर्चून बोध घेतला की थोडी जरूरी कसरत केलीच पाहिजे. चांगली अद्दल घडली. आता सुधारलेच पाहिजे. किंमत दिल्यावाचून बोधहि पटत नाही हे अनुभवास आले.

मुंबई
१७-११-७१

मारी लूईसला हिंदुधर्म आणि येथील समाज-व्यवस्था सोप्या भाषेत समजावण्याच्या प्रयत्नात आणि तिने ऐकलेल्या आणि वाचलेल्या गोष्टीतील गैरसमज दूर करण्यात मला पुष्कळ लाभ होतो. दार्शनिक शैली कामाची नाही. अगदी साधेपणाने समजावावे लागते.

तिच्या मते compassion--करुणा हा सर्वात श्रेष्ठ गुण आहे. " Sharing the miseries of other people and helping them is compassion " ही तिची भूमिका.

मी तिला love, compassion आणि pity यातील भेद समजावला होता. Pity चा भाव ती समजली. 'सज्जनाला वाटणारा, तिरस्कार दयेच्या रूपाने प्रगट होतो.' Compassion--करुणेमध्ये समोरचा मनुष्य अडचणीत आहे, ती दूर करण्याची शक्ति आपल्यात आहे, म्हणूनच आपण अभिमान-रहित होऊन सेवा करतो. पण देणारे आपण, घेणारा दुसरा-- यांच्यात प्रेम उत्पन्न होईल, पण समानता नाही. देणाऱ्याची nobility निराळीच पडते वगैरे समजावून सांगण्याचा पुरा प्रयत्न केला. तिला वाटत होते हिंदुधर्मात compassion नसावे. मी सांगितले, " जुन्याकाळापासून आमच्याकडे करुणा आहेच. ती काही बौद्धांची निर्मिती नव्हे. पण बौद्धांनी करुणेचे महत्त्व वाढवले " जैनधर्म आणि शीखधर्माविषयी पण मी थोडक्यात सांगितले. 'शीख' म्हणजे 'शिष्य'. गुरु भक्तांनी तो धर्म चालवला. यांनी हिंदुधर्मात पुष्कळ सुधारणा केली. जैनधर्माविषयी देखील सविस्तर सांगितले. कित्येक जैन गृहस्थांनी तिला पुष्कळ सांगितले आहे. सगळे मिळून घोटाळा न होवो, म्हणजे झाले.

मुंबई
१८-११-७१

समर्थ रामदासांचा " मनोबोध " (मनाची शतें) हे महाराष्ट्रात एकाकाळी अत्यंत लोकप्रिय प्रकरण होते. हे श्लोक घरोघर पाठ म्हणत आणि रामदासी साधु प्रत्येक घरांसमोर थोडे श्लोक ऐकवून, प्रतिष्ठितपणे भिक्षा वसूल करत असत. ज्यांच्या सेवाभावाविषयी मला अत्यंत आदर, त्या प्रा. त्रिवेदी यांच्या घरी पुण्यात 'मनोबोधा'चे पारायण होत असलेले पाहून मी मनोबोधाची पारायणयोग्य आवृत्ति तयार करून दिली आणि त्याच्यावर एकवीस प्रवचने लिहिण्याचा संकल्पहि जाहीर करून मोकळा

झालो. पहिली आवृत्ति ' मनोबोधा 'चे नित्य पारायण करणाऱ्या डॉ. मनूभाईंना अर्पण केली होती. आता प्रवचने पुरी करून ' मनोबोधा 'ची नवी आवृत्ति प्रकाशित करतांना ती प्रा. त्रिवेदी आणि त्यांचे चिरंजीव मनूभाई दोघांच्या स्मृतीला अर्पण करावी लागणार. दोघांविषयी आदर आणि आत्मीयता व्यक्त करण्याचा विचार आहे.

हा जर संकल्प नसता तर ' मनोबोधा 'ची आवृत्ति काढण्याच्या भरीस पडलो नसतो.

समर्थ रामदासांविषयी खास आदर यासाठी आहे की इतर कित्येक संतांप्रमाणे ते जीवन पराङ्गमुख अथवा इहलोकविमुख नव्हते. तरीही त्यांना रूढीवाद संभाळायचा होता. त्यांची रामोपासना कितीहि उत्कट असली तरी जुन्या प्रकारचीच होती. त्यांची भाषा प्रभावी खरी पण ओबडधोबड आणि ' मनोबोधा 'ची रचना अगदीच अव्यवस्थित.

जर समर्थांचा सबंध आदर्श मला मान्य असता तर सगळा मनोबोध त्यांच्याच भाषेत पण नव्याने लिहून काढून अगदी आटोपशीर आणि प्रभावशाली केला असता.

मुंबई
१९-११-७१

हॉरेस अलेक्झान्डर फार चांगले गृहस्थ आहेत. त्यांना भेटण्याची इच्छा होती पण सोफिया वाडीयांच्या घरी जाऊन भेटण्याची वेळ सोईस्कर नव्हती. पण ते म्हणाले, " काकांना जरूर भेटावयाचे आहेच." म्हणून आज दुपारी राजभवनमध्ये जाऊन भेटलो. परस्पर खूप आनंद झाला. पण विचाविनिमयाची अडचण. मी निरनिराळे विषय छेडले. पण त्यांनी विशेष आस्था दाखवली नाही. मला ऐकू येत नाही ही अडचण नडली असावी. दिल्लीला पुन्हा भेटू कदाचित्. क्वेकर सेन्टरने आपले काम वाढवले पाहिजे. पण तशी माणसे त्यांच्याकडे आहेत काय ? असतीलच.

आज गुरुनाथ सामंत दुसऱ्यांदा भेटला. माणूस हुशार आहे, चतुर

आहे आणि विशेष म्हणजे कसली भीति न बाळगता, मनाचे विचार साफ सांगतो. समाजाच्या अगदी खालच्या थरावरून हळूहळू वर चढत आहे. त्यामुळे आदर्शात स्थैर्य आवश्यक असते हे अजून पटले नाही. यथाकाळी पटेल. समाजातील पुढारी कसे वागतात हे पाहून त्यातून काही गोष्टी उचलायच्या, काहींचा विरोध करायचा असे करत करत जीवन जिकडे जाईल तिकडे जाईल अशी परिस्थिती आहे.

याचे स्वातंत्र्य अबाधित राहील अशा रीतीनेच मी याच्याशी वागणार, स्वतःचे विचार आणि आदर्श त्याला समजावून सांगेन. पण त्यातून काय घ्यावे, काय न घ्यावे हे तो ठरवील. मी आग्रह किंवा दबाव मुळीच करणार नाही. मनुष्य आपला व्हावा असा लोभ बिलकुल करावयाचा नाही असे मी ठरवले आहे. याच दृष्टीने तटस्थपणे त्याच्या विकासाचे निरीक्षण करणार.

मुंबई
२०-११-७१

आज इस्लामचा सण——ईद-उल-फित्र. या सणासाठी पाकिस्तानच्या याह्याखानने प्रेम आणि मैत्रीची शिफारस केली. पूर्व बंगालहून निघून गेलेल्या पाकिस्तानी हिंदु मुसलमानांना परत येण्याची त्यांनी विनंती केली. भारताला मैत्रीची शिफारस केली आणि साऱ्या जगाला स्नेहाचा संदेश दिला. मला नाही वाटत सगळ्या जगाच्या समस्त इतिहासात इतका निर्लज्ज संदेश कधी कोणी पाठवला असेल. लाखो निःशस्त्र, असहाय्य लोकांची निर्दय कत्तल केल्यानंतर——आणि अशी कत्तल अजूनहि करण्याची तयारी ठेवून असा संदेश पाठवणाऱ्याने 'हद्द केली', असेच म्हटले पाहिजे. "निराश होऊन शरण या आणि माना की हीच मैत्री आहे."

जगाने असे काही कधी केले नाही, असे नाही. लाचार प्राणी शरण जाणारच आणि गोडहि बोलणार. दुष्टांची स्तुति करणार. पण हे सर्व मागणारा याह्याखानच. हा याह्याखान सरतेशेवटी भारतीय प्राणीच आहे. त्याची निर्लज्जता भारतीयांच्या स्वभावाचा नमुना म्हणूनच नोंदावी लागेल.

तो पाकिस्तानी आहे, हा बचाव राजकीय होईल, सांस्कृतिक होणार नाही. या एका विचाराने माझ्या हृदयाचे पाणी पाणी झाले.

आज चि. शरद घरी आली. मला वाटते सर्वांत अधिक संतोष मलाच झाला असेल. मी माझी भावना एका शब्दांत सांगितली : "इतके दिवस घर अनाथ वाटत होते, आज सनाथ झाले." शरदची व्यापक प्रेमशक्ति खरोखर आध्यात्मिक आहे. तिला ते ठाऊक असो किंवा नसो.

मुंबई
२१-११-७१

मधु रावकर आणि गुरुनाथ सामंत भेटून गेले. एका लहानशा सामान्य कादंबरीचे त्यांना केवढे महत्त्व वाटत होते ! लेखकाची पहिली कादंबरी आणि प्रकाशकाचे पहिले प्रकाशन ! माझ्या नांवाने प्रकाशनाला प्रतिष्ठा मिळेल हा लोभ. मला त्यांची गंमत वाटते. पुस्तक तयार झाले म्हणजे सुचेल ते लिहीन. त्यावर त्यांचे नशीब. कसलेच जुने भांडवल नसताना हिंमतपूर्वक पुढे येणाऱ्या लेखकाचे मन कसे काम करते ते पहावयाला मिळते. त्याच्या उपयोगी पडता आले तर मला आनंदच होईल. लेखकाची बायको जातीने ब्राह्मण आणि अतिशय धार्मिक आहे. हे ऐकून लेखकाचे गृहस्थजीवन कसे असेल, याची कल्पना करू लागलो. याने आतापासुन आपली आत्मकथा लिहावयाला सुरू केली पाहिजे.

मारी लूईसच्या स्नेह्याविषयी थोडे बोललो. मनुष्य सज्जन आहे-त्याला अजून ओळखू शकलो नाही. मारी लुईसच्या निरनिराळ्या प्रश्नां-वरून तिच्या डोक्यातील अराजक थोडे थोडे ध्यानात येऊ लागले आहे. तीहि प्रश्नामार्फत माझे तत्त्वज्ञान समजू इच्छित आहे. मीहि तिला समजावून सांगितले की तात्त्विक चर्चा हवी तेवढी करता येईल पण अशा चर्चेची एक मर्यादा असते ती पाळावीच लागते. मन मोकळे केल्यावाचून अंतरंगाची ओळख होत नाही आणि स्वाभाविक पडदा दूर करण्याचा मी कधीच प्रयत्न करत नाही. मनुष्य आपण होऊन मोकळेपणा धारण करील तर उत्तम.

मुंबई
२२-११-७१

चि. शरदला माझा अनुभव सांगितला की या खेपेला बावीस तेवीस दिवस राहिलो पण जणू पुष्कळ दिवस झाले असेच वाटते आणि विशेष म्हणजे शरद घरी असली म्हणजे घर सनाथ आहे असे वाटते. पण मग तिचा विचार मनात फारसा येत नाही. या खेपेला त्याच्या उलट घरात इतर सगळी मंडळी असूनदेखील घर अनाथ वाटे आणि त्याचमुळे शरदच्या गैरहजेरीमुळे तिचे अस्तित्व अधिक जाणवत असे. आता भेटेल, आता भेटेल अशी अपेक्षा राही.

शरदचे म्हणणे खरे आहे. ही पित्याची भावना आहे. पण अशा भावनेचा अनुभव माझ्या वाट्याला हा पहिलाच होता आणि अनपेक्षित होता.

प्रो. वसंतराव दावकर यांना मी पत्र लिहिले होते पण ते विसरून गेलो होतो. त्यामुळे त्यांचे येणे अनपेक्षित वाटले. त्यांच्याशी बराच वेळ बोलणे झाले. एक विचार सहज बोलून गेलो. त्यांना तो अनपेक्षित होता. थोडा झोंबलाहि असेल.

मी म्हणालो, "हल्लीचे वाचक गंभीर साहित्य वाचतच नाहीत. पश्चिमेकडील जीवनाचे आदर्श (आणि साहित्यिक आदर्शहि) लोकांपुढे वाढले जातात. सामान्यवाचक कादंबऱ्या, लघुकथा आणि वर्तमानपत्री लेख ह्यावरच पोसला जातो आणि मग साहित्याचे आदर्श समालोचकापासून घेत असतो. यामुळे आजचा समालोचक समाजाच्या अभिरुचीचा गुरु बनतो. हे समालोचक बरेचसे वास्तववादी असतात. आदर्शवाद त्यांना पटत नाही आणि म्हणून खऱ्या व्यवस्थित आदर्शवादाची देखील टिंगल करतात आणि केव्हा केव्हा विकृतीला स्वाभाविक समजून तिचे समर्थनहि करतात. परिणामी शुद्ध आणि व्यवहार्य आदर्शदेखील विकृत वाटू लागतो आणि समाजाची नीतिमत्ता खाली ओढली जाते. समालोचक समाजाला गुरु वाटतो. त्यामूळे हे असे होते. हे एक संकटच आहे."

आगगाडी
२३-११-७१

सरकारने एखादा यंत्रोद्योग किंवा राष्ट्रीय महत्त्वाचा कोणताहि उद्योग सुरु केला तर निरनिराळ्या शाखेवर मुख्य व्यवस्थापक त्याची योग्यता पाहून नेमतात आणि त्याच्या हाताखाली त्या त्या विषयांचे तज्ज्ञ देतात. मुख्य व्यवस्थापक कोणत्याहि विषयाचा तज्ज्ञ असला पाहिजे असा आग्रह नाही. पण व्यवस्था चालवणे, त्या उद्योगाचे समाजांतील स्थान ओळखणे, नफानुकसान इत्यादि गोष्टीवर खास लक्ष ठेवणे वगैरे मुख्य संचालकाचे गुण त्याच्यात असावे लागतात. तशा गुणात तयार झाल्याचे प्रमाणपत्र ज्याच्याजवळ असेल त्यालाच अशा ठिकाणी नेमतात.

तरीहि सरकारी उद्योगधंदे फायद्यात पडत नाहीत. विशेष प्रगतिहि करतील याची खात्री नसते.

याच्या उलट ज्याला private sector म्हणतात तसा उद्योग एखादा उद्योगपति सुरू करतो आणि मग आपल्याच कुटुंबातील किंवा नातेवाईकांतून सामान्यपणे हुशार अशा लोकांना पसंत करून मोठ्या जागी नेमून टाकतो. आणि मग त्याच्यात त्या जागेला लागणारे कौशल्य उत्पन्न करतो. म्हणजे पहिली योग्यता नातेवाईकपणा म्हणजेच विश्वासपात्रता आणि उद्योग निष्फळ गेला तर आपली अब्रू गेली अशी जाणीव असणे आणि बरोबरच्या इतरांना सांभाळून घेण्याची आपुलकी असणे हाच मुख्य गुण पाहिला जातो. बाकीच्या गोष्टी नंतर आणता येतात.

आणि म्हणूनच खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना बरकत असते.

आणखी एक प्रकार आहे. रामकृष्ण मिशनसारख्या एखाद्या धार्मिक संस्थेने जर उद्योग काढला तर तेथे महत्त्वाच्या जागी कुटुंबियांना आणण्याचा प्रश्न नसतो. पण गुरुमहाराजांची शिष्यशाखा आणि त्यातून उत्पन्न होणारी आत्मीयता यालाच महत्त्व असते. म्हणजेच सर्वांचे हित-संबंध एक आहेत ही भावना. तिलाच महत्त्व अधिक आणि सर्वांच्या हिताच्या दृष्टीने उद्योग चालवणे हा सर्वमान्य हेतु असतो. धर्मसंस्थेमध्ये स्वतःच्या धर्माचे, पंथाचे अथवा परंपरेचे महत्त्व सर्वोपरी असते. ज्याप्रमाणे

कोणत्याहि उद्योगात त्या त्या विषयाचे तज्ज्ञ असावेच लागतात त्याचप्रमाणे व्यवस्थाकौशल्याचा तज्ज्ञ आणता येतो पण आपुलकी तशी आणता येत नाही. इंग्लंडसारख्या देशात त्यांची राष्ट्रीयता तेथे उत्तम आपुलकी उत्पन्न करते.

दिल्ली

२४–११–७१

मुंबईहून दिल्लीला आलो खरा. पण बरोबर सरोज नव्हती. कुसुम आली होती. मुंबईला बिघडलेली तब्येत आज अतिशय बिघडली. आसपासचे सगळेच लोक चिंतेत होते. चि. बाळ रात्री साडे नऊपर्यंत 'सन्निधी 'मध्येच बसला होता. अमृतलाल तर रात्री तीनपर्यंत खुर्चीवरच बसून राहिले.

अशा रीतीने प्रकृति बिघडली असतांनादेखील मेजर रामचंद्रनबरोबर आलेल्या फ्रेंच फादरशी पुष्कळ चर्चा करू शकलो. त्याविषयी आज न लिहिले तरी चालेल.

सगळा दिवस एकच वस्तु पुन:पुन्हा मनात येई की चि सरोज बरोबर नाही. आजारीपणामुळे तिचे सान्निध्य हवे आहे असा विचार मनात आला नाही. सेवा करणारे आसपास पुष्कळजण होते. पण दिवसभर सगळ्या गोष्टी, आलेल्या लोकांशी केलेली चर्चा यांची साक्षी सरोज असते. ही एकाग्रता तीस चाळीस वर्षे (नक्की किती ते आठवत नाही) चालू आहे. यामुळे दिवसाच्या सगळ्या कामात, विचारविनिमयात आणि चिंतनात सरोज हजर असलीच पाहिजे अशा तऱ्हेचे ऐक्य मनात मुरून गेले आहे. सरोजच्या गैरहजेरीमुळे ते ऐक्य अधिक स्पष्ट आणि जिवंत होऊ लागले होते हा अनुभव नोंदून ठेवण्याजोगा खरा.

दिल्ली

२५–११–७१

श्रीमान्जींच्या खास आग्रहामुळे गांधी हिंदुस्तानी साहित्य सभेची

बैठक ठेवली होती. पण ते स्वत: येऊ शकले नाहीत. त्यांनी फोनवर प्रत्येक ठरावाविषयी आपल्या सूचना सांगितल्या. ते इतका रस घेतात हे चांगले आहे.

मी अनौपचारिकपणे कित्येक महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या. चि. रैहानाचा माझा संबंध, त्याविषयी विनोबांनी केलेली माझी कदर, रैहानाचा हिंदुसंस्कृति विषयी आदर इत्यादि. या आदराची मी अत्यंत कदर करतो. पण हिंदुसंस्कृतीमध्ये सुधारणा करण्याच्या पक्षाचा मी रैहानामार्फत आलेल्या orthodoxy चे समर्थन करू शकत नाही. तरीहि त्यांच्या सेवेविषयी मला आदर आहे.

'मंगल प्रभातच्या ' नीतिविषयीदेखील आम्ही बोललो, चर्चा केली. , मंगल प्रभात 'ची भूमिका रवींद्रांना बरोबर समजली आहे. त्यांना सह-संपादक करण्याची माझी इच्छा आहे. मी सर्व संपादन आजच त्यांना द्यावयाला तयार आहे पण शेवटचा निर्णय माधवदास, रवींद्र आणि अमृत-लालनी करावयाचा आहे.

सरकारी मदत मिळत होती ती न घेण्याचे मी ठरविले होते याचे खरे कारण कुणालाच ठाऊक नव्हते. ते मी सर्वांना सविस्तर समजावून सांगितले. सरकारी ग्रँट आणि सरकारी जाहिराती घेण्याच्या बाबतीत माझा मुळीच विरोध नाही. पण ज्या कित्येक गोष्टी सांभाळायच्या आहेत त्या सविस्तर सांगितल्या. सभेवरील माझा ताबा सोडून देत आहे म्हणून गांधीकाळापासूनचे आग्रह सर्वांना समजावून सांगितले.

सभा संपल्यानंतर खाजगीरीतीने माझी एक चिंता सांगितली. अमृत-लालनी निष्ठापूर्वक आजन्म सेवा दिली आहे. त्यांचे म्हातारपण चिंतेत जाऊ नये याची काळजी सभेने घेतलीच पाहिजे. रैहानाविषयी जसा माझा आग्रह आहे तसाच दुसऱ्या प्रकारे अमृतलाल संबंधीहि आहे.

भाषा आणि साहित्य यांच्या जोरावर सभा आता काम करू शकणार नाही. सर्वधर्मकुटुंब आणि विश्वसमन्वय या तत्त्वांचाच प्रचार झाला पाहिजे हेहि मी सविस्तर सांगितले.

पाकिस्तानचा प्रश्न गळ्याशी येऊन पोहोचला आहे. त्याविषयी उद्या सविस्तर बोलण्याचा विचार आहे. त्याबाबतीत जागतिक मत तयार करणे अत्यंत जरूरीचे आहे. जे झाले ते फारच थोडे झाले. आपण गांधीवादी लोकांनी हातात शस्त्र घेण्याचे नाकारावे पण इंदिरेला पाठिंबा द्यावा.

दिल्ली
२६-११-७१

फ्रांसचा एक रोमन कॅथॉलिक स्वामी आज भेटला. पुनर्जन्मावर विश्वास कां ठेवावा हा त्याचा एक प्रश्न होता. मी म्हणालो, आमच्या देशात थोडे-फारच थोडे-लोक होऊन गेले. त्यांना लहानपणी पूर्वजन्मीच्या गोष्टी आठवत होत्या आणि त्या खऱ्या ठरल्या (अशा लोकांना 'जातिस्मर' म्हणतात). पण असा प्रत्यक्ष पुरावा तुमच्यापुढे मी मांडत नाही. कां तर विश्वास ठेवा किंवा तपास करा.

मी म्हणतो एखाद्या कादंबरीतील मधलेच प्रकरण वाचले म्हणजे मागच्या पुढच्या प्रकरणाची अपेक्षा जागृत होते त्याचप्रमाणे पूर्वजन्म आणि पुनर्जन्माची गोष्ट आहे. पुनर्जन्म नाही असे तुम्हाला सिद्ध करता येत नाही. जन्म परंपरेची अपेक्षा स्वाभाविक आहे. वंशपरंपरा (heredity), सामाजिक वातावरण (milieu) आणि संस्कृति या तीन गोष्टी पुढे करू शकता पण तेवढ्याने बापा-मुलांतल्या भेदाचे समर्थन होत नाही इत्यादि अनेक गोष्टी मी सांगितल्या. मग प्रश्न निघाला आत्मा आणि ईश्वर यांच्या द्वैत अद्वैताविषयी. हा प्रश्न दार्शनिक नसून धार्मिक आहे आणि अनुभवमूलक आहे असे तो म्हणाला. तेव्हा मी म्हणालो, शरीर, इंद्रिये, त्यांचा व्यापार, मन, बुद्धि, भावना आणि अंतःप्रेरणा (intuition) या सर्वांचा आपल्याला अनुभव आहे. आत्मा यांच्या पर आहे. आत्म्याचा सामान्य माणसाला अनुभव नसतो. सामान्यपणे सर्वोच्च भावनेलाच लोक आत्मा समजतात. आता माझा अनुभव सांगतो--मला साधना चालवता चालवता प्रथम परमात्म्याचा थोडासा साक्षात्कार झाला. त्यापूर्वी देवावर फक्त

विश्वास होता. परमात्म्याचा साक्षात्कार झाल्यानंतरच मला आत्म्याचा साक्षात्कार झाला. त्यापूर्वी केवळ विश्वास होता, श्रद्धा होती (तुम्ही अनुभवाची गोष्ट छेडली म्हणून हे सांगतो आहे). ते म्हणाले, सेंट ऑगस्टीन तुमच्यासारखेच म्हणाले होते-- " God is nearer to me than myself, is more myself than myself". सेंट ऑगस्टीनचे हे वचन एकूण मला ' नवाई ' वाटली. अगदी माझाच अनुभव तो बोलत आहे.

पुढे मी म्हणालो, जगातल्या अधिकांश भक्तांना, संतांना आणि ऋषींना द्वैत स्वाभाविक आहे. अद्वैताचा अनुभव झाला तरी त्यांची नम्रता म्हणते---अद्वैताचा अनुभव झाला म्हणून काय झाले ? ज्याप्रमाणे शिष्य गुरूची बरोबरी कधीच करणार नाही त्याचप्रमाणे अद्वैत पटूनदेखील त्याचा ' जाहीरकार ' करणे संतांना आवडत आही. एखादा jesus च हिंमतपूर्वक बोलतो " I and my father are one." खरे आहे अद्वैत. पण शोभते विशिष्टाद्वैत.

दिल्ली

२७–११–७१

कित्येक साहित्यिक लोक सुंदर पत्रें लिहावी अशा हेतूने लिहितात. ती प्रकाशित होणार याची अपेक्षाहि असते. एवढेच नव्हे तर प्रकाशन आणि प्रतिष्ठेच्या दृष्टीने कुणाकुणाला पत्रें लिहावी हेहि ठरवीत असतात. अशा प्रकारची पत्रें लिहिली जातात याची ज्याला कल्पना आहे त्याच्या मनात अशासारखा हेतु किंवा उद्देश येणे अशक्य नाही पण माझ्या बाबतीत मात्र तसे मुळीच झाले नाही. मी पुरेसा अंतर्मुख असल्यामुळे मनात उठणारे हेतु आणि लाभहानि लपून राहणे शक्य नाही. पण मला एखादे पत्र आले म्हणजे त्यातून सुचलेले विचार आणि पत्र लिहिणारी व्यक्ति दोन्हीविषयी आत्मीयता इतकी उत्कट होते की विचारविनिमय, अनुभव आणि भावनांची देवाणघेवाण यातून मिळणारा आनंद एवढ्याच गोष्टी उरतात. माझ्या पत्रात साहित्यिक गुण नसतो असे नाही पण त्याच्यामागे साहित्याची अभि-

रूचि ही गोष्ट प्रधान नसते. पण मी हाडाचा शिक्षक. लहान-मोठ्या कुणालाहि पत्र लिहावे, माझा विचार उत्कटतेने व्यक्त झाला पाहिजे. वाचणाऱ्याला माझी दृष्टि पटलीच पाहिजे अशा उत्कट उत्सुकतेमधून पत्र-लेखनात साहित्यिक गुण येत असला पाहिजे. दुसरी गोष्ट, ज्यांना मी पत्रें लिहितो, ते लहान असोत, मोठे असोत, पत्र लिहिताना एकप्रकारची समानतेची भूमिका धारण केली जाते.

कालच रवींद्रानी म्हटले की मी चंदनला लिहिलेल्या पत्रात सासरा आणि सून यातील वडिलकीचा गंध नसून अगदी मोकळेपणा आहे. मी म्हणालो, गोष्ट अगदी खरी आहे. प्रस्तावनेत या गोष्टीकडे लक्ष खेचलेच पाहिजे. पण नंतर मुख्य गोष्ट ध्यानात आली म्हणून सांगायची राहिली. ती ही, की चंदन सून झाली त्याच्या पूर्वी पुष्कळ काळ लाडकी विद्यार्थिनी होऊन बसली होती. 'दक्षिणामूर्ति'मुळे तो संबंध स्थापित झाला होता. तो बदलणे अशक्य होते. याविषयी मी लिहिलेहि आहे. माझ्या पत्रात केव्हा केव्हा अनुनय डोकावतो आणि तो अगदी परक्या लोकांना लिहिलेल्या पत्रातदेखील प्रकट होतो. त्याचे कारण मात्र माझी मानवतेची साधना होय. ज्याप्रमाणे निसर्गाच्या अनेकानेक विभूतिमध्ये मला परमात्म तत्त्व दिसते त्याचप्रमाणे आत्मीयताहि स्थापित होते आणि ही स्थिति मानव्याविषयीहि आहे. एखाद्याशी पटणेच अशक्य असले तरीदेखील अनुनय सुकून जात नाही. माझ्या स्वाभाविक साधनेचे ते अंग असल्यामुळे या सूक्ष्म गोष्टीकडे माझे ध्यान गेले. मला ते अगदी स्वाभाविक वाटले. माझ्याशी पत्रव्यवहार कर-णाऱ्या व्यक्तीचे व्यक्तित्व माझ्या उत्तरात प्रकट होते हीहि एक गोष्ट स्वाभाविक आहे.

दिल्ली
२८-११-७१

बापूजी आश्रमाच्या प्रारंभीच्या दिवसात सांगत की आपण जे अन्न खातो त्याचे शरीरात रक्त होते आणि वीर्यहि होते. निसर्गाचा नियम आहे की हे रक्त, वीर्य आणि प्राण यांचा उपयोग करून शरीरश्रम केले आणि

घामाच्या रूपाने ते बाहेर पडले तर मनुष्य निर्विकारी राहू शकतो. ब्रह्मचर्य सोपे जाते. शरीरश्रम न केले तर शरीरातील अन्नापासून झालेले वीर्य काम-विकाराला पोषण देते. म्हणून धनवान 'बेठाडु' लोक अनेक लग्नें करतात आणि विलासी जीवन अनुभवतात. ब्रह्मचाऱ्याने अंगातून घाम काढलाच पाहिजे.

अशा रीतीने शरीरश्रम आणि ब्रह्मचर्याचा संबंध ते समजावून सांगत असत. हाच विचार इतर एखाद दुसऱ्या साधूच्या तोंडून देखील ऐकला असावा असे अस्पष्ट आठवते.

आश्रमद्वारा अनेक प्रवृत्ति महात्माजी चालवू लागले. त्यात शरीर-श्रमाचा आग्रह पूर्वी इतका टिकला नाही. शेतीच्या कामात फारसे आश्रम-वासी रोकले जात नसत. बापूजींनी पाहिले की आपले म्हणणे सोपवणे, अमलात आणणे सोपे नाही. पण सूक्ष्म रूपाने श्रमसिद्धांताचे पालन झालेच पाहिजे. त्यांनी शेवटी चरखा कातण्याचा आग्रह धरला.

खऱ्या स्वराज्याला ग्रामोद्योग पाहिजेत. सगळ्यात विशाल ग्रामोद्योग आहे वस्त्र-निर्माणाचा. तोच शेतीचा मोठा सहायक आहे. त्याचाच पुरस्कार करून गांधींनी स्वराज्यासाठी आणि सर्वोदयासाठी खादीचे सूत्र चालवले आणि श्रमसिद्धांत म्हणून सूत कातण्याचा आग्रह धरला आणि म्हणाले राजाची राणी देखील गादीवर बसून सूत कातू शकते.

दिल्ली

२९-११-७१

ज्या लोकांनी धर्म नांवाची संस्था चालू केली त्यांची दीर्घदृष्टि आणि त्यांचे कौशल्य दोन्ही खरोखर अद्भुत म्हटली पाहिजेत. मी केवळ हिंदुधर्माचा विचार करीत नाही. आदिवासींच्या धर्मभावनेपासून जगातील सर्वच उत्तम रीतीने संघटित झालेल्या धर्मांविषयी विचार करतो. कित्येक दार्शनिक योगी आणि भक्त जीवनाविषयी उदासीन बनून फक्त आत्म्याचा अथवा परमात्म्याचा विचार करतात. ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग आणि राजयोग हे चारहि जीवनविमुख बनू शकतात. यांची स्वतःची करामत नगण्य नाही. पण यांना समग्र जीवनाविषयी आस्था कमीच.

खऱ्या अर्थाने अत्यंत व्यापक आणि शुद्धधर्मच केवळ समस्त जीवनाचा (आणि सामाजिक जीवनाचा देखील) विचार करीत असतो. त्याला जीवन विमुख होताच येत नाही.

जुन्या धर्मकारांनी लोकमानस, जनतेची अभिरुचि आणि सर्वप्रकारचा संतोष यांचा विचार करून आपआपल्या धर्माचे संगठन केले.

पण त्यांच्यात एकांगिता आली. जडता घुसली आणि तरीहि जनतेची खात्री झाली की धर्मावाचून जगणेच शक्य नाही. आज धर्म टिकले आहेत त्याचे मुख्य कारण 'जनतेचे धर्मावाचून चालत नाही' हेच होय.

पण सर्व जगातील आजचा सुशिक्षित समाज मानू लागला आहे की धर्मांची खरोखर आपल्याला जरूर नाही. सगळेच धर्म उपेक्षा करण्या-लायक आहेत. धर्मसंस्थाच जीवनाला आणि मानवीमनाला जड आणि विकृत करते. पक्षपातरहित सर्वधर्मांना मूठमाती दिली पाहिजे. (आम्ही म्हणतो तिच्याबरोबर राज्यसंस्थेलाहि मूठमाती द्या) आणि फक्त शिक्षण सेवा, संशोधन आणि कला राहू देत. पण समाज अजून राज्यसंस्थेवाचून चालवायला तयार नाही. हा भ्रम तोडलाच पाहिजे. काम सोपे नाही.

दिल्ली

३०-११-७१

श्री. बंसीधरजी आज भेटले. त्यांच्याकडून समजले की चिंतामणराव देशमुख कालच्या सभेचे महत्त्व ओळखून आमंत्रणावाचून आले होते. ते ऐकून त्यांच्या विषयींचा आदर वाढला. बंसीधरजींची सूचना आहे की माध्यमिक शिक्षण आणि कॉलेज शिक्षण यांच्यात श्रेष्ठ कनिष्ठ असा भेद करू नये. सर्व प्रवृत्ति एकरूप समजावी. ती सूचना आवडली.

आजकाल सगळी सरकारे सार्वजनिक प्रवृत्तींना अनुदान देताना स्वत:च्या अटी घालतात आणि प्रवृत्तीची शेंडी आपल्या हाती घेतात. मी म्हणालो की याच्या उलट झाले पाहिजे. प्राचीन काळी राजे लोक शिक्षण संस्थांना अनुदान, धान्य, कपडे, भांडी वगैरे वस्तु गाड्यात भरून गुरु-

कुलात धाडत. पण कुलपतीच्या संमतीवाचून गाड्या आत येऊ शकत नसत. कुलपति राजाला समोर बसवून त्याचे राज्य चांगले चालले आहे की नाही याची चौकशी करत. जर कुलपतीला संतोष झाला तर गाड्या आत येऊ देत. राजा अनुदान देई आणि ते स्वीकारल्याबद्दल धन्यवादहि देई.

याचा अर्थ 'अनुदान घेणारे कुलपति राजावर राज्य चांगले चालवण्याविषयीच्या अटी घालत.' राजा त्या अटी पाळतो अशी खात्री झाली तरच कुलपति अनुदान घेण्याचा अनुग्रह करीत.

राजसंस्था (सरकार) ही देखील एक संस्थाच. हिच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ संस्था अधिक टिकाऊ, दीर्घजीवी आणि समाजमान्य असत. (१) आचार्य कुलासारख्या शिक्षण संस्था. (२) निरनिराळे उद्योग, हुन्नर चालवणाऱ्या प्रभावशाली जातिसंस्था. (३) निरनिराळ्या जातीच्या स्वतंत्र स्वयंसंचालित संस्था. राज्यापेक्षा या तिन्ही अधिक प्रतिष्ठित आणि दीर्घजीवी असत.

## डिसेंबर

दिल्ली

१-१२-७१

(माझा जन्म-दिवस)

सर्वांनी मिळून आजच्या दिवसाचे महत्त्व बेहद वाढवले. अगदी याच्या उलट माझा देशी जन्म दिवस कार्तिक वद्य दशमीला शांतपणे गेला. कोणाला कळलेहि नाही.

रवींद्र येथे आल्यापासून सर्व लोकांशी मिसळतात. त्यामुळे आम्ही मंडळी आता 'समाजबाह्य' राहिलो नाही. खरोखर मुख्य लाभ हाच होय.

सकाळी अगदी प्रारंभी ठाकुरदास बंग भेटले. त्यांना लवकर बाहेर गावी जायचे होते. त्यांच्याबरोबर इतर मंडळीहि आली होती. नंतर प्रार्थना-प्रवचनात मी बोललो. संध्याकाळी चार वाजता गांधी-स्मारक संग्रहालया-मध्ये अनेक संस्थांचे प्रतिनिधि आणि स्नेही आले होते. इतक्या परिचित लोकांना एकत्र पाहून संतोष वाटला. या सभेत मी बोललो. त्यानंतर कृपलानीच्या अध्यक्षतेखाली त्याच इमारतीत दुसरी सभा झाली. कृप-लानीशी आता तेवढा संपर्क उरला नाही. आम्ही फारसे कधी भेटतहि नाही आणि त्याचमुळे आज भेटल्याचा आणि जुने प्रारंभीचे दिवस स्मृतीत ताजे करण्याचा असाधारण आनंद वाटला.

मृतप्राय संबंधाला सजीवन करण्याच्या प्रवृत्तीला श्राद्ध म्हणता येईल का ? श्राद्धामध्ये संतोष असतो, जिवंतपणा नसतो.

आजची दोन्ही भाषणे निराळी लिहून काढली पाहिजेत

आजचा दिवस अंतर्मुख जावा अशी इच्छा होती पण तो नेहमीपेक्षा अधिक बहिर्मुख झाला आणि अर्थात् आनंदहि अधिक मिळाला.

आगगाडी–दिल्ली
२–१२–७१

तिसऱ्या प्रहरी मुंबईला जायचे ठरलेले असल्यामुळे दिवसाच्या कामात एकाग्रता नव्हती. † नटवरशी त्याच्या परिस्थितीविषयी सविस्तर बोलणे झाले. जगात सर्वच गोष्टी अशा अस्थिर असतील काय ? नटवर अहमदाबादला जाऊन श्रीमनजींना भेटून येईल. त्याला एक परिचय पत्र लिहून दिले.

वसंत व्यास आणि तारा यांचा आंतरप्रांतीय विवाह. त्यामुळे त्यांना प्रोत्साहन दिले. पण त्यांना कायमचे राहण्याची व्यवस्था कशी काय देणार ? सर्वांच्या अभिप्रायाला महत्त्व देऊन कामे करावी लागणार. वसंताला सभेचा

† श्री नटवर ठक्कर. नागालँडमध्ये जाऊन राहिलेले काकासाहेबांचे एक तरुण सहकारी.

सर्वानुमतीने पास झालेला ठराव सांगितला. त्याचे लक्ष आणि हृदय दुसऱ्याच प्रकारच्या कामात आहे. हा काही त्याचा दोष नव्हे. ज्याचे काम करायचे त्यांनीच राहण्याची सोय करून दिली पाहिजे.

सकाळी वैद्य ओमप्रकाशजीकडून औषध मागवले. औषधात मोराच्या पिसांचा क्षार आहे. पिसे जाळून त्याच्या राखेतून क्षार तयार करतात आणि तो औषधात वापरतात. आपल्या लोकांनी एकेकाळी पुष्कळ प्रयोग केले असणार. मोराच्या पिसातूनदेखील खास काही औषध मिळू शकेल अशी कल्पना ज्यांनी केली त्यांचे कौतुकच केले पाहिजे. माझ्यापुढे दुसराच प्रश्न उत्पन्न झाला. मोराची पिसे त्याला मारल्यावाचून मिळतात आणि पिसे म्हणजे मांस नव्हे, हे खरे. पण शेवटी तो प्राणीज पदार्थ. तो पोटात घ्यावा किंवा नाही अशी शंका क्षणभर मनात आली. दूधदेखील शाकाहार नसून प्राणिज पदार्थ आहे. पण दुधाची उत्पत्ति पिण्यासाठीच असते. डोक्यांत विचार आला आणि तो सोडून दिला.

मुंबई
३–१२–७१

पुष्कळदा वाटते की माझे जीवन प्रवाह-पतीत आहे, लोक बोलवतात तेथे जातो. सेवा मागतात ती देतो. केव्हा कोण भेटायला येईल याची योजना नाही आणि ते लोक कोणता विषय छेडतील याची कल्पनाहि नसते.

रोज सकाळी दिवस उगवला म्हणजे नवे जीवन सुरू होते. मी मनात म्हणतो की शुद्ध सेवा होत आहे. दिवस फुकट जात नाही. तेव्हा जीवन योजनेची चिंता कशाला करू ? योजक परमात्मा जागत आहे. त्याला जसे घडवावयाचे असेल तसे घडेल. तरीहि जेव्हा स्वतःची जुनी पत्रें वाचतो, वासरीतील चिंतन नजरेखाली घालतो आणि पुष्कळ वर्षे न भेटलेले लोक अकस्मात भेटतात तेव्हा त्या त्या काळचे जीवन नजरेपुढे प्रकट होते आणि मग एक (अथवा अनेक) सार्वभौम कल्पना आणि जीवन प्रेरणा

माझा कब्जा घेऊन बसली आहे आणि व्यवस्थितपणे माझेकडून योजनापूर्वक काम घेत आहे असा संतोष मिळतो.

आज गुजरात विद्यापीठाच्या काळची माझी जुनी पत्रें हाती आली ती घेऊन बसलो. जणु दुसऱ्याच कुणाचे जीवन समजून घेत आहे. इतकी तटस्थता मनात स्थिर झाली आहे. अशा वेळी दिसून येते की माझी कार्यपद्धति विचारपूर्वक स्थिर झालेली आहे. विश्वसमाजाचे स्वरूप माझ्या ध्यानी आले आहे. जग हे असेच चालणार ही गोष्ट खरी असली तरी मानवी इतिहासाच्यामागे एक विकास योजना आहे.

(ही योजना व्यवस्थित नाही. याचे आता वैषम्य वाटत नाही. प्रत्येक व्यक्तीला पुरेसे स्वातंत्र्य देणे हे या योजनेचे सर्वश्रेष्ठ सूत्र त्यातून आपली योजना चालवावयाची तेव्हा हे असेच असणार हे पाहून संतोष होतो आणि योजना स्वामीच्या चरणी शीर नम्र होते.)

मुंबई
४–१२–७१

आजचा दिवस 'परिस्थितीचे परिवर्तन' म्हणून ध्यानात राहील. पाकिस्तानच्या याह्याखानने लाज भीड सोडून युद्ध सुरू केले आणि भारत सरकारने निश्चयपूर्वक युद्धाचा स्वीकार केला. त्यामुळे वातावरण निवळले, स्पष्ट झाले. या परिस्थितीचा प्रत्येकाच्या व्यक्तिगत कार्यक्रमावर परिणाम होणारच.

तरीहि अहमदाबाद आणि मद्रासची एकने चि. सरोजने वेळीच नक्की केली हे चांगले झाले. परिस्थिति बदलली तर एकने रद्द करणे सोपे असते. आता शांतपणे वाट पाहिली. युद्धाच्या दिवसात अंधारपटाचा अनुभव मोठ्या मोठ्या शहरांना पूर्णपणे घ्यावा लागतो. याचाहि प्रारंभ खरोखर कालच झाला आणि ही सर्व गंमत पहावयाला चंद्र हंसत हंसत वर आला. मुंबईत चंद्राचे प्रसन्न दर्शन क्वचितच घडते. मी चंद्राचे मन:पूर्वक अभिनंदन केले आणि त्याने माझे केले आणि आम्ही दोघांनी सरोजला धन्यवाद (आशीर्वाद) दिले.

एक विचार माझ्या मनात आला. मोठ्या मोठ्या शहरात रात्री चोऱ्या करून पोट भरणारे लोक असतातच. त्यांच्यात जर समाजसेवेचे काम मी केले असते तर त्यांच्याशी बोलून मी समाजाला, त्यांच्यावतीने अभयदान दिले असते की "अंधारपटाचा गैरफायदा आम्ही घेणार नाही· युद्धाच्या तयारीला ही आमची मदत समजा व निर्भय राहा."

मुंबई
५-१२-७१

आंधळ्या रमेशचे इतके आकर्षण कां आहे, समजत नाही. ख्रिस्ती लोकांनी त्याला बरीच मदत केलेली दिसते. अंधलिपीत लिहिलेली पुस्तके मिळवून तो खूप वाचतो. मला वाटते अंधलिपि ज्याप्रमाणे पश्चिमच्या लोकांनी बनवली, त्याचप्रमाणे भारतीय भाषांची पुस्तकेदेखील पश्चिमचे लोकच अंधलिपीत तयार करवत असतील. इतका सेवाभाव ज्या लोकात आहे त्यांच्या धर्माविषयी देखील मला आदर वाटतो. रमेशला वाटत असलाच पाहिजे. तरीहि त्याची स्वधर्मनिष्ठा, स्वसंस्कृतिनिष्ठा मजबूत आहे. या निष्ठा उदार झाल्या हे इष्टच आहे.

त्याच्या समाजातील आसपासच्या लोकांपेक्षा तो स्वतः किती तरी पुढारलेला आहे.

त्याला लंडनला जाऊन तेथे तीन वर्षे राहून इष्ट शिक्षण घेण्याची संधि आली आहे. पण याच वेळी देशात जर युद्ध सुरू झाले तर नागरिक म्हणून स्वतःचे कर्तव्य पार पाडणे अधिक जरूरीचे आहे असे त्याला वाटते.

तो येऊन आपले प्रश्न मजपुढे मांडतो. मी त्याला अनेक रीतीने तपासून पाहतो. त्याच्या भावना ओळखतो. त्याच्या स्वार्थाचा विचार त्याच्यापेक्षा मीच अधिक करतो. त्याप्रमाणे सल्ला देऊनहि पाहतो. नंतर जेव्हा दिसते की स्वार्थापेक्षा कर्तव्यच त्याला अधिक महत्त्वाचे वाटते, तेव्हा त्याच्याविषयी आदर वाढतो. मग मी त्याला त्याप्रमाणे सल्ला देतो.

तो आला म्हणजे चांदनी यावयाचीच. या खेपेला आपल्या धाकट्या

बहिणीला–शेरानीला–घेऊन आली. चांदनीच्या प्रगतिविषयी विशेष विचार केला पाहिजे.

मुंबई
६–१२–७१

गृहस्थाश्रम मूळ असतो वंशपरंपरा चालवण्यासाठी, यामुळे आपल्या पूर्वजांनी तो आश्रम तीन पुरुषार्थासाठीच–धर्म, अर्थ, काम यापुरता––मर्यादित केला आणि मोक्ष या पुरुषार्थाला गृहस्थाश्रमाच्या बाहेर ठेवला, हे योग्यच केले. पण रामकृष्ण परमहंस आणि शारदामाता यांनी बरोबर याच्या उलट, अर्थ आणि काम यांना पूर्णपणे बाजूला सारून मोक्षधर्माच्या सिद्धीला स्वीकारून नंतर आध्यात्मिक गृहस्थाश्रम पसंत केला आणि तो चालवून दाखवला.

या बाबतीतील दोघांचे जीवन मी बंगालीत वाचले आहे. पुष्कळशा गोष्टी इंग्रजीत आल्या नसतील. शारदामातेची पतिनिष्ठा आणि मोक्षनिष्ठा ––दोन्ही अद्‌भुत ! शारदा देवींनी आध्यात्मिक माता बनून गृहस्थाश्रमाची ती बाजूदेखील सिद्ध करून दाखवली. खरोखर शारदामातेची विभूति रामकृष्णापेक्षा कदाचित् कांकणभर श्रेष्ठच असेल. मी देवी उपासक खरा. शारदामातेचे प्रभावी जीवन मला पूर्णपणे पटते.

मुंबई
७–१२–७१

शेवटी ‘ मनोबोध ’ पूर्ण झाला. आता पुन्हा एकदा पाहून प्रकाशनाची व्यवस्था करावयाची. यानंतर करुणाष्टके घ्यावयाची आहेत. करुणाष्टकांचे संपादन म्हणजे माझ्या वाट्याला, अनंतबुवा मर्ढेकर यांचे श्राद्ध. “ करुणाष्टके ” आणि ‘ मनोबोध ’––दोन्ही रामदासांच्या कृति. करुणाष्टकाचे काव्य मला अत्यंत प्रिय आहे. पण त्या दोन्ही ग्रंथांतील विशिष्ट भक्ति

आणि अध्यात्म यांच्याशी माझा 'मेळ' बसत नाही. मला दोन्ही मान्य आहेत. पण मी त्यांच्यापुढे जातो. हीहि एक कसोटीच आहे.

माझी कित्येक जुनी पत्रे फार महत्त्वाची, जेठालाल गांधीकडून मिळाली. त्याची नक्कल चि. कुसुम करत आहे. मी ही पत्रें पार विसरून गेलो होतो. आज वाचतांना त्यावेळची परिस्थिति आणि माझे परिपक्व विचार–यांचे अगदी नव्याने पुनर्दर्शन होत आहे आणि त्यामुळे तटस्थपणे त्यांचे महत्त्व मी समजू शकतो. त्या काळीं काही पत्रे खाजगी स्वरुपाची होती. आज ती प्रकाशित करण्यात कसलीच अडचण नाही. मला वाटते ही आता संस्कृतीत छापण्यासाठी उमाशंकरला द्यावी. लोकांना यांचे महत्त्व पटल्यानंतर पुढचे पुढे.

मुंबई
८–१२–७१

'मराठी ग्रंथ संग्रहालय––दादर'मधून करुणाष्टकाचे एक पुस्तक आणि समर्थांविषयी तीन पुस्तके आली. नानासाहेब देवांची सेवा महत्त्वाची आहे. समर्थभक्तांना संतोष व्हावा अशी त्यांची भक्ति आहे. पण जी तटस्थ दृष्टि आज हवी आहे ती त्यांच्यात नाही मला भक्ति हवी आहे, धार्मिकता हवी आहे, संतपणा अत्यंत आवश्यक वाटतो. पण भूतकाळाचे राज्य भविष्य-काळावर जे चालवू पाहतात त्यांच्याशी माझी सहानुभूति नाही. कित्येक लोकांची भक्ति आणि व्यक्ति-निष्ठा संपूर्णपणे पांघुरलेली असते. त्यांना वाटते जगात अशी निष्ठाच धारण केली पाहिजे. अशांची चर्चा काय कामाची ? सबंध पिढी अशीच असली म्हणून काय झाले ? यांच्यामुळे प्रतिक्रिया म्हणून जो बुद्धिवाद सर्वत्र पसरू लागला आहे, त्याच्यापुढे यांचे काहीच चालत नाही. पांघुरलेल्या निष्ठेत विरोधाला तोंड देण्याची शक्ति नसते. असे लोक विरोधी लोकांची आणि काळाची निंदा करून थकतात.

मुंबई
९–१२–७१

'भेटणार', 'भेटणार' म्हणून ज्यांची जाहिरात झाली होती ते पुंडलीक शेवटी आज भेटले. पन्नास-साठ लोकांना घेऊन त्यांनी आपला एक कार्यक्रम चालवला होता. पाकिस्तानी युद्धामुळे तो कार्यक्रम गडबडला आणि त्यांना दहा हजाराचा चट्टा बसला. त्याच्या चिंतेत आहेत.

त्यांच्या कामाशी माझी सामान्य सहानुभूति आहे. त्यांनी आपल्यापरी व्यायामाचे काम चांगले चालवले आहे. हेच त्यांचे जीवनकार्य. याखेरीज साहित्यहि लिहिले आहे.

त्यांना गंगाधररावांनी जवळ केले. माझा आणि त्याचा घरोबा वाढला. गंगाधरराव गांधी मार्गाकडे आले त्यामुळे पुंडलीकांनाहि या दिशेने यावे लागले. पण त्यांच्या हाडात ते नाही. व्यायामाच्या मागे लागलेल्या लोकांमध्ये जे दोष सहजासहजी दिसतात ते पुंडलीकमध्ये नाहीत त्यामुळे त्यांचे काम राष्ट्रमान्य होऊ शकते. त्यांची भूमिका मात्र आज आहे तशीच शेवटपर्यंत असणार.

या खेपेला ते आले हे श्री. तिमाप्पा नायकांच्या पुस्तकाचे हस्त-लिखित घेऊन. या बाबतीत स्वतः काही करू शकतील अशी त्यांनी निमाप्पांना आशा दाखवली असेल. पण ते शक्य नव्हते तेव्हा आता त्यांची मध्यस्थी बाजूला राहिली. पुस्तकासंबधाने काय होते ते पाहू या.

मुंबई
१०–१२–७१

परवा कांति गांधीचे पत्र होते की सर्व-धर्म-समभाव आणि ममभाव यापेक्षा सर्वधर्मांना बाजूला ठेवून, धर्मनिरपेक्ष नीति चालवण्यातच श्रेय आहे. या विचाराची चर्चा आणि छाननी करण्यासाठी मी त्याला बोलावले होते. त्याच्यापुढे सगळी परिस्थिति मांडली. आणि जनतेवर योग्य परिणाम होईल असा उपाय तुझ्या मते काय आहे, तो सांग. असा उलट प्रश्न केला.

आपण धर्माची उपेक्षा केली तर सगळ्याच धर्मात असलेल्या चांगल्या गोष्टींची उपेक्षा होऊ शकते. सामान्य जनतेला त्या उत्तम गोष्टीचा गंधहि नसतो. पण धर्माच्या नांवाखाली जे समाजविघातक, चारित्र्यविनाशक आणि उत्तम-राष्ट्रीयतेला बाधक—अशा वस्तु असतात त्यांचा त्यावर परिणाम होत नाही, त्या फोफावतात. जनतेच्या मनावर धर्माच्या नावाने जो अनिष्ट गोष्टींचा पगडा आहे, त्याचा इलाज कोणीच करीत नाही. ज्या अहमदाबाद मध्ये गांधीजींनी काम केले, आश्रम चालवला, तरी जनतेवर त्याचा पुरेसा परिणाम झाला नाही. कारण धर्माच्या नावाने माजलेला वाईट गोष्टींचा इलाज कोणीच केला नाही. थोडया दिवसांपूर्वी अहमदाबादेत हिन्दु-मुस्लिम झगडे झाले आणि प्राणहानी झाली. इंग्रजी शिकलेले लोक आज राज्य चालवतात. त्यांना धर्म नको आहे. पण देशात माजलेल्या कुधर्माचा इलाज त्यांना सापडत नाही.

मुंबई

११-१२-७१

सिंधी महिला मोहिनी आज भेटायला आली होती. ती आली म्हणजे सिंधी समाजाचे अनेक प्रश्न छेडले जातात. सिंधी लोकांचे प्रथम दर्शन कारवारला झाले होते. रामजी तेली कच्छचा माणूस. त्याच्या घरी आम्ही भाडयाने राहत असू. त्याच्या घरी सिंधी लोक येत. पण सिंधशी माझा गाढ संबंध झाला जीवतराम कृपलानीमुळे. सिंधचे हिंदु लोकांची एक कर्तबगार जात आहे. कृपलानी, मलकानी, गिदवाणी, विष्णु शर्मा, जयरामदास दौलतराम, डॉ. चोइतराम किती तरी उत्तमोत्तम कार्यकर्ते आणि देशनेते या लहानशा जमातीने दिले आहेत. तरीहि सामान्यपणे ही जात पारश्याप्रमाणेच स्वात्मनिष्ठ. 'आमिल' आणि भाईबंद या दोनच जाती मुख्य ब्राह्मण आहेत पण गणतीत नाहीत.

भारतातील सगळ्याच जाती इंग्रजधार्जिण्या कशा होऊ शकल्या ? इंग्रज लोकात आहेच काहीतरी अद्‌भुत शक्ति, आणि आपल्या लोकात चांगल्या आश्रयाला चिकटून राहण्याची लालसा.

पाकिस्तानच्या युद्धाचा निर्णय कसा होणार कोणास ठाऊक ? सिंधी लोक स्वत:पुरता विचार करतात. पाकिस्तान झाले आणि सर्व सिंधी हिंदु एकजात-भारतात आले. आता जर पाकिस्तानच्या प्रयत्नाने हिंदु-बरेचसे सिंधमध्ये जातील तरीहि पूर्वबंगालप्रमाणे सिंध एक मुसलमानी राज्यच राहील. जे हिंदु तिकडे परत जातील त्यांनाहि पुढे मागे मुसलमान व्हावेच लागेल असा अंदाज आहे.

मुंबई
१२–१२–७१

अंध युवान रमेश बोरसे खानदेशकडचा राहणारा. आज पुन्हा भेटला. मुंबईसारख्या शहरात एकटा एकटा कोठेहि येतो जातो, वाहन पकडतो, ही साधी गोष्ट नाही. लहानपणापासून अंध असूनहि, याने स्वत:ची विद्वत्ता असाधारण वाढवली आहे. अंधलिपि शिकून, त्या लिपींत मिळणारे इंग्रजी साहित्य खूप वाचले आहे. टाइप राइटर वापरू शकतो. इतका स्वावलंबी अंध माणूस दुसरा पाहिला नाही.

आज आमच्या पुष्कळ गोष्टी झाल्या. तारुण्याचे प्रश्नहि चर्चेत आले. विषयाचे गांभीर्य संभाळून मोकळेपणाने बोलण्याची त्याची तयारी मला आवडली. त्याने स्वत:च्या कॉलेजच्या दिवसातील अनुभव थोडक्यात सांगितला. घरी वडिलांची धर्मनिष्ठा आणि सदाचारनिष्ठा कडक असल्याचा फायदाहि त्याने सांगितला. संभाषण परस्परांना आवडले तेव्हा गृहस्थ पुन्हा येणार. लोकांना मालिश वगैरे करून स्वत:च्या खर्चापुरते स्वत: मिळवतो. वडिलावर ओझे घालत नाही. पुस्तकें विकत घेतो. योगासने वगैरेचे आकर्षणहि आहे. आता तत्त्वज्ञानात शिरला आहे. पण योगी किंवा संत म्हणून मिरवण्याची इच्छा नाही.

आज मारी लुईस पण आली होती. आदर्श शिक्षण कसे असावे ? या प्रश्नातून थोडी चर्चा निघाली. ग्रंथनिष्ठेविरुद्ध मी विशेष बोललो.

मुंबई
१३-१२-७१

अहमदाबादचे प्रोफेसर फिरोज दावर यांचा एक लेख आला. ध्यानपूर्वक वाचला. पारशी समाजाची एक बाजू मला चांगली ठाऊक आहे. स्वतःच्या धर्मसमाजाचे व्यक्तित्व कायम टिकवण्याची इच्छा आजवर स्वाभाविक होती. तिचा स्वीकार करून मी त्या लोकांना विचारत असे की "तुमचा समाज गरीब नाही, अज्ञान नाही, व्यवहारकुशल आहे, तरी तुमची संख्या का वाढत नाही ? उलट घटू लागली आहे. याचा गंभीरपणे विचार करा." दुसरी गोष्ट तुमच्या धर्मात जी मुख्य गोष्ट आहे की वाईटाचा त्याग करावा आणि चांगल्याचा स्वीकार करावा हा सिद्धांत समस्त मानवजातीला इष्ट आहे. त्याचा सर्वत्र प्रचार तुम्ही कां करीत नाही ? तिसरी गोष्ट–तुमची नवी पिढी इंग्रजी शिक्षणाने आणि जागतिक वातावरणामुळे धर्मविमुख होत आहे त्याची तुम्हाला चिंता दिसत नाही.

तुमच्या कल्याणाचा विचार तुम्हीच करावयाचा आहे. जे ठरवाल ते मान्य करू. पण जी थोडी पारशी–बिनपारशी लग्ने होतात. ती झाल्यानंतर त्या लोकांना बहिष्कृत करू नका. गोडपणे वागवून घ्या.

मुंबई
१४-१२-७१

माझी जुनी पत्रे—कित्येक तीस–चाळीस वर्षापूर्वीची—कशीबशी सांभाळून ठेवलेली असतील. ती सगळी जेठालालकडून मिळाली. माझी ती पत्रे आणि जुनी परिस्थिति विसरून गेलो होतो. त्यामुळे आता ती तटस्थपणे वाचतो त्या वेळी ते विचार आणि घेतलेले निर्णय आजदेखील मला योग्य वाटतात. किशोरलालभाई, छगनलाल जोशी वगैरे सहकाऱ्यांशी जितक्या मोकळ्या मनाने त्या वेळी लिहिले तितके आज लिहू शकेन असे वाटत नाही. त्या वेळी संस्था सांभाळावयाच्या होत्या. बापूजींचे काम बिघडू नये, आपल्या हातून त्यांची उत्तम सेवा व्हावी असा आग्रह असूनदेखील मी

आतबाहेर असा भेद न करता स्वत:चे मत साफसाफ लिहीत आलो आहे. आज तशी जबाबदारी नाही. तरीहि सर्वांना सांभाळून घेण्याची वृत्ति जोर करते. कदाचित् विरोधी बाजूच्या दृष्टीनेहि विचार करण्याची उदारता आता आली असेल; कदाचित् परिणामभीरूताहि काम करीत असेल.

आज मला त्या वेळची माझी वृत्तीहि आवडते आणि आजची मनोवृत्ति तर सर्वबाजूने ईष्ट वाटणारच.

त्यामुळे ही जुनी पत्रे वाचण्यात आनंदहि आहे आणि लाभहि आहे. हा सारा मसाला आज माझ्या उपयोगी आहे. काही भाग पुढल्या पिढीला अत्यंत महत्त्वाचा वाटेल. ती पिढी स्वत: विचार करीलच.

मुंबई
१५-१२-७१

अहमदाबादच्या प्रो. फिरोज दावरना एक पत्र लिहिले.

पारशी लोकांना मिश्र विवाहाची भीति वाटते हे मला ठाऊक आहे. पूर्वी या लोकांना आपला धर्म आणि आपली राहणी यांचे महत्त्व वाटत होते. धर्मांतर करावे लागू नये, म्हणूनच तर त्यांनी ईराण सोडले आणि ते भारतात कायमचे येऊन राहिले. आपले व्यक्तित्त्व टिकावे या त्यांच्या इच्छेशी माझी पूर्ण सहानुभूति आहे आणि म्हणूनच त्यांना आंतरधर्मीय विवाहाविषयी प्रोत्साहन देण्याचे मी मनातून काढून टाकले. माझे म्हणणे एवढेच आहे की मिश्र विवाहाच्या विरुद्ध त्यांनी प्रचार खुशाल करावा. तरीहि जे थोडे, तुरळक मिश्र विवाह होतील त्यांचा बहिष्कार करू नये, त्यांना गोडरीतीने वागवून घ्यावे. दोन्ही धर्माच्या लोकांना हे इष्ट असावे.

प्रा. दावरना वाटते की मिश्र विवाह झाल्याने पारशी वंशच नष्ट होईल. मला दुसरीच चिंता वाटते. आज मिश्र विवाह जवळ जवळ नाहीत, तरीहि या सुखी आणि समर्थ जातीची लोकसंख्या घटत आहे. खरोखर संख्या वाढली पाहिजे, या गोष्टीची चिंता पारशी नेत्यांनी केली पाहिजे

खरोखर म्हणजे पारश्यांनी आणि भारत सरकारने या बाबतीत विश्वासपात्र माहिती गोळा करून आंकडे प्रसिद्ध केले पाहिजेत आणि मग समाज-विज्ञानाला इलाज विचारला पाहिजे.

मुंबई
१६-१२-७१

चि. शरदला भेटून आल्याचा आनंद झाला. गायत्री मंत्राचा अर्थ तिला हवा होता. तो सांगितला आणि सूचना केली की जेव्हा परिस्थितिमुळे पडून रहावे लागते, तेव्हा ईश्वराने दिलेली ही एक थोड्या वेळासाठी निवृत्ति आहे असे समजून या वेळात थोडे आध्यात्मिक चिंतन करावे. असे चिंतन मनाला आणि बुद्धीला शांति आणि प्रसन्नता देणारे असते.

केवळ मनालाच नव्हे तर शरीरालादेखील ते आरोग्य आणि पुष्टि देते. गायत्री मंत्र खास आरोग्यदायक आहेच. पण सर्व प्रकारचे आध्यात्मिक चिंतनदेखील शरीराला आणि मनाला पुष्टि देते. हा माझा स्वत:चा अनुभव आहे.

आजकाल माझ्या जुन्या पत्रांच्या केलेल्या नकला ऐकत असतो. 'मनोमंथन' या सदराखाली जुनी संस्मरणे लिहवीत असतो आणि माझ्यामागे मी लिहिलेल्या पुस्तकाचे काय करावयाचे, माझ्या पुस्तकालयातील सर्व पुस्तकांची व्यवस्था काय करावयाची, याचाहि विचार चालू आहे. या बाबतीत चि. सरोजच्या सविस्तर सूचना आज मी ऐकल्या. तिने डॉ. माधवदासशीदेखील चर्चा केली. एक दोन स्नेह्यांनी मला सांगितलेच आहे की तुम्ही सर्व गोष्टीचे एक इच्छापत्र--(वसीयतनामा) करून ठेवले पाहिजे. या सर्व गोष्टींचे अगदी तटस्थपणे, शांतपणे आणि प्रसन्नपणे चिंतन करीत आहे आणि आश्चर्य हे की हे चिंतनच मला असाधारण आनंद देत आहे. सर्व गोष्टी व्यवस्थित ठरल्या म्हणजे मनाला केवढा तरी मोठा संतोष मिळेल आणि हीच गोष्ट आरोग्यदायक आहे.

मुंबई
१७-१२-७१

इंग्रज इतिहासकार Arnold Toynbee सर्व जगाच्या (पृथ्वीच्या) लाखों वर्षांच्या इतिहासात जीवन सृष्टीची आणि मानवी सृष्टीची उत्पत्ति किती अल्प आहे इकडे ध्यान खेचतात.

मानवी सृष्टीत ज्या दहा-वीस संस्कृत्या उत्पन्न झाल्या, त्यांच्यापैकी पांच-सहाच सध्या जिवंत आहेत. त्यांच्या इतिहासातून ऐतिहासिक अनुमान काढतात की संस्कृतीचे आपापसात संघर्ष होतात आणि त्यातून नवीन धर्म उत्पन्न होतात. संस्कृति म्हणजे Civilisation. त्याच्यापेक्षा त्यांच्यातून उत्पन्न झालेले धर्म अधिक समर्थ आणि टिकाऊ असतात.

सध्याच्या काळी युद्धसंस्थेचा नाश होण्यापूर्वीच ॲटमची विनाशक शक्ति मनुष्याच्या हातात आली आहे. संभव आहे की या ॲटम शक्तिमुळे मनुष्यप्राणी सबंध मनुष्यजातीचा नाश करील किंवा एक नवीन धर्म उत्पन्न होऊन अहिंसेचे नैतिक संगठन करील.

टॉयनबी व्यापक भूमिकेवरून इतिहासाचे अध्ययन करतो. त्याच्या लिखाणाचे अध्ययन आपल्याकडे व्यापक प्रमाणावर झाले पाहिजे. पण त्याबरोबर जगांतील, आजवरच्या सर्व Civilisations चा इतिहास आपल्या लोकांना ठाऊक झाला पाहिजे. तरच टॉइनबीचे म्हणणे आपल्या लोकांच्या मनावर ठसणार. हे केव्हा आणि कसे व्हावे ? टॉइनबींना गांधीजींचे महत्त्व पटले आहे. गांधीवाल्यांनी त्यांच्याप्रमाणे खोल अध्ययन केले पाहिजे.

मुंबई
१८-१२-७१

पाकिस्तानचे युद्ध आज बंद झाले ही सर्वात आनंदाची गोष्ट झाली. इंदिरेचे जगापुढे उठावदार व्यक्तिमत्त्व सिद्ध झाले. भारतमातेची बहादुरी,

निखालसपणा आणि गांधींनी शिकवलेली उदार नीति—सर्वांची ती प्रतिनिधि ठरली. मोठी मोठी स्वार्थी राष्ट्रें कशीहि वागोत, भारताचा थोरपणा त्यांना दिसून आला. आणि त्यांची स्वार्थी नीति फिकी पडली. आपल्या नायबराजच्या तारेच्या उत्तरादाखल लिहिलेल्या पत्रात मी या सर्व गोष्टी लिहिल्या आहेत.

मारी लुईस नेहमीप्रमाणे आजहि आली. तिने एक खाजगी प्रश्न, विचारला. आणि 'एका स्नेह्याला दिलेले वचन पाळल्यावाचून गत्यंतर नाही, असे ती म्हणाली. मी म्हणालो, "तुला ठीक वाटेल तसे वागण्याला तू स्वतंत्र आहेस. पण दिलेले वचन परिस्थिति समजल्यानंतर परत घेणे हेंच योग्य होईल. अन्यथा सर्वांचेच नुकसान होणार आहे."

भाऊ धर्माधिकारीला पत्र लिहून कळवले की "जिवंत व्रतोत्सव" या पुस्तकाची नवी आवृत्ति त्याने स्वतःच्या कल्पनेप्रमाणे संपादित करावी. आम्ही दोघे एकत्र बसलो असतो तर काही करता आले असते. ते शक्य दिसत नाही. तेव्हा भाऊवरच सर्व सोपवलेले चांगले. नाही तरी माझ्या सर्वच पुस्तकांची पुढची व्यवस्था एखाद्या समितीला सोपवायचीच आहे. तेव्हा एका पुस्तकाच्या एका आवृत्तीची जबाबदारी भाऊला सोपविण्यात काही अयोग्य नाही.

आता फक्त काम राहिले 'मनोबोधा'चे—

भाऊंनी मनुस्मृतीतून पंचवीस श्लोक काढून त्यांच्यावर प्रवचने लिहिली आहेत. आणि त्यांच्या संग्रहाला 'मनुबोध' हे नाव दिले आहे. पुस्तकासाठी प्रस्तावना लिहून देणे सोपे काम आहे. वाचायला वेळ काढणे हीच अडचण.

मुंबई
१९-१२-७१

रमेश पुन्हा आला. त्याच्या मनात घोळत असलेली गोष्ट त्याला एकदाची बाहेर काढावयाची होती. तो म्हणाला, "मला युद्ध आवडते. शत्रूचा

पराभव करावा. त्याचा नाश करावा, आपला विजय व्हावा हेच जीवनाचे सार्थक. तुमचा सर्वोदय मला पटत नाही. पोरकट वाटतो. म्हणे राज्य नसावे. लोकांकडून कर घेऊ नये. सर्व काही आपोआप कसे होईल?" इत्यादि.

मी म्हणालों, "तुम्ही म्हणता तसाच सर्व जगाचा– अगदी कालपर्यंत– विचार होता, सिद्धांत म्हणा वाटल्यास, आजहि जगाचा व्यवहार चालवणारे राज्यकर्ते, उद्योगपति, व्यापारी आणि मजूरदेखील तुमच्याच मताचे आहेत. पण या सर्व क्षेत्रांचा अनुभव घेतलेले थोडे शहाणे लोक म्हणू लागले आहेत की आजवर युद्धांती विजय असे. यापुढे युद्धे जर टाळली नाहीत तर सगळी युद्धे जागतिक युद्धे होणार आणि समस्त मानवजातीचा नाश होणार. असे लोक तरंगी नाहीत. त्यांना जगाचा अनुभव आहे. पुढे काय होणार हे त्यांना स्पष्ट दिसते म्हणून ते टाळावे आणि मनुष्य जातीला वाचवावे, हा त्यांचा प्रयत्न आहे.

ही नवी बाजू तुम्हाला सविस्तर समजावून सांगावयाला मी तयार आहे. तुमच्या शंकांचे समाधान करण्याचे प्रयत्न करीन, पण तुम्हाला ते सर्व पटवण्याची जबाबदारी माझी नव्हे. चर्चेच्या द्वारा विचार विनिमय होऊ शकतो, गैरसमज दूर करता येतात. पण एखादी गोष्ट पटते किंवा अंत:करणातून उगवते ती चर्चेच्या वेळी नव्हे. चर्चेनंतर मनुष्य जेव्हा आत्माभिमुख होऊन चिंतन करू लागतो तेव्हाच त्याला नवे सत्य हळूहळू पटू लागते. जे लोक स्वभावाने म्हातारे झाले आहेत त्यांच्या बुद्धीला नव्या गोष्टी आणि नवे सत्य पटणे शक्य नसते. ते लोक जगाला सोडून जातील. भविष्यकाळ त्यांचा नसणार. आज जगात अशांची संख्या पुष्कळ असली तरी कमी होत आहे. आणि नवी सत्ये अधिकाधिक लोकांना पटू लागली आहेत.

मुंबई
२०-१२-७१

मोठे संकट येऊन पडले आहे. स्वामी. . . .बाबांविषयी पुष्कळ ऐकले होते. या लोकांना भेटावयाला जाणेदेखील सोपे नसते. पण एकदा पोहोचलो

ध्यानामध्ये काय काय दिसते याची तेथे चर्चा निघाली. मी सांगितले, "अगदी लहानपणी सावंतवाडीला रघुनाथ बापू रांगणेकर म्हणून एक गृहस्थ योगी होते. त्यांच्या संग्रहातून काही भजने वगैरे माझ्या वडील बंधूंनी आमच्या वडिलांच्यासाठी उतरून घेतली होती. त्यातल्या दोन ओळी आठवतात:- रक्तांत श्वेत पर्वंचि तदर्थ। श्यामांत नील लखलखते। मसुरेवत् तनु ज्योति या हि व्यापक स्वयंम्भ लखलखते ॥

बस स्वामींनी उत्साहपूर्वक ते वचन घेतले. आणि माझी आठवण कायम ठेवली.

आता त्यांच्या आश्रमातील चार-पांच वर्षांचे कथाप्रसंग लिहून काढलेले एक पुस्तक छापून तयार होत आहे. त्यासाठी माझ्याकडून त्यांच्या प्रमुख शिष्याने प्रस्तावना मागितली आहे. त्यांचा शिष्यवर्ग मोठा असणार. गांधींच्या मंडळीतून एखाद्याची प्रस्तावना असली तर त्यांना खूपच आनंद वाटणार. आणि मी तर शास्त्रनिष्ठा, वचननिष्ठा, ग्रंथनिष्ठा वगैरेंचा विरोध करणारा, विचित्र सनातनी. मला सर्वधर्मांच्या ग्रंथाविषयी आदर आहे. संतांविषयी पूज्यभाव आहे. आध्यात्मिक अनुभवाविषयी अविश्वास नाही. मंत्रशक्तीचादेखील अनादर नाही. आणि तरीहि त्या जुन्या निष्ठा अध्यात्माला बाधक आहेत असे मानणारा. सत्यप्रामाण्य, प्रयोगनिष्ठा आणि अनुभवनिष्ठा यांच्याच आधारे चालणारा.

आता मला प्रस्तावना न देणेच सुरक्षित वाटते. पुस्तक हाती आले आहे. वाचून पाहीन आणि नम्रपणे 'नाही' म्हणेन. दुसरा इलाज दिसत नाही. माझे स्वत:चे विचार आणि अनुभव लिहून काढणे अपरिहार्य होऊ लागले आहे. त्याच्यावाचून गत्यंतर नाही.

मुंबई
२१-१२-७१

वसंतराव आज भेटले हे चांगले झाले. राधालक्ष्मी ट्रस्टचे काम भिजत पडले आहे. हिशोब वेळेवर गेले नाहीत, त्याला नऊ महिने झाले म्हणजे

हद्द झाली. आता ता. २४ ला बाळ येणार. तेव्हा सर्व काही सुधारून व्यवस्थित करावयाचे आहे. हे काम फारच महत्त्वाचे आहे.

पण वसंतरावाशी मी विचारविनियम केला–धर्मानंद स्मारकाविषयी. कॉलेजातील विद्यार्थ्यांना दरमहा काही रुपये देऊन, त्यांच्याकडून अध्ययन करून घेता येईल. ते महानिबंध लिहितील. आणि 'आपण काही केले' असे ट्रस्टला दाखवता येईल. पण ते खरे धर्मानंद स्मारक होणार नाही आणि बुद्धाचा उपदेश समाजात जिवंतपणे पसरविला, असे होणार नाही. मी आपल्या लोकांना नेहमी सांगतो की सनातनधर्माच्या मान्यतेप्रमाणे मुख्य चार अवतारांपैकी बुद्ध हा चालू अवतार आहे. त्याचा प्रभाव आज ख्रिस्ती समाजातील समाजहितैषी विद्वानांच्या मनावर पडू लागला आहे. तसाच परिणाम आजच्या हिंदू समाजावर आणि सबंध भारताच्या धार्मिकतेवर पडला पाहिजे. या दृष्टीने धर्मानंदाचे कार्य समाजापुढे मांडून बुद्धाच्या उपदेशाचा केवळ प्रचार नव्हे, पण विनियोग केला पाहिजे. धर्मानंद सीलोन, ब्रह्मदेश आणि तिबेट मधून जाऊन आले आणि पुढे त्यांनी अमेरिका, रशिया वगैरे देशात जाऊन तिकडील पंडितांना बौद्धधर्म शिकवला. पण शेवटी त्यांना संतोष झाला गांधींच्याकडे येऊनच.

त्यांचेच काम मी माझ्या कल्पनेप्रमाणे जपानात करीत आलो आहे.

मुंबई
२२–१२–७१

इतर गोष्टी महत्त्वाच्या असेनात का, आज मला मुंबईच्या समुद्राला श्रद्धांजलि अर्पण करावयाची आहे. मॅट्रिक पास होऊन कॉलेजात दाखल होण्यासाठी पुण्याला आलो, त्याचवेळी मुंबईला कसले तरी स्वदेशी प्रदर्शन असावे. ते पाहण्यासाठी केशू आणि मी मुंबईला आलो होतो. त्यावेळी मुंबईच्या समुद्राचे प्रथम दर्शन घडले असावे. समुद्रदर्शन मला नवे नव्हते. अगदी लहानपणी कारवारला जाताना मुरगांवला समुद्राचे प्रथम दर्शन घडले होते. तो अद्भुत अनुभव लिहून ठेवलाच आहे.

मुंबईला जेव्हा जेव्हा येतो, समुद्राचा आनंद कधीच शिळा वाटला नाही. मला जर कुणी विचारले की समुद्र आणि हिमालय-यांच्यात अद्भुततेच्या दृष्टीने तुझे हृदय प्रथम स्थान कुणाला देईल ? तर उत्तर देणे मला सोपे जाणार नाही. ईश्वराच्या कृपेने समुद्रयात्रा पुष्कळ घडली आहे. आफ्रिकेला जाताना, युरोप आणि अमेरिकेला जाताना, ब्रह्मदेशाला जाताना आणि जपानला अनेकदा जाताना, आगबोटीने किंवा विमानातून समुद्राच्या विस्ताराचे आणि त्याच्या स्वभावाच्या गांभीर्याचे दर्शन अनेकवार घडले आहे.

आज विचार आला, मुंबईचा समुद्र पाहताच 'हा आमचा समुद्र' म्हणून आपलेपणा वाटतो. सबंध हिंदुस्थानला आपण भारतमाता म्हणतो. रोज प्रार्थनेच्यावेळी पर्वताला मातेचे दूध देणारे स्तन आणि समुद्राला तिची साडी म्हणतो. येथील पहाडांनादेखील आमच्याविषयी आपलेपणा वाटत असेल, असे मनात येते. पण या समुद्राच्या मनात आमच्याविषयी आपुलकी वाटत असेल काय ? या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. जणू समुद्र म्हणतो : मी लाखों वर्षांचा साक्षी. किती आले, किती गेले. कुणीच माझे नव्हे अथवा सर्वच माझे.

मुंबई
२३-१२-७१

'स्मरणयात्रे'नंतर कॉलेजच्या दिवसातील अनुभव लिहिण्याचा संकल्प केला होता. त्या चार वर्षात मुख्य विचार एकच होता की आपल्या पुढील सर्व आयुष्याला कोणते वळण द्यावे. चांगल्या डिग्र्या मिळवून, सरकारी नोकरी करून, सरकारात आणि समाजात पुढे यावे ? धनवान व्हावे आणि स्वत:च्या पुढच्या पिढीला त्याच मार्गात अधिक उन्नति करावयाला मदत करावी ? हा आदर्श आमच्या जातीपुढे आणि नात्यागोत्यापुढे होताच. एका वडील बंधूंनी स्वत: त्या मार्गाने जाऊन मला तोच सल्ला दिला, पण तो मी नाकारला. पण वकील, बॅरिस्टर होऊन पुढारी व्हावे, किंवा डॉक्टर होऊन लोकांचे दु:ख निवारण करावे हे मला पसंत होते, पण शेवटी निर्णय

केला की आपण इंजिनीयर होऊन जंगलातून रस्ते तयार करावेत. आणि लहानमोठ्या शहराचे 'टाऊन-प्लॅनिंग' करावे.

जर क्रांतिकारी विचारांनी जोर केला नसता तर इंजिनीयर खात्रीने झालो असतो. स्वातंत्र्यासाठी स्वीकारलेल्या क्रांतीतून अध्यात्मात शिरलो एरव्ही शिरलो नसतो. केवळ स्वामी विवेकानंदावाचून अध्यात्माची गोडी माझ्यावर 'सवार' झाली नसती. राजकीय क्रांति आणि आध्यात्मिक क्रांति यातच माझे सार्थक आहे हे पटल्यामुळेच गांधीमार्ग मला पटला. त्यांच्या अहिंसेमुळे नव्हे. गांधीमधील क्षात्रतेज प्रथम पटले. त्यानंतर माझ्या समाज-विज्ञानाने मला अहिंसेचे महत्त्व पटवले. त्यात गांधीची मदत पुष्कळ झाली.

लाजपतरायांच्या सहा वर्षांच्या हद्दपारीमुळे साखर न खाण्याचे व्रत मी-सहा वर्षांचे-घेतले. हा जुना प्रसंग लिहिता लिहिता वरील सर्व गोष्टी आज आठवल्या. आणि आता वाटते, माझा सगळा जीवनविकास क्रमबद्धच झाला. career मधील दोष प्रथमपासून दिसल्यामुळे तो मार्ग प्रथमपासून टाळत आलो याचे समाधान आहे.

मुंबई

२४–१२–७१

नागालँडमध्ये काम करण्यासाठी तेथे कायमचा जाऊन राहिलेला आमचा नटवर ठक्कर आज पुन्हा भेटला. बराच वेळ बसून त्याने आपल्या आजवरच्या आणि यापुढच्या कारकीर्दीविषयी बरेच प्रश्न विचारले. नटवर राहणारा डहाणूचा, त्यामुळे तो महाराष्ट्रीयहि खरा आणि गुजराती पण. नागालँडमधील एका ख्रिस्ती नागा मुलीशी लग्न करून तो तेथे स्थायी झाला आहे. ही कार्यनिष्ठा सामान्य नव्हे. आपले सर्वच राष्ट्रसेवक याची कदर करतात. माझा तर लाडका आहेच. याची मुलगी शकुंतला–आपनला वनस्थळीच्या विद्यालयात शिकते. तिच्याशीदेखील माझा पत्रव्यवहार आहे.

गांधीस्मारक निधीचे देवेंद्रकुमार गुप्त नटवरकडून महत्त्वाचे काम

घेऊ इच्छितात. जयप्रकाश नारायणचे हस्तक श्री आराम त्याच प्रदेशात स्वतःचे काम करीत असतात. तेहि मला भेटले.

सर्व परिस्थिति समजून घेऊन देवेंद्रानी यांच्या कामात कशी मदत करावी, याविषयी खूप विस्तारपूर्वक नटवरला सांगितले. बाप स्वतःच्या मुलाशी बोलत असावा इतकी आत्मीयता त्यावेळी मला वाटत होती.

अशाच प्रकारच्या अनेक प्रश्नांची चर्चा केल्यानंतर, नटवरला समजावून सांगितले की भारताचे प्रश्न म्हणजे जगाचेच प्रश्न थोडक्यात पण उत्कटतेने आपल्याकडे आहेत. भारत ही इतिहास विधात्याची प्रयोगभूमि आहे. आपण आपले प्रश्न सोडवू शकलो तर जगाचे सर्व जटिल प्रश्न सोडविण्याची योग्यता आपल्यात येईल. हें सर्व सांगत असताना एका हिंदी काव्यातील भारतासाठी वापरलेला नवा शब्द आठवला –जगदाचार्य.

मुंबई
२५–१२–७१

आज नाताळचा पवित्र दिन. किती आनंदाची गोष्ट की उत्तम ख्रिस्ती––डॉ. सिक्वेरा, त्यांची पत्नी आणि मुले यांची सकाळीच भेट झाली. मी त्यांना सांगितले की " भगवान येशू परमभागवत, बालब्रह्मचारी आणि पतितोद्धारक असल्याने आम्ही त्यांना वैष्णवोत्तम मानतो आणि आजचा दिवस आमचाहि एक सण आहे. तुमचाहि तो सण आहे. याचा परस्परांना आनंद असो. गांधीजींच्या आम्हा आश्रमवासीयांची भूमिका भारतातील सर्व हिंदूंची आणि सर्व भारतीयांची झाली पाहिजे. यासाठी आम्ही लोकांनी पराकाष्टा केली पाहिजे. ती अजून करावयाची बाकी आहे. पाहू पुढल्या वर्षी दोन–तीन महिन्यापासूनच जोराने पूर्व तयारी केली पाहिजे.

पारशी लोकांच्या धर्मसंस्थापक भगवान जरथुष्ट्राविषयी आणि भगवान महम्मद पैगम्बराविषयी देखील असाच पुरा प्रयत्न केला पाहिजे. पण येशूपासून प्रारंभ करण्यात विशेष लाभ आहे. या धर्मांची संगठने जबरदस्त आहेत. एकेकाळी प्रचार करता करता त्यांच्यात संकुचितता आणि

कडवेपणा आला असेल, पण आज तसे वातावरण नाही. ईसाई लोकांशी राजनैतिक भांडणहि नाही आणि या देशात ईसाई लोकांची संख्या पुष्कळ असून ती सर्वत्र पसरलेली आहे.

ईसाई धर्माच्या बाबतीत सफलता मिळाल्यानंतर बाकीच्या बाबतीत काम करणे सोपे जाईल. ईसाई लोकांनी वेदांताचा अभ्यास चालवला आहे. हिंदू समाजांतील गुणदोष ओळखून त्याचा फायदा ते घेऊन चुकले आहेत. त्याच्यामुळे परस्पर संबंध वाढवण्यात आता अडचणी उरल्या नाहीत.

मुख्य गोष्ट म्हणजे असा प्रयत्न करणारे आपण हृदयाने खरेखुरे येशूचे भक्त नले पाहिजे. त्यात कच्चेपणा नसावा, मतलब नसावा.

मुंबई
२६–१२–७१

स्वामी मुक्तानंदांचे नवे पुस्तक लवकरच प्रसिद्ध होईल–निरनिराळ्या लोकांशी झालेले वार्तालाप, त्यांच्या शिष्यांनी लिहून ठेवले आहेत. त्यांचा हा संग्रह आहे. पुस्तक तीनशे पानांचे होईल. पैकी एकशे चव्वेचाळीस पाने वाचावयाला मिळाली. सद्गुरुनिष्ठा त्यांच्याकडून प्राप्त होणार. शक्तिपात आणि ध्यानात दिसणारा लाल, शुभ्र, श्याम आणि अगदी आत दिसणारा शुभ्र बिंदु––या गोष्टींवर त्यांचा भर आहे. वेदांत आणि योग यांच्या समन्वयातून ही साधना विकसित झाली आहे.

स्वतःच्या साधनेच्या दृष्टीने हिंदुधर्मात सुधारणा करण्याची त्यांची तयारी दिसते. पण बाकी सर्व बाबतीत रूढीनिष्ठाच यांनी स्वीकारलेली असावी.

स्वामी विवेकानंदांनी रामकृष्णांचा आधार घेतला. त्याचप्रमाणे मुक्तानंद आपल्या गुरूजींचा आधार घेतात आणि गुरुनिष्ठेचे माहात्म्य समजावून सांगतात. ते एक शुभलक्षण आहे. त्याचा परिणाम चांगला दिसतो.

यांची साधना बरीचशी 'टेक्नीकल' आहे. पण इतर रीतीने सांप्र-

दायिकता दिसत नाही. त्यामुळे यांच्या मार्फत पुष्कळ काम होईल अशी आशा बाळगण्यास जागा आहे. प्रत्यक्ष भेटीनंतर मला स्पष्ट कल्पना येऊ शकेल. एकदा दिल्लीला भेटलो होतो. ते औपचारिक होते. पण त्यांना माझ्याविषयी कुतूहल उत्पन्न झाले आहे. पुढे काय होणार, ईश्वर जाणे !

मुंबई
२७-१२-७१

पुष्कळ दिवसांनी श्रीपाद जोशी भेटले. सन १९३८ ते ४६ पर्यंत-- म्हणजे आठ वर्षे माझ्या जवळ होते. नाना आठवले आणि श्रीपाद यांचा घनिष्ट संबंध. एका सारस्वत मुलीशी श्रीपादचे लग्न आम्ही ठरविले ही गोष्टहि मला आठवली. माझ्याजवळ राहिल्याने श्रीपादला गुजराती आणि हिंदीचा परिचय झाला यात काही विशेष नाही. पण माझ्या प्रेरणेने श्रीपादने उर्दू भाषा शिकून घेतली आणि आज महाराष्ट्रात उर्दूचा परिचय असलेल्या, अगदी थोड्या लोकात श्रीपादला मानाचे स्थान आहे, याचा मला अभिमान वाटतो आणि त्या वेळी मी विसरून जातो की उर्दू शिकण्याचे प्रयत्न मी स्वत: दोन-तीनदा केले पण माझ्यात ती निष्ठा टिकली नाही.

किती तरी नवयुवक माझ्याकडे आले माझ्या कामात त्यांनी भाग घेतला, माझ्याशी एकरूप झाले, त्यांना प्रेरणा मिळाली. पण अशांना स्वत:च्या कामात बांधून ठेवण्याचा लोभ मी कधीच धरला नाही, असे बहुतेक सर्व लोक माझा सहवास पोटभर मिळवून, आपापले स्वत:चे जीवन-कार्य पसंत करून ठिकठिकाणी नांदत आहेत. प्रत्येकाची शक्ति निराळी, कार्यपद्धति स्वत:चीच आणि स्वत:च्या पुरुषार्थाने प्रत्येकाने समाजात चांगले स्थान मिळवले आहे. माझ्याशी संबंध होता हे ते गौरवाने लोकांना सांगतात. मी मात्र पुष्कळशा गोष्टी विसरून गेलो आहे. पण जेव्हा भेटतात तेव्हा, त्यांना पाहून, पुत्रदर्शनाइतका आनंद मला होतो आणि त्यांच्या प्रतिष्ठेने मी फुलून जातो. श्रीपाद दर्शनामुळे हे सर्व आठवले. परवा नटवर ठक्कर भेटला होता, तेव्हाहि असेच बरे वाटले होते.

मुंबई
२८-१२-७१

पुण्याहून भाऊ धर्माधिकारी आले. गुलवाडी आले, त्यांचा फोन. दोघे उद्या भेटतील. जुगतरामभाई वेडछीला बोलावतात. या तिन्ही गोष्टी माझ्या नव्या कार्यक्रमाचे सूचन करीत आहेत. उद्या भाऊंना मुसलमानी सणांविषयी सांगावयाचे आहे. पारशी सणाविषयी थोड्या गोष्टी केल्याच आहेत. भाऊना धावपळ साधायची नाही. पण पत्रव्यवहाराने पुष्कळ काम करता येईल. सर्व धर्मांचे सण सर्वांनी पाळावे, हा कार्यक्रम तीस वर्षांपूर्वीचा. स्वराज्य होताच जोराने अंमलात आणावयास पाहिजे होता. पण गांधीजींच्या जागी जवाहरलाल आले. त्यांनी गांधीकडून आशीर्वाद आणि प्रतिष्ठा मिळविली, पण त्यांचा कोणताच कार्यक्रम आपलासा केला नाही. फार तर पैसे दिले.

आश्चर्य म्हणजे राजगोपालाचारी यांनीहि या दिशेने काहीच केले नाही. आता गांधीच्या तेजस्वी, क्रांतिकारी अहिंसेचे माहात्म्य तिम्मप्पा पुढे करणार. त्यांनी एकतर अखिल भारतीय वातावरण हाती घ्यावे, किंवा आप्पा पटवर्धनाप्रमाणे आपल्या प्रदेशाला जागृत करावे. पण आता ते प्रकृतीने थकले आहेत.

मुंबई
२९-१२-७१

'भेटावयाला येणाऱ्या लोकांचा दिवस', असे आजच्या दिवसाचे वर्णन होऊ शकेल. 'येणार, येणार' म्हणून कित्येक महिने गाजलेले शंकरराव गुलवाडी शेवटी आज येऊन भेटले. त्यांना तिम्मप्पांच्या पुस्तकाविषयी सगळे समजावून सांगितले. आता ते माधवदासना आणि शांतिभाईंना भेटतील. ते पुस्तक कसे असावे, याविषयीची माझी कल्पनाहि त्यांना सांगितली.

जुगतरामभाईंच्या आमंत्रणाला मी पाठवलेले उत्तर त्यांना आवडो, अशी प्रार्थना आहे. इंदिरा येईल अशी मला खात्री नाही. मग मात्र, यथाकाळी मला जावेच लागेल. पण मी मुद्दाम मौन राहिलो.

ठरल्याप्रमाणे भाऊ धर्माधिकारी आले. आता काही दिवस ते रोज येतील. उद्या दोन ते पांचपर्यंत बसणार आहेत. त्यांचे बंधू नाना भेटून गेले. याचा मला विशेष आनंद झाला. काम काहीच नव्हते.

नाना धर्माधिकारीच्या नंतर श्रीपाद जोशी माझ्याकडे रहावयाला आला. पण नानाकडून माझ्या कामाचा ताबा घेतला चि. सरोजनेच.

आज श्रीपादची पत्नी माणिक आणि मुलगी माया (तेवीस वर्षांची) भेटून गेल्या. बऱ्याच वेळ बसल्या. मायेचा खरा परिचय आजच झाला. बापाची लाडकी मुलगी आहे हे सहज दिसून येते. तिने सगळे शिक्षण प्रथम मराठीतून घेतले आणि पुढे Linguistics ची तयारी, फार थोडच्या वेळात इंग्रजीतून केली आणि उत्तम यश मिळविले. हा विषय गणिताइतकाच व्यवस्थित आणि रोचक आहे. मी मायेला दिल्लीला येण्याचे आमंत्रण दिले आहे. (सरोजने पण दिले आहे.) मी तिला आग्रहाने सांगितले की "येशील तेव्हा Linguistics ची थोडी पुस्तके बरोबर आण. तुझ्या मदतीने या विषयाचा आनंद मला घ्यावयाचा आहे". ज्ञानानंदासाठी मनुष्य कधीच म्हातारा होत नाही.

मुंबई
३०–१२–७१

स्वामी विवेकानंदाविषयी लिहिलेले माझे दोन मराठी लेख काल आणि आज वाचले. मला वाटले की आता देवी उपासनेविषयी संतोषकारक लिहू शकेन. पण पूर्वीच्या लोकांनी देवीउपासना (दक्षिणाचारी देखील) इतकी बिघडवलेली आहे की त्यांतून सकाम संकल्प आणि मंत्रोपासना काढून टाकणे शक्यच नाही. अद्वैत वेदांत आणि विश्वात्मैक्य भाव–यांतून उत्पन्न होणारी विश्वसेवा– हीच खरोखर शक्ति उपासना आहे.

याविषयी आज मी लिहिले खरे. विचार शुद्ध आहे, पण देवी उपासकांच्या हृदयाला स्पर्श करू शकेल, याची मला खात्री वाटत नाही.

लहानपणी मंगेश-महालक्ष्मीची पूजा केली होती. ही माझी पहिली देवीपूजा. त्यानंतर बडोदा सोडताना केशवरावांकडून व्यवस्थित दीक्षा घेतली आणि हिमालयात, माझ्या पद्धतीची देवी-उपासना चालवली. नवार्ण मंत्राचा पुष्कळ जपहि केला. ते सर्व आठवून देखील अद्वैत वेदांताची शुद्ध देवी-उपासना कशी असावी, याची आकर्षक योजना मी आजवर मांडू शकलो नाही, अशीच मनावर छाप आहे.

तेव्हा आता अंतर्मुख होऊन देवी-उपासनेचे नवीन स्वरूप ध्यानातून उत्पन्न करावयाचे आहे. त्या स्वरूपाचे दर्शन मिळाल्यानंतर विस्तार करणे सोपे आहे. पण ध्यान मात्र काव्यमय आणि गूढ झाले पाहिजे. थोडक्यात म्हणजे, देवीचा साक्षात्कारच झाला पाहिजे. माझ्याजवळ पूर्वतयारी आहे. उपासनेची शुद्ध कल्पना आणि त्याला अनुरूप अद्वैत दर्शनहि आहे. त्या दिशेने आजवर सेवाहि केली आहे. आता फक्त शिथिलता दूर करून उत्कटता वाढली पाहिजे.

मुंबई

३१-१२-७१

सन १९७१ चा आज शेवटचा दिवस. खरोखर पाहिले तर सगळे दिवस सारखे. निसर्गाप्रमाणे फक्त दिवस आणि रात्रीत फरक असतो. शुक्लपक्ष आणि कृष्णपक्षात फरक असतो उन्हाळा, पावसाळा, हिवाळा— यांतील फरक स्पष्ट आहे. बाकी सगळे फरक कृत्रिम. ख्रिस्ती लोकात नाताळच्या सणानंतर लगेच नूतनवर्ष येते. तेव्हा त्यांच्या वाट्याला नाविन्य खरे. आपणाला एक वर्ष संपले आणि दुसरे सुरू झाले, यात काहीच फरक नाही. वासरी आणि चिंतन लिहितो. त्यामुळे वर्षाचे पुस्तक बदलते, हाच मोठा फरक.

खरोखर म्हणजे एखादा दिवस रिकामा काढून गेल्या वर्षाची वासरी

वाचली पाहिजे. कोठे कोठे प्रवास केला, कोणत्या कामात भाग घेतला, कोण कोण भेटले, कोणी कोणी जगाचा निरोप घेतला सर्व पुन्हा एकदा आठवून, त्यातून महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या, त्या जर निराळ्या काढण्याचे ठरवले तर पांच-दहा गोष्टीच निघतील. आलेला दिवस जगावाच लागतो. आणि मी तर पारमार्थिक माणूस. आलेल्या दिवसाचे गांभीर्याने स्वागत करतो, आणि निजण्यापूर्वीच तो दिवस विसरण्याची तयारी करतो. यात विक्षेप म्हणजे हे चिंतन मी पसंत करत नाही. ते येऊन चिकटते. आज प्रश्न विचारला, "वर्ष संपत आहे, पैकी पदरात काय पडले ?" उत्तर मिळाले, केवळ हे चिंतनच पदरात पडले. आता यातून काढून काय टाकावयाचे आणि राहू काय द्यावयाचे हे पहावे लागणार. तेवढा वेळ काढलाच पाहिजे.

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

REFBK 0019009

REFBK-0019009

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों. दि: ..................